ऐतिहासिक-लेख-संग्रह.

भाग दहावा.

स. १७९६ दिसेंबर ते स. १७९८ डिसेंबरअखेरपर्यंत.

बाजीरावसाहेबांची कारकीर्द.

हें पुस्तक

वासुदेव वामन खरे,

यांनीं तयार केलें.

पुणें येथें "आर्यभूषण" छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें

व

वासुदेव वामन खरे यांनीं मिरज येथें प्रसिद्ध केलें.

शक १८४२: सन १९२०.

किंमत ४ रुपये.

पोस्टेज तीन आणे.

बाजीरावसाहेबांची स्थापना.

(दिसेंबर सन १७९६ ते जुलै १७९७.)

आजपर्यंत ऐतिहासिक लेखसंग्रहाच्या नऊ भागांत आलेलीं पत्रें, व या दहाव्या भागापासून पुढें येणारीं पत्रें यांत एक वैलक्षण्य आहे तें येथें प्रथम नमूद केलें पाहिजे. आजपर्यंत छापलेल्या पत्रांत पेशवे व त्यांचे मुत्सद्दी व सरदार यांनीं स्वतः पाहिलेल्या व अनुभविलेल्या गोष्टी वर्णिल्या आहेत, सबब त्या पूर्णपणें प्रमाणभूत होत. प्रत्येक स्वारींतल्या कारकून वगैरे लोकांनीं व पटवर्धनांचे वकील पुणें दरबारीं होते त्यांनीं लिहिलेल्या गोष्टींचेंही प्रामाण्य निर्विवाद आहे. कारण कीं स्वारींत ज्यानें जें पाहिलें तें लिहिलें; व वकिलांनीं सुद्धां नानाप्रकारच्या मसलतींचीं धोरणें व तपशील आपापल्या धन्यांस नक्की समजावे म्हणून ते मुख्य कारभारी नाना फडनवीस यांजकडूनच प्रत्यक्ष समजून घेऊन पत्रें लिहिलेलीं आहेत. तसल्या प्रकारचीं पत्रें यापुढें केव्हां आल्यास तो ऐतिहासिक पुरावा सर्वांशीं ग्राह्य धरण्यास हरकत नाहीं. पण आतां यापुढच्या कारकीर्दींत तसलीं पत्रें पटवर्धनी दप्तरांत पुष्कळशीं सांपडण्याचा संभव कमी ! बाजीरावींत पटवर्धनांचें व नानांचें प्राधान्य नाहींसें होऊन कारभार भलत्याच लोकांच्या हातीं गेला. त्या कारभाराची इत्थंभूत हकीकत पटवर्धनांच्या दप्तरांत कुठून सांपडणार ? पुण्यांतल्या कारकुनांनीं पत्रें लिहिलेलीं यापुढें छापिलीं जातील त्यांत लेखकांच्या डोळ्यांसमोर घडत असलेल्या गोष्टींचा उल्लेख जेथें येईल तेथें त्या गोष्टी खऱ्या मानण्यास प्रत्यवाय नाहीं. बाजारबातम्या म्हणून ज्या लिहिलेल्या आहेत त्यांतलें सत्य तारतम्यानेंच निवडून घेतलें पाहिजे !

मराठी राज्य काबीज करण्यासाठीं इंग्रज लोक अगदीं टपून बसले आहेत, राज्यांत दंगेधोपे माजून राहिले तर तें इंग्रजांच्या

घशाखालीं उतरण्यास फार अवधि लागणार नाहीं, या गोष्टी नाना-खेरीज इतर कोणास त्या काळीं दिसत होत्या असें वाटत नाहीं. राज्याचा कारभार आपल्या हातीं राहिला तरच राज्यांत स्वस्थता नांदून त्याचा उत्कर्ष होणें शक्य आहे अशी जी नानांची समजूत होती ती केवळ स्वार्थमूलक होती असेंही म्हणवत नाहीं. इंग्रजांच्या वर्चस्वाची आपत्ति टळावी व मराठी राज्याचें स्वातंत्र्य कायम रहावें म्हणून मागच्या प्रकरणांत वर्णिलेलें महाडचें कारस्थान नानांनीं रचिलें, आणि त्यांत त्यांचें अपूर्व बुद्धिकौशल्य दिसून आलें, हें निर्विवाद आहे. मात्र या कारस्थानाचें पुढें काय झालें हें पाहिलें तर असें म्हणावें लागतें कीं, महाडच्या कारस्थानापासून मराठी राज्यास अथवा खुद्द नानास सुद्धां कांहींएक फायदा झाला नाहीं ! उलट तेजोभंग, द्रव्यापहार, कारागृहवास व अखंड चिंता याचें चक्र जें एकदां त्यांच्या पाठीस लागून राहिलें त्यांतून मृत्यूनें त्यांची सुटका केली ! इतक्या शहाणपणानें लढविलेल्या मसलतीचें असें विपरीत पर्यवसान कां व्हावें याचा शोध करूं जातां असें दिसून येतें कीं यांत नानांच्या बुद्धीचा दोष नसून तो राज्याच्या ऱ्हासकाळाचा प्रताप होय ! कारण कीं नानांच्या ऐन अमदानींतले त्यांचे साहाय्यकारी हरीपंत, पाटीलबावा व तुकोजी होळकर हे परलोकवासी झाले होते, आणि परशुरामभाऊ कैदेंत पडले होते ! अशा लोकांशीं व्यवहार करण्याऐवजीं यापुढें ज्या इसमांशीं वागणें नानांच्या कपाळीं आलें ते बाजीराव व दौलतराव शिंदे हलक्या कानाचे, हलक्या मनाचे नादान मनुष्य असून शिवाय ते दगलबाज पाजी लोकांच्या मसलतींत गुरफटले गेले होते ! स्वतःच्या मनगटाचें सामर्थ्य हें नानाचें बळ कधींच नव्हतें ! येऊन जाऊन अकलेवर व जवळच्या द्रव्यावर त्यांची मदार ! पाजी लोकांशीं प्रसंग पडतांच त्यांची अक्कल गुंग होऊन गेली आणि द्रव्यापहार होऊन त्यांचे हाल झाले ते निराळेच ! यापुढच्या नानांच्या सर्व खटपटी म्हणजे बोक्यानें

धरलेल्या उंदरानें निसटून जाण्याचे यत्न करावे त्यासारखाच प्रकार होय ! नानांचें चरित्र जें यापुढें यावयाचें आहे त्याचें हें सामान्य स्वरूप आधींच सांगून ठेविलें आहे. ज्याला तपशील पहावयाचा असेल त्याला तो यापुढच्या प्रत्येक प्रकरणांतून पहावयास सांपडेलच !

बाजीरावसाहेबांच्या मनांत नानाविषयीं भीति व मत्सर लहानपणापासूनच वसत होता. पेशवाईच्या गादीवर त्यांची स्थापना व्हावी म्हणून नानानीं मागच्या भागांत वर्णिलेलें जें कारस्थान रचिलें, त्यायोगानें त्यांविषयींची श्रीमंतांच्या मनांतली भीति कांहीं तरी कमी व्हावी ती न होतां अधिकच बळावली ! भोसले, इंग्रज व निजामअल्ली यांस या जुन्या कारभाऱ्यानें अनुकूळ करून घेतलें तें आपली स्वतःची सत्ता नेहमीं कायम रहावी व वाटेल तेव्हां आम्हांस गादीवरून काढून टाकतां यावें याकरितांच होय, अशी त्यांची पक्की समजूत झाली होती ! ‘ हा नानाचा सासुरवास जन्मभर सुटणार नाहीं. मग आम्हीं राज्यसुख भोगावें केव्हां ? ’ असें मनांत आणून श्रीमंतानीं सर्जेराव घाटग्याच्या द्वारें शिंद्यांशीं नानांविरुद्ध गुप्त करार कसा कसा केला तो प्रकार मागच्या भागांत आलाच आहे. त्या करारांत श्रीमंतांच्या जीवास अगर अब्रूस नानांकडून धक्का न पोंचूं देण्याचें जोखीम शिंद्यानीं स्वतःवर घेतलें होतें ! ही गोष्ट नानांस आजपर्यंत माहीत नव्हती ती आतां ते पुण्यास आल्याबरोबर त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आली. कारण कीं वानवडीवर शिंद्यांचा व खराडीवर बाजीरावसाहेबांचा तळ होता तरी बाजीरावसाहेबांच्या गोटावर शिंद्याच्या पलटणांचा पहारा अजून कायमच होता ! जे श्रीमंत आपणांस इतके भितात ते शिंद्याकडून आपणांस कैद करविणार नाहींत कशावरून ? असें भय नानांच्या मनांत उत्पन्न होणें साहाजिक होतें. शिंद्यांचीं पलटणें उठल्याशिवाय आपण तुमच्या भेटीस येणार नाहीं असें त्यांनीं श्रीमंतांस सांगून पाठविलें. बाजीरावसाहेबांस पेशवाईचीं व स्वतःस त्यांच्या कारभाऱ्याचीं

वस्त्रें सातान्याच्या महाराजांकडून मिळण्याची तजवीज नानानीं केली होती, पण वर सांगितलेल्या कारणांमुळें श्रीमंतांचा व नानांचा शिलशिलाच जर मुळीं बंद झाला, तर श्रीमंतांस वस्त्रें मिळण्याची गोष्ट घडून यायची कशी ? अशी अडचण उत्पन्न होऊन साराच कारभार बंद पडला. मग दौलतराव शिंद्यानीं स्वतः नानाकडे येऊन तुम्हांस दगा फटका वगैरे कांहीं एक होणार नाहीं असें खात्रीनें आश्वासन दिलें, व भोसले वगैरे सरदार या बोलण्यांत मध्यस्थीस पडले, तेव्हां ठरलेल्या तारखेस म्हणजे ता० ४ डिसेंबर सन १७९६ (मार्ग० शु० ५ शके १७१८) या दिवशीं बाजीरावसाहेबांची व नानांची गांठ पडण्याचा योग एकदांचा जमून आला; आणि श्रीमंत गादीनशीन झाले व नाना त्यांचे कारभारी झाले !

"श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांची व श्री॥ राजश्री नानांची निखालसता जाली नव्हती. शिंद्यांचा कंपू श्रीमंतांजवळ, याजमुळें यांच्या जाण्यास दिक्कत होती. त्यास काल प्रातःकाळींच राजश्री दौलतराव शिंदे नानाचे डेऱ्यास आले. एक प्रहर बोलणीं होऊन निखालसता जाली. उपरांतिक श्रीमंत भोजनाकरितां म्हणून सडे वानवडीवर आले. नानांसही बोलाविलें. नाना भोजनास गेले होते. तेथें बोलणें चालणें होऊन निखालसता जाली. उपरांतिक श्रीमंत खराडीवर मुक्काम होता तेथें गेले. नाना शिंदे यांचे डेऱ्यास जाऊन खराडीस गेले. वस्त्रें जालियानंतर येथें गोटास आले."

शिंदे, होळकर व भोसले हे सरदार पुणें मुक्कामीं असूनही या समारंभास आले नाहींत. मुत्सद्दी व मानकरी यांपैकींसुद्धां कोणी हजर नव्हतें.

श्रीमंतानीं शिंद्यांस दोन कोट रुपये देऊं केले तेव्हांच तें द्रव्य नानांकडून युक्तीनें अगर जबरीनें काढून शिंद्यांस द्यावयाचें असें

त्यानीं मनाशीं ठरविलें होतें; व द्रव्य मिळावयाचें तें नानांकडूनच हें शिंद्यांसही उघड दिसत होतें. शिवाय " शिंद्यानीं बाजीराव-साहेबांची स्थापना करून हिंदुस्थानांत निघून जावें व ते मार्ग चालूं लागले म्हणजे नानानीं त्यांस हप्त्याहप्त्यानें एक कोट रुपये द्यावे " असा नानांचा व शिंद्यांचा करार ठरला होता, तें नानांजवळ द्रव्य मागण्यास निमित्त होतेंच ! तात्पर्य नानाचा कारभार कांहींच चालूं द्यायचा नाहीं आणि त्यांचा सर्व पैका मात्र हिरावून घ्यावयाचा, असें वागणुकीचें धोरण शिंदे व बाजीराव यांनीं आपसांत ठरविलें होतें ! त्या धोरणास अनुसरून पेशवाईच्या गादीवर बाजीरावांची स्थापना झाल्याबरोबर शिंद्यानीं फौजेच्या देण्यापैकीं कांहीं पैका देण्याविषयीं नानांस तगादा बसाविला. एकानें अद्वातद्वा मागावें व दुसऱ्यानें तुम्हीं येथून तळ हालविल्याखेरीज कांहीं देत नाहीं म्हणावें; असें होतां होतां आठ चार दिवसांत भांडण इतक्या विकोपास गेलें कीं, आपणांवर शिंद्यांचा घाला केव्हां येईल याचा नेम नाहीं असें सम-जून नाना फडनवीस रात्रंदिवस घोड्यावर जिनें ठेऊन व आरब वगैरे पायदळ सज्ज करून हुशारीनें राहूं लागले ! अशी कांहीं दिवस ओढाताण झाली, श्रीमंतांनीं मध्यस्थी पतकरून उभयताचीं आर्जवें केलीं, आणि शेवटीं नानानीं शिंद्यास द्रव्य दिलें ! तें द्रव्य किती दिलें हें नक्की समजत नाहीं. परंतु लोकवार्ता वीस लाखांची उठली होती ती बहुधा खरी असेलसें वाटतें.

आपण पेशवे झाल्यावर सवाईरावसाहेबांप्रमाणें तुमच्या ओंज-ळीनें पाणी पिणार नाहीं असें बाजीरावसाहेबांनीं नानांस पूर्वींच बोलून दाखविलें होतें. आतां तर शिंद्यांची व त्यांची गट्टी जमल्यामुळें ते नानांच्या धोरणाप्रमाणें वागण्याचा संभवच उरला नाहीं. पूर्वीं कांहीं उपद्यापी लोकांनीं फंद फितूर केल्यामुळें त्या लोकांस नानांनीं हद्दपार केलें होतें, तेच लोक आतां बाजीरावसाहेबांजवळ येऊन राहिले व दादासाहेबांच्या वेळची सारी भुतावळ पुन्हां श्रीमंतांजवळ जमली !

'या लोकांचा आम्हांस विश्वास येत नसल्यामुळें यांस काढून लावावें असें नानांनीं सांगून पाठविलें असतां तसें करण्याचें श्रीमंतांनीं साफ नाकारलें! पूर्वींच्या पेशव्यांप्रमाणें आपण हुजरातींत येऊन रहावें व आपल्या गोटाचा बंदोबस्त आपला आपण स्वतः ठेवावा, हेंही नानांचें म्हणणें त्यांस आवडलें नाहीं. त्यांच्या मतें आम्हांस पकडून कैदेंत घालण्याकरितां हा नानांचा कांहीं तरी कावा असावा!

श्रीमंतांनीं शिंद्याशीं केलेला गुप्त करार जसा नानांस माहीत नव्हता, तसा त्यांनीं मोंगलांच्या बाबतींत नानांशीं केलेला करार शिंद्यांस माहीत नव्हता! मशीरउल्मुल्क यानें पुणें दरबारास तो महाडचा करार पुरा करून देण्याबद्दल तगादा लाविला तेव्हां आतां कोठें शिंद्यांचे डोळे उघडले! तत्काळ तो करार अमान्य करण्याबद्दल त्यांनीं श्रीमंतांस आग्रहाची विनंती केली. खर्ड्याच्या स्वारींतली जी खंडणी मोंगलांकडून यावयाची होती तींत शिंद्यांचा मोठा हिस्सा होता व मोंगलांकडून मिळावयाच्या मुलखांतही त्यांची वांटणी ठरली होती. आम्हांस विचारल्याखेरीज ठरविलेला—बत्तीस लाखांचा मुलूख मोंगलांस परत देण्याचा व सबंध दोन कोट रुपये खंडणी त्यांस माफ करण्याचा—करार आपण मान्य करणार नाहीं असें शिंद्यांनीं श्रीमंतांस व नानांस साफ सांगितलें. खरें पाहिलें तर मुलूख अथवा खंडणी या दोहोंपैकीं कोणचेंच कलम अद्यापि पुरतेपणें मराठ्यांच्या पदरांत पडलें नव्हतें व तीं दोन्ही कलमें उगवून घेण्याकरितां पुन्हां खर्ड्याच्या स्वारीसारखीच दुसरी स्वारी करणें अवश्य होतें! तशी स्वारी करण्याचें सामर्थ्य आतां आपल्या सरकारांत राहिलें नाहीं असें समजूनच खंडणी व मुलूख सोडण्याची आशा नानांनीं निजामअलीस दाखविली व त्यास बाजीरावांची स्थापना करण्याच्या कामीं अनुकूळ करून घेतलें. पण शिंद्यांची धमक पुन्हां लढाई मारून आपण मोंगलांपासून खंडणी व मुलूख मिळवूं अशी होती! मोंगलांस दिलेलें वचन पाळावें अशी बाजीरावसाहेबांस

आधीं वासना नव्हतीच, त्यांत शिंद्यांची चिथावणी मिळाल्यावर मग काय विचारावें ? ते उघडपणें बोलूं लागले कीं, मोंगलांच्या शर्ती फार जबर असून नानांनीं त्या आपल्या स्वार्थावर नजर देऊन ठरविलेल्या आहेत ! त्या मान्य करण्याचें पूर्वी आम्हीं वचन दिलें असलें तरी आतां तें वचन आम्ही पाळणार नाहीं ! ता. २० दिसेंबरच्या सुमारास मशीरउल्मुल्क यास बरोबर घेऊन नाना श्रीमंतांकडे गेले. तेथें पुष्कळ बोलणींचालणीं झालीं. त्यांत शेवटीं श्रीमंतांनीं नन्नाचा पाढा वाचल्यामुळें दोघेही खट्टू होऊन परत आले. हें बोलणें सामोपचारानें मिटत नाहींसें पाहून मशीरानें भागानगराहून तीस चाळीस हजार फौज व मुसा रेमूचीं पलटणें व पन्नास तोफा असा सरंजाम मागविला.

वर सांगितल्याप्रमाणें मशीरउल्मुलुख याशीं वांकडेपणानें वागूनच श्रीमंत थांबले नाहींत. रघोजी भोंसल्यांसही याचप्रमाणें हिसका देण्याचा त्यांचा बेत स्पष्ट दिसूं लागला ! महाडच्या करारांत गढेमंडळ प्रांत व पंधरा लक्ष रुपये नानानीं भोसल्यांस देण्याचें कबूल केलें होतें; त्यांत रुपये देण्याबद्दल श्रीमंतांची हरकत नव्हती. भोंसल्यांनीं तितक्या ऐवजाची फौज ठेवून सरकारचाकरीकरितां पुण्यास आणिली होती त्याअर्थी तो ऐवज श्रीमंतास देणें प्राप्तच होतें व तो नानांकडून परभारें द्यावयाचा असल्यामुळें त्याची मंजुरी देणें त्यांस अवघड वाटलें नाहीं ! पण गढेमंडळ देण्याची गोष्ट निघतांच त्यानीं हात आंखडता धरिला ! खरें म्हटलें तर गढेमंडळाची देणगी नवीन नव्हती. गेलीं चाळीस वर्षें भोंसले तो प्रांत पेशव्यांजवळ मागत होते व तो त्यांस द्यावयाचें वचन माजी पेशव्यांनीं खर्ड्याच्या स्वारींत दिलें होतें. ते पेशवे अपघातानें मृत्यु न पावते तर गढेमंडळाच्या सनदा भोंसल्यांस यापूर्वीच मिळावयाच्या ! असें असतांही बाजीरावसाहेब सुधेपणानें त्या सनदा करून देईनात याचें कारण शिंद्यांच्या मनांत तो मुलूख आपल्या हाताखालीं घालावा असें होतें.

त्यामुळें गढेमंडळाच्या सनदा भोंसल्यांस न देण्याबद्दल श्रीमंतांजवळ शिंद्यांची रदबदली सक्तीची होती. आपल्या कामांत शिंद्यांनीं अड-थळा आणलेला पाहतांच भोंसले शिंद्यांशीं युद्ध करण्याच्या तयारीस लागले.

श्रीमंतांची तब्येत घटकेघटकेस नरम गरम होणारी होती. मशीराच्या व भोंसल्याच्या बाबतींत आपण ठीक वागलों नाहीं असें मागून त्यांचें त्यांनाच वाटूं लागलें व नानांचा क्रोध शांत करावा असेंही त्यांच्या मनांत आलें. नंतर त्यांनीं आपले बंधु अमृतराव यांस नानाशीं समेट करण्याच्या कामांत मध्यस्थीस घातलें. "छ. ५ रज्जबीं श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब हिराबागेंत संध्याकाळचे चार घटका दिवसास आले. श्री॥ राजश्री नानाही गेले. उपरांतिक तीन घटका रात्रपावेतों खलबत जालें. खलबतांत राजश्री रायाजी पाटील शिंद्यांकडील व आबा शेलूकर व दादा गद्रे येणेंप्रमाणें होते. अमृतराव याणीं यादी करार करून श्रीमंतांकडून आणिल्या होत्या. नानास सांगितलें, 'अत:पर वोढूं नये. सोईस काम लावावें. दादा-साहेबांचे ठायीं आम्ही आपणांस म्हणतों, त्याअर्थी बंदोबस्त करावा. बखेडा होऊं नये. श्रीमंतांचा कारभार अव्यवस्थ, त्याचा बंदोबस्त आपण करितों. आपण डेऱ्यास यावें.' याप्रकारें बोलोन गेले. तदनंतर काल छ. ७ रज्जबीं श्री॥ राजश्री नाना संध्याकाळचे प्रहर दिवसास श्रीमंतांकडे गेले. चार घटका रात्रपावेतों बोलणें जालें. उभयतांचा एक विचार जाला असें लोकवदंतेंत आहे."

लोकवदंतेप्रमाणें असा हा एक विचार श्रीमंत व नाना यांमध्यें झालाच असेल तर तो मशीराच्या बाबतींत झाला असल्यास नकळे, कारण या एकविचाराचा परिणाम भोंसल्यांच्या वर्तनावर कांहींएक दिसून न येतां उलट त्यांची लढाईची तयारी जारीनें चालली होती! आणखी वीस पंचवीस हजार फौज त्यांनीं नागपुराहून बोलाविली होती ती पैठणापर्यंत आल्याच्या वार्ता पुण्यांत उठत होत्या! लढ-

ण्याची खुमखुम शिंद्यांसही कमी होती असें नाहीं. भोंसल्यांची आणखी फौज पुण्यास येणार असें पहातांच त्यानीं हिंदुस्थानांतून अंबोजी इंगळे यांची फौज व पलटणांचा आणखी एक कंपू दक्षिणेंत बोलाविला. उभयपक्षीं दारूगोळा वगैरे तोफखान्याचा सरंजाम झपाट्यानें तयार होऊं लागला. भोंसल्याची कही शिंद्यांनीं लुटली व शिंद्यांची रसद भोंसल्यानीं लुटून नेली अशाही बातम्या उठल्या. नाना, मशीर, शिंदे, भोंसले व श्रीमंत या पांचही गोटांतले सैनिक रात्रंदिवस युद्धाकरितां सज्ज राहूं लागले.

या धामधुमीच्या प्रसंगीं श्रीमंतांच्या कारभारांत अमृतराव पुढाकार घेत असल्याचें दिसून येत होतें. त्यानीं नानाच्या पक्षांतून बाबा फडके, नारोपंत चक्रदेव, आबा शेलूकर, गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे इतकी मंडळी फोडून आपल्या लगामीं लाविली व त्यांपासून चालू खर्चाकरितां थोडेंबहुत द्रव्यही मिळविलें! शिवाय त्यानीं श्रीमंतांशीं इमानानें वागण्याबद्दल हुजरातीच्या सरदारांकडून बेलभंडार घेतला, आणि लष्करफडांतून शिलेदार व पागे यांचे हजेरीपट मागवून त्या त्या लोकांच्या हजेऱ्या घेतल्या व त्यांस सरकारच्या गोटांत आपापल्या विल्हेवर उतरावयास लाविलें. आपण कमकुवत राहिलों तर लढाईची झळ आपणासही कदाचित् बाधेल या भीतीनें त्यानीं पेशव्यांकडून काशीराव होळकर यांस सरकारी गोटाशेजारीं येऊन उतरण्याची ताकीद देवविली. ती ताकीद काशीरावानीं तत्काळ मान्य केली.

गेल्या पावसाळ्यांत तुकोजी होळकर वारले. त्यांस काशीराव, मल्हारराव, यशवंतराव व विठोजीराव असे चार पुत्र असून त्यांतले शेवटचे दोघे दासीपुत्र होते. काशीराव वेडसर होता व मल्हारराव शूर कर्ता मनुष्य होता. नानांचें मत सरदारीचीं वस्त्रें काशीराव वडील असला तरी वेडसर असल्यामुळें त्यास न देतां मल्हाररावास द्यावीं असें होतें, तें योग्यच होतें. पण

शिंदे व बाजीरावसाहेब यांच्या मनांतून होळकरांचें घराणें नानाच्या पक्षांतून काढून आपल्या ताब्यांत ठेवावें असें असल्यामुळें श्रीमंतानीं काशीरावासच सरदारीचीं वस्त्रें दिलीं व त्याची बक्षीगिरी म्हणजे सैन्याचा अधिकार बापू होळकरास दिला. मल्हाररावाच्या तर्फे नानानीं पुष्कळ रदबदली केली असतांही बाजीरावसाहेबानीं ती जुमानिली नाहीं.

असो. भोंसले व शिंदे यांमध्यें होणाऱ्या लढाईची मसलत जानेवारी महिना संपण्याच्या सुमारास चांगलीच रंगांत आली तेव्हां खराडीस राहण्याविषयीं श्रीमंतांचें मन कचकरूं लागलें ! होळकर व हुजरातवाले यांचे गोट त्यांच्या शेजारीं होते तरी सुद्धां तेथें रहाण्याचा त्यांस धीर होईना ! त्यामुळें गांवांतले लोक गडबडले. मातबर लोकानीं आपला पैसा मुलें माणसें सुरक्षित स्थळीं पाठविलीं. नानांनीं वांईस देवीच्या दर्शनाकरितां जाणार म्हणून पुकारा केला, आणि इकडे कोंकणांत पलायन करितां यावें म्हणून कुर्डूचा घांटही नीट करविला ! मध्यंतरीं एकदां कोणी मध्यस्थानीं भोंसले व पेशवे यांची भेट व्हावी असें ठरविलें होतें व पेशव्यांनीं तें मान्यही केलें होतें, पण भेटीकरितां भोंसले आले तेव्हां त्यांबरोबर दहा हजार स्वार, बाणाच्या कैच्या लादलेले दीडशें उंट व आठ तोफा असा सरंजाम होता. शिवाय त्यांबरोबर मोंगल सरदार इसामिय्या सहा हजार स्वारांनिशीं आला होता. इतका सरंजाम भोंसल्यांबरोबर असल्याचें कळतांच श्रीमंतानीं इथे कांहीं तरी दगा आहे असें समजून कांहीं अपशकुन झाल्याचें निमित्त केलें व भेट घेण्याचें टाळिलें ! लढाई गांवाशेजारीं अमुक दिवशीं होणार अशी सुद्धां बातमी उठली व त्या योगानें भयभीत होऊन गांवाच्या कडेचे भवानी व वेताळ या पेठेंतले लोक मध्यवस्तींत येऊन राहिले !

बाजीरावसाहेब फार भित्रे होते हें प्रसिद्धच आहे. घटकेघटकेस उठणाऱ्या लढाईच्या खबरांनीं त्यांचा जीव गडबडून गेला

होता. शिंदे होळकर वगैरेनीं किती धीर दिला तरी त्यांस स्वस्थपणा वाटेना ! मोंगल व भोंसले याशीं होतां होईतों देण्याघेण्याच्या बाबतींत टाळाटाळ करावयाची हें जसें त्यांचें ठरलें होतें, तसेंच लढाईपर्यंत मसलत कदापि येऊं द्यावयाची नाहीं असाही त्यांचा निर्धार झाला होता ! आणि या वेळेपुरती तरी चहूंकडे सामसूम करण्याची त्यानीं जी शक्कल काढिली तिच्या योगानें लढाईचा बेत तूर्तापुरता तहकूब झाला खरा ! ती शक्कल श्रीमंतांच्या लग्नसमारंभाची होय ! " आमच्या मनांतून लग्न करावयाचें आहे. तो समारंभ पार पडेपर्यंत सर्वानीं स्वस्थ असावें. पुढें सर्वांचे लढे काय काय असतील ते मिटवून टाकूं." असें पेशव्यानीं सांगून पाठविल्यावर तें न ऐकणारा कोण सांपडणार !

बाजीरावसाहेबांचें पहिलें लग्न जुन्नर मुक्कामीं पूर्वीं प्रतिबंधांत असतांना धोंडोपंत मंडलीक यांच्या कन्येशीं झालें होतें. ती स्त्री श्रीमंत पुन्हां पुण्यास लष्करांत आल्यावर पौषमासीं वारली. सबब दुसरें लग्न करणें श्रीमंतांस प्राप्त झाल्यामुळें त्यानीं नानांस वडीलपणा देऊन वधूची योजना करण्याविषयीं सांगितलें. नानानीं नवऱ्या पहाण्याकरितां पालख्या व कारकून कोंकणांत पाठविले व तिकडून आलेल्या मुलींपैकीं दोन मुली पसंत करून श्रीमंतांकडे पहावयास पाठविल्या. परंतु तितक्यांत हरीपंत तात्यांचे चिरंजीव दाजीबा फडके यानीं आपली कन्या श्रीमंतांस दाखविल्यावरून त्यानीं तीच वधू निश्चित केली व लष्करांतून आपण शनवारच्या वाड्यांत येऊन रहाणार, गांवांतच लग्नाचा सोहळा उरकला जावा, याप्रमाणें ठरविलें.

नंतर "श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांच्या लग्नाचा निश्चय होऊन दाजीबा फडके यांची कन्या करार होऊन काल पंचमीस श्री॥ राजश्री अमृतरावजी व नाना व शिंदे ऐसे वानवडीच्या बागांत एकत्र होऊन मसलत ठरोन नाना आपल्या गांवांतील बागांत येऊन राहिले. वाड्याबाहेरील चौक्या पहिल्या झाडून उठविल्या. शिंद्यांकडील लोक

आले. चार तोफा सरंजामसुद्धां आल्या आहेत. आपल्या नगारखान्याकडे जातां रस्त्यास जातां एक व (शनवारवाड्याच्या) गणपतिदरवाजापाशीं एक व चौकांत दोन ठेविल्या. वाड्यांतही लोक श्रीमंतांपाशीं होते ते व शिंदे यांजकडील ऐसे मध्यरात्रीचें काम करून काल श्रीमंतांची स्वारी त्रिवर्गांची गुरुवारीं गर्गाचार्यांचे मुहूर्तें आली. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांचे मागें नाना होते. खवासेमध्यें होते. चिमाजी आपांचे खवासखानेमध्यें गोविंदराव पिंगळे होते. अमृतराव यांचे खवासेमध्यें गोविंदराव काळे, याजप्रमाणें स्वारी मोठ्या समारंभानें आली. आजच सायंकाळीं गोंधळीक लग्न आहे. चार रोज समारंभ होणार. आदितवारांतील व बुधवारांतील मेणबाजारांतील दुकानें झाडून काढून रस्ते नीट केले. स्वारी आली तेव्हां तोफांची सरबत्ती शंभर तोफा झाली. सरकारचे तोफखान्यांत मात्र झाली. इतर स्थळीं झाली नाहीं." त्याप्रमाणें "श्री॥ राजश्री बाबासाहेब यांचें लग्न माघ व॥ ६ गुरुवासरीं गोंधळी जालें. गुरुवासरीं देवकप्रतिष्ठा सकाळीं जाली. सायंकाळीं विवाह जाहला. उजाडतां साडे होऊन वरात वाड्यांत सूर्योदयापूर्वीं मोठ्या समारंभानें आली. आज भृगुवासरीं फडके सरकारच्या वाड्यांत भोजनास येणार. उद्यां मंदवासरीं श्रीमंत फडक्यांचे घरीं भोजनास जाणार. भोजनोत्तर श्रीमंत डेऱ्यास लष्करांत जाणार ऐसी बोलवा आहे." परंतु या बोलवेप्रमाणें बाजीरावसाहेब पुन्हां लष्करांत रहावयास गेले नाहींत. लग्नाच्या निमित्तानें शनवारवाड्यांत येऊन राहिले ते कायमचेच राहिले. नानाही येरंडवण्याहून आपल्या फौजेंतून निघून श्रीमंतांच्या लग्नाकरितां बेलबागेच्या वाड्यांत रहावयास आले होते ते तसेच तेथें राहिले.

लग्न झाल्यावर आठ पंधरा दिवस होतात न होतात तों भोंसले व मशीर यांचा पुन्हा तगादा बसला. पुन्हा पुण्यांतले

१. म्हणजे हल्लीं जो सांगलीकरांचा वाडा म्हणून प्रसिद्ध आहे त्याच्या.

लोक घाबरून गेले. याच सुमारास इंग्रजांचा वकील सर चार्ल्स् मॅलेट हा पेशव्यांचा निरोप घेऊन मुंबईस गेला. त्याच्या जाण्यामुळें लोकांत अधिकच अस्वस्थता उत्पन्न झाली. कारण कीं याच वेळीं मोंगलांची पंचवीस हजार फौज पलटणें व मुबलक तोफखाना पेशवाईच्या सरहद्दीवर आला होता. इंग्रजांचें व मोंगलांचें आंतून सूत्र जमलेलें आहे व ज्या अर्थी इंग्रजांचा वकील येथून निघून गेला त्या अर्थी मोंगलांप्रमाणें इंग्रजही पुण्यावर स्वारी करणार असें लोकांत भय पडलें. हा भावी कलह शांत करण्याचें सामर्थ्य केवळ नाना फडनवीस यांस मात्र असल्यामुळें शिंदे व पेशवे यानीं त्यांशीं पुन्हा आर्जवाची वृत्ति धरिली. ता० ६ मार्च दिवशीं शिंद्यांच्या अगत्यपूर्वक निमंत्रणावरून नाना त्यांच्या डेऱ्यास गेले. शिंद्यानीं त्यांस वस्त्रें शिरपेंच व कंठी देऊन त्यांचा बहुमान केला. रात्रौ श्रीमंतानीं नानांस भोजनास बोलाविलें व तेथें उभयतांचें बराच वेळ खलबत झालें. त्या खलबतांत बहुधा बाजीराव साहेबानीं मोंगल व भोंसले यांस जें जें देण्याचें ठरलें आहे तें तें देतों असें नानां-जवळ कबूल केलें असावें. कारण कीं त्या दिवसापासून लढाईची वार्ता बहुतेक बंद पडल्यासारखी झाली.

पेशवाईप्रमाणें गायकवाडींत सुद्धां तंटे बखेडे होऊन बेबंद-शाही माजली होती. पुण्याहून कुमक नेऊन ही अस्वस्थता मोडावी या इच्छेनें गायकवाडांचा दिवाण रावजी परभू पुण्यास आला होता. पण नगाऱ्यापुढें तुणतुण्याची दाद कशी लागणार ! पुणें दरबार आपली दाद घेत नाहीं असें पाहून रावजीनें निरुपयानें इंग्रजांची मदत मागितली. ती मदत त्यास इंग्रजानीं संतोषानें दिली व बहुत मर्दुमी व मेहनत करून गायकवाडींतले दंगे मोडले. त्या दिवसापासून गायकवाडांच्या दौलतींत इंग्रजांचें पाऊल पडलें.

या वर्षी रंगपंचमीचा समारंभ झाला त्याचें वर्णन पुढें दिल्या-प्रमाणें—" समारंभास शिंदे यांची स्वारी आली होती. बरोबर

दोन हजार खासा चांगला होता. होळकर व मानाजी फांकडे व रास्ते व समस्त मानकरी आले होते. बैठक पुढील चौकांत केली होती. रा॥ नानाही आले होते. समारंभ उत्तम जाहला. रंग व गुलाल बहुत हंगामा जाला. रंगाचे बंब चार चोहों कोनांस लावून उडविले. रंग खेळोन समस्त घरोघर गेले." याप्रमाणें रंगपंचमीचा रंग चालला असतां तेथेंच त्याचा बेरंग होण्याचा प्रसंग आला होता! पण सुदैवानें वेळ निभावली. तो प्रसंग असा कीं "रंगाचे समारंभासमयीं कचेरींत राजेबहादर (हे) मानाजी शिंदे (फाकडे) यांच्या पुढें येऊन बसले. मानाजी शिंदे उठोन रुसून चालले. त्यांजबरोबर त्यांजकडील चाळीस पन्नास खासा उठला. तेव्हां राजश्री आपा बळवंत याणीं शिंदे यांचे गव्यास मिठी मारून बसविलें. नंतर रंगाचा समारंभ उत्तम जाहला."

बाजीराव साहेब गादीवर बसल्याबरोबर त्यानीं नानांस सांगितलें कीं "परशुरामभाऊनीं हरामखोरी केली, सबब त्यांची वस्तवानी व त्यांकडे सरकारी सरंजाम हत्ती घोडीं उंटें वगैरे सर्व कांहीं असेल तें तें सरकारांत आलें पाहिजे. शिवाय भाऊंच्या पदरच्या मंडळीवर जबर खंड बसवून तो वसूल केला पाहिजे. याकरितां भाऊंचे पुत्र हल्लीं तासगांव सोडून मिरजेस राहिले आहेत त्यांची मालमत्ता कारकून पाठवून जप्त करून आणावी. श्रीमंतांचा याप्रमाणें हुकूम झाल्यावरून या सालच्या फेब्रुआरी महिन्यांत नानानीं मिरजेस जप्तीकरितां कारकून पाठविला. परंतु गंगाधरराव बाळासाहेबानीं जप्तीवाल्याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. त्यानें चार सहा महिने राहून फारच जिकीर केली तेव्हां सरकारच्या समजुतीकरितां भाऊंची जिनगानी म्हणून थोडीं निरुपयोगी घोडीं, उंटें, मोडक्या तोडक्या पालख्या व आणखी कांहीं याच मासल्याचा सरंजाम बाळासाहेबानीं त्या कारकुनाच्या हवालीं केला!

परशुरामभाऊंबरोबर कैदेंत सांपडलेले कारकून होते त्यांस सुटका करून घेण्याकरितां पुणें मुक्कामीं जबर दंड भरावे लागले. त्यांत महादाजीपंत काळे ५००००, भिकाजीपंत आठवले २५०००, शिवरामपंत मोडक १५०००, गणपतराव करमरकर १००००, चिंतोपंत लिमये ८५०००, जयरामपंत जोशी ५००००, बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे २५०००, याप्रमाणें ठोकळ रकमा होत्या. हरि विष्णु सहस्रबुद्धे यास दंड भरावा लागला नाहीं, पण मार बसला! मागें परशुरामभाऊ चिमाजीआपास घेऊन थेउराहून पुण्यास यावयास निघाले तेव्हां चिमाजीआपा ब-या बोलानें पालखींत बसतना. त्यावेळीं हरि विष्णूनें ते श्रीमंत आक्रोश करीत असतांही त्यांस उचलून पालखींत नेऊन कोंबलें! हा त्याचा गुन्हा अर्थातच बाजीरावसाहेबांच्या मतें अक्षम्य होता. सबब "हरि विष्णु यास सरकारचे वाड्यांत नेऊन कोरड्यांचा मार दिला. पन्नास कोरडा मारिला. मार फार मारिला. आणि पाठींतून रक्तें फार निघालीं. आणि कानास चाप लाविला. एक कान तुटला. दोनी हातांचे बोटांस चाप लाविले. बोटांचेही तुकडे पडले म्हणोन बाजारआवई आहे. मार दिल्यानंतर बाजारांतून गल्लोगल्लीं फिरविला; आणि मोठे हाल केले." आरोपीचें म्हणणें असें होतें कीं, श्रीपतराव मोरेश्वर पटवर्धन यांनीं चिमाजीआपांच्या अंगास प्रथम हात लाविला सबब ते मुख्य गुन्हेगार. त्यांस मीं भाऊंच्या आज्ञेवरून मदत केली यांत माझा काय गुन्हा! पण निर्धनाचें कोण ऐकून घेणार? श्रीपतराव तर एक लाख रुपयांचें हिरण्यश्राद्ध करून आधींच मोकळे झाले होते!

करवीरकर महाराज या सालच्या पहिल्या सहामाहींत प्रायः स्वस्थच होते. त्यांच्या व मिरजकरांच्या कांहीं भानगडी होत्या त्या नानानीं विकोपास जाऊं न देतां महाराजांकडे कारकून पाठवून मिटवून टाकिल्या.

शिंद्यांच्या सांगण्यावरून पेशव्यानीं काशीराव होळकर यास सरदारीचीं वस्त्रें दिलीं ती गोष्ट त्याचा धाकटा भाऊ मल्हारराव यास अर्थातच खपली नाहीं. तो काशीरावापासून फटकून निराळा राहिला. यशवंतराव व विठोजीराव हे दोघेही मल्हाररावाच्याच बाजूला वळले. काशीरावाप्रमाणें मी सुद्धां होळकराच्या दौलतीचा मालक आहें असें मल्हारराव म्हणूं लागला व होळकरांच्या सरंजामी मुलखांतून जबरीनें वसूल घेऊं लागला. याप्रमाणें होळकरांच्या दौलतींत हा भाऊबंदकीचा बखेडा नवीनच सुरू झाला.

भोंसले व मशीर यांशीं नानानीं ठरविलेल्या करारावर मखलाशी करण्याची पेशव्यांनीं आज चार महिने टाळाटाळ चालविली होती, त्यामुळें शिंद्यांस दहा लक्षांची जहागीर व अहमदनगर किल्ला देण्याचें श्रीमंतांच्या मनांत होतें त्यास नानानीं रुकार देण्याचें नाकारिलें होतें. गढेमंडळ व पंधरा लक्ष रुपये घेतल्याखेरीज भोंसले कूच करीनात आणि खड्यांच्या स्वारींत दिलेला मुलूख परत घेतल्याखेरीज व खंडणी माफ झाल्याखेरीज मशीरउल्मुलूख याची मर्जी प्रसन्न होईना ! आपण किती जिकीर केली तरी पेशव्यांच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम होत नाहींसें पाहून शेवटीं मशीरास वैताग आला व तो पेशव्यांचा निरोप न घेतां स्वदेशास निघून चालला. तेव्हां आतां कसेंही करून त्याची समजूत केलीच पाहिजे व मोंगलाशीं होऊं पहाणारें युद्ध टाळलेंच पाहिजे असा नाना व इतर मुत्सद्दी यानीं दिलेला सल्ला श्रीमंतांच्या मनास पटला ! तोंपर्यंत मशीर पुण्याहून कूच करून मांडवगणावरून सिद्धटेकापर्यंत गेला होता. इतक्यांत तुमच्या कामाचा निकाल करितों, पुढें जाऊं नये, असा श्रीमंतांचा अगत्यपूर्वक निरोप गेल्यावरून तो तेथेंच महिनापंधरा दिवस मुक्काम करून राहिला.

सरदारांच्या तक्रारी व परदरबारचे लढे मृगसाल सुरू होण्यापूर्वी कसे तरी मोडून जिकडे तिकडे स्थिरस्थावर करणें पुणें दरबा-

रास नामाप्तच होतें. तसें न होईल तर नवीन मामलती दरसाल द्यावयाच्या त्या कोणी कोणत्या आधारावर पतकराव्या ? व मामलेदारांनीं वार्षिक वसुलाची अर्धी रक्कम रसद म्हणून आगाऊ सरकारांत भरावयाची असे ती कोणत्या आधारावर भरावी ?

नानानीं मोगलांस काय काय द्यावयाचें त्याची यादी तयार केली होती तिजवर होय ना म्हणतां म्हणतां श्रीमंतानीं ता० १० मे रोजीं एकदांची मखलाशी केली. पण त्यांतही ते आपला धनीपणाचा हेका चालविल्याखेरीज राहिले नाहींत ! मोंगलांस परत द्यावयाचा मुलूख बत्तीस लक्ष रुपये उत्पन्नाचा होता व खंडणी माफ करावयाची तिची रक्कम दोन कोट रुपये होती. परंतु श्रीमंतानीं यादीवर मखलाशी करितांनां चौथाई मुलूख परत दिला नाहीं व चौथाई खंडणी माफ केली नाहीं ! म्हणजे चोवीस लक्षांचा मुलूख परत दिला व दीडकोट रुपये माफ केले. सुभे बेदर येथील स्वराज्याचा हक्क आपणास कायमचा देण्याविषयीं मोगलांचें बोलणें होतें तो हक्क निजामअल्लीस त्याच्या हयातीपर्यंत देण्यांत आला ! निजामअल्लीच्या वयास त्यावेळीं पाउणशें वर्षे होऊन गेलीं होतीं ! नानानीं केलेल्या कराराची पेशव्यानीं अशी वासलात लाविलेली मशीरउल्मुलुख यास मुळींच रुचली नाहीं. तथापि कराराच्या शर्ती त्यानें निरुपायानें मान्य केल्या. भोसल्यांस गढेमंडळ व पंधरा लक्षांची नक्त रक्कम देण्याचें याच सुमारास श्रीमंतानीं मंजूर केलें; तेव्हां अर्थातच शिंद्यांस अहंमदनगरचा किल्ला व दहा लक्षांची जहागीर देण्याचा ठराव श्रीमंतानीं केला त्यास नानानीं हरकत घेतली नाहीं.

मशीरउल्मुलूख रागानें श्रीमंतांचा निरोप न घेतां पुण्याहून गेला होता यास्तव त्याचें समाधान करणें हा शिष्टाचार प्रसिद्धपणें होणें राजकीय दृष्ट्या अगत्याचें होतें. सबब तो शिष्टाचार करण्या-

साठीं श्रीमंतानीं बाळोजी कुंजर, आबा शेलूकर, गोविंदराव काळे व पिंगळे हे आपल्या तर्फेचे वकील त्याजकडे पाठविले. त्यांबरोबर नानांकडून दादा गद्रे, जनार्दन शिवाजी म्हैसकर व बजाबा शिराळेकर आणि शिंद्याकडून आत्मारामपंत तांबोळी, शिवाय होळकर व भोसले यांचे वकील, अशी मंडळी गेली. या सर्वांनीं सिद्धटेक येथें मशीरास भेटून मेजवानी, वस्त्रें, व जवाहीर दिलें; व त्यास मार्गस्थ केलें.

अहंमदनगरांत मोरोबादादा कैदेंत होते. तो किल्ला शिंद्यांच्या हवालीं करण्यापूर्वी मोरोबांस तेथून काढून दुसऱ्या किल्यावर ठेवणें नानांस जरूर पडलें. त्यामुळें त्यानीं मोरोबास आणण्याकरितां बजाबा शिराळेकर यांस परभारें सिद्धटेंकाहून नगरास पाठविलें. परंतु किल्यांतून बाहेर निघण्याचें मोरोबानीं नाकरल्यामुळें बराच घोळ पडला; त्यासंबंधाचा उल्लेख पुढील प्रकरणीं येईल.

सवाईरावसाहेब हयात असतां बाजीरावसाहेबांचा व त्यांचा कांहीं पत्रव्यवहार बळवंतराव नागनाथ याच्या विद्यमानें झाला होता व नानानीं बळवंतरावास अपराधी ठरवून किल्यावर कैदेंत घातलें होते असें मागें लिहिलें आहे तें वाचकांस आठवत असेलच. बळवंतराव आजपर्यंत कुर्डूच्या किल्यावर कैदेंत होता त्याची श्रीमंतानीं मार्च महिन्यांत सुटका मात्र केली. परंतु पुढें त्यानीं त्याची कांहीं विशेष बढती केल्याचें दिसून येत नाहीं.

महादजी शिंद्यांच्या बायका आजपर्यंत बऱ्हाणपुरास होत्या त्या आतां दौलतरावाकडून बोलावणें गेल्यावरून मे महिन्यांत पुण्यास आल्या. या बायका म्हणजे मोठींच प्रस्थें होतीं ! त्यांचें फौजेवर वजन होतें व दौलतरावही त्यांस वचकत असे. नानाशीं या बायांचा पत्रोपत्रीं शिलशिला चालत असे, त्यामुळें बायांच्या येण्यानें दौलतरावाचें स्तोम कमी होईल असें लोकांस वाटत होतें. पण तसें पुढें काहींच घडलें नाहीं.

ता. २३ जून रोजीं रघोजी भोसले पुण्याहून कूच करून गेले तेव्हां नानांचें बळ अर्थातच कमी पडलें. तें बळ भरून काढण्याकरितां त्यानीं आरबांच्या जमाती चाकरीस ठेविल्या. हे आरब दहा हजार होते असे लोक म्हणत. ते तितके नसले तरी पांच सहा हजार खचित होते. या आरबांचा पहारा नानांजवळ रात्रं दिवस असे. शिंदेही वानवडीहून शहरांत श्रीमंताकडे येत तेव्हां बंदोबस्तानेंच येत असत. शनवारच्या वाड्यांत श्रीमंत रहात होते तेथें शिंद्यांची पलटणें त्यांच्या रक्षणाकरितां रात्रंदिवस पहाऱ्यावर असतच. बाजीरावसाहेब आपल्या बंधूंसह वारंवार वडगांव कोथरूड वगैरे गांवच्या बागांत वनभोजनाकरितां वगैरे जात असत. केव्हां तरी ते नानांच्याही घरीं जाऊन त्यांस भेटून येत. परंतु पत्येक प्रासंगीं शिंद्यांचे लोक त्यांबरोबर असत. नाना मात्र शनवारच्या-वाड्यांत जाण्याचें होतां होईल तो टाळीत असत ! शिंद्यांची व नानांची दिलसफाई झालेली दिसत होती ती बाह्यात्कारी होती. भोसले गोदावरीपार गेल्यावर व नगरचा किल्ला व दहा लक्षांची जहागीर पदरांत पडल्यावर शिंद्यांची नानाशीं मैत्री टिकणार नाहीं असें लोक स्पष्ट बोलून दाखवीत !

याप्रमाणें डिसेंबर सन १८९६ पासून सन १७९७ च्या जून अखेरपर्यंतची हकीगत या प्रकरणांतल्या पत्रांत आली आहे. या अवधींत पुण्यांतल्या लोकांस निर्धास्तपणा असा कधींच वाटला नाहीं. आज हें झालें, उद्यां तें होणार, अशा अफवांवर अफवा नेहमीं उठत व जो तो आपापल्या काळजींत चूर असे. शहरासभोवतीं लष्करें जमलीं होतीं त्या आगंतुक माणसांची संख्या निदान दोन लक्षपर्यंत असावी. आणि निरनिराळ्या लष्करचीं गुरें व घोडीं मिळून संख्या त्या संख्येच्या एक तृतीयांश तरी निदान खचित असेल. इतक्या प्राण्यांचें पोट चालवितां चालवितां पुण्याभोंवतालचा प्रदेश उजाड होत चालला होता व खुद्द पुण्यांत दाणा वैरणीची

टंचाई पराकाष्ठेची भासत होती. एका वेळीं चांगल्या कडब्याची धारण रुपयास पंधरा पेंढ्या झाली होती. जळाऊ लांकडांचा दर सतरा अठरा रुपयानीं खंडी होता. जोरी रुपयास सव्वादोन पायली मापटें, हरभरे सव्वादोन पायली तीन चिपटीं, बाजरी दोन सव्वा-दोन पायली, तुरीची डाळ पावणे दोन पायली, हरभऱ्याची डाळ दीड पायली, तांदूळ आंबेमोहोर सव्वापायली मापटें, काळे साळीचे पावणे दोन पायली, तूप रुपयास सव्वाशेर, याप्रमाणें धारणी होत्या. त्या काळांतल्या त्या सर्व धारणी दुष्काळाच्या समजल्या जात होत्या! यावर्षी भोसल्यांचें लष्कर पुण्यास होतें त्यांत रामटेकचीं पानें रुपयास साडेतीनशें मिळत असत.

असल्या धारणी असून त्यांतच बाजीरावसाहेबानीं आपला खर्च चालविण्यासाठीं व शिंद्यांचा तगादा तात्पुरता भागविण्यासाठीं गांवांत पट्ट्यांचा सुळसुळाट सुरू केला होता! १ कर्जपट्टी २ सरं-जामपट्टी ३ वेतनपट्टी ४ सावकारपट्टी ५ उंबरेपट्टी ६ भाडेंपट्टी आणि सर्वांहून असंतोषकारक अशी ७ संतोषपट्टी! ही संतोष-पट्टी बाजीरावसाहेबांस पेशवाई मिळाली सबब रयतेस संतोष झाला असें गृहीत धरून वसूल करण्यांत येत होती, व ती देण्या-बद्दल धनिक लोकांमागें सक्तीचा तगादा लागला होता! व ते लोक सामर्थ्यानुरूप तें देणें देतही होते. कारण या संतोषपट्टीबद्दल असंतोष दाखवावा तर तत्काळ "बाळसंतोष" होण्याचा प्रसंग यावयाचा! इतक्या पट्ट्या होऊन शिवाय उदमी लोकावर उदीमपट्टी बसविण्याचा जेव्हां यत्न होऊं लागला तेव्हां सर्व प्रकारच्या व्यापारी व उदमी लोकानीं एकजुटीनें संप करून व्यापारधंदा बंद पाडला आणि सरकारास माघार घ्यावयास लाविलें!

मे महिन्यांत पुणें शहरावर टोळधाड आली होती. टोळ तांबडे होते. "कौलारावर टोळ बसत तेथें मिरच्या वाळत घातल्या-सारखें दिसे." या टोळधाडीनिमित्त सरकारांतून शांति करण्यांत

आली. या सहामाहींत कोटिहोमाचेंही एक अनुष्ठान सरकारवाड्यांत झालें. इतर दानधर्मही अद्वातद्वा झाला. मार्ग. शु॥. १५ स ग्रहण पडलें. त्या दिवशीं श्रीमंतानीं एकोणीस हजार रुपये खर्च केला. शालजोड्या द्यावयाच्या गृहस्थांस दिल्या व न द्यावयाच्या गृहस्थांसही दिल्या ! बाळाजीपंत पटवर्धन या क्षुल्लक मनुष्यास पालखी दिली ! "असा मनस्वी व्यवहार होऊं लागल्यास आपल्याच्यानें कारभाराची निभावणी पडणार नाहीं" अशी नानाकडून नेहमीं तकरार येऊं लागली.

दादा गद्रे यानीं एक देवालय बांधून त्यांत चैत्रमासीं मुरलीधराची स्थापना करण्याचें योजिलें होतें. त्या स्थापनेच्या दिवशीं बंदोबस्ताकरितां नानांचे आरब आले होते व पेशवे सरकारचीं दोन पलटणें आलीं होतीं. हीं पलटणें खर्ड्याच्या स्वारीपूर्वीं नानानींच बेट साहेब (Boyed) नांवाच्या इंग्रजाकडून तयार करविलीं होतीं. त्या पलटणवाल्यांची व आरबांची कांहीं बोलाचाली होऊन लढाई जुंपली तींत उभयपक्षाचे शेकडों लोक मेले व गांवांतल्या लोकांसही थोडी बहुत इजा झाली. नानांनीं चोपदार पाठवून दोन बाजूंचे प्रमुख लोक बोलावून नेऊन तंटा तोडला, व पुढें बेट साहेबास नोकरींतून दूर केलें आणि त्याचीं पलटणें मोडून टाकिलीं. ज्या देवाच्या स्थापनेच्या वेळीं ही लढाई होऊन माणसें मेलीं त्या देवास त्या दिवसापासून "खुन्या मुरलीधर" असें नांव पडलें आहे !

शिंदे व बाजीरावसाहेब आपलें कांहींच ऐकत नाहींत असें वाटून मध्यंतरीं एकदां नानांच्या मनांत कारभार सोडून मेणवलीस जाऊन रहावें असें आलें होतें व कांहीं तरी सबब सांगून पुण्यांतून पाय काढण्याचा ते यत्न करीत होते. परंतु श्रीमंतानीं त्यांस स्थलांतर करूं दिलें नाहीं. त्या संबधानें पुण्यांत त्या वेळीं दोन बातम्या उठल्या होत्या त्या अशा—" नानांचे स्त्रीस (स्त्री आठवी ! वय वर्षे अकरा बारा !) रजोदर्शन झाल्यामुळें नाना वांईस जावें म्हणतात, परंतु यजमान परवानगी देत नाहींत. येथेंच आणा म्हणतात."

" मेणवलीस लक्षभोजन घालण्या करितां जाण्याची परवानगी नानास होत नाहीं. " यांतली पहिली बातमी कदाचित् पुण्यांतल्या टवाळखोरांनीं उठविली असेल; पण दुसरी अगदींच खोटी असेल, श्रीमंतांस हुलकावणी देण्याकरितां नानांनीं लक्षभोजनाची सबब सांगितलीच नसेल, असें म्हणवत नाहीं. कारण ब्राह्मणी अमदानीच्या ऱ्हासकाळांत लक्ष ब्राम्हणांस सुग्रास भोजन घालणें हें मोठेंच पुण्यकृत्य समजलें जात होतें! अमृतरावाच्या दिनचर्येसंबंधानें एका पत्रांत मजकूर आला आहे तो या विसाव्या शतकांत चमत्कारिक भासतो. तो मजकूर असा कीं, " अमृतराव व त्यांचे पुत्र विनायकराव प्रत्यहीं आबा शेलूकराच्या बागेंत दूर्वा आणावयास जात असतात! " अमृतराव व त्यांचे पुत्र बाहेर पडावयाचे म्हणजे चार दोनशें माणसांच्या लवाजम्यानिशीं पडावयाचे हें उघडच आहे. ते दिवस पेशवाईला किती विपरीत आले होते हें वाचकांस सांगावयास नकोच. तर अशा त्या दिवसांत महत्वाचीं कामें बाजूस ठेऊन सरंजामानिशीं गांवाबाहेर दूर्वा आणावयास जाणाऱ्या अमृतरावांच्या वर्तनाला दांभिक देवभक्ति म्हणावें कीं स्वच्छंदी श्रीमंती म्हणावें हें समजत नाहीं!

पेशवाईच्या काळांत जादू चेटुक मंत्र तंत्र यांवर लोकांचा जबरदस्त विश्वास होता. या वेडगळ समजुतींमुळें एखाद्या वेळीं भलताच अनर्थ ओढवण्याचा संभव असतो हें दाखवणारा एक प्रसंग या प्रकरणांतल्या पत्रांत वर्णिला असून तो खुद्द नानांसंबंधाचाच आहे, व तो त्यांच्याच वाड्यांत—शनवार वाड्याशेजारीं असलेल्या नानाच्या वाड्यांत—घडलेला आहे. त्या वाड्यांत अलीकडे नानांची वस्ती नव्हती. तेथें पुन्हा रहावयास जाण्यापूर्वी देवप्रतिष्ठा करावी असें त्यांच्या मनांत आलें व त्या उद्देशानें त्यानीं कालियमर्दनाची मूर्ति सुवर्णाची करवून तिची स्थापना मागच्या चौकांत हौदाजवळच्या सोप्यांत केली. त्या प्रसंगीं काय प्रकार घडला तें पुढच्या दोन उताऱ्यांवरून दिसून येईल.

" राजश्री नानांचा वाडा सरकारच्या वाड्याजवळचा आहे त्या वाड्यांत हल्लीं नाना रहात नाहींत म्हणून देवप्रतिष्ठा केली, तेव्हां बलिदानाचा दिवा भातांत लावून गणेश दरवाजाजवळ टाकूं लागले. तेव्हां शिंद्याकडील मुकेरीसाहेब म्हणून जमादार आहे त्याचे गाडदी म्हणाले कीं ' भातांत दिवा लावून भात टाकितां, आणि आमचे धनी दौलतराव शिंदे बाबा यांजवर तुम्ही जादू केलीत ! म्हणोन गाड्यानीं कामाठी बळी टाकावयास गेला त्याच्या मुसक्या बांधल्या ! आणि नानाकडील कारकुनाबरोबर ही कटकट केली. आणि दिव्याची पांटी नानांच्या घरांत टाकिली आणि ' तुमची जादू तुमच्या घरांतच घातली म्हणोन बोलले. इतक्यांत आबा शेलूकर मध्यें जाऊन सांगितलें कीं, आमचे महजबांत (धर्मांत) याप्रमाणें आहे म्हणोन करतों. याप्रमाणें त्यांची समजूत केली. "

" नानांच्या वाड्यांत हौदाजवळील घरांत सुवर्णाच्या मूर्तीची स्थापना होऊन बलि बाहेर टाकावयास माणसानीं पुढच्या उंच दारानें आणून सरकारवाड्याकडच्या बाजूस येऊन मागील दारानें घरांत गेले. त्यास शिंद्याकडील चौकी व तोफा नजीकच, तेथील लोकानीं ' कांहीं कोडें केलें ' म्हणून तोंच बलि घेऊन माणसांचे पाठोपाठ मागील दारानें नानाच्या वाड्यांत गेले. तेव्हां त्यांस समजून सांगावयाकरितां भास्करपंत कोठवळे आले त्यांस धरून बांधून पाडून माणसा काणसांस मारामारी करून घरांतून हौदांतून वगैरे बलि टाकून खटला केला. तेव्हां (शिंद्यांचा हुजऱ्या) कृष्णा शेट्या (सरकारच्या) वाड्यांत होता त्यास सांगून पाठविलें. तेव्हां तो येऊन शिंद्यांकडील लोकांस समजोन सांगोन भास्करपंत वगैरे यांस सोडविलें. भास्करपंताचे हाल फार जाले. यास्तव नानाची मर्जी दोन दिवस ठीक नव्हती. "

या विचित्र प्रकारावरून नानांच्या नांवाचा वचक निदान शिंद्यांच्या लोकांवर तरी राहिला नव्हता व पेशवाईच्या कारभारांत ते फिके पडत चालले होते हें ही चांगलेंच निदर्शनास येतें. याच तेजोभंगाची क्रमाक्रमानें परमावधि होऊन त्याचें पर्यवसान त्यांच्या कारागृहवासांत कसें झालें तो प्रकार पुढील प्रकरणीं वर्णन करण्यांत येईल.

बाजीरावसाहेबांची स्थापना.

नं. ३८८२ श्री. (कार्ति० व० ११-२५ नोवेंबर.)

पै॥ छ० +१ जमादिलाखर गुरुवार. अस्तमान. सन सबां तिसैन.

पु॥ सेवेशी[1] शिरसांष्टांग नमस्कार विज्ञापना. स्वामीनीं वडिलांस पत्रें पाठविलीं ती जुजदानांत होतीं तें जुजदानच सांपडलें आहे. त्यांत पत्रें श्री॥ राजश्री बाजीराव साहेबांविशींचीं व नानाविशींचीं बहुत आहेत म्हणोन ऐकतों. त्यास स्वामींस विदित असतील. त्यास कोणकोणते प्रकरणीं लिहिलीं आहेत हें ल्याहावयाजोगें असल्यास ल्याहावें; म्हणजे नानांशीं बोलावयास ठीक पडेल. आम्ही तर अगोदरच कानावर घातलें आहे. परंतु मुख्यापावेतों गेलियास तिकडीलही धरबंध केला पाहिजे. सेवेसीं श्रुत हो॰य हे विज्ञापना.

नं. ३८८३ श्री. (कार्तिक व० ११–२५ नोवेंबर)

पै॥ छ० २४ जमादिलावल. सन सबां तिसैन.

पु॥ शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. स्वामीनी[3] तेथून वडिलांस पत्रें पाठविलीं तीं झाडून सरकारांत सापडलीं; त्याजविशीं स्वामीनीं सांगितलें होतें. त्याजवरून नानांस विनंती केली जे, बाळोबा भाऊसाहेबांस बोलले जे, ' मिरजकर व नाना एक. ' याजकरितां त्याचे खातरजमेबद्दल आपले बंदोबस्ताचीं पत्रें ल्याहावीं. व नारायणराव फौजसुद्धां पुण्यांत त्यांचा बचाव जाला पाहिजे[6], याज-

---

१ कारकून वकील जनार्दन शिवाजी म्हैसकर याचें बाळासाहेबांस पत्र पुण्याहून. २ कारकून वकील जनार्दन शिवाजी म्हैसकर याचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र. ३ तुम्ही. ४ परशुरामभाऊंस. ५ मी तुमच्या पक्षाचा, नानाच्या पक्षाचा नाहीं अशी पत्रें बाळासाहेबास ल्याहावीं लागली म्हणून त्यानीं लिहिलीं. ६ तशीं पत्रें लिहिण्याचें हें दुसरें कारण.

करितां आपले बंदोबस्ताचे विचार मिरजेहून भाऊसाहेबांस लिहीत गेले. तींच पत्रें कांहीं बाळोबांसही संशयनिवारणार्थ (भाऊनीं) दाखविलीं. तीं पत्रें हल्लीं सांपडल्यावर स्वामींस संशय येईल, याजकरितां विनंती केली आहे. त्याजवरून नानांची आज्ञा जाली जे, " तुम्ही म्हटलें ही गोष्ट प्रमाण आहे. प्रसंग पडिला त्याअर्थी (बाळासाहेबांस) लिहिणें प्राप्त जालेंच असेल. कांहीं चिंता नाहीं. संशय यावयाचा नाहीं. " याजप्रों उत्तर जालें. येथें आम्ही निळोपंतासही पुसलें. त्याणीं सांगितलें, ' रुमाल त्यांस सांपडले. ' व परभारेंही ऐकिलें. त्याजवरून नानांस विनंती करून ठेविली. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं ३८८४ श्री. (मार्ग० शु० २-१ दिसेंबर.)

नकल.

राजश्री धोंडोपंत[2] गोसावी यांस

अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्य स्ने॥ प्रीतिराव चव्हाण हिंमत बहादूर ममलकतमदार. दंडवत. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करणें. विशेष. राजश्री सखाराम[3]पंत याजबरोबर हुजूरचीं आज्ञापत्रें पाठविलीं तीं पावलीं. तुम्ही लिहिला मजकूर कळला. फौज त्या प्रांतीं आलेनंतर सरकार आज्ञेप्रों तुमचे तालुकेस उपसर्ग न करणेंस फौजेस ताकीद केली जाईल. रवाना छ० १ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नंबर ३८८५ श्री. (मार्ग. शु. ३-२ दिसें.

पैा छ० १३ रमजान. सन सबा तिसैन. फाल्गुन वा॥ २ इंदुवासर.

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री
गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं.

---

१ परशुरामभाऊंचा कारकून निळोपंत पोंक्षे. २ धोंडो अनंत सखदेव कमाविसदार परगणे अनगोळ. ३ सखाराम शेषाद्रि कारकून नि॥ कुरुंदवाडकर. ४ करवीरकर महाराजांची.

पोष्य बाळाजी जनार्दन सांा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय खुशल लेखन करीत जावें. विशेष. करवीर-वासी महाराजांकडील बहुत उपद्रव जाहला म्हणोन (तुम्हीं) चार पांच पत्रें पाठविलीं त्यावरून महाराजांस विनंती करून उपसर्ग अगदीं मना व्हावा याजकरितां राजश्री बाळकृष्णपंत यांस पाठविले आहेत. हे महाराजांसीं बालोन आपणाकडे येतील. मा निल्हेसीं मजकूर बोलण्यांत आले आहेत. सांगतां कळों येईल. रवाना छ० २ जलादिलाखर *बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

न. ३८८६ श्री (मार्ग. शु. ४–३ दिसें.)

पैा छ. ८ जमादिलाखर सन सबा तिसैन. मार्गशीर्ष.

[1]सेवशीं शिरसाष्टांगनमस्कार. विज्ञापना. छ. ३ जमादिलाखरीं श्रीा राजश्री नानांनीं अज्ञा केली जे, " श्रीा[2] राजश्री रामचंद्रपंत आपाकडील कारकून विसाजीपंत म्हणून मिरजेहून श्रीा राजश्री भाऊसाहेबांपाशीं येऊन बोलून गेला. याजप्रमाणें तेथें बातमीदार कारकून[3] आहे त्यानें लिहिलें आहे. त्यास अशी गोष्ट होऊंनये. येविषयींचा बंदोबस्त चांगला झाला पाहिजे. त्याजकरितां तुम्ही मिरजेस लिहून पक्का बंदोबस्त करवावा. अतःपर अशी गोष्ट जाह-ल्यास ठीक नव्हे. " ह्याप्रमाणें ताकीद झाली. त्याजवरून विनंति लिहिली असे. तर कारकून पाठवूं नये म्हणोन श्रीा राजश्री आप्पा-साहेबांस आज्ञा व्हावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८८७ श्री. (मार्ग. शु. ६–५ दिसें.)

पैा छ० ८ जमादिलाखर. सन सबा तिसैन. मार्गशीर्ष.

---

* छ० २ जमादिलाखरीं लिहिलेलें पत्र १३ रमजानीं म्हणजे तीन महिने अकरा दिवसानीं मालकास पोचतें ।

१ बाबूराव शिवाजी म्हैसकर याचें पत्र मिरजेस. २ 'श्रीमंत' हें उपपद म्हैसकरानें अर्थातच पदरचें लावलेलें. ३ आमचा कारकून.

सेवेसीं शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. श्रीा राजश्री बाजी-रावसाहेबांची व श्रीा राजश्री नानांची निखालसता जाली नव्हती. शिंद्यांचा कंपू श्रीमंतांजवळ याजमुळें यांचे जाण्यास दिकत होती. त्यास काल प्रातःकाळींच राजश्री दौलतराव शिंदे नानाचे डेन्यास आले. येक प्रहर बोलणीं होऊन निखालसता जाली. उपरातिक श्रीमंत भोजनाकरितां म्हणोन सडे वानवडीवर[2] आले. नानांसही बोलाविलें. नाना भोजनास गेले होते. तेथें बोलणें चालणें होऊन निखालसता जाली. उपरांतिक श्रीमंत खराडीवर मुकाम होता तेथें गेले. नाना शिंदे यांचे डेन्यास जाऊन खराडीस गेले. वस्त्रें जालि-यानंतर येथें गोटास आले. इंदुवारीं[3] वस्त्रें व्हावयाचा बेत पेशजी लिहिला होता त्यांत षष्टी तीथ उत्तम नव्हे, याजकरितां कालच सांडणीस्वारांची डाक बसवून वस्त्रें आणविलीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८८८ श्री. (मार्ग०—दिसेंबर)

विज्ञापना.[4] भिकाजीपंत आठवले व शिवरामपंत मोडक व
२५००० १५०००
गणपतराव करमरकर व महादजीपंत काळे येणें प्रमाणें घेऊन मोक-
१०००० ५००००
ळीक केली[5]. बाबा फडणवीस[6] यांस श्रीमंताचे हुजरे याणीं घेऊन

---

१ पत्र कारकून वकील म्हैसकर याचें बाळासाहेबांस. २ शिंद्याच्या गोटांत. ३ बाजीरावसाहेबांस पेशवाईचें वस्त्रें मार्ग. शु. ५ रविवार ता. ४ दिसेंबर स. १७९६ रोजीं झालीं. " इतिहास व ऐतिहासिक " या मासिकाच्या अंक ८ पृ. १६ मध्यें मार्ग. शु. ६ सोमवार छ. ४ जमादिलाखरीं वस्त्रें झाल्याचें लिहिलें आहे तें चुकलें आहे. ४ जमादिलाखरीं तिथि पंचमी आहे. षष्ठी नाहीं. डफ व फॉरेस्ट यांच्या बुकांत ४ दिसेंबर हीच तारीख दिली आहे. ४ बाळाजी गणेश जोशी कारकून याचें बाळासाहेबांस पत्र. ५ पत्रांत लिहिलेले सर्व गृहस्थ परशुराम भाऊंच्या पदरचे असून भाऊंबरोबरच सरकारच्या कैदेंत सांपडले होते. त्यांपासून पत्रांत लिहिलेल्या रकमा गुन्हेगारी घेऊन नानांनीं त्यांस सोडलें. ६ रामचंद्र श्रीधर काळे यांस ही जबर दंड व्हावयाचा, परंतु त्यांचा बाजीरावसाहेबांकडे वशिला लागल्यामुळें श्रीमंतांनीं हुजरे पाठवून त्यांस नानांच्या ताब्यांतून काढून आपल्या गोटांत नेलें व दंड न घेतां सोडून दिलें.

गेले. तेथून येथें आले म्हणोन वर्तमान आहे. (बाकी लोकांचा) खंडाचा जाबसाल हुजूरच[1] विल्हेस लागेलसा दिसतो. येणें प्रमाणें बाजारी वर्तमान आहे. वरकड रामाजी दामोदर यांणीं विनंती केलीच असेल येथले[2] गृहस्थांपुढें उपाय नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८८९ श्री (मार्ग. शु. ७—६ दिसेंबर).

पैा छ. १० जमादिलाखर. तास दिवस. सन सबा तिसैन.

सेवेसीं बाबूराव शिबाजी व बाबाजी विश्वनाथ[3]. कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. तागायत छ. ६ जमादिलाखर भौमवासर पावेतों मुा नजीक पुणें यथास्थित असे. विशेष. अलीकडे स्वामींकडून पत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी सदैव पत्रीं सांभाळीत असावें. यानंतर श्रीा राजश्री नानांचे नावें स्वामीनीं पेशजी पत्र पाठविलें तें प्रविष्ट केलें होतें त्याचें उत्तर घेऊन हल्लीं पाठविलें आहे. पावेल. यानंतर श्रीा राजश्री बापूसाहेबांची[4] व श्रीमंतांची भेट जाली पाहिजे म्हणोन श्रीा राजश्री नानांस श्रीमंतांस वस्त्रें व्हावयाचे पूर्वीं दोन दिवस विनंती केली. त्यावरून आज्ञा जाली जे, "राजश्री आपा बळवंत यांजकडून (श्रीमंतांच्या) कानावर घालवावें आणि भेटीस घेऊन जावें." त्यावरून आपांस सांगितलें. आपानीं श्रीमंतांस विनंती केली. तेव्हां (श्रीमंतांची) आज्ञा जाली जे, "पटवर्धन सारे एकच आहेत[5] ! मी भेट घेणार नाहीं. आपानी बहुत प्रकारें विनंती केली; परंतु ऐकिलें नाहीं. हें नानांस सारें समजाविलें. त्याजवरून नानानीं चिा राजश्री जनोबाभाऊस[6] पर्याय सांगोन श्रीमंतांकडे पाठविलें.

---

१ बाजीराव साहेबांकडे. २ येथील गृहस्थ म्हणजे जनार्दन शिवाजी म्हैसकर. हा पटवर्धनांचा कारकून असतां आंतून त्यांशीं वांकडा होता. नानांची त्यावर बहाल मर्जी होती. कैदेंत सांपडलेल्या लोकांपैकीं अमक्याची ऐपत अमुक आहे ही माहिती तोच नानांस देतो व दंडाच्या रकमा चढवितो. ३ चांफेकर. उभयतां कारकुनांचें पत्र गंगाधरराव बाळासाहेबांस. ४ ज्यांस पत्र लिहिलें त्यांचा पुतण्या विठ्ठलराव पांडुरंग. ५ तासगांवकर काय आणि मिरजकर काय, सारे एकच. ६ जनार्दन शिवाजी म्हैसकर.

त्याप्रों याणीं विनंती केली. तेव्हां आज्ञा जाली जे, " माझी व नानांची गांठ पडल्यानंतर बोलेन. उपरांतिक नाना ठराव करितील त्याप्रमाणें करूं " या प्रमाणें चिरंजीवानीं नानांजवळही सांगितलें. तेव्हां नाना बोलले. ' मी गेल्यानंतर सारे पर्याय बोलेन. ' त्यास नानांचे आज बोलणें पडलें जे, रामचंद्रपंत अपाजवळ मिरजेस पागा व हत्ती व उंट वगैरे सरकारी फरासखाना आदिकरून आहे तो आम्ही आणावयास पाठवितों व तेथें भाऊंचे पदरचे कारकून व भाऊंची चीजबस्त व कारकुनांची चीजबस्त असेल ती आणणार. त्यास तुमची दिक्कत असूं नये. तुमची थोडी दिक्कत मोहामुळें जाल्यास तुम्ही व ते एक असें सरकारांत होईल. त्यास तुम्ही किमपि मोह धरूं नये. याप्रमाणें सांगितलें व भाऊंकडे रामचंद्रपंत आपाकडून कारकून अथवा माणूस किमपि जावूं नये असा बंदोबस्त पक्का करावा. तुमचेजवळ ते राहून तिकडे कारकून व माणसें जातात हें परिच्छिन्न कार्याचें न्व्हे अशी नानानीं आज्ञा केली, त्यावरून विनंती लिहिली असे. तर याचें उत्तर काय सांगावें ती आज्ञा जाली पाहिजे. व श्रीा राजश्री आपासाहेब यांसही सांगावें जे कारकून अथवा माणूस श्रीा राजश्री भाऊसाहेबांकडे पाठवूं नये असा बंदोबस्त जाला पाहिजे. व येविशींचें उत्तर समर्पक आलें पाहिजे. वडिलांजवळ कारकून येऊन बोलोन गेला याजमुळें नानास बहुत राग आला आहे. त्यास येविशींचा बंदोबस्त चांगला पाहिजे. वडिलांविशीं व मंडळीविशीं मोठा निकर्ष आहे. काय ईश्वर परिणाम लावील तो न कळे. येथून कारकून पागा वगैरे (आणण्या) करितां रवाना होणार. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८९० श्रीगजानन. (७ दिसेंबर)

पैा छ. १८ जमादिलाखर सन सब्बा तिसैन मार्गशीर्ष मास.

---

१ मांडवगणास परशुरामभाऊ कैदेंत आहेत त्यांजकडे मिरजेहून कारकून येऊन गेला.

विज्ञापना. येथील क्षेम तागायत मार्गा शुा अष्टमी पावेतों यथास्थित असे. विशेष. शहापुराकडील वर्तमान आतांच आलें कीं, खानापूरचें ठाणें राजश्री धोंडोपंत गोखले यांजकडून मानिल्हेचे भाचे येऊन घेतेसमयीं राजमंडळकरांची फौज व जमाव खानापूरच्या ठाण्यांत होते त्यांसीं बोलाबोलीनें जातसाल होत होता. इतक्यांत माणसामाणसीं कजिया होऊन गोखले याचे भाच्यावर वार टाकिले. जखमा भारी लागल्या आहेत. राजमंडळकरानीं ठाणें सोडून येकमनमुरडीस जमाव सुद्धां पळोन आले. हें वर्तमान राजश्री धोंडोपंत गोखले यांस येकुंडी धुपदाळचे मुकामीं कळलें. तेथून कूच करून वकुंद प्रांत कित्तूर येथें श्रीमलापहारीतीरीं येऊन उतरले. त्यांची फौज येतांच कित्तूरकर सरदेसाई होंगल सोडून दोन हजार जमावानिशीं देसनुरावर आला आहे. राजमंडळकरांचे लोक जायां जालेचें वर्तमान मनोळीवर श्रीा महाराज राजश्री छत्रपति यांस कळोन त्याणीं गोखल्यांचे फौजेवर छापा पाडावा ही मसलत केली आहे. कुरबेट परगणे गोकाकवर आले आहेत. दुसरें शहापुराहून बाजारी वर्तमान कीं, वाडीकडे कोंकणांत शहापूरचे मार्गानें महाराज जाणार म्हणोन. खरें लटकें समजत नाहीं. गोखल्यानीं खानापूरचें ठाणें पाडणेंस पाठविलें त्यांजकडे राजश्री नानाचीं पत्रें तीा राजश्री भाऊसाहेबांकडील महालांचा बंदोबस्त करणेंविशीं आहेत म्हणोन लिहिलें आहे. पारगड व कळानिधिगड व भीमगड निा सरकार याणीं चांदगडें वगैरे राजमंडळकरानीं घेतलेलीं ठाणीं फिरून घेतलीं. सामानगडचा जमाव तुर्त येकमनमुरडीस माघारा आला आहे. याजउपरी काय वर्तमान येतें पहावें. वडिलांकडील कारकून

---

१ सरदार रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें कुरुंदवाडाहून बाळासाहेबांस

२ तुम्हांकडील

महाराजांकडे गेलाच आहे. वर्तमान येतच असेल. हल्लीं वर्तमान आलें तें सेवेसीं लिहिलें आहे. रवाना छ० ७ जमादिलाखर. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३८९१ श्री. (मार्ग. शु. ९–८ दिसें.)

पैा छ.× ८ जमादिलाखर सन सबा तिसैन–मार्गशीर्ष.

सेवेशीं शिरसाा नमस्कार विज्ञापना. छ. ३ जमादिलाखरीं श्रीा राजश्री नानानीं आज्ञा केली जे, श्रीा राजश्री रामचंद्रपंत आपा कडील कारकून विसाजीपंत म्हणोन मिरजेहून श्री॥ राजश्री भाऊसाहेबांसीं येऊन बोलोन गेला याप्रकारचें तेथें बातमिदार कारकून आहे त्याचें लिहिलें आहे. त्यास अशी गोष्ट होऊं नये, येविशींचा बंदोबस्त चांगला जाला पाहिजे. याजकारितां तुम्ही मिरजेस लिहून पक्का बंदोबस्त करावा व अत:पर अशी गोष्ट जाल्यास ठीक नव्हे. याप्रों ताकीद जाली. त्याजवरून विनंति लिहिली असे. तर कारकून पाठवूं नये म्हणोन श्रीा राजश्री आपासाहेबांस आज्ञा व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८९२ श्री. (मार्ग. व १–१५ दिसें.)

पैा छ. १८ जमादिलाखर सन सबा तिसैन.

विज्ञापना श्रीमंतांजवळ कोणी कोणी जुने दादासाहेबांचे प्रकरणांत बाहेर घातले व शास्त्री होते ते आले आहेत. त्यांस (बाजीरावसाहेबानीं) ठेऊन घेतलें याजमुळें लेखकांचें[3] चित्तांत संशय आला आहे जे, ते वेळेस परिपत्य करून आम्ही घालविले ते फिरोन सरकारांत ठेवल्यास त्यांचा विश्वास आम्हांस पटावयाचा नाहीं. श्रीमंतांजवळ ते; आम्ही हमेशा श्रीमंतांकडे जाणार येणार;

× तारीख व मिति पैवस्तीची. १ पत्र कारकून वकील म्हैसकर याचें बाळासाहेबांस.

१ कारकून वकील बाबूराव शिवाजी म्हैसकर याचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र. २ राज्याबाहेर घालवलें होतें. ३ नानाच्या.

तेव्हां त्यांजकडून आम्हांस दगाधोपा होईल. व बाजीरावसाहेब लोकांस मनस्वी देतात. बाळाजीपंत पटवर्धन यास पालखी दिली. काल ग्रहणास एकोणीस हजार रुपये खर्च केला. शालजोड्या यावयाच्या गृहस्थांस दिल्या व न यावयाच्या गृहस्थांसही दिल्या! असा मनस्वी वेव्हार होतो. त्याजमुळें लेखकांचें म्हणणें 'आमचे हातून निभावणी पडावयाची नाहीं.' कारभार झाडून बंद आहे. काल रायाजी पाटील आले होते. गोविंदराव पिंगळे वगैरे बोलत आहेत. काय ठरतें पहावें. अद्यापि निखालसता नाहीं. वस्त्रें झाल्यापासोन एक वेळ लेखक श्रीमंतांकडे गेले होते. पूर्ववत्प्रमाणें चालावयाचें अवघड आहे. शिंद्यांचीं पलटणें अद्यापि श्रीमंतांभोंवतीं आहेत. परवानगीशिवाय कोणी आंत जावयाचा नाहीं. सेवेशीं श्रुत होय. चिट्टी पाहून फाडावी. हे विज्ञापना.

नं. ३८९३ श्रीगजानन. (मार्ग. व. ३–१७ दिसें.)

विज्ञापना छ. १७ जमादिलाखर भृगुवासर. येथें कारभारी[1] आज चार रोज सिद्ध फौज पायदळसुद्धां राहतात. शिंदेही तयार असतात ऐसें सांगतात, परंतु तें लटकें आहे. गुंड[4] याजकडील प्यादे आमचे चौकीस असतात त्यांचेही म्हणणेंत गडबड भारी. याजकरितां विनंति लिहिली आहे. बाजारी अफवा लिहिली आहे. दुसरें, शिंदेकडील ऐवज देणें त्याजपैकीं शिंद्यास ऐवज थोरले[3] वीस[5] दिले म्हणोनही बोलवा आहे. काय आहे न कळे! सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं.३८९४ श्री. (मार्ग. व .९–२२ दिसें.)

पैा छ. २५ जमादिलाखर. सन सबा तिसैन.

सेवेसीं बाबूराव शिवाजी. दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता. छ. २२ जमादिलाखर पावेतों स्वामीचे कृपेंकरून

---

१ श्रीमंतांकडून नानाकडे मध्यस्थीकरितां. २ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र. ३ नाना. ४ नागोजी गुंड हा नानांकडील प्याद्यांचा जमादार. ५ वीस लक्ष.

सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पेशजी स्वामींचें पत्र आलें त्यांत आज्ञा जे, "राजश्री बाबाजीपंत यास ठेऊन तुम्ही येणें; बोलोन जाणें, म्हणोन. त्याजवरून श्रीा राजश्री नानांस विनंती केली. त्यांणीं आज्ञा केली, "निरोप द्यावयाचा नाहीं" इतकेंच उत्तर जालें म्हणोन परवां विनंती लिहिलीच आहे. त्याजवर काल नानांस विनंती केली जे, श्रीमंत यजमानांची आज्ञा येऊन जाणें म्हणोन आली आहे. त्यास स्वामींचें म्हणणें निरोप द्यावयाचा नाहीं. त्यास तेथील आज्ञा आली त्यापक्षीं मला गेलें पाहिजे. निरोप द्यावा. तेथील आज्ञा (निघून येण्याची) असतां मी राहावयाचा नाहीं. तेव्हां नानानीं सांगितलें, " आम्ही येथून जनार्दनपंत म्हैसकर यांस सरकारी कांहीं बोलणीं आहेत तीं बोलावयाकरितां मिरजेस पाठविणार. याजकरितां तुम्हीं आम्हांजवळ रहावें. तुम्हीं आपलीं बोलणीं त्यांजपासींच सांगावीं. तेथें बोलतील. " तेव्हां मीं विनंती केली, " मी दहा बारा दिवसांत येतों. उपरांतिक त्यांस पाठवावें. " तेव्हां बोलले, " मी म्हणतों याप्रमाणें मिरजेस ल्याहावें; " म्हणून सांगितलें. त्याजवरून विनंती लिहिली आहे. त्यास निघोन येणेंविशीं आज्ञा जाल्यास निघोन येतों. अथवा राजश्री बाबाजीपंत यांस पाठविणेंविशीं आज्ञा जाल्यास पाठवितों. चि॥ राजश्री जनोबांस पाठविण्याचें कारणही समजलें. इमान प्रमाण बेल भंडार घ्यावे, खातरजमा नानानीं आपली करून घ्यावी, मग श्रीमंतांची खातरजमा नानानीं करावी, या बोलण्यास पाठविणार. हें दुसऱ्यास समजों नये. मला जशी आज्ञा येईल त्याप्रमाणें करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. या पत्राचें उत्तर लौकर देणेंविशीं आज्ञा व्हावी म्हणजे आज्ञेप्रमाणें करीन. हे विज्ञापना.

नं. ३८९५ श्री.(मार्ग० वं० १०–२३ दिसेंबर.)

पै॥ छ० २३ जमादिलाखर. सन सबा तिसैन.

विज्ञापना. श्रीमंतांस वस्त्रें जाहलीं त्या तागाईत त्यांजकडे

---

१ पत्रावर घातलेली तारीख पैवस्तीची आहे. पत्र जनार्दन शिवाजी म्हैसकर यांचें मिरजेस.

श्रीमंत राजश्री नाना दोन वेळ गेले होते. उभयतांचें चित्त शुद्ध नाहीं. श्रीमंतांचे भोंवतीं पलटणें शिंद्यांकडील आहेत. नानाचें म्हणणें, " पलटणें उठावीं. हुजुरातेंत येऊन रहावें. चौकी पाहऱ्याचा बंदोबस्त आपला[1] असावा " असें म्हणणें आहे. शिंदे, होळकर, भोसले, मशीर यांचा जेथें मुक्काम आहे तेथेंच आहेत. नानांचा मुक्काम पुलानजीक आहे तेथेंच आहेत. श्रीमंतांजवळ दरकदार कोणी नाहीं. दरबार आमखास विशेषेंकडून परस्पर नाहीं. उभयतांचें चित्त शुद्ध होणें कठिण दिसतें. येणेंप्रमाणें बंदोबस्त नाहीं. सरदार चार भारी त्यांचें चित्त शुद्ध नाहीं ऐसें आहे. भोसले व मशीर यांचें व कारभारी यांचें एकचित्त आहे. सरदारांपैकीं शिंदे मात्र यजमान स्वारीस गेले तर जातात. वरकड पागे वगैरे आज्ञेबरहुकूम जातात. पागेही तेथें विशेषेंकडून कोणी नाहींत. हुजुरातपैकीं मानकरी विशेषेंकडून कोणी तेथें नाहीं. श्रीमंतांजवळ प्रमुख पलटणें शिंद्यांचे कडील आहेत. त्रिवर्ग श्रीमंत स्वारीस + ची पागा चिंचवड वगैरे येथें जातात. श्रीमंत राजश्री आपासाहेब[2] घोडीं फेरावयास जातात. वडीलसाहेब विशेषेंकरून जात नाहींत. खलबताखालीं पुरे आहे ! स्वारीस अवकाश नाहीं ! राजश्री दाजीबांस[3] मिरजेस येणेंविशीं पत्र लिहिलें म्हणोन आज्ञा, त्यास लवकरच आज्ञेप्रमाणें उभयतांतून[4] एकजण येतील. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८९६ श्री. (मार्ग. व.+ १०–२३ दिसें.)

पै॥ छ० २३ जमादिलाखर. सन सबा तिसैन

सेवेसीं बाबूराव शिवाजी म्हैसकर. दोनी कर जोडून शिर-साष्टांगनमस्कार विज्ञापना. " राजश्री बाबाजीपंत यास तेथें ठेऊन तुम्ही येऊन जाणें " म्हणोन आज्ञा, त्याजवरून श्री॥ राजश्री

---

१ आपला म्हणजे कोणाचा ? बाजीरावांचा कीं नानांचा ? + पत्र फाटल्यामुळें येथली अक्षरें गेलीं. २ चिमाजी आपा. ३ वडील बंधु बाबूराव. ४ बाबूराव अथवा त्याचा जोडीदार चाफेकर यांतून. + मिती व तारीख पैवस्तीची.

नानांस विनंती केली जे, " यजमानांची आज्ञा आली आहे जे, मिरजेस येऊन जाणें. त्यास आज्ञा जाल्यास जाऊन येतों. " त्याजवरून आज्ञा जाली, " निरोप द्यावयाचा नाहीं. " त्यास आज उद्यां गांठ घालोन समजोन सांगोन निरोप घेऊन येतों. काल श्रीमंतांकडे नाना गेले व मशीरन मुलुकही गेले होते. काय ठरलें हें समजलें नाहीं. आठचार दिवसांत येथीलही रंग समजेल. नंतर मी निघोन सेवेसीं येतों. निरोप द्यावयाचा नाहीं हें नानानीं म्हणावयाचें कारण-ही हेंच आहे जे, घडी बसेल किंवा कसें होईल याजकरितां निरोप दिल्हा नाहीं. श्रीमंतांजवळील मंडळी काढावी आणि नाना सांगतील ती ठेवावी असें ठरण्यांत येईल असा रंग दिसतो. काल बारा घटका रात्रीस नानाची स्वारी वाड्यांतून परत आली. आज त्यांतील भाव समजतील ते सेवेसीं लिहून पाठवितों. पेशजी स्वामींनीं पुरवणी पाठ-विली होती ती पाहिली आणि नानांसही दाखविली. नानानीं सांगितलें, कांहीं चिंता नाहीं. पुरवणी माघारी पाठविणेंविशीं आज्ञा, त्याजवरून हल्लीं पाठविली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८९७ श्री. (मार्ग. व. १२–२५ दिसें.)

पै॥ छ. २५ जमादिलाखर. सम सबा तिसैन.

पु॥ सेवेशीं विज्ञापना. आम्ही येथून विनंती लिहितों ती तेथें सर्वांस कळोन त्यांतील पर्याय येथें लिहिले येतात याप्रों आम्हांस आढळलें ! त्याजवरून विनंती लिहिली आहे. वडिलांविसीं श्रीमंतांची मर्जी बहुत रुष्ट आहे म्हणोन काल लेखक बोलले. तेथें बातमीकरितां कोण आहे न कळे ! कचें वर्तमान येथें येतें ! सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३८९८ श्री. (पौष शु० १–३० डिसेंबर.)

पै० छ १९ रज्जब. सन सबा तिसैन. पौष.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेसी.

---

१ नानांच्या कारभाराची घडी. २ तारीख व मिति पैवस्तीची. पत्र बाबूराव मेसकराचें. ३ परशुरामभाऊविषयीं. ४ नाना.

पोष्य बाळाजी जनार्दन सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असावें. विशेष. आपण छ० २४ जमादिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. "महाराजानीं जमखंडीचें ठाणें घेतलें. आतां कोणते मार्गें येतील हें न कळे. मिरज प्रांतांतील वोली नेल्या आहेत त्या अद्याप सुटून आल्या नाहींत. चि॥ राजश्री दादा[1] याजकडील कुइलगोड तालुके यादवाड येथील ठाणें घेतलें. (तेथें) शंभर माणूस राजे यांजकडील आहे. चांदगड तालुके कलानिधी येथील ठाणें राजमंडळकरानीं घातलें होतें तें कलानिधीकरानीं उठवून देऊन सरकारचें ठाणें घातलें. डुकरवाडीचें ठाणें सामानगडकरी याणीं घेतलें. सरकारचे लोक होते ते जखमी केले व जिवें मारिले म्हणोन शहापुराहून पत्रें आलीं. वल्लभगड व कलानिधी याणीं दहशत घेतली आहे. महाराजांचे फौजेचा जमाव दिवसेंदिवस अधिक होत आहे. आपणांस (त्यांचीं) पत्रें सरळपणाचीं येतात, परंतु सरकारची फौज आल्याविना बंदोबस्त होतां दिसत नाहीं ! कुरुंदवाड व इचलकर्जीचीं ठाणीं अद्याप आहेत, परंतु राजे यांचा निकर्ष आहे." म्हणोन लिहिलें तें कळलें. त्यास इचलकर्जीकडे व कुरुंदवाडाकडे श्रीमंतांची फौज आल्यास आपण व राजश्री रघुनाथरावदादा याणीं फौज पाठवून बंदोबस्त राखावा. महाराजांस पत्रें याउपरी झाडून प्रांतांत व इचलकर्जी वगैरे येथें उपद्रव होऊं नये म्हणोन मुजरद पत्रें पाठविलीं आहेत. उपद्रव होणार नाहीं असें आहे. राजश्री बाळकृष्ण महादेव[2] यांचीही रवानगी श्रीमंत महाराजांकडे एका दोहों रोजीं करितों. रवाना छ० ३० जमादिलाखर. राजश्री नागो शामजी यांचे गाव खेड्यांस उपद्रव होऊं लागल्यास त्यांचीही कुमक करावी. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

---

१ कुरुंदवाडकर. २ हा नानांचा कारकून, उपनांव बाळ, वास्तव्य कल्याण, याचे वंशज मिरजेस आहेत.

नं. ३८९९ श्री. (पौष शु. ९--७ जाने.)

पै॥ छ० १२ रज्जब. सन सबा तिसैन.

[1]विज्ञापना. काल भृगुवारीं लेखक[2] श्रीमंतांकडे गेले होते. तिघे खासे व लेखक ऐसें चौघांचें खलबत दोन घटका जाहलें. भृगुवारची[3] रात्र म्हणोन दिवस असतांच माघारे येणेंस निघाले. आज मंदवारीं मर्जी प्रसन्न दिसते. गोष्ट ठरावांत आली असी दिसते. शिंदे यांची पलटणें[4] उठलीं नाहींत. हुशारी म्हणावी तरी चोहींकडे आहे! मागाहून सविस्तर लिहितों. चि॥ राजश्री विठोबा आले. तेथील प्रकार सेवेसीं लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९०० श्री. (पौष शु. ९–७ जाने.)

पै॥ छ० १२ रज्जब. सन सबा तिसैन. पौष.

पुं॥ सेवेशीं सा॥ नमस्कार विज्ञापना. छ. ५ रज्जबीं श्री॥ राजश्री अमृतराव हिराबागेंत संध्याकाळचे चार घटका दिवसास आले. श्री॥ राजश्री नानाही गेले. उपरांतिक तीन घटका रात्रपावेतों खलबत (झालें.) खलबतांत राजश्री रायाजी पाटील शिंद्याकडील व आबा शेलूकर व दादा गद्रे येणेंप्रमाणें होते. अमृतराव याणीं यादी करार करून श्रीमंतांकडून आणिल्या होत्या. नानास सांगितलें, "अत:पर वोढूं नये. सोईस काम लावावें. दादासाहेबांचे ठायीं आम्ही आपणांस म्हणतों; त्याअर्थी बंदोबस्त करावा. बखेडा होऊं नये श्रीमंतांचा कारभार अव्यवस्थ, याचा बंदोबस्त आपण करतों. आपण डेऱ्यास यावें." याप्रकारें बोलोन गेले. तदनंतर काल छ. ७ रज्जबीं श्री॥ राजश्री नाना संध्याकाळचे प्रहर दिवसास श्रीमंतांकडे गेले. चार घटका रात्रपावेतों बोलणें जालें. (उभयतांचा) एकविचार जाला

---

१ बाबाजी विश्वनाथ चांफेकर कारकून याचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ नाना- ३ शुक्रवारच्या रात्रीस बोललेल्या गोष्टी सिद्धीस जात नसतात म्हणून. ४ बाजीरावा. भोंवती शिंद्यांचा बंदोबस्त आहे तो आहेच! ५ मोरो आपाजी परांजपे वकील याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

असें लोकवदंतेंत आहे. सविस्तर मागाहून ठीक शोध करून लिहून पाठवितों. परंतु परिणामास जाणें कठिणच आहे! भोसले यांची फौज पैठणावर होती ती येथून पंधरा सोळा कोसांवर आली. वीस हजार जमाव आहे असें म्हणतात. येथें चार दिवस [1]जिनबंदी रात्रीची असते. तशीच चहूंकडे भोसले, शिंदे व नबाबाकडील फौजेंत याप्रकारेंच आहे. कोणते थरास जाईल पहावें. याजमुळें कोणतेंच नानांस सुचत नाहीं असा प्रकार जाला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ३९०१ श्री. (पौष व० १–१३ जाने.)

पै॥ छ० २२ रज्जब. सन सबा तिसैन. पौषमास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं.

पोष्य बाळाजी जनार्दन सा॥ नमस्कार विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष. आपण छ० ८ रज्जबचें पत्र पाठविलें तें पावलें. अनं[2]तशयन राजाकडून हत्ती येक खरेदी करून आणविला होता तो राजश्री परशुरामपंत भाऊ याणीं आपले चिरंजीवांकडे लाऊन दिला होता तो हल्लीं रवाना केला आहे म्हणोन लिहिलें, त्यास हत्ती दंताळ सरंजामसुद्धां एक पाठविला तो पा[3]वला. रवाना छ० १४ रज्जब बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

नं. ३९०२ श्रीगजानन. (पौष व० ३–१५ जाने.)

विज्ञापना तागायत छ० १६ रजब क्षेम असे. वडिलीं शहाजीबरोबर निरोप सांगून पाठविलेप्रमाणें पावले. राजकीय वगैरे बाजारी वर्तमान लिहून पाठविणेंविषयीं आज्ञा, त्यास येथून बाजारी

---

१ घोड्यावर जिनें घातलेलीं! २ त्रावणकोरचे महाराज यांजकडून. ३ सरकारचा हत्ती सरकारांत परत आला. ४ बाळाजी गणेश जोशी याचें पत्र मिरजेस सदर बाळाजी हा विठ्ठल पांडुरंग पटवर्धन यांचा कारकून.

वर्तमान लिहिलें असतां तेथें सर्वत्रांस कळतें. याजमुळें लिहावयास येत नाहीं. बाजारी वर्तमान खरें नव्हे.

१ शिंदे यांचें व मशीरन्मुलूख[1] यांचें बोलणें जाहलें. मकारनामकाचें सूत्र मिळालें शिंयाकडे, ऐसें म्हणणें लोकांचें आहे. मशीरानें देशास जावें असें आहे.

१ भोसल्यांचें व शिंद्यांचें बोलणें मिटत नाहीं. भोसले (लढाईचा) सरंजाम करीत आहेत. शिंद्याचा कंपू अंबोजी इंगळे ऐसे (हिंदुस्थानांतून) येणार. भोसलेकडून कांहीं ऐवज मागतात[2]. ऐसें लोक बोलतात. एकूण काय आहे न कळे.

१ हुजरात पागे श्रीमंतांसीं बोलून बेलभंडार जाहला कांहीं व्हावयाचा आहे.

१ सर्व जन म्हणतें कीं लढाई होईल किंवा काय होईल हें समजत नाहीं; ऐसें संकट म्हणतात. एवंच सावध आहेत.

१ शिंदे, भोसले, मशीर, ऐसे वगैरे म्हणतां पायदळ सुद्धां लाखाची बेरीज ! आणखी गायकवाड सुद्धां येणार.

१ श्रीमंतांस[3] नवऱ्या पाहणेंस पालख्या कोंकणांत श्री. राजश्री नानानीं पाठविल्या.

येणेंप्रमाणें आहे. पत्र पाहून रवाना (?) करावयाची आज्ञा जाहली पाहिजे. श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ३९०३ श्री. (पौष व. ४–१६ जाने.)

पै॥ छ० १९ रज्जब. पौषमास. सन सबां तिसैन.

सेवेशीं जनार्दन शिवाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना

---

१ मशीर. २ कोण मागतात ? शिंदे कीं पेशवे ? ३ बाजीरावसाहेबांकरितां.

ता॥ छ० १७ रज्जबपावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. "राजश्री नीळकंठ आपाजी पोंक्षे याचा शोध करणेंविशीं त्याचे घरीं सांगितलें आहे. मासपक्ष लागेल. शोध करून सव्वीसशें रुपये मशारनिल्हेचा शोध लावून देवितों;" म्हणोन लिहिलें, ऐशास सव्वीसशें रुपये सरकारांत आम्हांपासून घेतले ते सावकाराकडून देविले त्याचें मागणें रोज होत आहे. व "मशारनिल्हेस हजीर करून द्यावें, नाहीं तर त्याचे माथां खंड बसेल तो द्यावा," असें बोलणें रोज सरकारचें आहे. त्याचें उत्तर स्वामीनीं पाठविलें कीं, "ते आमचे पदरचे. सर्व प्रकारें राजश्री नानानीं कृपा केली, त्यापेक्षां पदरच्यांकडे काय आहे? (तुम्ही नानांस) विनंती करावी" म्हणोन लिहिलें. त्यास "आपले पदरचे म्हणोन त्यांस सोडवून आणिलें असतां पळून गेले! सरकारचें बोलणें तुमचे हवालीं केले असतां पळून गेले त्यापेक्षां त्यांजकडे दोष लागला. हवालीं करावे. नाहीं तर सर्वांबरोबर गुन्हेगारीचा ठराव करूं त्याप्रों फडशा करून द्यावा." असें बोलणें पडून सक्त निकड होत आहे. राजश्री श्रीपतरावभाऊ यांची स्त्री व चि॥ राजश्री आबाची रवानगी करून द्यावयाची, त्यास जामीन आम्ही आहों; निरोप द्यावा; म्हणोन विनंती काल नानांस केली. त्याचें उत्तर जालें कीं "येक तुमचे हवालीं जामीन होऊन केले ते पळून गेले. त्यांस हजीर करावें तें करा तर तुम्हापासून फडशा करून घ्यावयाचा! असें असतां दुसरें झट बगलेस मारून कशास बोलतां?" त्यावरून "राजश्री आनंदराव रामचंद्र यांचें पत्र जामीनगतीचें (त्यानीं) आणून द्यावें आणि (आम्ही) निरोप द्यावा" असा ठराव जाहला आहे. मानिल्हेस मिरजेस सौ॥ लक्ष्मीबाईनीं[3] पत्र पाठविलें आहे. आपणही त्यांस सांगोन पत्र पाठवावें म्हणजे रवानगी करून देतों. त्यांजकडील इनामगांव व जमिनीची जप्ती

---

१ मिरजकरांकडून परशरामभाऊंच्या दिमतीस दिलेला हा कारकून. ऐ. ले. संग्रहांत यानें लिहिलेली भाऊंच्या स्वाऱ्यांसंबंधाचीं शेंकडों पत्रें छापलीं आहेत. २ हुपरीकर जोशी. सावकार. ३ श्रीपतराव मोरेश्वर यांची स्त्री.

करीत होते. त्यास आपली स्वारी (येथें) येऊन बोलणें होईतोंपर्यंत राजश्री श्रीपतराव संबंधें कांहीं करूं नये असें बोलोन मना केलें आहे. आपण आल्यावर मग जसें ठरेल तसें ठरवितां येईल. राजश्री गंगाधरराव हुपरीकर यांचा गांव हुपरी करवीरवासी याणीं घेऊन ठाणेंत लोक आपले घातले म्हणोन कळलें, त्यावरून करवीरकरांस पत्र श्रीमंत राजश्री नानांचें घेऊन पाठविलें आहे. राजश्री आनंदराव भाऊंस त्यांचें अगत्य असल्यास पत्र त्यांजकडे देवावयाची आज्ञा व्हावी. म्हणजे कारकून (करवीरकरांकडे) पाठवितील. पहिल्याप्रमाणेंच रहस्य[1] असल्यास मग गंगाधरराव यांजकडे पत्र पाठवावें. ते त्यांजकडे[2] पाठवितील. येथील वर्तमानें गलबलीचीं मनस्वी तिकडे येतात त्यास विना बातमी दिनचर्येंची समजलेशिवाय ठीक नव्हे. येथें प्रकरण पडलें आहे मोठें ! त्यापेक्षां एकदोन मास लागतील तों डाक ठेवावी म्हणजे रोज येक पत्र दिनचर्येंचें येत जाईल. बातमी समजली असतां गलबली उठणार नाहींत. जरूर डांक ठेवावी. तीस[3] माणूस लागेल. राजश्री विसाजी नारायण यांजकडे मौजे भुकम आहे. त्यास तूर्त घालमेल करून दुसरेकडे सांगावें. पुढें सुभत्ता पाहून करणें तसें करतां येईल. ते अटकेंत, त्यांजकडे गांवकरी येत असतात, बातमींत समजलें असतां "तुमचा गांव अद्यापि त्यांजकडे कां ?" असें म्हणतील. याजकरितां धोंडो बापूजीकडे पत्र पाठवावें. म्हणजे बंदोबस्त करितील. पुढें सुभत्ता दृष्टीस पडली असतां जसी मर्जी असेल तसें करावें. परंतु तूर्तचे प्रसंगीं काळानुरूप केलें पाहिजे. राजश्री नीळकंठ आपाजी येतांच त्यास पाठवून द्यावा. निकड फार आहे. पांच रुपये दरबारखर्च करून झट तोडूं म्हटलें असतांही

---

१ रहस्य म्हणजे द्वेष ! २ करवीरकरांकडे. ३ पुण्यापासून मिरजेपर्यंतची रोजची डांक बसवायला तीस माणसें लागत ! म्हणजे अजमासें दीडशें रुपयांचा दरमहा खर्च ! आतां तेंच काम पंधरा आण्यांत होतें !

ऐकत नाहींत ! काय करावें ! उपाय नाहीं ! राजश्री पर्वतराव शिंदे मळणगांवकर सरकारांत आले आहेत. "त्यांचा सरंजाम राजपत्री.[1] तो घेऊन सुभानराव शिंदे यांजकडे (तुम्ही) दिला आहे तो पुन्हां पर्वतराव यांचा यांजकडे द्यावा" अशी श्री॥ राजश्री नानांची आज्ञा आहे. राजपत्रें व सरकारचीं पत्रें पर्वतराव यांजकडे साकसुरत आहेत. येविशीं काय आज्ञा ? मंगळवेढें येथील रयतेविशीं कुळकर्णी यांची वगैरे घुगरी मना करून कुळकर्णी हुजूर आणवावे असें श्रीमंत[2] वरचेवर सांगतात. त्यास कसें करावें ? (यांच्या म्हणण्याप्रमाणें) न जाहलें असतां कुळकर्णाची जप्ती करितात ! खिजमतगाराकडून[3] रयतेची दाद लागली आहे. तूर्त माहात्म्य[4] येथें तेंच विशेष आहे ! सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९०४ श्री. (पौष व. ४–१६ जाने.)

पै॥ छ० २० रज्जब सायंकाळचा सहा घटका दिवस. सन सबा तिसैन.

विज्ञापना ता॥ छ १७ रज्जब इंदुवासर पावेतों यथास्थित असे विशेष.

१ शिंदे याजकडील रा॥ आबा चिटणीस यांचे पुत्रास (शिंद्यांच्या) दिवाणगिरीचीं वस्त्रें होणार. पुत्राचें नांव हरि आबाजी. एक दोन रोजांत वस्त्रें होतील असें आहे.

१ रामजी पाटील याजवर राजश्री दौलतराव शिंदे यांचा विश्वास नाहीं.

१ श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब व राजश्री अमृतराव यांचे लक्षांत गृहस्थ[6] मिळाले—

---

१ छत्रपतींच्या सनदेचा. त्यांत कोणास घालमेल करितां येत नाहीं. २ बाजीरावसाहेब. ३ प्रत्यक्ष श्रीमंतांचा खिजमतगार ! मग काय विचारावें ! ४ श्रीमंत बाजीरावसाहेबांजवळ तूर्त खिजमतगारांचा बोलबाला ! ५ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चाफेकर यांचें पत्र पुण्याहून. ६ नानांस सोडून श्रीमंतांस मिळाले.

१ बाबा फडके याणीं पांच लक्ष रुपये देऊन लक्षांत मिळाले.
१ त्रिंबकराव परचुरे याणीं एक लक्ष रुपये देऊन तिकडे मिळाले.
१ नारोपंत चक्रदेव तिकडील मर्जींत मिळाले.
१ आबा शेलूकर तिकडील ममतेंत आहेत.
१ गोविंदराव पिंगळेही तिकडे संधानांत आहेत.

५

येणेंप्र॥ वर्तमान आहे.

१ गोविंदराव कृष्ण काळे भागानगराहून येथें आले. येऊन पंधरा दिवस होत आले. त्यांचें व मशीराचें वांकडें आहे. काळे यांचें लक्ष श्रीमंतांकडे दिसतें. काळे याणीं मशीराकडील फौज फोडून मशीरास यथास्थित ठेवावा या लक्षांत आहेत.
१ नानांकडील मंडळीचीं माणसें मुलें पुण्यांत होतीं तीं गेलीं-
१ खंडोपंत वर्तक.
१ गोपाळजी गुंड.
१ त्रिंबकराव परचुरे यांचीं जाणार.

३

१ सरकारचे पागे वगैरे मानकरी लोक यांचा व राजश्री अमृतराव यांचा बेलभंडार होत आहे.
१ सरंजामी व पागे वगैरे शिलेदार यांचा पट राजश्री अमृतराव याणीं दप्तरांतून नेला. आणि पागेचे सरदारांस बाजूस विल्हेवर उतरणेंविशीं चिट्या पाठवीत आहेत. पागे वगैरे उतरावयासीं गेले. मालोजी घोरपडेही गेले.
१ श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांचें व राजश्री नानाचें अद्याप एकचित्त बेकिलाफीनें जाहलें नाहीं. उभय पक्षीं दिकत आहे.

१ मातबर गृहस्थांचीं लक्षें (अमृतराव वगैरेनीं) श्रीमंतांकडे लाऊन ठेविलीं आहेत.

याप्रमाणें बाजारी वर्तमान ऐकींव लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९०५ श्री. (१९ जानेवारी.)

पै॥ छ. १३ रज्जब. सबां तिसैन.

सेवेसीं सा॥ नमस्कार विज्ञापना. पौष व० ७ होळकर संगमावर तळ होता तो कूच करून खडकीचे पुलावर गेला. श्रीमतांचा तळ एक दोन रोजांनीं थेऊरास जाणार. भोंसले यांचे व शिंदे यांचे एकलासीमध्यें ठीक नाहीं. गांवांत लोक सावध मातबर जाले. याजप्रों बाजारबातमी ऐकींव लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विज्ञापना.

नं. ३९०६ **श्रीगजानन** (पौष+व०१०–२२ जाने.)

पै॥ छ० २३ रज्जब सन सबां तिसैन.

विज्ञापना. शहरचे लोक सावध जाहले. शहरानजीक हंगामा होईल म्हणोन कूच दोन कोस फांसल्याचें होणार. श्री॥ राजश्री नाना वाईकडून देवीचे दर्शनास जाणार ऐसें बाजारी वर्तमान आहे. तत्पक्षी लोक बहुत सावध आहेत. येथें अद्याप राज्याची घडी बसली नाहीं. दोन मुली श्रीमंतांकडे पाहण्यास राजश्री नानानीं पाठविल्या आहेत ऐसें वर्तमान बाजारी आहे. लेखक काळे भेटले होते. सुखरूप आहेत. मागाहून विनंति लिहितों. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ धोंडो बापूजी जोशी यांचें पत्र पुण्याहून २ सराडीहून थेउरास. ३ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें पत्र पुण्याहून. + मिति व तारीख पैवस्तीची. ४ लढाई. ५ श्रीमंतांच्या लष्कराचें कूच. ६ बाबा काळे फडणीस नि॥ तासगांवकर.

नं. ३९०७ श्री (पौष+ व० १४–२६ जाने.)

पै॥ छ० २७ रज्जब. सन सबां तिसैन.

विज्ञापना[1]. बाजारी वर्तमान. खरें नव्हे. श्री॥ राजश्री बाजीराव बाबासाहेब व अमृतरावसाहेब व शिंदे ऐसे श्री॥ राजश्री नानाचे डेरेस येऊन समजाविशी करून आपले डेरेस घेऊन जाणार हें एक. दुसरें श्रीमंतांचें व कारभारी यांचें रहस्य नाहीं, कुरडूचा घाट नानानीं नीट[2] केला, हें एक. ऐसीं अनेक प्रकारचीं वर्तमानें. होळकर श्रीमंतांचे डेऱ्याजवळ जाऊन उतरले. भोसले शिंदे मशीर आहेत तेथेंच आहेत. दाजीबा फडके यांची कन्या श्रीमंतांस देणार. राजश्री बाळाजीपंत पटवर्धन येऊन मूल पाहून गेले. लग्न कवडीवर व्हावें ऐसें आहे म्हणतात. येणें प्रमाणें बाजारी वर्तमान. जामीनदारानीं निरोप दिला तर तिकडे येऊन महाराजांचे[3] पाय पाहून मुदतीस माघारें यावें ऐसें (मनांत) आहे. घडेल तें खरें. वडिलांचीं पत्रें राणूबरोबरच पाठवून राणूस लवकर माघारा पाठविण्याची आज्ञा व्हावी. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३९०८ श्री. (पौष व० १४–२६ जाने.)

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक रामाजी[4] अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २७ रजब पावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. गोकाकेहून बातमीचें पत्र आतांच आलें तेंच बजिन्नस सेवेसीं पाठविलें आहे. त्याजवरून विदित होईल. पत्रांतील भाव पहातां भरंवसा दिसत नाहीं. दोन चार वेळां या प्रकारें तवाई पडली परंतु स्वामींचे पुण्यप्रतापें निभावणी पडली. हल्लींचा प्रसंग–पराभव करणार स्वामी समर्थ आहेत. लष्कर[5] समीप.

---

१ बाळाजी गणेश कारकून याचें पत्र पुण्याहून. + मिति व तारीख पैवस्तीची. २ पुन्हां कोंकणांत पळून जाण्याकरितां ! ३ तुमचे. ४ फडणीस परगणे तेरदाळ. ५ करवीरकरांचें.

जवळचे परगणेचें झाडून गुळें जाहलें. चहूंकडील आवाई मुळें येथें कोणी धर धरीत नाहीं. गांवचे लोक झाडून गुळेंस चालिले. सविस्तर वर्तमान सेवेसीं कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. हुजूरचे कारकून लष्करांत ... ... + ... × ... ... पाठवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. बहुत काय लिहिणें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३९०९ श्री (माघ शु० १–२८ जाने.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री रामाजी अनंत ठाणें तेरदाळ स्वामी गोसावी यांस. सेवक गंगाधरराव गोविंद नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणें विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. "करवीरकरांची फौज जमखिंडीस येऊन फार नासाडी केली. तेथील व परगणेंतील वाणी व सराफ यांस घरादाराची सोय नाहीं, याकरितां तेरदाळांत येऊन राहणार, येविशी काय आज्ञा ?" म्हणोन लिहिलें तें विदित जालें. ऐसीयास वाणी व सराफ वगैरे उदमी यांकडे तिकडील कंझ्या कांहीं नसल्यास त्यानीं सुखरूप येऊन रहावें. कंझ्याची असामी रहावयाचें प्रयोजन नाहीं. येविशींची चौकशी करून ठेवणें ते ठेवावे. पुढें हरएकविशीं खटला पडूं नये. रवाना छ० २९ रज्जब सुरु सन सबां तिसैन. मय्या व अल्लफ.

नं. ३९१० श्री. (माघ शु० ५–२ फेब्रु.)

पै॥ छ० ९ साबान. सन सबां तिसैन. माघ.

सेवेसीं सा॥ नमस्कार विज्ञापना. माघ शु॥ ५ वर्तमान क्षेम. श्री॥ राजश्री नाना शिरोप फौजेस देतात. राजश्री काशीबा होळकर याजला मुख्य वस्त्रें व बक्षीगिरीचीं बापू होळकर याजला श्रीमंतानीं दिलीं. मल्हारजी होळकर याजला वस्त्रें द्यावीं असा मजकूर

+ येथील मजकूर कागद फाटल्यामुळें गेला आहे. १ कारकून धोंडो बापूजी जोशी याचे पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

नानांचा होता तो न जाला. रा॥ मन्याबा भोसले (श्रीमंतांच्या) भेटीस्तव तयार होऊन निघोन आले. श्रीमंतही तयार होऊन निघाले. नंतर मनांत दिक्कत येऊन अपशकुन जाला म्हणोन भेटी न जाल्या ! श्रीमंतांचे लग्नाचा निश्चय जाला अद्यापि नाहीं. कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना. लिहिल्याप्रमाणें बाजार वर्तमान आहे. कळावें हे विज्ञापना.

नं. ३९११ श्री. (५ फेब्रु०)

पै॥ छ. ९ साबान. सन सबा तिसैन. माघ शु० ११ भौमबासर सात तास रात्र.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी. दोनी कर जोडून त्रिकाल चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ माघ शु॥ ९ रविवार प्रहर दिवसपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥ राजश्री नाना शु० ६ शुक्रवारीं दोन घटका दिवसाचे अलीकडेच पुण्यांत श्रीविष्णूचे दर्शनास येऊन पूजा करून सहा घटका दिवसास स्वारी आपल्या खासगत बागांत गेले. तेथें भोजन करून सायंकाळच्या चार घटका दिवसास बागांत पंतप्रतिनिधी यांची स्वारी आली. रंग[1] परस्परें घालून मग स्वारी[2] मागती गोटास गेली. गोटास जातेसमयीं सदाशिवपेठेंतील नवा वाडा आहे त्यांत दोन घटका बसून मग गोटास गेले. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांचे लग्नाचा निश्चय जाला नाहीं. सामान वगैरे तयारी आहे. मुलीही पाहतात. अद्यापि निश्चयांत नाहीं. मानाजी फांकडे नानाकडोन उठोन श्रीपर्वतीसुमारें निराळा उतरला आहे. राजश्री बाबाजीपंत वडिलांकडे येण्यास्तव लष्करांतून निघोन निरोप घेऊन कालच वाड्यांत आले आहेत. उदईक निघोन वडिलांकडे येतील. राजश्री बाबूराव शिवाजी व बाबाजीपंत यांजला तीनशें रुपये दिले. पावती मागाहून घेऊन पाठवितों. पावती-

---

१ माघ शुद्ध षष्ठीस रंग घालण्याचें कारण काय ? २ स्वारी नानाची.

विशीं अलाहिदा पत्र लिहिलें त्यास मशारनिल्हेकडील पावती आतां-च आली ती पाठविली आहे. राजश्री बाळाजीपंत जोशी हिपरगी याजकडील रुपयांची पावती मागाहून पाठवितों. हल्लीं लवंगा शेरीं रुपये ९। व जायफळ शेरीं रुपये २० पत्री रुपये ४२ येणेंप्रों सवंग जाली आहे. हिंग राजश्री बाबाजीपंत याजबरोबर उंट आहे त्याजवर पाठवितों. कळावें बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९१२ श्रीगजराज. (माघ शु० १०—६ फेब्रु.)

चिरंजीव राजश्री दादा यांसीं आशीर्वाद उपरी. आज आपली स्वारी कुरुंदवाडास गेली असेल. पुण्याहून काल राजश्री नागो-[१]रामराव याचे कारकुनाचें पत्र आलें. त्याणीं पहावयास पाठविलें होतें. त्यांतील मजकूर राजश्री मन्याबा भोसले दहा हजार फौज, दीडशें बाणांचे उंट, आठ तोफांनिशीं आले. नबाबाकडील इसामिय्या सरदार सहा हजार फौज सहा तोफांसुद्धां आले. भोसले यांचे (व श्रीमंतांच्या) भेटीचा प्रकार होत होता तमाम फौजा जमा जाहल्या, दगा आहे, हें समजून श्रीमंतानीं भेटीचें प्रयोजन नाहीं म्हणून सांगितलेवरून भेटी राहिल्या राजश्री नानांचें व मुख्यांचें रहस्य नाहीं. वांकडें आलें आहे. श्रीमंतांचें लग्न होणार. दाजीबा फडकेची मुली श्रीमंतांचे मर्जीस आली. आणखी दोन तीन मुली आहेत. यंदां लग्न व्हावयाचा सुमार दिसत नाहीं असें छ० २ साबानचें पत्र काल आलें. आज चि॥ राजश्री बापूकडून सांडणीस्वार आला. आपण (मिरजेस) येणार, उंट वगैरे पाठवावे, असें लिहिलें आहे. अधिकोत्तर नाहीं. छ० ४ रोजींचें पत्र आहे. कारभारी यांचें व श्रीमंतांचें नीट नाहीं असें कारकुनानें आमच्या लिहिलें आहे. जतीबाले[२] गोविंदपंत कारकून आज

१ गंगाधरराव गोविंद यांचें मिरजेहून पत्र कुरुंदवाडास रघुनाथराव यांस.

२ परशुरामभाऊंचे पुत्र तासगांवाहून सर्व मालमत्ता घेऊन मिरजेंत येऊन राहिले होते. ती मालमत्ता व भाऊंच्या पदरच्या कारकुनांची मालमत्ता जप्त करण्यासाठीं पेशव्यानीं पाठविलेला कारकून.

आले. बोकारी साहेबाचे दरगे नजीक उतरले. किल्लेंत आले वर समजेल. ती॥ राजश्री हरीपंत अण्णाचे पुत्राची मुंज आज दहा घटका दिवसास जाहली. छ०८ साबान. इंदुवार, आठवा तास. पत्राचें उत्तर याच चिट्टीवर लिहावें. आपणाकडे वर्तमान आलेलें पंधरा दिवस कळत नाहीं. कळवावें. लोभ करावा हे आशीर्वाद

श्री गजाननें श्रीमंतांचे दौलतीचें कल्याण करावें ही इच्छा आमची. त्याची इच्छा काय आहे न कळे ! मुख्य गोष्ट प्रजेचें इष्ट तें श्रीनें करावें. विदित होय रा॥ छ॥ ९ साबान. प्रीतिराव चव्हाण वाळव्यांकडे गेले आहेत. तेथें बातमी असावी. त्यांची बुद्धि ठीक नाहीं हे विज्ञापना.

नं. ३९१३ श्री. (माघ शु० १२—८ फेब्रु.)

*तालीक अस्सल बरहुकूम

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत दामले स्वामीचे सेवेसीं.

पोष्य गंगाधर गोविंद. सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० ८ साबानपावेतों क्षेम असे. विशेष. +अलाहिदा पत्र आहे तें मनन करून राजश्री गंगाधरराव यांसीं बोलोन उत्तर पाठवावें व पत्र आहे तें माघारें पाठवावें. त्यांचें[1] कल्याण व्हावें याजकरितां जलद गडी पाठविले आहेत. उत्तर पाठवावें. सर्वोपरी म्हैसकर उपयोगी मला माहीत महाडापासोन आहे. विचार करावा. कृपालोभ करावा हे विनंती.

नं. ३९१४ श्री. (१३ फेब्रु.)

पै॥ छ० १७ साबान. दोन तास रात्र सन सबा तिसैन.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी. सा॥ नमस्कार विज्ञापना माघ व॥ २ वर्तमान क्षेम. शिंदे व भोसले यांची लढाई व्हावी असा सुमार

---

१ येथून रघुनाथराव यांचें उत्तर. २ भानु. विजयदुर्गचे माजी सुभेदार. + नं. ३८८१ चें पत्र पहा. ३ मिरजकरांचें.

आहे. दारूगोळी तोफा सामान तयार. तोफखान्यांतील सरंजाम श्रीमंतांकडे गेला. तोफा उदईक जाणार. भोसलेकडे सरंजाम नानानीं भरपूर तोफांसमेत आपलेकडील दिला. मशीरसुद्धां तयार आहेत. काल रविवारीं प्रसंग व्हावा असा सुमार होता. न झाला. रात्रीस तिहीं गोटांस जिनबंदी तयारी असत्ये. शहर गलबललें आहे. लढाई गांवाजवळ जाल्यास गांवाची गत कशी, याजमुळें लोक फार गलबलले आहेत. कालचे रात्रीस कुडे शेवटले लोक गांवांत मध्यें आले. कुटुंबांसुद्धां कांहीं होते. लढाईच्या गोष्टी सर्व बोलतात. एक दोन रोजांत व्हावी असा सुमार आहे. वकील उभयतां (येथून) वडिलांजवळ गेले आहेत त्यास राजश्री बाबजीपंत अगोदर गेले त्यांचे कामकाज जालें असेल. त्यांस तरी अगोदर पाठवावें. राजश्री दाजीबांचें काम जाल्यावर तेही येतील. परंतु आधीं वकील पाठवावे. येथें आवया दोंहींतून एक प्रकार व्हावयास आतां दिवसगत नाहीं. सरंजामसुद्धां अवघे तयार आहेत. कोणी वेळेस क्षण लागणार नाहीं असा प्रकार आहे. यश देता ईश्वर आहे. काल राजश्री आबा शेलूकर व पिंगळे उभयतां वकील शिंदे यांजकडे गेले होते. बातमी फुटली नाहीं. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं.३९१५ श्री. (माघ व. २–१३ फेब्रु.)

[३]विज्ञापना. राजकी वर्तमान बाजारी. शिंदेची लष्करची कही गेली होती ती आणली भोसले याणीं; भोसले मशीर यांची रसद शिंदे याणीं नेली; असें म्हणतात. शिंदे यांचा पायदळ तोफा कंपूचा सरंजाम करीत आहेत. भोंसले मशीर मुलीक यांची फौज पायदळ तोफा ऐसा सरंजाम तयार आहे. दारू गोळी सारेच वांटतात. हंगामा सुरू होणार. भोसले यांच्या व शिंदे यांच्या लवकरच लढाईचा बेत ठरणार ऐसें बोलतात. श्रीमंत राजश्री नाना आपले फौजेंत स्वस्थ

---

१ गांवाच्या कडेचे. वेताळ पेठेंतले वगैरे लोक बुधवारांत आले. २ वकील नानांकडून. ३ बाळाजी गणेश जोशी याचें पत्र मिरजेस.

आहेत. ऐसें बाजारी वर्तमान आहे. सरकारच्या तोफखान्यांतून तोफा दारू गोळी ऐसा सरंजाम श्रीमंतांकडे जात आहे. लौकिकी बेत लढाई लवकरच होणार ऐसें आहे. ईश्वरी निर्मित हें काय आहे न कळे! श्रीमंतांचें मानस लढाई करावी ऐसें नाहीं. विवेकानेंच होईल तें करावें. ऐसें आहे. ऐसी जनवार्ता आहे. श्रीमंत त्रिवर्ग वाड्यांत येणार. हंगामा होऊं नये हेंच मानस श्रीमंतांचें आहे. शिंदे भोसले लढाईचा सरंजाम करीत आहेत. घडेल तें खरें. ईश्वरी सत्ता! वेताळपेठ भवानीपेठेंतील लोक कुटुंबासुद्धां गांवांत आले. लढाईस उभयतां सिद्ध आहेत. कोणते वेळेस ईश्वर काय करील हें समजत नाहीं. तर वकिलांस येण्याची आज्ञा व्हावी. हे विज्ञापना.

नं. ३९१६ श्री. (माघ. व. २–१३ फेब्रु.)

तालीक

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरपंत सुभेदार स्वामीचे सेवेसीं.

पोष्य +गंगाधर गोविंद. सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ० १५ साबान इंदुवारपर्यंत सुखरूप जाणोन स्वकुशल-लेखन करीत असावें. विशेष. आपण छ. ८ रोजचें पत्र पाठविलें तें काल पावलें. " राजश्री नारोपंत दामले यांस मजकूर कच्चा लिहिला आहे ते तपशिलें बोलतील. मनन करावें. आपलें बरें व्हावें म्हणोन लिहिलें आहे. " असें दर्शविलें, त्यास आपण लिहिलेप्रमाणें पंत म॥निल्हे यानीं सर्व मजकूर सांगितला. ऐसीयास म्हैसकर[1] आमचे पदरचेच आहेत. त्यांचे कारकुनास बाहेर घातलें म्हणोन आपण म॥ लिहिलें, ऐसी यास कारकुनास बाहेर घातलें नाहीं. पदरचेच असोन

---

१ दाजीबा म्हैसकर व बाबाजीपंत चांफेकर येथून तिकडे गेले आहेत त्यांस. २ भानू. + या व पुढच्या नंबरच्या पत्राचा संदर्भ नं. ३८८१ च्या पत्रांतील मजकुराशीं आहे.

लटकें चित्तांत आणितात हेंच अपूर्व आहे ! कांहीं कामाबद्दल रा॥ बाबजीपंत यास आणिलें आहे. ते राजश्री नानाजवळ आहेतच लटके संदेह त्यानीं मनांत आणों नयेत. राजश्री नारोपंतर्हा आपणास लिहितील त्यावरून कळों येईल. बहुत काय लिहिणें कृपालोभ असों द्यावा हे विनंती.

नं. ३९१७ श्री. (माघ व० ३–१४ फेब्रु.)

नकल.

श्रीमंत राजश्री तात्यां सुभेदार स्वामीचे सेवेशीं.

पोष्य नारो बाबाजी[3] कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती तागायत छ० १६ साबान पावेतों यथास्थित असे. विशेष. आपण कृपा करून पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहलें सविस्तर कळलें. श्रीमंत राजश्री यजमानांचें पत्र छ० ८ साबानचें पाठविलें ·तें पावलें व अलाहिदा पत्रें तपशीलवार होतीं तीं ही दाखविलीं. विनंती करण्याचे रीतीनें केली. पत्रांतलि अन्वयाचें उत्तर तपशीलवार लिहिल्यानें पाल्हाळ फारच होतो, याजकरितां लिहला नाहीं. सारांश श्रीमंता[4]च्या चित्तांत हा कालपावेतों दुसरा विचार किमपि बोलण्यांत करण्यांत काडीमात्र नाहीं. तेथें जाबसाल पडतात, तेव्हां लिहावें कोठवर ? याजकरितां रुबरू एक वेळ गांठ घालून बोलून ठेवावें, इतका मात्र उद्योग त्याजवरच इतका संशय घेतला ? येथें दुसरा विचारच नाहीं. आपण ऐकिलें, लिहिलें, उत्तम केलें. घरोब्याचा विचार आपण केला. श्रीमंत यजमानांस संतोषच जाहला. कारकून बाहेर घालविल्याचें लिहिलें, त्यास पुण्याहून पत्र " आजरेंहून सून आणावयाचा आहे, स्वार प्यादे कारकून समागमें देऊन आणवावी, " असें आलें, त्याच्या दुसरे दिवशीं कारकून आला. त्यास पत्राचा मजकूर सांगितला,

१ बापूराव शिवाजी उर्फ दाजीबा म्हैसकर. २ गंगाधर गोविंद भानू. विजयदुर्गचे माजी सुभेदार. ३ दामले हशमनीस किल्ले मिरज. ४ गंगाधरराव बाळासाहेब यांच्या.

त्याणें उत्तर केलें, " मला कांहीं तिकडे जाण्याविषयीं पत्रच नाहीं. बारामतीहून सून त्यांची यावयाची त्यास आणावयास सरकारांतून स्वार प्यादे घेऊन तिला राजश्री आनंदराव याणीं आणिली." कारकुनांनीं शहापूर प्रांतीं एक दुसरी ताकीद मागितल्याप्रमाणें दिली त्याजवर ते निघोन मंगळवेढेंस गेले. त्यांस जाऊन पांच सात दिवस जाले. कारकुनास कोणी घालविलें नाहीं. आपलें पत्र आठवे तेरिखेचें आलें त्याचें उत्तर नववे दहावे तारखेस कारकून गेला, असें तेथें कोणी आपल्याजवळ सांगितल्यावरून लिहिलें असेल. कारकून आपलें पत्र ज्या तारखेचें आलें त्याच तारखेस अगर दुसरे दिवशीं निघोन गेला. राजश्री बाबूराव शिवाजी पुण्याहून आले. मार्गीं येतांना त्यांचें पत्र आलें. त्यांत सरकार कामाकरितां निरोप घेऊन आलों आहें. (असें लिहिलें आहे.) तेही आजच येऊन पोचले. असा मजकूर आहे. सर्व प्रकारें आपल्यास अगत्यवाद आहे. तेविशीं सविस्तर काय लिहावा ? सेवेसीं श्रुत जालें पाहिजे. आज्ञेप्रमाणें पत्रें माघारीं पाठवीत आहें. येऊन पावतील: हे विज्ञापना.

नं. ३९१८ श्री. (१७ फेब्रुवारी)

पे॥ छ. २० साबान. सन सबा तिसैन. माघ मास.
मंदवार. चार घटका दिवस. सकाळ.

[1]सेवेसीं धोंडो बापूजी जोशी शिर सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ माघ व॥ ६ गुरुवार पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांच्या लग्नाचा निश्चय होऊन दाजीबा फडके यांची कन्या करार होऊन काल पंचमीस श्री॥ राजश्री अमृतरावजी व नाना व शिंदे ऐसे वानवडीचे बागांत एकत्र होऊन मसलत ठरोन नाना आपल्या गांवांतील बागांत येऊन राहिले. वाड्याबाहेरील चौक्या पहिल्या झाडून उठविल्या. शिंद्याकडील लोक आले. चार तोफा सरंजामासुद्धां आल्या आहेत. आपल्या नगार-

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

खान्याकडे जातां रस्त्यास जातां एक, व गणपति दरवाजा पासीं एक, चौकांत दोन ठेविल्या. वाड्यांतही लोक श्रीमंतांपासीं होते ते व शिंदे यांजकडील. ऐसें मध्यरात्रीचें काम करून काल श्रीमंतांची स्वारी त्रिवर्गांची गुरुवारीं गर्गाचार्यांचे मुहूर्तें आली. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांचे मागें नाना होते. खवासीमध्यें होते. चिमाजीआपांचे खवासखानेमध्यें गोविंदराव पिंगळे होते. अमृतराव यांचे खवासेमध्यें गोविंदराव काळे. याप्रमाणें स्वारी मोठ्या सरंजामानें आली. आजच सायंकाळीं गोंधळीक लग्न आहे. चार रोज समारंभ होणार. आदितवारांतील व बुधवारांतील मेणबाजारांतील दुकानें झाडून काढून रस्ते नीट केले. स्वारी आली तेव्हां तोफांची सरबत्ती शभर तोफा जाली. सरकारचे तोफखान्यांत मात्र जाली. इतर स्थळीं जाली नाहीं. हें वर्तमान वडिलांस लिहून पाठवावयास्तव श्री॥ राजश्री बापूसाहेबांपासीं[1] उंट अथवा जासूद मागितला, परन्तु हातास आला नाहीं. मग अजूरें[2] गडी करून पाठविला आहे. राजश्री बाबाजीपंत यांचें तेथील काम जालें असेल. त्यांची रवानगी करावयास आज्ञा करावी. श्रीमंतापासीं आपला वकील पाहिजे. वडिलांस मीं काय लिहावें ! श्री॥ राजश्री विठ्ठलराव बापूनीं पत्रें वडिलांस लिहिलीं आहेत. कळावें. शिंदे यांची स्वारी वाड्यांत चार घटका दिवसास येणार आहे. कळावें बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. उंट व जासूद येथें यजमानांपासीं मागितले परंतु मिरजेस त्यांची स्वारी येणार, वोझ्यास व माणसें वाटेस पाहिजेत, यास्तव न दिला. वडिलांस कळावें हे विज्ञापना. मशीर व भोसले यांचा जाणें येणेंचा प्रकार कसा जाला हें बाजार वर्तमान आइकण्यांत आल्यावर वडिलांस मागाहून लिहून पाठवितों हे विज्ञापना.

नं. ३९१९ श्री. (१८ फेब्रुवारी.)

पै॥ छ० २२ साबान. सन सबा तिसैन. माघ वा॥ ९ इंदुवार.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी शिर सा॥ नमस्कार विज्ञापना

---

१ तुमचे पुतणे विठ्ठलराव पांडुरंग यांजपाशीं. २ हंगामी. याच कामाकरितां.

ता॥ माघ व॥ ७ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबांचे लग्न होऊन आजच गर्गाचार्यांचे मुहूर्तें वरात आली. आज फडके वाड्यांत भोजनास येणार. उदईक श्रीमंत लष्करास जाणार. फडके यांजकडील आमंत्रण आम्हांकडे आलें. अहेर त्यांजकडे केला. सरकारचें आमंत्रण आलें नाहीं. +खासगीवाले यांचे वाड्यांत शेजारीं आमंत्रण सरकारचें आलें. आपले वाड्यावरून राजश्री आबा शेलूकर यांजकडे आमंत्रणास गेले. परंतु आपले वाड्यांत आलें नाहीं. पा[1]ण्याचाही कारखाना सांगितला नाहीं. श्री॥ राजश्री गणपतराव कोन्हेर यांजकडे सरकारचें आमंत्रण गेलें होतें. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंतां[2]नीं बाळाजी गणेश यास श्री॥ राजश्री नानांकडे पाठविलें कीं, “ श्रीमंत वा[3]ड्यांत आले आहेत. भेटीचें कैसें ? आज्ञा होईल तैसी वर्तणूक करूं ” म्हणोन जोशी याणीं श्री॥ राजश्री आपा बळवंत यांचे विद्यमानें नानांजवळ बोलले. तेंव्हां नाना याणीं आज्ञा केली कीं, “ विठ्ठलराव येथें आहेत ?” तर “ आहेत ” म्हणोन विनंती केली. नंतर आज्ञा केली कीं, “ पूर्वीं[4] अहेर केला असेल त्याजप्रमाणें करावा. कंठी वस्त्रें द्यावयाचीं. ” मग नाना आपणच म्हणाले कीं, “ खासा बाळासाहेब होते. आतां विठ्ठलराव एकटेच आहेत. शिरपेंच चारपाचशें रुपयेचा द्यावा. ” ऐसी आज्ञा जाहली. शिरपेंच वस्त्रें आणोन ठेविलीं आहेत. नानानीं आज्ञा केली कीं, “ श्रीमंतांस विनंती करून सांगून पाठवितों. मग आपण यावें.” ऐसी

+ सांगलीकरांच्या वाड्याशेजारीं खासगीवाल्यांचा वाडा हल्लीं नाहीं. हल्लीं चिनीवाले राहतात तो वाडा मूळचा खासगीवाल्यांचा असें ऐकिवांत आहे. १ पेशव्यांच्या घरीं लग्नकार्यांत पाण्याचा पुरवठा करण्याचें काम पटवर्धनांचें, परंतु सांप्रत ते गैरमर्जींत असल्यामुळें तें काम त्यांस सांगितलें नाहीं. २ विठ्ठलराव पांडुरंग याणीं. ३ पुण्यांत शनवार वाड्यांत. ४ पूर्वीं सवाईरावसाहेबांच्या लग्नाचा दाखला धरावा तर त्यावेळीं स्वतः बाळासाहेबच हजर होते.

नानाची आज्ञा, परंतु अद्याप कारकून बोलावण्यास आला नाहीं. गुरुवासरीं रात्रौ श्री॥ राजश्री नानांचे वाड्यांत बाळाजी गणेश गेले होते. नऊ घटका रात्र पावेतों बसून माघारे आले. गांठ पडली नाहीं. आज भृगुवासरीं देवकोत्थापन जाहलें याजमुळें श्री॥ राजश्री नानांकडे आज गेले नाहींत. कळावें हे विज्ञापना.

नं. ३९२० **श्रीगणराज.** (२० फेब्रुवारी).

पै॥ छ० २२ साबान. सन सबां तिसैन. माघ व० ९ इंदुवार.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ छ० १९ साबान यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. तर सदैव पत्रीं सांभाळ करावया आज्ञा केली पाहिजे. श्री॥ राजश्री बाबासाहेब यांचे लग्न माघ व॥ ६ गुरुवासरीं गोंधळी जाहलें. गुरुवासरीं देवकप्रतिष्ठा सकाळीं जाहली. सायंकाळीं विवाह जाहला. उजाडतां साडे होऊन वरात वाड्यांत सूर्योदयापूर्वी मोठ्या समारंभानें आली. आज भृगुवासरीं फडके सरकारच्या वाड्यांत भोजनास येणार. उद्यां मंदवासरीं श्रीमंत फडक्यांचे घरीं भोजनास जाणार. भोजनोत्तर श्रीमंत डेऱ्यास लष्करांत जाणार ऐसी बोलवा आहे. घडेल तें खरें. गांवांत आमंत्रण जाहलें. आमचे वाड्यांत आमंत्रण आलें नाहीं ! कळावें. ती॥ राजश्री गणपतराव बोरगांवकर यांस सरकारचें आमंत्रण आलें होतें. फडके यांजकडील आमंत्रण आलें होतें. आम्ही जाऊन आहेर केला. कळावें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. येथें राजश्री जनार्दन शिवाजी असतां मजकडे यावयास गांठ पडत नाहीं ! वडिलांस कळावें करितां विनंती लिहिली आहे. कारभार भारी याजमुळें बनलें नाहीं ! कळावें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ गणपतराव कोन्हेर. शाखा कुरुंदवाड. २ फडक्यांस. ३ म्हैसकरासंबंधें हें उपरोधिक लिहिणें.

नं. ३९२१ श्री. (२२ फेब्रुवारी).

पै.॥ छ २८ साबान. सन सबा तिसैन. माघमास.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी. शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना माघ व॥ ११ पावतों वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. राजश्री आप्पाजीपंत सहस्त्रबुद्धे दोन वेळां आले होते. रात्रीस निजावयास येथें यजमानांपाशीं होते. त्यांचे बोलण्यामध्यें पटवर्धन असें नांव श्रीमंतांपासी घेतां कामा नये ! पटवर्धनांवर राग आहे असें मशारनिल्हेनीं सांगितलें. वडिलांस कळावें. श्रीमंत राजश्री गणपतराव कोन्हेर यांजला आमंत्रण लग्नामध्यें आलें. श्री॥ राजश्री रघुनाथराव दादांकडील व गणपतराव यांजकडील अहेर लग्नास जाले. या उभयतांविषयीं नानानीं सांगितलें असेल तेव्हां त्यांचे अहेर जाहले ! कळावें. जालनापुर कापडाविषयीं पत्रें आपणाकडून येत नाहींत. रघोजी व मन्याबाबापू (भोंसले) व वैद्य वकील एकत्र होतील तेव्हां विचार करून सांगों असें वैद्य वकील बोलतात. कळावें. मालीट मुंबईचा वकील याणें घरीं कलकत्तेस जाण्यास निरोप सरकारामध्यें मागितला. त्याजवरून मालिटास काल वस्त्रें देऊन निरोप दिला. कळावें. सर्व मजकूर श्रीमंत राजश्री बापूसाहेबानीं व राजश्री बाळाजीपंत यांणीं वडिलांस लिहिला आहे त्या वरून कळोन येईल. राजश्री बाबाजीपंत अथवा बाबूराव[२] अद्याप येत नाहींत. येथें चढ भारी लागला आहे. पत्रीं काय लिहावें ? कित्तुराकडे आपली फौज जाण्यास आज्ञा सरकारची होती, गेली नाहीं, असें बोलण्यांत आहे. पैका सरंजामाचा घेतील. चाकरी नाहीं, मग पैका सुटणार नाहीं, असें दिसतें. श्री॥ राजश्री रघुनाथरावदादांवर सरकारची मर्जी बोलण्यांत-बाजारी वर्तमान-बरी आहे. वडिलांस कळावें बहुत काय लिहिणें. हे विज्ञापना.

---

१ हा बाजीरावसाहेबांच्या ममतेंतला माणूस. २ विठ्ठलराव यांजवळ.

नं. ३९२२ **श्रीगजानन.** (माघ व० १४–२५ फेब्रुवारी).

पै॥ छ ३० साबान. सन सबा तिसैन. फाल्गुन शु॥ २ भौमवार.

[1]विज्ञापना छ० २० साबान. आपली फौज कित्तुराकडे गेली नाहीं. मोबदला पलटणें फौज जाणार अशी बाजार अवाई आहे. दुसरें—आज काल भर आहे तो शिंदे यांजकडे आहे. वरकड अधिकोत्तर नाहीं. शिंद्यास निरोप होणार हें ही वर्तमान आहे. रास्ते लश्कास गेले ते अद्याप आले नाहींत. अप्पाजीपंत सहस्त्रबुद्धे भेटत आहेत. विशेष नाहीं. लोक दुष्ट बुद्धींत बहुत आहेत म्हणोन ऐकितों, श्रीनेंच परिणाम लावावा, वगैरे खरें वर्तमान नव्हे. पेशजी मारेकरी सांपडले ते अद्याप कैदेतच कंपू यांजकडे आहेत म्हणोन बाजार अवाई आहे. मालीट गेला याचें कारण समजलें नाहीं. लोक मात्र दिक्कती घेतात. जंकारनामक याची प्रकृति फारच बिघडली आहे. दैवास उपाय काय ? सेवेशी विदित होय हे विज्ञापना. मेस्तर बैट याची व शिलेदार श्री॥ राजश्री नानांकडील यांची कलागत जाली. शिलेदारानें हत्यार धरिलें. मेस्तर बेट याणें गोळी घालून दोन घोडीं ठार केलीं. कफावत अजून वारली नाहीं. सेवेसीं श्रुत होय ही विज्ञापना.

नं. ३९२३ **श्रीगणराज.** (माघ व. १४–२५ फेब्रु.)

छ० २९ साबान. सन सबा तिसैन. फाल्गुन.

[4]विज्ञापना. काशीरोव पंडित यांनीं रागमाला केली संस्कृतात, त्याची प्रती एक लिहून पाठवावी. रवाना छ २७ साबान. हे विज्ञापना.

---

१ बाळाजी गणेश जोशी याचें पत्र मिरजेस. २ पटवर्धनांचा नाशकरण्याविषयीं. ३ जनार्दन शिवाजी म्हैसकर हा पटवर्धनांचा फारच द्वेष करतो. ४ रघुनाथराव कुरंदवाडकर यांची चिठी मिरजेस बाळासाहेबांस. ५ मिरजीकर. यानीं रागमाला हा गायनशास्त्रावर ग्रंथ केला.

नं. ३९२४ श्रीगणराज. (फाल्गुन शु० १–२७ फेब्रु.)

पै॥ छ० २९ साबान सन सबांतिसैन. फाल्गुन.

[1]विज्ञापना. चि॥ राजश्री बापूचें पत्र आल्याचें वर्तमान लिहिलें तें कळलें. बारा मासांविषयीं लिहिलें होतें, त्यास हिंदुस्थानी बारा मास व काशीराव पंडित भिरडीकर याणीं रागमालेचे श्लोक केले आहेत ते तसबिरांसुद्धां पहावयास पाठवावे अथवा श्लोक लिहून पाठवावे. रवाना छ० २९ साबान. विदित होय. हे विज्ञापना. ती॥ मातोश्री सखू आत्यास पालखी देऊन पाठवावी. हे विज्ञापना.

नं. ३९२५ श्रीगजानन. (फाल्गुन शु० ९–७ मार्च)

पै॥ छ० ११ रमजान. सन सब्बां तिसैन. फाल्गुन.

विज्ञापना[2] ता॥ छ० ७ रमजान यथास्थित असे. विशेष. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. भोसले यांची फौज नवीन पांच सात हजार आली. नबाब बंदेगानअल्लीची फौज दहा पलटणें व पन्नास साठ तोफा व फौज पंचवीस हजार ऐसी रवाना जाहली. जलद पुढें कांहीं येऊन दाखल होणार. मागाहून सरंजामसुद्धां नबाबाचे चिरंजीव येणार ऐसी बाजार आवई आहे. भोसले फौज ठेवीत आहेत. येणेंप्रमाणें वर्तमान बाजारी.

१ भोसले याणीं जावें ऐसें होतें; परंतु तूर्त जात नाहींतसे दिसतें. त्यांचें म्हणणें गढेमंडळ आमचे स्वाधीन जाहलें म्हणजे जाऊं ऐसे म्हणणें. ऐवज कराराप्रमाणें (श्रीमंतानी त्यांस) द्यावा. तंवपावेतों कूच होत नाहीं. ऐसी बाजार वार्ता.

१ मशीरनमुल्क याचें म्हणणें खंडणीचा[3] ऐवज माफ करावा; महाल घेतले आहेत ते सरकारांत घेऊं नये, नबाबास द्यावे; म्हणून करार लिहून (नानानीं ?) दिला

---

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर याचें पत्र मिरजेस. २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन याचें पत्र मिरजेस. ३ खर्ड्याच्या लढाईनंतर ठरलेली खंडणी दोन कोट रुपये.

त्याजप्रमाणें महालाच्या सोडचिठ्या व ऐवज द्यावा. ऐसीं पत्रें लिहून दिलीं म्हणजे कूच करून जातों. नाहीं तर कूच करीत नाहीं. म्हणून बाजारी बोलवा आहे.

१ होळकर पूर्वी ज्या मुक्कामावर होते त्या मुक्कामावर फौजसुद्धां आले.

१ राजश्री जनार्दन शिवाजी तूर्त (तिकडे) यावयाचा बेत दिसत नाहीं. त्यांजकडे येथें सरकारचीं [1]कामें बहुत ! त्यांचे कसें येणें होईल ?

—
४

येणेंप्रमाणें बाजारी वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९२६ श्री. (फाल्गु. शु. ९–७ मार्च)

श्रीमंत राजश्री ना[2]रायणराव दादा स्वामीचे सेवेसीं—

विनंती सेवक बाळाजी गणेश व हरी धोंडदेव कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना येथील कुशल जाणून छ० ७ रमजान पर्यंत मु॥ पुणें येथें स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. अलीकडे स्वामींकडून पत्र येऊन सेवकाचा सांभाळ होत नाहीं, तरी सदैव पत्रीं सांभाळ करावयासीं आज्ञा झाली पाहिजे. श्री॥ राजश्री नाना छ० ६ रमजानीं राजश्री दौलतराव बाबा आलिजाबहादर यांचे लष्करांत गेले होते. तेथें वस्त्रें शिरपेंच कंठी येणेंप्रों (शिंद्यांनीं त्यांस) दिलीं. सायंकाळीं माघारे आले. नंतर रात्रौ श्रीमंतानीं वाड्यांत भोजनास बोलाविलें पोषाख उंच पिस्ताई रंगाचा कच्ची बुट्टीचा दिला. वरकड वर्तमान श्री॥ राजश्री बापूसाहेब याणीं वडिलांस लिहिलें आहे त्याजवरून कळेल. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ हें लिहिणें उपरोधिक आहे. २ मिरजकर नारायणराव गंगाधर पटवर्धन.

नं ३१२७ श्रीगजानन. (फाल्गुन शु० ९–७ मार्च)

पै॥ छ ११ रमजान. सबां तिसैन. फाल्गुन.

विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० ७ रमजानपावेतों सुखरूप असों. राजश्री बाबा फडके यांचे घरीं सोळनहाणास श्रीमंत त्रिवर्ग व आबा शेलूकर वगैरे गेले होते. फडके यांणीं पोषाख दिले. राजश्री नाना शिंदे यांचे गोटास गेले होते. त्यांणीं नानांस वस्त्रें व कंठी शिरपेंच दिला. काल नानांस रात्रीस श्रीमंतांनीं भोजनास बोलाविलें होतें. रात्रीस भोजन जाहलेनंतर श्रीमंतांनीं नानांस हजार रुपयेपर्यंत पोषाख दिला बारा घटका रात्रीपर्यंत नाना (सरकार) वाड्यांत होते. नानांचें व श्रीमंतांचें दोन घटका खलबत झालें. राजश्री अबा शेलुकर यांस भोजनास श्रीमंतांनीं बोलावून पोषाख चांगला उंच दिला. येथें शहरांत कर्जपट्टी व सरंजामपट्टी व वेतनें व सावकारपट्टी व उमरेपट्टी अशा पट्या जाहल्या आहेत, म्हणोन ऐकितों. व भाडेंपट्टी घेतात असें ऐकितों. मखदुमजी सांडणीस्वार याजबरोबर पत्रें पाठविलीं तीं आज प्रहर दिवसास पावलीं. बागणीस राजानीं मोर्चे दिले म्हणोन लिहिलें तें कळलें. राजश्री नानांस व जनार्दन शिवाजी यांस लाखोटे पाठविले ते जनार्दन शिवाजी यांजपाशीं दिले. लग्नाचा मजकूर तीं॥ राजश्री हरबा अण्णा व विनोबा आबा यांच्या पुत्रांचीं लग्नें जहालीं, शरीरसंबंध राजश्री अप्पाजी गोविंद व नीलकंठ गोविंद यांच्या कन्या दिल्या, म्हणोन लिहिलें तें कळलें. राजश्री गोविंदराव गायकवाड यांजकडील वकील रावजी परभू एक हजार फौजेनिशीं आले आहेत. त्यांच्या भेटी काल जाहल्या. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३१२८ श्री. (९ मार्च)

पै॥ छ० १२ रमजान. सन सबां तिसैन. फाल्गुन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. दोनी कर जोडून त्रिकाल

१ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र मिरजेस. २ घरपट्टी.

चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत फाल्गुन शु॥ ११ वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. रा. बाबा फडके दशमीस काल श्रीमंतांचा निरोप घेऊन गारपिरावर डेऱ्यास गेले. शिंदे यांची स्वारी काल श्रीमंतांकडे सायंकाळची आली ते प्रहर रात्र पर्यंत वाड्यांत होते. श्री॥ राजश्री अमृतराव साहेब ही डेऱ्यास जाणार असें वर्तमान आहे. मोंगलाकडील फौज दहा हजार व फिरंगी एक कंपू ५० तोफा असें सामान येत आहे. त्याजमुळें फडके डेऱ्यास गेले अशी बाजार बातमी आहे. रा॥ गोविंदराव गायकवाड यांजकडील वकील हजार दीड हजार जमावानिशीं आला आहे. चार रोज झाले. श्रीमंतांच्या भेटी जाहल्या. श्रीमंत पुण्यांत येऊन लग्न कार्य होऊन आठ पंधरा दिवस होत पर्यंत गांवांत जन स्वस्थ होते. अलीकडे मनस्वी बोलत आहेत. आणि नबाबाकडील ही फौज आणखी नवी येते याजमुळें नानाप्रकारें बोलतात. शिंदेकडील रायाजी पाटील वकिलीचें बोलणें बोलत होता तो शिंदे याणीं रायाजी पाटील घरीं बसवून कृष्णा शेट्या—शिंदे यांचा खिजमतगार—त्याजला वकिलीच्या बोलण्यामध्यें घातला. कळावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ३९२९ श्रीगणराज. (फाल्गुन शु० ११—९ मार्च)

पै॥ छ० ११ रमजान. सन सबा तिसैन. फाल्गुन शु॥ १४ शनिवार. प्रथमप्रहर दिवस.

तर्थिस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेसीं.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील क्षेम तागायत. छ० रमजान पावेतों येथें यथास्थित असे. विशेष. वडिलीं चंदा सांडणीस्वार याजबरोबर छ० २ रमजानचें पत्र पाठविलें तें छ० ५ रोजीं रविवारीं सकाळीं चार घटका दिवसास पावलें. लिहिला मजकुर कळला. 'शिलेदार व उंटें पाठवून

महिना होत आला. निघोन येणें ' विषयीं आज्ञा, त्यास आमचे येण्याविषयींचा मजकूर हुसेन सारवान याजबरोबर विनंती लिहून पाठविलीच आहे. त्यावरून सर्व विदित जाहलेंच असेल. इकडील वर्तमान तर अधिक उत्तर लिहावेंसें नाहीं. मागाहून मकदूमजी सांडणी स्वार याजबरोबर सविस्तर लिहून पाठवितों. हरि[1] विष्णु यांस सरकारचे वाड्यांत नेऊन कोरड्यांचा मार दिला. पन्नास कोरडा मारिला. आणि पाठींतून रक्तें फार निघालीं. आणि कानास चाप लाविला. एक कान तुटला. दोन्ही हातांचे बोटांस चाप लाविले. बोटांचेंही तुकडे पडले म्हणोन बाजार आवाई आहे. मार दिल्यानंतर बाजारांतून गल्लोगल्ली फिरविलें. आणि मोठे हाल केले. कळावें. इतका आग्रह मार द्यावयाचा श्रीमंत अप्पासाहेब यांचा पडला म्हणोन ऐकतो. खरें लटिकें न कळे. कळावें करितां लिहिलें आहे. श्रीइच्छा प्रमाण कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९३० श्री. (फाल्गुन व. ४–१६ मार्च.)

राजश्री बाळकृष्णपंत स्वामीचे सेवेसीं विनंती उपरी. "श्रीमंत महाराज करवीरकर यांजकडून पंत अमात्य फौजेसुद्धां कित्तूर प्रांतीं गेले आहेत. त्यांनीं परगणे शहापुर व परगणे खानापूर व तालुके कित्तूर येथें घास दाणा म्हणोन ऐवज घेतला. व परगणे सांबराणी महाल टिपूकडे आहे तेथें स्वारी केली. याजकरितां टिपूकडील ही जमाव त्या सरदेस आला. व परगणे मनोळी येथील मुकासबाब वगैरे अंमल तालुके कित्तुराकडे आहे (त्यांवर) मनोळीहून रोखा केला आहे. व पंत अमात्यही फडशा करून देणेंविषयीं मामलेदार यांस तगादा करतात; " म्हणोन कळलें. ऐशास सरंजामी

---

१ हरि विष्णु सहस्रबुद्धे हा परशुराम भाऊंचा कारकून. यशोदाबाईच्या मांडीवर चिमाजी आप्पास बसविण्याची मसलत ठरवून भाऊनीं त्यांस थेऊराहून पुण्यास आणिलें तेव्हां ते बऱ्या बोलनें येईनात. त्यावेळीं हरि विष्णु यानें त्यांस जबरदस्तीनें उचलून पालखींत घातलें हा त्याचा अन्याय.

व सरकारी महालांस उपद्रव होऊं नये येविषयीं वारंवार महाराजांस पत्रें दिलीं असतां पंत अमात्य यांस फौजेसुद्धां पाठवून ऐवज घेतला! अशी आज्ञा व्हावयाची नव्हती. येविषयीं तुम्ही महाराजांस विनंती करून फौज माघारी नेवावी. व सरकारी व सरंजामी या महालां-पासून ऐवज घेतला असेल तो माघारा देवावा. मनोळीहून रोखा जाहला आहे तो मना करावा. परभारें हर एकविषयीं उपद्रव करूं नये. जो जाबसाल बोलणें तो येथें बोलोन घेत असावा याप्रमाणें महाराजांस विनंती करून बंदोबस्त होय तो अर्थ करावा. राजश्री त्रिंबकराव काळे नांदणीकर तुम्हांबरोबर पाठविले आहेत त्यांजविषयीं महाराजांस विनंती करून त्यांचीं खतें पत्रें व चीजबस्त घेतली असेल तीं माघारी देवावी. रवाना छ० १६ रमजान हे विनंती. राजश्री+ बाळकृष्णपंत बाळ यांस रा॥ नानांचें पत्र आलें त्याची नक्कल.

नं. ३९३१ श्रीगणराज. (फाल्गुन व० ६ – १८ मार्च.)

पै॥ छ० २३ रमजान. सबा तिसैन. फाल्गुन व॥ १० गुरुवार. आठ तास दिवस.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल जाणून तागायत छ० १८ रमजानपर्यंत मु॥ पुणें सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून अलीकडे पंधरा दिवस आशी-र्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. त्यास सदैव पत्र पाठवून सांभा-ळीत असलें पाहिजे. पंचमीस रंगास सरकारचें आमंत्रण आलें होतें. आम्हीं राजश्री जनार्दन शिवाजी यांजकडे सांगून पाठविलें कीं सरकारचें बोलावणें रंगास आलें आहे. तर बरोबर यावें. त्याणीं सांगून पाठविलें कीं, आम्ही सरकारवाड्यांत येत नाहीं! तुम्हांस बोलावणें आलें असल्यास तुम्हीं जावें. नंतर ती॥ राजश्री गणपत-राव दादा बोरगांवकर यांजकडे कारकून पाठविला कीं तुम्हांस

+ हा शेरा गंगाधरराव बाळासाहेब यांच्या हातचा.

सरकारचें बोलावणें आहे, तर तुम्ही आम्ही मिळोन जाऊं; म्हणोन सांगोन पाठविलें. ते ' उत्तम ' म्हणाले. भोजन करून तयार होऊन आमच्या वाड्यांत आले. मग उभयतां मिळोन गेलों होतों. शिंदे यांची स्वारी आली होती. बरोबर दोन हजार खासा चांगला होता. होळकर व मानाजी फांकडे व रास्ते व समस्त मानकरी आले होते. बैठक पुढील चौकांत केली होती. राजश्री नानाही आले होते. समारंभ उत्तम जाहला. रंग व गुलाल बहुत हंगामा जाहला. रंगाचे बंब चार चोंहों कोनांस लावून उडविले. रंग खेळोन समस्त घरोघर गेले. शिंदे सरकारवाड्यांत आंघोळ करून फराळ करून रात्रौ स्वारी गोटास गेली. उंट नफर दोन कागदगड्या भरून पाठविले आहेत. बरोबर इकडे खर्चास रुपये सात व एक रोजची चंदी दिली आहे. गड्यांचे तपशिलाची याद राजश्री धोंडो बापूजी जोशी यांणीं लिहिली आहे. कृष्णाजी बापूजी जोशी यांस समाधान नव्हतें म्हणोन कोंकणांत गेले होते. तेथें उदराची भावना होऊन फाल्गुन शु॥ ११ एकादशी गुरुवारीं वारले. ईश्वरें गोष्ट मोठी वाईट केली. खर्चास ऐवज पाठवावा. निरोपाचेंही नेहमीं जनार्दन शिवाजी यांस विचारावयास पाठवितों. कळावें करितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९३२ श्री. (फाल्गुन व० ६—१८ मार्च.)

पै॥ छ० मजकूर मंदवार. सात तास रात्र. सन सबा तिसैन.

[2]विज्ञापना. वडिलीं राजश्री अप्पाजी दामोदर यांस संवदत्तीस पाठविलें आहे, त्यास करवीराकडून मौजे अकीवाट येथें पांचशें जमाव जाहला आहे. संवदत्तीवर जाऊन म॥निल्हेवर घालमेल करणार याप्रमाणें जनवार्ता आली आहे. त्यावरून वडिलांस

---

१ आम्हांस मिरजेस जाण्याविषयीं नानांकडून निरोप कधीं होणार म्हणून.

२ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें पत्र मिरजेस.

लिहिलें आहे. वडिलीं संवदत्तीकडील बंदोबस्त करणें तो करवावा. रवाना छ० १८ रमजान. फौज ही करवीराहून रातबेरात येणार अशी बोलवा आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ३९३३ **श्रीगजानन.** (फाल्गुन व० ६–१८ मार्च.)

पै॥ छ०२३ रमजान. सन सबा तिसैन. फाल्गुन.

विज्ञापना. तागायत छ० १८ रमजान क्षेम असों. दहा बारा रोज वर्तमान कळत नाहीं. मशीरनूमुलूक याची फौज थोडीबहुत हरहमेशा येत आहे. भोंसले यांचीही फौज कार्याकारण येतच आहे. वर्तमान अधिकोत्तर नाहीं. तिकडे महाराजांनीं दंगा आरंभिला म्हणोन बाजारआवई आहे. इकडून श्री॥ राजश्री नानानीं बाळकृष्ण-पंत बाळ पाठविले आहेत महाराजांकडे, तेव्हां दंगा होणार नाहीं. श्री॥ राजश्री अमृतराव साहेब व विनायकराव साहेब यांची स्वारी एक दोन रोजीं बाहेर राजश्री आबा शेलूकर यांचे अगर दुसऱ्याचे बागेंत दूर्वा आणावयास जातात. शहरांत वाणी शिंपी वगैरे उदम्यांनीं आज दोन रोज दुकानें बंद केलीं आहेत. विक्री होत नाहीं. दुकानें बंद करावयाचें कारण पट्टीचांचा तगादा चालला आहे भारी म्हणोन बंद केलीं आहेत. येणेंप्रमाणें बाजारी वर्तमान आहे. शहरांत भाजी लिंबू आदीकरून विक्री नाहीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. अद्याप कांहीं स्वस्थ नाहीं असें आहे म्हणोन बोलवा बाजारी आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९३४ **श्रीगणराज.** (फाल्गुन शु० ८–२०मार्च)

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल जाणून तागायत छ० २० रमजानपर्यंत मुकाम पुणें सुखरूप असों. विशेष. वडिलांकडून पत्र येऊन सांभाळ होत नाहीं तरी असें नसावें. सदैव पत्र पाठवून सांभाळीत असलें पाहिजे. राजश्री बाळाजीपंत जोशी यांस राजश्री मानांचे खासगीचे कारकून

१ बाळाजीपंत जोशी याचें पत्र मिरजेस.

राघोपंत पेंडसे याणीं बोलावून नेऊन खानापूरचे कारकुनीचा फडशा करून देणें म्हणोन ताकीद केली आहे. पुढें काय होईल तें न कळे. छ० १८ रोज़ीं राजश्री नाना व शिंदे व भोंसले त्रिवर्ग गुलटेंकडीचे बागेंत येऊन चार घटका खलबत करून स्वारी राजश्री नानांची माघारी आली. बोलणें काय जाहलें तें बाहेर फुटलें नाहीं. येथें खर्चीची निकड भारी. वडिलांकडून पैसा येत नाहीं. राजश्री गोविंदपंत मामांची पालखी व गाडदी मिळोन दरमहां दीडशें रुपये-पर्यंत होतात. त्यांस ठेवावें किंवा रवाना करावें तें लिहून पाठवावें. सारांश खर्चाची निकड भारी आहे. येथें पैसा देऊन हुंडीही मिळत नाहीं. व येरवींही पैसा मिळत नाहीं. येथें पैशाशिवाय एका पैशाचा जिन्नस कोणी देत (नाहीं.) संकट मोठेंच प्राप्त जाहलें. त्यास खर्चीस पाठवून द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे. भाडेपट्टीचा तगादा सरकारांतून लाविला. याजकरितां बाजार बंद दोन तीन दिवस होता. काल सायंकाळीं मोकळीक जाहली. सर्व जिनसांची विक्री होऊं लागली. ठरावांत गोष्ट काय आली तें समजलें नाहीं. परंतु समजूत जाहली असें आहे. पूर्वीं वडिलांनीं मला येणेंविषयीं लिहिलें होतें तेव्हां मशीरानें सोडिलें होतें. ते चिरंजीव नारायणराव दादास—तेव्हांची प्रकृति तर सर्वांस ठाऊकच आहे—ते सर्व विनंती केली. हल्लीं पहिल्यापेक्षां बरी म्हणोन वडिलांचे पायांकडे येण्याची याचना केली. परंतु येथील[१] गृहस्थांनीं बहुत पुण्य खर्च केलें ! त्यांजपुढें उपाय नाहीं. कळावें करितां विनंती लिहिली आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९३५ श्री (फाल्गुन व. १०—२३ मार्च.)

पै॥ छ० २४ रमजान. सन सबा तिसैन.

---

१ जनोबा म्हैसकर यानें नानांजवळ.

सेवेसीं बाळकृष्ण महादेव कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २३ रमजान पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तेथें आज्ञा (कीं) "संवदत्तीचे गोंसावियाचा निवाडा होई तों जप्ती सरकारांत असावी. अथवा जप्तीविशीं आपली खातरजमा असल्यास आम्ही फौज माघारी आणवितों. उत्तर पाठविणें." म्हणोन आज्ञा, त्यास गोसावियाचा मजकूर सविस्तर श्री॥ राजश्री नानास पत्र लिहून पाठविलें आहे. तेथून उत्तर येई तों स्वामीनीं ठाणें घालूं नये. फौज मात्र जवळ असावी. पत्राचा जाब येईतों खटला वाढवावयाचा नाहीं. मग आज्ञा येईल ते शिरसा. श्रीमंत महाराजांचे मर्जीस्तव पुणेंयास पत्र पाठविलें आहे. सरकारचीं वस्त्रें व जवाहीर व हत्ती आणिला होता तो श्रीमंत महाराजांस नजर केला. येथील सविस्तर श्री॥ राजश्री नानांस लिहून पाठविलें आहे. तेथील आज्ञा येईल त्या प्रों सेवेसीं येऊन विदित करीन. पुणेंयाचे पत्राचें उत्तर येईतों कांहींच सोडीत नाहीं (?) हे विज्ञापना. गांवचें पाणी बंद केलें आहे व गांवकरी बाहेर निघों देत नाहीं म्हणोन कळलें, त्यास गांवास तूर्त कांहींच तसदी नसावी. हे विज्ञापना.

नं. ३९३६ **श्रीगणराज.** (फाल्गुन व ०१०-२३ मार्च.)

पै॥ छ ०२३ रमजान. सन सबा तिसैन. फाल्गुन.

विज्ञापना. रंगाचे समारंभासमयीं कचेरींत राजे बहादर (हे) मानाजी शिंदे यांच्यापुढें बसले. मानाजी शिंदे उठोन रुसून चालले. त्यांजबरोबर त्यांजकडील चाळीस पन्नास खासा उठला. तेव्हां राजश्री आपा बळवंत याणीं शिंदे यांचे गळ्यास मिठी मारून बसविलें! नंतर रंगाचा समारंभ उत्तम जाहला. कागद गड्ड्यांचे उंटावर बुरणूस

---

१ हा नानांचा कारकून पेशव्यांकडून महाराजांकडे तंख्याच्या तडजोडीसाठीं आलेला. याचें हे मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन याचें पत्र मिरजेस.

दोन पैकीं नवा येक व जुना येक एकूण दोन पाठविले आहेत हे खाजगीकडील आहेत. राजश्री केसोपंतदादाकडे द्यावयाची आज्ञा व्हावी. पेशजी कागद गड्डयांचा उंट नफर गेला त्याजवर बुरणूस व चवाळें एक, दोन दागिने पाठविले ते माघारे आले नाहीं. तेंही खासगीकडील आहेत. राजश्री जनार्दन शिवाजी येथें तीन चार दिवसीं येतात तेव्हां बोलतात कीं, रुपयांची तोड पडल्या-शिवाय तुम्हांस निरोप होत नाहीं ! वडिलांस कळावें याजकरितां लि॥ आहे. म॥ निल्हेनीं मशीरनूमुल्क याचा चार लाख रुपयेचा हवाला घेतला आहे आणि त्याजकडील वकिली आपणच करितात. याजमुळें वडिलांकडील एवजाची निकड लावतात ! याप्रों यांचा मजकूर आहे. निरोपाचेंहीं संधान यास न कळतां एक दोहोंकडून लाविलें आहे. साधेल तेव्हां खरें ! म॥ निल्हे याप्रमाणें बोलतात जे, मिरजेस पत्रें पाठविलीं असतां पत्र येत नाही व दाजीबाही येत नाहीं! बरें ! त्यांची मर्जी ! याप्रों नित्य बोलतात. दिवस याप्रकारचे म्हणोन हें बोलणे ऐकून घेणें प्राप्त आहे ! कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. आज भोंसले व शिंदे व होळकर सरकारवाड्यांत रंग खेळा-वयास येणार याप्रों आवई आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९३७ श्री. (फाल्गुन व० १०–२३ मार्च.)

पै॥ छ० २४ रमजान. सन सबा तिसैन.

सेवेसीं जिवाजी[3] गोपाळ व नारो हरी करंदीकर. दोनी कर

---

१ खासगीकडील कारकून केसो बल्लाळ गोरे. २ म्हैसकर जनार्दन शिवाजी हा पटवर्धनांचा वकील नानाकडे नेमलेला असतां मशीराकडून नानाकडे बोलण्याकरितां आपण वकिली पतकरतो. नानानीं बाजीरावास गादीवर बसवण्याप्रकरणीं मशीराचा ऐवज देणें त्यापैकीं चार लक्ष रुपये मी परभारें उगवून मशीरास देतों म्हणून हवाला घेतो. आणि हे रुपये मिरजकरांकडून वसूल झाल्याखेरीज विठ्ठलरावास पुण्यांतून सोडूं नका म्हणून नानांस आग्रह करितो ! + मिति व तारीख पैवस्तीची. ३ दोघेही मिरजकरांकडून वकिलीकरितां करवीरच्या महाराजांजवळ होते, त्यांचें हें बाळासाहेबांस पत्र.

जोडून शिर सा॥ नमस्कार विनंती विज्ञापना तागायत छ० २३ रमजान पावेतों यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं छ० २२ रमजानचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं तेथें आज्ञा कीं, " श्री॥ महाराज यांजकडील जाबसाल उलगडयांत यावयाचे येविसीं राजश्री बाळकृष्णपंत यांस पत्र लिहिलें आहे व श्रीमंत नानांचें पत्र म॥ निल्हेस या कामाबद्दल आलें तेंही ऐसीं दोनी पत्रें पाठविलीं आहेत. तुम्ही पाहोन प्रविष्ट करून जाब घेऊन पाठवावे व संवदत्तीस कुमकेस महाराजांकडून फौज गेली म्हणोन ऐकतों. त्यास किती फौज गेली ? बाळकृष्णपंत (हे) गोसावी याचा जाबसाल बोलत असतां कुमक होणें हाही मजकूर विचारावा. ठाण्याचा जिम्मा त्याणीं करून घ्यावा म्हणजे फौज माघारी आणवावयासीं येईल." म्हणोन आज्ञा, त्यावरून दोनी पत्रें पाहून प्रविष्ट केलीं. संवदत्तीस आज प्रातःकाळीं हजार फौज जावयाचा निश्चय होऊन नगारा जाहला. तेव्हां बाळकृष्णपंत यांजकडे जाऊन मजकूर सांगितला. त्याणीं सांगोन पाठविलें असतां फौज रहावयाची आज्ञा होईना! कारण "पुण्याहून पत्रांचीं उत्तरें येत तोंपर्यंत (मिरजेची) फौज माघारी यावी असें जालें तर फौज पाठवीत नाहीं. असें होत नाहीं त्यापेक्षां फौज पाठवितों " असें निक्षून (महाराज बोलल्याचें) समजलें. तेव्हां बाळकृष्णपंत याणीं फौज माघारी यावी येविशीं परभारें महाराजांकडे एक पत्र लिहून दिलें तेंही येऊन पावेल. व मजजवळ दिलें तेंही पावेल. बाळकृष्णपंत याणीं पुण्यास संवदत्तीच्या मजकुराविशीं पत्र लिहून पाठविलें आहे त्यांत मजकूर लिहिला कीं, "चिकोडी तालुका महाराजांकडे राहतो ऐसें असल्यास संवदत्तीची जप्ती महाराजांकडे असावी. चिकोडी तालुका सरकारांत घ्यावयाचा असल्यास महाराजांकडे निक्षून लिहून यावें. पत्राचीं उत्तरें येत तोंपर्यंत ठाण्यास उपद्रव होऊं नये येविशीं मिरजेस लिहिलें आहे; " असा मजकूर लिहून पत्र पाठविलें आहे. बाळकृष्णपंत ठाणीं सोडावयासीं व लोकांचे नागावे वगैरे जाले आहेत याचा फडशा

होणेबद्दल आले. त्यास यांची जरब बसोन फडशे होतात असा भाव कांहींच दिसत नाहीं ! ठाणीं सुटणें व नागावे भरून देणें हें जरबेशिवाय कैसें घडेल ? तो डौल काडीमात्र दिसत नाहीं, याचाही बारकाईनें शोध पाहिला. तेव्हां मूळें ठिकाणींच या प्रसंगीं (महाराजांची) मर्जी तोडूं नये. वरचेवर जाबसाल होईल तो होईल ! बाळकृष्णपंत आले ते दिवसीं मठांतच उतरले. दुसरे दिवशीं गांवांत आले ते अद्याप गांवांतच हंबीरराव चिटणीस कराडे आहेत त्यांच्या वाड्यांत आहेत. वरकड आटाळा मठांतच आहे. कळावें. संवदत्तीविशीं आज्ञेप्रों बाळकृष्णपंत यांजवळ मजकूर बोललों. त्यास स्वामींची गांठ मिरजेस पडोन बोलणें जालें तोही मजकूर त्यांणीं थोडाबहुत आले तेव्हां सांगितला. परंतु हल्लींच्या कर्तव्यास कांहींच दिसण्यांत येत नाहीं ! तूर्त महाराजांचे मर्जीनुरूपच म॥ निल्हेची वर्तणूक दिसते. असा प्रकार आहे. नानांचें पत्र व स्वामींचें पत्र दिलें त्यांतील मजकुराचा जाब मागाहून घेऊन पाठवितों. पुण्याहून संवदत्तीच्या मजकुराचें उत्तर येई तोंपर्यंत कलागत वाढवूं नये. तूर्तच खटला पडतो ऐसें आहे. त्यांत स्वामींची मर्जी ! मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९३८ श्री. (फाल्गुन व० १०—२३ मार्च.)

पै॥ छ० २४ रमजान. सन सबां तिसैन. महाराजांच्या माणसाबरोबर पत्र आलें.

सेवेसीं बालकृष्ण महादेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २३ रमजानपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. संवदत्तीविषयीं एक दोन पत्रें पाठविलीं. परंतु गांवचा वेढा उठला नाहीं. वेढा बसोन पाणी देखील बंद केलें आहे. त्यास श्रीमंतांची आज्ञा होऊन येथें हुजूर महाराज स्वामींकडे आलों. सर-

१ नानांच्या मनांत. २ पत्र करवीराहून बाळासाहेबांस.

कारची कांहीं आज्ञा महाराजांविषयीं विरुद्ध करावें अशी नाहीं, आणि आपण संवदत्तीविषयीं कलह वाढवितां, येणेंकरून काय होणार ? श्रीमंतांचा शब्द मजवर येणार जे, तुम्ही प्रसंगीं असतां कलह वाढविला, हें काय ? तर कलह न वाढे ते गोष्ट करून संवदत्तीचा वेठा उठवून न्यावा. म्हणजे उभय पक्षीं उत्तम आहे. नाहींतर सरकारचा शब्द येईल. सरकारची कांहीं मजला हुजूरचेविषयीं कलह वाढावा अशी आज्ञा नसतां आपण कलह वाढविल्यास चांगलें नाहीं. हे विज्ञापना.

नं. ३९३९ श्री. (फाल्गुन व० १०–२३ मार्च.)

पै॥ छ० २४ रमजान. सन सबां तिसैन.

सेवेसीं बाळकृष्ण महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २३ रमजानपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. संवदत्तीस फौज गेली आहे त्यास उभयतां गोसावी यांचा मजकूर पुणेंयास लिहिला आहे. तेथील उत्तर येईतों फौज माघारी चार कोसीं आणवावी. श्रीमंत महाराज आपली फौज पाठवीत होते ती मना करविली. यास्तव स्वामींनीं आपली फौज माघारी चार कोस आणवली पाहिजे. व भैरवगिरि येथें आणविला. राजेंद्रगिरि पाठवावयाची आज्ञा व्हावी. पुणेंयाचे उत्तर येईल त्या अन्वयें सेवेसी लिहून पाठवीन तोंपर्यंत कज्जा होऊं नये हे विज्ञापना. श्रीमंत महाराज यांनीं पत्र दुसरें लिहून दिलें आहे तेंही पावेल. हे विज्ञापना.

नं. ३९४० श्रीगणराज. (फाल्गुन व. ११–२४ मार्च.)

पै॥ छ० २६ रमजान. सन सबां तिसैन.

विज्ञापना. रामटेकचीं पानें सांडणीस्वार याजबरोबर पाठ-

---

१ पत्र करवीराहून मिरजेस बाळासाहेबांस. २ महाराजांबरोबर. ३ पत्र विठ्ठलराव पांडुरंग यांचें मिरजेस बाळासाहेबांस. ४ वडील बंधु चिंतामणराव पांडुरंग.

विणेंविशीं आज्ञा, त्यास रामटेकच्या पानाचा दर भोंसले यांचे लष्करांत दर रुपयास २५० प्रों पेशजी मिळत होतीं म्हणोन दोन रुपयांचीं पाठविलीं होतीं. आपली आज्ञा आली त्यावरून येक रुपयाचीं ३५० पाठविलीं आहेत. घ्यावयाची आज्ञा व्हावी. या पानांपैकीं ती॥ राजश्री आपासाहेब[1] यांस पानें सुमारी १०० देणेंविशीं आज्ञा जाहली पाहिजे. सरकारच्या वाड्याभोंवता अलिजाबहादूर यांजकडील तोफा व पलटणें बंदोबस्त पूर्ववत्प्रमाणेंच आहे. राजश्री नानांचे वाड्यापुढें छबिना आरब वगैरे बंदोबस्त चांगला पक्काच आहे. कळावें. परवारांविशीं आज्ञा जाहली त्यास परवारें मिळत नाहींत. मिळालीं म्हणजे सेवेसीं पाठवितों. कागदगड्यांचे उंट पाठविले ते पावलेच असतील. हल्लीं रामटेकच्या पानांचा भरणा आला याजमुळें (रुपयास) साडेतीनशें जाहलीं आहेत. पानें जाजती पाठविणार होतों, परंतु म्हैसकर याणीं पानें पाठविलीं, सबब एक रुपयाचींच पाठविलीं आहेत. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९४१ श्री. (२४ मार्च.)

पै॥ छ० २६ रमजान. सन सबा तिसैन.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून शिर सा॥ नमस्कार. विनापना तागायत फाल्गुन व० ११ पावेतों वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. त्याचीं उत्तरें राजश्री बाळाजीपंत पटवर्धन याजबरोबर वडिलांस लिहून पाठविलीं आहेत. हिंग अडीच पाव कमी भरल्याविशीं पत्रीं[2] लिहिलें, त्यावरून ज्याकडील हिंग घेतला होता त्याजला आणून चौकशी केली. त्याणें शपथ वाहिली (कीं) जाणोन कमी दिला नाहीं; नजर चुकोन कमी कैसा भरला न कळे; ऐसी आण वाहिली. मग त्याजपासोन अडीच पावांचा पैका परत घेतला. बाकी सवा-

१ रामचंद्र परशुराम यांस. २ पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

चारशेर अद्पाव याचा पैका मात्र पेशजी दर लिहिल्याप्रमाणें खात्यास लिहिला. वडिलांस कळावें. राजश्री बळवंतराव नागनाथ वांबोरीकर बंदी कुरडू किल्यावर घातले होते त्यांजला श्री॥ राजश्री बाजीरावसाहेबानीं आणविलें. नागनाथ यांची भेट घेतली नाहीं. " घरीं वांबोरीस जाणें. बंदीस होतां, प्रायश्चित्त घ्यावें. डोकी वाढविली आहे ती करावी. दोन महिने घरीं रहावें. जसी आज्ञा करू तेणेंप्रों वर्तावें. " अशी सरकारची आज्ञा होऊन नागनाथ वांबोरीस घरीं गेले. राजश्री मोरोबादादाचे बोलणें होळकर बोलतात. श्रीमंतांचे कानावर गोष्ट गेली. कारभार मात्र करू नये, घरीं रहावें, असें कारभारी[1] यांचें बोलणें आहे. होळकर यांचा नेट दादास (कैदेंतून) काढावेंविसीं भारी आहे. काय ठरतें पहावें. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ३९४२ श्री. (२४ मार्च.)

पै॥ छ २६ रमजान. सन सबा तिसैन.

विज्ञापना[2]. फाल्गुन व॥ ११ वर्तमान यथास्थित असे. विशेष-श्री. राजश्री अमृतराव व चिमाजी अप्पा व शिंदे व सखाराम घाटगे व होळकर यांचे बोलणें होऊन भाऊसाहेबांस आणावें असा करार त्यांचा ठरला आहे. श्रीमंतांचा तह[3] पडत नाहीं त्याजविषयीं शिंदे श्रीमंतांसीं बोलणार. तहामध्यें आणून मग आणणार. गांवांत बातमी सर्व ठायीं लष्करांत संमत[4] कीं आणावयास गेले. अशी बोलवा. परंतु गेले नाहीं. दोन चार रोजांनी शिंदे यांचें बोलणें सरकारांत जाहल्यावर मग जाणार अशी बातमी आहे. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ३९४३ श्री. (फाल्गुन व० १४–२७ मार्च.*)

अपत्यें बाळकृष्णानें सा नमस्कार विज्ञापना. ता. छ० २७

---

१ नानाचें कीं दुसऱ्या कोणा कारभाऱ्याचें ? २ धोंडो बापूजी जोशी याचें पत्र मिरजेस. ३ परशुरामभाऊंस कैदेंतून सोडवून. ४ संमति.

रमजान इंदुवार क्षेम असे. विशेष. काल चतुरसिंग याजकडील चाळीस पन्नास राऊत येऊन मौजे कवठेंचीं गुरें पांच सातशें वळलीं तेव्हां गांवांत वर्तमान कळून सरकारचे लोक व नवे ठेवलेले प्यादे व गांवचे शेंदोनशें माणूस बाहेर निघून पाठलाग केला तों बागणीचे अलीकडे गांठ पडली. नंतर गुरें सोडवून घेऊन आले. एक असामी रयतेस जखम लागली आहे. आणखी स्वारी घेऊन येतों म्हणून ते बोलोन गेले आहेत ! अकरा गांवकरांची अर्जदास्त आहे त्यावरून श्रुत होईल. अशा नेहमीं स्वाऱ्या करूं लागल्यास गांवचा बचाव कैसा होतो ? सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९४४ श्रीगजानन. (चैत्र शु० ४–१एप्रिल.)

पै॥ छ० ६ सवाल. सन सबा तिसैन.

विज्ञापना. इकडील वर्तमान–बाजारी–खरें नव्हे–लोक अफवा उग्याच उठवतात ! (त्या अशा कीं) वडिलांचें[2] बोलणें लागलें आहे. कोणी तीस[3] लक्ष, कोणी वीस लक्ष, ऐसें म्हणतात ! बोलणें रास्ते व शिंदे बोलतात ऐसें ऐकतों. वडिलांस स्वाधीन करावें ऐसें म्हणणें कारभारी[4] यांचें, त्यास रास्ते यांचें म्हणणें पडिलें आहे कीं, " शिंदे, होळकर, मशीर, चिमाजी खंडेराव, आपा बळवंतराव, नारोपंत चक्रदेव इतक्यानीं मिळोन (भाऊंस) आमचे हवालीं केलें. त्या पक्षीं आतां आमचे हवालां आहेत त्यांजकडून फंद फितूर जाहला असिला तर आपले स्वाधीन करावें (हें वाजवी.) उगेच स्वाधीन करावें हेंच मानस असल्यास त्यांची वाट ती आमची वाट ! ऐसें उत्तर जाहलें आहे. दुसरे एक वर्तमान (भाऊंस) चाळीस पन्नास हजार रुपयांचा सरंजाम द्यावा, (त्यानीं) भिलवडीस स्नानसंध्या करून रहावें, ही एक बोलवा आहे. येणेंप्रमाणें बोलणें लागलें

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें पत्र मिरजेस. २. परशुरामभाऊंच्या सुटकेचें.

आहे. यांत गुंता नाहींसें वाटतें. सर्व बोलण्याचा भर शिंद्यांचा व रास्ते यांचा आहे असें दिसतें. काय घडेल तें खरें. बाळोबा पागनीस यांस सोडावें, तेव्हां त्यांचें बोलणें "कुटुंबवत्सल ते सुटल्याविना माझें काय आहे?" असें बोलणें त्यांचें आहे. कोणी बाळोबास सोडिलें ऐसेंही म्हणतात. ईश्वरइच्छा प्रमाण. सर्व बाजारी अफवा आहेत. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३९४५ श्रीगणराज. (चैत्र शु॰ ७–४एप्रिल.)

पै॥ छ १० सवाल. सन सबा तिसैन.

विज्ञापना. सावकारपट्टीसाठीं भिडयांचे घरीं आज दोन रोज आरबांची निकड जाहली आहे ती कोठवर लिहावी! आज दोन रोज घरांत अग्नि प्रदीप्त नाहीं![2] अद्याप कोणत्याही सावकाराची तोड पडली नाहीं याजमुळें निकड सोसून क्षेत्र करीत आहेत. गरीब सावकारांस निकड करून तोड पाडणार असें दिसतें. रस्त्यांत उन्हांत उभे (सावकारांच्या) कारकुनांस केलें. डोईवर दगडही देणार. बहुत निकड जाहली. राजश्री गंगाधरपंत तात्या भानु आंबेगांवास परवां रात्रौ निघोन गेले. कळावें. भिडयांच्या घरीं काल मोठा कहर जाहला. कारकुनाच्या देखील डोईवर दगड दिले. आणि अनवाणी उन्हांत डोईवर प्रावर्ण देखील नाहीं! गरीबांचे फार हाल होतात! आणि कारकून उनामू कलम (?) येऊन पडतात. याप्रमाणें त्यांच्या घरचा मजकूर आहे. इतक्यास्तव विनंती लिहिली आहे. तर मुद्दल रुपये[3] द्यावे तर वोढ भारी, याजमुळें व्याज तरी द्यावयाची आज्ञा व्हावी. कळावेंकरितां विनंती[4] लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस. २ उपास काढीत आहेत. ३ तुह्मीं भिडयांचे रुपये देणें ते. ४ विठ्ठलरावानें विनंती लिहिण्याचें कारण भिडयांच्या घरीं त्याचें आजोळ. हे सावकार भिडे बुधवार पेठेंतले.

नं. ३९४६ श्री. (चैत्र शु० ७–४ एप्रिल.)

पै॥ छ० १० सवाल. सन सबा तिसैन.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत चैत्र शु॥ ७ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. नबाबाकडील फौज नवीन पांच सात हजार आली. दोन रोज जाहले. आमचा गडी फुरसंगीस रविवारीं गेला होता तो त्याचें लष्कर नवें आलें त्या रवेंतून आला. त्याणें फौज पाहिली. सावकारपट्टी निकडीनें वसूल होत आहे. इतर बोलवा मनस्वी बोलतात. कही बोरघाटाखालीं खोपवलीपर्यंत जाऊन कोंकणचा पेंढा साळीचा भरोन आणिला. वाईकडे जात होती ती (बंद झाली. कारण) रास्ते याणीं घांट दोन्ही पाडिले. कळावें. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९४७ श्रीगणराज. (चैत्र शु० ७–४एप्रिल)

पै॥ छ० १० सवाल सन सबा तिसैन.

विज्ञापना. राजश्री जनार्दन शिवाजी शु॥ ९ बुधवारीं येथें आले होते. त्यांस मीं सांगितलें कीं " वडिलांस मिरजेस तेथें सरंजामासाठीं कारकून गेला आहे तो निकड भारी करितो. वडिलांस उपोषण जाहलें म्हणोन ऐकतों. मनाचिठी देववावी. " म्हणोन सांगितलें. त्यास (ते बोलले कीं) अमावास्येस उपोषण जालें तें दर्शश्राद्धामुळें जाहलें. मिरजेहून मातबर कोणी आल्याविना मनाचिठी होत नाहीं. तेथें बोलणार तिमाजीपंत म्हणोन कोणी आले आहेत. शिंबाकडे आपाजीपंत सहस्रबुद्धे आले आहेत. " त्यांस मी सांगितलें कीं तिमाजीपंत कोण हें आम्हांस ठाऊक नाहीं. आपाजी नाईक सहस्रबुद्धे आपलें कापड विकण्यास आलों म्हणोन सांगत होते. जैनाबादी कापड विकलें, एक दोन दिवसांत मिरजेस जाणार, ऐसें

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. २ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र मिरजेस.

सांगत होते म्हणोन सांगितलें. त्यास मजजवळ उत्तर केलें कीं, तुम्हांस सांगावयाचें नसेल म्हणोन सांगितलें नाहीं! ऐसें उत्तर बोलून गेले. राजश्री दौलतराव बाबा शिंदे अलीजाबहादूर यांची स्वारी बुधवारीं सायंकाळीं चार घटका दिवसास आली. राजश्री नानाही वाड्यांत आले. खलबत जाहलें. भोजन जाहलें. रात्रौ बारा घटका रात्रीस स्वारी माघारी गेली. कळावें. शिंदे यांजकडील सरंजाम चार हजार फौज पायदळ शहराबाहेर तोफा पलटणें येणेंप्रमाणें होतीं. कळावें. तेथें उपोषणें वगैरे निकड होती हें सांगितलें असतां यांचे चित्तांत येत नाहीं! श्री इच्छा प्रमाण. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९४८ श्रीगजानन. (चैत्र शु० १०–६ एप्रिल.)

पै॥ छ१० सवाल. सन सबा तिसैन.

विज्ञापना तागायत छ० ८ सवाल यथास्थित असे. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र मदारीबरोबर पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. इकडील वर्तमान तर बाजार अवाई आहे. खरी नव्हे. उगीच अफवा.

१ श्रीमंत राजश्री नाना यांचे स्त्रीस रजोदर्शन प्राप्त जाहलें म्हणोन मेणवलीस जाणार. परंतु यजमान आज्ञा देत नाहींत. येथेंच आणवावी म्हणतात म्हणोन वर्तमान.

१. वडिलांविशींचें बोलणें लागलें आहे म्हणतात. वर्तमान दुणावत नाहीं.

१ मशीराची फौज नवीन दहा हजार आली. सुरतेकडून गोरे येणार. मुसा नारंजाचीं पलटणें बेदरच्या चौकांत आलीं. मशीर सावध आहे. दरमहा सात लक्ष रुपये लागतात.

---

१ शिंद्यांस दगाफटका होईल तर त्याच्या निवारणार्थ. २ बाळाजी गणेश जोशी यांचें पत्र मिरजेस. ३ परशुरामभाऊंच्या सुटकेविषयीं.

१ लोकांचे म्हणणें फिरोन बोलूं लागले. ठीक नाहीं असें म्हणों लागले. काय आहे न कळे.

१ मोरोबादादा फडणीस यांचें बोलणें लागलें म्हणोन वार्ता. परंतु लटकें आहे.

१ वरकड सर्व जबानी मदारीस सांगितलें आहे. तो विनंती करील त्याजवरून विदित होईल.

१ मेणवलीस लक्ष भोजन घालावयाचा नवस आहे याजकरितां जाणार, म्हणोन विनंती केली[1] परंतु आज्ञा होत नाहीं; अशी बाजार बोलवा आहे.

येणेंप्रमाणें बाजारी वर्तमान आढळलेलें विनंती लिहिली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३९४९ श्रीगजानन. (चैत्र शु० ११–७ एप्रिल.)

* राजश्री बाबजीपंत दादा स्वामीचे सेवेसीं साष्टांग नमस्कार विनंती. उपर मनाचिठीचें केलें होतें. इतक्यांत सांडणीस्वाराबरोबर पत्र गृहस्थास होतें त्यानें सार्थक जालें! गृहस्थाचे म्हणणें वीस वर्षांचा दावा आहे. आम्हीं त्याचें काय करावें? तेव्हां ढेकणे बोलिले कीं तीन पिढ्या त्यांचे पदरचे. त्याचें अन्न खाल्लें. या समयास ऐसें करणें हे ठीक नव्हे. म्हणोन बहुत प्रकारें बोलिले. नंतर वडिलांची सुटका जाहली असतां आमचें अनहित होईल. तेव्हां आमचें त्याचें नीट करून द्यावें. तेव्हां ढेकणें बोलिले कीं शपथपुरःसर नीट करूं. चिंता नाहीं. एकादा जाबसाल बोलण्याचा पडला तर जळीती. आपण नसावें. आग पडली ती विझविणें होणें कठीण. असें बहुत प्रकारें बोलून गृहस्थांनीं आग घालूं नये, याजप्रमाणें करार करून घेतला म्हणोन बाजारी वर्तमान आहे. खरें नव्हे. त्याजवरून ढेकणे यास राजश्री नानाकडे पाठवून बहुत प्रकारें सांगून घेतलें. नंतर "सरकारची मनाचिठी होत

---

१ नानानीं पेशव्यांस विनंति केली. * बाळाजीपंत जोशी याचें पत्र मिरजेस.

नाहीं. आम्हीं एक मात्र 'स्वस्थ राहणें, तगादा न करणें,' अशी चिठी जनार्दन शिवाजीजवळ दिली आहे. तुम्हाजवळ देत नाहीं. बभ्रा होईल" ऐसीं अक्षरें बोलिले आहेत. सर्व जबानी मदारी विनंती करील त्याजवरोन कळेल. छ० ९ सवाल हे विज्ञापना.

नं. ३९५० श्री. (चैत्र शु १२-८ एप्रिल)

पै॥ छ० १३ चैत्रमास. सबां तिसैन.

विज्ञापना[1]. तर्थिरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेसीं. विज्ञापना. दोन चिट्या पाठविल्या त्या पावल्या. सर्व अर्थ समजले. वडिलीं ही सर्व मान्य करून लिहिलें तें कळलें. त्यास येथें जसा प्रसंग पडेल तसें करितों. आज्ञेशिवाय वर्तणूकच व्हावयाची नाहीं. रास्ते बोलतात खरे, परंतु लेखकास बहुत भितात ! यास्तव मी ही सुमार पाहूनच बोलतों. सुतरस्वाराबरोबर मनाई गेली आहे म्हणोन आजच ऐकिलें; त्यास जर मनाई गेली असल्यास बरेंच जाहलें. नसल्यास काय तें कळवावें. येथें तरी कोणतें सुधें आहे ! सर्व आपले जागीं दिलगीर आहेत. वडिलीं जप्तीवालेस खणखणीत सांगावें कीं, " मंडळीसुद्धां हातीं देणार नाहीं, खर्च नेमून देतों. खाऊन रहावयाचें असल्यास रहावें. नाहीं तर उठून जाणें. " असें स्पष्ट सांगावें. तूर्त इकडे सर्व आपले घोळांत आहेत. आणि कोणतीही गोष्ट जरबेशिवाय होणार नाहीं. येथें म्हसकर याणीं बाकी ठेविली नाहीं ! असो. ईश्वरी इच्छा प्रमाण. पत्रार्थ गुप्त असावा. मी येथें श्रीमंतांचे वचनाची नौका करून सुखी आहें. चरण दृष्टीस पडतील तेव्हां खरे ! रवाना. मंदवार.

नं. ३९५१ श्रीगणराज. (चैत्र व० १-१२ एप्रिल.)

पै॥ छ० १४ सन सबां तिसैन. चैत्रमास.

विज्ञापना[2]. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. राजश्री बाळाजी-

१ बाबा काळे यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें पत्र कुरुंदवाडाहून मिरजेस.

पंतासमागमें फौज रा॥ नानांच्या पत्रावरोन पाठविली. लढाई जाहली. परंतु करवीराहून बहादुरवाडीकरांच्या कुमकेस फौज येणार, म्हणोन मजकडोन करवीरास कारकून राजश्री सखाराम शेषाद्रि आहे त्यानें वर्तमान लिहिलें आहे. राजश्री आपाजी दामोदर फौज देऊन पाठविले आहेत त्यांस सावधतेविषयीं वरचेवर आज्ञा जांहली पाहिजे. राजश्री बाबूराव शिवाजी याची रवानगी कांहीं ऐवज देऊन करितों म्हणोन लिहिलें, त्यास कोणकोणत्या बाबें द्यावयाचा ठराव होऊन ऐवज रवाना होतो ? मजकडील महालांचाही ऐवज गेला पाहिजे. मजकडील ऐवज मागील दहकाचा व हक्क रुसुमाचा काय आहे तो लिहिला पाहिजे. त्यापैकीं आपला ऐवज कोणत्या हिसेरसीनें जातो त्याप्रमाणें येथून ऐवज आज्ञापत्र येतांच पाठवितों. परंतु तेरदाळ तालुका अगदीं खराबींत आला. तालुक्याची खराबी जाहली त्याचा अजमासही कमावीसदाराकडून लिहिला आला आहे. तसेंच यादवाडपैकीं देहचार यांची अगदींच नासाडी. शहापुर तालुक्यांत कर्याती दोन घास दाणा वगैरे (घेऊन) करवीरकरांनीं खेडीं लुटलीं गेलीं याची विनंती राजश्री देवापा देशपांडे यांनीं केलीच असेल. त्याचे जाबसाल कसे (हें) समजण्यास्तव विनंती लिहिली आहे. सरकारांतून तो तगादे भारी ! कोणत्या प्रकारें खर्च, कोणत्या प्रकारें तालुका खराबी, नापीक, टोळखाद, याची विनंती सरकारांत होऊन जाबसाल जाला पाहिजे. नाहीं तर ऐवज उगाच दिला असतां अमुक ऐवजीं ऐवज वजा करून फिरोन आहे तें आहेच असें होणार ! यास्तव इतके पर्याय राजश्री नानांशीं बोलण्याची आज्ञा रवाना जाहलीच असेल. तूर्त किती ऐवज पाठवावयाचा त्याची आज्ञा अजमासें व्हावी. उपळें येथील लोकांस मोकाशाचे खटल्याचें पत्र घेऊन सरकारची जासूदजोडी आली आहे. नबाबाची फौज पुण्यास वरचेवर येतच आहे. त्यास काल मैंदर्गीहून पत्रें आलीं त्यांत लिहिलें होतें जे नबाब डेरेदाखल होते ते हल्लीं शहरांत येऊन फिरोन डेरेदाखल

होणार. मुसा रहीम फिरंगी आपलीं पलटणेंसुद्धां सुरापुरचा रोख धरोन कलबुर्ग्यास आले. सुरापूरचे तालुक्यांत कही वगैरे होते. हल्लीं आमच्या तालुक्यांत सात कोसांच्या फासल्यानें आहेत. (तिकडे आमची) पागा आहे. काय होतें पहावें. पुण्यास किरकोळ जमाव जात होता तो हल्लीं परांड्यास जमा होतो असें लिहिलें आहे. चिरंजीव राजश्री बाबाजीस बोलवावयास पालखी वगैरे साहित्य पाठविलें. तीन दिवस जाले. त्याच मार्गे येतील. द्राक्षें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री बाळकृष्णपंत यांनीं पुण्यास पत्रें पाठविलीं आहेत त्या पत्रांच्या उत्तराचा मार्ग (करवीरकर) पहातात अशी जनवार्ता. श्रीमंत रा॥ पंत अमात्य हल्लीं फौजेसह ज्या तालुक्यांत रहातात त्या तालुक्याची खराबी पत्री लिहितां येत नाहीं. जितके खटलेखोर तितके लष्करांत जमा करून तालुक्यांत उपद्रव मनस्वी करितात. लावणीचे दिवस. कोकणी खेडीं. लावणी होत नाहीं. रवाना छ० १४ सवाल विदित होय हे विज्ञापना.

नं.३९५२ श्री. (चैत्र व. १–१२ एप्रि.)

विज्ञापना. चैत्र वद्य प्रतिपदा बुधवार. राजश्री दादा गद्रे याणीं आपल्या बागेंत देवालय बांधविलें आहे तेथें श्री मुरलीधर देवप्रतिष्ठा करून स्थापना करावयास प्रातःकाळीं छ० १५ सवालीं आजी (?) बागेंत गेले होते. तेथील चौकीस नानाकडील मेस्तर बैट कंपू याजकडील लोक व आरब होते. त्या उभयतांच्या लोकांत कटकट होऊन कलह वाढला. तों दादा गद्रे कंपूकडे जाऊन बहुत प्रकार सांगत असतां ऐकिलें नाहीं. कंपूची व आरबांची गोळागोळी उडाली. तेव्हां गद्रे श्रीच्या देवालयांतून ब्राम्हण सुद्धां निघून आले. तें नानांकडे जाऊन सांगितलेवरून त्यांनीं कजिया तोडावयाकरितां चोपदार पाठविला. त्यास गोळी लागून जखमी जाहला. गोळागोळी व तोफा व रेखलें असे मार होऊन जायां जखमी फार झाले. याज-

करितां नानांच्या वाड्यापुढें आरब होते त्यांस आज्ञा होऊन ते जाऊन कंपूस मोडून त्या च तोफा सोडवून आणिलेवरी स्वस्थ जालें. रेखल्यांचे गोळे व बंदुकीच्या गोळ्या भिरडीकरांच्या वाड्यांत येऊन पडल्या. आम्ही दरवाजा लावून बंदोबस्तानें होतों. शहरांत गलबल फार झाली. शिंदे व भोसले व मशरीन अगदीं तयार झाले होते. सरकार वाड्यांतही बंदोबस्ती होती. आरबांची व कंपूची कटकट होऊन गोळागोळी जाली; अशी बातमी सर्वांस समजलेवरून स्वस्थ जालें. चार पांच घटका गोळागोळी जाली. शहरचे तमासगीर कांहीं जायां जखमी जाले. श्री॥ राजश्री गणपतरावांकडील पागेचा घोडा श्यामसुंदर याच्या पायास गोळा लागला. तीन पायांवर घोडा उभा राहिला. तेथें चौकशी (?) होती सबब नानांकडील कारकून व भालदार जाऊन घोडा पाहून आले. नंतर जबे करणेची आज्ञा जाली त्याप्रमाणें जबे झाली. कंपूकडील मुडदे पडले आहेत ते (कंपूवाले) नेऊं म्हणतात त्यांस आरब नेऊं देत नाहींत. येविशी नानांची आज्ञा होईल त्याप्रमाणें होईल. चोपदार ताकीद करून कजिया तोडावयास गेला तो जखमी जाला, सबब नानाची मर्जी ठीक नाहीं. ताकीद होऊन बंदोबस्त होईल ... ... कंपूची व आरबांची गोळागोळी जाली तेव्हां मी व विठू कानडा वगैरे तमाशा पहात गच्चीवर जाऊन बसलों होतों. तेथें गोळे येऊन पडूं लागले तेव्हां निघून आलों. स्वामीच्या कृपेकरून सर्व सुखरूप आहों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९५३ **श्रीगणराज.** (चैत्र व० ५–१६ एप्रिल)

पै॥ छ० २८ सवाल. सन सब्बा तिसैन. चैत्रमास.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १८ सवाल यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं; तर सदैव पत्रीं सांभाळ करावयास आज्ञा केली पाहिजे. छ० १५ सवालीं मेस्तर

बैट याची लढाई जाल्याचें लिहिलेंच आहे. छ० १५ सवालीं राजश्री दौलतराव बाबा शिंदे अलिजाबहाद्दर यांच्या गोटांत सखाराम घाटगे आहेत त्याणीं नवे आरब रोहिले ठेविले आहेत त्यांच्या तलबेच्या रुपयांसाठीं खटला जाहला. तेन्हां तरवार चालली. अठ्ठावीस असामी ठार जाहली. नंतर शिंदे याणीं सखाराम घाटगे डेऱ्याजवळ उतरले होते त्यांस फांसल्यानें उतरणेंविशीं आज्ञा जाहली. त्याजप्रों राहुटी तफावतीनें घाटगे यांची दिली. छ० १६ रोजीं धोंडोपंत बाबा निजसुरे यांजकडील शिलेदार एक असामी तलबेसाठीं निकड केली. शेवट आपले हातीं मान कापून घेतली ! ठार जाहला. छ० १७ रोजीं आरब एक लांकडी नागमोडीच्या पुलाकडे गेला होता. तेथें मेस्तर बैट याणें ठार मारून टाकिला ! असा आरबांचा व टोपीकराचा दावा पडिला आहे. काय होतें पहावें. बाजारी अफवा आहे कीं मल्हारराव होळकर याच्या व काशीराव होळकर याच्या खटल्यास प्रारंभ जाहला. तालुक्यावर उभयता मिळोन वराता करितात. येणेंप्रमाणें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९५४ श्री. (चैत्र वद्य—एप्रिल)

सन सब्बां तिसैन.

विज्ञापना. दादा गद्रे याणीं बागेंत श्रीदेवप्रतिष्ठा केली ते दिवशीं मेस्तर बैटकडील लोकांची व आरबाकडील लोकांची कट-कट जाली. तेच दिवशीं नानाच्या वाड्यांत हौदाजवळील घरांत सुवर्णाच्या मूर्तीची स्थापना होऊन बलि बाहेर टाकावयास माण-सानीं उंच दारांनीं आणून सरकारवाड्याकडच्या बाजूस येऊन मागील दारांनीं घरांत गेले. त्यास-शिंद्याकडील चौकी व तोफा नंजीकच-तेथील लोकांनीं ‘ कांहीं कोडें केलें ’ म्हणून तोच बलि

१ बाळासाहेबांस पत्र मिरजेस. २ थोरल्या दरवाजानें.

घेऊन माणसांचे पाठोपाठ मागील दारांनीं नानांच्या वाड्यांत गेले. तेव्हां त्यांस समजून सांगावयाकरितां भास्करपंत कोठवळे आले त्यांस धरून बांधून पाडून माणसांकाणसांस मारामारी करून घरांतून हौदांतून वगैरे बली टाकून खटला केला. तेव्हा कृष्णाजी शेट्या वाड्यांत होता त्यास सांगून पाठविलें. तेव्हां तो येऊन शिंयाकडील लोकांस समजून सांगोन भास्करपंत वगैरे यांस सोडविलें. भास्करपंताचे हाल फार जाले. यास्तव नानाची मर्जी दोन दिवस ठीक नव्हती. आणि कंपूही अद्यापत: समजत नाहीं. आरबांशीं लढाई मारूं म्हणतात. त्यांसही आबा शेलूकर वगैरे एकदोघे समजून सांगोन आले कीं, दोघांचा मजकूर मनास आणून ज्याकडून अंतर पडलें असेल त्याचें पारिपत्य करावें. असें जालें तेव्हां त्यांणीं आपलेकडील मुडदे काढून नेले. पुढें काय होतें पहावें. ताकीद होऊन समजूत होईलसें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९५५ **श्रीगजानन.** (चैत्र व० ११–२२ एप्रिल)

विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २४ सवाल. यथास्थित असे. विशेष. काल हुसेनबेगाकडील गारदी एक आला होता त्याजबरोबर विनंती लिहिली आहे. आज राजश्री जनार्दनपंत भाऊ वाड्यांत आले होते. त्यांणीं राजश्री धोंडोपंत जोशी यांजवळ व यजमानांजवळ बोलिले म्हणून उभयतां सांगत होते कीं, राजश्री दाजीबा म्हैसकर ऐवज घेऊन येतात म्हणोन वाट पाहिली. दाजीबाचीं पत्रें कोरेगांवच्या मुक्कामाचीं निकडीनें आलीं त्यांत लिहिलें होतें कीं; "ऐवज पैसा नाहीं. ऐवज सिद्ध केला होता. परंतु (बाळासाहेबांनीं) ऐवज पाठविला नाहीं." म्हणोन राजश्री

---

१ हा दौलतराव शिंयांचा हुजऱ्या त्या वेळीं शनवारवाड्यांत होता. २ मेस्तर बेट याच्या कंपूची समजूत पडत नाहीं. ३ बाळाजी गणेश जोशी याचें पत्र मिरजेस. ४ आमच्या वाड्यांत. ५ विठ्ठलराव यांजवळ.

नानांस विनंती केली. नंतर श्रीमंतांची मर्जी बहुत क्रोधाची जाहली. " ऐवज न आल्यास चिंता नाहीं. सरंजाम जप्त होईल. पांच लक्षांची वरात शिंद्यास देतों. शिंद्याकडील कंपू पांचशें गारदी गेले असतां पांच लाख रुपये देतील. लाख खर्च पडेल. आम्ही लिहावयाचे रीतीनें लिहिलें, परंतु (बाळासाहेब) चौघांच्या बुद्धीस लागले! बाळासाहेबांचा ढिला कारभार ! त्याजपक्षीं आम्हीं कोठवर लिहावें ? म्हणोन[1] बोलत होते. दुसरें " चिंतोपंत[2] वगैरे तीन असामींस शोभा करून किल्ल्यावर टाकणार. वडिलांजवळ तेथें मंडळी आहे ती सारी पुण्यास आणोन शोभा करोन द्रव्याचा जाबसाल उरकला तर उत्तम—नाहीं तर किल्ल्यावर टाकणार"; म्हणोन येथें बोलत होते. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. विदित होय. हे विज्ञापना.

नं. ३९५६ **श्री.** (चैत्र व. ११—२२ एप्रिल).

पै॥ छ० २७ सवाल. सन सब्बां तिसैन. चैत्र.

विज्ञापना[3] छ० २४ सवालीं राजश्री जनार्दन शिवाजी भोजनास दोन प्रहरीं येथें आले होते. मातुश्री बाईंचें[4] व त्यांचें चार घटका खलबत जाहलें. त्याणीं बाईंस विचारलें कीं, श्री॥ राजश्री चिंतामणराव आपा यांस (श्रीमंतांकडून अगर नानांकडून) बोलावणें गेल्यास येतील कीं नाहीं ? येथें श्री॥ राजश्री नानांचा राग श्री॥ बाळासाहेबांवर आहे. आम्हीं त्यांस बहुत प्रकारें लिहिलें परंतु पैका अजून येत नाहीं याजकरितां सरंजाम (सरकारांतून) जप्त करणार. त्यांच्या ध्यानांत येत नाहीं ! त्यास पुढें कसें करावें ? मातुश्रीनीं उत्तर केलें कीं मी येथें आहें. सरकारचे जाबसाल आम्हा बायकांस काय समजत ? चि॥ राजश्री बाळासाहेब मिरजेस आहेत. त्यांजकडे लिहून पाठवावें. आजचे बोलण्यांत मातुश्रीचे लक्ष तिकडे नाहींसें दिसतें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ नाना बोलल्याचें बोलत होते. २ लिमये. ३ धोंडो बापू जोशी याचें मिरजेस पत्र. ४ चिंतामणराव व विठ्ठलराव यांची आई लक्ष्मीबाई.

नं. ३९५७ श्री. (२२ एप्रिल.)

पै॥ छ० २७ सवाल. सन सब्बां तिसैन. चैत्र.

सेवेसीं बाळाजी गणेश व धोंडो बापूजी जोशी शिरसा॥ नमस्कार विज्ञापना तागायत चैत्र व॥ ११ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री जनार्दनपंत वाड्यांत आले होते. आज त्याणीं सांगितलें कीं " ती॥ राजश्री दाजी मिरजेहून येत आहेत. समागमें ऐवज रोकड नाहीं. पंचवीस हजार रुपयांची हुंडी मात्र आहे. चार लाख ऐवज येणें, तें कांहींच न पाठविलें! येथील मर्जी एक तऱ्हेची. कसें होईल पहावें. " असें बोलले. आम्हीं उत्तर केलें कीं, येथील प्रकार[1] तुम्हांस ठाऊक; तो सर्व तुम्हीं लिहून कळविला कीं नाहीं? असें बोललों. ते बोलले कीं, " बहुत वेळ लिहिला, परंतु त्यांच्या ध्यानांत येत नाहीं! भाऊसाहेबांस लोक सांगत[2] होते. त्याणीं न आइकलें. मग फसले. असें होऊं शके! दाजीबा आल्यावर बोलण्यांतील विचार समजोन पैक्याचा भरणा होत नसल्यास सरंजामाची जप्ती होऊं शके असा प्रकार आहे. आम्हीं तरी काय करावें? जसें होणार तशी वासना होत आहे " असें म॥निल्हे बोलले. आम्हीं उत्तर केलें, तुम्ही आपणाकडून राखावें. गोष्ट बिघडूं देऊं नये. असें बोललों. कळावें. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९५८ श्रीगणराज. (चैत्र व० १२–२३ एप्रिल.)

पै॥ छ० २८ सवाल. सन सब्बां तिसैन. चैत्र.

[3]विज्ञापना. राजश्री नानांनीं कालियमर्दनाची सुवर्णाची मूर्ति देवालयांत स्थापावी म्हणून प्रतिष्ठा केली ती मुहूर्तें वे॥ राजश्री रामभट आश्रित यांस दान दिली. मशीरन् मुल्क याच्या लष्करचें कूच छ० १५ सवालीं जाहलें. छ० १६ रोजीं कोरेगांवचा मुक्काम

१ नानांची व श्रीमंतांची. २ नानांशीं विरोध करूं नका असें सांगत होते. ३ विठ्ठलराव पांडुरंग याचें पत्र मिरजेस.

होता. छ० १७ रोजीं शिकरापूरच्या मुकामास गेला म्हणोन बाजारी वर्तमान. खरड्यानजीक पंचवीस हजार फौज व कंपू, पाउणशें तोफा, ऐसा सरंजाम आहे तो जवळ करावयास जाणार म्हणोन बोलतात. खरें लटकें न कळे. भिडचांची तोड पंधरा हजार रुपयांवर पडावी ऐसें जाहलें होतें. फिरोन तगादा बसला. पन्नास हजार रुपये मागतात. येणेंप्रमाणें आहे. एक दोन रोजीं भोंसले यांचेंही कूच होणार म्हणोन बोलवा आहे. कळावें करितां विनंति लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री नानांचा वाडा सरकारच्या वाड्याजवळचा आहे त्या वाडयांत हल्लीं नाना रहात नाहींत म्हणून देवप्रतिष्ठा केली. तेव्हां बलिदानाचा दिवा भातांत लावून गणेश-दरवाजाजवळ टाकूं लागले. तेव्हां शिंद्यांकडील मुकेरीसाहेब म्हणून जमातदार आहे त्याचे गारदी म्हणाले कीं, भातांत दिवा लावून भात टाकतां आणि आमचे धनी दौलतराव शिंदे बाबा यांजवर तुम्ही जादू केलीत ! म्हणोन गाडद्यानीं कामाठी बळी टाकावयास गेला त्याच्या मुसक्या बांधल्या ! आणि नानाकडील कारकुनाबरोबरही कटकट केली, आणि दिव्याची पांटी नानांच्या घरांत टाकली आणि तुमची जादू तुमच्या घरांतच घातली म्हणोन बोलले ! इतक्यांत आबा शेलूकर मधें जाऊन सांगितलें कीं, आमचे महजबांत[1] याप्रमाणें आहे म्हणोन करतों. याजप्रमाणें त्यांची समजूत केली. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९५९ **श्रीगणराज.** (चैत्र व० १२—२३ एप्रिल.)

पै॥ क्ष० २७ सवाल. सन सबा तिसैन. चैत्र.

[2]विज्ञापना. बाजारी वर्तमान—मुंबईस वर्तमान मेस्तर बेट याची व आरबांची लढाई जहाली हें गेलेनंतर तिकडून टोपीकर यांचा हुकूम

---

१ असा बलि टाकावा असें आमच्या धर्मांत सांगितलें आहे. २ विठ्ठलराव पांडुरंग याचें पत्र मिरजेस.

आला कीं, आम्ही घांट चढून येतों. तुम्ही स्वस्थ रहाणें ! असें पत्र आलें म्हणोन वर्तमान. परंतु लटिकें असेल. इतक्यांत मुंबईहून वर्तमान कसें येईल; याजवरून लटिकें वाटतें. कळावें. मेस्तर बेट याचें म्हणणें श्रीमंतांकडून राजश्री आबा काळे आले, आणि त्याणीं दुवाई सरकारची घातली, म्हणोन आम्हीं किनारा पिछाडीचा केला. सबब आरबांनीं आगळीक करून आमचे माणूस मारले; त्याजपक्षीं आम्ही आरबांचें पारिपत्य करणार. असें म्हणणें पडलें आहे. राजश्री नानांनीं बेट याजकडे कारकून पाठविला, जवाहीर वस्त्रें पाठवून समजी करोन दिली, म्हणोन बाजारी आवाई ऐकिली. तथ्य नाहीं. श्रीमंत त्रिवर्ग साहेब छ० १७ सवालीं अलिजाबहाद्दर यांच्या गोटांत स्वारी गेली होती. दोन घटका रात्रीस माघारी स्वारी आली. येतेसमयीं राजश्री नानांच्या वाड्यांत जाऊन आपल्या वाड्यांत दाखल जाहली. सरकार खुशालपट्टी मागतात कीं श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यांस वस्त्रें जाहलीं. त्याची खुशालपट्टी देणें म्हणून सांगतात. आणि कोणीकडून तरी सावकार हलके व्हावे ह्या सरकारच्या व कारभाऱ्यांच्या बुद्धि आहेत ! पृथ्वींत कोणी खुशाल असूं नये ! आपलेकडील[१] कोणी चुकून राहिला साहिला असला तर येथें गृहस्थ आहेत तेही दिवसेंदिवस पुण्य खावीतात ! कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९० **श्रीगणराज.** (चैत्र-एप्रिल)

[३]विज्ञापना. नानांची स्वारी भोसल्यांच्या येथें काल सायंकाळीं गेली होती. दोन घटका खलबत होऊन स्वारी माघारी आली. कळावें. श्री. राजश्री बाबांसाहेब[४] व आपासाहेब काल कोथ-

---

१ आम्हांकडील. २ जनोबा म्हैसकर. ३ विठ्ठलराव पांडुरंग यांचे पत्र मिरजेस. ४ बाजीराव व चिमाजीआपा.

रूडच्या बागेंत फराळास स्वारी गेली होती. व त्याचे अगोदरही एक दिवस वडगांवास व एक दिवस दुसऱ्याच्या बागेंत याप्रमाणें गेली होती. स्वाऱ्या नेहमीं जातात. याप्रमाणें येथील मजकूर आहे. भोंसले खासे असामी तीन आहेत त्यांपैकीं खासा रघोजीबाबा नागपुरासच जाणार. व त्यांचे पुत्र नाशीकत्रिंबकाकडून देवदर्शन घेऊन नागपुराकडेस जाणार. व व्यंकटराव भोसले कोण आहेत ते पंढरपुरच्या देवाच्या दर्शनाकरितां तिकडे जाणार. याप्रमाणें बाजारवदंता आहे. परंतु तथ्य आहे. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. भोंसले यांची स्वारी पंढरपुराकडे जाणार तेव्हां आपले मुलखास उपद्रव होईलसा वाटतो. कळावेंकरितां आगाऊ विनंती लिहिली आहे. मुख्य भोंसलेही डांक बसवून दर कूच जाणार. याप्रमाणें वदंता आहे. कळावें सेवेसीं श्रुत होय विज्ञापना.

नं. ३९६१ श्री. (२८ एप्रिल.)

पै॥ छ० ७ जिल्काद. सन सबातिसैन. इंदुवार.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत वैशाख शु॥ २ पावेतों वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं, ऐवज मागाहून पाठवितों म्हणून लिहिलें तें कळलें. राजश्री आबा चिटणीस निसबत शिंदे यांचा भाऊ कृष्णराव श्री॥ राजश्री नानानीं महाडाहून येतेसमयीं समागमें आणिला, त्यास शिंदे याणीं चिटणिशीचीं वस्त्रें राजश्री कृष्णराव याजला दिलीं. आणि नजरेचा ऐवज दहा लाख रुपये घ्यावयाचा करार केला आहे! मेस्तर बैट याजला नानानीं आपलेकडून रजा दिली. तो आतां मशीर याजकडे अथवा भोंसले याजकडे रहावयास जाणार आहे. राजश्री रघुपतराव वकील निसबत नबाब येथें आहे त्याजपाशीं चार पांच हजार फौज होती. आजकाल दोन हजार

आणखी मशीरानें फौज पाठविली. भोंसले जाण्याचा तूर्त बेत राहिला. श्रीरामनवमीपासून आजपर्यंत श्री॥ राजश्री नाना वाड्यांत आले नाहींत. सरकारची बोलावणीं गेलीं. परंतु शिंदे यांजकडील पलटणी लोक वाड्याभोंवते आहेत ते उठून जातील तेव्हां मी वाड्यांत येईन याजप्रमाणें नानानीं उत्तर सांगितलें. गांवांत संतोषपट्टीचा मोठा कडाड जाहला आहे. बेमुरवत पैका घेतात. कालदेशवर्तमान पट्टीचा वगैरे सुमार पाहून गोरगरीब मातबरही त्याणीं देखील कुटुंबाची रवानगी करून कोकणांत पाठवूं लागले ! काल प्रतिपदेस श्री॥ राजश्री विठ्ठलराव बापूंनीं वसंतपूजा केली. ब्राह्मण व गृहस्थ मिळोन शंभर पात्र जाहलें. ब्राह्मण तीसपर्यंत होते. बाकी इतर जमाव. वडिलांस कळावें. शिंदे यांजकडील आणखी सरंजाम येत आहे अशी बाजार-आवाई आहे. ऐवजाविशीं वडिलांस पेशजी विनंती लिहिली आहे. त्यास ऐवज पाठवावयास आज्ञा करावी. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९६२ **श्रीगजानन.** (वैशाख शु७–३मे.)

पै॥ छ० १० जिलकाद सन सबा तिसैन.

[1]विज्ञापना. तागायत छ० ५ जिलकाद बुधवार. सुखरूप असों विशेष. इकडील सविस्तर वृत्त मशारनिल्हे विदित करितील त्याजवरून कळेल. खरड्यांजवळ नबाब बंदेगान अलीची फौज पायदळ जरबा होत्या. त्यांजपैकीं कांहीं सरंजाम येऊन मशीर यास मिळाला. भोसले यांच्या कुचाचें तूर्त कांहीं दिसत नाहीं. खुशालपट्टीचा तगादा भारी आहे. शिंदे व श्रीमंत राजश्री नाना एकरूप होऊन मसलत करणार हीं बोलवा आहे. हें न साधेल तर भोंसले (व) मशीर (व) आपण मिळोन शिंद्यास बेतांत आणावे.[3] ते बेतांत आले असतां सर्व बंदोबस्त (होईल.) महाड रायगड वगैरे जागां छपरबंदी श्रीमंतांची जाहली. लोक सावध होणार अशी

१ बाळाजी गणेश जोशी यांचे पत्र मिरजेस. २ तोफा. ३ असा नानाचा उद्देश. ४ नानांची. हें पुण्यांतून मुक्काम हालण्याचें लक्षण.

बोलवा आहे. श्री॥ राजश्री नाना (यांच्या) बेलबागेच्या वाड्यांतून दुसऱ्या वाड्यांत जावें हें मानस. परंतु सरकारची आज्ञा नाहीं म्हणोन बेलबागेंतील वाड्यांत आहेत. मशीराचा मुक्काम मांडवगणानजीक आहे. श्री॥ राजश्री आप्पासाहेब यांस ज्वर येत असतां राजश्री नाना समाचारास वाड्यांत आले नाहींत. शिंदे यांची स्वारी अलीकडे वाड्यांत आली नाहीं. श्रीनिर्मित काय आहे हें समजत नाहीं. गणेश बाजीराव याचे प्रकरणीं पत्रें आपणाकडे रवाना जाहलीं हेंही वर्तमान आहे. राजश्री दौलतराव बाब अलीजाबहादर यांचें मातोश्री वगैरे कुटुंब हिंदुस्थानांत होतें तेंही नजीक आलें म्हणोन बोलवा. बाजारी वर्तमान ऐकींव लिहिलें आहे. खरें नव्हे. श्री॥ सौभाग्यवती सखुबाई आंबेगांवास परभारी गेली. बाळाजीराम याचें पत्र आलें होतें. मशारनिल्हे आंबेगांवाहून दोनचार रोजीं यावेसे आहेत. अलीकडे पत्र (आपणांकडून) येत नाहीं. मोठी काळजी लागली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. मनाचिठीविशीं बाबा काळे यांस लिहिलें असतां होईलसें वाटतें. आपलें आज्ञा पत्र (बाबा काळे यांस) पाहिजे असें ऐकणेंत येतें. खरें नव्हे. हे विज्ञापना.

नं. ३९६३ श्रीगजानन. (वैशाख शु० १४-९ मे.)

पै॥ छ० १४ जिलकाद सन सब्बा तिसैन.

[१]विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० ११ जिलकाद यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर श्री॥ त्रिवर्ग साहेब छ० ७ जिलकादीं राजश्री दौलतराव शिंदे यांच्या गोटास गेले होते. छ०१० जिलकादीं आलिजाबहादर सरकारचे वाड्यांत आले होते. सायंकाळच्या सहा घटका दिवसास स्वारी वाड्यांत दाखल जाहली. खलबत श्रीमंतांबरोबर जाहलें. सायंकाळीं अस्तमानाबरोबर स्वारी

---

१ बाळाजी गणेश जोशी याचें पत्र मिरजेस.

माघारी शहराबाहेर गेली. बरोबर फौज (व) पांच सहा हजार पायदळ ऐसा सरंजाम होता. श्रीमंत राजश्री नाना वाड्यांत आले नव्हते. आपले वाड्यांत होते. मशीराची फौज पलटणें नवीं येणार येविशीं अलिजाबहादर यांची हरकत पडों लागली, म्हणोन कूच करून तो वीस पंजवीस कोसांचा फासला राखोन गेला. तिकडील सरंजाम येणें तो हरहमेषा येऊन दाखल होत आहे. बत्तीस लक्षांचा मुलूख व शिवाय चौथाई खंडणीचा ऐवज माफ जाहला त्यावरोन सरकारच्या लक्षांतच आहे. भोसल्याची फौजही येऊन दाखल जाहली. तुरळक तुरळक येत आहे. राजश्री दौलतरावबाबा शिंदे कूच करून जांबगांवास जाणार येणेंप्रमाणें बाजारी अफवा आहे. हे विज्ञापना.

नं. ३९६४ श्री. (वैशाख शु. १५–१०मे.)

*यादी नबाब निजामअलीखानबहादूर यांच्या सरकाराशीं अजमुल उमराव बहादूर यांच्या विद्यमानें राजश्री बाळाजी जनार्दन याणीं महाडाहून चौदा कलमांचा करार करून दिला त्यापैकीं ज्या कलमांचें बोलणें पडलें त्या कलमांचा ठराव हल्लीं हुजूर. सु॥ सब्बां तिसैन मय्या व अल्लफ.

कलम १ जहागीर खड्यांचे स्वारीस घेतली त्याच्या मोकळचिठ्या द्याव्या. कलम १

मख० १ तीन हिस्से नबाबास जहागीर माघारी द्यावी. एक हिस्सा सरकारांत ठेवावी. तीन हिशांच्या मोकळचिठ्या दिल्या जातील. येणेंप्रमाणें करार करावें. करार.

---

* त्या याद्दींत प्रत्येक ठिकाणीं " करार करावें करार. " अक्षरें नाना फडणीस यांच्या हातचीं आहेत. ' कलम ' ' मसलाशी ' हीं अक्षरें व कलमांचें आंकडे समजुतीकरितां आम्ही घातले आहेत.

१ मशीरउल्मुलुक.

क० २ सुभे बेदर येथील स्वराज्य[1] द्यावें. कलम. १

मख० २ तीन हिस्से स्वराज्याचा अंमल नबाबाचे जोतीसच[2] दिला. एक हिस्सा अंमल स्वराज्याचा सरकारांत देत जावा. येणेंप्रों करार करावें. करार.

क० ३ दोन करोड ऐवजाचें दस्तऐवज सरकारांत आहेत ते माघारे द्यावे. कलम १

मख० ३ हिस्से ऐवज नबाबापासून घेऊं नये. एक हिस्सा पन्नास लक्ष रुपये सरकारांत घ्यावयाचा करार ठरला त्याप्रों नबाबानीं ऐवज सरकारांत द्यावयाची खातरजमा करून द्यावी (म्हणजे) दोन करोड ऐवजाचे दस्तऐवज दिले जातील. येणेंप्रों करार करावें, करार.

क० ४ किल्ले दौलताबाद येथील सोडचिठी द्यावी. कलम १

मख० ४ ' किल्ला नबाबाकडे दिला[3] ' अशी सोडचिठी दिली जाईल. येणेंप्रमाणें करार करावें. करार. कलम १

चौदा कलमांपैकीं सदरहू चार कलमांचा ठराव झाला. बाकी दहा कलमें महाडचे यादीप्रों करार असेत. येणें-प्रों करार करावें. करार.

छ० १२ जिलकाद सन सब्बां तिसैन. वैशाख मास.

नं. ३९६५ श्रीगणराज. (वैशाख व० ३—१२ मे.)

पै॥ छ० १५ जिलकाद. सन सब्बां तिसैन. वैशाख.

[4]विज्ञापना. कवाइती लोक तीनशें येऊन मेळ्यांत[5] उतरले

---

१ चौथाई व सरदेशमुखी मिळून मराठ्यांच्या हक्काचा वसूल ११० रुपयांस ३५ रुपये या हिशेबानें. २ निजामअली (वय अजमासें पाउणशें!) यांच्या हयातीपुरता दिला. ते वारल्यावर परत घ्यावयाचा ! ३ ' नबाबास दिला ' म्हणजे कायमचा दिला. ' नबाबाकडे दिला ' म्हणजे तूर्त वहिवाटीस नबाबाकडे दिला. ४ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांचें पत्र कुरुंदवाडाहून मिरजेस बाळासाहेबांस. ५ मिरजेनजीकच्या कुरुंदवाडकरांच्या मळ्यांत शिंद्याचें कवाइती लोक.

आहेत. आपल्याही समजण्यांत आलें अशी जनवार्ता. त्यास कोठून आले, जाणें कोठवर, चिकीर्षित काय, याचा विस्तार लिहिण्याची आज्ञा जाहली पाहिजे. करवीरकर कागलावर जमीयत जमा करिताहेत. पुढें काय होतें पहावें. रवाना छ० १५ जिलकाद. लोक मनस्वी बोलतात. विदित होय हे विज्ञापना.

नं. ३९६६ श्री. (वैशाख व० ७–१८ मे.)

छ० २० जिल्काद. सन सब्बां तिसैन. वैशाख.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेसीं पो नारायणराव वेंकटेश सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल ता॥ छ० २० जिल्काद गुरुवार दुपार जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष. राजमंडळाकडील वर्तमान तरी काल बुधवार रात्रौ हिंमतबहाद्दराचे लेक व नाना पाटणकर मुहूर्तानें निघोन पन्हाळ्याकडे उतरले. वरकड झाडून फौजेस ताकीद जाहली. दोन तोफा बरोबर घेतल्या आहेत. निपाणीवर जाण्याची धोप घातली, परंतु अंतर्गत बातमी इचलकर्जीवरच[1] यावें असें वर्तमान आहे. याकरितां आपण पाईचे लोक शंभर आज रातोरात येऊन पोहोचतसे ताकीद करून पाठवावे. आपणाकारणें गोमांतकी आंबे सुमार वीस २० पाठविले आहेत. पावलियाचें उत्तर पाठवावें. लोक जरूर पाठवावे. निपाणीकडे त्यांचा रोख होऊन गेल्यावर आपले लोक माघारे पाठवून देऊं. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे विनंती. आज दोन प्रहर गुरुवार. हे विनंती.

नं. ३९६७ श्रीगजानन. (वैशाख व० ७–१८ मे.)

पै॥ छ० २५ जिल्काद. सन सब्बां तिसैन.

[2]विज्ञापना. ता॥ छ० २० जिल्कादपावेतों वर्तमान यथास्थित

---

१ घोरपडे, इचलकरंजीकर. २ बाळाजी गणेश जोशी यांचें पत्र मिरजेस पुण्याहून.

असे. विशेष. बाजारी बोलवा आहे कीं, रायाजी पाटील यांचा सरंजाम राजश्री दौलतराव शिंदे याणीं जप्त केला व (गैरमर्जीत) आंणखी दोन असामी आहेत. कांहीं फितुरांत होते असें म्हणतात. मशीर याच्या समजुतीस श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब जाण्याचा बेत होता. प्रस्थान ठेविलें होतें. तेव्हां कांहीं बातमी समजली, त्याजवर राहिले. कोणी वकील वस्त्रें देऊन पाठविणार आहेत. काल छ० १९ जिल्कादीं शिंदे यांच्या डेऱ्यास श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब व आपासाहेब यांची स्वारी गेली होती ती दोन घटका रात्रीस वाड्यांत दाखल जाहली. मशीराच्या समजुतीस राजश्री आबा शेलूकर वगैरे जाणार होते तेही तूर्त राहिले आहेत. शिंदे यास नगरचा किल्ला व दहा लक्षांचा मुलूख देणार असें बोलतात. बाजारी वर्तमान आहे. शिंद्यांकडील बोलण्यास भोंसल्यांकडील वकील होते, त्यांस भोंसले याणीं शिंदे यांजकडे न जाणेंविशीं सांगितलें असेंही बोलतात. एवंच शिंद्यांची व श्री॥ राजश्री नानाची ऐक्यता जाहलीसें म्हणतात. कळावेंकरितां लिहिलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. मशीराची आणखी फौज येणारसी बोलवा आहे. कळावें. हे विज्ञापना.

नं. ३९६८ **श्रीगणराज.** (वैशाख व. ९–२० मे.)

पै॥ छ० २६ जिल्काद. सन सब्बां तिसैन. वैशाख.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून सा॥ नमस्कार विज्ञापना येथील क्षेमतागायत. छ० २२ जिल्काद. यथास्थित असे. विशेष. वडिलीं पेशजी सांडणीस्वार याजबरोबर पत्र पाठविलें होतें व हल्लीं लक्ष्मण खिजमतगार याजबरोबर आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. राजश्री बाबा काळे यांस सखोपंत यांचें वर्तमान नववे दिवशीं कळविलें. इकडील वर्तमान तर अधिकोत्तर ल्याहावेसें नाहीं. राजश्री आबा शेलूकर व रघोत्तमराव ऐसे मशीरनू मुलुक याजकडे जाणार. सरकारांतून आठ लक्षांची जहागीर द्यावी

ऐसें ठरलें आहे म्हणोन बाजारी अफवा आहे. कृष्णाजी शेट्या खिजमतगार नि॥ शिंदे अकस्मात् काल वारला. चांगला माणूस होता. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. " चि॥ सौभाग्यवती सखूबाईच्या समाचारास लक्ष्मण गडी पाठविला आहे, पुढें (आंबेगांवास-भानूंकडे) रवाना करावा, " म्हणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रों आज रवाना केला. सौ॥ बयानें पिकलीं पानें पाठविणेंविशीं सांगून पाठविलें होतें त्याजवरून आज लक्ष्मणाबरोबर पाठविलीं. अमावास्या जाहल्यावर आंबेगांवास बोलाऊं पाठवून येथें आणविणार. तूर्त येथें पाण्याचा कडाड बहुत. हौदांस पाणी नाहीं. नदीवर झरा खणल्यास झऱ्यास येक दिवस पाणी येतें, दुसरे दिवसीं जातें ! ऐसें पाण्याचें देखील संकट पडलें त्याजपक्षीं वरकड काय ल्याहावें ? ऐसीं श्रीनें चहूंकडून संकटेंच आणिलीं आहेत. चि॥ सौ॥ बयास चिकणी सुपारी व बर्फी व फणी हस्तीदंती पाठविली होती. पोंहोंचवून माणसें आलीं. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ३९६९ श्री. (वैशाख व० ९-२० मे.)

यादी. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांच्या लग्नास अहेर. सुरु सन सब्बां तिसैन. मय्या व अल्लफ.छ० २२ जिलकाद. विठ्ठलराव बापू याणीं पुण्यांत सणगें वगैरे घेऊन अहेर केला. त्याचा दाखला.

रुपये.

४४६ सनगें

२७	तिवट पैठणी.	१
१५१॥	शेलाजाफर खानी	१
७५	किनखाप	१
८६	लुगडें पैठणी	१
४॥	खण	१

१ गंगाधर गोविंद पटवर्धन यांची मुलगी गंगाधर गोविंद भानू यांच्या मुलास दिलेली.

१०२	जामेवार जोडी	१	
४४६		६	
५००	शिरपेंच १ गुजारत रायचंद जोहारी.		
९४६			

नं. ३९७० श्री. (२१ मे.)

पै॥ छ० २५ जिल्काद. सन सब्बां तिसैन. वैशाख.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवक धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेऊन शिरसा॥ नमस्कार विनापना तागायत वैशाख व॥ १० पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री कृष्णापा नाईक नरगुंदे ह्यांच्या दुकानची हुंडी दोन हजार रुपयांची चांदवडीची रघुनाथ भुकणदास याचे नांवची पाठविली ती पावली. सावकारास दाखविली. मुदतीस ऐवज घेऊन मागाहून वडिलांस लिहून पाठवितों. शिंदे यांजकडील कृष्णा शेट्या नवज्वर येऊन काल मृत्यु पावला. नगरचा[1] किल्ला शिंदे यांजला सरकारांतून दिला. राजश्री मोरोबादादा यांजला आणावयास हजार स्वार राजश्री बजाबा शिराळेकर याजकडील गेले. त्रिंबकच्या किल्ल्यावर अगर लोहगडावर नेऊन ठेवणार; याजप्रमाणें बाजारबातमी आहे. राजश्री नानाचें व शिंदे यांचें सख्य सत्वर होईल ऐसी बाजार बोलवा आहे. बत्तीस लक्षांची जहागीर नबाबास सरकारांतून दिली अशी आवई आहे. दाणा गल्ला वजन व बट्टयाचा निरख पेशजीच लिहिला आहे. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ३९७१ श्री. (वैशाख व० १०—२१ मे.)

पै॥ छ० २५ जिल्काद. सन सब्बां तिसैन.

---

१ सन १७७८ त नगरच्या किल्ल्यांत कैदेंत ठेविले ते अद्यापि तेथेंच होते.

विज्ञापना. तागायत छ २३ जिल्कादपावेतों सुखरूप असों. विशेष. राजश्री रघुपतराव[1] यांस श्री॥ राजश्री नानांच्या घरीं मेजवानी जाली. निरोप घेऊन गेले. मशीराचे समजुतीस रघुपतराव व आबा शेलूकर व जनार्दन शिवाजी म्हैसकर असे जातात. आठ लक्षांचा मुलूख (मशीरास) माघारा द्यावा असें ठरलें आहे. नगरचा किल्ला शिंद्यास देतात. दौलताबाद मशीरास देणार असें आहे. श्रीमंत राजश्री मोरोबादादा यांस नगराहून काढून लोहगडास आणणार अशी बोलवा आहे. रघुपतराव (यांस) कंठी व शिरपेंच नानानीं दिला. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे विज्ञापना. श्री॥ महाराज छत्रपति सातारा यांची स्त्री देवाज्ञा जाली. (येथें) सरकारचा चौघडा बंद जाला आहे. हे विज्ञापना.

नं. ३९७२ **श्रीगजानन**. (वैशाख व० ११–२२ मे.)

विज्ञापना.[2] तागायत छ० २४ जिल्हाद.यथास्थित असे. विशेष, बाजारी वर्तमान श्रीमंतानीं श्री॥ राजश्री नानांस सांगून पाठविलें कीं, मिरजेस कारकून जाऊन सहा महिने जाहले. अद्याप[3] सरंजाम येत नाहीं हें काय ? त्यावरून राजश्री नाना यानीं दोन हजार फौज पाठवून सरंजामाची जप्ती करावी, मिरजकर सरंजाम देत नाहींत त्यापक्षीं त्यांचें लक्ष तिकडेसच[4] आहे; ऐसें म्हणणें आहे. राजश्री नाना म्हणतात[5] कीं, पांच रुपये[6] तुम्हांकडून येणें, त्यास मी इतके दिवस सांभाळिलें. अद्याप पैसा येत नाहीं. श्रीमंत रागें भरतात. त्यापक्षीं आमचा उपाय नाहीं. ऐसीं बोलणीं पडलीं. बोलणीं पडलीं आहेत म्हणून राजश्री दाजीबांच्याही बोलण्यांत

---

१ नांव 'राजेरघूत्तमराव ' असें पाहिजे. हा मशीरउल्मुलुक याचा कारभारी. २ बाळाजी गणेश जोशी हिपरगीकर यांचें पत्र. ३ परशुरामभाऊंचा हत्ती घोडे उंटें वगैरे सरंजाम. ४ भाऊंकडे. ५ मिरजकरांस म्हणतात. ६ पांच रुपये म्हणजे चार लक्ष रुपये !

आहेसें ऐकतों. एवंच काय ईश्वरनिर्मित आहे नकळे! गढेमंडळ भोसल्यास देणार. भोसले आपले तर्फेने शिंद्यांस देणार. शिंद्यांची नानांची ऐक्यता जाहलीसें म्हणतात. एवंच मशीर मात्र कूच करून गेला. रघोत्तमराव सर्वांचा निरोप घेऊन जात आहेत. येणेंप्रमाणें बाजारी अफवा आहेत. सेवेसीं विदित होय. जप्तीचा मजकूर कालच ऐकला आहे. हे विज्ञापना.

नं. ३९७३ श्री. (२४ मे)

पै॥ छ० १ जिल्हेज. सन सब्बां तिसैन.

श्रीमंत रा॥ बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंति सेवक धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत वैशाख व॥ १३ पावेतों वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें व ऐवजाची हुंडी पाठविली त्याचें उत्तर लिहून पेशजीच पाठविलें आहे. ऐवज मुदतीस घेऊन मागाहून वडिलांस लिहून पाठवितों. गांवामध्यें तांबडे टोळ दोन तीन रोज आले. काल भारी होते. कौलांवर बसले तेथे मिरच्या वाळत घातल्यासारिखें दिसे. कौल खालीं दिसों नये याजप्रों बसले. झाडेंही कोठें कोठें गांवांतील खाल्लीं. टोळ आले सबब सरकारांत शांत करणार आहेत. रोहिणी नक्षत्राचे पांच रोज जाले. अद्याप पर्जन्याचा कांहीं सुमार दिसत नाहीं. अभ्रेंही येत नाहींत. नदीचें पाणी सरलें. आंत विहिरे लोकानीं खणिले आहेत. संगमाचें पाणी लोक आणितात. नळास पाणी कार्याकारण माफकच आहे. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९७४ श्रीगणराज. (वैशाख व० १३-२४ मे.)

पै॥ छ० १ जिल्हेज. सब्बां तिसैन ज्येष्ठमास.

श. १७१९ **बाजीरावसाहेबांची स्थापना.** इ. स. १७९७

[1]विज्ञापना. मशीरनूमुलुकाकडे वस्त्रें वगैरे घेऊन राजश्री दादा गद्रे व आबा शेलूकर, गोविंदराव पिंगळे ऐसे जावयास निघाले. आज कूच जाहलें. रघोत्तमराव बरोबर जाणार ऐसें आहे. शिंदे अलिजाबहादर यांस नगरचा किल्ला दिला. सनदा दिल्या. गढे मंडळ भोसले यांस दिलें. सनदा द्यावयाच्या आहेत. राजश्री मोरोबादादा यांस आणावयास बजाबा शिराळेकर यांजकडील फौज गेली आहे. कोठें ठेवतात न कळे. राजश्री गणेश[2] बाजीराव (यांच्या) पागा अद्याप येथें आहेत. रामदीक्षित माहुलीकर याणीं पागे यांस बहुत निषेध केला. (कीं) बाबाजी विश्वनाथ यास तुम्ही नको म्हटलें त्याजप्रों दुसरा कारकून देतात तो घेऊन यावें. तें मर्जीस येतां दिसत नाहीं. त्यांणी[3] स्पष्ट सांगितलें कीं, बाळासाहेबांवर हा समय, तुम्ही इकडे आलां; लोकोत्तर गोष्ट केली ! निदान मिरजेस गेलां असतां तुमचें कल्याण आहे. येथें राहिलां तर जसें विचारास चांगलें दिसेल तें करणें. ऐसें आमचे वाड्यांत व अपरोक्षही बोलले. कळावें. भेटीच्या[4] उद्योगांत आहेत. कळावें. गणेश बाजीराव याजविशीं लक्ष्मणास विनंति करावयास सांगितलें आहे. त्यानें विनंति केल्यानंतर विदित होईल. श्रुत होय विज्ञापना.

नं. ३९७५ **श्री.** (वैशाख व० १४–२५ मे.)

+ पुरवणी राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं—

विनंती विशेष. करवीराहून काल बुधवारीं संध्याकाळीं बातमीची चिठी आली त्यांत मजकूर खासा स्वारी काल निघण्याचा

---

१ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ कुर्लेकर. हे मिरजकरांचे पोटसरंजामदार मिरजकरांशीं तंटा करून पुणें दरबारांत फिर्यादीस आले होते. ३ दीक्षित याणीं. ४ कुर्लेकर श्रीमंताच्या भेटीच्या उद्योगांत आहेत.

+ पत्र इचलकर्जीकरांचें आहे. पण ' व्यंकटेश ' ही निशाणी पाहिजे ती लिहिलेली नाहीं.

बेत होता. हत्तीवर नौबत देखील घातली होती. परंतु तोरगलाहून राजश्री सेनाखासकील आले त्यांसी स्वारी आडवी जाऊन घेऊन आले. दोन तास रात्रीं गांवांत आले. मनोळीकडील मसलतीस सेनाखासकील यांस सांगून समागमें फौज तोफखाना देऊन रवाना करावे असे दिसतें. काय घडतें पहावें. याप्रों लिहिलें आहे. आपणांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ असों द्यावा हे विनंती. गुरुवार प्रातःकाळ. हे विनंती.

पै॥ छ २७ जिल्काद. सन सब्बां तिसैन.

नं. ३९७६ **श्रीगणराज.** (वैशाख—मे.)

पै॥ छ० १ जिल्हेज. सन सब्बा तिसैन. जेष्ठ.

[1]विज्ञापना. टोळ येथें दोन रोज आले आहेत. एक रोज पातळ होते. एक रोज बहुतच आले. टोळ तांबडे होते. लोकांच्या घरांवर सरकारच्या वाड्यावर वगैरे बसले. सबब सरकारांत टोळा-निमित्य शांत करावी ऐसें (ठरत) आहे. श्रीमंतांची स्वारी वैशाख वद्य १० स शिंद्यांच्या गोटांत गेले होते. एकादशीस श्रीमंत व नाना ऐसे श्रीपर्वतीश्वराचें दर्शनास गेले होते. स्वारी मोठ्या समारंभानें गेली होती.(तेथें) दोन घटका खलबत जाहलें. येणेंप्रमाणें बाजारीं वर्तमान आहे. चि. सौभाग्यवती सखूबाईस आपण मूळ पाठविणार, त्यास अगोदर सूचना कळवावी. म्हणजे आंबेगांवास बोलावूं पाठवूं. येथें चार दिवस राहून मग वडिलांकडेस येईल. माझ्या निरोपाचें होत नाहीं. पैसा खर्चास नाहीं. ईश्वरें ऐसें संकट आणिलें आहे. त्यास वडिलीं खर्चाविशीं व निरोपाविशीं राजश्री बाबूराव म्हैसकर यांस आज्ञा व्हावी; म्हणजे खर्चास देवितील. अकरा रुपयेनी शेकडा कडबा मिळत नाहीं. ऐसें आहे. खिजमतगार वगैरे माणसें येथें आहेत त्यांची नालबंदी पावली नाहीं. तेथील लोकांस नालबंदी पावली

---

१ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पुण्याहून पत्र मिरजेस.

याजकरितां याद लिहून राणू खिजमतगार याजबरोबर पाठविली आहे. त्याजप्रमाणें नालबंदी द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे. जो निरोप सांगणें तो लक्ष्मणाजवळ तोंडजबानी सांगितला आहे त्याजवरून सर्व विदित होईल. खर्चाची ओढ बहुत आहे. तर आज्ञा दाजीबा म्हैसकर यांस यावी म्हणजे ते खर्चास देत जातील. मला आधार वडिलांचे पायांचा आहे. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९७७ **श्रीगजानन.** (वैशाख —मे.)

विज्ञापना.[1] दौलताबादेचा किल्ला मशरिाकडे देणेंचा ठरला. अहमदनगरचा किल्ला राजश्री दौलतराव बाबा शिंदे यांजकडे देणार. महादजी शिंदे यांच्या बायका व रक्षा आल्या. येथून वीस पंचवीस कोसांच्या फासल्यानें आहेत. त्यांजकडे येथील कारभारी याणीं संधान केलें. कंपू सरदारसमेत बायकांच्या कहेंत, त्याजपक्षीं आलिजाबहादर यांची कमती पडते असें दिसतें. कळावें. रायाजी पाटील याची जप्ती करावी हा बेत आहे ऐसी बाजार बोलवा. श्री ॥ राजश्री अमृतरावसाहेब मशीराचे समजाविशीस जाणार ही बोलवा आहे. श्रीमंत गेले असतां श्री॥ राजश्री अप्पासाहेब जाणार ऐसी ही बोलवा होती परंतु तूर्त राहिले असें म्हणतात. विदित होय हे विज्ञापना. राजश्री गणेश बाजीराव भेट घेणार होते. परंतु भेटीस वकिलांनीं हिसका पाडिला ऐसी बोलवा आहे हे विज्ञापना.

नं. ३९७८ **श्रीगजानन.** (ज्येष्ठ शु० २–२८ मे.)

[2]विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १ जिल्हेज रविवासर यथास्थित असे. विशेष. मशीरुलमुलूक याजकडे राजश्री आबा शेलूकर व दादा गद्रे, गोविंदराव पिंगळे, व काळे, जनोबा भाऊ म्हैसकर, ऐसे जावयास निघाले होते. परंतु राजश्री दौलतराव बाबा शिंदे

---

१ बाळाजी गणेश जोशी यांचें पत्र मिरजेस. २ बाळाजी गणेश जोशी यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

अलिजाबहादर याणीं जाऊं नये म्हणोन सांगितलवरून राहिले ऐसी बोलवा. दुसरें, एक दोन रोजांत जाणार ऐसेंही म्हणतात. चवघेजण जाऊन वस्त्रें जवाहीर देऊन आले तर मग यथास्थित. नाहीं तर किंचित लढासा वाटतो. ऐसा प्रकार आहे. देऊर[1] गांव (यास) शिंदे यांच्या कहीनें उपद्रव बहुत केला याजकरितां भोंसले यांजकडील स्वार देऊन भोंसले याणीं रवाना केले आहेत. शिंद्यांकडील ही कांहीं लोक पायदळ देऊराकडे गेले आहेत. कलागत कहीची वाढते किंवा काय होतें पहावें. येणेंप्रमाणें बाजारी वर्तमान आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं ३९७९ श्री. (ज्येष्ठ शु० ५–३० मे.)

पै॥ छ० ५ जिल्हेज. जेष्ठ सन सब्बां तिसैन.

पुरंवणी[2]. सेवेसी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. "कसबे रहिमतपुरचें ठाणें मानाजी शिंदे यांजकडे होतें. हल्लीं दौलतराव शिंदे याणीं घेतलें. त्यास आम्हांकडील सरंजामांतील (तो) महाल; येविशीं (नानांजवळ) विनंती करावी." म्हणोन आज्ञा, त्यास मानाजी शिंदे यांजकडे होतें, त्यास खंडेराव माने शिंदे यांजकडे आहेत त्याणीं दौलतराव यांस सांगोन ठाणें घेविलें. मानाजी शिंदे याणीं सरकारांत बहुत आग्रह केला, परंतु चाललें नाहीं. श्री॥ राजश्री नानास विनंती करीतच आहों. होईल तेव्हां खरें! दौलतराव यांचें म्हणणें 'आपणांस दहा लक्षांची जहागीर देणार त्यांत हा गांव लावून द्यावा.' असें एक वेळ बोलले आहेत. नानांचें तर म्हणणें देवितों[3] असें आहे. घडेल तें खरें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ३९८० श्री. (ज्येष्ट शु० ५–३० मे)

पै॥ छ० ५ जिल्हेज सन सब्बा तिसैन.

---

१ देऊर हा नागपुरकर भोंसल्यांचा इनामगांव. २ बाबूराव म्हैसकर यांचें पत्र मिरजेस. ३ तुम्हांस परत देववितों.

पुरवणी[1] सेवेसीं शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. छ० २३ जिलकादीं श्री. राजश्री नानानीं सांगितलें जे, " श्रीमंतांचा निरोप आला आहे जे, ' भाऊंकडील पागा वगैरे चीजवस्त अद्यापि येत नाहीं. गोविंद बापूजीस जाऊन चार पांच महिने जाले. मिरजकर वोढतात त्या अर्थी मिरजकरांच्या सरंजामाची जप्ती करावी. त्या शिवाय (भाऊंकडील) सरंजाम व असाम्या येत नाहींत. ' असा प्रकार आहे. तुम्हांस तर मोह सुटत नाहीं. आम्हांस असाम्यांचे फडशे व झाडून चीजवस्त घ्यावयाची. तुम्हांस--सरकारचे अपराधी--त्यांचा मोह कांहीं परिछिन्न ठीक नव्हे. मग मजकडे दोष नाहीं. याप्रमाणें मिरजेस लिहावें " म्हणून सांगितलें. त्याजवरून विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९८१ श्री. (ज्येष्ठ शु० ५--३० मे.

पै॥ छ ३ जिल्हेज. सन सब्बा तिसैन. ज्येष्ठमास.

सेवेसीं[2] विज्ञापना ऐसी जे, वेदमूर्ति शंकर[3] जोशी यांस महाराजांनीं दोन हजारांची हुंडी करून पाठविली. चार रोज जाले. पुण्याहून श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब यांचीं पत्रें दादासाहेब[3] याजविशीं महाराजांस हुजरे घेऊन आले त्यांचीं उत्तरें लिहून दिलीं. त्यांतील मजकूर ' आजपर्यंत उपसर्ग लागला नाहीं. व पुढें हरएकविशीं उपसर्ग लागणार नाहीं.' याप्रमाणें लिहून दिलें. महाराजांकडील फौज कालपावेतों कागलच्या नदीवर व कांहीं भिरडीवर होती. आज जतरटचें ठाणें घ्यावयाकरितां जाणार. तें ठाणें घेतलेनंतर मग निपाणीस जाणार. कळावें. महाराजांकडील फडशे चिकोडी शिराळें व दोन[4] लक्ष कर्जाऊ ऐवज व लोकांच्या नागाव्याचे फडशे व्हावयाचे,

१ बाबूराव म्हैसकर वकील याचें पत्र मिरजेस. २ नारो हरी करंदीकर याचें पत्र करवीराहून मिरजेस. ३ नानाफडनविसांचे आश्रित व ज्योतिषी. नानांची मर्जी धरण्याचें हें एक द्वार होतें. ४ कुरुंदवाडकर. ५ महाडास असतां नानानीं करवीरकरांस कर्जाऊ दिले ते. ६ तगादा पत्रें.

यास्तव बचाजीपंत यांस श्रीमंत राजश्री नानाकडील पत्रें येणार. पुण्याहून पत्रें निघाल्याचें वर्तमान वकिलाचें लिहिलें आलें. पत्रें आल्यावर (पुण्यास बचाजीपंत) जातात न जातात हें कळेल तैसें लिहून पाठवीन. याप्रमाणें तूर्त वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९८२ श्री. (ज्येष्ठ शु० ५-३० मे.)

पै॥ छ० ५ जिल्हेज. ज्येष्ठ. सन सब्बां तिसैन.

पुरवणी सेवेशीं शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. मशीरुलमुलुक सिद्धटेंकासच मुक्काम करून आहेत. आज येथून राजश्री रघोत्तमराव गेले. आबा शेलूकर व गोविंदराव काळे व गोविंदराव पिंगळे व दादा गद्रे व चिरंजीव राजश्री जनोबाभाऊ येणेंप्रमाणें आज जाणार. नबाबास बेदरचा स्वराज्याचा अंमल व चौवीस लक्षांची जहागीर येणेंप्रमाणें दिली. सनदा गेल्या. आज निरोप द्यावयास येथील गृहस्थ जातात. नगरचा किल्ला व दहालक्षांची जहागीर शिंदे यांस दिली. गढेमंडळ भोंसले यांस दिलें. स्वामींस कळावें. येथून आबा शेलूकर वगैरे जात होते त्यांस शिंदे याणीं अडथळा केला होता, आपले जाबसाल उरकून द्यावे, मग बोलोन चालोन जावें असें जालें. आज जातात. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. अहमदानगरांतील गृहस्थांस त्रिंबकाच्या किल्ल्यास पाठविणार. हे विज्ञापना.

नं. ३९८३ श्रीगणराज. (ज्येष्ठ शु. ०५-३० मे.)

पै॥ छ० ५ जिल्हेज. ज्येष्ठ. सन सब्बां तिसैन.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून चरणावरी मस्तक ठेवून सिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० ३ जिल्हेज

---

१ बाबूराव शिवाजी म्हैसकर याचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ तेथें मोरोबादादा कैदेंत आहेत त्यांस.

पावेतों सुखरूव असों. विशेष. राजश्री चिंतोपंत लिमये व बाळाजी विष्णु सहस्रबुद्धे व जयरामपंत जोशी यांचा खंडाचा ठराव जाहला. चिंतोपंत रुपये ८५००० व जयरामपंत रुपये ५०००० व बाळाजी विष्णु रुपये २५००० येणे. (प्रमाणें) द्यावे असें ठरलें आहे. त्यांचा ऐवज वस्तवानी वगैरे जें सरकारांत आलें तें (या रकमेंत) मजुरा द्यावें. या प्रमाणें बाजारी वर्तमान आहे. मशीराच्या समजावीसीस आबा शेलूकर व दादा गद्रे व काळे व पिंगळे व बाळोजी कुंजर व जनार्दन शिवाजी म्हैसकर व शिंद्यांकडील राजश्री आत्मारामपंत तांबोळी व होळकर यांजकडील कारकून व भोसले यांजकडील कारभारी ऐसे आज निघोन गेले. कळावें. वडूथ गांव कहीनें लुटला व जेऊर भोसले यांजकडील गांव शिंद्याच्या कहीनें लुटला असें वर्तमान बाजारी आहे. राजश्री नानाचे आरब दहा हजार आले. पुण्यांत दोन हजार दाखल जाहले. बाकी नाशिकास आले. नाशिकापासून खंडणी चाळीस पंनास हजार रुपये घेतले. व शिंद्यांची फौज चाळीस हजार हिंदुस्थानांतून येणार. निघाली ऐसें बाजारी वर्तमान आहे. शनिवारीं रात्रीस तारा मोठा पडला.[1] कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना

सेवेसीं बाळाजी गणेश. साष्टांग नमस्कार विज्ञापना. मशीर परांड्यावर छावणी करणार, आणखी फौज पायदळ जरबा आल्या, म्हणोन बाजारी वर्तमान. शिंद्यांची पलटणें उठणार म्हणतात. घडेल तें खरें ! विदित होय हे विज्ञप्ति.

नं. ३९८४[2] **श्रीगणराज.** (जेष्ठ शु० ८—२जून)

पै॥ छ १० जिल्हेज. सन समान तिसैन. ज्येष्ठमास.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना.

---

१ शनवारच्या वाड्याभोंवती पहाऱ्यावर आहेत तीं. २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पुण्याहून मिरजेस पत्र.

येथील क्षेम तागायत छ० ६ जिल्हेज यथास्थित असें. विशेष. श्रीमंत राजश्री उभयतां साहेबांची स्वारी छ० ४ रोजीं वडगांवच्या बागेस गेली होती. आठ घटका रात्रीस वाड्यांत आली. छ० ५ रोजीं बुधवारीं कोथरूडच्या बागेंत स्वारी गेली होती. वडगांवच्या बागेस गेले ते दिवशीं बाबा फडके परभारे बागेंत आले होते. स्वारीबरोबर त्रिंबकराव भाऊ परचुरे व पेठे व दाजीबा फडके यांचे चिरंजीव व खाजगीवाले व बिनीवाले ऐसे होते. छ० ६ रोजीं गुरुवासरीं रोहिणी नक्षत्राचा पर्जन्य पडावयास प्रारंभ जाहला. अंगणातील धुराळा मात्र भिजला. पाणी प्यावयास देखील मिळत नाहीं. ऐसें पाण्याचें संकट आलें आहे. थोरले नदीचें पाणी दोन माकणी घालून पाणी आणतों. ऐसें आहे. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९८५ श्री. (जेष्ठ शु० ११–५ जून)

पै॥ छ० ११ जिल्हेज. सन समान तिसैन.

विज्ञापना. तागायत छ० ९ जिल्हेज. अमदानगरचा किल्ला अद्यापि शिंदे यांचे हस्तगत जाहला नाहीं. श्री॥ राजश्री नाना यांचे बेलबागेचे वाड्यापुढें चौकीचे आरबांस छपरबंदी जाहली. येणें प्रमाणें बाजारी वर्तमान आहे. भोंसले कूच करून जाणार असें बोलतात. सरकारच्या वाड्यापुढें शिंद्याचे लोक आहेत त्यांस सरकारांतून छपरबंदी करवून देविली. सेवेशीं विदित होय. हे विज्ञापना.

नं. ३९८६ श्री. (जेष्ठ शु० १३–७ जून)

पै॥ छ० १५ जिल्हेज. सन समान तिसैन. जेष्ठ.

सेवेसीं बाबूराव शिवाजी म्हैसकर. दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ जिल्हेजपावेतों स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. हल्लीं पांडुरंगपंत

१ बाळाजीपंत जोशी यांचें पत्र मिरजेस.

ढमढेरे यांची एक महिन्याच्या मुदतीची मनाचिठी पाठविली, त्यास एक महिन्यांत कारकून यावे असा करार करून राजश्री बापूजीपंत परचुरे यांस व राजश्री जनार्दनपंत लागू यांस द्यावयाची आज्ञा व्हावी. खटावाविशींची मनाचिठी घेऊन पाठविणेंविषयीं आज्ञा, त्यास श्रीमंत कैलासवासी रावसाहेबांच्या आज्ञापत्राची नकल पाठविली, त्यास याप्रों पत्र दिलें नाहीं असें येथील म्हणणें. त्यास गांवकरी यांस ताकीद करून ऐवज देवावा, असें म्हणणें आहे. त्यास मागील वसूल कोणीकडे जमा आहे, हा मजकूर कसा आहे, ही माहीतगारी मला नाहीं, व स्वामींच्या पत्रांतही समजे असें नाहीं. त्यास समजे असें ल्याहावयाची आज्ञा व्हावी. खटावावर वरात वाकनिसास दिली आहे. ते नित्य पुसतात जे ' वरातेचे रुपये देवावे, ते तुमचे यजमानानीं दिकत केली आहे. त्यांस तुम्हीं लिहून पाठवून ऐवज देवावा; म्हणून नित्य कारकून येतात. असा प्रकार आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. येथील प्रकार तर नवल विशेष नाहीं. राजश्री आबा शेलूकर व उभयतां गोविंदराव काल मशीरमुलुक याच्या लष्करांतून आले. राजश्री दादा गद्रे अहमदनगरांतील गृहस्थास काढून त्रिंबकच्या किल्यास आणावयाकरितां नगरास परभारांच मशीराचे लष्करांतून गेले. चिरंजीव राजश्री जनोबा भाऊ अद्यापि[1]

नं. ३९८७ . श्री. (जेष्ठ शु० १४-८ जून)

पै॥ छ० १२ जिल्हेज. सन समान तिसैन. जेष्ठ.

[2]सेवेशीं विज्ञापना ऐसी जे, इकडील वर्तमान तर राजश्री रत्नाकरपंत काल आवशीचे दीड प्रहर रात्रीस निघोन संवदलगेस गेले. गांवावर हल्ला केली. गुरें वगैरे लुटलीं. पांढरे यांजकडील चार पांच भले लोक ठार जाहले, व आठ दहा जखमी जाहले. वरकड लष्क-

---

१ पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें. २ नारो हरी करंदीकर वकील यांचें पत्र करवीराहून मिरजेस.

रचें माणूस पंधरावीस पर्यंत जखमी जाहलें. ठाणें अद्याप आलें नाहीं. आज पांढरे यांजकडील गडी लष्करांतून आला, तो कारकुनाजवळ सांगत होता जे लहान तोफा दोन लष्करांत आहेत त्यांचे बार काढीत असतां आवाज होत नाहीं. तोफा धुवून फिरोन भरल्या तरी आवाज होत नाहीं, असें सांगत होता. मी ही जवळ होतों. श्रीमंत राजश्री शिवराव सुभेदार कुरुंदवाडकर यांजकडील कारकून करवीरास राजश्री बाळाजीपंत माणगांवकर आले आहेत. कारण सुभेदार यांजकडील पागा महाराजांकडे चाकरीस घेऊन यावें. बोलणें राजश्री रायाजी जाधव सरनोबत यांचे विद्यमानें बोलत आहेत. वरकड त्यांचें चित्तांतील अर्थ काय असतील ते ते जाणोत! शिरगुरास ठाणें हवाली करणेंबद्दल रोखा लष्करांतून होऊन शेंपन्नास लोक गेले आहेत. ठाणें हवालीं करितात, किंवा लढतात हें पहावें. शिरगूर संवदलगेकरांकडीलच गांव आहे. राजश्री भोंसले[1] याजकडून महाराजांस वस्त्रें कारकून घेऊन आला होता. काल अस्तमानीं वस्त्रें महाराजांस दिलीं. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. महाराजांची स्वारी बुधवारीं निघणार होती, परंतु संवदलग्याचा उलगडा होईतोंपर्यंत तहकूब जाहली. कळावें हे विज्ञापना.

नं. ३९८८ श्री. (जेष्ठ शु० १४–८जुलै.)

पै॥ छ० १२ जिल्हेज. सन समान तिसैन.

सेवेशीं नारो हरी करंदीकर दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना तागायत छ० १२ जिल्हेजपावेतों यथास्थित असे. विशेष. राजश्री जोशीराव यांस पत्र होतें तें प्रविष्ट करून गोदंती हरताळाविषयीं विचारलें. त्याणीं एक दोन रोज शोध केला परंतु मिळालें नाहीं. पुस्तकाविशीं पहिलें पत्र स्वामीं कडून आलेलें घेऊन पाठविलें आहे. पावेल. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ नागपुरकर.

नं. ३९८९ श्री. (१२ जून.)

पै॥ छ० २० जिल्हेज. ज्येष्ठ मास. सन समान तिसैन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं. विनंती सेवेशीं. बाळाजी केशव कृतानेक साष्टांगनमस्कार विनंती विज्ञापना येथील कुशल तागायत ज्येष्ठ व॥ ३ मुक्काम करकंबें येथें स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. मशीरुलमुलूक याचें लष्कर भीमातीरानें येणार निश्चयें, म्हणून सिद्धटेंकच्या मुक्काहून बातमीची पत्रें आलीं. त्याजवरून रखवालीचा वगैरे बंदोबस्त करावयाकारितां छ० ६ जिल्हेजीं राजश्री रामाजी मल्हार यांस रवाना केलें. ते मौजे खेड येथें जाऊन पोंचले. सिद्धटेंकाहून लष्कर ही तेथेंच आलें होतें. राजश्री गोविंदराव काळे, व पिंगळे व शिंदे व भोंसले यांजकडील वकील व दादा गद्रे ऐसे मशीरुलमुलुक यांस मेजवानी, हत्ती व घोडे व वस्त्रें व जवाहीर घेऊन आले होते. त्यानीं सिद्धटेकाच्या मुक्कामीं देऊन तेथेंच निरोप घेतला. राजश्री जनार्दनपंत भाऊ म्हैसकर ही आले होते. ते आपल्या कामामुळें खेडच्या मुक्कामास आले. त्यांची व रामाजीपंताची भेट जाहली. त्यांच्या विद्यमानें मशीरुलमुलुक याची भेटी घेतली. त्यांची यांची पहिली ओळख हीहोती. मार्गाच्या पाणीयाचें विचारिलें. याणीं सीनेस पाणी आहे व पुढें खैरानदीसही पाणी आहे म्हणून खातरजमेनें सांगितलेवरून त्याणीं उत्तर केलें कीं, तुम्ही तालुक्यामुळें[1] सांगत असाल. यानीं उत्तर केलें कीं, पाणी आहे. याची बातमी आमची खातरजमेनें आहे. आपण ही बातमी आणवावी. तेव्हां त्याणीं उत्तर केलें कीं, जासूद बातमीस गेले आहेत. आम्हांस मोहरीचे घांटानें जावयाचें जरूर. निलंगेच्या पिरास मानत कबूल केली आहे. तेथें जावयाचें तें

---

१ आपला तालुका खराब होईल म्हणून दुसऱ्या मार्गानें लष्कर लावून द्यावें या हेतूनें.

भीमातीरानें गेलें असतां फेरा पडतो. यास्तव मोहरीचे घाटानें जावयाचें. पाणीयाचा सुमार दिसेल तसें करूं. सुगांवच्या मुक्कामीं बातमी येईल. तेथें निश्चय होणें तो होईल. या प्रमाणें बोलणें जाहलें. दुसरे दिवसीं कूच होऊन सुगांवच्या मुक्कामास आले. त्या मुक्कामीं परांडेकरांचें पत्र, सीनेस व खैरानदीस पर्जन्य पडोन पाणी आलें म्हणोन आलेवरून त्या मार्गें गेले. जनार्दनपंत भाऊ ही सुगांवच्या मुक्कामास आले होते. तेथें निरोप घेऊन पुणीयास गेले. परांडेकरांकडे (आमचा) ऐवज येणें, परांडेकरानीं फौजेचा शह जातांच गोष्ट लांबणीवर टाकिली, हा मजकूर जनार्दनपंत भाऊच्या विद्यमानें मशीरुलमुल्क यांस सांगितला. त्यानीं राजश्री रघोत्तमराव यांस सांगितलें जे, परांडेकरांस ताकीद करून यांचा फडशा करून देवविणें. तेव्हां रघोत्तमराव याणीं सांगितलें जे, सीनेच्या मुक्कामास चलावें. तेथें परांडेकर ही येतात. रुबरू ताकीद करतों. त्याजवरून करमाळ्याचे पूर्वेस दोन कोस सीनातीरीं मुक्काम जाहला तेथें गेले. तों पर्जन्य पडला. सांगावयास गांठ पडली नाहीं. पुढील मुक्कामास चलावें म्हणून सांगितलेवरून पुढील मुक्काम नजीक खरडें दोन कोस खैरा नदीतीर येथें जाहला तेथें गेले. त्या मुक्कामीं परांडेकरांस बोलावून आणून रुबरू निक्षून ताकीद केली. वाजवी ऐवज गेला असेल त्याचा फडशा करून देणें. त्याणीं मान्य केलें. नंतर रामाजीपंत निरोप घेऊन आले. छ० १६ जिल्हेजीं येथें पावले. लष्कर त्या मार्गें गेलें. ईश्वरें मोठें अरिष्ट निवारण केलें! ज्या मार्गें लष्कर गेलें त्याची रखवालीही घेतली असतां तसनस व्हावयाचा तो जाहला. गांवांतील घरें देखील मोडून नेलीं आणि रखवाली पडावयाची ते पडली! याप्रमाणें तिकडील वृत्त जालें. श्री कृपेनें इकडील अरिष्ट गेलें. मोठी गोष्ट जाहली अरिष्ट मोठें होतें. स्वामीच्या कृपावलोकनें निवारण जाहलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

याचे दिवस नाहींत. या दिवसांत नाकाशिंकणीचीं झाडें वाळतात. स्वामीस तो रसाचे जरूर प्रयोजन, यास्तव जासुदासमागमें ष्यादें देऊन बहुत प्रयत्नेंकरून पाला मिळवून, आपण लिहिल्याअन्वयें रस काढून शिसे भरून व चोंथाही पाठविला आहे. या रानांत झाडें थोडीं आणि रस ही थोडा निघतो. त्यामुळें चार दिवस अधिक लागले. जासुदानें मेहनत चांगली केली. सदैव पत्रीं सांभाळीत असावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९९३ श्री. (ज्येष्ठ व० १०–१९ जून.)

पै॥ छ० २४ जिल्हेज. सन सब्बा तिसैन. जेष्ठ

सेवेशी नारो हरी करंदीकर दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना तागायत छ० २३ जिल्हेज इंदुवासरपावेतों यथास्थित असे. विशेष. पेशजी जासूद याजबरोबर घोडगिरीकरांस ताकीद व रहदारीचें दस्तक पाठविलें तें सेवेसीं पावलेंच असेल. हल्लीं एकमनमुरडीच्या ठाणेदारास–राजश्री जिवाजी यादव हवालदार यांजकडे ती मामलत आहे, त्यांचें पत्र हुजूरच्या आज्ञापत्राबरोबर घेऊन पाठविलें आहे. कारण लागल्यास ठाणेदाराकडे पाठवावें. अंकलीकर सुताराविशीं आज्ञापत्र उदगांवकरांस घेऊन आज जासूद सुतारास आणावयासीं पाठविला आहे. सुतार आला म्हणजे सेवेसीं पाठवून देतों. आज्ञापत्राची नक्कल सेवेशीं पहावयास पाठविली आहे. श्रीमंत महाराज याणीं सुतार हवालीं करावयासीं दोन तीन वेळां दिक्कत घेतली. कारण जे, ' सुतारास नेऊन तसदी कराल यास्तव, तेव्हां महाराजांस विनंती केली कीं, सुतारास हवालीं करावयाची आज्ञा व्हावी. सुतारास तसदी होणार नाहीं. त्याचें काय बोलणें असेल तें वाजवी पंचमतें बोलून घ्यावें. तेथें ठरेल त्याप्रमाणें सुतारानें वर्तणूक करून रहावें. त्यास याप्रमाणेंच सुताराची खातर-

१ पत्र करवीराहून मिरजेस.

जमा करून सुतार न्यावा. त्याजवर (मी) उत्तर केलें कीं, " सुताराचा कारभार तो किती आणि खातरजमा वगैरे इतकें कारण नाहीं. स्वामींजवळ बोलतों हीच खातरजमा. आज्ञेप्रमाणें परागंदा होऊन सुतारानें खटला केला, यास्तव त्यास तगादा लागणार नाहीं. सुताराकडून अंतर पडलेंच आहे. परंतु तो ही पदरचा रयत आहे. चिंता नाहीं. या प्रमाणें महाराजांची खातरजमा करून सुतार हवालीं करावयाचें आज्ञापत्र घेऊन सुतारास आणावयासीं पाठविला आहे. आल्यावर सुतार सेवेशीं पाठवीन. सुतारास अन्याय माफ करून त्याचें काय भाऊपणाचें बोलणें असल्यास पंच नेमून देऊन वाजवी मनास आणावयाची आज्ञा व्हावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. निंबाजी यादव याजकडील पत्र उदईक पाठवून देतों. हे विज्ञापना.

नं. ३९९४ श्री. (ज्येष्ठ व० ११–२० जून)

पै॥ छ२४ जिल्हेज. सन सबां तिसैन. ज्येष्ठ.

[1]सेवेसीं विज्ञापना ऐसी जे. संवदलग्याचें ठाणें काल सायंकाळीं हस्तगत जाहलें. राजश्री हिंमतबहादर यांजकडील लोक पंचवीस व निशाण व एक कारकून गेले. ठाण्यांतील लोक हत्यार पात्यारेंसुद्धां सोडावे. वरकड चीजबस्त व गुरें व गुळेंकरी यांस सोडीत नाहींत. लुटणार ! शिवाय गुळेंकरांत मातबर चांगल्या असाम्या सांपडतील त्या कैद करून खंडणी घ्यावी असा बेत आहे. ठाण्यांतील मातुःश्रीस एक खेडें रहावयासीं द्यावें. ठाणें हिंमतबहादर याजकडे असावें. (असें ठरलें आहे) ठाण्यांत फार लोक गेल्यानें ठाण्यांतील चीजबस्तीचा बंदोबस्त ठीक राहणार नाहीं, यास्तव लोक आंत फार जाऊं दिले नाहींत. आज उद्यां तेथील गुंता उरकून मिरडीकडे जाणार असा रोंख आहे कोणीकडे जातात पहावें. तूर्त फौज माघारी

---

१ नारो हरी करंदीकर याचें पत्र मिरजेस करवीरकरांच्या लष्करांतून.

(करवीरास) येत नाहीं हें खाचित आहे. कळावें. आणखी आढळेल तें वरचेवर सेवेसीं लिहून पाठवीन. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९९५ श्री. (२० जून.)

पै॥ छ० २७ जिल्हेज. सन समान तिसैन. ज्येष्ठ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत ज्येष्ठ वा। ११ मंगळवार सायंकाळ प्रहर दिवस पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. गोदंती हरताळ वडिलीं लिहिल्याप्रमाणें मिळत नाहीं. दोन चार जागां आहे त्यामध्यें चांगला पाहून संजाईत घेऊन पाठवितों. भोंसले याणीं श्रीमंतांस मेजवानी केली व होळकर यांजला ही केली. नानांकडे भोसले यांजला मेजवानी जाहली. सरकारांत ही भोसले यांजला मेजवानी होऊन निरोप जाहला. तीन रोज जाले. शिंदे यांजकडील मात्र मेजवानी परस्परें होणार आहेत त्या जाहल्यावर भोसले कूच करून जाण्याचे बेतांत आहे अशी बोलवा आहे. इकडे एकवेळ पाऊस लागून पाणी जाहलें. अलीकडे पाऊस लागत नाहीं. मावळांत व देशांमध्यें इकडे पेरण्या अद्यापि होऊं लागल्या नाहीं. पर्जन्य नाहीं. लष्करचा उपद्रव भारी, यास्तव कडबा आज दरसद्दे रुपये १६ व गवत शेंकडा रुपये ६॥. प्रमाणें भाव जाहला आहे. दिवसेंदिवस महाग वैरण होत आहे. एक दोन रोजानीं सत्रांचा भाव होतो. वैरण नाहीं, सबब महागाई झाली. शहाजी खिजमतगार याजबरोबर पत्र पाठविलें त्याचें उत्तर त्याजबरोबर लिहून पाठवितों व हर्ताळ ही पाठवितों. कागद गढ्या तीस पर्यंत पाहून घेतल्या. बाकीच्या सुमार पाहून घेत आहें. वडिलीं उंटें बुरणुसासुद्धां पाठवावयास आज्ञा चार उंटांस करावी. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९९६ **श्रीगणराज.** (ज्येष्ठ व० ११–२० जून.

पै॥ छ० २७ जिल्हेज. सन समान तिसैन. ज्येष्ठ.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल जाणून तागायत छ० २४ जिल्हेजपर्यंत मुक्काम पुणें सुखरूप असों. विशेष. आजच प्रातःकाळीं सरकारचे हुजरे आले होते. येऊन वाडा पाहून सांगून गेले कीं, "शिंदे यांजकडील कंपू सरकारचे वाड्यासभोंवता आहे त्यास पर्जन्यकाळचें रहावयासीं दोन महिने पुढील चौक रिकामा करून देणें. तुम्ही मागील दारचे चौकांत राहणें." याजप्रमाणें बोलून गेले. राजश्री बाबूराव शिवाजी बाहेर गेले होते ते आल्यावर त्यांच्या कानावर घातलें. बंदोबस्त करितों म्हणून बोलिले. येथें आमची खर्चाची वोढ भारी आहे म्हणोन वारंवार लिहितों, त्यास येथील मजकूर राजश्री बाळाजी गणेश समक्ष विनंती करितील. जाजती पैसा किमपि खर्च करीत नाहीं. धारण महाग. कडबा बारीक पेंडी पंधरा रुपये व थोर सतरा अठरा याप्रमाणें सांगतात परंतु समयास मिळत नाहीं ! कोणी चोरून ठेविलेला तो चोरून विकितात.

जोरी	हरबरे	बाजरी
ϭϭ२।=।	ϭϭ२।ϭ≡	ϭϭ२।
ϭϭ२॥		ϭϭ२।=

तुरींची डाळ,	हरभाऱ्याची डाळ,
ϭϭ१॥।·	ϭϭ१॥·

तांदूळ आंबे मोहोर	काळे साळीचे	तूप
ϭϭ१।=	ϭϭ१॥।	ϭϭ१।
ϭϭ१!	ϭϭ१॥।=	ϭϭ१।९

धारण याजप्रमाणें आहे. माळवें ही महाग भारी. कारण समुदाय भारी व पर्जन्य नाहीं. व खेडेगांवांत कहीचा उपद्रव. लुटून नेतात. याजकरितां विनंती लिहिली आहे. येथें आतां कोणी एक पैसा

देत नाहीं. खर्च चालिला पाहिजे. आपणांकडून समयास पैसा येत नाहीं, व (येथून मला) निरोपही होत नाहीं, तेव्हां कसें करावें ? शहाजीबरोबर पत्र आलें त्यांत वडिलांनी पर्जन्याचा मजकूर लिहिला त्याजप्रमाणेंच इकडे आहे. नदीस पाणी आलें याजमुळें पाणी मात्र मिळतें. येथें लांकडें जळाऊ दरखंडीस रुपये १७।१८ प्रमाणें आहेत. हुसेन सरकार चाकरीस उपयोगी चांगला आहे. दोन चार वेळां चाकरी चांगली केली. याची असामी सांडणिस्वारांत घालावयाची आज्ञा व्हावी. हुसेनास खर्चास रुपये ४ दिले आहेत. छ० मजकूरचा दाणा दिला आहे. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९९७ **श्रीगणराज.** (ज्येष्ठ व. १३–२२ जून)

पै॥ छ १ मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागायत छ० २६ जिल्हेजपर्यंत मुक्काम पुणें सुखरूप असों. विशेष. छ० २५ रोजीं भोंसले यांस मेजवानी शिंदे यांजकडे जाहली. राजश्री नाना गेले होते. शिंदे यांजकडून भोंसले यांची स्वारी राजश्री आप्पा बळवंत व राजश्री दादा गद्रे यांजकडे आली होती. होळकर यांजकडे (त्यांस) मेजवानी होणार आहे. राजश्री मोरोबा दादा यांस आणावयास राजश्री दादा गद्रे यांजकडील कारकून व राजश्री जनार्दनराम यांची पागा व दुसरे कांहीं लोक जाणार अशी बाजार आवाई आहे. पर्जन्य अजून नाहीं. कडबा दरसदे सतरा अठरा (रुपये) सांगतात. सळईपंचोत्री नाहीं. बुट्टा सांगतात. परंतु हजार पांचशें एकठाणा मिळत नाहीं ! एकदांच महिना दीड महिन्याची बेगमी घ्यावी तर पैसा नाहीं. कालची धारण आज नाहीं. दिवसेंदिवस चढ आहे. अशी सर्वत्र जिनसांचे धारणेस

१ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पुण्याहून मिरजेस पत्र.

चढ आहे. पर्जन्य नाहीं याजमुळें भाजीही मिळत नाहीं. काल शिंद्यांकडे भोंसले भेटीस गेले तेव्हां शिंद्यांच्या लष्करांत राजश्री नानाची स्वारी गेली होती. कळावें. भोसल्यांस सरकारचा निरोप जाहला. भोंसले दरकूच जाणार याप्रमाणें बाजारी वदंता आहे. जेव्हां जातील तेव्हां खरें ! पृथ्वीचा भोग सरेल तेव्हां लष्करें ही जातील. व राज्यही स्वस्थ होईल. परवां सरकारचा कारकून येथें आला होता त्याची विनंती लिहिली आहे त्याजवरून कळेल. येथें दरबारांत लहान मनुष्याची चलती ! एकादा लहान मनुष्य सरकारांत बोलिला कीं, वाडा व पागा रिकामी आहे म्हणोन सांगितलें म्हणजे तितक्यावरूनच खातरजमा सरकारची होते ! याप्रमाणें तर येथील मजकूर आहे. कळावेंकरितां सविस्तर विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९९८ श्री. (२२ जून)

पै॥ छ० १ मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत ज्येष्ठ वद्य १३ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री मोरोबा दादांस गद्रे आणावयास गेले ते रिकामे फिरोन आले. मागती शिंद्यांकडील विठ्ठलपंत निसबत बाणाजी याजपाशीं खलबत होऊन काल ब॥ १२ बुधवारीं राजश्री बजाबा शिराळेकर याजकडील स्वार व सरकार पागा व शिराळेकर याजकडील गृहस्थ असे दादास आणावयास रवाना जाहले. कोठें आणून ठेवितात हें पुरतें बाजारबोलवेमध्यें समजण्यांत आलेवर मागाहून लिहून पाठवितों. शिंदे यांजकडे काल राजश्री नाना गेले होते. एक प्रहरानंतर स्वारी (परत) आली. भोसले यांजला मेजवानी काल राजश्री गोविंदराव

काळे यांजकडे जाली. शिंदे यांजकडील मेजवानी परस्परें व्हावयाची आहे. शिंदे यांचें व नानांचें दर्शन चैत्र मासापासून नवतें ते शिंदे नानाकडे आले, नाना काल त्यांजकडे गेले, याजप्रमाणें जाहलें. इकडे पर्जन्य नाहीं. पाणी मात्र तूर्त जाहलें. पागा व वाड्याचा[1] पुढील चौक सरकारांत तूर्त दोन मास पर्जन्य काळचे लोक रहावयास मागतात. ' मागील चौकांत तुम्ही रहावें, पुढील चौक द्यावा याजप्रमाणें (बोलण्यास) सरकार हुजरे आले होते. मग राजश्री जनार्दनपंत सरकारांत जाऊन बोलोन आले. तूर्त तगादा नाहीं. 'मळा घोरपडीचा शिंदे यांजकडे आहे तो त्यांजकडून घ्यावा, शिंदे देशीं गेल्यावर मग हातास येण्यास दिरंग लागेल' असें उभयतां वकिलांस सांगत आहें. त्यांत राजश्री जनोबा बोलले कीं, ' उतावळी करितां ठीक नाहीं. कांहीं दिसांनीं मळा ही घेतों. नानांचें शिंदे यांचें बोलणें अलीकडे होत आहे. आम्हांस स्मरण आहे' असें बोलले. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ३९९ **श्रीगणराज.** (ज्येष्ट व० १३–२२ जून.)[2]

पै॥ छ० २ मोहोरम. सन समान तिसैन. आषाढ.

अपत्यें विठोबानें दोनीकर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ जिल्हेजपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. इकडील मजकूर तर काल श्रीमंत राजश्री बाबासाहेब व आप्पासाहेब यांची स्वारी बागेंत गेली होती. व नानांची ही स्वारी तिसरे प्रहरीं शिंदे यांजकडे गेली होती. याजप्रमाणें येथील वर्तमान आहे. स्वारी ही उभयतांची अस्तमानीं आली. कळावें. इकडे हा कालपर्यंत पावसाचा बिंदु नाहीं. पुढें ईश्वर काय करतो

---

१ सांगलीकरांच्या वाड्याचा पुढला चौक. २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस पत्र.

न कळे. ईश्वर इच्छा प्रमाण ! भोंसलेही आपले देशास जाणार या प्रमाणें बाजारी वदंता आहे. कळावें. सरकारचे कारकून व जासूद वाडा व पागा पहावयास आले होते, म्हणोन वडिलांस कळावें करितां पेशजी मी व दाजीबांनीं विनंती लिहिलीच होती, त्याजवरून कळलेंच असेल. येथें कोणचे ही गोष्टीचा बंद नाहीं. कळावें. सरकारच्या वाड्यांतील हौदास पाणी भरावयाकरितां हुजरे यांच्या बायकांस व त्यांच्या कुळंबिणी यांस सरकारची परवानगी नूतन जाहली. त्यांत लबाडी करून दोन चांभारणी ही पाणी भरावयास गेल्या होत्या त्याही वाड्यांतच सांपडल्या. नंतर चौकशी होत होती. त्यांचें शासन सरकारातून करणार, याप्रमाणें बाजारी वदंता आहे परंतु तथ्यांतच आहेसें वाटतें. याप्रमाणें बेबंद आहे. कळावें. शहाजी-बरोबर विनंती लिहिली आहे त्याची आज्ञा यावी म्हणजे त्या प्रमाणेंच वर्तणूक करीन. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. आणखी ही आढळेल तें वरचेवर सेवेशीं लिहून पाठवितों. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४००० श्रीगणराज. (ज्येष्ठ व० १४–२२जून.)

पै॥ छ० २७ जिल्हेज. सन समानतिसैन.

विज्ञापना. छ० २३ जिल्हेजीं सायंकाळीं भोसले यांस सरकार वाड्यांत मेजवानी जाहली. चार घटका रात्र जाहली. खाशांस मात्र वस्त्रें चार पांच असामींस दिलीं. बाकी उभयतांकडील कारकून देऊन राहुटीस वस्त्रें पावतीं केलीं. भोसले आले तेव्हां शिंदे यांजकडील करोल व पठाण मिळोन हजारपर्यंत श्रीमंतांजवळ उभे होते. व वाड्या भोंवती दोन हजार स्वार व चार तोफा नव्या आल्या होत्या, व कंपू बाहेर तयार होता ! राजश्री नाना वाड्यांत गेले होते. रा. नानानीं भोसले यांस मेजवानी छ० २१ जिल्हेजीं

१ ब्राह्मणांच्या–खुद्द सरकारच्या वाड्यांतल्या हौदांत–चांभारणी पाणी भरतात ही बेबंदशाही ! २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पुण्याहून मिरजेस पत्र.

बागेंत केली. ज्येष्ठ व॥ १० इंदुवारीं वाड्यांत कोटिहोमास प्रारंभ जाहला. वेदमूर्ति राजश्री गोविंद भट गाडगीळ श्रावण मासाकरितां चिरंजीवसुद्धां येथें आले. वाड्यांच उतरले होते. त्यांस सांगितलें कीं, तुमचें येथें रहावयाचें प्रयोजन नाहीं. बिऱ्हाड दुसरे जागीं करावें. त्याजवरून ते उभयतां दुसरे जागीं जाऊन राहिले. वडिलांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. भोसले यांस काळे, पिंगळे, शेलूकर, गद्रे, यांजकडे मेजवानी होणार असें आहे. सन सीत तिसैनचे झाडे राजश्री बाळाजी गणेश यांजबरोबर पाठविले आहेत, त्यास पथकाकडील माणसांचे हिशेब द्यावयाची आज्ञा व्हावी. सबां तिसैनचे झाडे मागाहून पाठवून देतों. जी विनंती करणें ती बाळाजी गणेश यांस करावयास सांगितली आहे त्याजवरून इकडील मजकूर विदित होईल. कळावेंकरितां विनंती लिहिली. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४००१ (जेष्ठ +व० १४–२३ जून)

धोंडो बापूजी जोशी याचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. पै॥ छ० २७ जिल्हेज.

" शिंद्यांचें व नानाचें मिटावें येविशीं आठ पंधरा रोज मध्यस्थ बाणाजी हुजरे वगैरे पडोन शिंदे नानाचे वाड्यांत भौमवारीं आले. तेथें आठ चार घटका बोलणें होवोन जाबसाल मिटणेंत येवोन नानानीं वस्त्रें व जडावाची पोंहोंची शिंदे यांस दिली. नंतर शिंदे वाड्यांत जाऊन श्रीमंतांस कुरणीस करून माघारे गेले. सवेंच दुसरे रोजीं भोंसले याणीं श्रीमंतांस मेजवानी केली. भोंसले आमंत्रणास येणार तेव्हां शिंद्याच्या चौक्या वाड्यासभोंवार आहेत त्या उठाव्या, नंतर वाड्यांत भोंसले याणीं जावें, असें होतें. परंतु चौक्या न उठत, तेव्हां पुढील दिल्ली दरवाजाच्या चौकांतील मात्र चौक्या काढवून भोंसले आंत

---

१ हरिपुरकर. + पत्रावरची तारीख व मिति पैवस्तीची.

जाऊन आमंत्रण केलें. सायंकाळीं सरकारची स्वांरी भोंसले यांच्या येथें जावी इतक्यांत श्रीमंतांनीं शिंद्यांस सांगोन पाठविलें. तुम्हीं सरंजामसुद्धां यावें म्हणाले. तेव्हां शिंद्यांचें उत्तर आलें, ' आम्ही येत नाहीं, आपण जावें. ' त्यावरोन श्रीमंतांच्या चित्तांत काय भासलें न कळे, जाणेंचा अनमान जाला ! नंतर शिंद्यानीं दोन तीन हजार फौज व पलटणें व तोफा सर्व सरंजाम पाठवून बंदोबस्त केला तेव्हां स्वांरी निघाली ! इतका बेत होईपर्यंत सूर्यास्त जाला. दोन प्रहरीं जाण्याचा बेत होता ते या संशयाखालीं अस्तमान जाला ! नंतर स्वारी जाऊन वरचेवर वस्त्रें व जवाहीर व चौघांस चार हत्ती व चार घोडे याप्रमाणें भोंसले याणीं दिलें तें घेऊन खासा स्वारी माघारी आली. नाना मागें राहून सर्व मानकरी यांस वस्त्रें देऊन चौदा घटका रात्रीस नाना घरीं आले. याप्रमाणें मजकूर जाहला. नंतर काल नानानीं भोंसले यांस मेजवानी केली. दशमीस सरकारांत भोंसल्यांस मेजवानी होणार. उपरांत भोंसले यांचें कूच, व शिंद्यांचाही कंपू जावा, सडे शिंद्यानीं रहावें, असा प्रथम बेत होता; परंतु हल्लीं कंपू सुद्धां चार सहा महिने राहणार असें ऐकतों. मशीर तो गेलाच. त्याजकडे गद्रे व शेलूकर व काळे व पिंगळे व म्हैसकर एकूण पांच असामी इकडील (नानांकडील) व सरकारांतून बाळोजी कुंजर व शिंद्यांकडून आत्माराम नाईक तांबोळी याप्रमाणें गेले होते. वस्त्रें जवाहीर सरकारचें देऊन माघारे आले. यांसही मशीरानें शिरपेंच कंठ्या दिल्या. कुंजरास कडीं दोन दिलीं. म्हैसकरास एक हजार रुपयांचा गांव दिला. याप्रमाणें होऊन माघारे आले. गद्रे नगरास तेथील बंदिवान काढोन किल्ला रिकामा करणेंस गेले होते ते परवां माघारे आले. तेथील गृहस्थानीं निघावें असा बेत करून आले आहेत. रतनगडास जावे असें ठरलें आहे. निघतील न निघतील असेंही कोणी म्हणतात. गढेमंडळ भोंसल्यास दिलें. दौलताबादेचा किल्ला मोंगलाच्या स्वाधीन करणेंबद्दल दिनकरपंत भडभडे भौमवारीं गेले.

वरकड आढळेल तें मागाहून लिहितों. पत्रांत मजकूर बहुत आहे. दुसऱ्यास आढळूं नये. "

नं. ४००२ श्री. (आषाढ शु० १–२५ जून.)

पै॥ छ ४ मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

सेवेशीं बालकृष्ण महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३० जिल्हेज पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं सेवकाबरोबर श्रीमंत राजश्री नाना स्वामींस पत्र दिलें तें प्रविष्ट केलें. त्याचें उत्तर मागाहून सविस्तर पाठवितों. ' श्रीमंत महाराज स्वामींचे मोर्चे संवदलग्यास लागले आहेत तें घेतल्यावर पुढें कोठें जातील यास्तव येविषयींचा बंदोबस्त सत्वर जाहल्यास उत्तम आहे.' म्हणोन आज्ञा, त्यास महाराजांस विनंतीपत्रें गेलीं जाहेत. श्रीमंत नानांची व शिंदे यांची गोडी जाहली. कित्येक बंदोबस्ताचीं बोलणीं होत आहेत. नगरचा किल्ला शिंदे यांस द्यावयाचा ठराव जाहला. आंतील गृहस्थ दुसरे जागा न्यावयाच्या विचारांत आहेत. नगर रिकामें जाहलियावर शिंदे (तो किल्ला) पहावयास जाणार आहेत. सविस्तर मागाहून साकल्य लिहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४००३ श्री. (आषाढ शु० १–२५ जून)

पै॥ छ०४ मोहरम. सन समान तिसैन.

विज्ञापना. भानुवार अस्तमान पावेतों कुशल असे. परवां विनंतीपत्र सेवेशीं पाठविलें आहे त्यावरून कळेल. तूर्त अधिकोत्तर लिहावयाजोगें नाहीं. भोंसले यांस निरोप जाहला. पुण्यांत मेजवान्या होत आहेत. आठचार दिवसीं जातील. ताबुताचे दिवस आले

---

[1] पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. [2] रामचंद्र श्रीधर उर्फ बाबा काळे यांचें पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

आहेत यामुळें चार दिवस अधिक उणे लागले तर लागोत. तूर्त शिंदे यांचें आणि चिरंजीवाचें[1] यथास्थित जाहलें आहे. शिंदे यांच्या हातास नगरचा किल्ला व पंधरा लक्षांची जहागीर येईपावेतों व भोंसले गंगापार होईपावेतों सख्य आहे असें लोक बोलतात! यांत काय शेवटास जातें पहावें. श्रीमंतांचें आणि कारभारी यांचें तो किमपि मिळावयाचें नाहीं. या प्रमाणें अनान्वित आहे. कारभारी मेणवलीस जाण्यास निरोपही मागत आहेत. आपले हातून कारभार होत नाहीं असें बोलतात. शिंदे यांनीं गोडी करून फासा हुगावा (?) असा बेत दिसतो. नगरास जे गृहस्थ आहेत त्यांस महाडास नेणार. गद्रे यांजकडील कारकून व स्वार व गाडदी असे नगरास मशारनिल्हेस आणावयास गेले आहेत. तेथून (मोरोबादादा) निघतात न निघतात कांहीं समजत नाहीं. आठ चार दिवशीं समजल्यावर कळवीन. जप्तीचा प्रकारही गोखले यांसीं बोलत आहें. काय करितात पहावें. शिंदे यांसींही बोलणें लाविलें आहे. अद्यापि विदुराचें पक्कें अभय आलें नाहीं. आजपर्यंत गोखले यांच्या विश्वासावर गेलों. कोठेंच नाद राहिला नाहीं. या उपरी खटपट करून पाहतों. वडिलांच्या आशीर्वादें जेथें तड सांपडेल ती खरी! दैवयोगेंकरून एक श्रीमंत कांहीं वळणीवर येत नाहींत याजमुळें बहुत संकट आहे. वडिलीं गुंडांकडील[2] कारकून तेथें जप्तीस गेला आहे त्याजकडे नाद लाविला आहे तो फार चांगला आहे. आणि कनिष्ठ[3] वकील यांसही फूल लावून लिहीत जावें. तूर्तच्या प्रसंगीं जें ते म्हणतील त्यासच अनुमोदन देऊन होय मात्र म्हणत असावें. तूर्त सर्व आपले विचारीं आहेत. आणखी जें आढळेल तें लिहून पाठवितों. हे विज्ञापना.

---

१ चिरंजीव कोण? नाना फडणीस यांस चिरंजीव हें सांकेतिक नांव दिलेलें कोठें पहाण्यांत नाहीं!. २ नागोजी गुंड निसबत नाना फडनवीस. ३ जनोबा म्हैसकर.

नं. ४००४ श्री. (२६ जून)

पै॥ छ० ४ मोहरम. सब समान तिसैन. आषाढ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आषाढ शु॥ २ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील सविस्तर पेशजी शाहजीबरोबर लिहून पाठविलें आहे त्याजवरोन कळों येईल. तीर्थस्वरूप राजश्री मोरोपंतदादा पुण्यास आले त्यांनीं वडिलांस पत्र लिहून पाठविलें आहे. भोंसले यांजला शिंदे यांजकडे मेजवानी जाहली. गांवांतही भोसले यांजला दहा पांच जागां जाहली. जेष्ठ व॥ १४ मुहूर्तेकरून भोंसल्यानीं अघाडीची पिछाडी केली. परंतु मोहरम महिना, यास्तव डोले थंडे जाहल्यावर आषाढ शु॥ १३ स येथून कूच करून जाणार याप्रमाणें बाजारबातमी आहे. वैरण फार महाग जाली आहे. कडबा दरसद्दे बाजारी पेंढी रुपये २५ पंचवीस प्रमाणें आज दर जाहला आहे ! गवत माल पाहून दरसद्दे रुपये ८।९।१० याप्रमाणें. तेंही बहुतसें एके जागा मिळत नाहीं. दिवसें दिवस महाग वैरण होत आहे.

जोरी	बाजरी	हरभरे
८८२॥	८८२।	८८२८=

याजप्रमाणें भाव आहे. सरकारामध्यें कोटिहोम अनुष्ठान चाललें आहे. नगारखान्याच्या पागेंतील खुले खण व नगारखाना व भाडेकरी व प्राचीनपासून सोनार दुकानें रस्त्यास आहेत चार तीं, अशी तपशीलवार याद लिहून सरकारांत गेली आहे. चार रोज जाहले. राजश्री जनार्दनपंत सरकारांत गेले होते. बोलणें काय केलें समजलें नाहीं. त्यांनीं वडिलांस लिहिलेंच असेल. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४००५[1] श्रीगणराज. (आषाढ +शु० ३-२७जून)

पै॥ छ० २ मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

विज्ञापना. काल पागेंत सरकारचे कारकून येऊन भाड्याच्या खोल्या व खण रिकामे किती व घोडीं किती खणांत बांधलीं त्याची तपशीलवार याद लिहून सरकारांत समजावयास कारकून गेला म्हणोन कळलें. नंतर पागेचें ही बोलणें बोलावयास जनार्दन शिवाजी यांस बाड्यांत पाठविलें होतें. कळावें. पुढें काय होतें पहावें. सरकारांत समजावणारानें समजाविलें आहे जे, पागेंतील घोडीं चारणीस गेलीं याप्रमाणें समजाविलें आहे. हल्लीं पागेंत पांच सहा घोडीं मात्र बांधलीं आहेत, बाकीची पागा रिकामीच आहे, याप्रमाणें (कोणी) सरकारची समजूत केली आहे. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ४००६ श्री. (आषाढ शु० ४-२८ जून)

पै॥ छ० ३ मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधर रावजी स्वामींचे सेवेसीं पोष्य नारो[2] विनायक. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० ३ मोहोरम. यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें " सहा मयूखांचें पुस्तक नेलें त्यास फार दिवस जाले. हल्लीं पुस्तकाचें प्रयोजन आहे. तरी बंदोबस्तानें पाठवावें " म्हणोन लिहिलें, त्यास येथें मयूखांचें पुस्तक लिहविलें आहे तें शोधावयाचें होतें, याजमुळें पोथी ठेविली होती. हल्लीं पाठविली आहे. पत्रें सुमार—

७१ संस्कारमयूख.

७३ आचार.

---

१ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस पत्र. + मिति व तारीख पैवस्तीची.

२ मामलेदार निसबत रास्ते परगणे अथणी.

९२ समय.
९८ श्राद्ध.
७९ नीति.
७६ व्यवहार.

४८९

सहा मयूखांचीं चारशें येकूणनवद पत्रें खालीं वर फळ्या घालून रुमालांत बांधून वरतें मेणकापड व त्यावर आणखी रुमाल बांधून आपल्याकडील जासूद एक व येथून दोन गडी देऊन पुस्तक पाठविलें आहे. येऊन पोहोंचेल. पुढील सहा मयूखांचें पुस्तक पाहिजे तें पाठवून द्यावें. त्याजवरून येथील पुस्तक सम प्रत करून माघारें पाठवून देऊं. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा. हे विनंती.

नं. ४००७[१] श्रीगणराज. (आषाढ शु० ५–२९ जून)

पै॥ छ० ४ मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

विज्ञापना. सुलतानजी हजारी येथें येऊन सरकारांत बोलूं लागले. तेव्हां वकिलांनीं सरकारांत समजाविलें कीं, हे लबाड आहेत. तेव्हां हिसका पडला. नंतर शिंदे यांजकडे जाऊन बाबूराव आंगरे यांच्या विद्यमानें राजश्री दौलतराव बाबा शिंदे यांच्या कानावर घालून गैरवाका समजावून कसबे मंगळवेढें येथील कुलकर्णी (यांजवर) मसाला करून पंचवीस स्वार पाठवून दिले; म्हणोन राजश्री विठ्ठल व्यंकटेश कुलकर्णी मंगळवेढेंकर याणीं सांगितलें. त्याजवरून विनंती लिहिली आहे. तेथें[३] भलते भलते गैरवाका समजावतात, जशीं ज्यास

---

१ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस पत्र. २ खटल्याच्या चौकशीआधींच गुन्हेगारीबद्दल अमुक पैसा द्या असें सांगून तो वसूल करणें हाच मसाला ! ३ शिंद्याच्या दरबारांत.

पाहिजेत तशीं (पत्रें) घेतात ! याप्रमाणें येथील मजकूर आहे. बंध किमपि नाहीं. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४००८ श्री. (आषाढ शु० ११–५ जुलै.)

पै॥ छ० १४ मोहरम. आषाढ. सन समान
तिसैन. रविवार. दोन प्रहर.

सेवेशीं बाबूराव शिवाजी म्हैसकर दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ९ मोहरमपावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं जासूदजोडीबरोबर पत्रें छ० २६ जिल्हेजींचीं पाठविलीं तीं छ० २ मोहरमीं पावोन लिहिला (मजकूर) कळला. “ मौजे संवदलगें येथील ठाणें करवीरकरांनीं घेतलें. आतां कोणाचे गळीं पडतात पहावें. राजश्री बाळाजी गणेश जोशी याजबराबर पत्रें पाठविलीं त्यांचीं उत्तरें मागाहून पाठवितों. जुने हुबळीस राजश्री मोरोबादादा फडके यांजकडील कारकून आहेत त्यांनीं नवे हुबळीचे खेड्यांत शिंबेच्या कजियाबद्दल गाडदी बसविले व जकातीच्या चौक्या उठविल्या; येविषयीं मोरोबादादांनीं लिहिलें असतां ऐकत नाहींत. मोठा उपद्रव मांडिला आहे. व कुंदगोळ परगण्यांत नाडगौडी व सरदेसकत आहेत, त्यास सालाबादप्रमाणें ऐवज देत नाहींत. येविषयीं सरकारांत विनंती करून पत्रें घेऊन पाठविणें.” म्हणोन आज्ञा, ऐसियास सरकारचीं पत्रें तयार होत आहेत. दोन चार दिवसांत सेवेसीं पाठवून देतों. भोसले याणीं काल कूच जवळचेंच केलें आहे. अतःपर लौकरच जाणार. राजश्री रघोजी भोसले यांचे चिरंजीव श्रीपंढरपुरास जाणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. काल श्रीमंत राजश्री नाना भोसले यांच्या डेऱ्यास गेले होते. उभयतांचेंच खलबत जाहलें. तिसरा कोणी नव्हता. हे विज्ञापना.

बाजीरावीची सुरुवात.

जुलई १७९७ पासून जानेवारी १७९८ पर्यंत.

ता० २३ जून रोजीं रघोजी भोसले पुण्याहून कूच करून गेले हें मागच्या प्रकरणांत सांगितलें आहे. एकंदरींत पहातां त्यांच्या निघण्याला चांगला मुहूर्त लागला नव्हता ! कारण पुण्याचा मुक्काम सुटला तरी जवळ जवळ महिनाभर त्यांस नानांच्या सूचनेवरून पुण्याजवळ खडकी येथें तळ देऊन रहावें लागलें. त्यांचें बुनगें पुढें रवाना झालें होतें त्याबरोबर कांहीं जवाहीर होतें. तें बुनगें कोरेगांवाजवळ भीमा उतरत असतां ज्या नावेंत जवाहीर होतें ती नाव फुटून जवाहीर बुडालें ! मागून २० जुलैच्या सुमारास रघोजी भोसले खडकीहून निघाले ते मार्गांत दाणावैरणीचा दुष्काळ पडल्यामुळें लष्करचीं उंटें हत्ती जागोजाग टाकीतच गेले ! आगष्ट महिन्याच्या अखेरीस ते कसेबसे नागपुरास जाऊन पोहोंचले.

भोसले आसपास होते तोंपर्यंत नानाची बाजू बरीच प्रबळ होती. त्या अवधींत बाजीराव साहेबांची दिनचर्या कशी चालत असे हें पुढील उताऱ्यावरून कळेल.

" रा. सदाशिव मल्हार—शिंदे यांजकडील—सरकारांत खलबतास आले होते. एक प्रहर खबलत श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांजपाशीं जाहलें. नंतर राजश्री अमृतराव यांजपाशीं चार घटका बोलोन गेले. तूर्त कोणी एक कारभाराविषयीं घडी बसली नाहीं. वाड्यांत तो कांहीं एक कारभार श्रीमंत करीत नाहींत. कोणाची गांठ पडत नाहीं. मर्जी कठिण. देण्याचा सुमार नाहीं. जाबसाल करावयास अगदीं कळत नाहीं. ऐसें वर्तमान जाहलें आहे. कोणी विनंती केली असतां "नानाकडे जावें. आम्हांकडे काय आहे ? जुन्नरास (पूर्वी कैदेंत होतों तसेच) आम्ही आहों ऐसेंच समजोन नानांकडून

जाबसाल करून घ्यावे," ऐसें म्हणतात. फकीर, बैरागी, कांहीं हातपाय तुटके, याप्रमाणें दहापांच खुळें वाड्यांत जाहलीं आहेत. नाच, रागरंग, पोऱ्यांचें गाणें (श्रीमंत) ऐकत असतात. कारभाराविषयीं कांहीं एक बोलत नाहींत. त्यावरून गांवांत लोक म्हणतात कीं, " (यांजवळ अकलेचा) कांहीं एक ऐवज नाहीं; यांच्या हातून कांहीं एक व्हावयाचें नाहीं ! " (श्रीमंतांचें व) अमृतराव यांचेंही आंतून वांकडें आहे. मन शुद्ध नाहीं. भोसले गेल्यानंतर कांहीं एक गडबड होईल असें लौकिकी बोलण्यांत आहे."

'यांच्या हातून कांहीं एक व्हावयाचें नाहीं' असें अनुमान बाजीरावांविषयीं काढण्यांत आपल्या हातून चूक झाली हें पुण्याच्या लोकांस मोरोबादाच्या प्रकरणाकरून लवकरच कळून आलें ! मोरोबादादा हे नानाचे प्रतिस्पर्धी व फडनविशीच्या उत्पन्नाचे हिस्सेदार होते. फडनविशीच्या कारकुनीचें सालिना उत्पन्न लाखों रुपयांचें असून तें मोरोबादादास कैदेंत ठेवून आजपर्यंत नाना एकटेच खात होते. स. १७७८ पासून आजपर्यंत हा क्रम असाच चालला होता. मोरोबाचा कैवार घेण्याचें ढोंग करून शिंद्याच्या कारभाऱ्यानीं पूर्वीं त्याच्या हिश्शाचें द्रव्य नानापासून वसूल करण्याचा घाट कसा घातला होता हें वाचकांस स्मरत असेलच. तो मोरोबादादा नगरच्या किल्ल्यांत बंदिवान असल्यामुळें तो किल्ला शिंद्याच्या हवालीं करण्यापूर्वीं त्यास तेथून काढून रायगडास पाठवावें अशा बेतानें नानानीं दादा गद्रे यास नगरास पाठविलें. मोरोबा हें नानाचें वर्म आहे व केव्हां तरी नानास बाऊ दाखविण्याच्या उपयोगाचें आहे; सबब त्यास आपल्या हातचा जाऊं देऊं नये, असें योजून नगरच्या किल्लेदारास बाजीरावसाहेबानीं गुप्तपणें निरोप पाठविला कीं, नानाचा माणूस येईल त्याच्या हवालीं मोरोबास करूं नये ! इतकी फूस मिळाल्यावर मग काय पाहिजे ! दादा

गद्रे यास मोरोबा दादानें साफ सांगितलें कीं, मी येथून हालणार नाहीं, आणि किल्लेदारही म्हणूं लागला कीं, मोरोबाची खुषी असेल तर त्यानें खुशाल जावें, सक्तीनें नेऊं म्हणाल तर मी तसें करूं देणार नाहीं !

या कामांत बाजीरावसाहेबानीं अशी ही आंतून किल्ली फिरविली खरी, पण त्यांचा डाव अखेरीस साधला नाहीं तो नाहींच ! कारण कीं, शिंदे या वेळीं नानास सर्वस्वी अनुकूल होते व मोरोबास नगरांतून काढण्याविषयीं नानाचा निर्धार पक्का होता. ते दोघे एक झाल्यावर त्यांपुढें श्रीमंतांचें काय चालणार ? मोरोबास हवालीं करण्याविषयीं किल्लेदारास खुद्द तुमचें ताकीदपत्र पाहिजे असें नानानीं सांगतांच श्रीमंतांस तें लिहून द्यावें लागलें ! तें पत्र व चार हजार फौज बरोबर घेऊन दादा गद्रे व बजाबा शिराळेकर पुन्हा नानाकडून नगरास गेले. तेव्हां किल्लेदाराचें तोंड अर्थातच बंद झालें ! पण इतकें झालें तरी मोरोबादादा सुधेपणानें जाग्यावरून थोडेच हालणार होते !

" रा० मोरोबादादांस बलात्कारें घेऊन जातात ऐसें समजलेवर त्यानीं शिखा सूत्र वस्त्र तिन्हीं टाकिलीं, आणि मग किल्ल्याखालीं आले ! परमहंसदीक्षा घेतली........मोरोबादादा उपोषणें करितात. पांच जाहलीं. येथें पुण्यांत त्यांची स्त्री अन्न घेत नाहीं. दोन रोज जाले. " "मयूरपंत याणी सांगितलें कीं, जर मला जबरदस्ती करून महाडास नेऊं लागलां तर एक प्राणत्याग, अथवा चतुर्थाश्रम करीन ! ऐसें म्हणत असतां आषाढ व० ११ चे दिवशीं गद्रे याणीं त्या स्थळींच्या गृहस्थास बाहेर आणूं लागले. त्या समयीं त्यानीं कौपीन परिधान केलें, शिखेचे दोन केश उपडले, आणि ब्रह्मसूत्र तोडिलें ! एक प्रेष साक्षीसह उच्चारावा तेवढें मात्र राहिलें आहे. ऐसें जाहलें असतांही गद्रे याणीं आपल्या राहुटीस आणून ठेविले आहेत. दादाचें

म्हणणें आहे कीं, येथून मला महाडास न्यावयासाठीं उचललेंत तर प्रेषोच्चार स्वयमेव करितों. .... श्रीमंत बहुत दिलगीर आहेत. कांहीं चालत नाहीं. शिंदे यांजकडे जातात. ते म्हणतात कीं, आम्हीं नानांस वचन दिलें आहे; त्यापेक्षां मोरोबास नाना कां नेईनात ? ऐसें स्पष्ट विदुर बोलतात. मग यांचें काय माहात्म्य आहे तें कळतच आहे ! श्रीमंत मध्यम यांचें कोणतेंही स्थिर ठीक नाहीं........ येथील कारभाऱ्यांचा कृतसंकल्प आहे कीं, संन्यास जरी घेतला तरी (मोरोबा) सोडावयाचे नाहींत. तैसेंच संन्याशानीं महाडास रहावें. ऐसा रंग दिसतो. ऐसा प्रकार घडला आहे. जर शिंदे यांचें अंग कांहीं मयूराकडे असतें तर ठीक पडतें. तें कांहीं नाहीं. ते लोभाविष्ट आहेत. तूर्त पंधरा लक्षांची जहागीर व नगरचा किल्ला प्राप्त होत आहे, मग त्यांनीं कां वोढावें ?"

शेवटीं मोरोबास दुसरीकडे नेऊन ठेवण्याचा निश्चय पक्का ठरला. त्यानीं संन्यास घेतला तो रागानें घेतला सबब तो खरा नव्हे असें ठरून संन्यास रद्द झाला ! "महाडास म्हणजे रायगडास पूर्वीं सखारामबापू मृत्यु पावलेला आहे. सबब मी तेथें जाणार नाहीं;" एवढा मात्र मोरोबाचा हेका चालला व त्यास रायगडास नेण्याचें रहित होऊन रतनगडावर कैदेंत ठेवण्यांत आलें.

या वर्षींच्या श्रावणमासीं दक्षिणा देण्याचा समारंभ झाला तो अपूर्व झाला. श्रीमंतांस देण्याचा सुमार नाहीं म्हणून बोभाटा झाला होता तो विनाकारण नव्हता हें त्या समारंभांत चांगलेंच नजरेस पडलें !

"श्रावणमासचे समारंभास शिध्यास ब्राह्मण सालाबादपेक्षां जाजती आहेत. प्रथम दिवशीं तीस हजार जाहले. गुदस्तां वीस हजार होते. दुसरे दिवशीं छत्तीस हजार शिधा पावले. शिवाय तीन हजार ब्राह्मण फिरोन रिकामे आले. यंदां ब्राह्मण पंचावन साठ

हजार पर्यंत होईल अशी बोलवा आहे. ब्राह्मण गांवांतून रस्त्यांत बहुत दिसतात. वाड्यांत दक्षिणा गुदस्त प्रमाणें दिली. नवीन ब्राह्मण-ही लिहिले त्यांस आख उत्तम १५।२०।२५।३०।४० पर्यंत वैदिकांस घालून रुपये दिले."

या वर्षी रमण्यांत एकंदर ब्राह्मण ४९९६६ आले व त्यांस २९२२८५॥ रुपये देण्यांत आले. म्हणजे माणशीं सरासरीं शेरा ५॥।~॥ चा बसला. आदल्या वर्षी ३६२१२ ब्राह्मण आले होते व त्यांस १४०१५३ रुपये दक्षिणा देण्यांत आली होती.

"श्रावणमासचा समारंभ रमण्यांत चांगला जाहला. श्रीमंतानीं आपले हातीं ब्राह्मणांस दक्षिणा फार दिली. दोनशें, चारशें, बाराशें, चवदाशें, दोन हजारपर्यंत दिली !!! ब्राह्मण चांगला, वग भारी, त्यास फार दिली. ज्यास वग नाहीं, पण ब्राह्मण चांगला, त्यास ४० २५।३०।५०।१००।२०० पर्यंत दिली. वरकड दरवाजांवर तीन चार पांच, वैदिकांस ७।८।१० पर्यंत दक्षिणा जाहली. आजपर्यंत पांचवा दरवाजा श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांचा होता तो (चिणला होता सबब) चालत नव्हता. हल्लीं यंदां चालता केला. श्रीमंत सायंकाळीं त्याच दरवाजावर बसून मोहरा, होन, पुतळ्या, रुपये यांची मोतीं वगैरे मिळून खिचडी करून वांटली. दैवानुसार कोणास मोहोर, कोणास दोन मोहरा, तीन मोहरा, येणेंप्रमाणें आल्या ... ... रा॥ नाना सायंकाळीं प्रहर दिवसास गांवांतून स्वारी येऊन रमण्यांत जाऊन पायउतारा प्रदक्षिणा घातली. श्रीमंतांजवळ अंमळ बसोन स्वारी लौकर गांवांत गेली. नंतर मग शिंदे आले, त्यांची स्वारी दोन घटका रात्रीस गेली. ब्राह्मण सुटावयासीं प्रहर रात्र जाहली. दक्षिणा कनिष्ठ तीन रुपये याप्रमाणें दिली."

"श्रीमंत बाजीरावसाहेब याणीं उत्कृष्ट दक्षिणा दिली. श्रीमंत कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब ज्याप्रमाणें देत होते त्याप्रमाणें

दिली, असें जुने मनुष्य आहेत ते बोलतात. पंचमेळ खिचडी केली त्यांत मोहरा व पुतळ्या होन व मौक्तिक व रुपये याप्रमाणें दक्षिणा दिली म्हणोन गोविंदराव नीलकंठ खासगीवाले बोलिले."

दहा लक्षांची जहागीर व नगरचा किल्ला पदरांत पडेपर्यंत दौलतराव शिंद्यांस नाना फडनवीस यांच्या साहाय्याची जरूर होती व तेथपर्यंत त्यांचें त्याशीं प्रत्येक बाबतींत एक मत दिसून यावें हें ठीकच. परंतु पुढेंही आगस्ट अखेरपर्यंत नानाविषयीं त्यांची मैत्री तशीच कायम राहिल्याचें दिसून येत होतें. कारण कीं त्यानीं बाजीरावसाहेबांस नानासमक्ष कळविलें कीं, तुम्हास गादीवर बसविण्याचें नाना व मी मिळून कबूल केलें त्याप्रममाणें आमच्या खटपटीनें आपण गादीवर बसलां. आतां आम्ही हिंदुस्थानांत जातों. नानांच्या सल्लचानें आपण राज्यकारभार चालवावा. या बोलण्यास श्रीमंतानीं बाह्यात्कारें मान्यता दर्शविली. पण वाड्यासभोंवतीं पहाऱ्यावर आमचीं पलटणें आहेत तीं उठवून नेण्याची परवानगी मिळावी असें जेव्हां शिंदे म्हणूं लागले तेव्हां श्रीमंत बोलले कीं, याचें उत्तर आपण आठचार दिवसांत कळवूं ! त्या गोष्टीस पंधरा दिवस होऊन गेले, शिंद्याकडून दोन चार निरोप आले, तेव्हां अखेरीस बाजीराव साहेबानीं त्यांस सांगून पाठविलें कीं, तुम्ही पलटणें न्याल तर आम्हीच वाडा सोडून तुमच्या लष्करांत रहावयास येतों ! कारण तुम्ही गेल्यावर नाना आमची काय दशा करील याचा भरंवसा आम्हास मुळींच लागत नाहीं !

या उत्तरप्रत्युत्तराचें धोरण सहजगत्या वाचकांच्या लक्ष्यांत येण्याजोगें नाहीं. सबब तें अधिक स्पष्ट केलें पाहिजे. महाड मुक्कामीं नानाचा व शिंद्याचा करार ठरला त्यांत बाजीराव साहेब गादीवर बसल्यावर नानानीं शिंद्यास एक कोट रुपये द्यावे असें ठरलें होतें. त्या कराराप्रमाणें शिंदे जर कूच करून जाते तर नानाकडून रकमे-

चा जेवढा अंश देणें राहिला होता तेवढा त्यांस मिळाला असता. नानांस श्रीमंत थरकांप भीत होते ही गोष्ट प्रसिद्ध होती व त्या कारभाऱ्याच्या जाचापासून शिंद्यानीं आपला बचाव करावा म्हणून शिंद्यास दोन कोट रुपये देण्याचा गुप्त करार श्रीमंतानीं सर्जाराव घाटग्याच्या मार्फत केला होता; त्याचा उल्लेख मागें एकदोन वेळां आलाच आहे. आतां शिंद्याचें श्रीमंताशीं बोलणें पडलें कीं, नाना देतात ती रक्कम घेऊन त्यांच्या हवालीं तुम्हास करून मी हिंदुस्थानांत जाऊं, कीं तुम्ही घाटग्याच्या मार्फत ठरवलेले दोन कोट रुपये आम्हास देणार ? तसें करणार असाल तर नानाचें पारिपत्य करून तुम्हास निर्भय करितों. त्यावर श्रीमंतानीं उत्तर पाठविलें त्याचा अभिप्राय कीं, मला नानाच्या ताब्यांत देऊन तुम्ही जाल तर माझी धडगत नाहीं. याकरितां नानास अधिकारभ्रष्ट करून माझें भय दूर करावें, म्हणजे मी तुम्हास दोन कोट रुपये मिळवून देतों.

त्या काळांत सर्व मराठी साम्राज्यांत शिंद्याचें प्राबल्य विशेष होतें. ते म्हणतील ती पूर्वदिशा याप्रमाणें चालत होतें. निजाम अल्ली, टिपू सुलतान, व इंग्रज हे त्यांस वचकून होते. अशा प्रबळ सरदाराची कास धरिली असतांही नानासारख्या बाह्यतःदुर्बळ दिसणाऱ्या मुत्सद्याचा धाक श्रीमंतांस वाटावा हें चमत्कारिक दिसतें. उलट नाना आयते पुण्यांत येऊन राहिले, व त्यांजवळ म्हणण्याजोगा फौजफांटा कांहीं एक नाहीं, सबब आतां तेच आपल्या आहारीं पडले, असेंच श्रीमंतांस वाटावें व त्यांचा जीव स्वस्थ व्हावा. असें असतां नानांची दहशत श्रीमंतांच्या व शिंद्यांच्या मनावर बसली होती याचें कारण नानाच्या मसलतीचीं धोरणें त्या दोघांस कळून चुकलीं होतीं हें होय ! तीं धोरणें काय होतीं हे स्पष्ट कोठेंही जरी लिहिलेलें नाहीं, तरी या प्रकरणांतल्या पत्रांतून जे उल्लेख आले आहेत त्यावरून तर्क करण्यास जागा आहे. तीं धोरणें अशीं—

पेशवाईचा कारभार करण्याचा हक्क नानाचा नसून माझा आहे, असें अमृतराव प्रतिपादन करीत असत व त्याप्रमाणें कारभारांत पुढाकार घेण्याची त्यांची खटपट गेल्या सात आठ महिन्यांत चालू होती. हा त्यांचा हक्क बाजीरावांसुद्धां सर्वांस मान्य होता आणि खुद्द नानासही नाकबूल करितां येण्याजोगा नव्हता. "नानाजवळ द्रव्य आहे तें सरकारी खजिन्यांतून त्यानीं नेलेलें आहे. तें त्यानीं शिंद्याच्या फौजेचें देणें फेडण्याकरितां कां देऊं नये ? सवाई रावसाहेब लहान होते तोंपर्यंत नानानीं कारभार केला हें ठीकच झालें. पण आतां आम्ही आमचा कारभार पहाणारे झालों त्या अर्थी कारभाराचीं सूत्रें आमच्या हवालीं करून आपली फडणिशी संभाळून त्यानीं रहावें, व सरकारी पैसा दाबून ठेवला आहे तो सरकारच्या आज्ञेप्रमाणें शिंद्यांस देऊन त्यांची हिंदुस्थानाकडे रवानगी होईल असें करावें." हें अमृतरावाचें प्रतिपादन बाजीरावसाहेबांस सर्वस्वी सोईचें होतें, व नानांशीं भांडतांना ते याच मुद्यांचा नेहमीं पुरस्कार करीत. याप्रमाणें अमृतरावाचा नानाशीं जरी विरोध होता तरी त्यांस नानांपेक्षां शिंद्याची जबरदस्ती अधिक असह्य झाली होती ! शिंद्याच्या फौजानीं पुणें प्रांताचे गांव लुटून ओस पाडिले. वाटेल त्यास धरून नागविलें, रयतेस ताप दिला, पुणें दरबाराचा मनास येईल तसा उपमर्द केला, राज्यांतल्या बखेडेखोर लोकांच्या फिर्यादी घेऊन पेशव्यांस किंवा नानांस न विचारतां न्यायमनसुबीच्या मिषानें लोकांकडून पैका उकळला, या गोष्टी पाहून अमृतरावाच्या अंगाचा तिळपापड होत असे ! ही त्यांची वृत्ति नानांस माहीत होती व शिंदे प्रकरणीं कांहीं कांहीं गोष्टींत अमृतरावांचें व त्यांचें एकमत होत असे. अमृतराव मुख्य कारभारी होण्याचा योग जमून येत असल्यास तो कबूल करण्यास नाना तयार होते व अमृतरावाचाही त्याला रुकार पडण्याचा संभव होता. नानाच्या या धोरणाचें पर्यवसान अमृतरावाच्या द्वारें पेशव्यास हळूहळू आपल्या कह्यांत आणण्याकडे होतें !

खरें पाहिलें तर ही त्यांची आशा निष्फळ होती. कारण राज्यकारभारांत अमृतराव मन घालूं लागल्यापासून त्यांविषयीं खुद्द पेशव्यांच्या मनांतच भीति व मत्सर उत्पन्न झाला होता ! नानाशीं संधान जुळवून माझी मुंडी मुरगाळून हा अमृतराव स्वतःच पेशवाई कशावरून बळकावणार नाहीं अशी त्यांस काळजी वाटत असे ! अर्थात् नाना व अमृतराव यानीं एक व्हावें हें पेशव्यांस कुपथ्य वाटत असल्यामुळें तें त्यानीं कधीं तडीला जाऊं दिलें नसतें !

शिंद्याच्या मध्यस्थीवरून पेशव्यानीं काशीराव होळकरास सरदारीचीं वस्त्रें दिलीं होतीं. त्याचा भाऊ मल्हारराव यास सरदारी द्यावी असा नानानीं आग्रह धरिला होता तो चालला नाहीं. त्यामुळें मल्हारराव आपल्या भावांवर रुसून थोडक्याशा जमावानिशीं निराळा राहिला होता हें मागें सांगितलेंच आहे. योग्य उत्तेजन मिळाल्यास मल्हारराव हा नांवारूपास येण्यासारखा सरदार आहे अशी नानाची, समजूत असल्यामुळें त्यानीं त्यास आधार दिला होता. काशीराव, पेशवे व शिंदे या तिघांच्याही दरडावणीस न जुमानतां कधीं काळीं नाना आपणास सरदारी मिळवून देतील या आशेवर मल्हारराव स्वस्थ होता. पुढें त्याजकडून फौज ठेववून होळकराचें घराणें पुनः आपल्या लगामीं लावावें असा नानांचा मनोदय स्पष्ट दिसून येत होता.

शिंद्याच्या लष्करांत महादजी शिंद्याच्या तिघी बायका होत्या. त्यांचें दौलतरावाशीं वांकडें होतें व नानाशीं सख्य होतें. सर्व शेणवी मंडळ त्या बायांच्या विश्वासांतलें होतें. आणि त्यांतले बाळोबा व धोंडीबा हे कारभारी जरी तूर्त कैदेंत होते, तरी नारायणराव बक्षी वगैरे अद्यापि मोकळे असून आपल्या अधिकारावर रुजू होते व त्यांचें शिंद्याच्या घोडदळावर मोठें वजन होतें. शिंद्यानीं जर फारच निकर्ष आरंभिला तर त्यांच्या दौलतींत बखेडा करण्यासाठीं बाया व

शेणवी मंडळ यांशीं मिलाफ करण्याचा नानाच्या मनांत विचार घोळत होता.

परशुरामभाऊ मांडवगणास कैदेंत होते त्यांची दहा लक्ष रुपये दंड घेऊन सुटका करण्याविषयीं माधवराव रास्ते खटपट करीत होते, परंतु दीर्घद्वेषी बाजीराव भाऊंच्या सुटकेची गोष्ट सुद्धां आपल्यापुढें काढूं देईनात ! शिंद्याकडून त्यांस सांगवावें, तर ते पैक्याच्या हलाखींत असल्यामुळें मध्यस्थीकरितां अद्वातद्वा पैका मागूं लागणार, सबब तो नाद रास्त्यांस सोडून द्यावा लागला. भाऊंची मुक्तता होण्यास नानाकडून हटकून अडथळा येईल हें माहीत असतांही रास्त्यानीं नानांजवळ भीत भीत तें बोलणें काढिलें. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, नानांकडून त्यांचा हिरमोड न होतां उलट आश्वासन मिळालें कीं, तुमचा हेतु पूर्ण करण्याविषयीं वेळोवेळ खटपट करून परशुरामभाऊंस कैदेंतून सोडविल्याचें यश तुमच्या पदरांत खचित पाडून देईन ! तात्पर्य आतां मागचे द्वेष नाना विसरले होते. परशुरामभाऊची सरदारी पुनः उजगारीला आणून त्यास पूर्वीप्रमाणें आपल्या पक्षांत आणावें अशी इच्छा त्यांस झाली होती. मिरजकर व कुरुंदवाडकर पटवर्धन यांशीं त्यांचें सख्य पूर्वीप्रमाणें कायमच होतें.

टिपू व इंग्रज यांमध्यें बिघाड होण्याचा रंग दिसूं लागला होता. तसें घडल्यास पूर्वीच्या तहाप्रमाणें मराठी फौज इंग्रजांच्या मदतीस कर्नाटकांत पाठविणें आवश्यक होतें. त्या स्वारीचें काम अंगावर घेऊन पार पाडण्यास परशुरामभाऊखेरीज दुसरा कोणीही सरदार समर्थ नव्हता. अर्थात् ती वेळ येईल तेव्हां परशुरामभाऊंस कैदेंतून सोडण्याखेरीज पेशव्यांस गत्यंतर रहाणार नाहीं हा नानाचा अदमास चुकीचा नव्हता.

टिपूचा व इंग्रजांचा बिघाड होणार असें पाहतांच इंग्रजांच्या मदतीस आपली फौज पाठविण्याची निजाम अल्लीनें तयारी सुरू केली. ती फौज व मुसारेमूचीं पलटणें यांचा जमाव बेदरच्या मुक्कामीं

होत होता. त्या सैन्याच्या खर्चाकरितां नानाकडून पैक्याचा पुरवठा होत असल्याची बातमी पुण्यांत पसरली होती ती बहुधा खरी असावी. पुण्यांतल्या सर्व मसलती ठाकठीक जुळल्यावर शिंद्यास घालवून देण्याकारितां ती मोंगलाई फौज कुमकेस आणण्याचा त्यांचा विचार असावा असें यावरून स्पष्ट होतें.

अमृतराव, होळकर, शिंदे बाया, शेणवी मंडळ, पटवर्धन सरदार, मोंगलाई फौज, यासंबंधें नानाच्या मनांत काय काय मसलती घोळत होत्या हें पेशवे व शिंदे यांस ठाऊक नव्हतेंसें नाहीं. मग त्यानीं नानास एकदम पकडून कैदेंत कां टाकलें नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, तसें करणें बहुधा अशक्य होतें ! नानांजवळ स्वार व आरब पायदळ मिळून सहा सात हजार जमाव होता तो विश्वासू होता. त्यांची व शिंद्याची लढाई झाली असतीं तर त्यांचा एका घटकेंत धुव्वा उडाला असता हें खरें, व शिंद्यांची इच्छाही तीच होती ! पण नानाची फौज लढाईला उभी राहणार कशी ? शिंद्यांचा केव्हां छापा येईल याचा नेम नाहीं हें समजून ते रात्रंदिवस सावधपणें पळून जाण्याच्या तयारींत असत ! एकदां इतक्या जमावानिशीं ते पुण्यांतून निसटले म्हणजे पुनः हातीं लागण्याचा संभव मुळींच नव्हता ! सातारा, रायगड, प्रतापगड इत्यादि किल्ले त्यांच्या ताब्यांत होते, जवळ थोडी बहुत फौज होती, आणि जवळ मुबलक पैका असल्यामुळें पाहिजे तितकी आणखी फौज चाकरीस ठेवण्याचें व वाटेल त्या सरदारास आपणाकडे वळविण्याचें साधन त्यांजवळ होतें ! एकदां उघडपणें नानाशीं बिघाड झाल्यावर ती संधि साधून शिंद्याच्या लष्करांत व पेशव्यांच्या दरबारांत लपून छपून राहणाऱ्या अनेक बंडानीं निर्भयपणानें फैलावा केला असता यांत संशय नाहीं. तात्पर्य पेशवे व शिंदे यांचें जरी नानांशीं वांकडें पडलें होतें तरी त्यांस उघडपणें धरण्याचा

यत्न करण्याची दोघांसही सोय नव्हती. झालें तर तें काम विश्वासघातानेंच व्हावयाचें होतें. पण नानांच्या सावधपणामुळें विश्वासघात करण्याचा योगही कोठें जमून येईना !

होळकरप्रकरणांत नानांच्या मनाचा हिरमोड पेशव्यांच्या आज्ञेवरून शिंद्यांस उघडपणें करितां आला, व तेथपासूनच शिंद्यांच्या कारभारांत सर्जेराव घाटग्याचा हात स्पष्टपणें दिसूं लागला. ता० १४ सप्टेंबर रोजीं शिंद्यानीं मल्हारराव होळकरावर एकाएकीं छापा घालून त्यास ठार मारिलें व त्याचें लष्कर लुटून फस्त केलें ! तो प्रकार कसकसा घडला हें पुढील उताऱ्यावरून समजेल—

" छ० २२ रबिलावल रोजीं गुरुवारीं मल्हारजी होळकर यांचें गोटावर अलीजाबहाद्दर याणीं चालून घेतलें. आपण खासा चार घटका रात्रीस स्वारी तयार करून पर्वतीजवळ रमण्यांत फौज घेऊन उभे राहिले. कांहीं फौज व पलटणें व पंचवीस जरबा ऐसा सरंजाम होळकर यांचे मोहल्यावर पाठविला. काशीबा होळकर याणीं तिकडून लढाई सुरू केली. तों फौज भारी. याणीं गांठलें. तरवार चालली. चाळीस पन्नास मनुष्य होळकराकडील व शिंद्याकडील ठार व जखमी जाहलें. खासा मल्हारराव होळकर यास तरवारेच्या जखमा व तिराची जखम व गोळी ऐसी लागून ठार जाहले. मशारनिल्हेची स्त्रीही वारली. गोट शिंद्याकडील लोकानीं लुटला. होळकराचा मुडदा काशीराव याणीं नेला. पूर्वी चार रोज अलीजाबहाद्दर याणीं मल्हारराव यांस सूचना केली कीं, फौज रुकसत करावी. आम्ही सांगतों त्याजप्रमाणें ऐकावें. परंतु तें न ऐकिलें. प्रातःकाळीं तोंड धूत डेऱ्यापुढें बसले म्हणोन बेहुषारीमुळें ऐसी गोष्ट गुदरली ! सावध घोड्यावर असते तर हंगामा बराच होता. "

शिंद्यानीं मल्हाररावावर याप्रमाणें एकाएकीं हल्ला करून त्याचा जीव घेतला हें पाहून पुण्यांतले लोक घाबरून गेले. असे

अनन्वित प्रकार होऊं लागल्यास शिंद्याचा दुष्टपणा आणखी कोण-च्या पल्लयावर जातो न कळे असें ज्याला त्याला वाटूं लागलें. नानाच्या मनास तर अतिशय वैषम्य वाटलें आणि शिंदे व पेशवे यांशीं त्यांची तेढ पडली होती ती आतां स्पष्टपणें लोकांच्या नजरेस येऊं लागली. मल्हाररावाच्या वधानंतर थोड्याच दिवसांनीं दसरा आला त्या दिवशीं व त्यानंतर काय प्रकार झाला तो पहा:—

" दसऱ्यास अगोदर तीन दिवस एक दिवशीं बोलावूं वाड्यांतून गेलें त्याचें उत्तर कारभारी याणीं केलें, "सेवकें यावें हें विहित. परंतु शिंद्याचा परिघ सरकारी वाड्यांभोंवती आहे त्याचा विश्वास आम्हांस नाहीं." त्यानंतर दसऱ्याचे दिवशीं प्रातःकाळापासून चार बोलावणीं गेलीं तत्राप गेले नाहींत. वस्त्रें वाड्यांतून दसऱ्याचीं पाठवून दिलीं आणि मुख्यांची स्वारी सीमा उल्लंघनास गेली. तेथें शिंदे आले. शिंद्यांचा नजराणा होऊन शिंदे माघारे गेले. नंतर कारभारी यांची स्वारी मागाहून जाऊन वेताळ पेठेनजीक भिडे यांचे बागेसमीप जाऊन उभी राहिली. तिकडून खासा स्वारी आली. अंबारींतूनच नमस्कार व त्रिवर्गांस नजराणा जाहला. नंतर निरोप घेऊन ते एका मार्गें आपले वाडेस गेले. खासे एका मार्गें आले, याप्रमाणें मजकूर जाहला."

" त्यानंतर दुसरे दिवशीं शिंदे यांची ताकीद शिकारीची आपले गोटांत होऊन चार घटका रात्रीस शिकारीस निघावें हा बेत जाहला. तो संदेह पडोन कारभारी आटून होते. निजसुऱ्याचें पथक पर्वतीसमीप होतें तें तयार होतें. असा प्रकार आज चार दिवस दररोज चालला आहे. होळकर मारिला ते दिवशींही शिंदे शिकारीचें निमित्त करून चार घटका रात्रीस पर्वतीसमीप फौजेसुद्धां उभे होते. ती दरद हल्लीं लोकांच्या चित्तांत येत आहे. परंतु तूर्तपक्षीं पाहिलें असतां कोणाचे हातून कोणाचेंही वाईट होत नाहीं. सारे सावध आहेत, यांत श्रीची कृपा कोणीकडे न कळे !"

जिवाजी रामचंद्र जोशी ऊर्फ जिऊबा अण्णा पोतनीस याच्या संबंधाचा मजकूर या प्रकरणांतल्या बऱ्याच पत्रांतून आला आहे. ती हकीगत थोडक्यांत अशी आहे कीं, सदर जिवाजीपंत हा मिरजकर बाळासाहेबांपाशीं फार वर्षांपासून पोतनिशीच्या कामावर होता, आणि त्यांचा त्यावर लोभ व विश्वास असे. बाळासाहेब व त्यांचा पुतण्या चिंतामणराव यांत दौलतीच्या वांटणीसंबंधें जेव्हां तंटा लागला तेव्हां त्यांत जिवाजीपंत बाळासाहेबांस सोडून चिंतामणरावांस मिळाला. या पुस्तकाच्या ७ व्या भागांत काशीयात्राप्रकरणीं जिचीं पत्रें छापलीं आहेत ती सरस्वतीबाई बाळासाहेबांची थोरली भावजय होय. बाळासाहेबांशीं वांटणी प्रकरणीं कज्जा चालविण्यांत त्याच बाईनें चिंतामणरावांस उत्तेजन दिलें होतें व तिच्याच सांगण्यावरून चिंतामणराव यानीं सर्व जहागीर आपणास मिळावी म्हणून खटपट करण्यासाठीं जिवाजी रामचंद्र यास पुण्यास पाठविलें. नाना फडनवीस व बाळासाहेब यांचा स्नेह असल्यामुळें नानास आपलें बोलणें रुचणार नाहीं हें समजून जिवाजीनें बाजीराव अगर अमृतराव अथवा शिंदे यांपैकीं कोणास दहापांच लाख रुपये देऊं करावे आणि जहागीर चिंतामणरावांच्या नांवें करून घ्यावी असें योजिलें. देऊं केलेल्या रकमेची फेड जहागिरीच्या उत्पन्नांतून अगर बाळासाहेबांची मालमत्ता जप्त करवून करावी असाही त्याचा बेत होता. या दिशेनें त्यानें कांहीं खटपट सुरू केली न केली तोंच ती बातमी बाळासाहेबांस समजली व त्यानीं ती हकीगत आपल्या वकिलामार्फत नानाच्या कानांवर घालविली. तेव्हां नानानीं जिवाजीपंतास पकडून सिंहगडावर कैदेंत घातलें. पुढें जिवाजीपंतानें मिरजकरांच्या भाऊबंदकीच्या भांडणांत आपण पुनः पडणार नाहीं असें कबूल करून त्याबद्दल यशवंतराव घोरपडे दत्तवाडकर यांस जामीन दिल्यावरून त्याची मुक्तता झाली.

चिमाजी आपाचें अशास्त्र दत्तविधान झालें त्याला प्रायश्चित्त काय, असा बाजीरावसाहेबानीं पुण्यांतल्या पंडितांना बोलावून आणून प्रश्न केला. तेव्हां या पापाबद्दल सक्षौर प्रायश्चित्त केलें पाहिजे असें त्यानीं मत दिल्यावरून श्रीमंतानीं चिमाजी आपाकडून तसें प्रायश्चित्त घेवविलें.

बाजीराव साहेबांच्या आग्रहावरून सर्जेराव घाटग्यानें दौलतराव शिंद्यास आपली मुलगी बायजाबाई देऊं केली होती. तें लग्न झाल्यानंतर श्रीमंतानीं शिंद्यास दोन कोट रुपये द्यावयाचे व घाटग्याची शिंद्याच्या दिवाणगिरीवर नेमणूक करावयाची, असेंही ठरलें होतें; हें सर्व मागें आलेंच आहे. त्या करारांत आधीं बायजाबाईचें शिंद्याशीं लग्न होणें अवश्यक होतें व ती मुलगी तर कोल्हापूरकर महाराजांच्या ताब्यांत असून केवळ घाटग्याच्या सांगण्यावरून तिची पुण्यास रवानगी होण्याजोगी नव्हती. सबब दौलतराव शिंद्यानीं आपली भावी वधू पाठवून देण्याविषयीं कोल्हापूरच्या महाराजांस पत्र लिहिलें व तिला आणण्याकरितां सरंजामही पाठविला. सर्जेरावाचीं मुलेंमाणसें महाराजानीं आपा देसाई निपाणकर याच्या हवालीं केलेलीं होतीं. घाटग्यानें शिंद्याशीं शरीरसंबंध करावा ही गोष्ट महाराजांस बिलकुल पसंत नव्हती. परंतु पुण्यास शिंद्याचें प्राबल्य वाढत चाललेलें पाहून त्याचा सरंजाम घाटग्याचीं मुलेंमाणसें न्यावयाकरितां आला होता त्याच्या हवालीं तीं करण्याविषयीं आपा देसाई यांस महाराजानीं आज्ञा केली.

शिंद्याचें लष्कर पुण्यास येऊन बसलें त्याला दोन वर्षें होत आलीं होतीं. सुमारें तीस चाळीस हजार स्वार आणि त्याच्या निम्यानें पायदळ व मुबलक तोफखाना असें म्हणतां या सैन्याचा खर्च अवाढव्य वाढावा यांत नवल नाहीं. जरी हें लष्कर कांहीं अंशीं लुटीवर पोट भरीत होतें व जरी दौलतराव कांहीं ना कांहीं निमित्तानें

श्रीमंतांकडून व नानाकडून व इतर लोकांकडून खर्चाकरितां मिळेल तें द्रव्य उकळीतच होते, तरी फौजेचें देणें बेसुमार चढल्यामुळें त्याची फेड होणें आतां मुष्किलीचें झालें होतें. शेवटीं फौजेच्या तगाद्यांनीं फारच हैराणगत झाली तेव्हां दौलतरावानीं आपल्या सरदारांपुढें पदर पसरून आजपर्यंत तुंबलेली नालबंदी माफ करण्याविषयीं त्यांची प्रार्थना केली व निरुपायामुळें त्यांनीं ती मान्य केली ! तरी सुद्धां स्वारांचा रोजमुरा चाळीस लक्ष रुपये तुंबला होता तो व पलटणांचें देणें वीस लक्ष रुपये एकूण साठ लक्ष रुपये कोठून तरी उभे करणें शिंद्यास आतां नाप्राप्त झालें. इकडे आदल्याच महिन्यांत ब्राह्मणांस ओंजळीनें मोती, मोहरा, पुतळ्या दक्षिणा वांटणाऱ्या बाजीराव साहेबांची आतां खर्चाची जी हलाखी चालली होती ती पुसूंच नये ! त्यांच्या वाड्यांत दिव्यास तेल मिळेना, विड्याचीं पानें दुर्मिळ झालीं आणि खाशांच्या स्वयंपाकाचे बारीक तांदूळ बंद झाले ! अशा स्थितींत नानाशीं सुरू असलेल्या तंट्याचा काय तो सोक्षमोक्ष करणें दोघांसही प्राप्त झालें. त्यासमयीं बाजीराव साहेबानीं शिंद्यास स्वच्छपणानें पत्र लिहून दिलें कीं, तुम्ही वाटेल ती हिकमत लढवून नानांस कैद करावें आणि त्यांचें व त्यांच्या पक्षांतल्या सर्व मंडळीचें द्रव्य घेऊन फौजेचें व सरकारचें देणें फेडावें. श्रीमंतांकडून हें पत्र मिळविण्यांतही घाटग्याचाच पुढाकार होता.

इतकें झाल्यावर आज पुष्कळ महिने नानांशीं सुरू असलेलें बोलणें हातघाईवर आणण्यास शिंद्यानीं विलंब केला नाहीं ! साठ लक्ष रुपयांची वरात नाना फडनवीस व त्यांचे अनुयायी गद्रे, शिराळेकर, परचुरे वगैरे दहा असामी यांजवर आपण करणार व त्यांपासून सक्तीनें रक्कम वसूल करणार असें दौलतराव शिंदे उघड बोलूं लागले. तेव्हां नानांकडूनही उत्तरें प्रत्युत्तरें होत गेलीं. व उभय पक्षीं परस्परांवर पगडा बसविण्याची खटपट चालू झाली. तो वृत्तांत असा:—

"श्री॥ रा॥ नाना वाड्यांत जात होते. अलीकडे शिंदेकडील वाड्यासभोंवतें पहिले लोक होते त्यांजपैकीं दोन अंगचे लोकांची बदली केली. दुसरे राहिले. त्या (नवीन) पलटणाचें नांव रफीक पलटण आहे. तोफा आठ आहेत. माणूस चांगलें. भारी चौक्या पहारा. पहिल्यापेक्षां भारी. रात्रीचे तोडे शिलकावून पहारेकरी असतात. आपल्या (सांगलीकरांच्या) वाड्यापुढें पहारा तोडे शिलकावून उभा असतो. बंदोबस्ती भारी. हें पाहून नाना वाड्यांत जातनासे जाहले, आणि श्रीमंतांस सांगितलें कीं, "मी वाड्यांत येतों, स्वामींचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करितों; पलटणें उठवावीं, हे विचार बोलण्यांत; तों हे नवे लोक येऊन विचार अनेक तऱ्हेचा दिसों लागला. मला विचार ठीक दिसत नाहीं." असें सांगून पाठविलें. आणि आपण दहाबारा रोज वाड्यांत जात नाहींत. शु॥ ११ रात्रीस नानांकडील लोक तयार, निजसुरे व शिराळेकर यांजकडील पागा चौकीस शिंदेकडील पलटणें दोन घोरपडीनजीक आलीं हें वर्तमान ऐकून उभी रात्रीस होती."

" पेशजी महाडच्या करारांत शिंद्यास ऐवज द्यावयाचा ठराव नानाकडून जाहला होता. त्यापैकीं निमा ऐवज जांबगांवास व निमा गंगापार जाहल्यानंतर द्यावा; ऐसा करार असतां नाना महाडाहून पुण्यास आल्यानंतर शिंदे याणीं कांहीं भय, कांहीं ऐवजार्चा लोकांची वोढ, असें दाखवून थोड्याबहुतानीं वरचेवर ऐवज घेत आले. बाकी छप्पन लक्ष रुपये राहिले. त्यास हल्लीं ऐवजाविषयीं शिंदे याणीं निकड लावली आहे. यांचें (नानांचें) म्हणणें, तुमचा आमचा करार येथें ऐवज द्यावयाचा नसतां स्नेहानें ऐवज आजवर देत आलों तत्रापि अद्याप (तुमचें) कूच होत नाहीं. त्यास आतां ऐवज मिळत नाहीं. येथून कूच करून जावें. कोणाची पाहिजे त्याची निशा छपन लक्षांची देतों. जांबगांवास गेल्यानंतर निमे व गंगापार

जाहल्यानंतर निमे, याप्रमाणें देऊं. त्यास शिंदे यांचें म्हणणें आपले लष्करांत ऐवजाची ओढ पडली आहे. ऐवज आल्याशिवाय लोक कूच करीत नाहींत. त्यास छप्पन आज पदरीं घालावे. लोकांचे फडशे करून लागलेंच कूच श्रीमंतांस मेजवानी करून करितों, व गद्रे, शेलूकर, पिंगळे, बजाबा शिराळेकर या चौघांपैकीं दोन असाम्या बोलीस द्याव्या. याचें कारण श्रीमंतांस तुम्हांकडून कांहीं वांकडें होऊं नये. एक संवत्सर यथास्थित चाललें म्हणजे बोली सोडून देऊं. याप्रमाणें जाहल्यास ऐवज येतांच कूच करितों. त्यास यांस (नानांस) एकही गोष्टीचा भरंवसा लागत नाहीं. त्याजवरून बहुत वांकडें आहे. नानांचे येथें रात्रौ बहुत तयारी होते. काल शिंदे सायंकाळीं वाड्यांत आले होते. व नाना शिंदे गेल्यानंतर सहा घटका रात्रीं वाड्यांत जाऊन अमृतराव यांशीं खलबत करून आले. लोकांचें म्हणणें आठचार रोजांत (शिंदे, नानांस) कैदेंत बसवितात. यांजकडील गृहस्थांचे म्हणणेंत त्याचे लोक यांणीं फितविले आहेत. हे त्यास कैद करितात. याप्रमाणें आहे. घडेल तें खरें. ''

आज छप्पन लक्ष रुपये द्या म्हणजे कूच करून जातों असें दौलतराव शिंद्यांचें म्हणणें. नानाचें म्हणणें.कीं, पुणें मुक्कामीं तुम्हांस पैका देण्याचा करार नसतां नाना प्रकारचीं निमित्तें दाखवून आजपर्यंत आम्हांकडून चव्वेचाळीस लक्ष रुपये तुम्हीं उचललेत. आतां तुम्ही येथून गेल्याशिवाय तुम्हांस छदाम मिळणार नाहीं ! दोहीं बाजूंचें म्हणणें निकराचें पडलें तेव्हां आतां त्याची तडजोड कशी व्हावी ?

विश्वासघाताशिवाय नानांस पकडण्याचें दुसरें साधन नव्हतें हें पूर्वी लिहिलेंच आहे. तो विश्वाघात होऊं नये म्हणून नाना जपत असतां शेवटीं शिंद्यानीं त्याच साधनाचा उपयोग करून त्यांचा नाश

केला ! बाणाजी शेटे वगैरे आपलें कारभारी प्रथम शिंद्यानीं मध्य-स्थीस घातले. त्यांच्या वचनाचा विश्वास नानांस बिलकुल येईना. तेव्हां त्या कामावर शिंद्यांनीं मुकीर साहेबाची योजना केली ! एत-द्देशीय राजेरजवाड्यांच्या पदरीं युरोपियन अंमलदार त्या काळांत चाकरीस होते त्यांनीं वचनाच्या नेकीविषयीं मोठा लौकिक संपादन केला होता. ते केव्हांही आपल्या वचनास बट्टा लागूं द्यावयाचे नाहींत अशी त्यांची सर्व हिंदुस्थानभर ख्याति होती. शिंद्याच्या नोकरीस मुकीर (Michale Philose) हा फ्रेंच सरदार होता त्याची हुकमत आठ पलटणांवर चालत होती. असल्या बड्या युरोपियन अंमलदारानें फलाण्या गोष्टीबद्दल शब्द गुंतवला तर नानांचा त्यावर विश्वास बसण्याजोगा आहे हें ओळखून शिंद्यानीं आणि सर्जेराव घाटग्यानीं दगाबाजी करण्याविषयीं त्या मुकीर साहेबाचें मन वळविलें !

मुकीर साहेबाची मध्यस्थी नानास कबूल झाली. करार होईल तो उभयपक्षीं पाळला जाईल याबद्दलची हमी मुकीरानें पतकरली. नंतर एक एक बोलणें निघून निकालांत येऊं लागलें तों मध्येंच एके दिवशीं शिंदे म्हणूं लागले कीं, नानानीं निदान चाळीस लाख रुपये दिल्याखेरीज आपण कोणतीही गोष्ट मान्य करणार नाहीं ! अर्थात् मुकीराची मध्यस्थी लटकी पडल्यामुळें त्यास आपल्या धन्याचा फार राग आला. हा राग बाह्यात्कारी असून पुढच्या खोट्या मसलतीस लोकांत खरेपणाचें स्वरूप दिसावें म्हणून दौलतराव धनी व त्याचा नोकर मुकीर यांनीं याप्रमाणें वागावयाचें आपसांत पूर्वींच ठरवून ठेवलें होतें !

मुकीराची मध्यस्थी याप्रमाणें रहित होऊन पुनः बाणाजी हुजरे वगैरे शिंद्याचे छोटेखानी मुत्सद्दी नानाच्या घरीं हेलपाटे घालूं लागले. परंतु आतां नानानीं मुकीराच्या शब्दाखेरीज कोणावरही विश्वास टाकण्याचें साफ नाकारलें ! असे आठचार दिवस गेल्यानंतर

आपला निरुपाय झालासें दाखवून शिंद्यानीं पुनः मुकीर साहेबाचीं आर्जवें करून त्यास पुनः लढा मिटवण्याच्या कामांत घातलें. जो करार होईल त्यांत शिंद्याकडून तजावजा झाल्यास आपण पलटणानिशीं तुम्हांस सामील होऊं अशी मुकीर साहेबानें नानांची खात्री केली! नंतर कराराच्या यादी हं हं म्हणतां उभयपक्षीं मान्य होऊन नाना व शिंदे यांचा समेट झाला. शिंद्यानीं आपल्या लष्कराचा तळ हालविण्याची तयारी ज्यारीनें सुरू केली, मुकीरसाहेब या मध्यस्थामार्फत ते नानाच्या भेटीस येऊन चार घटका मोकळेपणानें त्यांशीं बोलून परत गेले. नंतर शिंद्यांस निरोप देण्याकरितां नानानीं त्यांच्या लष्करांत जावयाचें त्याचा दिवस ३१ दिसेंबर हा ठरला. त्या प्रसंगीं दगाफटका होणार नाहीं याबद्दल मुकीर साहेबाची हमी होतीच तथापि नानानीं त्याजकडून बायबलावर हात ठेववून पुनः इमानानें वागण्याची शपथ घेवविली! नंतर ठरलेल्या दिवशीं कांहीं जुजबी लवाजमा बरोबर घेऊन नाना फडनवीस शिंद्याच्या लष्करांत गेले. त्यांबरोबर आबा शेलूकर, बजाबा शिराळेकर, नारायणराव वैद्य व दुसरे कित्येक गृहस्थ होते. तेथें गेल्यावर परस्परें भेटी व आदराचे उपचार होऊन खलबत करण्याच्या निमित्तानें शिंदे, त्यांचे कारभारी, मुकीर, व नाना असे निराळ्या जागेंत गेले, आणि तेथें मुकीर साहेबानें नानांस कैद केलें! तें घडतांच नानाबरोबर लोक होते त्यांवर शिंद्याकडील लोकांनीं हल्ला करून त्यांस उधळून लाविलें. त्या गर्दींत पुष्कळ लोक मारले गेले व पुण्यांत मोठा हाहाकार झाला. लोकांचीं तोंडें काळीं ठिक्कर पडलीं. पेशवाईचा लय होऊन बेबंदशाहीस आज सुरुवात झाली असेंच त्या दिवशीं पुण्यांतील लोकांनीं मानिलें. "शिंद्यानीं आयत्या वेळीं मुकीर साहेबास फसवून नानास दगा केला, त्यांत मुकीराची कांहीं चूक नव्हती." अशी त्यावेळीं पुष्कळ लोकांची समजूत होती. परंतु ग्रांट्

डफचें मत असें आहे कीं, मुकीर साहेब प्रथमपासून या लबाडींत होता व त्यानें दगलबाजी करून युरोपियन अंमलदारांच्या नांवास लांच्छन लाविलें. मुकीराच्या बाबतींत ग्रांट् डफचें म्हणणें आम्हांस ग्राह्य वाटतें. अलीकडे नाना जरी राज्यकारभाराचे सूत्रधार नांवाला मात्र होते तरी त्यांच्या दराऱ्यामुळें त्या काळचे कित्येक लहान मोठे सत्ताधीश उद्धट, जुलमी, क्रूर व हलकट बुद्धीचे असूनही त्यांचे दुर्गुण उघड माथ्यानें सामाजांत वावरूं शकले नाहींत. परंतु पेशव्यानीं शिंद्याकडून नानांस कैद करविलें त्यामुळें मराठी राज्यास आळा घालणारा आतां कोणी राहिला नाहीं. दरबार म्हटलें म्हणजे तेथें गांभीर्य, चातुर्य, प्रतिष्ठितपणा, दूरदृष्टि इत्यादि गुणांच्या संभवाचा बोध होतो. परंतु आतां त्या गुणांची व मराठी दरबाराची कायमची फारकत होऊन गेली! मग तें दरबार पेशव्यांचें असो, शिंद्याचें असो, कीं दुसरे कोणाचें असो! या गोष्टी पुण्यांतल्या प्रत्येक माणसाच्या डोळ्यापुढें दिसत होत्या. पटवर्धनांचा एक वकील खेदानें म्हणतो कीं "येथील विधी समाप्तीस गेला. याजउपरी श्रीमंतांच्या राज्याचा आळा गेला. जो जबरदस्त त्याचें पागोटें वांचेल!"

नं. ४००९ श्री. (६ जुलै)

पै॥ छ. १५ मोहोरम. पांच तास रात्र. सन समान तिसैन.

[1]ती॥ राजश्री बाळसाहेब वडिलांचे सेवेशीं.

विज्ञापना. आज राजश्री माधवराव रास्ते याणीं (मला) बलावून नेलें आणि सांगितलें कीं, "आज पावेतों राजश्री नाना हातीं लागत नव्हते, याजमुळें भाऊंच्या बोलण्यास ढील होती. हल्लीं आम्ही राजश्री नानांचें वचन घेतलें. याजउपरी आम्ही शिंदे यांच्या

१ रामचंद्र श्रीधर उर्फ बाबा काळे यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबास.

घरीं खामखां बोलतों. तुमची सिद्धता[1] असावी. ऐसें तपशीलवार मिरजेस लिहून पाठवावें." त्याजवरून हल्लीं विनंती लिहिली आहे. तर आपलीं उभयतांचीं पत्रें यांस द्यावीं कीं, "आम्हांकडून सिद्धतेस गुंता नाहीं. आपण वडिलांच्या सुटकेची सिद्धता करावी म्हणजे इकडून दिकत नाहीं. ऐवजाचें काम—समयास आपण चार[2] पावेतों थोप संभाळावी. बाकीची भरती करून देतों. आपलीही निर्गत मागाहून करिता येईल. परंतु याजउपरी कार्य होण्यास दिवसगत असूं नये." ऐसे बहुत थोरपणा देऊन दोनी पत्रें पाठवावीं म्हणजे ठीक पडेल. ज्या पक्षीं राजश्री नानांनीं लोभ[3] धरिला असतां[4] संकट पडणार नाहीं. एक नानांची श्रीमंतांपाशीं मात्र डाळ गळेंत[5] नाहीं. त्यासाठीं नानांनीं रास्ते यांस सागितलें कीं, तुम्ही विदुर[6]द्वारें बोलणें. आम्ही कार्य होण्याविषयीं सिद्ध आहों. त्यावरून भासतें कीं दैव सानुकूल आहे तर कार्य होईलसें भासतें. काल जप्तीविषयीं व मंडळीविषयीं लिहिलें आहे त्याचें उत्तर यावें. त्याप्रमाणें रास्तेयांसीं नाद खचित लाविला आहे. तेही खटपट करीत आहेत. तैसेंच राजश्री बजाबा शिराळेकर यांजकडेही प्रवेश केला आहे. त्यांसीं बोलत असतों. बहुत योग्य माणूस आहे. प्रामाणिक आहे. एकादी विश्वासानें गोष्ट त्याजपाशीं सांगितली असतां दिकत नाहीं. शिराळेकर यांचें म्हणणें आहे कीं, श्रीमंत राजश्री नानांसीं बोलून, तुमचे कार्य होयसें करितों असें त्यांचें ही बोलण्यांत आहे, त्याजवरून भासतें. मग होणें पुण्य आपलें आहे! परवां नांवनिशीची याद पाठविली आहे त्यास त्याच अजमासानें मडंळीची[7] नांवनिशी लिहून चाळीस बेचाळीस पर्यंत एकंदर आंख

१ दंडाची रकम भरण्याची. २ चार लक्ष. ३ कृपा केली. ४ त्या अर्थीं. ५ शिजत नाहीं असें म्हणण्याचा प्रचार नेहमींचा. गळत नाहीं हा प्रयोग अदृष्टपूर्व आहे. ६ शिंद्यांकडून श्रीमंताजवळ. ७ परशुरामभाऊंच्या पदरच्या मंडळीपैकीं कोणी किती दंड द्यावा त्याची. २ हजार.

पडे असें करावें. आणि याद राजश्री कृष्णराव तासगांवीं आहेत त्यांचे हवालीं केली असतां परस्परें बजाबाकडे येईल. मग मी समजाविलें आहे तें सोईचे पडेल. आणि आपलीं पत्रें ही एकांतीं राजश्री बजाबांस गोड येत असावीं. म्हैसकर यांस कळूं नये असें गुप्त त्यांस लिहीत असावें. सेवेसीं कळणेंकरितां लिहिलें असे. खटपटीस कमी करीत नाहीं. खटपट माझी, दैव आपलें ! हे विज्ञापना. रवाना गुरुवार त्रयोदशी.

नं. ४०१० श्री. (आषाढ+ शु. १५-९ जुलै.)

पै॥ छ. मोहरम. आषाढ. सन समान तिसैन.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी व मोरो आप्पाजी परांजपे. साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे राजश्री मोरोबादादा यांस नगराहून आणावयाकरितां सरंजाम पाठविला. सरंजाम पोहोचल्यावर दादांजवळ शिवाजीपंत आणावयास गेले. त्याचें बोलणें जाहलें; 'किल्यावरून साफ उतरत नाहीं ! किल्लेदार याणीं सांगितलें कीं, "संतोषेंकरून निघत असल्यास घेऊन जावें. जबरदस्ती तुम्हीं करूं लागल्यास न जाणों, त्यांणी दुर्घट कर्म केलें (तर) त्याचें निमित्त कोणी घ्यावें ? आमचे स्वाधीन प्रारंभी जाहले ते समयीं सरकारचा करार आहे कीं, श्रीमंतांनीं कृपा करून आपणाजवळ घेऊन जावें, अथवा आम्हाजवळ असावें. या प्रमाणें करार मदार असतां येथून न्यावयाची सरकारची मर्जी; त्यास सतोषें जात असल्यास घेऊन जावें. ते जात नाहीं ऐसें म्हणतात त्या अर्थीं आमचा उपाय नाहीं. शिंदे याजकडील सरकारांत खलबतास आले होते. पांच दिवस जाहाले. एक प्रहर खलबत श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांजपाशीं जाहलें. नंतर श्रीमंत राजश्री अमृतराव यांजपाशीं चार घटका बोलोन गेले. तूर्त कोणी एक कारभाराविषयीं घडी बसली नाहीं. वाड्यांत तो कांहीं

+ मिति व तारीख पैवस्तीची.

एक कारभार श्रीमंत करीत नाहींत. कोणाची गांठ पडत नाहीं. मर्जी कठीण. देण्याचा[1] सुमार नाहीं. जाबसाल करावयास अगदीं कळत नाहीं. ऐसें वर्तमान जाहलें आहे. कोणी विनंती केली असतां "नानाकडे जावें. आम्हांकडे काय आहे? जुन्नरास आम्ही आहों ऐसेंच समजोन नानांकडून जाबसाल करोन घ्यावे" (असें म्हणतात.) फकीर, बैरागी, कांहीं हातपायतुटके, या प्रमाणें दहा पांच खुळें वाड्यांत जाहलीं आहेत. नाच, रागरंग, पोऱ्याचें गाणें ऐकत असतात. कारभाराविषयीं कांहीं एक बोलत नाहींत! त्यावरून गांवांत लोक म्हणतात कीं 'कांहींएक ऐवज नाहीं. यांच्या हातून कांहीं एक व्हावयाचें नाहीं.' अमृतराव यांचें ही आंतून वांकडें आहे. मन शुद्ध नाहीं. भोसले गेल्यानंतर[2] कांहीं एक गडबड होईल असें लौकिकी बोलण्यांत आहे. काय घडतें पहावें. दादा गद्रे नगरास जाण्याकरिता मुहूर्तें निघाले आहेत. जाऊन फल नाहीं ऐसें दिसतें. सविस्तर मागाहून विनंती लिहितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०११ श्री. (आषाढ शु. १५–९ जुलई)

सेवेशीं बालकृष्ण महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ. १४ मोहोरमपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असेविशेष मजबरोबर स्वामीचें पत्र श्रीमंत नानांस होतें तें नानांस प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविलें आहे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचे प्रकरणीं तूर्त कांहीं घडत नाहीं. वस्त भाव वगैरे जें स्वामी पाशीं असेल तें पाठवावें ऐसी श्रीमंत नानाची मर्जी आहे. शिंदे यांची व श्रीमंत नानाची गोडी जाली आहे. परंतु नगरचे किल्यावरून वांकडें पडावें असा रंग दिसतो. कारण आंत गृहस्थ आहेत त्यांस आणावयासीं गद्रे गेले आहेत (परंतु) आंतून बाहेर येतां दिसत नाहीं. मसलत बहुत वांकडी दिसते. याजकरितां स्वामीनीं बहुत सावधतेनें असावें. पत्र वाचून विस-

---

१ कोणास काय द्यावें याचा. २ भोंसले गोदावरीपार गेल्यावर.

र्जन करावें. ठेवूं नये. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. रांजे यांस पत्र लिहून पाठविलें आहे. हे विज्ञापना.

नं. ४०१२ श्री. (आषाढ व० १-१० जुलई.)

पै॥ छ १५ मोहरम. पिंगल संवत्सर

विज्ञापना. शिराळेकराकडील दाजीबा आंबेकर यांसी बोलल्याचा व राजश्री नारोपंतानीं ही वडील हवालीस (?) लिहिल्याचा व वडिलीं शिराळेकर यांस पत्र लिहिल्यावर मजकूर लिहिला तो कळला. गुप्तत्वें कारभारी यांचें दर्शन करवितों, मागून कारकून पाठवितों, म्हणून दाजीबा आंबेकर म्हणत होते तो मजकूर वडिलीं लिहिला, आणि लिहिलें कीं, दुसरा कोण पाठवावा, इत्यादिक मजकूर लिहिला, त्यास मला इतकें कशास पाहिजे ! जशी आज्ञा होईल तशी वर्तणूक करीन. मी ही नेहमीं राजश्री बजाबाकडे जात असतों. बजाबा चांगले मनुष्य आहेत. मग आमच्या दैवेंकरून कार्य हो किंवा न हो ! परंतु मनुष्य उत्तम रीतीचे, बहुत गरीब आहेत, यांत संदेह नाहीं. माझा इलाज श्रीमंत राजश्री नानांकडे व्हावयाचा नाहीं. वडील सर्वजाण[3] आहेत. आज नानाची भेटी घ्यावी तर पांच सात हजार दंड मागतील; आणि माझी दशा आहे ती सर्व माहीतच आहे ! माझेमागें सर्व मुलांबाळांस व वडिलांस अन्न नाहींसें केलें. आजपर्यंत दिवस वडिलांचे आशीर्वादेंकरून पाहिले. पुढें ही सुखरूप रक्षण करणार (आपणाखेरीज) कोण आहे ? सविस्तर समाजावें, करितां लिहिलें आहे. मी बजाबाचे घरीं नेहमीं जात असतों. बहुत ममता करितो. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ कोल्हापुरच्या महाराजांस नानांनीं, २ रामचंद्र श्रीधर ऊर्फ बाबा काळे यांच पत्र पुण्याहून मिरजेस. ३ तम्हीं.

नं. ४०१३ श्रीकृष्ण. (आषाढ व० १-१० जुलै)

पै॥ छ० १९ मोहरम. सनसमान तिसैन. आषाढ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं. विनंति पोण्यांतर्गत धोंडो केशव आठवले दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १५ मोहरम. मुक्काम क्षेत्र पंढरपूर स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत भाऊसाहेबांचे दंग्यांत चिरंजीव भिकाजीपंत आपा सांपडले म्हणोन कार्तिकमासीं क्षेत्राहून पुण्यास गेलों. तेथील विधि[1] आजपर्यंत सर्वही उरकोन घरची चौकी उठली. उपरांतिक श्रीमंत नानांचा निरोप घेऊन क्षेत्रास आलों. पाडळीची कमावीस शिराळेकर यांजकडे सांगितली[2]. बहुत नाश जाहला. सरकारचा खंड व पुण्यांतलि वस्तभाव प्रथम दिवसीं दंग्यांत गेलें, तें व पाडळीचें घर जप्त केलें ते समयीं वस्त भाव दाणादुणा गेला तो मिळोन पन्नासांस[3] चाट बसली. असो. ईश्वर इच्छा ! होणारास कोणाचा उपाय नाहीं. लोभमूलानि पापानि ऐसें वचन आहे. एक लोभास माणूस प्रवृत्त जालें म्हणजे त्याचे मागें सर्व नाश आहे ! असो. तूर्त सर्व कुटुंब क्षेत्रांत येऊन राहिलों. सडे भिकाजीपंत व नारायणराव मात्र पुण्यांत आहेत. ऐशास पंढरपूर तूर्त शहरादाखलच आहे[4]. याजकरितां विनंती पत्र लिहावें याचें कारण कीं, घोडीं गुरें कांहीं जप्तींत गेलीं व मेलीं. बाकी चाळीस पन्नास गुरें व बारा पंधरा घोडीं राहिलीं तीं सारीं येथेंच आहेत. केवळ खर्चामुळें तूर्त विपत्ति आहे. हें गृहकृत्य दुसऱ्यांसीं लिहून फल नाहीं ! आपण स्वकीय व पूर्वी वडिलांपासून कृपाच करीत आले असें जाणून पत्र लिहिलें कीं एक दुसरें मंगळवेढ्यांतलें खेडें कमाविसीनें दिल्यास घोड्या गुरांची सोय होईल. कांहीं शेत

१ विधि कैद भोगण्याचा व दंड देण्याचा ! २ पाडळीची कमाविस आमची ती नानानीं बजाबा शिराळेकर यास सांगितली. ३ पन्नास हजारांची. ४ शहरची राहणी खर्चाची तशीच येथची आहे.

भात व मळा करून चार दिवस आपले छायेंत कालक्षेप करूं. गांवचा वसूल मंगळवेढ्याकडे अगर हुजूर देऊं. जैशी आज्ञा होईल तैसे करूं. सारें कुटुंब तरी क्षेत्रींच राहील. परंतु गांव दिले तरी कोणी मूल अगर कारकून राहील. आपले कमावीसदार जागजागीं आहेत तसे आम्हीही एकादो खेड्याचे कमावीसदार. आपले भाग्याचे विभागीं आम्ही नाहीं असें नाहीं. मर्जीस आल्यास उत्तर पाठवावें. त्याप्रमाणें करूं. यासमयीं आपण रक्षण केल्यास फार उत्तम आहे. समय आहे. विशेष काय विनंती करावी ? सर्व विनंती करावयासीं राजश्रीं तात्या फडणीस यांस सांगितलें आहे. विनंती करितील. दरसाल मंगळवेढ्याहून पांच हजार गवत पावत असतें. गुदस्तांही विनंती पत्र पाठविलें होतें त्या वरून रा॥ बापूस पत्र स्वामीनीं दिलें होतें. तेव्हां वैरण पावली. सालमजकुरीं वैरण पावली नाहीं. बापू जिवाजीपंतावर घालवितात. जिवाजीपंत बापूवर घालवितात ! ऐशास आम्हांस वैरण पावे ऐसें एक पत्र देणें म्हणजे सालाबादप्रमाणें पावेल. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४०१४ श्री. (आषाढ व० ५–१४ जुलै)

पै॥ छ० २० मोहरम. सन समान तिसैन. आषाढ. [2]सेवेशीं नारोहरी करंदीकर. दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती. विज्ञापना. तागायत छ० १९ मोहरमपावेतों यथास्थित असे. विशेष. राजश्री बचाजीपंत यांस समाधान नाहीं. यास्तव कांहीं अंजीर व डाळिंबें मिरजेस मिळाल्यास आणवावीं म्हणोन मला त्याणीं सांगितलें. त्यादरून सेवेशीं विनंती लिहिली आहे. मिळाल्यास पाठवावयाची आज्ञा जाहली पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ मंगळवेढ्यांचे मामलेदार मेघश्यामराव कृष्ण पटवर्धन. २ पत्र कोल्हापुराहून मिरजेस.

नं. ४०१५ श्री. (आषाढ व० ६–१५ जुलै)

पै॥ छ० २० मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

[1]सेवेशीं विज्ञापना ऐसी जे, श्री॥ राजश्री दादा[2]साहेबांकडील सुभेदारप्रकरणीं मजकूर लिहून परवां पत्रें पाठविलीं आहेत. तो मजकूर राजश्री सखोपंत यांस कुरुंदवाडास जाऊन पुसोन येणें विषयीं श्रीमंत महाराज याणीं आज्ञा केली. त्यावरून कुरुंदवाडास मशारनिल्हेनीं लिहून पाठविलें होतें. दादासाहेबांनीं येऊन जाणें म्हणोन परवानगी जाली. त्याजवरून सखोपंत बुधवारीं प्रातःकाळीं निघोन कुरुंदवाडास गेले. चार दिवसांत येणें म्हणोन महाराजानीं सांगितलें आहे. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. श्रीमंत सुभे-[3]दार व गणपतराव यांचा मतलब एकच दिसतो. कळावें सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०१६ श्री. (आषाढ व० ६–१५ जुलै)

प॥ छ० २० मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

[4]सेवेशीं विज्ञापना. भिरडीकडील फौज करवीरास आणविली. तूर्त दसऱ्यापर्यंत खटला करूं नये अशी मसलत जाहली आहे. परंतु प्रमाण काय ! वरचेवर आढळेल तसें सेवेशीं लिहून पाठवीन. कळावें. भिरडीकरांची कांहीं चीजवस्त व गल्ला कुडचींत होता त्याचा पत्ता करवीरकरांस लागला असें वर्तमान आहे. कळावें. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ नारो हरी करंदीकर याचें पत्र करवीराहून मिरजेस. २ दादासाहेब हे रघुनाथराव नीलकंठ. त्यांचे बंधु शिवराव सुभेदार कोल्हापुरकरांची चाकरी पतकरूं इच्छीत होते. ३ शिवराव नीलकंठ व गणपतराव कोन्हेर या दोघांचा ही मतलब दादासाहेबांशीं भांडून वांटणी मागण्याचा दिसतो. ४ नारो हरी करंदीकर याची चिट्ठी करवीराहून.

श. १७१९ बागणीकरासंबंधें करवीरकरांशीं लढा. इ. स. १७९७

नं. ४०१७ श्री. (आषाढ व० ६–१५ जुलै.)

पै॥ छ० २० मोहरम. सन समान तिसैन. आषाढ.

[1]सेवेशीं विज्ञापना. राजश्री चिंतोपंत देशमुख याणीं सरकारांत दोन लाख रुपये रसद देऊन चिकोडी तालुक्याची मामलत केली. पुण्याहून निघाले किंवा एक दोन दिवसांत निघणार. बरोबर हजार स्वांर व पांचशें गाडदी याप्रमाणें सरकारचा सरंजाम आहे. व स्वामीस व श्रीमंत दादासाहेब यांस व नागोश्यामजी यांस सरकारचीं व श्रीमंत नानांची पत्रें आहेत कुमकेविषयीं असें वर्तमान आहे. कळावें. बागणीकरांचे फडशाबद्दल राजश्री बाजीपंत निसबत शिंदे यांजकडून काल आले. सरकारचीं पत्रें व नानांचीं व दौलतराव शिंदे यांचीं घेऊन आले आहेत. राजश्री सखाराम घाटगे याणीं पेशजी महाराजांस पत्र पाठविलें होतें कीं "बागणीकरांचा फडशा करूं नये. आठचार रोजांत शिंदे यांजकडील कारकून व हुजरे यांस उठोन येणेंविषयीं मनाचिठी पावून देतों," असें आलें. त्यावरून बागणीकरांचें कापड मात्र सिलकेस राहिलें होतें त्याचा व्यय केला. त्यावरून शिंदे याणीं घाटगे यांस फारच निषेध केलें व हल्लीं घाटगे यांचे पत्र महाराजांस व बागणीकरांसंबंधें तसनस व मेजवानी सुद्धां एक लाख साठ हजारांची याद आकारून पाठविली आहे. मागाहून परशुराम हुजरे याची रवानगी होत आहे. निघाला असेल किंवा निघणार. बरोबर सरंजाम पांचशें स्वार व एक पलटण व दोन तोफा याप्रमाणें आहे. त्यास कामगारी सखाराम घाटगे यांचीं मुलें माणसें घेऊन पुण्यास जावें व बागणीकरांचे फडशास बदल पडल्यास परशुराम याणें नेट पाडावा. व शिंदे यांजकडील पागा शिराळें प्रांत वगैरे जागजागां चारणीस आहेत त्यांस ही कुमकेविषयीं पत्रें आहेत. व बागणींत दोन अडीचशें पागा पेशजी आलेली

---

१ नारो हरी करंदीकर याचें पत्र करवीराहून मिरजेस. २ तुम्हांस व कुरुंदवाडकरांस.

आहे. कसें कसें होतें पहावें. तूर्त याप्रमाणें आहे. कळावें सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ४०१८ श्री. (आषाढ–जुलई)

विज्ञापना. काल चिरंजीव पद्माकर शिवाजी याजकडून माणूस पुण्याहून आला त्यास मार्गीं पुसेसावळीच्या अलीकडे शिंद्याकडील दोनशें स्वार व एक कारकून करवीरास जावयास आले. घाटग्याची मूल शिंद्यांस द्यावयास केली तीस नेणार अशी बातमी त्यानें सांगितली. स्वार व चार उंट आहेत. घाटग्याचे मुलीकडे जाणार. आतां पुढें माणसें पाठवीत आहेत. बातमी येतांच कळवितों. हे विज्ञापना.

नं. ४०१९ श्री. (आषाढ व० ७–१६ जुलै.)

पै॥ छ० २१ मोहरम. सन समानतिसैन. आषाढ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब साहेबांचे सेवेशीं.

अर्जदास्त जमाल महमद निसबत नवाब सावनूरकर कुरनिसात तसलीमात मारूज[1] उकी (?) नवाब साहेबानीं आपणांस बहुत प्रकारें सलाम सांगितले असे; कीं आपण वडील आहां लडकेवालें कुटुंब सारा आपले कदमासीं लागले आहेत. याची शेर अबरू साहेबांचे पायाशीं लागले असेत. आजी तागायत पुणेंहून कागदपत्र आमचे नांवें येत आहेत ते (येथील अंमलदार) आम्हांस दाखवीत नाहींत. तसेच दाबून ठेवीत आहेत. पुणेंहून सरकारचे कागद राजश्री राघोपंत सुभेदार यांसीं आलेकी हूसेनीमिय्यास चार हजार रुपये देत जाणें. त्याजवरून त्यानीं सनद व पंचवीस स्वार सावनुरास सुभेदार याणीं पाठविले होते तें पण ही माघारे पाठविलें. स्वार ही माघार गेले. त्याजवरून खैरमिय्या कडील कारकून व हकीम सरकारांत जाऊन बोलिले कीं, उभयतां भाऊ एक दिल होऊन खुषीनें दौलत खैरामि-

---

१ मारूज ई के = विनंती ही कीं

त्यास दिली. ऐसें बोलिलेवरून तेथून राजश्री गोपाळराव यांसी रुपये कबूल होऊन सरकारचे पत्र खैरमिय्याचें नांव करून पाठविलें कीं, तुम्ही उभयतां भाऊ एकदिल राहिलां तर तुमचे बंदोबस्त करून देऊं. ऐसें पत्र आलें आहे. त्याजवरून गांवांत साखरा वाटिल्या. उपरांतिक खैरमिय्यानें (आम्हांस) सांगून पाठविलें कीं, तुम्हांस नबाबगिरी श्रीमंत भाऊसाहेब याणीं दिली होती. आतां आम्हांस नबाबगिरी सरकारांतून श्रीमंतानीं दिली आहे. तुम्ही आमचे मुजरेस येणें. त्याजवरून सांगून पाठविलें कीं, तुमचे कयाज आम्ही मुजरेस येत नाहीं. पुणेंहून सरकारचा हुकूम येईल तेव्हां येऊं. असें सांगोन पाठविलें. खर्चास दरमहा पन्नास होन द्यावें ऐंसे बोलिले होते त्यांस चार महिनेंत पंचवीस तीस होन पाठविले. खर्च ऐसा. जीव आहे. आपले आधारावरून व श्रीमंतांचे हुकुमावरून नबाबगिरीस बसलों होतों. त्यास येथील कैदेंतून काढवून पुणेंस पाठवून द्यावे ऐसे आपण करावें. आपण वडील काका मेहेरबानगी करून पेशजी शिक्के मोहोर-सुद्धां पत्र पाठविलें होतें तें पाहून बहुत खुशाल जाहलों. (नबाबानीं) कागद आपण लिहून पाठवावा तर चांगलें लिहिण्यास येत नाहीं. या प्रमाणें नबाब हुसेनीमिय्यानीं बोलून आम्हांस साहेबांकडे पाठविलें असे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०२० श्री. (१७ जुलै.)

पै॥ छ० २६ मोहरम. सन समानतिसैन.

तीर्थस्वरूप राजश्री बाळा साहेब वडिलांचे सेवेशीं

[1] विज्ञापना. वडिलीं श्रीमंत राजश्री आनंदराव दादांस पत्र पाठविलें तें पावलें. खातरजमा करून घेऊन हवालीं करावें म्हणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें करितों. वडिलीं लिहिलें कीं, आर्यांकडे कारकून गेला पाहिजे. त्यास गोखले याची परवानगी घ्यावी म्हणोन लिहिलें;

---

१ बाबा काळे याचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ रास्ते.

त्यास आजच कांहीं जाऊन कारकुनानें विचारून यावें ऐसी निकड नाहीं. राजश्री माधवराव रास्ते बहुत खटपट आम्हांविषयीं करितात. होऊन येण्याची वेळ जेव्हां येईल तेव्हां सिद्ध होईल ! एक राजश्री नानाचा धाक बहुत होता, तेवढी राजश्री माधवराव याणीं परवानगी घेतली. आतां शिंदे यांचे घरीं खटपटीस लागले आहेत. तेथें[1] रोज एक कारभारी,याजमुळें संकट आहे. कृष्णाजी शेव्याचा भाऊ बाणाजी हल्लीं कारभार करीत आहे त्यासीं जाऊन बोलिले आहेत. माझें संधान मोरोपंत नेवासकर याजकडे होतें. त्यांचें रास्ते यांचें एक करून दिलें आहे. परंतु आज चार दिवस वार्ता उठली आहे कीं, बाणाजीचा कारभार वि[2]दुर काढतात. तेव्हां कैसे करावें ऐसीं अनेक संकटें आहेत. मुख्य लेखक मुख्याचा धाक बहुत होता तो सुलभसा दिसोन आला आहे. [3]यांचे मतें ती॥ भाऊंचें कांहीं समूळ बुडवावें ऐसें नाहीं. श्रीमंत मात्र अविचारास प्रवर्तले आहेत त्यास इलाज नाहीं. श्रीमंतांचे अति आग्रहामुळें लेखक उगेच आहेत. नाहीं तर ती॥ राजश्री भाऊचें कसेंही असो, बरें करावें, ऐसा मानस आहेसा भासतो. आपण म्हणतील, जर इतकी ममता लेखकाची आहे तर जप्तीचा अनर्थ कशासाठीं ? त्यास जप्तीची तंबी असावी म्हणोन राखिली आहे. श्रीमंतांपुढें इलाज नाहीं. श्रीमंतांकडून नानांस वरचेवर निरोप येतात कीं, भाऊंची सर्व चीजवस्त आणा ! ऐसीं सांगणीं येतात त्यांची समजाविसी 'आणितों', अशी करीत आहेत. जर लेखकांचे विचारें निग्रह असता तर आजपर्यंत वडिलांस तरी तेथेंच चैन पडूं देते कीं काय ? जप्तीवाला पैका खाऊन दिवस लोटितो आणि येथें हे उगेच आहेत ऐसें कधीं घडूं न देते ! त्याजमुळें वाटतें कीं लेखकाकडून कांहीं रक्षण करण्याची बुद्धि आहे. आमचें अद्याप नष्टचर्य

---

१ शिंद्याकडे. २ शिंदे. ३ नानांच्या.

सुटत नाहीं. जें करावयास जावें तें लांब धांवतें ! राजश्री बजाबासीं बोलूं लागलों तों ते आज चार दिवस जाहले, नगरास गेले. येईपावेतों बोलणें तैसेंच राहिलें. वडिलीं आंबेकर यांसीं बोलून येथें आले. त्याणीं सर्व वर्तमान बजाबापाशीं बोलिले. नंतर बजाबानीं श्रीमंत राजश्री नानांची कांहीं सोईची परवानगी आपलेस घेऊन पाठविली आहे असें ऐकितों. या प्रमाणें सोईचे स्वालजाब आहेत ऐसा हरबा आपाकडून मला निरोप आला होता. बजाबा तांतडीनें गेले. नाहीं तर सर्व समजून घेतां येतें. आणि आंबेकर माझे ओळखीचा नाहीं, याजमुळें असें घडलें. असो. जर सोईसीं असल्यास फार बरें जाहलें. मंडळीचा वगैरे जो गुंता तेथें उरकावयाचा तो तेथें जप्तीवाले यांजपाशीं उरकूं नये. आणि आपण तीस चाळीस या बेरजेवर चढूं नये. आपण कबूल होत नसतां मी येथें आपले खुणेप्रमाणें कबूल केलें म्हणजे ठीक पडेल. येथें पाऊंणपर्यंत मंडळीचें उरकावें असा भाव दिसतो. आमचाही अजमास तितकाच आहे. त्यांत आपले उभयतांचे विचारें जसी आज्ञा होईल तैशी वर्तणूक घडेल. 'आतां मनाई कां होत नाहीं ?' (असें म्हणाल तर) त्यास रास्ते यांचा कारभार फार सैल आहे. त्यांत कृष्णाजीपंत ढेकणे आहेत ते म्हैसकर यांचे सोबती आहेत. ढेकणें यांचें लक्ष राजश्री व्यंकटराव रास्ते यांजकडे आहे. त्यांत म्हैसकर यांचें आणि ढेकणे यांचें एकमत आहे. ते रास्ते यांसही जड आहेत. बोलून दाखवीत नाहींत. त्यांस वडिलीं तसाच श्रावणमास ढकलावा. इतक्यांत मनाई चिठी खामखां पाठवितों. हल्लीं लेखकाचे घरीं एक

---

१ परशुरामभाऊंच्या पदरच्या लोकांकडून दंड पाऊण लाख रुपये घ्यावे. २ तुम्ही व रामचंद्रपंतआपा. ३ येथें मिरजेस जप्ती बसली आहे तिची मनाई.

नगरचा कारभार चालिला आहे तेवढे महाडास[1] पोंचले म्हणजे मग दुसरा विचार. एक लक्ष नगरचें लागलें आहे. परंतु विदुर लेखकाकडे आहे, तूर्त त्यांस नगरचा किल्ला व पंधरा लक्षांचा मुलूख मिळतो आहे, तेव्हां त्यांस राजश्री मोरोबादादा कशास पाहिजे लोक मागें मनस्वी बोलतात. काय घडतें पहावें. हें सर्व एकीकडे. परंतु श्रीमंत त्रिवर्ग यांचें व कारभारी यांचें मात्र कालत्रयीं बनावयाचें नाहीं. मुख्य जप्तीवाले याजपाशीं मंडळीची बेरीज तिसांवर पस्तिसांवर बोलूं नये, म्हणजे ठीक घडेल. रवाना अष्टमी. सोमवार. हे विज्ञापना.

नं. ४०२१ श्री. (आषाढ व० ८–१७ जुलई)

यादी[2] नांवनिशीं.

किता		किता	
			पटवर्धन.
५०००	बाळाजीपंत सोनी.	२०००	सदाशिव भास्कर.
१०००	बाजीपंत करमरकर.	२०००	बळवंतराव अनंत.
४००	करंदीकर.	४०००	विष्णु अनंत.
०	लक्ष्मण.	२०००	हरि भास्कर.
०	दिनकर.	०	खासा.
४००	विठ्ठलपंत फडके.	०	बाबूराव अप्पाजी कारकून.
४०००	गोपाळपंत सोनी.		
४००	बाबूराव छत्रे यांचे पुत्र.		

१ नगरचे कैदी मोरोबादादा रायगडास पोंचले म्हणजे. २ ही यादी रामचंद्र श्रीधर उर्फ बाबा काळे यांच्या हातची आहे.

३०० त्रिंबकपंत व महादजी-
पंत केतकर.
१००० राघोपंत खरे.
२०० काशी तुकदेव.
२५०० राघो राम व सदाशिव
महादेव सहस्रबुद्धे.
२०० गोविंद रघुनाथ जोशी
२०० बाळाजी धोंडदेव भावे
१५०० बाळाजी तुकदेव व
अमृतराव सागाव (?)
२०० गोपाळ विठ्ठल व नर-
हर विठ्ठल.
१५०० लक्ष्मण महादेव व
गोपाळ महादेव देवधर.
१००० वासुदेव काका.
२०००० सदाशिव कृष्ण.
३००० भास्कर सखदेव.
२००० माणिकराव केशव.

४४८००

१ खुद्द
२ आपाजी श्रीनिवास
३ लक्ष्मणपंत

२००० निळो अप्पाजी पोंक्षे.
६००० नरसिंगराव उडपी.
२०० शिधो गंगाधर गोडबोले.
४००० कृष्णापा नाईक कलकेरी
६००० बाळकृष्णपंत लागू.
४००० नारायणराव लागू.
२०० चिंतो नारायण जोशी.
१००० रामचंद्र अप्पाजी कोट-
बागी.
२००० येसाजी गोविंद गोगटे.
२०० राघो भगवंत वसगडे.
२०० बाळाजी गंगाधर जोशी.
३०० जनार्दन चिंतामण साठे.
२०० अप्पाजी भगवंत.
१०० बाळोबा शेणवी.
२०० बनाजी जिवाजी.
४००० चिंतो अनंत देवधर.
१६०० लक्ष्मण महादेव पेंडसे.
४०० सदाशिव गोपाळ काळे
४०० अप्पाजी गोविंद जोशी
नेहमीं अडूरची मामलत.

४३०००

४००० येसोबा गोकाक

---

१ आपाजी भगवंत रानडे हे जस्टिस महादेव गोविंद रानडे यांचे पणजे. गोविंद अमृत व अमृतराव आपाजी या मधल्या दोन पिढ्या.

याशिवाय नांवनिशी नादार आहे ती--

- संक्राजीपंत लिमये. ठाउक नाहीं.
- पांडोबा गोखले शागीर्द.
- गिरमाजीपंत मयत सरकारांत फडशे झाले. केसो सदाशिव (काळे).
- खुद्द.
- बाबूराव.
- सखो काका व कोंडोपंत.
- सदाशिवपंत परांजपे.

बाळंभट वाटवे.
पांडुरंग शिवराम लिमये(यांस)
गोविंदराव नीळकंठ.
यांजकडून वांटणी
देववून मग काय घेणं तें घ्यावें.

- आपा बळवंत यांचे सर्वस्व पूर्वीच उरकलें.
- लक्ष्मी नरसिंह हरदासपंत यांचे पुत्र. पोटभरू.
- नागो बल्लाळ व बापू यांचें पूर्वींच उरकलें.
- रघुनाथ भट काळे व सदाशिव भट वैद्य.
- मल्हारराव. फक्त शिलेदार.
- विसापा आपटे याचा मूल. कर्ता नाहीं.
- बाळाजीपंत भिडे.
- गणेश हरि बर्वे.
- गोपाळ बचाजी रिसबूड. शागीर्द.
- या यादी शिवाय दुसरी याद आहे तिजवर नांवनिशी आहे त्यांचे नांवें बेरीज भरावयाची आहे. येथें सवते म्हणतात.

येणेंप्रमाणें याद आम्ही केली आहे. आपले मतें दोनी यादी मिळून एकांवर ठरलें तर तोडावें. ते सव्वास[1] कमी होत नाहींत. याच यादीवरून सरासरी पाउणाची बेरीज दरनांवाखालीं घालून बजाबास दाखविली. परंतु आपली याद येणें सबब मार्गप्रतीक्षा

---

१ एक लक्षावर.

आहे. आपली याद कृष्णराव यांजपाशीं चाळिसांची. यादी जाजती होऊं नये.

नं. ४०२२ श्रीगणराज. (आषाढ व० ८–१७ जुलै.)

पै॥ छ० २७ मोहरम. सन समानतिसैन. आषाढ.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २२ मोहरम पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असे. विशेष. अलीकडे दहा पंधरा दिवस पांचवे मोहरमपासून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तर असें न करावें. सदैव आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर श्रीमंतांच्या स्वाऱ्या नेहमीं बाहेर जात असतात त्या प्रमाणेंच हल्लीं जात असतात. कळावें. भोसले याणींही आपला तळ चाळविला आहे. खडकीचे तळावरच आहेत. बुणगें मात्र पुढें गेलें. बुणग्यांत कांहीं जवाहीर होतें तें कोरेगांवचे नदीस पाणी आलें तेव्हां नावेंतून पलीकडे उतरून नेऊं लागले तेव्हां नाव फुटोन बुडालें अशी बाजारी वदंता आहे. खरें लटकें ईश्वर जाणे. नगरचे किल्यांत गृहस्थ कारागृहीं आहेत त्यांस आणावयाकारितां दादा गद्रे व बजाबा शिराळेकर चार हजार फौज आणावयास गेली आहे. तेथें कांहीं किल्लेदाराची व इकडील गृहस्थ गेले त्यांची व किल्लेचे लोकांची कटकट होऊन गोळा गोळी जाहली याप्रमाणें बाजारवदंता आहे. मागाहून तथ्य लिहून पाठवितों. कळावेंकरितां लिहिलें आहे. जें आढळेल तें मागाहून सविस्तर विस्तारें लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०२३ श्री. (२० जुलै.)

पै छ० २ सफर सन समान तिसैन.

पुं॥ सेवेशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. नगरांतील गृहस्थ

---

१ मोरोबादादा. २ बाबूराव म्हैसकर याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

आषाढ व॥ ११ स निघावे असा निश्चय होऊन पत्रें आलीं. निघाले असतील. आज पत्रें येतील. आल्यानंतर लिहून पाठवितों. श्रावणमासची दक्षणा गुदस्तप्रमाणें द्यावी असा ठराव होऊन एकादशीस वाड्यांत द्यावयाचा प्रारंभ जाला. स्वामीस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ४०२४ **श्रीगणराज.** (आषाढ व० १२-२१ जुलै)

पै॥ छ० २ सफर. सन समानतिसैन. श्रावणमास.

तीर्थस्वरूप राजश्री काकासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत छ० २६ मोहरमपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. अलीकडे सतरावे मोहरमपासून पत्र येत नाहीं, त्याजवरून मोठी काळजी लागली आहे. तर ऐसें न करावें. सदैव पत्र पाठवून बालकाचा सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर भोंसले निघोन गेले. भीमा उतरले म्हणोन वंदता आहे. परंतु तथ्य आहे. भोसले यांचे लष्करचे हत्ती व उंट घोडीं पोटास नाहीं सबब जागोजाग राहिलीं, या प्रमाणें वर्तमान आहे. परंतु खरेंच आहे. मागाहून जें आढळेल तें सविस्तर लिहितों. शिंदे यास दोन चार दिवस ज्वर येत आहे म्हणोन उभयतां श्रीमंत समाचारास गेले होते. कंपूंतील पलटणें व तोफा वाड्याभोंवतीं आहेत त्याप्रमाणेंच आहेत. प्रजेचा कधीं भोग सरतो पहावें ! विसाजी नारायण वाडदेकर यांचे समाचारास काल बाबूरावास पाठविलें होतें. त्याणीं सांगितलें कीं, अतःपर वांचणें गोष्ट कठीण. उदरानें व्यापलें. उरास पोट लागलें. या प्रमाणें मशारनिल्हे याणीं सांगितलें. वडिलांस कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. नगराकडील वर्तमान स्तब्धच आहे. काय होतें पहावें. मागाहून दरबारचें व बाजारी वर्तमान आढळेल तें सविस्तर लिहून पाठवितों. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०२५ श्री. (आषाढ व० १३–२२ जुलै.)

पौ छ० २७ मोहरम. सन समानतिसैन. आषाढ.

पुा सेवेशीं शिरसाष्टांगनमस्कार विज्ञापना. नगरांतील गृहस्थास रायगडास आणावयाचा निश्चय करून राजश्री दादा गद्रे व बजाबा शिराळेकर फौजसुद्धां गेले आहेत. त्यास त्या गृहस्थाचा तर न निघण्याचा आग्रह आहे. एकादशीस काढतों असें गद्रे यांचें पत्र आलें आहे. शिंदे यांजकडील ही कांहीं फौज व पायदळ नगरास आहे. गृहस्थ रायगडास दाखल होत तों पावेतों लोक मनस्वी बोलतात तें शेंवटास जाणार नाहीं. परंतु शिंदे याणीं कारभारी यांची खातरजमा केली आहे जे, रायगडास पावते करूं. उपरांतिक नगर आमचे हवालीं व्हावें. असे करार आहेत. श्री॥ राजश्री बाजीराव साहेबानीं ह्णमंतराव म्हणोन भिल्लांचे पारिपत्यास पाठविला होता त्याजपाशीं दोन हजार स्वार आहेत. तो सरकारचे हुजरे गेले असतां धठाई करितो. परंतु तो ही नगराचे आसपास आला आहे. पुढें कसा परिणाम होईल पहावें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४०२६ श्रीगणराज. (आषाढ व० १३–२२ जुलै.)

पैा छ० २७ मोहरम. सन समानतिसैन. आषाढ.

विज्ञापना. विसाजी नारायण वाडदेकर यांस उदराची भावना जाली आहे. म॥ निल्हे बहुत जेर जाले आहेत. दैवानें वांचले तर नकळे. मी ही दाजीबा म्हैसकर यांस समाचारास जावयास सांगितलें आहे. मशारनिल्हे चांगले होते. काय होतें पहावें. कळावें कारितां विनंती लिहिली आहे. हे विज्ञापना.

नं. ४०२७ श्री. (२२ जुलै)

पैा छ० २ सफर. सन समानतिसैन. श्रावण.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

---

१ बाबूराव म्हैसकर यांचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

विनंती सेवक धोंडो बापूजी व मोरो आपाजी परांजपे. दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत आषाढ वद्य १३ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजकी मजकूर आधिकोत्तर नाहीं. राजश्री मोरोबा दादा यांस आणावया करितां दादा गद्रे गेले आहेत. दादा गद्रे यांचें (व त्यांचें) बोलणें जाहलें. एकादशीस नगराहून निघतात म्हणोन श्रीमंत राजश्री नानांकडे पत्रें आलीं म्हणोन बातमी आहे. किल्ल्याखालीं आल्याचें वर्तमान नाहीं. बहुता अर्थी हस्तगत व्हावे असें लोक म्हणतात. श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांचे अंग आहे अशी लौकिक वार्ता आहे. परंतु दिसत नाहीं. एक दोन दिवसांत काय तें होईल. मागाहून विनंती लिहितों. जिनसाचा वगैरे दर पेशजी लिहिला आहे त्याच प्रमाणें आहे. तूप एका एकीं एकशेर आद पावाचा दर आज दोन दिवस जाहला आहे. बट्टा चांदवडीस हल्लीं शिक्यास साडेतीन रुपयांचा जाहला आहे. मशीर फौजसुधां भागानगरास गेला. नबाबाची भेट जाहली. खलबत जाहलें. एकलासी जाहली. तीन कोटींची खुशालपट्टी व कर्जपट्टी केली आहे. शिवाय इनाम एक साल व रयतेवर ऐन जमेवर सवाई जाजती एक साल, या प्रमाणें पैका घेणार. पट्टी जाहली म्हणोन बातमी दाट आहे। मागाहून विनंती पत्रीं लिहितों. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ४०२८ श्री. (आषाढ व० १४–२२ जुलै.)

पैा छ० १७ सफर. सन समानतिसैन. श्रावण.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें रामचंद्र श्रीधर शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ० २८ मोहरमपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. रूपसिंग म्हणोन कोणी भला माणूस आहे त्याची घोडी मिरजेंत दमनसिंग म्हणोन कोणी आहे त्याणें घेतली आहे.

त्यास रूपसिंग आपलेकडे आला होता. वडिलीं न्यायही मनास आणिला. दमनसिंगाची घोडी नव्हे, रूपसिंगाची घोडी, असेंही ठरलें आहे. परंतु कोणी गृहस्थानें अटकाव केला आहे. घोडी मिरजेहून हातास येत नाहीं, ऐसा वाका येथें राजश्री दौलतराव शिंदे बहादर यांचे कानावर घातला. तेव्हां बक्षीस आज्ञा जाहली आहे कीं, मिरजेस पन्नास राऊत पाठवून रूपसिंगाची घोडी व तरवार देवणें, ऐशी परवानगी झाली आहें असे एका गृहस्थानें कळविलें. तेव्हां शिंदे यांचे घरचा कारभार. स्वार जाऊन खटला होणें ठीक नाहीं. हें मला आढळलें म्हणोन सेवेशी विनंती लिहिली आहे. तर वाजवी रूपसिंग याची घोडी दमनसिंग याणें देणें आहे तर सोडून देवावी. हा वाका समजल्यावरून सेवेशीं श्रुत व्हावा म्हणोन लिहिला आहे. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०२९ श्री. (२७ जुलै)

पै॥ छ० ६ सफर. सन समान तिसैन. श्रावणमास.

सेवेशीं धोंडो बापूजी व मोरो आपाजी परांजपे. दोनी कर-जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून सिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत श्रावण शु॥ ४ पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री मोरोबा दादास बलात्कारें घेऊन जातात. ऐसे समजलेवर त्यांनीं शिखा सूत्र वस्त्र तीन्ही टाकिलीं आणि मग खालीं आले. (बरोबर) एक विद्यार्थी आहे. परमहंस दीक्षा घेतली. परंतु सभोंवती चौकी गद्रे यांची आहे. पुण्यास पत्रें श्रीमंतां-कडे व नानांकडे तेथून आलीं आहेत. "गंगातीरीं ठेवावें. अथवा त्यांची मर्जी श्रीकाशीस जाण्याची असल्यास उत्तर पाठवावें. म्हणजे सरंजाम येथून पाठवूं" अशीं पत्रें गद्रे यांजला येथून गेलीं. दादा गंगातीरीं राहत नाहीं. श्रीकाशीस जाणार असा सुमार आहे. परंतु

कोठें राहूत, चौकींत ठेवणार, श्रीकाशीस गेल्यावर मग चौकी नाहीं, असा बेत आहे. शिंदे यांचें निशाण किल्यावर चढलें. धोंडोपंत खालीं जमाव सुद्धां सत्वर उतरणार. याजप्रमाणें बाजार वर्तमान तथ्यांत बोलतात. येविषयींचा मजकूर राजश्री दाजीबांनीं वडिलांस लिहिला असेल. (मोरोबा) दादा उपोषणें करितात. पांच जाहलीं. येथें पुण्यांत त्यांची स्त्री अन्न घेत नाहीं. दोन रोज झाले. अशी बाजार बोलवा आहे. कळावें. श्रावणमासचे समारंभास शिध्यास ब्राह्मण सालाबादपेक्षां (जातती आहेत.) प्रथम दिवशीं तीस हजार जाहले. गुदस्तां वीस हजार होते. यंदां दहा हजार जास्ती जाहले. दुसरे दिवशीं छत्तीस हजार शिधा पावले. तीन हजार ब्राह्मण फिरोन रिकामे आले. दिवसेंदिवस चढत जातात. यंदां ब्राह्मण पंचावन साठ हजारपर्यंत होईल अशी बोलवा आहे. ब्राह्मण गांवांत रस्त्यांतून बहुत दिसतात. वाड्यांत दक्षणा गुदस्तप्रमाणें दिली. नवीन ब्राह्मणही लिहिले. त्यास आंख उत्तम पंधरा वीस पंचवीस चाळीस पर्यंत वैदिकांस घालून रुपये दिले. कागद गड्डचा पेशजी पाठविल्या त्या पावल्याचें उत्तर पाठवावयास आज्ञा करावी. राजश्री रघोजी भोसले दर कूचकरून नागपुरास गेले अशी बोलवा आहे. पेणकर ब्राह्मण यांचा व परभूंचा कजिया मागेंपासून आहे. तिगस्तां भारी कजिया हो(ता). अय्याशास्त्री असतां अमुक तऱ्हेनें त्याणीं वर्तावें असें ठरावांत आलें होतें. कांहीं चालचालण पडलें होतें, अलीकडे दंग्यामुळें तसाच प्रकार होता. हल्लीं यंदां पेणकर याणीं एकोपा करून मागती परभूंचा बंदोबस्त पक्का करावा या बेतांत आहेत. काशीकर मंडळी थोर ब्राह्मण यांजकडे जाऊन बोलोन आले. दक्षिणेचा समारंभ जाहल्यावर कजिया करणार. गायकवाडाकडून परभू सरकारांत वाकिलीस आला आहे. पोक्त सरंजाम आहे. त्यासच आधीं शिक्षा करणार अशी बोलवा आहे. परंतु कजिया मागती

माजणार. कळावें. विसाजीपंत वाडदेकर याजला उदराची भावना जालीच होती. त्याच रोगानें व्याप्त होऊन देवाज्ञा जाहले. आज पांचवा दिवस. दोघी स्त्रिया समागमें जाणार असें होतें, परंतु श्री॥ राजश्री नानानीं बापूजीपंत बापट यांस पाठवून समाधान करून उभयतांस राहविलें. तुमचा बंदोबस्त उत्तम प्रकारें करून देईन असें सांगून नानानीं पाठविलें.

नं. ४०३० श्री. (श्रावण शु० ४-२७ जुलै.)

पै॥ छ२३ रबिलावल. सन समानतिसैन. भाद्रपदमास.

राजश्री गंगाधर राव गोसावी यांसीं

अखंडित लक्षी अलंकृत राजमान्य दौलतराव शिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. रूपसिंग परदेशी निसबत लष्कर याची घोडी व तरवार दमनसिंग मिरजेंत राहतो त्याच्या लेंकानें नेऊन ठेविली आहे रूपसिंग मागत असतां धटाईच्या गोष्टी सांगोन घोडी व तरवार देत नाहीं म्हणोन कळलें, त्यावरून हें पत्र आपणास लिहिलें आहे तरी दमनसिंग याजकडील घोडी व तरवार आणावयासीं इकडील पागेकडील स्वार दमनसिंगाकडे पाठविले आहेत. त्यास दमनसिंगास आपण निक्षून ताकीद करून रूपसिंग याची घोडी व तरवार देवावी. दिक्कत न पडे तें करावें. रवाना छ०२ सफर. बहुत काय लिहिणें. हे विनंती.

नं. ४०३१ श्री. (श्रावण शु० ४-२७ जुलै)

पै॥ छ० २ सफर. सन समानतिसैन. श्रावणमास.

पुरवणी. [1]सेवेशीं शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. परवां जवाहीरचंदाचें पत्र आलें जे, श्रीमंतानीं सांगितलें, पाऊस पाणी पडल्यानंतर महिन्या दोन महिन्यांनीं सोईसोईनें ऐवज पावेल. त्याजवरून त्याणें आपले भावास लिहिलेंजे, ऐवज लवकर

---

१ जनार्दन शिवाजी म्हैसकर यांचें पुण्याहून मिरजेस पत्र.

हातास येण्याचा नाहीं. तुम्ही तेथें म्हैसकर यांस तगादा करावा. त्याजवरून बहुत तगादा जाहला आहे. शिंदे यांचे प्यादे बसले आहेत. दररोज पांच रुपये प्याद्यांचे घेतात. बहुत तगादा जाहला आहे. अब्रूवर आलें ते वेळेस जाऊन श्रीमंत राजश्री नानांस विनंती केली जे, आमची अब्रू रहात नाहीं. मारले जातों. त्याजवरून नानानीं सांगितलें जे, याणीं मिरजेस लिहिलें आहे; त्याची उत्तरें येईतों अब्रूवर येऊं नये. नच ऐवज आल्यास कळेल तसें करावें. ऐवज द्यावा. आम्ही ही येविषयीं मिरजेस पत्र पाठवितों. असें नानानीं सांगितलें. त्यावरून चार दिवस रोज मात्र घेऊन होते. हल्लीं फिरोन मोठी तसदी जाहली. त्याजवरून विनंती लिहिली आहे. तर सत्तावन हजार रुपये लौकर पदरीं घालोन, ऐवज पदरीं पडला अश्या सावकाराच्या चिठ्या घेऊन पाठवाव्या. व बाकीचा ऐवज रोकड पाठविला तरच वांचतों. वारंवार स्वामीस कोठवर लिहावें ? स्वामींस वेढगस्त जाहली. आज समय स्वामींवर. त्यांत सरकारची निकड. या प्रकारचा उपाय राहिला नाहीं. त्यास हरकसेंही करून सावकाराची समजूत पाडून चिठ्या आल्या पाहिजेत. व बाकी लाख रुपयेचे भरतीचे रोकड पाहिजेत. हल्लीं कोणी हुंडी घेत नाही. चांदवडीस व शिक्क्यास सव्वातीन रुपये चवलाचा भाव झाला आहे याजमुळें हुंडी होत नाहीं. रोकड पाठविली पाहिजे. दिवसगतीवर घालावयाचा समय नव्हे. सत्वर ऐवज आला पाहिजे. सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं ४०३२ श्री. (२८ जुलै)

पै॥ छ० सफर. सन समानतिसैन.

विज्ञापना. नगरचा मजकूर पहिल्याने मशीरास निरोप

---

१ धरणेंवाल्यास सांगितलें. २ बाबाकाळे यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

द्यावयास जेव्हां सर्व मंडळी गेली होती, त्यासमयीं गद्रे नगरास जाऊन तेथून मयूर[1] नामकास घेऊन महाडास जावें या बेतानें गेले होते. बहुत प्रकारें सांगितलें कीं, नगर किल्ला शिंदे यांस देणार, त्यास आपण महाडास चलावें. तेव्हां त्याणीं उत्तर केलें कीं, महाडास येत नाहीं. आज वीस वर्षेंपर्यंत नगरकर मामलेदार यांजपाशीं आहें. फितूर केला नाहीं. तर पुढें ही यांजपाशीं राहीन. यांचे स्वाधीन त्रिंबक वगैरे किल्ले आहेतच. महाडास न्याल तर येत नाहीं. तेथें पेशजी सखाराम पंत याणी कैलास वास केला आहे. तेथें मी येत नाहीं. मी बंदिवान. मला पाहिजेतर सोलापुरास ठेवा, अथवा मिरजेस ठेवावें, अथवा नगरकर मामलेदार यांचे हवालीं असावें. असें घडत असल्यास सिद्ध आहें. याजप्रमाणें दादाचें बोलणें पडलें आणि गद्रे यांस मामलेदार याणीं ही सांगितलें कीं, तुम्ही आग्रह न करणें. तेव्हां ते गेले. काम फसलें. आणि गद्रे जें सामान घेऊन गेले होते तें व्यर्थ जाहलें. येथून श्रीमंत राजश्री नानांचें ही पत्र त्यांस न आणतां तुम्ही निघून येणें ऐसें गद्रे यांस गेलें. गद्रे येथें आल्यावर मागती मनसबा केला कीं, मामलेदार याणी नेऊं नका म्हणावें याचें कारण काय आहे? तेव्हां कांहीं बोजा आहे. तर कसेंही करून तेथून काढून महाडास न्यावें. ऐसाच मनसबा ठरून, शिंदे यांचें पक्कें संमत घेऊन श्रीमंतांचीं पत्रें मामलेदार यांस घेऊन मागती गद्रे यांस पाठविलें. बरोबर राजश्री शिराळेकरही दिले आहेत. आंतून मामलेदार यांस श्रीमंतांनीं चिठी पाठविली होती असें ऐकत होतों. परंतु तितकेंच तोंड नानांनीं बांधून खटपट करून किल्ले नगर येथून बाहेर काढूं लागले. तेव्हां मयूरपंत याणीं सांगितलें कीं, जर मला जबरदस्तीं करून महाडास नेऊं लागलां तर एक प्राणत्याग अथवा चतुर्थाश्रम करीन; ऐसें म्हणत असतां आषाढ वद्य ११ चे दिवशीं गद्रे याणीं स्थळच्या गृहस्थास बाहेर आणूं लागले. त्या समयीं त्याणीं कौपीन

1 मोरोबादादास.

परिधान केलें. शिखेचे दोन केश उपडले, आणि ब्रम्हसूत्र तोडिलें. एक प्रेष साक्षीसह उच्चारावा तेवढें मात्र राहिलें आहे. ऐसें जाहलें असतां ही गद्रे याणीं आपले राहुटीस आणून ठेविले आहेत. दादाचें म्हणणेंच आहे कीं, येथून मला महाडास न्यावयासाठीं उचललेंत म्हणजे प्रेषोच्चार स्वयमेव करितों! मग तुमच्या विचारें येईल तें करणें. अथवा जर नगरकर यांचे हवालीं करीत असल्यास मग पूर्ववत् प्रमाणें राहीन. नाहीं तर हें करीतच आहें. ऐसा निग्रह आहे. श्रीमंत बहुत दिलगीर आहेत. कांहीं चालत नाहीं. शिंदे यांजकडे जातात. ते म्हणतात, आम्ही नानास वचन दिलें आहे त्यापेक्षां मोरोबांस नाना कां नेईनात? ऐसें स्पष्ट विदुर बोलतात. मग यांचें काय माहात्म्य आहे तें कळतच आहे! श्रीमंत मध्यम यांचें कोणतेंही स्थिर ठीक नाहीं. गद्रे यांचें व शिराळेकर यांचीं पत्रें येथें नानांकडे आलीं आहेत विचार करीत आहेत. काल राजश्री मोरोपंत गडबोले, त्रिंबकपंत गडबोले यांचे चिरंजीव, यांस नगरास सर्व विचार पहावयास पाठविले आहेत. परंतु येथील कारभारी यांचा कृतसंकल्प आहे कीं, संन्यास जरी घेतला तरी सोडावयाचें नाहीं! तैसेंच संन्याशानीं महाडास रहावें. ऐसा रंग दिसतो. या उपरी काय होतें पहावें. ऐसा प्रकार घडला आहे. नगरास कलागत जाहली नाहीं. व्यर्थ आवाया मात्र आहेत. जर शिंदे यांचें अंग कांहीं मयूराकडे असतें तर ठीक घडतें. तें कांहीं नाहीं. ते लोभाविष्ट आहेत. तूर्त पंधरा लक्षांची जहागीर व नगरचा किल्ला प्राप्त होत आहे, मग त्याणी कां ओढावें? श्रावण मासची दक्षणा गुदस्ताप्रमाणें जाहल्यास फार आहे. रवाना भृगुवार. नागपंचमी. हे विज्ञापना.

नं. ४०३३ श्री. (श्रावण शु० ५—२८ जुलै)

पै॥ छ० ६ सफर. सन समानतिसैन. श्रावणमास.

सेवेशीं बाबूराव शिवाजी म्हैसकर दोनी कर जोडून साष्टांग

नमस्कार विज्ञापना तागायत छ० ३ सफरपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून अलीकडे पत्र येऊन सांभाळ होत नाहीं' तर सदैव पत्रीं सांभाळ करावयाची आज्ञा जाहली पाहिजे. यानंतर राजश्री बजाबा शिराळेकर यांनीं श्रीमंत राजश्री नानांचें पत्र स्वामीस मागितलें जे, श्रीमंत राजश्री भाऊसाहेबां-कडील असाम्यांचे फडशांकरितां आपण पत्र द्यावें म्हणजे कृष्णराव यांस पाठवून ठराव करितों. त्याजवरून नानानीं स्वामींच्या नांवें पत्र दिलें तें पत्र घेऊन कृष्णराव मिरजेस गेले. तेथें असाम्यांचा ठराव स्वामीनीं करून देविला म्हणोन ऐकिलें. त्याजवरून विनंती लिहिली आहे. त्यास मी येथें आल्यानंतर श्रीमंत राजश्री नानांनीं सांगितलें जे, असाम्यांचे ठराव करावे व पागा पीलखाना वगैरे हवालीं करवावा. तेव्हां नानानीं असाम्यांची यादही आम्हांस पहावयास दिली त्याची नकल स्वामींकडे पाठविली. असें असता परभारें फडशे झाले तेव्हां येथील समजुतींत आलें जे, इतकी वोढ घेत होते. तेथें वोढ किमपि नाहीं ! असा प्रकार झाला. आणि मी तर चार महिने विनंती लिहीत गेलों जे, असाम्यांचा ठराव व्हावा. तेव्हां स्वामी लिहीत गेले जे, गोरगरिबांकडे काय आहे ? आणि हल्लीं कृष्णराव आले; ठराव करितात, असें किमपि न लिहितां ठराव केला ! याजमुळें दरबारांत (आमचें) हंसें जाहलें. आमचे विचारें होतें म्हणज आमचा बोज राखून यथास्थित घडतें. स्वामी सर्वजाण आहेत. मी विनंती लिहावी असा प्रकार नाहीं. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४०३४ श्री. (श्रावण शु. ७–३० जुलई)

दक्षणा+ श्रावणमासची रमण्यांत. सुरु सन समानतिसैन. शके १७१९ इस्तकबील छ ४ सफर ता॥ छ ५ मिनहू.

+ याच मजकुराचें विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र आहे तें ५ आगस्टचें आहे. म्हेसकराच्या या पत्रापेक्षां त्यांत अधिक मजकूर ' येणेंप्रमाण दक्षिण झाली. श्रीमंतांची मोठी कीर्ति झाली' एवढें एकच वाक्य आहे; तें पत्र येथें घेतलें नाहीं.

श. १७१९ **मोरोबादादाची भानगड.** इ. स. १७९७

	ब्राह्मण.	रुपये.	शेरा.
दरवाजा पहिला	१२०१०	७९३००	६॥-॥
दरवाजा दुसरा	९५३२	४७०००	४॥≋
दरवाजा तिसरा	९९७४	४८६२०	४॥=
दरवाजा चवथा	१३०००	५७६६३	४ ।≋
दरवाजा पांचवा.	५४५०	५९७०२॥	१०॥≋।
	४९९६६	२९२२८५॥·	
		शेरा सरासरी	५॥-॥

गुदस्तां--

ब्राह्मण	रुपये	शेरा सरासरी.
३६२१२	१४०१४३	३॥·।

जास्ती सालमजकुरीं

ब्राह्मण	रुपये	शेरा ज्यास्ती
१३७५४	१५२१४२॥·	२८।

नं. ४०३५ **श्रीगणराज.** (श्रावण शु० ८–३१ जुलै.)

पै॥ छ० ६ सफर. समान तिसैन.

विज्ञापना. नगराकडील मजकूर राजश्री दादा गद्रे व राजश्री बजाबा शिराळेकर उभयतां फौज घेऊन राजश्री मोरोबादादा यांस आणावयास गेले होते. त्याणीं सांगितलें कीं; मी येत नाहीं. मला बलात्कार केल्यास मी प्राणत्याग करीन. याणीं सांगितलें कीं, आपण बरे गोष्टीनें आल्यास उत्तम. नाहींतरी आम्ही उचलून नेऊं! असा त्यांचा करार पाहून मग एक दोन दिवशीं निघतों म्हणोन करार करून आतुरसंन्यासग्रहण केलें, म्हणोन गद्रे यांची पत्रें आलीं कीं यानीं संन्यासग्रहण करून अन्न वर्ज्य केलें. पुढें कसें करावयाचें? म्हणोन पत्रें आलीं. येथील मजकूर असा दिसतो.

---

१ विठ्ठलराव पांडुरंग याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

संन्यासही घेतला तरी तसेंच आणोन दुर्गवासी करावें, असें बाजार वदंता लोक बोलतात. पुढें काय होतें पहावें. श्रावणमासचा समारंभ वर्षीप्रमाणेंच होणार. मंत्रोच्चारें करून संन्यासग्रहण झालें कीं कसें हें कळलें नाहीं. सविस्तर तथ्य मागाहून लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०३६ श्री. (श्रावण शु० ८--३१ जुलई.)

पै॥ छ० ६ सफर सन समान तिसैन.

विज्ञापना. नगरच्या गृहस्थाचा बंदोबस्त जाहला. अत:पर येथील वाड्यांत जाजती याहून बंदोबस्त होणार अशी वदंता आहे. काय घडेल पहावें. हे विज्ञापना.

नं. ४०३७ श्री. (श्रावण शु०८—३१ जुलई.)

पै॥ छ० ६ सफर. श्रावण. सनसमान तिसैन.

विज्ञापना. विसाजीपंत वाडदेकर यांस उदर होऊन आषाढ कृष्ण अमावास्या रविवारीं देवाधीन जाले. ईश्वरें मोठें अनुचित केलें. होणारास उपाय नाहीं. थोरले बायकोचे चित्तांत सहगमन करावें असें होतें, परंतु आग्रह करून राहविली. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०३८ श्री. (श्रावण शु० ९—१ आगष्ट.)

पै॥ छ० ११ सफर. सन समान तिसैन. श्रावणमास.

सेवेशीं बाबूराव शिवाजी म्हैसकर दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ७ सफरपावेतों स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं ज्योती खीरसागर याजबरोबर छ० २९ मोहरमचीं पत्रें पाठविलीं तीं छ० ३ सफरीं पावोन लिहिला मजकूर कळला. "राणोजी घाटगे

---

१ बाबूराव म्हैसकर वकील याची पुण्याहून चिठी मिरजेस. त्याचप्रमाणें पुढच्या नंबरची.

देशमुख प्रांत कागल यांची वडील भावजय सगुणाबाई घाटगी यांचे पोटीं पुत्र संतान नाहीं, याजकारितां सरकारांतून डिगरज कर्यातीचा हक्क रुसुमाचा ऐवज पोटखर्चास देविला. हुजूरचीं पत्रेंच येविषयीं आलीं आहेत. त्यास हल्लीं करवीरकर महाराज यांचीं पत्रें येतात जे, राणोजी घाटगे यांचे चिरंजीवाकडे डिगरज कर्यातीचा देशमुखीचा ऐवज द्यावा." त्यास येविषयीं सरकारांत विनंती करून ठेवावी म्हणोन लिहिलें, त्यास एक दोन दिवसांत गांठ घालोन विनंती करितों. चि॥ राजश्री बापूजी त्रिंबक परचुरे हिशेबाकरितां कारकून पाठवीत असतां प्यादे ऐकत नाहींत, येविषयीं चिठी घेऊन पाठवावी म्हणोन आज्ञा; त्यास चिठी घेऊन पाठवितों. खटावकरांविषयींचा मजकूर स्वामीनीं रागें भरून लिहिलें जे 'तुम्ही याद व श्रीमंतांचे पत्राची नक्कल पाठविलेली पाहिली किंवा नाहीं ? त्यास पाहिली नाहीं असें कसें घडेल ? परंतु येथें एकाद्या कोणाची भीड घालोन पत्र मागतो. कितीही सांगितलें असतां (नाना) ऐकत नाहींत. तेव्हां पत्र (ते म्हणतील त्याप्रमाणें आपणास) द्यावें लागतें. त्यास स्वामीनीं विचार पाहून वाजवी असेल त्याप्रमाणें करीत असावें. सदाशिवपंत वांकनीस हल्लीं मोठे पेशव्यांचे ! भिडेमुळें पत्र दिलें होतें. स्वामींस कळावें. सेवेशीं-श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०३९[1] **श्रीगणराज.** (श्रावण शु० ९–१ आगष्ट.)

पैा छ० ११ सफर. सन समान तिसैन. श्रावण.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील कुशल जाणून तागायत छ० ७ सफरपर्यंत मुक्काम पुणें सुखरूप असों. विशेष. वडिलीं ज्योती खीरसागर याजबरोबर पत्रें पाठविलीं तीं पावलीं. श्रावणमासचा समारंभ रमण्यांत चांगला

---

१ पत्र विठ्ठलराव पांडुरंग यांचें मिरजेस बाळासाहेबांस.

जाहला. श्रीमंतांनीं आपले हातीं ब्राम्हणांस दाक्षिणा फार दिली ! दोनशें चारशें हजार बाराशें चवदाशें दोन हजार पर्यंत दिली ! ब्राम्हण चांगला, वग भारी, त्यांस फार दिली. ज्यांस वग नाहीं (पण) ब्राम्हण चांगला त्यास चाळीस पंचवीस तीस पनास शंभर दोनशेंपर्यंत दिली. वरकड दरवाजांवर तीन, चार पांच, वैदिकांस सात आठ दहा पर्यंत जाहली. (आजपर्यंत) पांचवा दरवाजा श्रीमंत कैलासवासी दादासाहेब यांचा होता तो चालत नव्हता. हल्लीं यंदां चालता केला. श्रीमंत सायंकाळीं त्याच दरवाजावर बसून मोहरा, होन, पुतळ्या, रुपये यांची मोतीं वगैरे मिळून खिचडी करून वांटली ! दैवानुसार कोणास मोहोर, कोणास दोन मोहरा तीन मोहरा, येणें प्रमाणें आल्या. दरवाजे—

	प्रथम. याजवर नेमणूक.		दुसरा.
२	श्रीमंत उभयतां	१	श्रीमंत अमृतरावसाहेब
१	बचंभट कर्वे	१	बाळ जोशी कवठेंकर
२	कित्ता भट	१	गोपीनाथ भट कर्वे
		३	

	तिसरा.		चौथा.
२	पानशे. गणपतराव बापूचे मूल.	३	फडके बाबा, अन्या, आत्या.
१	त्रिंबकराव पेठे.	२	भट त्यांजकडील.
१	वासुदेवभट चिपळूणकर.		पंचम.
१	बळवंतराव खरे.	२	शेलूकर बंधू व खासे.
१	बाळ जोशी मालगुंडकर.	१	गोविंदराव काळे.
		१	वैजनाथ भट भागवत.
		१	श्रीमंत खासा सायंकाळीं.

१ तिघेही हरिपंत फडक्यांचे पुत्र.

येणेंप्रमाणें आढळलें तें लिहून पाठविलें आहे. राजश्री नाना सायंकाळीं प्रहर दिवसास गांवांतून स्वारी येऊन रमण्यांत जाऊन पायउतार प्रदक्षिणा घातली. श्रीमंतांजवळ अंमळ बसोन स्वारी लवकर गांवांत गेली. नंतर मग शिंदे आले. त्यांची स्वारी दोन घटिका रात्रीस गेली. ब्राम्हण सुटावयासीं प्रहर रात्र जाहली. ब्राम्हण यंदां पन्नास हजार पर्यंत होईल. दक्षणा कनिष्ट तीन रुपये, याजप्रमाणें दिली. सरासरी शेरा काय बसेल याचा शोध मागाहून घेऊन पाठवितों.

नं.४०४० श्री. (श्रावण शु० ९—१ आगष्ट.)

पैा छ० ११ सफर. सन समान तिसैन. श्रावणमास.

सेवेशीं बाबूराव शिवाजी म्हैसकर. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ७ सफरपावेतों स्वामींचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. माझें पालखीचें सामान अगदीं फाटलें आहे. सरकारांतून घेऊन दोन वर्षें जाहलीं. त्यास याद व धोंडो बापूजीस सामान करून देणेंविषयीं पत्र पाठविलें पाहिजे. सामान दोन वर्षांआड पावतें, तें तीन वर्षांआड देववावें, परंतु हल्लीं सामान अगदीं उणाख पावतें. त्यास दिढी द्यावयाची आज्ञा व्हावी म्हणजे तीन वर्षांआड घेऊं. चिठी स्मरणपूर्वक व याद पाठविण्याविषयीं आज्ञा जाहली पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०४१ श्री. (श्रावण शु० ९—१ आगष्ट.)

पैा छ० ११ सफर. सन समान तिसैन. श्रावण मास.

सेवेशीं लक्ष्मण आपाजी भिडे. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत छ ७ सफरपर्यंत मुक्काम परगणें करकंबें यथास्थित असे. विशेष. छ २ सफरीं स्वामीची आज्ञा घेऊन आलों तों छ० ६ सफरीं परगणेमजकुरीं पागेसुद्धां सुखरूप येऊन पावलों.

इकडे तीन रोज पर्जन्य चांगला पडला. मंगळवेढ्यांसही फारच पाऊस पाडिला आहे. घरींहून आजच माणूस आला. वडिलांनीं पत्रें पाठविलीं त्या पत्रीं मजकूर कीं, शिंद्यांस अमदानगरचा किल्ला खालीं करून दिला. किल्यांत राजश्री मोरोबा दादा होते. त्यांस आणावयासी राजश्री दादा गद्रे व बजाबा शिराळेकर यांस राजश्री नाना फडणवीस यांणीं पुण्याहून पाठविलें होतें. मोरोबादादा यांस किल्याबाहेर काढून रायरीच्या किल्यावर नेऊन ठेवावयाचा बेत केला होता. हें समजतांच किल्याबाहेर येतांच शेंडी उपटोन जानवें तोडोन चतुर्थाश्रम घेऊन बाहेर राहिले आहेत. राजश्री नानांकडेस पत्रें गेलीं आहेत. आज्ञा येईल त्याजप्रमाणें जिकडे न्यावयाचें असेल तिकडे घेऊन जाणार आहेत. अद्यापि बाहेरच आहेत. नबाब निजामन्मुलूख फोजेची जमाबंदी करीत आहेत. कलम चाललें आहे. मी आज्ञे प्रमाणें येथून पुढें जाऊन पंधरा दिवशीं लौकरच येतों. बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं.+ ४०४२ श्री. (श्रावण शु० १३—५ आगष्ट.)

पै॥ छ० ११ सफर. सन समान तिसैन श्रावणमास.

पुं॥ सेवेशीं विज्ञापना. नगरांतील गृहस्थ अद्याप नगरचे बाहेरच आहेत. बहुत करून प्रेष जाहला नाहीं असें म्हणतात. स्वामीस कळावें. रमण्यांत दाक्षिणा जाहली त्याची याद पाठविली च आहे. वाड्यांतील याद जाहल्यावर पाठवून देतों. श्रीमंत कैलासवासी दादासाहेबांचा दरवाजा पांचवा तो आजपावेतों चिणला होता. हल्लीं उघडिला. तेथें श्रीमंत बहुत वेळ बसले होते. स्वामींस कळावें. सालमजकुरीं दक्षणा बहुत जाजती लागली. हे विज्ञापना.

+ तारीख व मिति पैवस्तीची आहे. १ जनार्दन शिवाजी म्हैसकर यांचें मिरजेस पत्र.

+नं. ४०४३ श्री. (श्रावण+ शु० १३–५ आगष्ट.)

पै॥ छ० ११ सफर. सन समान तिसैन. श्रावणमास.

[1]सेवेशीं विज्ञापना. माझीं चोरीनें सणगें गेलीं. शालजोड्या वगैरे सारें गेलें. त्याजवरोन गाड्यांपासून खत घेऊन स्वामीकडे पाठविलें होतें. त्याचा फडशा जाहला नाहीं. मला शालजोडी अथवा पोषाखीस नग अगदीं नाहीं. त्यास गाड्यांकडील उगवावयाचें असल्यास उगवून पाठवावयाची आज्ञा व्हावी. गाड्यांपासून घ्यावयाचें नसल्यास तशीच आज्ञा व्हावी म्हणजे येथें तरी घेईन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०४४ श्रीव्यंकटेश. (८ आगष्ट)

पै॥ छ० १९ सफर. सन समान तिसैन. श्रावण.

श्रियासह चिरंजीव राजश्री गंगाधरराव यांसीं प्रती धोंडूबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशाल तागायत श्रावण व॥ १ भौमवासर पर्यंत यथास्थित असे. विशेष. अलीकडे आपणाकडून पत्र येऊन वर्तमान न कळतां चित्त सापेक्षित असे. तरी असें न करितां निरंतर पत्र पाठवून चित्त संतोषवीत जावें. यानंतर उत्तरेकडील वर्तमान अलीकडे कांहीं कळत नाहीं. इकडे बाजारी वदंता नानाप्रकारें बोलतात. तरी तिकडील वर्तमान सविस्तर लिहून पाठवावें. वरचेवर पत्र पाठवून वर्तमान लिहून समाचार घेत असावा. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे आशीर्वाद.

नं. ४०४५ श्री (श्रावण व० २–९ आगष्ट.)

पै॥ छ० २० सफर. सन समानतिसैन. श्रावणमास.

सेवेशी बाबूराव शिवाजी म्हैसकर दोनी कर जोडून शिर

+ तारीख व मिति पैवस्तीची आहे. १ बाबूराव शिवाजी म्हैसकर वकील यांचें बाळासाहेबांस पत्र. २ धोंडूबाई कंकणवाडीकर यांचें मिरजेस पत्र.

साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ१५ सफरपावेतों स्वामीचे कृपें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं जासुदाबरोबर व राजश्री बाळाजीपंत जोशी यांजबरोबर पत्रें पाठविलीं तीं पावोन लिहिला मजकूर कळला. तेथें आज्ञा जे, "हुबळीकरांनी मनस्वी उपद्रव मांडिला आहे. येविषयींचे सविस्तर पेशजी लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें ताकीद पत्रें घेऊन लौकर पाठवावीं. त्यास फडके[1] यांचे वाड्यांत नित्य जातों. त्यास नानाप्रकारच्या दिक्कती घेतात. नाडगौडी व सरदेसगत तुमचे सरंजामास आहे किंवा नाहीं हें पाहून दप्तरचा दाखला आणवून उपरांतीक पत्रें देऊं म्हणतात. त्यास आज देतों असा करार केला आहे. येतांच पाठवून देतों. नगरांतील गृहस्थ यांस रतनगडास नेलें. अद्यापि चतुर्थाश्रम घेतला असें नाहीं व कौपीन लाविली आहे ती हीं काढून धोतरें नेसूं लागले असें नाहीं. नाशिकास गेल्यावर होणें तें होईल. शिंदे यांचे पलटणांसुद्धां नाशकाकडे नगराहून गेले. धोंडो महादेव यांचे स्वाधीन असावें असा ठराव जाहला. स्वामीस कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०४६ **श्रीगणराज.** (श्रावण व० ३–१० आगष्ट.)[2]

पैा छ० २२ सफर. सन समान तिसैन. श्रावण.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १६ सफरपर्यंत क्षेम असे. विशेष. छ० १५ रोजीं राजश्री नाना सरकारवाड्यांत आले होते. शिंदे यांची स्वारी आली होती. चार घटका खलबत जालें. नगराकडील वर्तमान तर शिंदे यांचें निशाण किल्यावर चढलें. राजश्री मोरोबादादा यांस राजश्री धोंडोपंत जोशी याचे हवालीं केलें. महाडचा बेत राहिला. रतनगड धोंडोपंत यांजकडे आहे तेथें न्यावयाचा बेत होऊन राजश्री

१ कारण कीं हुबळीची मालमत हल्लीं मोरोपंत फडक्यांकडे होती. २ विठ्ठलराव डुिरंग पटवर्धन यांचें पुण्याहून मिरेजस पत्र.

दादा गद्रे आले. अजून नेले न नेले याचें पक्केंपणें समजलें नाहीं. काषायवस्त्रें परिधान केलीं होतीं. रागानें केलीं असें ठरावून मागती शुभ्र वस्त्रें परिधान करविलीं. याजप्रमाणें वर्तमान आहे. राजश्री जिउबा अण्णा यांचीं दोन घोडीं पागेंत बांधों द्यावीं म्हणोन बोलणें पडलें तेंव्हां राजश्री दाजीबा म्हैसकर यांनी सांगितलें कीं मी परवानगी सांगणार नाहीं. ते वाडिलांस न पुसतां आले. त्यास मशारनिल्हे बोलले जे, जाबसाल येविषयीं पडला तर मी वडिलांस विनंती करीन. त्याजवरोन घोडीं बांधावयास पागेंत सांगितलीं आहेत. वडिलांस कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०४७ श्री. (श्रावण व० ६–१३ आगष्ट)

नक्कल.

पै॥× छ० १९ सफर सन समान तिसैन.

बाबूराव शिवाजीचे पत्राची तालीक.

विज्ञापना. काल तिसरे प्रहरीं श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब यांजकडील हुजरे आले होते जे,“ मिरजकर कारकुन यासीं हवालीं करणें.” त्याजवरून विनंती सांगोन पाठविली जे,“श्रीमंत नानांकडील प्याद्यांनीं आमचे बिन्हाडीं आणोन बसविले होते ते प्रातःकाळींच घेऊन गेले. येणेंप्रमाणें कारकुनाबरोबर सांगोन पाठविलें. तेंव्हां साहेब बोलले,“नानाकडील प्यादे गेले ?” इतकें मात्र पुसिलें. आणि जावें म्हणाले. अशीं राजकारणें केलीं होतीं. स्वामीचें पुण्य समर्थ ! जलदी जाहली म्हणोनच बंदोबस्त जाहला. बुधवार रस्त्यांतून पन्नास गाडदी पायउतारा घेऊन गेले, स्वामीसीं त्यानें बदनेक केली त्याचें फल ईश्वरें दिलें! आम्ही आपली मान कापून हातीं घेतली आहे.

× तारीख व मिति पैवस्तीची आहे. १ चिंतामणरावआपांचा कारकून जिवाजी रामचंद्र.

आज त्याजवर समय. कदाचित् प्रसंग तसाच पडल्यास असाच आम्हांवर ! असो. पार करणार स्वामीचे पाय आहेत. स्वामींजवळच मिळविलें, स्वामीचेच कारणास गेल्यास चिंता नाहीं. आम्ही आपली चिंता करीत नाहीं, स्वामीचें क्षेम तर मला मूठभर अन्न देतील ही खातरजमा माझी आहे. मला स्वामीचे पायाशिवाय दुसऱ्याची चाकरीच करावयाची नाहीं असा निश्चय आहे. परिणाम लाविणार ईश्वर आहे. ही पुरवणी पाहून माघारी आली पाहिजे. हे विज्ञापना.

नं. ४०४८ **श्रीगजानन.** (श्रावण व० ६–१३ आगष्ट.)

विज्ञापना. तागायत छ० १९ माहे सफर. इंदुवासर. सांडणी स्वाराबरोबर आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. म्हैसकराचे घरांतून जिउबा अण्णा राजश्री अप्पाजीपंत आठवले यांचें घरीं बिऱ्हाडास जाऊन रविवारीं राहिले आहेत- राजश्री दाजीबांचे पत्रीं काय होतें हें समजल नाहीं. असामींची सनद प्रविष्ट केली. मला दोन वेळां वॆकिलांनीं बोलावण्यास पाठविलें त्यामुळें गेलों होतों. भाषणांत वांकडें दिसत नाहीं. पोटांतील विचार काय आहे न कळे. तेथून आले त्यापक्षीं विचार समजतच आहे. घाट कसा उतरतो पहावा. श्री इच्छा प्रमाण. मला बोलावल्यास जा म्हणतात म्हणोन दोन वेळ गेलें होतों. सांडणस्विर याजबरोबर सविस्तर लिहून पाठवितों. परभूंचा खटला फिरोन उत्पन्न जाहला आहे. वेदमूर्ति राजमान्य राजश्री बाळ दिक्षीत टोकेकर वगैरे ब्राह्मणांस अडविलें आहे ब्राह्मणांनीं. काय होतें पहावें. दुसरें बाजारी वर्तमान आबा शेलूकर व मोरोबादादा फडके याणीं आपले निसबतीचे ब्राह्मणांस भारी दक्षणा दिली, सबब पन्नास हजार रुपये दर असामीस (श्रीमंत)

१ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचे मिरजेस बाळासाहेबांस पत्र. २ चिंतामणराव आपाकडून वाकिलीस आलेले जिवाजीपंत पोतनीस यांनीं. ३ चिंतामणराव आपाकडून. ४ यजमान विठ्ठलराव जा म्हणतात म्हणून जातों.

मागतात. शिंदे वद्य पंचमीस मंगळवारीं सरकारच्या वाड्यांत आले होते. भोजन जाहलें. तैलाभ्यंग जाहलें. श्रीमंत राजश्री नाना सरकारच्या वाड्यांत गेले होते. एक प्रहर वाड्यांत होते टिपूकडील वकिलांनीं हत्ती, बंदुखा २ पिस्तुलें २ शिवाय वस्त्रें जवाहीर असा नजराणा केला. येणें प्रमाणें आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४०४९ श्री. (श्रावण व० ६–१२ आगष्ट.)

विज्ञापना. पर्जन्य इकडे चांगला होऊन पाणी जाहलें नाहीं. पर्वतीचे तलावास पाण्याचा बिंदु नाहीं ! विहिरींस मोटा लावून रमण्यांत तळें आहे त्यांत पाण्याचा पाट आणून सोडला होता. पुण्यापासून चार कोसांवर मावळांत पर्जन्य चांगला लागतो. नगराकडील वर्तमान तर संन्यासग्रहण केलें हें खरें किंवा खोटें याचे चौकशीस राजश्री मोरो त्रिंबक गोडबोले गेले आहेत. नगरच्या किल्यावर शिंदे यांजकडील निशाण चढलें. विसाजीपंत वाडदेकर यांस (आपण) पत्र पाठविलें होतें त्यास ते पूर्वींच देवाज्ञा जाहले. नगराकडील गृहस्थांनीं संन्यास घेतला नाहीं. शिखासूत्र मात्र टाकिलें होतें व वस्त्रें ही भगवीं केलीं होतीं म्हणोन बाजारवदंता फार आहे. परंतु संन्यास घेतला नाहींसें वाटतें. इकडे येण्याचें स्तब्ध आहे. पुढें काय होतें पहावें. बाजारांत अवाया भारी उठतात त्या कागदोपत्रीं देखील लिहावयास येत नाहीं. इतक्यास्तव जोतीस जबानी विनंती करावयास सांगितली आहे. विनंती केल्यानंतर सर्व विदित होईल. श्रीमंत बाजीराव साहेब याणीं उत्कृष्ट दक्षणा दिली. श्रीमंत कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब ज्याप्रमाणें देत होते त्याप्रमाणें दिली (असें) जुने मनुष्य आहेत ते बोलतात. पंचभेळ खिचडी केली त्यांत मोहरा व पुतळ्या व होन व मौक्तिक व रुपये, याप्रमाणें

१ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र मिरजेस.

दिली म्हणोन गोविंदराव नीलकंठ खाजगीवाले बोलिले. वडिलांस कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. शेरा दक्षणेचा मागाहून लिहून पाठवितों. व जें आढळेल तें लिहून पाठवितों. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. शेरा आणून पाठविला आहे हे विज्ञापना.

+नं. ४०५० श्रीगजानन. (श्रावण व० ९–१६ आगष्ट.)

पै॥ छ० २२ सफर. सन समान तिसैन.

श्रावण[1] वद्य द्वितीया बुधवारीं सरकारच्या वाड्यांत अलीजाबहाद्दर शिंदे व श्रीमंत राजश्री नाना ऐसे एकत्र जाहले तेव्हां ते वेळेस अलिजाबहाद्दर याणीं (श्रीमंतांस) सांगितलें, "आपण व कारभारी याणीं एकरूप कारभार करावा. आम्ही देशास जातों. तिकडे दंगा बहुत. त्याजपक्षीं जातों" तेव्हां नानानीं सांगितलें कीं, "उत्तम." पलटणांस[2] ही उठोन येणेंविषयीं चिठी शिंदे यांची आली. नानांनीं (श्रीमंतांस) विनंती केली कीं, नूतन मंडळी आहे ही कामाची नाहीं. पूर्वींपासून मंडळी तीन पिढ्यांची पदरची आहे. त्यांस जवळ बाळगावें ऐसीं बोलणीं जाहलीं. पलटणवाले याणीं श्रीमंतांस अर्ज केला, "आम्हांस अलिजाबहाद्दर यांचा हूकूम आला. आम्ही जातों." त्यांस चार रोज दम धरणें म्हणोन मात्र आज्ञा जाहली आहे. येणें प्रमाणें बाजारी वर्तमान. हे विज्ञापना.

नं. ४०५१ श्री. (श्रावण व० १२–१९ आगष्ट)

पै॥ छ० १५ रबिलावल. सन समानतिसैन. भाद्रपद.

सेवेशीं[3] बाबूराव शिवाजी म्हैसकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २५ सफरपावेतों स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीकडील सरंजामी

+ तारीख व मिति आम्हीं घातली ती पैवस्तीची आहे. १ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें मिरजेस पत्र. २ शनवार वाड्याभोंवती पहाऱ्यावर पलटणें होतीं त्यांस. ३ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

महालांचे पाटील कुळकर्णी व जमीदार यांचे हक्क रुसुमचा व जातीच्या तैनातींचा वगैरे ऐवज सरकारांत देणें, त्यापैकीं सरकारांतून राजश्री बजाबादादाकडील लोकांचे बेगमीस पाऊण लाख रुपयांची वरात स्वामींवर दिली, व श्रीमंत राजश्री नानानीं ही पत्र लिहिलें आहे, त्याप्रमाणें ऐवज पावता होय तें केलें पाहिजे. व श्रीमंत राजश्री रघुनाथराव दादांकडे पंचवीस हजार रुपयांची वरात आहे त्याप्रमाणें ऐवज द्यावयाविशीं आज्ञा जाली पाहिजे. वरातीस बहुत दिवस जाले. अत:पर दिवसगत होऊं नये. दादांस ही बहुत लोकांची निकड आहे यास्तव लौकरच ऐवज देविला पाहिजे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०५२ श्री. (श्रावण व० १२–१९ आगष्ट.)

पै॥ छ० २९ सफर. सन समान तिसैन.

सेवेशीं बाबूराव शिवाजी म्हैसकर दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २५ सफरपावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं मदार सूतरस्वार याजबरोबर पत्रें पाठविलीं तीं पावलीं. तेथें आज्ञा जे, "चि॥ राजश्री जिवाजीपंत[1] याणीं आमचे घरांत काजिया निर्माण करून त्यांस मिळून आम्हांसीं निमकहरामी केली आहे. तोंडचा ग्रास जिवाजीपंतास चारिला असोन पूर्व न स्मरतां नाशास उभा राहिला. राजश्री नाना सर्वजाण आहेत. आम्हांवर कृपा करून त्यास आमचे हवालीं करावें. एवढें जरूर करावें. येवढेनें दाब बसोन मोठें काम होईल. याबद्दल दहा हजार रुपये राजश्री नानांस कबूल करावे, परंतु बंदोबस्त होय तें करावें. नच होय तर अलाहिदा पुरवणी लिहिली आहे त्याप्रमाणें खातरजमा करून त्यास पाठवावें;" म्हणोन आज्ञा, ऐसीयासी मदारभाई येथें आला तेच दिवसीं पंत-

---

१ कुरुंदवाडकर.

मशारनिल्हे यांस काय समजलें न कळे; चिरंजीव राजश्री जनोबा भाऊचे बिऱ्हाडींहून निघोन दुसरे ठिकाणीं चालले. तेव्हां भाऊनीं म्हटलें जे, "दुसरे टिकाणीं जाऊं नये. मिरजेहून पत्रें ही आलीं आहेत. उदईक बोलणें होईल. उपरांत जाणें तर जावें." तेव्हां आपण बोलले, "पहिलेच दिवशीं 'तुम्ही येथें उतरूं नका, दुसरें बिऱ्हाड करा, असें बोललां' त्यास आजपावेतों राहिलों. अतःपर रहात नाहीं." पहिले अण्णा आले तें दिवसीं 'तुम्ही मिरजेस यजमानांसी वांकडेपणा करून आलां, त्या अर्थी आमचेजवळ राहूं नये. तुम्हांमुळें आमचें घर बुडेल. असे भाऊ बोलले तेव्हां अण्णा बोलले, माझी कोठें ओळख नाहीं. आजचा दिवस राहूं द्या. उद्यां कोठें सोई करीन." म्हणोन बहुत प्रकारें सांगितलें. तेव्हां भाऊंनीं उतरावें म्हणोत सांगितलें. उपरांतीक माझा व श्रीमंत राजश्री बाळासाहेबांचा समेट करून द्यावा. मी आठ दिवस तुम्हांजवळच राहतों. तेव्हां भाऊंनीं सुमार पाहिला, यासीं बाहेर जा म्हणावें तर हा दुसरीकडे संधानें करूं लागेल. बोलण्यांत ही दर्शविलें जें, बाळासाहेब कर्ज करितात हे उभयतांस[1] ही फेडावें लागेल. तथें मी येथें कर्ज चिंतामणराव[2] म्हणोन काढीन. हे दोघे जण फेडतील ! तेव्हां बोलण्यांत जे, 'लाख पन्नास हजार रुपये खर्च पडला तरी करावा, परंतु काम करावें. अशीं (त्यांचीं) मनस्वी बोलणीं पडलीं. तेव्हां भाऊंनीं ध्यानांत आणिलें जे, हा बाहेर गेला असतां ठीक नव्हे. फंद करून घरें बुडवील. ऐसें जाणून ठेवून घेतला. आणि श्रीमंत राजश्री नानांच्या कानावर घातलें. तेव्हां नाना बोलले, मला चिंतामणराव यांचीं पत्रें आलीं आहेत त्या अर्थी कैद कसा करावा ? तेव्हां भाऊ बोलिले, तो लबाड आहे. फंद करील. तेव्हां नाना बोलिले, मी

---

१ बाळासाहेब व चिंतामणराव. २ चिंतामणराव यांच्या नांवावर.

आपला प्यादा एक त्याजपाशीं ठेवितों. कोणासी बोलों नये, कोठें जाऊं नये. अशी ताकीद करून ठेवावी. कोणेकडे गडबडच करों लागल्यास मग विचार करणें तो करावायास येईल. त्याप्रमाणें ताकीद करून एक प्यादा जवळ ठेविला. असें असतां वेदमूर्ति राजश्री मोरभट वझे हरिपुरीं असतां ते अण्णाकडे येऊन बोलून गेले. आम्ही म्हटलें,'हरिपुरकर ब्राह्मण आहे. हा बोलून काय होणें ! त्यास मोरभट याणीं सदाशिव जोशी मेणवलीकर नानांपाशीं असतात त्यांशीं संधान करून नानांचे कानावर घातलें व विठलपंत दादा गद्रे यांजकडे संधान करून गद्रे, गोविंदराव पिंगळे, यांजकडे संधान केलें. आणि मदार आला ते दिवशीं अण्णा निघोन राजश्री आप्पाजीपंत यांचें बि-हाडीं जाऊन राहिले. आणि सदाशिव जोशी मेणवलीकर यांजकडून नानाच्या कानावर घालविलें, "मला जनार्दनपंत कोणासीं बोलों देईनात, व कोणीकडे जावों देईनात, यास्तव मी येथें राहिलों आहें. सर्व प्रकारें आधार स्वामीचे पायांचा." तेव्हां भाऊंनीं सुमार पाहिला, गृहस्थ बोलीचा आपले घरीं येऊन राहिला असतां एकादी वाईट गोष्ट करणें ठीक नव्हे. नका जाऊं म्हणत असतां जातात तेव्हां आपले वरील निमित्य टळेल हें जाणून कांहीं बोलिले नाहींत. ते जाऊन आठवले यांचे घरीं राहिले. उपरांतिक मदार सांडणीस्वाराबरोबर पत्रें आलीं ते पर्याय अण्णास भाऊंचे बि-हाडीं आणून बोललों जे, तुम्हांस बहुत दिवस बाळासाहेबांनीं बाळगलें. पुत्रापेक्षां आधिक पालग्रहण केलें. तुम्हांस सोडून कोणतीही गोष्ट केली नाहीं. असें असतां तुम्ही हें करणें ठीक नव्हे. त्यास तुम्ही मिरजेस जावें, तसलमातीचा फडशा करावा, आणि पंढरपुरीं अथवा मिरज प्रांतातील एक कृष्णातीरचा गांव पाहून कुटुंबासुद्धां रहावें. घरचा कलह तुटे तोंपावेतों दोहींकडे बोलूं नये. निरोप सांगोन पाठवूं नये" याप्रमाणें बहुत प्रकारें बोललों जे, " आम्ही दरम्यान होतों. तुमचे अनूस खत्ता

१ नाना। तुमच्या पायांचा.

लागूं देत नाहीं. परंतु अण्णांचें उत्तर कीं, " जेथें मीं फुलें विकिलीं तेथें गोवऱ्या काय विकूं ? मी हरिपुरीं राहीन." आम्ही म्हटलें, 'अशी गोष्ट कशी घडेल ?' तेव्हां बोलले, " हरिपुरकर मातुश्रीस[1] मी आपली मातुश्री म्हणविली आहे. तिनें आजचे प्रसंगीं माझीं मुलें माणसें संरक्षण केलीं, त्या अर्थीं मी तिचे पाय सोडून रहावयाचा नाहीं. माझे अंगावरील कातड्याचा जोडा करून तिला पायांत घालावयासीं दिला तरीही तिचे उपकार फिटणार नाहींत. मी तिचे पाय सोडून राहणार नाहीं व पहिल्यापेक्षां अधीक बाळासाहेबांनीं चालविलें तरच येथून जावयाचें. नाहीं तर जाणें नाहीं. तेव्हां आम्ही म्हटलें " वहिनीस आपले शरीराचे कातड्याचा जोडा देणार, आणि × × × लंगोटी होती तेव्हांपासोन (बाळासाहेबानीं) पालग्रहण करून नांव लौकिकास आणिलें, पालखी दिली, लेकांपेक्षां अधिक चालविलें, त्याचे उपकार हे कीं काय ?" तेव्हा बोलिले, " मी बदनेक बाळासाहेबांपाशीं केलीच नाहीं. बाळासाहेबांनीं मजवर कहर केला. " तेव्हां आम्ही बहुत प्रकारें समेटाच्याच गोष्टी बोललों. परंतु मर्जीस नये. शेंवटीं बोलले, बाळासाहेबांचा व माझा कांहीं संकेत आहे तो निरोप आल्यावर जाईन. पहिल्यापेक्षां अधिक चालविल्यास जाईन. नाहींतर मी चिंतामणरायाचा म्हणोन आलों आहें. नानांस हीं पत्रें आहेत. मला नाना (बाळासाहेबांच्या) हातीं देणार नाहींत. मला कळेल तशी खटपट करीन. लाख दोन लाख रुपये खर्च करीन. ते[2] दोघेही फेडतील ? काय चिंता आहे ? अशी चढाचीं बोलणीं आढळल्यानंतर बिऱ्हाडास जावें म्हणोन सांगि-

---

१ मयत गोपाळराव गोविंद यांची स्त्री सरस्वतीबाई ही गंगाधरराव बाळासाहेब यांची थोरली भावजय व चिंतामणराव आपासाहेब यांची चुलती. बाळासाहेबांपासून वांटणी मागण्याच्या कामीं चिंतामणरावांस हिचेंच प्रोत्साहन विशेष होतें. ऐ. ले. संग्रहाच्या सातव्या भागांत काशीयात्राप्रकरणीं हिचीं पत्रें आलीं आहेत तीं वाचकांच्या स्मरणांतून गेलीं नसतीलच. २ बाळासाहेब व चिंतामणराव.

तलें. आणि भाऊनीं जाऊन नानांचे कानावर घातलें जे, हा आमचें घर बुडवितो. त्यास दहा हजार रुपये आपण घ्यावे, परंतु याचा बंदोबस्त करावा; म्हणोन बहुत प्रकारें नानासी भाऊ बोलिले. फार खटपट केली ती कोठवर लिहावी ? तेव्हां नानांस दहा हजार व आणखी एक दोघां गृहस्थांस व किरकोळ मिळोन अडीच हजार पोतेंचाल येणेंप्रमाणें पंधरा दिवशीं देतों असा करार करून परवानगी घेतली जे, ' युक्तीनें आणून अडकवितों. आपण पांच प्यादे द्यावे. तेव्हां नानांनीं पांच प्यादे दिले. उपरांतिक अण्णास युक्तीनें बोलावूं पाठविलें जे, ' आज मिरजेहून आणखी पत्रें आलीं आहेत, याजकरितां येथवर यावें. तेव्हां अण्णा येतांच नानांचे प्यायांचे हवालीं केलें छ० २३ रोजीं. तों संध्याकाळीं श्री॥ राजश्री अमृतरावसाहेबांचा निरोप आला जे, मिरजेहून कारकून आला आहे त्यास आणून हवालीं करणें. मिरजेस पाठवूं नये. तेव्हां मोठा पेंच पडला. व नानाजवळ चार पांच असामी रदबदल करूं लागली. याजमुळें आम्ही म्हटलें दगा जाहला ! अतःपर हा मोकळा जाहल्यास आमचें घर बुडवील व बाळासाहेबांस बुडवील. हें ध्यानांत आणून प्रातःकाळींच नानांकडे भाऊ गेले आणि सांगितलें, अशी गोष्ट जाहली. पुढें कसें करावें ? तेव्हां नानांस ही विचारच पडलाजे, " तुमचे हातून मिरजेस दाखल करणें होणार नाहीं. अतःपर जलदी जाहली पाहिजे. त्यास लोहगडास आज पाठवितों. उपरांतिक महिन्या दोन महिन्यांनीं तुमचे हवालीं करीन. तूर्त जाऊं देणें. नाहींतर फंदी आहे. लबाड्या करील. मग माझे ही हातून आटोपणार नाहीं. तो पुरता माहीत. " त्याजवरून आम्ही ही सुमार पाहिला, आमचे स्वांर यावयासीं चार दिवस लागणार. तंवपावेतों श्रीमंतांस पंचवीस तीस हजार रुपये कबूल केलें असतां सोडवून देवितील. मग मोठा पेंच पडेल. यास्तव जलदी करून

राजश्री धोंडोपंत निजसुरे यांसीं नानांनीं सांगितलें जे, जनार्दनपंत हवालीं करितील त्यास लोहगडास पाठवून देणें. त्याजवरून धोंडोपंत याजकडील प्यादे आले त्यांचे हवालीं केलें. लोहगडास रवाना जाहले. आपणांस कळावें. स्वामीचे पुण्यप्रभावेंकरून मोठी गोष्ट घडली. गृहस्थ महिना पंधरा दिवस ठरता तर पैगाम करून स्वामीचें घर बुडविता; ही खातरजमा आमची जाहली. यावेळेस भाऊंनीं बहुत खटपट केली ती कोठवर लिहावी ? येथून अपराधी कोणी गेला असें घडलें नाहीं, परंतु सत्तामर्दीनें काम केलें. स्वामींस कळावेंकारितां तपशीलवार लिहिलें आहे. अण्णाचे घरचा वगैरे बंदोबस्त करावयाचा, त्यास तेथें वहिनी आहेत तीं करूं देणार नाहींत. त्यास नानांचे कानावर घालून लिहून पाठवितों त्याप्रमाणें करावें. तूर्तच उतावळी करूं नये. बाहेरून चौक्या मात्र असों द्याव्या. वरकडही कांहीं बंदोबस्ताविषयींची विनंती मागाहून लिहून पाठवितों. स्वामीस कळावें. राजश्री बळवतरात वांकडे याचा ऐवज चिरंजीव राजश्री भाऊंनीं काढून (नानांस वगैरे) दिला. त्याची याद सविस्तर लिहून मुद्दाम जासूद पाठविला आहे. त्यास भाऊंस समाधान नाहीं आणि नित्य उपोषणासीं संबंध पडला आहे. संध्याकाळ पावेतों उपास करतात. असें संकट प्राप्त जाहलें आहे. त्यास हरकसें करून यादीप्रमाणें ऐवज लौकर आला पाहिजे. न आल्यास मग ठीक नाहीं. आमचा परिणाम लागणें कठिण आहे. याजकरितां भाऊंचे हाल होतात हें संकट जाणून लिहिलें आहे. तर कृपाळू होऊन ऐवज हरकसें ही करून पाठविला पाहिजे. भाऊस आधींच समाधान नाहीं. त्यांत दररोज उपोषणें, तेव्हां दुखणें विकोपास जाऊन मजकरितां त्यांचा घात होईल. यास्तव हरकसें करून आधीं रुपये यादीप्रमाणें दहा दिवसांत येत तें करावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. राऊत

कांहीं रवाना जाहले असल्यास माघारा नेवावे. मीही चिठी माघारे जावें म्हणोन लिहिली आहे. हे विज्ञापना.*

नं. ४०५३ श्रीगजानन. (श्रावण व० १४–२१ आगष्ट)

पै॥ छ० २७ सफर. श्रावणमास. सन समान तिसैन.

साष्टांग नमस्कार विनंती विशेष. नगराकडील वर्तमान कांहींच समजत नाहीं. किल्ला (शिंद्यांच्या) स्वाधीन झाला कीं नाहीं, तेथें होते ते कोठें आहेत, हें कच्चें जरूर लिहावें हे विज्ञापना.

नं. ४०५४ श्री. (भाद्रपद शु० १–२३ आगष्ट.)

पै॥ छ० २९ सफर. सन समान तिसैन. भाद्रपद.

पु॥ सेवेशीं विज्ञापना. ऐसी जे–

---

* ऐ. ले. संग्रहाच्या पांच, सहा व सात वगैरे भागांतून शिवाजी बाबाजी म्हैसकर यांचीं शेंकडों पत्रें आलीं आहेत तीं वाचकांस ठाऊकच आहेत. तो पुणें दरबारीं पटवर्धनांचा वकील म्हणून रहात असे. त्याचे हे दोघे पुत्र बाबूराव उर्फ दाजीबा आणि जनोबाभाऊ. मिरजकरानीं दाजीबास त्याच्या बापाच्याच कामावर म्हणजे वकिलीवर नानाजवळ अलीकडे वर्ष सहा महिने ठेविलें होतें. जनोबाभाऊ नानांच्या रुपेंतला असल्यामुळें त्यांजवळच राहून घालमेली करून पोट भरी. बाळासाहेब मिरजकर यांचा व चिंतामणराव आपासाहेब सांगलीकर यांचा दौलतीसंबंधें तंटा माजला होता त्यांत चिंतामणरावाकडून जिवाजीपंत पोतनीस दरबारांत वशिला बांधण्यासाठीं पुण्यास आला असतां त्यास पकडण्याविषयीं मिरजेहून बाळासाहेबांचें पत्र गेल्यावरून या म्हैसकर बंधूनीं नानाकडून त्यास धरविलें. नानांनीं केवळ बाळासाहेबांच्या स्नेहावर नजर देऊन हें त्यांचें काम केलें; तरी दाजीबानें या पत्रांत आपल्या व जनोबाच्या कामगिरीचें खूप तिखटमीठ लावून वर्णन केलें आहे । नानास या कामाकरितां दहा हजार रुपये भरावे लागले असें बाळासाहेबांस खोटेंच समजावून या म्हैसकर बंधूनीं त्यांपासून ते रुपये घेऊन आपणच गिळंकृत केले ! पुढें ती लबाडी उघडकीस आल्यावरून बाळासाहेबांनीं दाजीबा म्हैसकर यास कैदेंत घातलें तो मजकूर पुढें येईल.

+ साष्टांग नमस्कार विज्ञापना. राजश्री जिवाजीपंत जोशी यांच्या मजकुराची पुरवणी लिहिली त्याजवरून बाणाजीकडे दोन चार वेळां बोललों. एकांतीं गांठून वर्तमान सांगितलें कीं, (जिवाजीपंत हा) सरकारचा बहुत दिवसांचा सेवक. खाजगीकडील कामकाज त्याजकडे होतें. तेथें शिल्लक वगैरे कांहीं गुंता होता त्याचा फडशा न करितां तेथून पळून आला आहे. तो राजश्री जनार्दनपंत म्हैसकर आपलेकडील वकील आहे त्याजकडे आहे. त्याजला तेथून आणून आम्हांपाशीं दिऱ्याचे घाटापलीकडे आमचे स्वाधीन करावें. आणि तुम्ही दहा (हजार रुपये घ्यावे) याप्रमाणें चि॥ राजश्री नानाकडील राजश्री बाळाजीपंताचे विद्यमानें सांगितलें. त्याणीं उत्तर केलें कीं, आम्हांकडील वकील पुण्यांत लेखकाकडे आहे तो आल्यानंतर सांगूं. यांतील कारण काय ? जर करितां नानानीं त्याजला आसरा दिला असल्यास या कामांत पडूं नये हें मानस. आमच्या आयकिल्यांत आहे कीं, जकारनामक याणें खातरजमा करून देविली आहे. त्याजवरून वर्तमान दिसतें. त्याजवर राजश्री यादवराव भास्कर याजलाही सांगितलें. त्याणींही मळमळीत बोलले. तेव्हां आम्हीं योजना केली आहे कीं, राजश्री बाबूराव आंगरे यांजला पांच (हजार) पर्यंत देऊं करावे, आणि राजश्री गोविंदराव काळे यांजकडून वर्तमान नानांचे कानावर घालून परवानगी घेऊन त्यांजकडून धरोन आणावें. त्यांजलाही पांच दिले पाहिजेत. येथील आंगरे याणीं कबूल केल्यास चार अधिक पडतील त्याजाविषयीं मात्र आज्ञा असावी. त्याणीं कबूल केल्यास स्वामीकडे अजुरदार पाठवितों. त्याजबरोबर स्वार पाठवून द्यावे. आपले आज्ञेची वाट पहात नाहीं. जिकडून लाग लागेल तिकडून लाग

+ पत्रावर इंग्रजी तारीख व मिति आम्हीं घातली आहे ती पैवस्तीची आहे. हें बाबूराव म्हैसकरानें बाळासाहेबांस लिहिलें आहे.

लावितों. सरकारचाकरीस चुकत नाहीं. परंतु वर्तमान ऐकींव आहे कीं, स्वामींकडील राऊत वगैरे आले. त्याजवरून श्रीमंत राजश्री नानानीं गृहस्थास लोहगडास शंभर राऊत (बरोबर देऊन) पावतें केलें. याप्रमाणें वर्तमान आहे. परंतु स्वामीच्या पत्रावरून केलें किंवा इकडे संधान लाविलें हें समजलें, त्याजवरून केलें हें न कळे. आपले मंगळवेढेकडील कुणबी गांवांत होते तें सर्व लष्करांत आले. त्याणीं वर्तमान सांगितलें त्याजवरून लिहिलें आहे. आम्हीं जासुदास फितविला होता हें वर्तमान कळलें कीं काय तें न कळे. सविस्तर मजकूर स्वामींस कळलाच असेल. सेवेशी श्रुत होय हे विज्ञप्ति.

नं. ४०५५ **श्रीगणराज.** (२५ आगष्ट)

पै॥ छ० ४ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपद.

अपत्यें अप्पानें व गणपतीनें—विज्ञापना तागायत भाद्रपद शु॥ ३ पावेतों यस्थास्थित असे. विशेष. तीर्थस्वरूप बापूसाहेब भाद्रपद शु॥ २ सौम्यवारीं प्रातःकाळचे प्रहर दिवसास देवाज्ञा जाहले. ईश्वरें अनुचित केलें. सर्वांस वडील होते. निराश्रय केलें. ती॥ राजश्री दादास[1] व चिरंजीव राजश्री बळवंतराव यांस शोकाचे पर्वत जाहले. वडिलांमागें सर्वप्रकारें सांभाळ करणार वडील आहेत. बहुत सावधगिरीनें वडिलांचा काळ जाहला. सेवेशीं विदित होय. बहुत काय लिहिणें कृपालोभ करावा हे विज्ञापना.

नं. ४०५६[2] **श्रीगणराज.** (भाद्रपद शु० ४—२५आगष्ट.)

पै॥ छ०५ राबिलावल, सन समान तिसैन. भाद्रपद.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ०२ रबिलावल यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्रें येऊन वर्तमान कळत नाहीं. मोठी काळजी लागली आहे. इकडील वर्तमान तर मघा नक्षत्र अर्धें होऊन

---

१ तुम्ही बाळासाहेब. २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस पत्र हें इतकेंच अपूर्ण सांपडलें.

गेलें. पर्जन्याचा बिंदु नाहीं. तूर्त नदीस पाणी आहे. पुढें ईश्वरी निर्मित न कळे. श्रीमंत त्रिवर्गसाहेब यांची स्वारी जन्माष्टमीचे गोपाळकाल्यास गेली होती शिंदे अलिजाबहाद्दर यांचे डेऱ्यास. राजश्री नानाही गेले होते. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. श्रीगणपतीच्या उत्सवास शुद्ध प्रतिपदा बुधवारीं प्रारंभ सालाबादप्रमाणें जाहला. श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब याणीं बुधवारीं वाड्यांतील अनुष्ठानाचे वगैरे ब्राह्मण मिळोन चारशें ब्राह्मणांस सात, आठ, नऊ, दहा, बारा याजप्रमाणें दक्षणा दिली. दहा बारा हजार रुपये वांटणार ऐसी भटी बातमी आहे. (आम्हांस) भाद्रपद महिन्यांत खर्चास नाहीं. तर सांडणीस्वार याजबरोबर खर्चास आलें पाहिजे. खर्चाची मोठी ओढ जाहली आहे. लुगडीं वगैरे लिहिलेप्रमाणें पाठविलीं पाहिजेत. येथें धारण हरभरे जोरी तांदूळ अंबे-
८८२।. ८८२॥.
मोहोर २० रुपये पल्लाप्रमाणें आहे. कडबा मिळत नाहीं. ओलें गवत खुरपणें येतात. पुलापलीकडून खरेदी करून आणिल्यास कंपूकडील संत्री गवत पाडून येतात. एकादे वेळेस सरकारांतही तट्टासुद्धां येतात. ऐसें आहे. येणें प्रमाणें आहे. जासुद जोडी बराबर आशिर्वाद पत्र पाठविलें तें छ२

नं. ४०५७ श्री. (भाद्रपद शु० ५—२६ आगष्ट.)

पै॥ छ० ६ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपद.

सेवेशीं गिरमाजी जिवाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ३ रबिलावल मंदवार पावेतों स्वामीचे कृपे वर्तमान यथास्थित असे. विशेष येथील सविस्तर पत्रें अलाहिदा राजश्री भास्करपंतीं विनंती लिहिलेली आहे. मी विनंतीपत्र लिहून पाठवित आहें. येथील कारभार मोठा अंधेरी. कोणास कोणी पुसत नाहीं. कैद तो कांहींच दिसत नाहीं. शिंद्याचें

लष्कर प्रस्तुत कालीं मुलखांत रोखे करावयाची सीमा जाहली. बोलण्यांत धर नाहीं. शिलेदारी चहूंकडे आणि हुजरे कारभारी पुण्यांत ! कोणापाशीं फिर्यादी सांगावी ? आणि येथून चिठी चपाटी पाठवून बंदोबस्त व्हावा हा बेत तो प्रस्तुत दिसत नाहीं. जमेदार व पाटील वगैरे (शिंद्यांच्या) लष्करास येऊन एक मास होत आला. दाद फिर्याद ऐकोन कोणता मजकूर ध्यानावर घ्यावा हें कांहींच दिसत नाहीं. मुख्य खासे पूर्ववयी आहेत. कारभारी समजावितील तें प्रमाण ! (आमच्या) प्रयत्नाची सीमा झाली. गोविंदराव काळे यांजकडून आंगरे यांजकडे निरोप नेहमीं पाठवीत गेलों. कोणत्याही गोष्टीचा ठराव होईना. शेवटीं बाणाजीचे विद्यमानें बोलणें जालें. व आंगरे यांजकडील बोलण्याचा अर्थ राजश्रीनी कच्चा लिहिला आहे. आठ पंधरा दिवस बहुत वोढून पाहिलें. तेथें मनाचिठी होईना, आणि तेथील खेटे मना होईनात. दिवस लावणीचे. जोरी पेरणी आली. रयतेचे मतें स्वार तेथें नेहमीं असावे, असे मुद्दे घालूं लागले. तेव्हां खूळ दिसूं लागलें. परगण्यांत बखेडा कामाचा नाहीं. थोर भांडें. हंगाम गेला म्हणजे मजकूर ठकावून जाईल. तेव्हां पांच रुपये ते म्हणतील तसें ऐकोन, स्वार उठोन येणेंविषयीं छ० २० सफरीं चिठ्या घेतल्या असतां चिठ्या हातास येईनात. म्हणोन आज अकरा दिवस वोढून पाहिलें. काल परवां श्रीमंत राजश्री बापूचें पत्र आलें जे, साराच बखेडा पडोन परगणा लावणीखेरीज पडतो. तेव्हां ते म्हणतील तें ऐकावें. चिठ्या हाताखालीं घेऊन निकडीनें मंगळवेढ्यास रवाना केल्या आहेत. जमेदारीपैकीं ब्राह्मण मंडळी मात्र जिमे करून घेतली. देशमुख व रयत लष्करांतच आहेत. येथून सारींच खुळें मोडून स्वामीचे चरणासंनिध आणावें हे तजवीज रात्रंदिवस खटपटींत आहों. श्रीकृपेनें मनोदयानुसार गोष्ट घडल्यास हे बेरीज रयतेपासोन घेतां येईल. कोठें जात नाहीं. आज-

---

१ दौलतराव शिंदे.

तागायत सुटी वगैरे देऊन त्यांचें पालन केलें, शेवटीं हें मात्रागमन करून रयतेनीं दाखविलें ! चिंता नाहीं. स्वामीचें पुण्य विशेष आहे. सर्व गोष्टी घडतील. तूर्त येथील मजकुरापुढें उपाय नाहीं. सविस्तर राजश्रीनीं विनंती लिहिली आहे. चरणासांनिध्य आल्यावर जशी आज्ञा होईल तशी सर्वत्र वर्तणूक करितील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०५८ **श्रीगजानन.** (भाद्रपद शु० ५–२६आगष्ट)

पै॥ छ० ७ रबिलावल. सन समान तिसैन.

+ छ० ३ रबिलावल. भृगुवासर. गृहस्थ अद्याप येथेंच आहेत. पर्वतास गेला नाहीं. दुसरेचे हातीं हस्तगत जाहला. गृहस्थ याचा पल्ला श्री काय करितो न कळे. येथील लोकांचा भरंवसा तिलप्राय नाहीं. खलबतें जाहलीं याजमुळें लोक अनेक कल्पना घेतात. इंग्रजांचा व टिपूचा बिघाड जाहला. टिपूवर मोहीम इंग्रज करणार. फरांशीस इंग्रज एकरूप असें बोलतात. नबाब बंदेगान अली यांचीं पलटणें बिडास आलीं. फौजेची कलमजारी आहे. ऐवज येथून[3] जात आहे. ईश्वरी तंत्र काय आहे तें न कळे. शिंदे अलिजाबहाद्दर याजकडील पेरू साहेब कंपूचा सरदार निरोप घेऊन देशास गेला. करवीरचा बंदोबस्त व्हावा हा ही बेत घाटत आहे. येणें प्रमाणें बाजारी वर्तमान. खरें नव्हे. सेवेसी विदित होय. हे विज्ञापना.

नं. ४०५९ **श्रीगणराज.** (भाद्रपद शु० ७–२८आगष्ट.)

पै॥ छ५ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपद.

[3]विज्ञापना. बहिरोपंत मेहेंदळे रायगडास होते तेथें निव-

+ कारकून बाळाजीपंत जोशी याचें पत्र मिरजेस १ जिऊबा पोतनीस. २ लोहगडावर. ३ नाना फडनवीस यांजकडून. ४ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस पत्र. यावर मिति व तारीख आम्हीं घातली आहे ती पैवस्तीची.

तेले. सहा सात रोज जाहले. अस्थि येथें आल्या होत्या. येथून अन्याबा मेहेंदळे यांजकडे किल्ल्यास पाठविल्या. अन्याबा बिवलकर ही वारले. हे विज्ञापना.

नं. ४०६० श्रीगणराज. (भाद्रपद शु० ७–२८ आगष्ट.)

पै॥ छ० ५ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपद.

[2]विज्ञापना. शुद्ध प्रतिपदा बुधवारीं श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब यांचें व राजश्री नाना यांचें खलबत जाहलें. कोणी म्हणतात पर्वतीस. कोणी म्हणतात बागेंत. एवंच खलबत जाहलें खरें. शिंद्याचे घरीं व सरकार वाड्यात व नानांचे घरीं ऐसीं बहुत खलबतें चाललीं आहेत. शकटभेद काय आहे न कळे. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. माझा छिटाचा अंगरखा फाटला आहे इतक्यास्तव विनंती लिहिली आहे. तर दुसरें एक छिट चांगलें तऱ्हेदार वडिलांचे मर्जीस येईल तसें पाठवून द्यावें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०६१ श्री. (भाद्रपद शु० ७–२८ आगष्ट.)

पै॥ छ० ५ रबिलावल. सन समान तिसैन.

[3]सेवेशी धोंडो बापूजी व मोरो अप्पाजी परांजपे. साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसी जे, राजश्री जिवाजी रामचंद्र पुण्यास आल्यानंतर येथें राजश्री जनार्दनपंत म्हैसकर यांचे बिऱ्हाडीं राहिले. आणि बोलण्यांत श्री॥ राजश्री बाळासाहेब यांचे पायांखेरीज मला दुसरा विचार नाहीं, श्रीमंतानी माझें चालविलें त्या प्रमाणें कोणी चालविणार नाहीं, असें असतां मी पुण्यास आलों याचें कारण मला धरोन कैद करितात हा अर्थ दिसोन आला, मला धीर न पुरे,

---

१ बहिरोपंत व अन्याबा हे दोघे ही परशुराम भाऊंच्या कारस्थानांत सांपडल्यामुळें किल्ल्यावर कैदेंत होते. २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस पत्र. यावर आम्हीं घातलेली तारीख व मिति पैवस्तीची आहे. ३ या पत्रावर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे.

यास्तव तेथून पळोन आलों. आज मला वडिलांचें पत्र खातरजमेचें आलें असतां मी निघोन मिरजेस जातों, याप्रमाणें दोन तीन वेळां स्वामीचे पायांची शपथ—आणखी ही शपथा कानीं आयकों नये याप्रमाणें वाहिल्या. नंतर जनार्दनपंत यांणीं विचार केला कीं, हरतऱ्हा करून यांस समेटून मिरजेस पाठवावें. वाजबी तसलमात वगैरे जाबसाल असतील त्याचा मशारनिल्हे याणीं फडशा करावा, आणि स्वस्थ बसावें. कोणीकडेही बोलों नये. याप्रमाणें मशारनिल्हेजवळ बोलिले. त्याप्रमाणें कबूल जाहले. नंतर स्वामींकडे म्हैसकर याणी पत्रें पाठविलीं. त्यांचें उत्तर स्वामीनीं पाठविलें कीं बहुतार्थी सरकारची परवानगी घेऊन कैद करूनच पाठवावें. तें न ठरे तर मग तुम्ही लिहिलेप्रमाणें करावें. त्यास कालदेश या प्रकारचा. येथून मिरजेस रवाना केल्यानंतर निमित्तास जागा बहुत आहे. मग पारिपत्य केल्यास चिंता नाहीं. याप्रमाणें विचार केला. जिवाजीपंत यांणीं शपथा वगैरे केल्या, आणि राजश्री दादा गद्रे यांजकडील विठ्ठलपंत दात्ये व बारामतीकर यांजकडील आपाजीपंत आठवले यांजकडे व गोविंदराव काळे यांजकडे बोलणें लाविलें. आणि मी बिऱ्हाड दुसरे जागीं करितों म्हणों लागले. जनार्दनपंत याणीं सांगितलें कीं, तुमचें बोलणें ठरोन आम्ही मिरजेस लिहिलें त्यावरून श्रीमंतांचें पत्र आलें कीं, तुम्ही खातरजमा करून पाठवून देणें. तुम्ही दुसरे जागां जावयाचें कारण नाहीं. ऐसें बालिले. जिवाजीपंत याणीं उत्तर केलें कीं, मी बिऱ्हाडही केलें तत्रापि चिंता नाहीं. ऐसें म्हणोन बारामतीकर यांचे वाड्यांत[1] आपाजीपंत आठवले यांजकडे बिऱ्हाडास गेले. दुसरे दिवशीं त्यांस बोलवून आणिलें. दाजीबा व जनार्दनपंत व जिवाजीपंत त्रिवर्ग एकांतीं बसोन बोलणें जाहलें. याणीं सांगितलें कीं, श्रीमंत राजश्री बाळासाहेब

१ सरकारवाड्यांत.

यांचे पत्र आलें आहे. तुमचें अब्रूस खत्ता नाहीं. तुम्ही मिरजेस जावें. वाजवी तुमचेकडे तसलमातीचे वगैरे लढे असतील ते उरकून स्वस्थ असावें. कोणीकडेही बोलों नये. तुमचा पाय यथास्थित पडत चालिला म्हणजे श्रीमंत कृपा करितील. "पूर्ववतप्रमाणें माझे हातून कामकाज घ्यावें. तें घडत असल्यास मीं जातों." ऐसें जिऊबाचें बोलणें, त्यास "होईल. चिंता नाहीं." ऐसें सांगितलें तेव्हां तें त्यांचे युक्तीस न येई. म्हणों लागले, ज्या स्थळीं फुलें विकिलीं तेथें शुभा विकाव्या हें घडणार नाहीं. तेथें जावें, कोणीकडेही बोलों नये, कामकाज मजकडे कांहीं एक नाहीं, ऐसा विचार जाहला असतां माझें जाणें होत नाहीं; म्हणोन बोलणें घातलें. एक प्रहरपावेतों हरतऱ्हाकरून समजावून सांगत असतां आयकिलें नाहीं. निघोन बिऱ्हाडास गेले. नंतर आपले ढंगावर आले. बाहेर राजकारण केलें हें निखालस समजोन आलें. नंतर श्रीमंत राजश्री नानांकडे राजश्री जनार्दनपंत जाऊन मजकूर समजाविला कीं, जिवाजीपंत याजकडे तसलमातेचे लढे बहुत आहेत. पळोन तेथून आले. येथें आल्यानंतर आम्हाजवळ शपथा केल्या कीं, माझी अब्रू बाळासाहेब याणीं राखावी. मी मिरजेस जातों. त्यावरून विनंती मिरजेस लिहिली. मिरजेहून खातरजमा करून पाठवून देणें म्हणोन उत्तर आलें असतां लबाडीच्या गोष्टीस प्रवर्तला. तुमच्यानें माझा बंदोबस्त होत असल्यास उत्तम. नाहींतर मी परभारां श्रीमंत रा॥ नानांची भेट घेऊन बंदोबस्त करून घेतों. याप्रमाणें त्यांचें बोलणें आहे. पुढें याचा विचार काय ? बाहेर गृहस्थांकडे बोलणीं लागलीं आहेत. वाड्यांतही कोणाकडून श्रीमंतांस विनंती करितील. त्यास आज्ञा काय ? त्यावरून नानानीं सांगितलें कीं, पूर्ववत्प्रमाणें तुमचे बिऱ्हाडीं नेऊन ठेवणें. प्यादे देतों. चौकी करितील. आणि दोनचार दिवसांनीं मिरजेस रवाना करणें. याप्रमाणें सांगोन चार प्यादे दिले.

१ सरकारवाड्यांत.

जिवाजीपंत यांस वेदमूर्ति राजश्री सदाशिव भट गाडगीळ यांजबरोबर सांगोन पाठवून बोलावयाकरितां जनार्दनपंत याणीं आणिलें. ते येतांच आम्हांकडे सूचना होती. दहा पंधरा माणसें घेऊन जाऊन बसलों. इतक्यांत नानाकडील प्यादे परवानगीचे आले. अण्णानीं प्यादे व मला पाहून घाबरें होऊन बोलिले कीं, हा विचार काय ? जनार्दनपंत याणीं सांगितलें, कीं नानानीं तुम्हाकडे चौकी बसविली. तुमचें आमचें बोलणें राहिलें. आम्ही सांगत होतों. तुमचे विचारास आलें नाहीं. आतां नाना आज्ञा करितील त्याप्रमाणें होईल. म्हणोन सांगितलें. तेव्हां अश्रुपात जाहला. बंदोबस्त जाहला. दशमी शुक्रवारीं प्रातःकाळीं कैद केला. नंतर सायंकाळपावेतों होते. नंतर श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यांचे कानावर कोणी मजकूर घातला नकळे. सरकारचा खिजमतगार आला कीं जिवाजीपंत यांस तुम्ही बसविलें आहे त्यास मिरजेस न पाठविणें. सरकारांतून आज्ञा होईल तसें करणें. जनार्दनपंत बोलिले कीं, त्यास मीं बसविलें नाहीं. नानानीं चौकी बसविली आहे. ते काय तें करितील. आम्हाकडे जाबसाल कांहीं नाहीं. याप्रमाणें सांगोन एकादशीस प्रातःकाळीं श्रीमंत राजश्री नानाकडे जाऊन वाड्यांतून परवानगी आली म्हणोन सांगितलें. त्यावरून नाना बहुत रागें भरोन गालिप्रदानें दोन चार देऊन बोलिले कीं, त्यास लोहगडास आतां रवाना करणें. धोंडोपंत यांस बोलावून आणून त्यांस रुबरू ताकीद केली. त्याचे वीस असामी गाडदी व कारकून येऊन त्यांचे स्वाधीन केलें. याप्रमाणें येथें वर्तमान जाहलें. या उपरांत नानांजवळ कोणी एकानें विनंती केली असतां, कांहीं एक होत नाहीं, लोहगडास गेले, येविषयींचा मजकूर राजश्री दाजीबानीं स्वामीस लिहिला आहे. श्रुत होईल. आणखी यथाज्ञानें मजकूर पुरवणी लिहिली आहे त्यांत आहे. स्वामीनीं विचार केला पाहिजे. हे विज्ञापना.

नं. ४०६२ श्री. (भाद्रपद शु० ८–२९ आगष्ट.)

पै॥ छ० ९ रबिलावल. सन समान तिसैन. आश्विन.

[1]सेवेशीं मोरोबानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना येथील कुशल तागायत छ० ६ रबिलावल पर्यंत स्वामींच्या कृपें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री बापूसाहेबांनीं लिहिलें आहे त्याजकरून विदित होईल. श्री॥ सौभाग्यवती यशोदा[2]बाईच्या दुखण्यास अद्यापि गुण नाहीं. दिवसेंदिवस अशक्त होतात. रविवार पासून वे॥ राजश्री धोंडभट वैद्य लागवणकर यांचें औषध चालतें जाहलें आहे. श्रीगजानन कृपा करील तेव्हां खरें. दैवी औषधी उपाय बहुत होत आहेत. कळावें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४०६३ श्रीगजानन. (भाद्रपद शु. १०–३१ आगष्ट)

पै॥ छ० ११ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपद.

छ८ रबि[3]लावल. आलिजाबहाद्दर सरकारवाड्यांत आले. संपत शनिवारीं तैलाभ्यंग होऊन भोजन जाहलें. तेव्हां (परशुरामभाऊंच्या) सुटकेविषयीं (शिंद्यानीं) श्रीमंतांस विनंती केली. "हरामखोर मी आहें. प्रथम मी संमत न देतों तर त्याचे हातून हें कृत्य होतें कीं काय? मी हिंदुस्थानांत गेल्यानंतर पांच हजार फौज घेऊन शत्रूवर जाण्यास सरदार कोण आहे? अंतर पडलें असतां क्षमेंत आणोन सरकार कामावर पाडावें." ऐसीं बोलणीं पडलीं, तेव्हां आज्ञा जाहली कीं राज्याचा ढवैणा वारला म्हणजे त्यांची सुटका होईल. आलिजाबहाद्दर यांचे म्हणणें, पूर्ववत्प्रमाणें दौलत उभी करावी घरदारसुद्धां. श्री इच्छा प्रमाण! वाड्याभोंवतीं पलटणें आहेत तीं उठावीं येविषयींचें बोलणें जाहलें. पलटणें उठलीं

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.. २ चिंतामणराव आपांची स्त्री व बाबा-फडके यांची कन्या. ही माहेरीं पुण्यास होती. ३ बाळाजी गणेश जोशी यांचें पत्र पुण्याहून मिरजेस. ४ दंगा.

असतां आम्हीच लष्करांत येतों, ऐसें श्रीमंतांचें बोलणें पडलें ! त्याजपक्षीं तूर्त पलटणें उठवावयाचीं खलबतें बहुत होत आहेत. काय होतें पहावें. बाजारी वर्तमान. खरें नव्हे. हे विज्ञापना.

नं. ४०६४ श्री. (भाद्रपद शु० ११–१ सप्तंबर.)

पै॥ छ० ९ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपद.

[1]सेवेशीं विज्ञापना. शिंदे यांजकडील कारकून व लोक रा सखाराम घाटगे याचीं मुलें माणसें न्यावयासीं आलेले चिखलीस काल निघोन करवीराहून गेले. परंतु राजश्री रत्नाकरपंत यानीं श्रीमंत महाराजांस मसलत दिली कीं मूल देऊं नये. सामानगडाकडे मूल नेली असें वर्तमान आहे. खटला पडेलसें दिसतें. ही मसलत वरकडांच्या मनास आली नाहीं. पुढें काय होईल तें सेवेशीं लिहून पाठवीन. कळावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं ४०६५ श्रीगजानन. (भाद्रपद शु० १२–२ सपटेंबर.)

पै॥ छ० ११ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपद.

[2]विज्ञापना. श्रीमंत राजश्री नाना यांचे स्त्रीस रजोदर्शन प्राप्त जाहलें. तालगुदस्तां लग्न झालें तिला नहाण आलें. गर्भाधान करावयाचें याजकरितां [3]सुताराची मूल तिगस्तां लग्न जाहलें तिला मेणवलीहून आणविली आहे. तिला अद्याप नहाण आलें नाहीं. विदित होय. श्रीमंत उभयतां साहेब उत्सवासाठीं राजश्री आबा शेलूकर व गद्रे व फडके यांचे घरीं गेले होते. विदित होय हे विज्ञप्ति.

नं. ४०६६ श्री. (३ सप्टंबर.)

पै॥ छ० १६ रबिलावल. सन समान तिसैन.

---

१ नारो हरी करंदीकर याचें पत्र करवीराहून मिरजेस. यावर आम्हीं तारीख व मिति पैवस्तीची घातली आहे. २ बाळाजी गणेश जोशी याचें पत्र पुण्याहून मिरजेस. यावर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे. ३ कोंकणस्थ ब्राह्मण. आडनांव सुतार.

श्रीमन्माधवचरणांभोरुहभृंगायमानांतःकरणविद्वद्वृंदपरिपाल-नैकव्रतपट्टवर्धनोपाख्यगंगाधरशर्मणां

प्रतिपच्चंद्रलेखेव प्रीतिवर्धिष्णुनातूपाख्यगोविंदभट्टकृतानेक प्रणामाः समुल्लसन्तु. विशेषस्तु. अत्रत्य क्षेम भाद्रपद शुद्ध १२ रविवासरावधि यथास्थित जाणोन स्वीय क्षेमलेखनेंकरून संतोष करावा. आम्हीं विजयादशमीचे मुहूर्तें निघोन भेटीस येतों. येतेसमयीं रामकृष्ण काव्याची टीका घेऊन येतों. सदैव पत्रद्वारा आश्रितजनांचा परामर्ष असावा. बहुत काय लिहिणें लोभवृद्धि करावी. हे विनंती.

नं. ४०६७ श्री. (+भाद्रपद शु० १४–५ सप्टंबर.)

पै॥ छ० १३ रबिलावल. सन सभान तिसैन. भाद्रपद.

[1]सेवेशीं विज्ञापना. पुण्याहून एक गृहस्थ आला त्याणें वर्तमान सांगितलें, कीं दसरा जालेवर पुण्याहून करवीराच्या परामर्षास फौज येणार. स्वामींकडे व श्रीमंत राजश्री दादासाहेब यांसही पत्रें येणार. पुण्याच्या फौजेनें स्वामींच्या आज्ञेप्रमाणें चालावें. मिरजेस फौजा येत तों मात्र सरकारांतून खर्चाची बेजमी व्हावी. पुढें कामकाजही इकडे व खर्चही इकडे असें आहे. मिरजेसही पत्रें पुण्याहून श्रीमंत राजश्री नानाकडून रवाना सदरहू मजकुराचीं जाहलीं असें आहे. कळावें. मौजे टाकळी हा गांव इचलकरंजीकरांकडे आहे त्यास हल्लीं श्रीमंत नानानीं अंतवाडकर सांवत यांस इनाम गांव करून दिला. इचलकरंजीकरानीं वळ केल्यास श्रीमंत महाराजानीं ठाणें घालून द्यावें, म्हणोन महाराजांसही पत्रें आहेत. हें वर्तमान नांदणीकर देशपांडे यांणीं सांगितलें. कळावें सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

+ मिति व तारीख पैवस्तीची आहे. १ नारो हरी करंदीकर यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र करवीराहून. २ कुरुंदवाडकर.

नं. ४०६८ श्री. (भाद्रपद शु० १५–६ सपटेंबर.)

पै॥ छ० २१ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपदमास.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक नरसो तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १४ रबिलावल पावेतों यथास्थित असे. विशेष. ज्योती घोरपड्याच्या बायका वाळव्यांहून निघून जात होत्या त्यांचे पाठलागास आम्हांकडील राजश्री मुराररराव सांळोखे होते. त्याणीं तानगेस त्यांसीं गांठ घातली. बायका जमीयतसुद्धां गांवांत शिरून लढूं लागल्या. ते समयीं आपल्याकडील कुमकेस स्वार आले. त्याणीं मधीं पडून जाबसाल ठरावांत आणिला आणि ज्योतीस बातमी पोहोंचाविली. व छबिना आपल्याकडील उभा असतां बायका निघून गेल्या ! रात्रीस ज्योतीनें येऊन मुराररराव याजवर छापा घातला. याप्रमाणें येथें सर्वतोमुखीं वर्तमान आहे. हें आपल्यास समजून आलें नसेल व ज्यानी बातमी पोहोंचविली त्यांचा विचार आपण केलाच असेल. पाडाव घोडीं व लूट आपल्याकडील लोकांनीं नेली. मधलेमधीं असा प्रकार घडतो. याजमुळें विरुद्ध येतें म्हणोन विस्तारें विनंती लिहिली. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं.+ ४०६९ श्री. (भाद्रपद व० ४–१०सप्टेंबर.)

पै॥ छ० १८ रबिलावल. सन समान तिसैन भाद्रपद.

ती॥ राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.

विज्ञापना. "जप्तीवाला ती॥ राजश्री आपासाहेबाचें सर्वस्व आणावयासाठीं मिरजेस बसला आहे त्याचें कसें करावयाचें ? राजश्री दाजीबा आंबेकर यांस पाठविलें. श्रीमंत राजश्री नानानीं पत्रें पाठविलीं त्यांतील अर्थ पहातां सर्वस्व अपहार करावा ऐसा

+ या पत्रावर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे.

भाव आहे. त्यास याचा विचार काय करावयाचा" म्हणोन तपशील राजश्री बजाबांस पुसिला. त्याणीं उत्तर केलें कीं, नानांच्या मनांत सर्वस्व भाऊंचें आणावें ऐसें नाहीं. परंतु श्रीमंतांपुढें इलाज नाहीं. श्रीमंतांचे निरोप वरचेवर नानांस येतात. "भाऊंची चीजबस्त सुद्धां दौलत कां अद्याप येत नाहीं ?" ऐसे निरोप येतात. आणि नानाही कोठें भले आहेत! ऐसें बज्याबाचें म्हणणें. त्यांतही नानांस पुसिलें. त्याणीं सांगितलें कीं, येथें सर्वांस श्रीमंतसुद्धां बोभाट जाहला पाहिजे कीं, भाऊचें सर्वस्व आणिलें. याजउपरी त्यांजपाशीं कांहीं नाहीं. ऐसें होईल तेव्हां जप्ती मोकळी होईल. तेव्हां गाड्याचा माग फेंसाटीनें मोडावा. याप्रमाणें नाना बजाबापाशीं बोलिले. तेव्हां मी उत्तर केलें कीं, गाड्याचा माग फेंसाटीनें मोडावा म्हणजे कैसा तो तपशील बोला. तेव्हां बजाबांनीं उत्तर केलें, त्याचा तपशील बीतपशीलवार कलमबंदी मुख्य दौलत मिळून हत्ती, घोडीं व उंटें फरासखाना व कापड व रोकड व जवाहीर वगैरे सर्व जिन्नस मिळून दौलत. यांतील मजकूर बजाबाच्या बोलण्यांतलि भाव जें बोलिले तें समजावें. आपलें येथें कापड असेल त्यांपैकीं जुनेंपानें पांच सात हजार रुपये पावेतों कापड देणें. कलम १

तैसींच उंटें निमेशिमें द्यावीं. कलम १

जवाहीर वस्तभाव नाहीं म्हणावें. त्यांतही कार्याकारण एकादी कंठी, एकादा शिरपेच, कांहीं वस्तभाव. दहा पांच हजार पावेतों द्यावी. कलम १

घोडीं शेपन्नास असतलि त्यांपैकीं वाईट वाईट चाळीस पन्नास घोडीं द्यावीं. कलम १

रोकड रुपये शिल्लक नाहीं म्हणावें. त्यांत पांच सात दहा (हजार) पावेतों द्यावे. कलम १

तैशींच गुरें कांहीं निम्मेशिमे येणेंप्रमाणें. लम १

तैसाच फरासखाना कांहीं असल्यास. कलम १

येणेंप्रमाणें तोंडानें नाहीं म्हणावें तें हातानें नाहीं म्हणावें म्हणजे भाऊंचें सर्वस्व घेतलें ऐसेंही जाहलें. माग मोडला असें होतें. याप्रमाणें बजाबाचें म्हणणें आहे. मग नाना बजाबापाशीं कसें बोलिले असतील कळत नाहीं. जें बजाबाचे मुखें आयाकिलें तितकें लिहिलें आहे. या परतें बजाबाचे हातें होत नाहीं. मंडळीचें पुरवणी पत्रीं लिहिलें आहे तें कमी होत नाहीं. मंडळीचें त्याप्रमाणें व्हावें आणि हें असें व्हावें ऐसें स्पष्ट बजाबाचें म्हणणें आहे. असें होत असल्यास आम्ही निभावून देतों. नाहीं तर याशिवाय कमी आपले हातें होतां दिसत नाहीं. याप्रमाणें बजाबा बोलिले. कळावें करितां लिहिलें आहे. हे विज्ञापना. रवाना मंगळवार+

नं.[१] ४०७० श्री. (भाद्रपद व० ४–१० सपटेंबर.)

पै॥ छ० १८ रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपदमास.

ती॥ राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विज्ञापना. वडिलीं रायाजी काल्या व केरूबराबर पत्रें पाठविलीं तीं पावलीं. राजश्री बजाबा शिराळेकर आलेनंतर त्यांस पांच सात दिवस ज्वर येत होता. एक दोन वेळां त्यांजकडे गेलों होतों. त्यांची गांठ चांगली पडली नव्हती. नंतर गांठही पडली. वडिलीं मंडळीच्या यादी बज्याबाकडे आंख घालून पाठविल्या होत्या त्या बजाबांनीं मला दाखविल्या. आणि मला म्हणूं लागले कीं, काय तें बोला. तेव्हां मी त्यांस सागितलें कीं, गृहस्थांचें जीवन पाहून आंख घातले आहेत. याचा विचार मी काय सांगावयाचा आहे ? आपणच श्रीमंत राजश्री नानांस विनंती करून काय तें

+ रामचंद्र श्रीधर ऊर्फ बाबा काळे यांचें मिरजेस पत्र. १ पत्र बाबा काळे यांचें पुण्याहून बाळासाहेबांस मिरजेस. यावर मिति व तारीख आम्हीं घातली आहे ती पैवस्तीची आहे.

उत्तर सांगावें, म्हणजे त्यासारखें मिरजेस लिहितों. त्यावरून त्या यादीच नानास दाखविल्या. नानानीं बजाबांस उत्तर केलें कीं, ऐसें कां समजावतां ? येथें म्हैस(कर) वगैरे खातरजमा करितात कीं, किमान या मंडळीपासून अगदीं न घेणें तरी तीन लक्ष रुपयेस कमी घेऊं नये ! ऐसें म्हणत असतां तुम्ही या यादी दाखवितां यांत काय आहे ? तेव्हां नानानीं उत्तर केलें कीं, जर तुमच्या हातून मंडळींचें विल्हे लावावयाचें असल्यास काय तें खचित सांगणें. नाहीं तर व्यर्थ नाद कशास पाहिजे ? तेव्हां बजाबानीं नानांस विनंती केली कीं, निदान पन्नास हजार घ्यावे. तेव्हां नानानीं साफ सांगितलें कीं जर तुम्हास तोड पाडणें असली तर एक लक्ष रुपये सरकार व पंचवीस हजार दरबारखर्च याप्रमाणें तोड पडत असल्यास बोलावें. नाहींतर न बोलणें. ऐसें साफ उत्तर केलें. त्याप्रमाणें मला बजाबानीं बोलावून नेऊन सांगितलें. मंडळीचें सवा लक्षाशिवाय कमी कांहीं बजाबाचे हातें होत नाहीं. आणि बजाबा म्हणत होते कीं, नाना बोलिले कीं, गंगाधरराव यांचे खातर सवा लक्ष कबूल करितों ! नाहींतर पांचांस कमी केलें नसतें ! तें व्हावयाचें नसल्यास मंडळी जप्तीवाले यांचे हवालीं करावी. म्हणजे गुंता उरकला. ऐसें नानाचें म्हणणें बजाबापाशीं स्पष्ट पडलें. त्याणीं याप्रमाणें मला सांगितलें. आणि बजाबानीं मला सांगितलें कीं, "मंडळीचे सव्वा लक्ष पर्यंत जालें तरी उरकून टाकावें. आजपर्यंत बाळासाहेबांनीं राखिलें आणि आज मंडळी हवालीं केली तर चांगलें दिसत नाहीं. कांहीं इतकें उत्पन्न होत नसल्यास चार रुपये बाळासाहेबांनीं व आपासाहेबांनीं आपले अंगावर सोसावे, आणि मंडळी मुक्त करावी. मी मध्यें बोलितों. मला यश द्यावें. मला म्हटल्यासही मी पांच हजार रुपये गरीबांचे मुक्ततेसाठीं देईन" याप्रमाणें बजाबाचें म्हणणें आहे.

त्यास कसें करावयाचें तें लिहावें. आज मंडळीपासून उत्पन्न होणें कठिण, परंतु आज धोप संभाळावी. यादी नांवानिशीवार करून ठेवाव्या. मंडळीही देईल. गुंता नाहीं. सवा लक्ष कबूल केल्यास आजपर्यंत रक्षिलेसारखें सर्व मंडळी पार होती. कळावें. मग जसें मर्जीस येईल तसें लिहावें. मंडळींचें यापेक्षां कमी शिराळेकर यांचें वस्तु होत नाहीं. रवाना मंगळवार हे विज्ञापना.

+नं. ४०७१ श्री. (भाद्रपद व० ६–१२ सप्टेंबर.)

पै॥ छ० २० रबिलावल. सन समान तिसैन. भाद्रपद.

सेवेशीं सदाशिव आनंदराव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. काल स्वारांचे समागमें आपणांस विनंतीपत्र पाठविलें. आम्ही अथणीहून निघोन पुढें तलेसंगास जात होतों. तिकडून ती॥ राजश्री अप्पा येत होते. मार्गीं भेट जाहली. त्यांस वर्तमान निवेदन केलें. ते आम्ही मिळोन येऊन अथणीस मुक्काम केला. तिकडील वर्तमान आणोन शोध केला कीं, जोती घोरपडा तानंगेहून बायकोसुद्धां निघोन मंगसुळीस आला. रात्रीं तेथें मुक्काम करून दुसरे रोजीं निघोन येऊन आथणीस श्रीचे देउळांत तीन चार मुक्काम करून जखमी मिळोन मुधोळास शामराव घोरपडे यांस सांगोन पाठवून शें दोनशें स्वांर प्यादे आणोन, नदीपलीकडे आसंगीचे कुरणांत मुक्काम करोन चारसहा घटका होता. येथें जखम्यांस खर्चास देऊन आरबसुद्धां म्हैसवाडीपाशीं नदीपार होऊन त्यांसीं मिळाला. ते हे मिळून मुधोळास गेले. पुढें उपलंनाम (?) याचा नांदूर परागणा शंकरोजी राजे घोरपडे याजकडे आहे. राजश्री महाराव घोरपडे व राजश्री मिळून हजार दोन हजार जमाव केला आहे व त्यांचे कारभारी याणींही हजार जमाव केला. त्यांची यांची कटकट माजणार.

+ पत्रावर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैबस्तींची आहे. २ हा धोंडोपंत कोण ?

माघारी यावयाचा कांहीं पल्ला नाहीं. सेवेशीं कळावें. श्रुत होय हे विज्ञापना.

+नं. ४०७२ **श्रीगणराज.** (भाद्रपद व० ६–१२सप्टेंबर.)

पै॥ छ० २० रबिलावल सन समान तिसैन. भाद्रपद.

विज्ञापना. आज दोन महिने शिक्के कट्यार सुटली नाहीं. देणें करार होत नाहीं. खलबतें बहुत होत आहेत. मनसबा समजत नाहीं. श्री इच्छा काय आहे न कळे ! हल्लीं राजकारणही दुसरेंच चालीस लागलें आहे म्हणोन ऐकतों. माझेही ऐकिण्यांत थोडें थोडें आलें आहे परंतु कागदो पत्रीं कसें लिहावें ? परंतु पूर्वी जाहलें असें होणार अशी लोकवार्ता बहुत आहे. ईश्वर काय घडवितो न कळे. श्री इच्छा प्रमाण. इकडील वर्तमान अधिकोत्तर लिहावेंसें नाहीं. मागाहून जें आढळेल तें लिहून पाठवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री नानांचा मनसबा वेगळाच दिसतो. कोणचे पल्लचास जातें न कळे. श्री इच्छा प्रमाण होय. हे विज्ञापना. वर्तमान बाजारी आहे. खरें नव्हे.

नं. ४०७३ **श्रीगणराज.** (भाद्रपद व०९–१५ सप्तंबर.)

पै॥ छ०२७ रबिलावल. सन समान तिसैन.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ०२३ रबिलावल यथास्थित असे. विशेष वडिलीं आशीर्वादपत्र बाबाजी सांडणीस्वार याजबरोबर पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि यांचे वाड्यांत शिंद्याकडील आरब चौकीस होते. गणेश काशी कात्रे यांचे घरींही होते. खासा गणेशपंत श्रीमंतांजवळ होता. आलिजाबहाद्दर याणीं हुजरे व कारकून पाठवून गणेशपंत कात्रे यांस आपले गोटांत घेऊन गेले. दोन दिवस प्रतिनिधि याणीं आरबांस

+ पत्र विठ्ठलराव पांडुरंग याचें पुण्याहून. याचर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैवस्तीची.

तीनशें चारशेंप्रमाणें रोज दिला. याप्रमाणें प्रतिनिधीकडील वर्तमान आहे. छ० २२ रोजीं गुरुवारीं मल्हारजी होळकर याचे गोटावर अली-जाबहाद्दर याणीं चालून घेतलें. आपण खासा चार घटका रात्रीस स्वारी तयार करून पर्वतीजवळ रमण्यांत फौज घेऊन उभे राहिले. कांहीं फौज व पलटणें पंचवीस जरंबा ऐसा सरंजाम होळकर यांचे मोहल्यावर पाठविला. काशीबा होळकर याणीं तिकडून लढाई सुरू केली. तों फौज भारी. याणीं गांठलें. तरवार चालली. चाळीस पन्नास मनुष्य होळकराकडील व शिंद्याकडील ठार व जखमी जाहलें. खासा मल्हारराव होळकर यांस तरवारेच्या जखमा व तिराची जखम व गोळी ऐसी लागून ठार जाहले. मशारनिल्हेची स्त्रीही वारली. गोट शिंद्याकडील लोकांनीं लुटला. होळकराचा मुडदा दहनास काशीराव याणीं नेला. पूर्वी चार रोज अलिजाबहाद्दर यांणीं मल्हारराव यांस सूचना केली कीं फौज रुकसत करावी. आम्ही सांगतों त्याजप्रमाणें ऐकावें. परंतु तें न ऐकिलें. प्रातःकाळीं तोंड धूत डेऱ्यापुढें बसले म्हणोन बेहुषारी-मुळें ऐसी गोष्ट गुदरली ! सावध घोड्यावर असते तर हंगामा बराच होता. श्री इच्छा प्रमाण ! ती॥ सौभाग्यवती यशोदा वहिनीस फडके याणीं तेलंग वैद्याकडून औषध देववीत होते तें औषध प्रकृतीस न माने. उष्णता बहुत जाहली याजमुळें फडके याणी मागती सुलतानजी पाटील यांस औषध देण्यास प्रारंभ कराविला. हें औषध देऊं लागून दोन रोज जाहले. उष्णता किंचित् कमी आहे ऐसें म्हणतात. पहिल्या प्रकृतीवर प्रकृत यावयास आठ रोज पाहिजेत. वडिलांचे आशीर्वादें करून आरोग्य होईल. सुलतानबा औषध देत नव्हता. ' प्रकृत ताळ्यावर होती. नूतन औषध देऊन बिघडविली. हगवणीचा उपद्रव जाहला. त्यास आतां मी कसें करावें ? निमित्याचा करा-

१ तोफा.

भार;' म्हणों लागले. नंतर बहुत प्रकारें सौभाग्यवती वहिनीस फडके याणीं पाटलांस सांगितलेवरून औषध सुरू केलें आहे. श्रीकृपा करील. कळावें करितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे +विज्ञापना.

नं. ४०७४ श्री. (भाद्रपद व० १२–१७ सप्टेंबर)

पै॥ छ० १४ रबिलाखर. सन समान तिसैन. आश्विन.

सेवेसीं बाळकृष्ण महादेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० २५ रबिलावलपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री नागोपंत आपा व श्रीमंत राजश्री नारायणराव घोरपडे यांचे गांव खेडच्यांस श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामी फौज पाठवून उपद्रव करणार, म्हणून श्रीमंत राजश्री नाना स्वामींस विनंती करून स्वामींस पत्र घेऊन पाठविलें आहे. महाराजांकडील फौज आल्यास श्रीमंत नानांच्या पत्राअन्वयें फौज पाठवून बंदोबस्त चांगले रीतीनें जाहला पाहिजे. सेवेशी श्रुत होय. हे विज्ञापना.

नं.४०७५ श्री. (भाद्रपद–व० १४–१९सप्टेंबर.)

पै॥ छ० ३० रबिलावल. सन समानतिसैन. मार्गशीर्ष शु॥ १

सेवेशीं बाळकृष्ण महादेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २७ रबिलावलपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून बहुत दिवस आज्ञापत्र न आलें त्यामुळें सेवकाचें चित्त उदास आहे. तर आज्ञापत्र पाठवून चित्त संतोषविलें पाहिजे. श्रीमंत अमृतराव साहेबांची व श्रीमंत नानांची गोडी जाहली त्यांत दिक्कत राहिली नाहीं. श्रीमंत बाजीरावसाहेबांचें चित्त मिळवून घेत आहेत. शिंदे तूर्तच हिंदुस्थानांत जात नाहीं. माघ

+ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पत्र मिरजेस. १ हा नानांच्या विश्वासांतील कारकून. उपनांव बाळ. याचें हें बाळासाहेबांस पत्र. २ पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस.

मासीं जातील तर न कळे. मुलखाची खराबी बहुत जाहली आणि होतच आहे. शिंदे यांचा सरंजाम भारी यामुळें इलाज चालत नाहीं. श्रीमंतांचे पदरीं सरदारांत शिंदेच मात्र आहेत. सलतनत भारी. जातील तो सुदिन ! सेवेसीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४०७६ श्री. (भाद्रपद व० १४–१९सप्टेंबर.)

पै॥ छ० २७ रबिलावल. सन समानतिसैन. भाद्रपद मास.

पुं॥ सेवेशीं शिरसाष्टांगनमस्कार विज्ञापना. (आपण) राहिमतपुराविषयीं लिहिलें, त्यास शिंदे यांस दहा लक्षांची जहागीर द्यावी असें सरकारांतून असें ठरलें; तेव्हां शिंदे यांचें म्हणणें रहिमतपूर त्यांत आम्हास द्यावें. तेव्हां श्रीमंत राजश्री नानांस (आम्ही) सांगून राहविलें. दुसरे महाल लावून दहा लक्षांची भरती केली. रहिमतपुरची सोडचिठी आणवितों म्हणोन नाना बोलतात. येईल तेव्हां खरी ! परंतु नानांनीं सांगितलें आहे (कीं) त्यांस महाल द्यावयाचे त्याच्या सनदा ही चिठी आल्याशिवाय देत नाहीं. असा प्रकार आहे. घडतां घडतां काय घडेल तें खरें. येथील कोणतेंही प्रमाण मानावयाचें नाहीं. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४०७७ श्री. (अश्विन–सप्टेंबर)

+यादी. जिवाजी रामचंद्र जोशी याचीं कलमें–

मला कैदकरून राजश्री धोंडोपंत निजसुरे यांचे गोटांत ठेविलें. तेथें माझी चीजवस्त घोडीं वगैरे जप्त करून ठेविलीं आहेत तीं देवावीं.

कलम १

मिरज प्रांतीं हरिपूर म्हणून गांव श्रीकृष्णातीरीं आहे तेथें माझीं मुलें मनुष्यें आहेत. त्यांस उपसर्ग होऊं नये. आणि माझी चीजवस्त दाणा वगैरे जप्ती करून मिरजेस नेला असेल तो माघारा

---

१ बाबूराव शिवाजी म्हैसकर यांचें पत्र. यावर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे. + नानांस लिहून दिलेली.

देवावा. व माझीं कुळेंडाळें कर्जवामाचीं आहेत त्यांस उपद्रव केला असेल, त्यास होऊं नये. सोईसोईनें केलें जाईल. कलम १

माझेकडे मिरजकरांचे तसलमातीचे लढे आहेत म्हणोन स्वामींस समजावितील. तरी आज वीस वर्षांची तसलमात—ते सालजाब जमाखर्चाचे आहेत. त्यास श्रीमंत राजश्री चिंतामणराव अप्पा व ती॥ राजश्री बाळासाहेब या उभयतांचा घरकलह लागला आहे त्याचा फडशा होईल तों मला तसलमातीचा उपद्रव मिरजकर यांजकडून लागों नये. कलम १

या उपरी माझें रक्षण सरकारांतून व्हावें. ती॥ राजश्री बाळासाहेबांचे हातीं देऊं नये. आणि मजवर कृपा करावी. कलम १

नं. ४०७८ श्रीगजानन. (भाद्रपद व० १४–१९ सप्तंबर)

पै॥ छ० २७ रबिलावल. सन समान तिसैन.

'विज्ञापना. बाजारी अफवा. गणेशपंत कात्रे अलिजाबहादर यांजकडे गेले आहेत ते राजश्री तात्या जोशी यांजकडे हिशेब घेणार. होळकरांचे गडबडीमुळें गद्रे व शेलूकर व निजसुरे फार गडबडले आहेत. कारभारी ही बहुत खप्पा आहेत. ईश्वरी तंत्र काय आहे हें समजत नाहीं. एवंच सगळें शहर गडबडलें आहे. गृहस्थ अद्यापि निजसुरे यांचे गोटांत आहेत. महाराजांचे मर्जीस आल्यास कानडे प्यादे दोन रोजमुरेची बेगमी करून पाठवावे. केवळ मजकडे आले हें कळूं नये. सालगुदस्ता आश्विन वद्यपक्षीं गडबड जाहली त्या प्रमाणें होणार ऐसें लोक बोलूं लागले. काय कोणेवेळेस होईल हें समजत नाहीं. हुजरात एकत्र होऊन कांहीं खटला व्हावा, कीं नामी मनुष्य कैद करावा, जिवानीसीं मारणें हें काय? ऐसे अनेक प्रकार आहेत. शिंदे आपली फौज पागा वगैरे जमा करितात म्हणोन

---

१ बाळाजी गणेश जोशी कारकून याचें मिरजेस पत्र. यावर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे. २ घेणार कीं देणार ? ३ जिवाजीपंत पोतनीस. ४ तुमच्या. ५ मल्हारराव होळकराचा प्राण घेणें म्हणजे काय !

बोलवा आहे. एवंच कांहीं कलह उत्पन्न व्हावा हा अर्थ दिसत आहे. करवीरकर उपद्रव करितील यास्तव बंदोबस्त चांगला असला पाहिजे. श्रीनिर्मितानुरूप घडेल तें खरें! गोळा गोळीचा (?) खटला गद्रे यांजकडील जाहला त्यास गद्रे यांचा कारकून संभाजीपंत यास हवालां सरकारांत करावा हा बेत ठरला असें बाजारी वर्तमान आहे. खरें न्व्हे. पर्जन्य नाहीं. पैसा उत्पन्न नाहीं. खटले या रीतीचे! श्री करील तें खरें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. प्रतिनिधीचा खटला शेलूकर यांजकडे कांहीं दिसत आहे. हे विज्ञप्ति.

नं. ४०७९ श्री. (आश्विन. शु० १–२१ सप्टेंबर.)

सेवेशीं विज्ञापना. ता॥ छ० २९ माहे रा॥वलपर्यंत वृत्त यथास्थित असे. विज्ञापना ऐसीजे, इकडील वर्तमान तरी पुणेंहून व वाकिलांचीं पत्रें आलीं त्यांतील मजकूर तरी होळकर यांचे पुत्र उभयतांत कलह लागून वडीलकीचा व हरयेकविशींचा ऐसें उभयतांत विरुद्ध लागून एक श्री॥ राजश्री नानांच्या पाठशीं व एक राजश्री दौलतराव शिंदे यांच्या पाठशीं पडून उभयतांचें झुंज जाहलेनंतर नानांच्या पाठशीं होता त्यासीं थोरला भाऊ यानें करोली जोडगोळ्या घालून ठार जिवें मारिला. शहरांत बहुत दंगा जाहला. याजप्रों पत्र आलेनंतर कागलकर याची बायको व मुलगी शिंदेकडील कारकून आले आहेत त्यांसीं देणेंविशीं निक्षून ताकीदपत्रें दिलीं आपा निपाणकर देसाई यास कीं शिंदेकडील कारकून आले आहेत तरी सखाराम घाटगे याचीं मूल तूर्त यांच्या स्वाधीन करणें. याज प्रों जाहलें. हुजूरचा रोखा कुरुंदवाडच्या वाडीस व कुरुंदवाडास जाहला आहे कीं ठाणें स्वाधीन करणें म्हणून लोक गेले आहत; त्यासीं, त्यांचा कारकून येथें आहे, परंतु बोलणें कांहीं आणखी

---

१ पत्र नारो हरी करंदीकर याचें कोल्हापुराहून. २ करवीरकरांचा वकील पुण्यास आहे त्याचीं.

होऊन मनाचिठ्ठी जाहली नाहीं. वरकड मजकूर जबानी गोविंदा पवार सांगतां सेवेशीं निवेदन होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०८० **श्रीगजानन.**.(आश्विन शु० ८--२८ सप्टेंबर.)

पै॥ छ० ७ रबिलाखर. सन समान तिसैन. आश्विन.

+ साष्टांग नमस्कार विनंती विशेष. जनवार्ता ऐकिली कीं मिरजेच्या किल्लयांत फितूर जाहला. याजकरितां मुजरद पत्र पाठविलें आहे. अधिकोत्तर मजकूर असल्यास कळविला पाहिजे. परम सावध असावें. आपल्या खबरदारीस तर उपमा नाहीं, परंतु कालगति विजातीय जाहली आहे. परम सावधपणें असावें. हे विनंती.

नं ४०८१ **श्रीगणराज.**(आश्विन शु. १०--३० सप्टेंबर)

पै॥ छ० ९ रबिलाखर. सन समानतिसैन. आश्विन.

विज्ञापना. मल्हारजी होळकर याचा लेकवळा (भाऊ) होता तो गडबडींत पळाला. त्याणें दहा हजार फौज जमा केली आहे, म्हणोन बाजारी अफवा आहे. शिंदे यांचे लष्करांत व कंपूचे लोकांत फितवा जाहला आहेसें म्हणतात. बाजारी अफवा--"श्रीमंत राजश्री नाना (श्रीमंतांस) म्हणतात कीं, आपला कारभार आपण करावा. मी वृद्ध जाहलों. मी स्नानसंध्या करीन." ऐसी विनंती करणार म्हणोन लोकवार्ता आहे. *राजश्री चिंतोपंत, बाळाजी विष्णु, जयरामपंत, चिंतोपत यांची स्त्री, यांस किल्लयास नेत होते. वडगांवपर्यंत (मंडळी) गेली होती तों श्रीमंतांनीं माघारी आणिली म्हणोन

+ बाळाजी गणेश जोशी कारकून याचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. यावर आमची मिति व तारीख पैवस्तीची. १ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र. पुण्याहून मिरजेस. यावर आमची मिति व तारीख पैवस्तीची आहे. * परशुरामभाऊंबरोबरच कैदेंत सांपडलेले हे सर्व त्यांचे अनुयायी मुत्सद्दी. यांचीं अनुक्रमें उपनामें लिमये, सहस्रबुद्धे व बापट.

बोलतात. कळावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. ती॥ राजश्री आपासाहेब यांस ती॥ सौ॥ वहिनीच्या प्रकृतीच्या मजकुराचे कागद लखोटा करून पाठविला आहे तो लखोटा वडिलांकडे पाठवावयाची आज्ञा व्हावी. हे विज्ञापना.

नं. ४०८२ श्रीगजानन. (आश्विन शु० १०–३० सप्टेंबर.)

पै॥ छ० १५ रबिलाखर. सन समान तिसैन. आश्विन.

+विज्ञापना. तागायत छ० ९ रबिलाखर. यथास्थित असे. विशेष. दसरेस श्रीमंत सीमा उल्लंघनास गेले होते. श्रीमंत राजश्री नाना पाठीमागोन गेले. श्रीमंत सीमा उल्लंखन करून माघारे येतांना घासीरामाचे तळ्यापासीं स्वांरीची गांठ पडली. हत्तीवरूनच नानांनीं श्रीमंतांस नमस्कार केला. तेथेंच नजराणा जाहला. वाड्यांत नाना गेले नव्हते म्हणोन बोलवा. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४०८३ श्री. (आश्विन शु० १२–२अक्टोबर)

नक्कल.

राजश्री गोविंदपंत स्वामीचे सेवेशीं.

विनंती उपरी. राजश्री रामचंद्र परशुराम यांस तूर्त तगादा न करणें. मागाहून लिहिलें जाईल त्याप्रमाणें करणें. रवाना छ० ११ रबिलाखर. हे विनंती.

नं. ४०८४ श्री. (आश्विन शु० १३–३ आक्टोंबर)

पै॥ छ० १६ रबिलाखर. आश्विन मास. शनिवार. समान तिसैन

तीर्थस्वरूप[3] राजश्री बाळासाहब वडिलांचे सेवेशी विज्ञापना. वडिलीं छ० ४ रबिलाखरचें पत्र पाठविलें तें पावलें. पत्रीं सूचना की[?] मनाचिठीचे प्रयत्नाचा मजकूर समजला. श्रीमंत किंवा राजश्री नानाची

+ पत्र बाळाजीपंत जोशी यांचें पुण्याहून मिरजेस. १ ज्येष्ठ बंधु चिंतामणराव. २ हा पेशव्यांकडून मिरजेस जप्ती करण्याकरितां आलेला कारकून. उपनांव गोखले. यास ही नानांची चिठी. ३ बाबा काळे याचें पुण्याहून पत्र.

चिठी यावी असें करावें. ज्यांत राजश्री लेखकाचा इतला तितकें चांगलें म्हणून लिहिलें तें कळलें. त्यास आज्ञेशिवाय कोणतीच गोष्ट व्हावयाची नाहीं. आजपावेतों शिंदे यांचें घरीं मनाईविषयीं खटपट करीत होतों. याजउपरी करीत नाहीं. शिंदे याणीं श्रीमंतांची अथवा नानाची मनाई घेऊन दिली तर चिंता नाहीं. याशिवाय जबरदस्तीनें शिंदे यांजकरवीं जप्तीवाले यांस उठवून लावावें असें माव मी लिहिले होते ते वडिलीं सूचना केल्यापासून करीत नाहीं. आपण जशी आज्ञा करितील तसेंच करावयाचें, परंतु दैव कोठें थारा देईनासें जाहलें आहे. आजपर्यंत मी लिहित गेलों त्यांत आपले प्रत्ययास एक ही नाहीं आलें. त्याजमुळें आपल्यास माझी पत राहिली नाहीं. असो. दैव माझें! माझे हातें जितकी खटपट होईल तितकी करितों. मग दैव आपलें, परंतु जप्तीवाले यांस कंटाळूं नये. येथें अनेक प्रकारचे मनसबे आहेत. खामखां कांहीं तरी खटपट होईल खरी. माझी खटपट आहे ती गुप्त आहे, हें वडिलांस ठाऊक आहे. त्यांत ही मला यश नाहींसें मला समजलें. त्यांत वडिलीं तेथून कोणी शहाणा कारस्थानी यश संपादन करील असा पाठवावा. माझा काया वाचा मानस कोणीही बोलो, परंतु शेवट लावो इतकी इच्छा आहे. त्यास या उपरी कोणी-तरी पाठवावा. रवाना मंगळवार दोन प्रहर दिवस. हे विज्ञापना.

नं. ४०८५ श्रीगणराज. (आश्विनशु० १२—२आक्टोबर)

पै॥ छ० १६ रबिलाखर. सन समान तिसैन. आश्विन.

विज्ञापना + ता॥ छ० ११ रबिलाखर. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. आज दोन रोज रात्रंदिवस कारभारी यांजकडील लोक कमरा बांधून आहेत. गडबड रात्रीची बहुत होते. राजश्री नानांस प्रातःकाळीं बोलावणें वाड्यांतून आलें. तेव्हां नानानीं सांगितलें, घोड्यांचें वगैरे पूजन व्हावें. नंतर सीमा उल्लंघनास स्वारी निघाली

+ पत्र विठ्ठलराव पांडुरंग यांचें.

ते वेळेसही बोलावणें कारभारी यांस आलें होतें. श्रीमंतांची स्वारी जाऊन शमीपूजन करून माघारी फिरली तेव्हां नानांची स्वारी घासीराम याचे बागेनजीक गेली. बरोबर, फडके, शेलूकर, दादा गद्रे व शिराळेकर ऐसे होते. तीन हजार फौज नानाबरोबर होती. सरकारचे मानकरी होते. अंबारींतच नाना होते. श्रीमंतांस नमस्कार व नजराणा सोनें, ऐसें तेथें अंबारींत बसूनच बागेजवळ दिलें. नाना दोन घटका रात्रीस आपले वाड्यांत आले. सरकारचे वाड्यांत गेले नाहींत. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०८६ श्री. आश्विन शु० १३–३ आक्टोबर.)

पै॥ छ० ४ जमादिलाखर. सन समान तिसैन. मार्गशीर्ष शु॥५

राजाश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं. पोष्य बाळाजी जनार्दन. साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखीत जावें. विशेष. राजश्री भवानी श्रीपत देशपांडे परगणा करकंबें याणीं समजाविलें कीं, “ आपले वडिलानीं कसबेमजकुरी कुळांस तगाई देऊन पेठ वसविली होती. अलीकडे पेठेचा जागा कसब्यांत घेतला, त्यास तेथें आमचा महाजनकीचा वाडा आहे त्यापैकीं कांहीं जागा आबाजी बापूजी देशपांडे परगणेमजकूर याणीं जबरदस्तीनें घेतली. येविषयीं कमावीसदार त्यांस निक्षून ताकीद करीत नाहींत. याजकरितां आबाजी बापूजी यांस निक्षून ताकीद होऊन पूर्वापार आमचे महाजनकीचे वाड्याची जागा आहे ती आम्हास देविली पाहिजे,” म्हणोन. त्याजवरून हें पत्र लिहिलें आहे. तर येविशीं वाजवी मनास आणून भवानी श्रीपत याची जागा त्यास देवावी. रवाना छ० १२ रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे. हे विनंती.

नं. ४०८७ श्री. (३ आक्टोबर.)

पै॥ छ० १८ राखर. सन समान तिसैन. आश्विन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत आश्विन शु॥ १ ३ वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. विजयादशमीस श्रीमंत त्रिवर्ग सालाबाद प्र॥ शमीपूजनाचे जाग्याकडे गेले. समागमें श्रीमंत राजश्री नाना गेले नाहीं. इतर झाडून मंडळी गेली. शमीपूजन होऊन शिंदे यांच्या भेटी होऊन शिंदे याणीं सोनें तेथें देऊन सरबत्ती तोफांची व कवाइती कंपूची भारी झाली. शिंदे माघारे गेले. श्रीमंत माघारे येतात ही बातमी नानानीं राखून येथून तीन चार हजार सरंजामानिशीं लेस सामान घेऊन निघाले त्यानीं श्रीमंतांस गांवाबाहेर गांठिलें. अंबारीजवळ अंबारी लावून वरचेवरच विनायकरावसुद्धा चतुवर्गास सोनें दिलें. आणि स्वारी एकीकडे तुटून राहिली. सरकारची स्वारी गांवांत आल्यावर मग मागाहून नाना आले. वाड्यांत कांहीं गेले नाहीं. याजप्रमाणें जाहलें. आश्विन शु॥ १२ शिंदे शिकारीस सिंहगडाकडे आले. कधीं इकडे शिकारीस येत नाहींत. मोठे प्रातःकाळीं रमण्यांत आले. अगोदर रात्रीस नानानीं दोन हजार फौज तयार करून छबिन्यास ठेविली होती. शिंदे रमण्यांत आल्यावर अवघा गोट तयार नानाचा जाला. याजप्रमाणें सावधता होती. शिंदे याणीं सहा घटका शिकार खेळून मग गोटास गेले. याजप्रमाणें जालें. गांवांत लोक नानाप्रकारें बोलतात. कोणे समयीं कशी घडी येईल न कळे असें म्हणतात. वडिलांस कळावें. दसऱ्याचें वगैरे दरबारी वर्तमान राजश्री बाबूराव याणीं वडिलांस लिहून पाठविलें असेल. मी बाजारी ऐकींव लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०८८ श्री. (६ आक्टोबर.)

पै॥ छ० ४ जमादिलावल. कार्तिकमास. सन समान तिसैन. तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिळांचें सेवेशीं

विज्ञापना. वडिलीं छ० २२ रविलावलचें पत्र पाठविलें तें पावलें. "राजश्री गोविंद बाबाजीस मनाई चिठीची नकल दाखविली. चिठी आली असतां खर्चाचें मागणें त्याचें आहेच. यास्तव दुसरी चिठी ठरावांत आलेवर उठून येणें अशी पाठवावी," म्हणोन आज्ञा, त्यास उपद्रव न करणें म्हणोन चिठींत आहे तेंव्हां त्यांस खर्चास काय द्यावयाचें आहे ? चिठीचा भाग पाहतां त्यानें उपद्रव करूं नये. मग इलाज नाहीं ! श्रीमंत राजश्री नानांस वडिलीं पत्रें पाठविलीं त्यांचा जाब आल्याचा मजकूर लिहिला तो समजला. त्यास मंडळीचें नानानीं आपलेस कसें लिहिलें आहे ? मी येथें राजश्री बजाबासी आजचार महिने बोलतों. सवा लक्षावर आजवर होतें. हल्लीं एका लक्षावर मंडळीचे बेरजेचे बोला असें बोलतात. मी त्यांसीं दरबार खर्चासुद्धां पाऊण बोलिलों आहें. ते अद्यापि उतरत नाहींत. हल्लीं वडिलीं गोविंद बापाजीसी बोलतों म्हणोन लिहिलें, त्यास पाऊणपेक्षां कमीवर उलगडत असल्यास तेंच फार चांगलें आहे. तर बजाबाकडील नाद सोडला पाहिजे. तर एक वेगळीच पुरवणी मंडळीच्याच स्वाल-जबाबाची यावी कीं, नानानीं मंडळीचें बोलणें गोविंद पंतासीं बोलणें म्हणून लिहिलें आहे. बज्याबासी प्रयोजन नाहीं. या प्रमाणें वडिलीं पत्र पावतेक्षणीं लिहून पाठविलें म्हणजे आपली चिठी मला येईल तीच शिरोळकर यांस दाखवून नाद सोडतां येईल. नाहींतर मी येथें फजीत पडेन. यास्तव विनंती लिहिली आहे. श्रीमंत राजश्री माधवराव रास्ते यांसी नानाही मऊ पडले आहेत. केवळ वडिलांविषयींची अतिरुष्टता दिसत नाहीं. या प्रमाणें रास्ते सांगतात. वडिलीं वरचेवर नानांस लिहावें कीं, कोणीतरी बोलणार पाठवितों. आणि विना वडिलांकडून एकादा मातबर बोलणार आल्याशिवाय येथेंही बळ पडत नाहीं. वडिलीं केवळ माझे भरवंसेवर राहूं नये. मला राजरोस बोलतां येत

१ बाबा काळे यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

नाहीं. मी सरकारचा हारामखोर या बोलण्याविषयीं आहें. वडिलीं पूर्ण चित्तांत आणावें. श्रीमंतांनीं मला कृपा करून सोडिलें आहे खरें, परंतु जामीन घेतला आहे कीं, भाऊंचे अथवा भाऊंचे मंडळीचें तूं बोलणें बोलूं नये. तैसा मी जामीन देऊन गुंतलों आहें. हा एक प्रकार. आणि दुसरा नानासीं माझा वांकडेपणा वहुत आहे. नानाचे चौकींतून श्रीमंतानीं मला जबरदस्तीनें सोडविलें आहे. याजमुळें माझें बोलणें कोठेंच उजगाऱ्याचें नव्हे. यास्तव वडिलीं याचा विचार करून एकदा शहाणा मातबर पाठवावा म्हणजे तो प्रसिद्ध बोलला असतां दिक्कत नाहीं. याज उपरी नानासीं खचीत बोलणें लाविल्या-शिवाय गोष्ट कशी विल्हेस लागेल ? आमचा शोध घेणें म्हणजे सर्व चोरीचा प्रकार आहे. वडील सर्वजाण आहेत. वडिलीं ती॥ राजश्री हरबाअण्णास पाठवावें. अथवा वडिलांचे विचारें कार्य हरतऱ्हा करून सिद्धीस नेई असा पाठवावा म्हणजे ठीक. सर्व समजावें म्हणोन विनंती लिहिली आहे. यांत जसें विचारास येईल तसें करावें. मी वडिलांस कळवावें असा अर्थ नाहीं. रवाना आश्विन वद्य प्रतिपदा.[१] भृगुवार हे विज्ञापना. आणखी राजकी जें आढळेल तें मागाहून कासीपंताबरोबर कळवितों.

नं. ४०८९ श्री. (आश्विन व० १–६ आक्टोबर.)

पै॥ छ० १९ रबिलाखर. समान तिसैन.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं

[१]विज्ञापना वडिलीं चिठी पाठविली ती पावली. पत्रीं आज्ञा कीं "मनाई होणें तर श्रीमंतांची अथवा राजश्री नानांची, त्यांत मुख्य इतल्ला लेखकाचा असावा;" अशी आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें श्रीमंत राजश्री नानाची मनाईचिठी जप्तीवाले यास पाठविली आहे. त्यास द्यावी. या उपरी खर्च सुद्धां त्यास द्यावयाचा नाहीं. श्रीमंतांपाशीं

१ बाबा काळे यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

आमचें ठीक नाहीं याजमुळें जप्ती उठवून मात्र आणिली नाहीं. रवाना प्रतिपदा भृगुवार. हे विज्ञापना.

नं. ४०९० **श्रीशंकर.** (आश्विन व० २–७ आक्टोबर)

पै॥ छ० १६ रबिलाखर. सन समान तिसैन. आश्विन.

पु॥+ विज्ञापना. राजकी वर्तमान तर वाड्यांतील मुख्यांत व कारभारी यांत वांकडें विशेष दिसतें. दसऱ्यास अगोदर तीन दिवस एक दिवशीं बोलावूं वाड्यांतून गेलें त्याचें उत्तर कारभारी याणीं केलें. "सेवकें यावें हें विहित. परंतु शिंद्याचा परिघ सरकारी वाड्याभोंवतीं आहे त्याचा विश्वास आम्हांस नाहीं." त्यानंतर दसऱ्याचे दिवशीं प्रातःकाळापासून चार बोलावणीं गेलीं तत्राप गेले नाहींत. वस्त्रें वाड्यांतून दसऱ्याचीं पाठवून दिलीं आणि मुख्याची स्वारी सीमाउल्लंघनास गेली. तेथें शिंदे आले. शिंद्यांचा नजराणा होऊन शिंदे माघारे गेले. नंतर कारभारी यांची स्वारी मागाहून जाऊन वेताळपेठेनजीक भिडे यांचे बागेसमीप जाऊन उभी राहिली. तिकडून खासा स्वारी आली. अंबारींतून नमस्कार व त्रिवर्गांस नजराणा जाहला. नंतर निरोप घेऊन ते एका मार्गें आपले वाडेस गेले. खासे एका मार्गें आले. याप्रमाणें मजकूर जाहला. त्यानंतर दुसरे दिवशीं शिंदे यांची ताकीद शिकारीची आपले गोटांत होऊन चार घटका रात्रीस शिकारीस निघावें हो बेत जाहला. तो संदेह पडोन कारभारी आटून होते. निजसुऱ्याचें पथक पर्वतीसमीप होतें तें तयार होतें. असा प्रकार आज चार दिवस दररोज चालला आहे. होळकर मारिला ते दिवशींही शिंदे शिकारीचें निमित्त करून चार घटका रात्रीस पर्वतीसमीप फौजेसुद्धां उभे होते. ती दरद हल्लीं लोकांच्या चित्तांत येत आहे. परंतु तूर्तपक्षीं पाहिलें

+ पत्र बाबा काळे यांचें पुण्याहून. यावर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे.

असतां कोणाचे हातून कोणाचेंही वाईट होत नाहीं. सारे सावध आहेत. यांत श्रीची कृपा कोणीकडे न कळे. पर्जन्य चांगला नवरात्रांत जाहला. विदित होय हे विज्ञापना. जिवबा अण्णास सिंहगडास नेलें. लिमये[1] वगैरे मंडळी पूर्वीप्रमाणें गद्रे यांचे बागेंत आहेत. हे विज्ञापना.

नं. ४०९१ श्री. (८ आक्टोबर.)

पै॥ छ० २४ रबिलावल. सन समान तिसैन. आश्विन वद्य १०

[2]पु॥ सेवेशीं विज्ञापना ऐसी जे, मिति आश्विन वद्य ३ दोन प्रहर पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री जिवाजी रामचंद्र जोशी याची पुरवणी लिहिली ते पावली. त्यास चार रोज जाले. मजला बोलावूं दाजीबा म्हैसकर याणीं पाठविलें. त्याणीं उत्तर सांगितलें, " शिंद्याचे लष्करांत कोणी हरिपुराकडून कारकून आला आहे तो सतरा हजार रुपये घ्यावे आणि (जिवाजीपंतास) सोडावें याप्रमाणें म्हणतो म्हणून ऐकितों हें काय ? " तेव्हां मी सांगितलें, " रोजचा दोन प्रहर (वानवडीस शिंद्यांच्या) वाड्यांत असतों, परंतु मला कोठें आढळलें नाहीं. परंतु बाबाजीपंत गोगटे हे काल मला पुण्यांत वाटेंत भेटले तेव्हां त्यांजला पुसिलें. त्याणीं उत्तर केलें कीं, जर धणी जीव घेऊं लागले तरी त्यांनें आपला जीव वांचवावा किंवा मरावें हें सांगा. त्यावर मी बोललों कीं, एकवेळ लेखक[3] बरा, परंतु शिंद्याचें लष्कर खोटें ! कारण तेथें बहुनायकी. कोण कोणासीं बोलावें ? आणि भुकेभान ! तेव्हां भलतेंच घडेल. ऐसें बोलिलों तरी त्यांचें नेटाचें बोलणें. तेव्हां मात्र बोलिलों, ऐसें

---

१ परशुरामभाऊंच्या पदरची चिंतोपंत लिमये वगैरे बंदिवान मंडळी. २ पत्र लिहिणारा शिंद्यांच्या लष्करांतला कोणी कारकून असून तो पटवर्धनांच्या वळणांतला आहे. ३ जिवाजी रामचंद्र याने. ४ नाना फडनवीस.

करितां कोणी बोलिलें असल्यास मी आजच बाणाजीकडे जाऊन खुंटी मुरगाळून ठेवितों. तेव्हां उगेच राहिले. उपरांत रात्री लष्करांत येऊन राजश्री मोरोपंत मुजमदार यांजकडे गेलों. तेव्हां ते संध्या करीत होते. तेथें बसून शपथ घालून पुसिलें. त्याणीं साफ उत्तर केलें कीं, याप्रमाणें वर्तमान नाहीं. परंतु प्रथम आले तेव्हां बोलिले कीं, मिरजेकडून जिवाजीपंत रामचंद्र येत आहेत ते येथें आल्यास त्यांचें साहित्यावर असावें. याप्रमाणें मात्र बोलिले होते. त्याचें उत्तर (त्यावेळीं मी) केलें कीं, ही गोष्ट आमचे हातें होत नाहीं. त्याआलीकडे मजकडे बोलणें नाहीं. तेव्हां मी बोलिलों कीं, तुम्ही भीड धरून बोलत असल्यास चार रुपये कंपेश ५ बोलोन बाणाजी-कडे जाबसाल बोलतों. तेव्हां ते बोलिले कीं, मला माहीतगारी नाहीं. व मी बाललों नाही. तुम्ही पक्की बातमी राखोन बोला. नाहीं-तर उगेच बोलोन फळ नाहीं. तेव्हां मागती शोध केला. तों ठिकाण लागेना. सबब दाजीबानें सांगितलें कीं, दारकोजी यांजकडील कार-कून बोलत होता. या प्रमाणें वर्तमान आहे. तेथें ही शोध घेतों. कळावें. किल्यांवर गृहस्थ गेले, ते बहुत हैराण आहेत. हगवणीने दिक्क झाले आहेत. बाबा काळे सांगत होते सबब लिहिलें असे. मर-तील असें बोलत होते. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

नं. ४०९२ श्री· (आश्विन—आक्टोबर)

विज्ञापना. "राजश्री जिवाजी रामचंद्र यांचे सुटकेविशीं राजश्री गोविंदराव पिंगळे व यशवंतराव घोरपडे बोलतात, त्याची बातमी राखून श्रीमंत नानासीं बोलून ठेवावें " म्हणून लिहिलें, त्यास उभय-तांकडील वर्तमानः—

---

१ बाणाजी शेट्या हा दौलतराव शिंद्यांचा हुजऱ्या व कारभारी.

२ सिंहगडावर जिवाजीपंत कैदेंत आहेत ते.

राजश्री गोविंदराव पिंगळे यांजकडे काल आम्ही जाऊन पुसिलें. त्यांचें बोलणें पडिलें कीं, मातुश्रीचें[1] पत्र आपणास आलें व बोलणें पडलें आहे कीं, मशारनिल्हेस किल्यावरून उतरावें. (जिऊबा बोलतात कीं) सांगाल तेथें राहूं. मेणवली अथवा इंदापुरीं गोविंदराव याचे घरीं राहीन. मिरजकर यांचे कामांत व गृहकृत्यांत बोलणार नाहीं. जामीन पाहिजे तसा घ्यावा. पांच रुपये येविषयीं घ्यावे. असें बोलणें पडलें आहे. तेव्हां आजपर्यंत जाहलीं कृत्यें सारीं त्यांस समजाविलीं. तेव्हां त्यांचे आमचे विचारें ठरलें कीं, पुढें श्रीमंतांसी बोलून श्रीमंत राजश्री बाळासाहेबांची व श्रीमंतांची भेट होऊन सारे जाबसाल ठरावांत यावे. तेव्हां येविषयीं बोलावें. श्रीमंत नानांची व बाळासाहेबांची भेट जाहली म्हणजे उपरांत त्यांचें बोलणें होऊन पांच रुपये माथां मारावे, आणि जामीन घेऊन मोकळे करावे. तोंपर्यंत सोडों नयेत. भेटीचे योगाचेंच बोलणें ठरवावें. असें जाहलें. गोविंदराव आमचे स्नेहांत आहेत. वांकडे होणार नाहींत. आमची प्रकृत आतां सुधारली आहे. सात दिवस वाऱ्यांत जाऊं नये असें पथ्य आहे तें जाहलेवर उद्योग करितों. हातपायांच्या कळा तीन हिस्से गेल्या. एक हिस्सा आहेत. त्याही जातील. औषध चांगलें पोचलें आहे.

कलम १

पेशजी श्रीमंत नानांजवळ तीन बोलणीं पडलीं होतीं कीं, एक बोलणें चाळीस (हजार) घ्यावे, व एक बोलणें साठ हजार रुपये घ्यावे, व एक लाख रुपयांचें, अशी वदंता यजमानांपर्यंत गेली. तेव्हां धोंडोपंत याणीं जिवाजीपंतांस पुसिलें. त्याणीं सांगितलें कीं, दोन हजार रुपये देईन. ज्यास्ती मजपाशीं कांहीं नाहीं. हा मजकूर आपण असतांच जाहला तेव्हां आपणांस कळलेंच होतें.

१ कलम

[1] हरिपुराहून सरस्वतीबाईचें.

यशवंतराव घोरपडे बोलतात त्यांत पंचवीस हजार रुपये घ्यावे. जामीन घ्यावा. मिरजकरांचे बोलण्यांत बोलणार नाहीं. यशवंतराव यांजपाशीं असावें. त्यांचीं माणसें चौकीस असावीं. बाहेर जाऊं नये. कोणासीं मिरजकरांसंबंधीं बोलणें बोलूं नये. असें बोलणें पडलें आहे. यजमानांस पुसून येविषयींचा पर्याय लिहितों.

वेदमूर्ति सदाशिव जोशी मेणवलीकर याणीं घरीं जातांना निरोप समयीं (नानांस) विनंती केलीं कीं, जिवाजी रामचंद्र यांस सोडावा. त्याजकडे दोष नाहीं. येविषयीं पांच रुपये मर्जीमाफक बोलतों. त्यास उत्तर जाहलें कीं, त्यास कैद मिरजकरांनीं करविला आहे. त्याविषयीं संमत त्यांचें पाहिजे तें त्यांची भेट जाल्याशिवाय होत नाहीं. आणि तुमचा बोलण्याचा विषयही नव्हे. ही गोष्ट तुम्हीं बोलावी आणि आम्हीं नाहीं म्हणावें हें ठीक नव्हे. आपण अक्षर बोलूं नये. म्हणून सांगितलें.

पेशजी जिवाजीपंत येथें असतां राजश्री धोंडोपंत यांजकडे बाळाजी गणेश जोशी बाईचा[१] निरोप घेऊन गेले होते कीं, हा आमचा आहे. तुम्हीं बोलून सोडवावें. यशवंतराव यांजकडे वासुदेव बोलतो व बाळाजीपंत जोशी हीं आंतून बोलतात असें ऐकितों. शेषो अप्पाजी म्हणून तेलंग कारकून आहे त्यास आढळले आहेत. त्याणीं येऊन सांगितलें. पक्की बातमी लावून रुजुवात करावी म्हणतों. लोकांजवळ बाळाजी गणेश वल्गना मनस्वी या प्रकरणीं करीत आहेत.

याप्रमाणें आढळलेला मजकूर लिहिला आहे. सविस्तर मागाहून लिहितों. हे + विज्ञापना.

---

१ चिंतामणराव आपांची आई पुण्यांत होती तिचा.

+ जनार्दन शिवाजी म्हैसकर याचें पत्र पुण्याहून मिरजेस आलें त्याची ही नक्कल.

नं. ४०९३ **श्रीगजानन.** (आश्विन व० ४–९ आक्टोबर.)

पै॥ छ० १८ रबिलाखर. आश्विनमास. सन समान तिसैन.

विज्ञापना. बाजारी वर्तमान ऐकींव—अलिजाबहाद्दर यांची स्वारी सरकारवाड्यांत आज येणार. कारभारी यांस बोलावून पुसोन सर्व एकमतें चालावें, ऐसी एखलासी करणार. तें न होय, पक्षीं (नानांचा) बंदोबस्त करणार हें एक. दुसरें—श्रीमंतांचें संधान कारभारी यांजकडे लागलें आहे कीं, "श्रीमंत अमृतराव साहेब याणीं जाहगीर खाऊन गंगातीरीं रहावें. कारभारी याणीं पूर्ववत्‌-प्रमाणें अखत्यारीनें कारभार करावा." ऐसेंही आहे. लोकवार्ता आहेत त्यांस तो थाकच नाहीं! ऐसें आहे. श्री घडवील तें खरें. राजश्री दाजीबा एक दोन रोजांत कारभारी यांचा निरोप घेऊन वडिलांकडे मिरजेस येणार. ऐवजाचे कामाकरितां म्हणोन ऐकितों. खरें लटकें न कळे. गडबड जाहली तर पौर्णिमेपावेतों जाहली तर जाहली. नाहींतर होत नाहीं ऐसें आहे. करवीरकर डेरेदाखल जाहले. खेमलापुर वगैरे (स्थळीं) उपद्रव आहेसें ऐकितों. खरें लटकें न कळे. वकील तेथें आले असतां चार गोष्टी समजून सांगून ऐवजाची तोड पाडून इकडे रवाना करावे. सेवेशीं विदित होय. हे विज्ञापना.

नं. ४०९४ **श्रीगणराज.** (आश्विन व० १२–१७ आक्टोबर.)

पै॥ छ० २ जमादिलावल. सन समान. कार्तिक.

विज्ञापना. येथील क्षेम छ० २५ रबिलाखर मंगळवार. छ० २४ रोज इंदुवासरीं अलिजाबहादर यांची स्वारी वाड्यांत सरकारच्या आली. बरोबर फौज पांच सात हजार होती. राजश्री नाना वाड्यांत गेले होते. चार घटका खलबत जाहलें. अस्तमानीं उभयतांची

---

१ पत्र बाळाजीपंत जोशी याचें मिरजेस. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची. २ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पत्र मिरजेस.

स्वारी माघारीं गेली. छ० २३ रोज रविवारीं उभयतां साहेबांची[1] स्वारी अलिजाबहाद्दर यांचे डेऱ्यास गेली होती. काय तो इत्यर्थ ठरला ऐसी बोलवा आहे. दुसरें, राजश्री नानानीं सर्व कारभार करावा. शिंद्यानीं हिंदुस्थानांत जावें, ऐसें ठरलें आहे म्हणतात. श्रीमंतानीं व नानानीं एकरूपेंकरून कारभार करावा ऐसें म्हणणें ठरलें आहे. यांत निर्दशनास येईल तें खरें. आश्विन व॥ ११ इंदुवासरीं अस्थिसंचयन सौभाग्यवती वहिनीचें[2] केलें. रक्षा नाशिकास रामकुंडास रवाना केली. क्रियेस प्रारंभ जाहला. मीच करितों. प्राप्त जाहलें तें करणें प्राप्त आहे. ती॥ राजश्री गणपतराव[3] रावजींस किंचित् समाधान नाहीं, त्याजमुळें मलाच करावें लागलें. कळावें करितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ४०९५ **श्रीव्यंकटेश.** (२६ आक्टोबर.)

पै॥ छ० ८ जमादिलावल. सन समान तिसैन. कार्तिक.

श्रियासह चिरंजीव राजश्री गंगाधरराव यांसीं प्रती धोंडूबाई[4]. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत कार्तिक शु॥ ७ गुरुवासरपावेतों यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. पुण्यांत उभयतां होळकरांची लढाई होऊन मल्हारजी होळकर मारले गेले त्याजपासून गडबडच आहे म्हणून लिहिलें तें सर्व कळलें. त्या अलीकडील वर्तमान कांहीं कळत नाहीं. तरी सविस्तर लिहून पाठवावें. वर्तमान वरचेवर सविस्तर लिहून पाठवून संतोषवीत जावें. बहुत काय लिहिणें लोभ असावा हे आशीर्वाद.

नं. ४०९६ **श्रीगजानन.** (कार्तिक शु० १०–३० आक्टोबर.)

पै॥ छ० ९ जमादिलावल. सन समान तिसैन. कार्तिक.

---

१ बाजीराव व अमृतराव यांची. २ चिंतामणराव आपाची स्त्री वारली तिचें. ३ पुण्यांत गणपतराव कोन्हेर बोरगांवकर होते त्यांस. ४ कंकणवाडीकर.

[1]विज्ञापना. श्रीमंत राजश्री नाना यांची स्वारी सरकारच्या वाड्यांत छ० ४ जमादिलावल बुधवारीं सायंकाळींच्या सहा घटका दिवसास गेली ती तीन घटका रात्रीस आवशीच्या बेलबागेंतील वाड्यांत दाखल जाहली. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांजबरोबर खलबत जाहलें म्हणोन अफवा आहे. सरकारी वाड्यांत दिव्यास तेल, विड्यांस पानसुपारी वगैरे व बारीक तांदूळ सुद्धां मानसिक आहे. श्रीमंत साहेबानीं पंडित यांची सभा करविली जे, श्रीमंत राजश्री अप्पासाहेब यांचें दत्तविधान जाहलें त्यास प्रायश्चित्त काय ? त्यास शिष्टांनीं विचार करून सांगतों ऐसें बोलिले, म्हणोन बाजारीं अफवा आहे. वरकड घासी जबानी विनंती करील. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४०९७ श्री. (३ नोव्हेंबर.)

पै॥ छ० १९ जमादिलावल. कार्तिक. समान तिसैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत कार्तिक शु॥ १४ पावेतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री जनार्दनपंत म्हैसकर याणीं आजच सांगितलें कीं, "भाऊसाहेबांकडील मंडळी मिरजेस वगैरे तिकडे आहे, त्यांचा खंड लाख रुपये शिराळेकर यांचें विद्यमानें जाला. ऐवज परभारा द्यावयाचा, त्यास पुण्यांत बाळाजी विष्णु, चिंतोपंत व जयरामपंत व जनोबा सुभेदार मंडळींतील, ते मिरजेस यावे; नंतर लाख रुपये देऊं, ऐसें उत्तर मिरजेस शिराळेकर यांचें कारकुनापाशीं (तुम्हीं बाळासाहेबांनीं) केलें. तें त्याणीं येथें नानांस लिहिल्यावरून नानानीं शंभर गाडदी कालच रवाना भाऊंकडील मंडळीस आणावयास्तव मिरजेस केले. धरून मंडळी घेऊन पुण्यास आणावी यास्तव आणखी

---

१ बाळाजी गणेश जोशी कारकून यांचें मिरजेस पत्र. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

शिराळेकर याजबरोबर गेले. वरात तीन लाख रुपये द्यावयाचा करार ठरला, त्यापैकीं केली ते वरात बाळासाहेबानीं माघारी टाकिली. (कोल्हापुरकर) राजानीं मुलखाची पायमल्ली केली तो ऐवज वजा द्यावा म्हणजे हे लाख रुपये देऊं ऐसें म्हणोन टाकिली. ती वरात येथें आली. त्याजवरून नानांस राग आला. राजानें पायमल्ली केली सबब सत्तर हजार रुपये धरून ठेविले आहेत. असें असोन वरात माघारी टाकिली हें काय ? नाना शिंदे यांजला वरात पांच लाखांची देणार. पांचशें लोक शिंदेकडील मिरजेस जाणार. हें मी आज दोन दिवस आयाकिल्यावर नानाशीं गांठ घालून बोलूं लागलों. तेव्हां नाना बोलिले कीं, तुमच्यानें बोलणें होत नाहीं. तुम्हीं ऐवज दिला तो ऐवज तुम्हांस उगवूं द्या. तुम्हीं बोलों नका;'' ऐसें बोलिले. "यांजला ऐवज मिळत नाहीं तर दौलत चिंतामणराव आपाचे हवालीं करितों. आज पांच लाख रुपये मला मिळतील.'' इतकें नाना बोलिले. शिंदेकडील वरात होणार. शिंदेकडील वरात जाली तर मग गैर-आदाही व्हावयाची नाहीं ! हें मला कळतांच कालच मी अज़ूरदार मुजरद पाठविले आहेत. यजमानांजवळ राजश्री केसोपंत काळे व श्रीमंत राजश्री रघुनाथ दादांशिवाय विचार होत नाहीं. परंतु तूंही हें वर्तमान यजमानांस लिही.'' ऐसें राजश्री जनोबाभाऊंनीं सांगितलेवरून वडिलांस लिहिलें आहे. आणखी "दाजीबास निरोप द्यावा. दुसरा बोलण्यास कोणी पाठवावा. असेंही मीं लिहिलें आहे.'' असें भाऊ बोलिले. कळावें. हल्लीं भाऊंचे बोलण्यावरून चित्त खिन्नसें वाटलें. वडिलांस कळावें. कार्तिक शु॥ १३ सायंकाळीं नाना वाड्यांत तीन घटका दिवसास गेले होते ते दोन घटका रात्रीस आले. श्रीमंतांचें व नानांचें मिळतें आलें अशी बाजार बोलवा आहे. परस्परें यादी

१ आपल्या तालुक्याचा वसूल सरकारांत द्यावयाचा त्यांत वजा घातले आहेत.
२ बाळासाहेबांस.

कलमांच्याही पडल्या आहेत असें बाजार वर्तमान बोलवा आहे. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४०९८ **श्रीगजानन**. (कार्तिक व० १–५ नोव्हेंबर.)

पै॥ छ० २२ जमादिलावल. सन समान तिसैन. कार्तिक. [2]विज्ञापना. तागायत छ० १५ जमादिलावल. येथें म्हैसकर लोकांजवळ बोलतात कीं, श्री॥ राजश्री नानांचें वैमनस्य यजमानांचे[3] ठिकाणीं पक्केपणें आलें असें दर्शवितात. वरात याणींच करविली पांच लक्षांची. सन सब्बातिसैन सालीं चाकरी जाहली नाहीं सबब, ऐसें लोक बोलतात. याजकरितां राजश्री दाजीबास चार गोष्टी सांगून ऐवजाची तोड पाडून रवाना करावे. नाइटे तुळजापुरचे देवीचें होतात. तिलाच शरण गेल्यास बरे होतात! काळानुसार याजकरितां विनंती लिहिली आहे. प्रायश्चित्त[4] क्षौरपूर्वक जाहलें. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. या काळांत विश्वास कोठेंच राहिला नाहींसा दिसतो. हे विज्ञापना.

नं. ४०९९ **श्रीगजानन**. (कार्तिक व. ६–१० नोव्हेंबर.)

पै॥ छ २४ जमादिलावल. सन समान तिसैन.

---

१ चिंतोपंत लिमये, जयरामपंत वगैरे परशुराम भाऊंचे कारभारी संरकारच्या कैदेंत आहेत त्यांचा खंड निराळा ठरवूं. त्याखेरीज मिरज व तासगांव वगैरे स्थळीं भाऊंच्या पदरचे लोक आहेत त्याचा खंड एक लाख रुपये बाळासाहेबांनीं वसूल करून द्यावा, असें शिराळेकर याच्या मार्फत नानांनीं ठरवून वरात केली असतां ‘सरकारांत कैदी चिंतोपंत वगैरे आहेत त्यांचाही खंड या एक लाखांत समजून त्यांस मुक्त करून इकडे पाठविल्याखेरीज पैका देत नाहीं;’ अशी तकरार करून बाळासाहेबांनीं वरात माघारी टाकिली. त्यावरून नानांस संताप आला त्यांचें वर्णन या पत्रांत आहे. २ बाळाजी गणेश जोशी यांचें मिरजेस पत्र बाळासाहेबांस. ३ तुमच्या. ४ प्रायश्चित्त चिमाजी आपास. सुनेचा म्हणजे सवाई माधवरावाच्या स्त्रीचा दत्तकपुत्र झाल्याबद्दल.

विज्ञापना. गृहस्थाविषयीं बोलणें लागलें आहे म्हणोन ऐकतों. वासुदेव करबेलकर म्हणोन कोण आहे तो बोलणें बोलतो ऐसें ऐकतों. म्हैसकरही बोलणें बोलतात ऐसें ऐकितों. खरें लटकें नकळे ! काल रात्रौ सदाशिव मल्हार येथें वाड्यांत येऊन बोलणें बोलून गुप्तरूपें गेले म्हणोन वर्तमान आहे. श्री॥ राजश्री नाना वाड्यांत परवां गेले होते. ऐक्यता निखालसपणें जाहली म्हणतात. परंतु लोकांची भ्रांत जात नाहीं ऐसें आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञप्ति. भृगुवार. तीन प्रहर. मंगळवेढेंची रयत श्री॥ राजश्री अमृतराव साहेब यांजकडे बोलणें बोलतात म्हणोन अफवा आहे. हे विज्ञापना.

नं. ४१०० श्री. (कार्तिक व. ७–११ नोव्हेंबर)

पै॥ छ० २४ जमादिलावल. समान तिसैन. कार्तिकमास.

सेवेशीं जनार्दन शिवाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ. २१ जमादिलावलपावेतों स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं शहाजीबरोबर व सांडणीस्वांरासमागमें पत्रें पाठविलीं तीं पावलीं. दहा हजार रुपयांची हुंडी पाठविली तीही पावली. सावकाराचा पैका देणें मनस्वी. दहा हजार दिले असत। निर्वाह कसा होतो ? कृपा करून पार करावें. राजश्री जिवाजीपंताचें सुटकेचें बोलणें बोलताहेत त्या विषयींचा बंदोबस्त करवावा म्हणोन आज्ञा, ऐशास बंदोबस्त आहेच. पक्केपणें बोलून मागाहून लिहितों. परंतु सरकारचे ऐवजाचा फडशा होत नाहीं, व असाम्यांचे लाख रुपये ठरविले असतां पुढें लिमये वगैरे असाम्या यांतच म्हणोन बोलणें घालून (आपण) फडशा न केला.

१ जिवाजीपंत जोशी पोतनीस सिंहगडावर कैदेंत आहे त्याच्या मुक्ततेविषयीं. २ हें पत्र लिहिणारा बाळाजीपंत येथें जनोबा म्हैसकराचें नांव घेतो. उलट जनोबा पूर्वीच्या एका पत्रांत या बाळाजीपंताचें नांव घेतो ! एकूण दोघेही लबाड ! ३ शिंद्यांचे दिवाण.

याजवरून नानांची मर्जी खट्टी जाहली आहे. ऐशास असाम्यांचा जाबसाल बऱ्यांत ठरला होता. फडशा करावयाचा होता. आतां जाजती पडून(नानाची) मर्जीही नाखूष होणार; ऐसा पर्याय आहे. त्यास येविषयीं पेशजी लिहिलें आहे त्यांचें मनन होऊन समर्पक उत्तर आलें म्हणजे बोलतों. जिवाजीपंताच्या आवाया येथेंही आहेत. परंतु विना आपल्या संमताखेरीज करणार नाहींत. आज उद्यां वेगळी गांठ घालून (नानांशीं) बोलून लिहितों. मी औषध वायूस[1] घेतलें आहे याजकरितां जातां येत नाहीं. चौदा दिवसांचें औषध आहे. त्यांत सोय पाहून जाऊन बोलून लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१०१ **श्रीगजानन.** (कार्तिक व. १३–१६ नोव्हेंबर)

पै॥ छ० ३० जमादिलावल. सन समान तिसैन. मार्गशीर्ष.

विज्ञापना[2]. तागायत छ. २६ जमादिलावल. क्षेम असे. विशेष. सगुणाबाई घाटगी कागलकर याणीं सखाराम घाटगे सर्जेराव यांस ओटच्यांत घ्यावें आणि मिरज प्रांतांत देशमुखी कागलप्रान्तचे खेडच्यांतील आहे त्याचा हक्क वगैरे घ्यावा जप्ती करून; येविशीं अलिजाबहादर यांचे कानावर घालून दोनशें स्वार व कंपनी एक ऐसी तिकडे रवाना व्हावी म्हणोन बोलवा आहे. खरें लटकें न कळे. ऐकींव अफवा लिहिली आहे. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१०२ **श्रीगजानन.** (कार्तिक व० १४–१७ नोव्हेंबर.)

पै॥ छ० ३० जमादिलावल. सन समान तिसैन. मार्गशीर्ष.

विज्ञापना[3]. छ. २७ जमादिलावल. भृगुवासरीं रात्रौ अतषबाजी पर्वतीवर जाहली. त्रिवर्ग साहेब व सौ॥ बाईसाहेब ऐसे सर्वत्र

---

१ संधिवातावर. २ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें मिरजेस पत्र. ३ बाळाजीपंत जोशी याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

गेले होते. राजश्री नानाही गेले होते. बारा घटका रात्रीस दारू सुरू जाहली. चार घटका दारूची हवा चालली होती. घडेबाजी वगैरे तमाशा शिरा जाहला. अर्धरात्रीस स्वारी माघारी आली. शिंद्याकडील पांच लक्षांची वरात मिरजेवर जाहली. बक्षीकडील पन्नास स्वांर पन्नास पायदळ रवाना जाहलें हें वर्तमान ऐकिलेबर सहस्र-बुद्धेकडे जासूद पाठविला आहे. वर्तमान समजल्यावर विनंती लिहितों. राजश्री बाबानीं बातमी सांगितली. मींही ऐकिली होती. विदित होय. छ० २८ जमादिलावल. हे विज्ञापना.

नं. ४१०३ श्रीगजानन. (कार्तिक व॥ ३०—१८ नोव्हेंबर.)

पै॥ छ. ३० जमादिलावल. सन समान तिसैन. मार्गशीर्ष शु॥ १

विज्ञापना. चिंतो रा[1]मचंद्र, बाळाजी विष्णु, जयरामपंत जोशी ऐसे तीन असामी रायगडास नेले. चिंतोपंत यांची मातुश्री वारली हें त्यांस कळूं दिलें नाहीं. रवाना जाहले. (त्या) गृहस्थांनीं दोनशें पात्रांचें बुंदीचें ब्राह्मणभोजन केलें. सेवेशीं विदित होय. रवाना छ.२८ जमादिलावल. मंदवासर. हे विज्ञप्ति.

नं. ४१०४ श्री. (१८ नोवेंबर.)

पै॥ छ०३० जमादिलावल. सन समान तिसैन मार्गशीर्ष शु॥१०

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी. शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत कार्तिक व॥ ३० वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. राजश्री चिंतोपंत व बाळाजीपंत व जयरामपंत (हे असामी) दादा गद्रे यांजकडे होते. तेथून कालच राजश्री नानानीं रायगडास रवाना केले असें बाजारी वर्तमान आहे. रवाना केले तें कोणास कळलेंही नाहीं. दुसरे दिवशीं वर्तमान समजण्यांत आलें असें बाजारी वर्तमान आहे. काल रात्री दारू श्रीपर्वतीस सुटली. त्रिवर्ग श्रीमंत व राजश्री नाना गेले होते. शिंदेकडील कोणी (आलें) नाहीं. कळावें. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ उत्तम. २ कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें पत्र. ३ लिमये.

नं. ४१०५ **श्रीगजानन.** (मार्ग० शु० २--२० नोव्हेंबर)

पै॥ छ० ३ जमादिलाखर. सन समान तिसैन. मार्गशीर्ष. मध्यरात्र.

[1]विज्ञापना. शिंदे यांचें व कारभारी यांचें वैमनस्य आलें असें लोक बोलतात. श्रीमंतांचें व कारभारी यांचें यथास्थित आहे. पुढें काय होतें पहावें. रविवासरीं श्रीमंत त्रिवर्ग साहेब दादा गद्रे यांचे घरीं भोजनास रात्रीं गेले होते. कळावें. छ० ३० जमादिलावल. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१०६ **श्री.** (२९ नोव्हेंबर.)

पै॥ छ० १२ जमादिलाखर. मार्गशीर्ष. सन समान तिसैन.

ती॥ राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.

[2]विज्ञापना. वडिलीं विठू भोर याजबरोबर पत्र पाठविलें तें पावलें. गोखले यांचें पत्र प्रविष्ट केलें. जप्तीवाले यांचा मजकूर लिहिला तो समजला. मंडळीविषयीं बहुत जप्तीवाले याणीं तगादा केला आहे म्हणून कळलें, त्यांस वडिलीं लिहिल्याप्रमाणें त्याही मनाचिठीचा प्रयत्न करीत आहें. मग सर्वांचें दैव जसें उभें राहील त्याप्रमाणें घडेल ! वडिलीं आज वर्षभर सर्वांस पुत्रवत् पालन केलें. आजच जप्तीवाले यांचे हवालीं केलेंतर मग मंडळीची दोरी तुटली ! वडील सर्वजाण आहेत. मी लिहून कळवावेसें काय आहे ? जप्तीवाले यानीं चौक्या बसवून कोणापासून घ्यावें तरी काय ? सारी बेरीज किती हें कळवावें. एक लाख रुपयांस कमी किती आहे ? वडिलीं दीड दोन महिन्यांची फुरसत जप्तीवाले यांजकडून करवावी म्हणजे येथें खटपट करीन. मग दैव मंडळीचें ! मी खासगत दोनदां जप्तीवाले यांस सरकारची मनाई पाठविली असतां मागती उपद्रव कां ? वडिलांपाशीं सर्व आमचीं मुलें माणसें आहेत. वाडिलांचे विचारें कसें पाहिजे तसें संरक्षण करावें. सर्व चिंता आपल्यास आहे. आजच

---

१ बाळाजीपंत जोशी कारकून याचें पत्र मिरजेस. २ वकील बाबा काळे यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

मनाचिठीची खटपट करणार होतों, परंतु वडिलांस[1] मांडवगणाहून काढून कोंकणांत सुवर्णदुर्ग तालुक्यांत सुखेरी गोखले यांचा गांव आहे[2] तेथें मंडळी सुद्धां नेऊन ठेवणार हें ऐकून याच खटपटीस लागलों आहें. आज दोन चार दिवस गोखले यांसीं बोलोन वांईस ठेवावें असें केलें आहे. ईश्वर कसे दिवस दाखवितो समजत नाहीं. राजश्री आनंदरावदादा रास्तेही (श्रीमंतांचा) निरोप घेऊन वांईस जातात. कळावें. येथें जैसे मांडवगणीं होते तसेच तेथें वांईस रहावे असा बेत आहे. कांहीं विपरीत नाहीं असें मनापासून म्हणत आहेत. यास्तव वडिलीं मंडळीचें चार दिवस रक्षण करावें. पुढें आर्यांचें[3] नीट करावयाचें एकीकडे राहिलें. अन्नूनें रक्षण करावें म्हणजे पुरे; असें म्हणतां दांत किटले. गोखले त्यांजपाशीं आहेत म्हणोन वर्तमान तरी समजतें. नाहींतर दैवाधीन गोष्टी आहेत. त्यांत श्रीमंत राजश्री नाना यांचीही केवळ हाडीं घाव घालावा ही भावना नाहीं. थोर आहेत. नानाचें मानस आपला हात चालल्यास भाऊंचें बरें करावें असें ऐकितों. मग दैवदशा निराळी आहे ! रवाना बुधवार दशमी. हे विज्ञापना.

नं. ४१०७ श्री. (३० नोव्हेंबर)

पै॥ छ० १४ जमादिलाखर. मार्गशीर्ष मास. सन समान तिसैन.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत मार्गशीर्ष शु॥ ११ यथास्थित असे. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांस स्थलांतर करणार असें वर्तमान आहे. परंतु शिंदे होळकर यांचा रुकार पडावयाचा तो पडत नाहीं. रास्तेही बोलत आहेत. गोष्ट घडत नाहीं. पक्कें वर्तमान समजलें नाहीं. शिंदे यांजकडे सूत्र भाऊंकडून पक्कें लागलें यास्तव खालीं कोंकणांत सुवर्ण-

---

१ परशुरामभाऊंस. २ हा गांव खेडच्या खाडीवर आहे. ३ परशुरामभाऊंच्या नांवाचा उल्लेख हा लेखक पुष्कळदां 'आर्य' शब्दानें करितो.

दुर्गास ठेवावें असें आहे म्हणून राजश्री जनोबा भाऊंनीं सांगितलें. कळावें. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१०८ श्री. (२ डिसेंबर.)

पै॥ छ० १७ जमादिलाखर. सन तिसैन. मार्गशीर्ष.

सेवेशीं धोंडो बापूजी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत मार्गशीर्ष शु॥ १३ पावेतों वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री नाना वाड्यांत जात होते. अलीकडे शिंदेकडील वाड्या-सभोंवतें पहिले लोक होते त्यांजपैकीं दोन अंगचे लोकांची बदली केली. दुसरे राहिले. त्या पलटणाचें नांव रफीक पलटण आहे. तोफा आठ आहेत. माणूस चांगलें. भारी चौक्या पहारा. पहिल्यापेक्षां भारी. रात्रीचे तोडे शिलकावून उभे पहारेकरी असतात. आपल्या वाड्यापुढें पहारा तोडे शिलकावून उभा असतो. बंदोबस्ती भारी. हें पाहून नाना वाड्यांत जातनासे जाहले. आणि श्रीमंतांस सांगितलें कीं, " मी वाड्यांत येतों; स्वामीचे आज्ञेप्रमाणें वर्तणूक करितों; पलटणें उठवावीं, हे विचार बोलण्यांत–तों हे नवे लोक येऊन विचार अनेक तऱ्हेचा दिसों लागला. मला विचार ठीक दिसत नाहीं. " असें सांगून पाठविलें. आणि आपण दहा रोज वाड्यांत जात नाहींत. शु॥ १४ रात्रीस नानांकडील लोक तयार. निजसुरे व शिराळेकर यांजकडील पागा चौकीस, शिंदेकडील पलटणें दोन घोरपडी नजीक आलीं हें वर्तमान ऐकून उभी रात्रीस होती. असें वर्तमान जाहलें. सरकारांत शिंदे यांजकडे बोलण्यामध्यें विपर्यास आला. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांस स्थळांतर करणार असें पेशजी लिहिलें आहे. परंतु शिंयाचा रुकार होत नाहीं व अमृतराव यांचा

---

१ पटवर्धनांच्या वाड ढें, ज्याला हल्लीं सांगलीकरांचा वाडा म्हणतात त्यापुढें.

होत नाहीं अशी बाजारबातमी आहे. कळावें बहुत काय लिहिणें, सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१०९ श्रीशंकर. (मार्ग. शु० १४-३ दिसें.)

पु॥ विज्ञापना. राजकी वर्तमान तर पेशजी महाडच्या करारांत शिंद्यास ऐवज द्यावयाचा ठराव (नानाकडून) झाला होता त्यापैकीं निमा ऐवज जांबगांवास व निमा गंगापार जाहल्यानंतर द्यावा; ऐसा करार असतां नाना महाडाहून पुण्यास आल्यानंतर शिंदे याणीं कांहीं भय, कांहीं ऐवजाची लोकांची वोढ, असें दाखवून थोड्या बहुतानीं वरचेवर ऐवज घेत आले. बाकी छपन्न लक्ष रुपये राहिले. त्यास हल्लीं ऐवजाविषयीं शिंदे याणीं निकड लाविली आहे. यांचें (नानांचें) म्हणणें "तुमचा आमचा करार येथें ऐवज द्यावयाचा नसतां ऐवज आजवर देत आलों. तत्रापि अद्याप (तुमचें) कूच होत नाहीं. त्यास आतां ऐवज मिळत नाहीं. येथून कूच करून जावें. कोणाची पाहिजे त्याची निशा छपन्न लक्षांची देतों. जांबगांवास गेल्यानंतर निम्मे व गंगापार जाहल्यानंतर निम्मे, याप्रमाणें देऊं." त्यास शिंदे यांचें म्हणणें "आपले लष्करांत ऐवजाची ओढ पडली आहे. ऐवज आल्याशिवाय लोक कूच करीत नाहींत. त्यास छपन्न आज पदरीं घालावे. लोकांचे फडशे करून लागलेंच कूच श्रीमंतांस मेजवानी करून करितों, व गद्रे, शेलूकर, पिंगळे, बजाबा शिराळेकर या चवघांपैकीं दोन असाम्या वोलीस द्याव्या. त्याचें कारण श्रीमंतांस तुम्हांकडून कांहीं वांकडें होऊं नये. एक संवत्सर यथास्थित चाललें म्हणजे वोलीं सोडून देऊं. याप्रमाणें जाहल्यास ऐवज येतांच कूच करितों. त्यास यांस, (नानांस) एकही गोष्टीचा भरंवसा लागत नाहीं. त्याजवरून बहुत वांकडें आलें आहे. नानाचे येथें रात्रौ बहुत तयारी होते. काल शिंदे सायंकाळीं वाड्यांत आले होते व नाना शिंदे गेल्यानंतर सहा घटका रात्रीं वाड्यांत जाऊन अमृतराव यांसीं

खलबत करून आले. लोकांचें म्हणणें शिंदे आठचार रोजांत नानांस कैदेंत बसवितात. यांजकडील गृहस्थांचे म्हणणेंत त्याचे लोक याणीं फितविले आहेत. हे त्यास कैद करितात. याप्रमाणें आहे. घडेल तें खरें. हे [1]विज्ञापना.

हें पत्र वाड्यांत ती॥ राजश्री बाळासाहेबांस दाखवावें. वृद्धांस स्थळांतर करणार. दाट अवाई आहे. रवाना छ१३ रविवार.

नं. ४११० श्री. (मार्ग. शु० १४–३ दिसेंबर.)

पै॥ छ० १७ जमादिलाखर. समान तिसैन. मार्गशीर्ष मास.

छ[3]०१३ जमादिलाखर. रविवासर. बाजारी वर्तमान सालगुदस्तां महाडास करार ठरला आहे कीं, शिंयांस ऐवज द्यावयाचा त्याजपैकीं निम्मा जांबगांवास, निम्मा गंगापार जाहलेवर द्यावा. त्यास शिंदे याणीं कांहीं जरब दाखवून थोडे बहुतानी वरचेवर ऐवज घेतला. बाकी छपन्न लक्ष रुपये राहिला त्यास हल्लीं ऐवजाची ओढ शिंदे यांस भारी, याजमुळें निकड लाविली आहे. यांचे म्हणणें, 'कूच करणें. निमा ऐवज जांबगांवास देतों. निमा गंगापार जाहलेवर देतों'. ऐसें सांगितलें. त्यास शिंदे मशारनिल्हेचें म्हणणें 'आमचे लष्करांत ओढ भारी. ऐवज देणें. लोकांचे फडशे करितों, आणि श्रीमंतांस मेजवानी करून कूच करितों. आम्हांबरोबर गद्रे व पिंगळे व शिराळेकर, परचुरे, या चवघांपैकीं दोन असामी बरोबर नेतों. एक संवत्सर तुम्हांकडून श्रीमंतांस बालाग्र वांकडें होऊं नये; हें दृष्टीस पडलेनंतर बोली सोडून देऊं. ऐशीं बोलणीं ! उभयतांतही एकमेकांची खातरजमा पुरत नाहीं. मनस्वी बोलतात. येणेंप्रमाणें बाजारी अफवा. सेवेशीं विदित होय. हे विज्ञापना.

---

१ पत्र बाबा काळे याचें रामचंद्रपंत आपास. २ परशुरामभाऊंस. ३ बाळाजी गणेश जोशी कारकून याचें पुण्याहून पत्र.

नं. ४१११ श्रीगजानन. (मार्ग० शु० १४–३ डिसेंबर)

पै॥ छ० १४ जमादिलाखर. मार्गशीर्ष मास. सन समान तिसैन.

[1]विज्ञापना. तागायत रोज रविवार. वडील ज्या स्थळीं होते त्या स्थळांतून सुखेरी म्हणोन कोंकणांत (गांव) आहे तिकडे रवाना करणार. रास्ते यांचे जिमेस आहेत ऐसेच ठेवणार. परंतु स्थळांतर; ऐसी बाजारी अफवा. खरें लटकें न कळे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४११२ श्री. (मार्ग० शु० १५–४ डिसेंबर)

पै॥ छ० २० जमादिलाखर. मार्गशीर्ष. सन समान तिसैन.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.

विज्ञा[2]पना. अलीकडे वडिलांकडून आशीर्वादपत्र येत नाहीं. सदैव आशीर्वादपत्र येत असावें. मांडवगणाहून आयां[3]स मंडळीसह वाईप्रांतीं आणितात यांत दिकत नाहीं. खटपट करून रास्ते यांजपाशीं पाहिली. परंतु रास्ते यांचें म्हणणें, "श्रीमंत राजश्री नानानीं अभयवचन दिलें आहे कीं, तुम्हांपासून हवालीं करून घेत नाहीं, आणि पुढें स्वल्प दिवसांत तुमच्या हातें कांहीं त्यांची सोय काढूं. तुम्हांस यश देऊं." ऐसें खाचित वचन दिलें आहे. याप्रमाणें वास्तविक आहे. मग ईश्वरइच्छा वेगळी आहे ! मिरजेस मंडळीस बहुत उपद्रव जाहला आहे. वडिलींही मागें लिहिलें होतें. त्यास उपद्रव म्हणजे काय, बेरजेचा ठराव आहे किंवा नाहीं, हें कांहीं समजत नाहीं. मागें मजपाशीं राजश्री बजाबा दादा बोलत होते त्यापेक्षां कमी आहे किंवा जास्त आहे हेंही समजत नाहीं. तें कळवावें. काल विपरीत आला आहे. मी येथें आजवर्षपर्यंत आहें. लटकेंच निमित्य मजवर ठेवून मला अटक करावी ऐसी येथील मंडळीची योजना आहे. मग ईश्वर रक्षील तसें रक्षो.

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें पुण्याहून पत्र. २ बाबा काळे याचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र. ३ परशुरामभाऊंस.

अद्यापि आमचें नष्टचर्य किती दिवस आहे कळत नाहीं. आजवर्ष-पर्यंत सर्व आमचीं मुलें माणसें वडिलीं रक्षिलीं. आणि पुढेंही आपले-शिवाय कोण आहे ? तीा। राजश्री जिवाजीपंत अण्णा पुण्यास आले. मी इमी देऊन सोडविलें ऐसें आपल्यास पुण्यांतून एका दोघानीं लिहिलें आहे ! असो. लिहिणारापुढें इलाज चालावयाचा नाहीं. सर्व मजकूर वेदमूर्ति राजश्री नारायण भट खाडलीकर यांजपाशीं बोलिलों आहें. वडिलांस खातरजमा आहेच. माझा भाव तीा। राजश्री भाऊ-साहेब तसें आपल्यास मानितों. जर मी भाऊंसीं कृत्रिम करीन तर आपल्यासीं करीन ! याजउपरी श्रीमंतांस मी विनंती करून चार दिवस कोठें तरी गुप्त राहतों. वडिलांस कळावेंकरितां लिहिलें आहे. रवाना सोमवार दोन प्रहर. हे विज्ञापना. राजश्री बजाबादादावर श्रीमंत नानांची मर्जी ठीक नाहीं अशी वार्ता उठली आहे. परंतु खरेंच आहे. ईश्वर कोणासच सुखी राखीत नाहीं ! पक्कें समजलें म्हणजे कळवितों. हे विज्ञापना.

नं. ४११३ श्री. (मार्ग. व. ४–७ दिसें.)

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.

विज्ञापना–अलीकडे बहुत दिवस आशीर्वादपत्र येत नाहीं. तर आशीर्वादपत्रिका येत असावी. वडिलीं गोखले यांस पत्रें पाठ-विलीं तीं पावतीं केलीं. गोखले ही खटपटीस कमी करीत नाहींत. ईश्वर कृपा करील तेव्हां खरी. राजश्री माधवराव रास्ते यांस पांच सात दिवस ज्वर बहुत येत होता. हल्लीं उपशम आहे. चार अहोरात्र लंघन केलें त्यामुळें ज्वर मार्गे सरकला. कळावें. राजकी वगैरे अधिक नाहीं. राजश्री काशीबा उदईक पाठवितों त्याजवरून समजेल. जो घाट लिहावा तो एकही शेवटास जात नाहीं यामुळें खरेपण जातें. असो. कालचक्रच एका रीतीचें आलें आहे. तीा। राजश्री

१ बाबा काळे यांचें पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस.

जिवाजीपंत अण्णा यांस श्रीमंत राजश्री नानांनीं सिंहगडास कैदेंत घातलें होतें त्यास राजश्री यशवंतराव घोरपडे व गुंड या उभयतानीं सोडविलें. चाळीस हजार रुपयेचा हवाला घोरपडे याणीं आपले तलबेंत लिहून घेतला, आणि सोडविलें. हल्लीं घोरपडे यांजपाशीं आहेत. त्यांस सोडवून आणिल्यावर मी तेथें गेलों होतों. घोरपडे यांची माझी भेट जाहली. तूर्त यशवंतराव ती॥ राजश्री भाऊंच्या साहित्यावर नाहींत. कर्नाटकच्या स्वारींत विसाप्पा सुभेदार याचे खटलेमुळें आम्हाशीं रुष्ट आहेत. ठीकसें बोलले नाहींत. त्यांतही चार गोष्टी अण्णाविषयीं त्यांस सांगितल्या. परंतु त्यांचें म्हणणें पडलें कीं, आम्हीं पन्नास हजार रुपये देऊन सोडवून घेतले आहेत हे कोणीही द्यावे आणि सोडवून घेऊन जावें. परंतु त्यांचे अब्रूस धक्का असूं नये. याप्रमाणें उत्तर जाहलें. अण्णाही भेटले होते. बहुत क्षीण जाहले आहेत. त्यांसही चार गोष्टी सांगितल्या. त्यांणीं एकच उत्तर केलें. माझे दैवें करून कारागृह प्राप्त जाहलें. दैवें करून मुक्तही जाहलों. परंतु ती॥ राजश्री बाळासाहेबांच्या उण्या गोष्टी माझें मुखांतून निघणार नाहींत. जर मी बाळासाहेबांचें वाईट इच्छीन तर ईश्वर परिणामीं मला शब्द लावील. याप्रमाणें अण्णा बोलत होते. मग त्यांचें कर्म ते जाणत ! कैद करून सरकारांत अटकाविले तेच दिवशीं मला बरेंसें वाटलें नाहीं. कैद केल्यासारिखे आपलेपाशीं पावते करिते म्हणजे उत्तम. अथवा समजूत करिते तरी चांगलें होतें. दोनीही केलीं नाहींत ! शेवटीं असें जाहलें. समजला मजकूर लिहिला आहे. रवाना गुरुवार. हे विज्ञापना. सर्व मजकूर मदार सांगतां विदित होईल.

नं. ४११४ श्री. (मार्ग. शु० १५–४ दिसेंबर)

विज्ञापना. जिवाजी रामचंद्र यासीं काल तिसरे प्रहरीं घेऊन राजश्री यशवंतराव घोरपडे श्रीमंत राजश्री नानाचे वाड्यांत आले. भेट जाहली. (जिवाजीपंतानीं नानांस) शंभर रुपयांची वस्त्रें दिलीं.

दुपट्टा तिवट होतें तें पुढें ठेऊन भेटले. उपरांत श्रीमंत नानानीं उत्तर केलें कीं, पेशजी तुम्ही येथें येऊन चहूंकडे संचार करूं लागलां त्याचें फल हीं पावलां. हल्लीं तुम्हांस समाधान नाहीं, किल्याची हवा मानत नाहीं, म्हणोन जामीन देऊन यशवंतराव यांचे जिमेस असावें असें करून आलां. त्यास ज्याप्रमाणें बोलणें आहे त्याजप्रमाणें यशवंतराव यांजपाशीं असावें. जवळ माणसें यशवंतराव यांचीं. पटवर्धन यांची गोष्ट बोलूं नये. बाहेर कोठें संचार (करावयास) जाऊं नये. गेले असतां पहिल्या फैलास याल. याचा मात्र पुरता खंबीर असों द्यावा. तेव्हां जिवाजीपंतानीं उत्तर केलें, मी अतःपर कोठें संचार करणार नाहीं. यशवंतराव यांचा जिमा आहे त्याप्रमाणें यांजवळ राहीन. दोन माणसें यशवंतराव यांचीं आहेत. आणि स्वामींची खातरजमा जाहली कीं, गंगाधरराव यांजकडे मीं जावें, माझ्या अब्रूस खत्ता होणार नाहीं, अशी जाहल्यास मी त्यांजकडे जाईन. तेव्हां श्रीमंत नानानीं उत्तर केलें कीं, त्याचा विचार जालेवर मग पाठवून देतां येईल. परंतु यशवंतराव यांचा जिमा दिला आहे त्याप्रमाणें असावें. इतकें सांगोन विडे दिले. उपरांत मशारनिल्हे उठोन गेले. समागमें यशवंतराव यांजकडील दहा पंधरा माणसें होतीं. आणि पाहिलें यशवंतराव यांचें बोलणें ही असेंच आहे कीं, किल्यावर आहे त्या दाखल मजपाशीं असावा. जिमा माझा आहे. परंतु ब्राह्मणास हगवण लागली आहे, माझा त्याचा मिरजेस असतां स्नेह होता, त्या पेक्षां माझे हवालीं करावा; असेंच आहे. त्यानीं दुसरेकडे जाऊं नये असा करार आहे. त्याचा मानस कसेंही करून श्रीमंत बाळासाहेबाचें रहस्य करून घ्यावें आणि मिरजेस जावें असा आहे. राजश्री भास्कर नाईक सिधोरे यासीं आणून बोलत असतो. त्याचे हातीं अप्पाजी नाईक यांस पत्र पाठवितो असें दिसतें. राजश्री आप्पाजी नाईक जासूद हा त्या बोलण्यांत आहे. त्यास आम्ही शंभर

---

१ कैदेंत पडाला.

रुपये देऊं केले. नेहमीं होईल ती बातमी सांगावी असें केलें आहे. वरचेवर शोध करितों. सेवेशीं श्रुत होय. हे + विज्ञापना.

नं. ४११५ श्री. (मार्ग० व० १–५ डिसेंबर)

पै॥ छ०२० जमादिलाखर. मार्गशीर्ष. सन समान तिसैन.

सेवेशीं बालकृष्ण महादेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ०१५ जमादिलाखरपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीचें आज्ञापत्र छ०४ जमादिलाखरचें सादर जाहलें तें छ० ७ मिनहूस पावलें. तेथें आज्ञा कीं राजश्री जिवाजीपंत जोशी यांस किल्ल्यावर ठेविलें होतें ते राजश्री यशवंतराव घोरपडे याणी विनंती करून सोडविले आहेत. ते आमचे हवालीं श्रीमंत नाना करितात कीं नाहीं ? जिवाजीपंतास सोडावयाचें राजकारण मातुश्री वहिनीनीं हरिपुराहून राजश्री गोविंदराव पिंगळे व यशवंतराव घोरपडे यांस पत्रें लिहून केलें आहे, त्यास जोशी याजपासून काय घेतलें याचा शोध लागल्यास करून लिहून पाठविणें. व जोशी प्रथम पळून गेले त्यावेळीं श्रीमंत नानांस व राजश्री बाबूराव म्हैसकर यांस पत्रें पाठविलीं होतीं. त्यास म्हैसकर यांचें पत्र आलें कीं. (या कामास) साडे बारा हजार रुपये पडतात. त्यांत नानास दहा हजार द्यावे लागतात व अडीच हजार किरकोळ. त्याजवरून स्वामींनीं साडे-बाराहजार रुपये म॥निल्हेकडे पाठविले. "दहा हजार पहिले व हल्लीं पांच हजार आणखी रुपये श्रीमंत नानांस देतों. जिवाजीपंतास आमचे हवालीं करावें, म्हणून नानांस व राजश्री जनार्दनपंत म्हैसकर यांस पत्रें पाठविलीं आहेत. त्यास नानांस हा मजकूर कळून पत्राचे जाब येत नाहींत. त्याजकरितां दुसऱ्यास न कळतां जिवाजीपंताविषयीं श्रीमंत नानांस विनंती करून सविस्तर लिहून पाठविणें म्हणून आज्ञा; व राजमंडळाकडील वर्तमान लिहिलें आहे हें (नानांच्या) कानावर घालून काय उत्तर होतें तें लिहून पाठविणें, म्हणून आज्ञा,

+ जनार्दन शिवाजी म्हैसकर याचें मिरजेस पत्र.

याजवरून श्रीमंतांची एकांतीं गांठ घालून विनंती केली. आज्ञा जाहली कीं, जिवाजीपंत जोशी प्रथम येथें आले त्यांस श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब व अमृतरावसाहेब आपलेकडे नेतात, मशारनिल्हे हे गंगाधरराव यांजकडील कारभारी, हें कळल्यावर आम्ही त्यांस अडथळा करून आपलेकडे आणिले आणि धोंडोपंत निजसुरे याचे हवालीं केले. तेथून किल्ल्यास पाठविले होते. हल्लीं येथें आणिले आहेत. याचा विचार करावयाचा तो गंगाधरराव यांस लिहून करूं. दोहों महिन्यांनीं जोशी यांस हवालीं करूं. व दहा हजार रुपये आम्हांस द्यावे हें कांहीं आम्ही म्हैसकर यासीं बोलिलों नाहीं. असें असतां त्याणीं काय लिहिलें असेल तें न कळे. गंगाधरराव यांचा व आमचा घरोबा, आणि दहा हजार रुपये आम्ही कसे घेऊं ? आमची निखालसता त्यांचे ठायीं व त्यांची आमचे ठायीं मात्र असावी. जोशी यास हवालीं करावयाचें, त्यास त्याचा विचार करून गंगाधरराव यांस लिहून त्यांचे विचारें करूं; म्हणून आज्ञा जाहली. नानांस रुपयांचा मजकूर श्रुत नाहीं ! सेवकानें स्वामीचे निखालसतेविषयीं (नानांजवळ)[1] खातरजमा बहुत प्रकारें केलीच आहे. स्वामीनीं ही श्रीमंतांस लिहून पाठविलें पाहिजे. "श्रीमंत गंगाधर रावजीस घराऊ आज्ञा जी करणें असेल ती सेवकास करीत जावी. स्वामीचे आज्ञेनुरूप मी मिरजेस लिहून आज्ञा होईल या अन्वयें गोष्ट अमलांत आणून देईन, म्हणोन श्रीमंत राजश्री नानांस विनंती करून ठेविली आहे. राजमंडळाकडील मजकूर विदित केला. आज्ञा जाहली कीं राजश्री गंगाधरराव व राजश्री रघुनाथराव व इचलकरंजीकर व नागो शामराव यांस बंदोबस्ताविषयींचीं पत्रें रवानगी केलीं आहेत. व राजश्री बजाबा शिराळेकर यांजकडून फौज ही रवाना करविली आहे. जिवाजीपंतापासून काय घेतलें याचा शोध करीत आहें. पक्का लागल्यावर सेवेशीं लिहून पाठवीन. जिवाजीपंतास

---

१ नानांची.

आमचे हवालीं करावें म्हणून विनंती (नानांस) करीतच आहें. विचार ठरेल तो सेवेशीं विदित करीन. स्वामी कृपाळू होऊन सेवकास पत्रें पाठवितात तो संतोष पत्रीं कोठवर सेवेशीं लिहूं ? आज्ञा येत असावी. सेवक चाकरीस हजर आहे. सविस्तर सेवकास आज्ञा समक्ष मिरजेस जाहलीच आहे ती सेवकाचे चित्तांत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४११६ श्री. (मार्गशीर्ष० व० १–५ डिसेंबर.)

पै॥ छ० २० जमादिलाखर. मार्गशीर्ष मास. सन समान तिसैन.

सेवेशीं बालकृष्ण महादेव. विज्ञापना. तागायत छ० १५ जमादिलाखरपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब मांडवगणास आहेत त्यास वांईकडे आणावें, म्हणून श्रीमंत राजश्री आनंदरावदादास (नानांची) आज्ञा जाहली आहे. शिंदे यांची व श्रीमंत नानाची निखालसता होण्याविषयीं, व हिंदुस्थानांत जावयाचे विचारांत सांप्रत मुकेल–शिंदे यांजकडील कंपूचे सरदार–बोलण्यांत आले आहेत. पक्केपणा ठरल्यावर सेवेशीं श्रुत करीन. स्वामींनीं सांडणीस्वाराबरोबर पत्रें पाठविलीं तीं सांडणीस्वारानें एकांतीं आणून दिलीं. सांडणीस्वार फारच चांगला आहे. नाजूक कामास यास पाठवावयाची आज्ञा होत असावी. बहुत गरीब आहे. आणि स्वामीसेवेसीं चांगला आहे. हे विज्ञापना.

नं. ४११७ श्रीशंकर. (मार्ग० व० १–५ दिसेंबर.)

पै॥ छ० २१ जमादिलाखर. समानतिसैन.

विज्ञापना[३]. तागायत छ० १५ जमा॥खर पावेतों क्षेम असे. विशेष. इकडील वर्तमान सर्व तपशीलवार वेदमूर्ति राजश्री नारायण भट नाना यांस सांगितलें आहे. ते सेवेशी निवेदन करितील. त्याजवरून कळेल. तपशील:—

---

१ पत्र पुण्याहून बाळासाहेबांस. २ रास्त्यांस. ३ पत्र बाबा काळे यांचें पुण्याहून.

शिंदे यांचे व नाना यांचे बोलणेंतील मजकूर. कलम,
करवीरकरांकडील मजकूर. १ कलम
मांडवगणाकडील प्रकार. हल्लीं ठरल्याचा. १ कलम

काल बाणाजी शेटे व मुकीर इंग्रज नानांकडे आला त्यांतील मजकूर. १ कलम

येणेंप्रमाणें सर्व तपशीलवार सांगितला आहे. विदित करितील त्याजवरून कळेल. हे विज्ञापना.

नं. ४११८ श्रीगजानन. (मार्ग० व० १४–१७ दिसेंबर.)

पै॥ छ० २ रजब. अस्तमान. सन समान तिसैन.

विज्ञापना. बाजारी अफवा इंग्रज शिंदेकडील मुकील साहेब मध्यस्तींत होते ती मध्यस्ती उडाली. चाळीस लक्ष रुपये रोख द्यावे म्हणजे कूच. यांचें म्हणणें कूच जाहलेवर ऐवज पावेल. त्याजमुळें इंग्रजाची वकिली राहिली. याजकारितां इंग्रज शिंदे याजवर अर्जुदा आहेत. दरम्यानकी बाळाजी शेटे यादवराव भास्कर वगैरे मंडळी करीत आहेत. मिटतें किंवा फाटतें पहावें. महाराजांस करवीरची मसलत सांगितली आहे. महाराजानीं न पतकरल्यास (ते सरकारांत) दुसाला ऐवज देतील ऐसें बोलणें वकील बोलतात, म्हणोन बाजारी अफवा आहे! खरें लटकें न कळे. एकूण बाजारी अफवा आहे. रामाजी अनंत व येसाजी गोविंद येऊन दाखल जाहले. बजाबा दादानीं आणिले म्हणोन वार्ता आहेत. खरें लटकें न कळे. जोती खीरसागर याचा जाब अद्याप जाहला नाहीं. नागोजी पाटील गुंड यांस रोज मी विचारतों. गडी ही विचारतात. जाब आला नाहीं. छ० २७ जमादिलाखर. रविवार. चवथा प्रहर. सेवेशीं विदित होय हे विज्ञप्ति.

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें पुण्याहून पत्र. २ तुम्हांस.

नं. ४११९ श्री. (१९ डिसेंबर)

पै॥ छ० ५ रजब, सन समान तिसैन. पौष.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं विनंती. सेवक बापूजी बल्लाळ वझे. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत पौष शुद्ध प्रतिपदा मुक्काम श्री क्षेत्र पंढरपूर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनी कृपाळू होऊन कृपासूचक पत्र पाठविलें तें पावलें. पुस्तकाविषयीं लिहिलें, त्यास भक्तिरसचंद्रिकेचें पुस्तक आमचें खासगत वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाबा पाध्ये यांचे प्रतीवरून लिहविलेलें पाठविलें आहे. पत्रें सुमार २८. येणेंप्रमाणें राजश्री केसोपंत गोरे यांचे स्वाधीन केलें आहे. येऊन पोचेल. आमचा बंधु चिरंजीव राजश्री दाजीबा यांचें लग्न मार्गशीर्ष वद्य अष्टमीस जाहलें. स्वामींस कळावें. वेदशास्त्र संपन्न राजश्री बाबा पाध्ये व त्यांचे बंधु या उभयतांस (आपला) साष्टांग नमस्कार प्रविष्ट केला. कळावें. बहुत काय लिहिणें. कृपा लोभाची वृद्धि असों द्यावी हे विज्ञापना.

नं. ४१२० श्री. (२३ डिसेंबर)

पै॥ छ० ११ रजब. पौष मास. सन समान तिसैन.

[1]विज्ञापना. येथील कुशल पौष शु॥५ मंदवार अस्तमान पावेतों कुशल आहे. विशेष. वडिलीं छ० १४ जमादिलाखरीं आशीर्वाद लेख खिजमतगार याजबरोबर पाठविला तो पावला. मंडळीच्या घरी चौक्या बसविल्याचा विस्तार व वडीलीं बसलेल्या चौक्या उठविल्या तो मजकूर व गोविंदपंत यांस चिठी पाठविली त्याची नक्कल पाठविली तें सर्व कळलें. आपण तरी काय करितील ? गोविंदपंत म्हणजे केवळ लहान मनुष्य आहे. येथें ही त्याच्या लहानपणाची आख्या आहे. आणि ईश्वरें त्यास ही कामागिरी योजिली ! आज वीस दिवस गड्यास येऊन जाहले. जाब जाहले नाहींत. आज

---

१ बाबा काळे याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

जाब जाहले त्यांत मंडळीविषयीं काय लिहिलें आहे कळत नाहीं. वडिलीं लिहिलें होतें त्या अर्थी इकडच्या उत्तरांत कांहीं सुभत्ता लिहिला असेल. मला ती॥ राजश्री केसोपंत दादानीं दोन चार वेळ लिहिलें कीं, दुसरी मनाईचिठी पाठवावी, अथवा गुंडाचें पत्र पाठवावें, असें लिहिलें होतें. त्यास पेशजी दोन मनाचिठ्या पाठविल्या त्यांस गोविंदपंत मानीत नाहीं ! मग आणखी सरकारची चिठी घेऊन परिणाम काय आहे ? याजउपरी श्रीमंत राजश्री नानाची मनाचिठी आल्यास खटपट करून पाहतों. या खटपटीस किमान महिनाभर पाहिजे. तावत् गोविंदपंत यांस दादा कांहीं देणार आहेत त देऊं नये. येथील खटपट सरली, कांहीं थाक लागत नाहीं, ऐसें जाहल्यास वडिलीं जैसें योजिलें आहे तैसें करावें. आज जें सर्वांचें ओझें वाडिलांस आहे तें पत्रीं काय लिहावें ? येथें रोज एक घाट होत आहे. आर्यांस[1] वाईस नेत होते तें शिंदे याणीं गोखले यांस ताकीद करून राहविलें, त्याजमुळें लेखकास फार अवघड पडलें आहे. तूर्त शिंदे यांचा आणि लेखकाचा तह होत आहे. यांत काय ठरतें पहावें. शिंदे याजकडील मोकील म्हणोन पलटणचा सरदार आहे. (जातीचा) इंग्रज आहे त्यास (नाना) दरम्यान घेत आहेत, खटपट करून शिंदे देशांतून जावे असें करीत आहेत. काय घडतें पहावें. असेंच आजपर्यंत पांच सातदां समजी जाहली, तैसीच ही ! ऐसें लोक बोलतात. ज्यासमयीं शिंदे कूच करून जामगांवाइतके जातील तेव्हां या देशाचा भोग सरला ! तावत् उपद्रव चुकत नाहीं. राज्य ही स्वस्थ होत नाहीं. राजश्री चिंतोपंत, बाळाजीपंत, जयरामपंत यांस रायगडास नेल्यापासून मलाही उचलावें या मनसब्यांत आहेत. परंतु अद्यापवर दिवस घेतले आहेत. श्रीमंतांच्या कानावर माझी गोष्टी पडली. परंतु श्रीमंतानीं उत्तर केलें कीं, " दस्ताऐवजीं काय तो फितूर केल्याचा धरावा आणि मग त्याचा विचार सांगूं. तावत् त्यास उपद्रव करा-

१ परशुरामभाऊस.

वयाचा नाहीं. या प्रमाणें माझे दैवयोगें सांगितलें त्याजमुळें आजपर्यंत स्वस्थ आहे. पळून कोठें जावें ? जें ईश्वरनिर्मित तें चुकत नाहीं. याजउपरीं श्रीमंत राजश्री नानांची भेटी घ्यावी हा ही विचार केला आहे. भेटी होऊन अभय होईल तो दिवस सोन्याचा ! तावत् अवघड आहे. हल्लीं आर्यांचे शरीरास कांहीं उपद्रव वायूचा जाहला आहे. रास्ते याणीं वैद्य रवाना केले आहेत. वरचेवर शरीरभावना समजेल ती कळवितों. आजपर्यंत शरीराची काळजी नव्हती. हे मध्येंच दशेंत अंतर्दशा प्राप्त जाहली आहे. तेव्हां अद्यापि ग्रहदशा फिरली नाहींशी भासती. आणखी अधिक उणें जें आढळेल तें मागाहून लिहितों. सदैव आशीर्वादपत्रीं कृपा करावी. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४१२१ **श्रीगणराज.** (पौष शु० ७–२५ दिसेंबर.)

पै॥ छ० ६ रजब. सन समान तिसैन. पौष.

विज्ञापना श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब व राजश्री नाना ऐसे छ २८ जमादिलाखर इंदुवासरीं राजश्री गोविंदराव तात्या खासगीवाले यांचे वाड्यांत गेले होते. बागेंत जाऊन बंगल्यांत बैठक जाहली. एक प्रहर भरचक्का खलबत जाहलें. नंतर स्वारी वाड्यांत दाखल जाहली. श्रीमंत राजश्री उभयतां साहेबांची स्वारी पर्वतीस गेली होती. नंतर वडगांवचे बागेस जाऊन दोन घटका रात्रीस वाड्यांत दाखल जाहली. शिंदे यांचे कूच व्हावें हें घाटत आहे. शिंदे याणीं आपले लोकांस मागून घेऊन तलब माफ करून घेतली. चाळीस लक्ष रुपये रोजमुरा मात्र द्यावा. कंपूचे वीस लक्ष रुपये. बाकी साठ लक्ष रुपये द्यावे. ऐसें ठरवून बाकीबेबाक कबजे होतात, म्हणोन बाजारी अफवा. दुसरें, साठ लक्ष रुपये सरकारांत येणें तेविषयीं कूच जाहलेविना पैसा प्राप्त नाहीं ऐसें (नानांचें) बोलणें

१ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र. यांवर आम्हीं घातलेली मिति व तारीख पैवस्तीची आहे.

पडलें. शेवट अलिजाबहादर वरात सात असामींवर करणार (म्हणूं लागले) तेव्हां दहा लक्ष रुपये द्यावे (असा नानाचा) बेत होत आहे परंतु निश्चयांत नाहीं. काय बेत आहे न कळे. हे ही बाजारी अफवा. खरें किती, लटकें किती, न कळे ! कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१२२ + **श्री.** (पौष–दिसेंबर)

श्रीगणेशायनमः

शुक्रमहादशा दहा वर्षेपर्यंत आहे. फळ महादशेचें उत्तम आहे.

राहोरन्तर्दशा माघ शु॥ ५ पर्यंत. फलमनिष्टम्.

माघी पंचमी नंतर ३२ मासपर्यंत गुरोरन्तर्दशा. फलं शुभमस्ति.

गुरोर्मेषप्रवेशे मुक्तता.

भीमातटाकात् गमनं न भविष्यति.

धनुःसंक्रान्तिनन्तरं अभ्युदयोऽस्ति

एतादृशम् सुब्बाशास्त्री उक्तवान्.

नं. ४१२३ **श्रीव्यंकटेश.** (पौष शु० १०–२८ दिसेंबर)

पै॥ छ० १३ रजब. सन समान तिसैन.

श्रियासह चिरंजीव राजश्री गंगाधरराव यांसीं प्रति × धोंडूबाई आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० ९ रजब गुरुवासर पावेतों यथास्थित असे. विशेष. पेशजी आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. त्या अलीकडे तिकडील वर्तमान कळत नाहीं. शिंदे याणीं वडिलांस त्या स्थळांहून काढून दुसरे जागीं नेलें म्हणोन बाजारी वदंता आहे. तरी तिकडील सर्व वर्तमान लिहून पाठवावें. इकडील वर्तमान तरी राजमंडळकरांच्या

+ भविष्य परशुरामभाऊंसंबंधें. × कंकणवाडीकर. १ परशुरामभाऊंस.

२ मांडवगणाहून.

लष्कराची फौज सध्यां मोरबेत्री आहे. कोणीकडे जाणार हें कांहीं कळत नाहीं. अद्यापि मागील रोख दिसत नाहीं. तासगांवीं फौज जमा करीत आहेत, सरकारांतून ही सरंजाम येणेंचा आहे, तो आल्यानंतर जें होणें तें होईल; असें लिहिण्यांत आलें होतें त्याचें कसें जाहलें हें सविस्तर लिहिणें. बहुत काय लिहिणें. लोभ असावा हे आशीर्वाद.

+ नं. ४१२४ श्री. (पौष शु० १२–३० दिसेंबर.)

पै॥ छ० ११ रजब. सन समान तिसैन. पौष.

सेवेशी विज्ञापना. करवीरकर यांची फौज चव्हाणाबरोबर शहापूरप्रांतीं गेली त्याणीं चि॥ राजश्री दादाकडील तालुक्याचे पांच सात गांव लुटून जाळून फस्त केले. रत्नाकरपंत याणीं रामदुर्गची खंडणी घेऊन बारीचे पलीकडे जाऊन ईटगळास ठाणें घातलें. नरगुंदची खंडणी घेणार म्हणोन आज्ञा लिहिली ती कळली. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१२५ श्री. (पौष शु० १४–१ जानेवारी.)

पै॥ छ० १७ रजब. अर्धरात्र. सन समान तिसैन.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशी.

विज्ञापना. काल श्रीमंत राजश्री नाना फडणवीस यांस शिंदे यांचे घरीं खलबतास बोलाविलें. तेथें जातांच कैद केलें. बहुत वाईट गोष्ट जाहली. असा पुरुष पुन्हा व्हावयाचा नाहीं. होणारें सोडीत नाहीं ! वडिलीं बहुत सावध असावें. फौज जमा असावी. चार वेळा सारिख्या येत नाहींत. वडील सर्वजाण आहेत. अशा प्रसंगीं फौजेची बळकटी असावी ती चांगली. आणखी अधिकोत्तर होईल तें मागाहून लिहीन. तपशीलवार वर्तमान आपल्यास परभारें कळलेंच असेल. रवाना सोमवार अस्तमानचा दोन घटिका दिवस. हे विज्ञापना.

---

१ पत्रावर मिति व तारीख आम्ही घातली आहे ती पैवस्तीचा आहे. पत्र बाबाकाळे याचें पुण्याहून ३ बाबाकाळे याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

नं. ४१२६ श्रीगणराज. (पौष शु० १५–२ जानेवारी)

पै॥ छ० १८ रजब. सन समान तिसैन. पौष.

[1]विज्ञापना मंगळवार दोन प्रहर दिवस. यथास्थित असे. परवां रविवारीं राजश्री नाना फडणवीस यांस शिंदे यांजकडून मुकरी साहेब कंपूचा सरदार होता तो नानाकडे आला. आणि खलबतास बोलाविलें म्हणोन घेऊन गेला. नाना तेथें जातांच शिंदे यांच्या वाड्याभोंवते चौक्या बसवून बंदोबस्त केला. आणि कैद केलें. मोठी वाईट गोष्ट जाहली. असा पुरुष पुन्हा व्हावयाचा नाहीं. होणार त्यासारखी बुद्धि होते ! तिकडे सावधता असावी. वडील सर्वजाण आहेत मी विनंती लिहावी ऐसें नाहीं. फौजेची तयारी असावी. मागाहून जें आढळेल तें सविस्तर विनंती लिहून पाठवितों. अशा प्रसंगीं कोणी बोलणार असता म्हणजे ठीक पडतें. कळावेंकारितां लिहिलें आहे. सेवेशी श्रुत होय. हे विज्ञापना. श्रीमंत रा॥ अमृतराव साहेब यांजवळ गोविंदराव काळे व शिवरामपंत थत्ते याप्रमाणें कारभार करीत आहेत. कळावें. हे विज्ञापना.

१ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

घाटग्याचा दंगा.

इ. स. १७९८ जानेवारी ते जूनपर्यंत.

यापुढें पुण्यावर जी अनर्थपरंपरा ओढवली तिला कारण म्हणून बाजीराव व दौलतराव शिंदे यांचेंच नांव जरी पुढें आलें, तरी त्या दोघांच्या दुष्ट बुद्धीस प्रेरणा देणारा व त्यांच्या नांवावर वाटेल तें राक्षसी कृत्य करण्यास न भिणारा सर्जेराव घाटगा हाच त्या सर्व अनर्थांचें मूळ होय; सबब या प्रकरणास आम्ही घाटग्याचा दंगा हेंच नांव दिलें आहे.

नाना फडणवीस शिंद्याच्या लष्करांत धरले गेले तेव्हां त्यांचे पांच चार हजार आरब शहरांत होते. त्या आरबांची पगारबाकी वगैरे चुकती न करितां त्यांस शिंद्यांच्या पलटणांकडून धुडकावून लावावें, अगर मारून टाकावें, असा बाजीराव साहेबांचा बेत होता. परंतु आरबांनीं तो रंग पहातांच शहरची नाकेबंदी केली, कित्येक बडे मुत्सद्दी धरून पहाऱ्यांत बसविले, व 'मरून जाऊं, पण आमची तलब भागल्याखेरीज शहर सोडून जाणार नाहीं,' असा श्रीमंतांस निरोप पाठविला. शिंद्याच्या पलटणांची व आरबांची भर-शहरांत व खुद्द आपल्या वाड्याभोवतीं लढाई सुरू होणार असा संभव दिसूं लागतांच श्रीमंतानीं घाबरून आरबांचा सर्व पैसा देऊन टाकून त्यांस मार्गस्थ केलें. नानांचें बंड आतां मोडलें असल्यामुळें आपण निर्भय झालोंसें समजून श्रीमंतानीं शिंद्याचीं पलटणें वाड्या-भोंवतीं पहाऱ्यावर होतीं त्यांस शिंद्याकडे परत लावून दिलें व आपण चाकरीस ठेविलेलीं निराळीं नवीन पलटणें तयार झालीं होतीं तीं पहाऱ्यावर नेमिलीं. त्या पलटणांवर आबा काळे हा मुख्य अंमलदार होता. पूर्वीपासून नानांच्या कारभारांत असलेले बाबा

फडके, त्रिंबकराव परचुरे, गोविंदराव काळे, गोविंदराव पिंगळे, नारोपंत चक्रदेव वगैरे लोक शहरांत होते त्यांस श्रीमंतानीं नाना कैद झाल्याबरोबर कांहीं निमित्तानें सरकारवाड्यांत बोलावून नेऊन अटकेंत ठेवलें! शिंद्याच्या लष्करांत आबा शेलूकर, दादा गद्रे, बजाबा शिराळेकर व आणखी किरकोळ असामी नानांबरोबरच धरले गेले होते ते पुढें एक महिन्यानें सुटून आले. त्यांत शेलूकरांपासून पंधरा लक्ष, गद्रे यांजपासून सात लक्ष, व शिराळेकर यांजपासून पन्नास हजार रुपये शिंद्यानें खंड घेतला; अशी त्या वेळीं लोकांत बोलवा होती.

सुमारें तीन महिने नाना फडनवीस शिंद्याच्या लष्करांतच होते. त्या अवधींत शिंद्यांचे कारभारी सर्जेराव घाटगे, फकीरजी गाढवे, व यादवराव भास्कर त्यांजकडे वारंवार जाऊन तुमच्या जवळचें द्रव्य द्या, गड व किल्ले तुमच्या ताब्यांत आहेत त्यांच्या सोडचिठ्या द्या, व कारभार प्रकरणीं कांहीं अडचणी आहेत त्यांचा उलगडा करा, असें त्यांस सांगत असत. परंतु विश्वासघातानें आपणास धरल्यामुळें नाना फार चिडले होते. त्यानीं कोणत्याही गोष्टीसंबंधानें या लोकांशीं वाटाघाट करण्याचें साफ नाकारिलें.

बाळाजी विश्वनाथ यांस सन १७१४ सालीं शाहू महाराजांकडून मराठी राज्याची पेशवाई व फडनविसी मिळाली. त्यावेळीं बाळाजीपंतानीं फडनविसी आपले स्नेही बाळाजीपंत भानु यांस देऊन टाकिली. त्या दिवसापासून पेशवे व फडनवीस या नात्यानें भट व भानु यांचें एकत्र अधिष्ठान आजपर्यंत चालत आलें. आतां मोरोबा व नाना हे दोघेही फडनवीस कैदेंत सांपडल्यामुळें तो संबंध तुटल्यासारखा होऊन श्रीमंतांस चमत्कारिक वाटूं लागलें व तो लोकापवाद दूर करण्यासाठीं मोरोबास कैदेंतून सोडून फडनविसीच्या अधिकारावर स्थापावें असें त्यांच्या मनांत आलें. परंतु 'मोरोबाकडून मला तीस लाख रुपये मिळाल्याखेरीज मी त्यास फडनविसी मिळूं

देणार नाहीं,' असा शिंद्यानें आग्रह धरिला; आणि मोरोबाजवळ तर विष खायला द्यां पैसा नव्हता! अर्थात् श्रीमंतांस आपला बेत रहित करावा लागला. तथापि त्यांनीं त्रिंबकच्या किल्यावर मोरोबा कैदेंत होता त्याच्या कैदेची सक्ती ढिली करविली व त्याजकडे द्रव्य पाठवून त्रिंबकेश्वरीं येऊन प्रायश्चित्त घेण्याची त्यास परवानगी दिली. त्याचा मुलगा पुण्यांत होता त्यास धाकटा नाना फडनवीस म्हणत. त्या धाकट्या नानाचाही श्रीमंतानीं द्रव्यद्वारें परामर्ष घेऊन कांहीं घोडीं व खासबारदार व तीन पागा असा सरंजाम त्याजकडे नेमून दिला.

राज्यकारभारांतून नाना फडनवीस निघाले तरी श्रीमंतांच्या दरबारांत पूर्वीप्रमाणेंच बेदा चालू होता. याचें कारण अमृतराव जरी कारभाराचीं सूत्रें श्रीमंतांच्या इच्छेप्रमाणेंच चालवीत होता तरी त्याविषयीं श्रीमंतांच्या मनांत मत्सर व भीति जी यापूर्वीच उत्पन्न झाली होती ती कधींही दूर झाली नाहीं! दरबारच्या स्थितीविषयीं त्यावेळच्या एका पत्रांत मजकूर आहे कीं " उभयतां श्रीमंत यांचें चित्त परस्पर शुद्ध नाहीं. सर्व कारभार अमृतरावसाहेब करितात. पहिले दौलतींतील मातबर गृहस्थ अथवा माहितगार यांचें प्रयोजन कांहीं एक नाहीं व त्यांचें अगत्यही नाहीं! स्वारी श्रीमंतांची निघाली असतां कोणी एक बरोबर मागल्यांपैकीं नाहीं. वर्तमानकाळीं संनिध आहेत तेच असतात. सरकारवाड्यांत पांचशें पात्रें भोजनास होतात. कोणाची कोणास दाद नाहीं. महादेवी राज्य झालें आहे!"

नानाच्या जाचांतून मुक्त होण्यासाठीं बाजीरावानीं शिंद्याचा आश्रय केला खरा, पण लौकरच त्यांस व अमृतराव वगैरे मुत्सद्यांस शिंद्याचाही जाच असह्य भासूं लागला! शिंद्याच्या दरबारांतून शेणवीमंडळ निघाल्यापासून तेथें कोणी प्रतिष्ठित माणूस राहिलें नव्हतें. शिंद्याचा सर्व कारभार सर्जेराव घाटगे, फकीरजी गाढवे, बाणाजी हुजऱ्या व आणखी एक दोन खिजमतगार या लोकांच्या हातांत गेला होता. या

लोकांनीं आपल्या धन्याच्या नांवें तमाम मुलखांत मनास वाटेल तशीं रोखेपत्रें करून मनस्वी धामधूम मांडली! परशुरामभाऊंची जहागीर आपल्या नांवें करून घ्यावी हा सर्जेरावाला हव्यास लागला होता; व त्याप्रमाणें त्यानें श्रीमंतांस न कळवितां पंढरपुरांत जबरदस्तीनें शिंद्याचें ठाणें घातलें. तासगांव तालुका आपल्या हवालीं करण्याविषयीं तेथील अंमलदारांस त्यानें शिंद्यांकडून पत्रें लिहून घेतलीं आणि पेशव्यांस न विचारितां शिंद्यानींही तीं बेलाशक लिहून दिलीं. तीं पत्रें रवाना व्हावीं तों तें वर्तमान नारायणराव घोरपडे कापशीकर यांस कळल्यावरून त्यांनीं दौलतरावांस सांगून त्या पत्रांची रवानगी रहित करविली. घाटग्यानें अंदाधुंदी माजविल्याच्या आणखी शेकडों कागाळ्या पेशव्यांच्या कानावर प्रत्यहीं येऊं लागल्या; त्यामुळें त्यांस फार संताप आला. त्या संधींत जवळच्या मुत्सद्यानीं त्यांस बीर भरला कीं, "शिंद्यावर जरब बसविण्यासाठीं पागे जमा करावे, हुजरत बोलवावी, सरंजामी रास्ते पटवर्धन यांची फौज बोलवावी." पण बाजीरावांची ही वीरश्री फार वेळ टिकली नाहीं! शिंद्यापुढें आपलें कांहीं एक चालणार नाहीं असें समजून फौज गोळा करण्याचा नाद त्यांनीं सोडून दिला. त्यावेळीं एक गोष्ट मात्र लक्षात ठेवण्याजोगी घडून आली. ती गोष्ट हीच कीं, त्यानीं धोंडोपंत गोखले यास पांच हजार फौज चाकरीस ठेवण्याची आज्ञा दिली, व धारवाडच्या किल्ल्यापैकीं दोन तोफा व खर्चाकरितां तिकडील तालुक्यांवर एक लाख रुपयांची वरात देवविली. त्याप्रमाणें धोंडोपंतानें फौज ठेवून काय काय कामगिरी केली त्याचें वर्णन पुढें येईलच. धोंडोपंताचा पुतण्या बापू गोखले याच्या उत्कर्षाला येथपासूनच प्रारंभ झाला.

बाजीरावसाहेब जरी सर्जेरावाच्या चढेलपणाला कंटाळले होते तरी त्याच्या कांहीं कृत्यांकडे कानाडोळा करणें श्रीमंतांस आवडत होतें, जीं माणसें श्रीमंतांस नको होतीं तींच माणसें कांहीं

अन्य कारणामुळें सर्जेरावासही नको होतीं ! अर्थात् तसल्या माणसांचें पारिपत्य आपण करूं लागलों असतां श्रीमंतांकडून कांहीं एक अडथळा येणार नाहीं हें सर्जेरावास पक्कें माहीत होतें. शिंद्याच्या लष्करांत महादजी शिंद्याच्या बायकांचें प्रस्थ खुद्द दौलतरावाससुद्धां डोईजड झालें होतें. त्या बायकांत महादजीची थोरली स्त्री लक्ष्मीबाई हीच प्रमुखत्वानें वागत होती. नानाशीं तिनें स्नेहभावाचा शिलशिला राखिला होता. महादजीच्या विश्वासांतले आबा चिटणीस, रायाजी व रामजी पाटील वगैरे मुत्सद्दी त्या बाईच्या शब्दास मान देणारे होते. जिवबादादांचा मुलगा नारायणराव हा शिंद्याच्या घोडदळावरचा बक्षी म्हणजे मुख्य अंमलदार होता. जिवबादादाचा भाऊ बाळाभाऊ व आणखीही शेणवी सरदार बक्षीच्या हाताखालीं होते. त्या सर्व शेणवी मंडळीची बायांवर मोठी भक्ति असल्यामुळें त्यांच्या द्वारें फौजेवर वजन राखणें लक्ष्मीबाईस सुलभ झालें होतें. दौलतरावाची दिवाणगिरी जर आपणास मिळवावयाची, तर बाया व त्यांचे कारभारी व शेणवी सरदार यांचें कूट फोडून धुळीस मिळविल्याखेरीज आपलें बस्तान कधींही बसणार नाहीं, हें सर्जेरावास समजून चुकलें होतें. नानास अटकाव करण्याविषयीं श्रीमंतांची इच्छा तृप्त करण्याबद्दल घाटग्यानें आपल्या धन्यास जी भर दिली तींत श्रीमंतांकडून मुबलग द्रव्य मिळवून फौजेचें देणें फेडावें हा हेतु होताच; पण दुसराही हेतु असा होता कीं, नानाची पुंगी एकदां बंद झाली म्हणजे बायांस बाहेरून मदत मिळण्याचा संभव राहिला नाहीं !

नानांचा बंदोबस्त झाल्यावर घाटग्याची वक्रदृष्टि शेणवी सरदार व त्यांचे अनुयायी यांजकडे फिरली. बाजीरावसाहेब शेणव्यांचें नांव निघालें कीं, नखशिखांत संतापून जात. अर्थात् त्या शेणव्यांचें पारिपत्य करणें हा श्रीमंतांची मर्जी सुप्रसन्न करण्याचाच

मार्ग होता ! पण नारायणराव बक्षीस कामावरून काढावें तर त्याची जागा भरून काढण्यासाठीं तसाच प्रतिष्ठित व वजनदार माणूस फौजेस मान्य होण्याजोगा मिळाला पाहिजे, तो कोण मिळणार ? घाटग्याच्या सुदैवानें गोपाळराव चिटणीस हा वजनदार मुत्सद्दी यावेळीं बक्षीगिरीस उमेदवार म्हणून उभा राहिला. त्यास घाटगे व गाढवे वगैरेनीं तत्काळ हातीं धरिलें, व त्याजकडून दौलतरावांस समजाविलें कीं, नारायणराव बक्षी यानें फौजेच्या कारभारांत बखेडे माजवून तिच्या देण्याची रक्कम उगीच फुगविली आहे ! मला बक्षी कराल तर मी पांसष्ट लक्ष रुपये देतों. मात्र हल्लींचा बक्षी व त्याचे अनुयायी मोकळे राहतां उपयोगी नाहीं. शिंद्यानीं तें म्हणणें तत्काळ कबूल केलें आणि मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत नारायणराव बक्षी, बाळाभाऊ, बाजीबा मोदी, देवजी गवळी व आणखी तीन असामी कैद करून नगरच्या किल्ल्यास रवाना केले. जांबगांवीं बाळोबा तात्या व धोंडीबा अटकेंत होते त्यांसही यावेळीं अधिक बंदोबस्तासाठीं त्याच किल्ल्यास पाठवून देण्यांत आलें. शेणव्यांपैकीं एक सदाशिव मल्हार दिवाण मात्र मोकळा होता, पण त्याच्या हातीं काम कारभार कोणताही राहिला नव्हता.

बक्षी वगैरे मंडळी कैद झाल्याबरोबर शिंद्याच्या फौजेंत मोठी गलबल झाली. फौजेंतले मराठे व पठाण सरदार व पलटणांवरचे गोरे अंमलदारसुद्धां सर्व बेदिल होऊन दंग्यास सुरुवात झाली. मराठे व पठाण याणीं शिंद्याच्या दारांत धरणें धरिलें, व ‘ आम्हांस तुमची चाकरी करावयाची नाहीं, आमच्या देण्याचा आजच्या आज निकाल करा, ’ असा त्यानीं तगादा लाविला. घाटगे, गाढवे वगैरे कारभारीही धरणेवाल्यांनीं पहाऱ्यांत बसवून ठेवले. आठ पंधरा दिवस हा हमामा चालला होता. शेवटीं नवीन बक्षीनें पैक्याची थोडीबहुत तरतूद करून व बाकी देण्याच्या मुदती बांधून

घेऊन मोठ्या कष्टानें तीं धरणीं उठविलीं व दंगा मोडिल्या-सारखा केला.

शिंद्याच्या फौजेचें देणें दोन कोट रुपये तुंबलें होतें. नानास धरून कैदेंत घालण्याबद्दल श्रीमंतानीं जो पैका देऊं केला होता त्यावरच शिंद्यानीं आतां सर्व भिस्त टाकली होती. पण श्रीमंतांजवळ तरी पैका कोठून येणार ? नानांच्या अमदानींतले जुने मुत्सद्दी द्रव्य-वान् होते, पण त्यांस मारहाण करून निर्दयपणानें त्यांजकडून द्रव्य काढण्याची छाती श्रीमंतांस होईना ! त्यानीं जुन्या मुत्सद्यांस धाक-दपटशा दाखवून पाहिला व त्यांजवळ पैका मागितला; त्यांस एकदोन उपोषणें ही घालून पाहिलीं; परंतु कोणीही बधले नाहींत. रामचंद्र नाईक परांजपे, वानवळे, बळवंतराव वांकडे वगैरे सावका-रांसही श्रीमंतानीं द्रव्य देण्याविषयीं पुष्कळ तगादा केला, परंतु त्यांजकडूनही कांहीं अर्थनिष्पत्ति झाली नाहीं.

पेशवाई हें ब्राह्मणी राज्य होतें. पैक्याच्या तगाद्याची किती सक्ती झाली तरी त्याची मजल उपोषणापलीकडे जाणार नाहीं अशीच पुण्यांतल्या द्रव्यवान् ब्राह्मणांना भ्रांति होती. ती भ्रांति दूर होण्याचा समय जवळच येऊन ठेपला होता ! फेब्रुवारींत शिंद्याच्या लष्करांत जो एक कांहींसा विलक्षण प्रकार घडून आला त्यावरून तरी पुण्यांतल्या द्रव्यवान् धूर्त ब्राम्हणानीं बोध घ्यावयास पाहिजे होता ! तो प्रकार हाच कीं, शिंद्यांच्या सात नोकरांवर ब्राह्मण मार-ल्याचा आळ आल्यावरून शिंद्यानीं—म्हणजे सर्जेराव घाटग्यानें—त्या नोकरांचा शिरच्छेद करविला ! त्या दुर्दैवी नोकरांस घाटग्यानें खरोखरीच ही शिक्षा केली होती कीं काय, याचा आम्हाला संश-यच वाटतो. तसा बोभाटा मात्र चोहींकडे झाला होता एवढें खरें ! कसेंही असो, या एकाच गोष्टीवरून " अतिशिष्टत्वं चोरलक्षणं " हा न्याय पुणेंकर मुत्सद्दी उमजले असते, तर पुढें लवकरच अंगावर शहारे येण्याजोग्या भयंकर विपत्ति आपणास भोगाव्या लागणार हें समजून ते सावध झाले असते !

घाटग्याचा शिरजोरपणा श्रीमंतांपेक्षां अमृतरावांच्या मनास फारच अपमानकारक भासत होता. पुण्यावर कसे दिवस येणार याचाही तर्क त्यांस झाला होता. ते दिवस निमूटपणें पहाण्यापेक्षां कांहींतरी निमित्तानें पुण्यांतून पाय काढावा असें त्यांच्या मनांत आलें, आणि ओझरच्या गणपतीच्या दर्शनास जातों, असें श्रीमंतांस सांगून स्वांर व गारदी मिळून हजार दीडहजार जमावानिशीं त्यानीं पुण्यांतून कूच केलें.

फाल्गुन महिन्यांत सर्जेराव घाटगे यांची कन्या बायजाबाई हिचें दौलतराव शिंयाबरोबर लग्न झालें. लग्नांत रुप्याचें बहुलें केलें होतें व सोनेरी चांदवा व मोत्यांच्या झालरी लाविल्या होत्या. यावरून समारंभ किती टोलेजंग झाला असेल याची कल्पना होईल.

नाना फडनवीस यांच्या जिवास अथवा अब्रूस मी धक्का लावणार नाहीं अशी पूर्वी बाजीराव साहेबानीं निजामअल्लीस चिठी लिहून दिली होती व भोंसल्यांसही तसें आश्वासन दिलें होतें. त्यावरून पाहिलें तर भोंसले व नबाब यानीं आतां पुण्यावर स्वांरी करावी. परंतु त्या दोघांस जें जें पाहिजे होतें तें तें नानांकडून पूर्वींच मिळालें होतें. नानांस सोडविण्याची खटपट ते आतां कशाला करितील ? लौकिकार्थ त्यानीं फौज गोळा करण्याची थोडी गडबड केली; पण तिजपासून शेवटीं कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं हें पुणें दरबारास पक्कें ठाऊक होतें ! सांप्रत चिंता उत्पन्न होण्याचें कारण करवीरच्या महाराजांकडून घडत होतें त्याचा मात्र परिहार करणें पुणें दरबारास न्प्राप्त झालें. श्रीमंतांच्या आज्ञेवरून शिंयानीं नानास कैद केल्याचें वर्तमान येतांच करवीरकर महाराजानीं साखरा वांटल्या, व पेशव्यांस नानाच्या जाचांतून मुक्त झाल्याबद्दल अभिनंदनपत्रें पाठविलीं; आणि त्याबरोबरच त्यांच्या मुलखावर स्वारी केली ! त्यावेळीं कर्नाटकाच्या बाजूस शत्र्यांची म्हणण्याजोगी फौज नव्हती त्यामुळें महाराजांचा डाव

चांगलाच साधला. त्यानीं प्रांतोप्रांतीं खंडणी घेण्यांत व लुटालूट जाळपोळ करण्यांत बिलकूल कसूर केली नाहीं! त्यानीं गोकाक घेतलें, शहापुर तालुका आणि नवी व जुनी हुबळी घेऊन लुटली, आणि सावनूरच्या अकराही महालांत ठाणीं बसविलीं. आणखीही त्यांचा व्याप पसरतां पसरतां कृष्णा व तुंगभद्रा यांमधला सर्व मुलूख महाराजांच्या ताब्यांत जाणार अशी पुणेंदरबारास धास्ती पडली. एकटा धोंडोपंत गोखले नवलगुंदाकडे पांच चार हजार फौज बाळगन होता त्यानें करवीरकरांशीं हिय्यानें टक्कर दिली, परंतु त्या एकट्या सरदाराचें त्यांपुढें काय चालणार? एतावता सर्व कामें बाजूस ठेवून महाराजांच्या बंदोबस्ताकरितां कर्नाटकांत फौज पाठविण्याखेरीज पेशव्यांस गत्यंतर राहिलें नाहीं. आणि त्यांजवळ तर शिंद्यांच्या फौजेखेरीज स्वारीस पाठविण्याजोगी फौज मुळींच नव्हती! शिवाय अंतःस्थ व बाहेरील शत्रूंचा बदोबस्त करून बाजीराव साहेबांची गादी चिरस्थायी करण्याचा मक्ता दौलतराव शिंद्यानीं घेतला होता त्याअर्थीं या मोहिमेवर फौज पाठविणें हें त्यांचेंही काम होतेंच. त्याप्रमाणें शिंद्यांचा कारभारी सर्जेराव यानें पंधरा हजार स्वांर व मुकेरीचीं पलटणें या मोहिमेवर रवाना केलीं. फौजेंत हिरोजीराव पाटणकर, रखमाजी जाधव, व गोपाळराव मोहिते हे मुख्य सरदार होते. या फौजेस कुमक म्हणून आणखी दहा हजार फौज स्वतः ठेवून आपण स्वतः स्वांरीवर नमूद होणार असा घाटग्यानें पुकारा केला होता. करवीरच्या मोहिमेकरितां शिंद्यानीं हिंदुस्थानांतून वीस हजार पेंढार बोलाविल्याचीही वदंता त्यावेळीं पसरली होती. तीं सर्व वर्तमानें करवीरकर महाराजांच्या कानावर जातांच त्यांस दहशत बसली, आणि शिंद्यांची फौज जेजुरीपर्यंत येते न येते तोंच रत्नाकरपंत राजाज्ञा यांस सावनूरप्रांतीं पांच हजार फौजेनिशीं ठेवून महाराज घाईघाईनें परत करवीरास आले! अर्थात् शिंद्यांची फौजही मोहिमेची मसलत रहित करून परत पुण्यास आली. खरें पाहिलें तर महाराजांस भय-

प्रदर्शन करण्याकारितां घाटग्यानें हा फौज पाठविण्याचा नुसता बहाणा केला होता ! वस्तुतः इतक्या लांब पल्ल्यावर एवढी मोठी फौज पाठवणें शिंद्यांस अशक्य झालें होतें. अशी संकटावस्था उत्पन्न होण्याचें कारण त्यांच्या घरांत माजलेला गृहकलह हेंच होय. सैन्यांत धुमसत असलेल्या असंतोषामुळें ह्या गृहकलहाचें स्वरूप केव्हां भयंकर होईल याचा मुळींच नेम नव्हता.

शिंद्याच्या लष्करांतला असंतोष द्रव्याचा मुबलग पुरवठा झाल्याखेरीज मोडण्याजोगा नव्हता, आणि शिंद्यांस द्रव्य-दर्शन तर श्रीमंतांकडून बिलकुल होईनासें झालें ! घाटग्यानें श्रीमंतांच्या मुरवतीसाठीं आजपर्यंत सबुरी केली. परंतु आतां कोणाचीही दयामाया अगर भीड न धरितां पुण्यांतल्या लोकांकडून मिळेल तितकें द्रव्य आपण उकळणार असें त्यानें श्रीमंतांस बजाविलें. त्याच्या क्रूरपणाची व उद्दामपणाची अटकळ श्रीमंतांस अजूनसुद्धां पुरती झाली नव्हती. त्यानीं त्याच्या म्हण-ण्यास निरुपायानें रुकार दिला व खंड वसूल करण्याच्या कामावर आपल्या वतीनें बाळोजी कुंजर यास घाटग्याच्या मदतीस नेमिलें. इतकें झाल्यावर घाटग्याच्या सैतानी लीलांचा प्रभाव काय विचारावा ! शनवारच्या वाड्यांत नानाच्या पक्षाची कांहीं मंडळी खुद्द पेशव्या-नींच अटकेंत ठेविली होती; सबब प्रथम सरकारच्याच वाड्यांत सरकारच्याच समक्ष त्या दुर्दैवी बंदिवानांची बेअब्रू व हाल हाल करून सर्जेरावानें द्रव्य वसूल केलें ! लष्करांतून गांवांत जाण्या-येण्यास लांब पडतें म्हणून तो आतां नाना फडनवीस यांच्या वाड्यांत येऊन राहिला होता. तेथें गांवांतले द्रव्यवान् प्रमुख लोक धरून न्यावे, त्यांजवळ अद्वातद्वा पैका मागावा, न देतील तर त्यांस धक्काबुक्की व शिवीगाळ करावी, आणि इतकेंही करून वसूल न ाईल तर त्या लोकांस वानवडीवर लष्करांत पवू द्यावें, तेथें

त्या लोकांचा प्राण गेला तरी बेहत्तर, पण द्रव्य मिळेपर्यंत त्यांस मारझोड करीत सुटावें, हा सर्जेराव घाटग्याच्या क्रम दोन तीन महिने चालला होता. या अनर्थांची कल्पना पुढें थोडेसे उतारे आम्ही देत आहों त्यावरून वाचकांच्या डोळ्यांसमोर उभी राहील.

"शहरांतील मुत्सद्दी व मातबर गृहस्थ श्री॥ राजश्री नाना फडणीस यांजकडील राजकारणांत व मायेंतील होते ते नाना नजरबंद जाहल्यापासून सरकार वाड्यांत होते. त्यांजकडे पैक्याच्या ठरावाचा जाबसाल जाहला नव्हता. हल्लीं पंधरा दिवस जाहले, राजश्री सखाराम घाटगे याणीं अंतर्यामीं श्री॥ राजश्री पंतप्रधान यांजपाशीं बोलणें बोलोन गृहस्थांस तगादा बहुत केला. हल्लींही तगादा बहुत चालला आहे. राजश्री नारायणराव वैद्य यास छड्यानीं मारिलें व बाबूराव केशव यांचे पुत्रास मारिलें. राजश्री चिंतोपंत देशमुख यांसही मारिलें. चाप देशमुख यांजपुढें ठेविले होते. लाविले मात्र नाहींत. पांच लक्ष रुपये बाबूराव केशव यांचे पुत्रानें करार केले. देशमुख याणीं पन्नास हजार रुयये कबूल केले आहेत, त्यास त्यांजपाशीं इतका पैका नाहीं. कबूल तो जाहले; पुढें पैका मिळत नाहीं. देवपूजा देखील बाजारांत विकावयास काढिली !"

"राजश्री त्रिंबकराव परचुरे याणीं आपणापाशीं ऐवज होता त्याची सात लक्ष रुपयांची याद लिहून श्रीमंतांस दिली. आणि (त्यांच्या) पायांवर हात ठेविला. 'याशिवाय पैसा आपणाजवळ नाहीं. मर्जीस येईल तो ऐवज घ्यावा. बाकी आम्हांस द्यावा.' ऐशी विनंती केली. तेव्हां श्रीमंतानीं पांच लाख रुपये घेऊन दोन लाख त्यांस दिले. त्रिंबकराव याणीं लागलीच भावांची वांटणी तिघांची करून आपण पन्नास हजार घेतले. श्रीकाशीस जाण्यास सरकार आज्ञा घेतली. शिंदेकडीलही घेतली. शिंदे याणीं मार्गाचीं दस्तकें लिहून दिलीं."

त्याप्रमाणें त्रिंबकराव परचुरे काशीयात्रेस निघून गेले, परंतु कायगांव टोक्यापलीकडे त्यांचें जाणें झालें नाहीं. त्या ठिकाणीं कफक्षयाची भावना होऊन त्यांचें देहावसान झालें.

“ राजश्री भाऊ कापशे व राघोपंत पेंडसे—नानांकडील —यांजला शिंदे याणीं लष्करांत नेलें. नानांकडील ऐवजाची माहितगिरी त्यांस पुसिली. त्याणीं आपणास माहितीगिरी आहे तितका ऐवज दाखविला. भाऊ कापशे गांवांत येऊन ज्या ज्यांकडे ऐवज होता तो दाखविला. तितके गृहस्थ शिंयानीं लष्करांत नेले. अजमास बाजार वर्तमान पन्नास, साठ, ऐशीं, नवद लाख पर्यंत जवाहीर समेत ऐवज सांपडला असें वर्तमान बाजारी बोलतात. ”

दुसऱ्या एका पत्रांत हा ऐवज पांसष्ट लाखपर्यंत शिंयाच्या हातीं लागल्याचें लिहिलें आहे.

“ राजश्री जनार्दन शिवाजी याणीं चाळीस हजार रुपये कबूल केले. पैकीं पांच हजार दिले. बाकीचा पैका मिळत नाहीं. त्यांचे मामा खाडीलकर यांस घाटग्यानीं बांधून मारिलें. दोनचार दिवस शहरांत रामाजी महादेव यांचे वाड्यांत होते. पैका न मिळे तेव्हां आज प्रातःकाळीं शिंयाच्या लष्करांत घेऊन गेले. वरकड गृहस्थांसही तगादा बहुत चालिला आहे. श्रीमंतांसमक्ष शिवीगाळ सर्जेराव करितात. श्रीमंतांचें चित्तांत कांहीं एक येत नाहीं! बाळोजी कुंजर व सखाराम घाटगे पैका काढावयाचे मसलतींत आहेत. शहरांत मोठा प्रळय जाहला आहे. आज सरकार दौलतीमध्यें व शिंदे यांजकडील दौलतीमध्यें जें करणें ते घाटगे करितील तें प्रमाण! दुसऱ्याचें कोणाचें चालत नाहीं. सखाराम घाटगे नाना फडणीस यांचे वाड्यांत येऊन राहिले. आबा शेलूकर यांस गुजराथेचा सरसुभा सरकारांतून सांगितला. खंड त्यांचा पेशजी जाहलाच होता. हल्लीं पंधरा लक्ष सरकारांत पैका द्यावयाचा करार केला. ”

" आजचा प्रसंग जो जबरदस्तीनें राहील त्याचा आहे. कोणी कोणास विचारावयाचें नाहीं. ईश्वराचे चित्तीं याजउपरी ब्राम्हणाचा हुकूम चालूं नये याप्रमाणें आलें आहेसें भासतें. मग दैवदशा कळेना ! तूर्त शिंदे यांचे घरीं कारभारी एक सर्जा आहे, तेव्हां दौलत चालणें कळतच आहे ! परंतु आज सद्दी त्याचीच उभी राहिली आहे ! पुण्यांत हाणामार चालली आहे त्यांत कोण पार पडतात पहावें. तूर्त श्रीमंतांपाशीं मुखत्यार चक्रदेव, पिंगळे व कुंजर आहेत. "

" सखाराम घाटगे श्री॥ राजश्री नानांचे वाड्यांत येऊन राहिले. नानांच्या देवघरांत अजापुत्राचा वध नित्य चालला आहे. नानांची बैठक होती तेथें कारभारास घाटगे बसत असतात. पुण्यांतील गृहस्थांस दक्षिणदिशेच्या स्वामीप्रमाणें घाटग्याचें भय जाहलें आहे ! ...... उभयतां श्रीमंतांचें अंतर्यामीं चित्त शुद्ध नाहीं. हल्लीं श्री॥ राजश्री (बाजीराव) बाबासाहेब यांजपाशीं कारभार पिंगळे, काळे, चक्रदेव करितात. फडाचा कारभार राजश्री बापूजीपंत लेले करितात. तृणाची प्रबलता जाहली आहे ! ब्राम्हण म्हणजे पदार्थ काय, याजप्रमाणें शिंद्याचे घरीं तूर्त जाहलें आहे. ईश्वरेच्छा ! "

" राजश्री गंगाधरपंत भानु[1]यांस सरकारचे वाड्यांतून सर्जेराव याणीं राजश्री नाना यांचे वाड्यांत आणिलें होतें. नंतर लष्करांत नेलें. तेथें ऐवजाची तोड पडेल म्हणत होते. परंतु ऐवज पटला नाहीं. कोणी विष घेऊन वारले म्हणतात. राघोपंत गोडबोले, भाऊ कापशे, बळवंत बाबूराव यांजवरही प्रसंग कठिणच; प्राणांसी गांठ ! दररोज वस्त्रविरहित करून तापलेल्या तोफेवर बसवितात म्हणून ऐकितों. जे जे ज्याचे ज्याचे कपाळीं संस्कार असतात ते चुकत नाहींत ! "

---

[1] बाबूराव केशव ठाकूर यांचा पुत्र.

" (गंगाधरपंत) भानूंस पंधरा लक्ष तजकरा व आठलक्ष खंड मागत होते. ऐवज उत्पन्न न होय तेव्हां हातापायास दगड बांधिले. शेवट वस्त्रविरहित करून दोन प्रहरां तोफ उष्णांत तप्त होते त्या तोफेवर बसविलें. त्याची झळ नाजूक जाग्यास लागली. नंतर ताडणही जाहलें. शेवट काल जाहला. कांहीं भक्षून वारले हा बहाणा म्हणतात. "

याशिवाय खंडोपंत वर्तक, मोरोपंत गोडबोले, व विठ्ठलराव गोळे सावकार यांचेहीं सर्जेरावानें फार हालहाल व अप्रतिष्ठा केली. मार्चपासून जूनपर्यंत हीं घाटग्याची हाणामारी सुरू होती व त्या अवधींत बहुत अब्रूदार लोकांस पुणें म्हणजे यमपुरी भासत होती ! आपा बळवंत मेहेंदळे यांच्या शरीरीं अकस्मात् कांहीं आजार उत्पन्न होऊन ते याच सुमारास वारले. सर्जेराव द्रव्य मागतो तें आपणाजवळ देण्यास नाहीं, सबब आपली बेअब्रू व हाल होणार, या भयानें त्यानीं विषभक्षण केलें अशी अफवा उठली होती तींत तथ्य नव्हतें. मरतेवेळीं आपानीं गणपतराव मेहेंदळे यांचा मुलगा दोन महिन्यांचा होता तो श्रीमंतांच्या परवानगीनें दत्तक घेतला. असें असतांही घाटग्यानें आपांच्या स्मशानयात्रेस अडथळा केला ! सरकारी परवानगीखेरीज दत्तक घेतल्याबद्दल कांहीं नजराणा वसूल करण्याचा त्याचा बेत होता. परंतु श्रीमंतानीं ताकीद केल्यावरून त्याची हरकत दूर झाली.

नानांस लष्करांत राहूं दिल्यानें बायांचे वगैरे फितूर बळावण्यास अवसर राहतो, आणि बाजीरावसाहेबांचें मन निश्चिंत होत नाहीं, नाना व त्यांचे अनुयायी यांजकडून निघेल तितका पैका काढण्याचें कामही संपत आलें असल्यामुळें त्यांस याउपर येथें ठेवण्याचें कारणही राहिलें नाहीं, असें समजून शिंद्यानीं नानांस ता० ६ एप्रिल रोजीं मध्यरात्रीस डांकेवरून नगरच्या किल्ल्यास रवाना केलें.

एवढा वेळ जे उतारे व पत्रांतले उल्लेख व बाजारवदंता वर दिल्या आहेत त्यावरून पाहिलें तर पुण्यांतल्या लोकांपासून सुमारें दोन कोट रुपये निदान वसूल करून सर्जेरावानें शिंद्यांस दिले असावे असें दिसतें. शिंद्याच्या फौजेचा दंगा द्रव्याकरितांच होता, व हें द्रव्य प्राप्त झाल्यावर तो दंगा वास्तविकपणें शांत व्हावयास पाहिजे होता. पण तसें न होतां फौजेचा असंतोष व दंगाधोपा सुरूच राहिला. फौजेंतले सरदार आपणावर नाखूष, आणि शिंद्याची लहर घटके घटकेस बदलणारी; या स्थितीला कंटाळून गोपाळराव चिटणीस यानें बक्षीच्या कामाचा राजीनामा दिला. तेव्हां फौजेस संतुष्ट करण्यासाठीं नारायणराव बक्षी व त्याचे सोबती यांस कैदेतून सोडणें दौलतराव शिंद्यांस भाग पडलें. ते लोक पुनः आपापल्या कामावर रुजू झाले तरी सर्जेरावानें त्यांची फारशी पर्वा मानिली नाहीं. आपणाशीं विरोध केल्याबद्दल या शेणवी मंडळास आपण चांगलाच हात दाखविला आहे त्या अर्थी बायांच्या बाबतींत हे लोक आपल्या इच्छेविरुद्ध लुडबुड करण्यास पुनः धजणार नाहींत अशीच त्याची समजूत झाली व तो बाया प्रकरणांत अधिकच बेपर्वाईनें वागूं लागला. बक्षी सुटून येण्याच्या सुमारास त्यानें बायांच्या ममतेंतले जुने मुत्सद्दी रायाजी पाटील व रामजी पाटील व मीरजी बावीकर व रामजी कुवर यांची शिंद्यां-करवीं अप्रतिष्ठा करवून त्यांस लष्कराबाहेर हांकून लाविलें.

पुण्यांतल्या लोकांपासून पैका वसूल करण्याविषयीं सर्जे-रावास परवानगी देतांना तो लोकांस इतक्या क्रूरतेनें वागवील अगर आपणाशीं इतक्या बेमुरवतपणानें वागेल, असें बाजीराव साहेबांस मुळींच वाटलें नव्हतें. परंतु ही परवानगी दिल्याबद्दल आतां गंगाधरपंत भानु वगैरे ब्राह्मणांचे प्राण घेतल्याचें अपेश श्रीमंतांकडे पर्यायानें येऊं लागलें व चोहोंकडे

त्यांच्या नांवाची छीथू होऊं लागली. सर्जेरावाच्या बेताल वागणुकीला श्रीमंत कंटाळलेच होते. त्यांत पूर्वी कोणत्याही पेशव्यांच्या कारकीर्दींत न घडलेले अनन्वित प्रकार आपल्यादेखत आपल्याच राजधानींत आपल्या संमतीनें घडून आले, ही गोष्ट त्यांच्या मनास फारच लागली. त्यानीं घाटग्याची जबरदस्ती कोणत्याही उपायानें बंद केलीच पाहिजे असा निर्धार केला. इतक्यांत एके दिवशीं तोफखान्याचे दरोगे पानशे यांचा मुलगा यशवंतराव हा नानांच्या वाड्यावरून सरकारवाड्यांत जात असतां वाटेंत घाटग्याच्या लोकानीं त्याचा घोडा हिसकून घेऊन त्यास पहाऱ्यांत बसविलें. तें वर्तमान पानशे यांस कळतांच त्यानीं गारदी व तोफा तयार करून नानाच्या वाड्यावर चालून घेतलें. तेव्हां श्रीमंतानीं मध्यें पडून तुमचा मुलगा सोडवून तुमच्या हवालीं करितों, तुम्हीं परत जावें, असें पानशे यांस आश्वासन दिलें व मोठ्या प्रयत्नानें त्यांस परत फिरविलें. नंतर श्रीमंतानीं आबा काळे याच्या पलटणांस आज्ञा दिली कीं, पानशांचा मूल घाटग्याचे लोक हवालीं न करतील तर तोफा लावून वाड्याचा विध्वंस करावा ! त्याप्रमाणें पलटणच्या लोकानीं नानाच्या वाड्याभोंवतीं गराडा घालून तोफा रोंखिल्या. हें प्रकरण इतक्या पल्ल्यावर आलें तेव्हां घाटग्याच्या लोकांस भय उत्पन्न होऊन त्यानीं पानशांचा मुलगा सोडून दिला.

बाजीरावांची घाटग्याविषयीं अशी करडी नजर झालेली पहातांच दौलतराव यांच्या मनांत त्यांविषयीं काळेंबेरें येऊं लागलें व ती वृत्ति विकोपास जाण्यास आणखीही कारणें होत गेलीं.

एके दिवशीं दौलतराव शिंदे सरकारवाड्यांत येऊन श्रीमंतांस म्हणूं लागले कीं, आम्हांस पैक्याची फार नड आहे. काळे व पिंगळे व बाबा फडके यांस आमच्या हवालीं करावें. कळेल त्या रीतीनें आम्ही त्यांपासून द्रव्य वसूल करितों व आमची नड भाग-

वितों ! त्यावर या लोकांस तुमच्या हातीं देत नाहीं असें श्रीमंतानीं सांगितलें, तेव्हां दौलतराव रागानें निघून गेले. शिंद्यानें जबरदस्ती केल्यास या लोकांचा बचाव आपल्या हातून होणार नाहीं असें समजून श्रीमंतानीं फडके वगैरे आपल्या ममतेंतील लोकांस पुणें सोडून जाण्याविषयीं हळूच सूचना दिली. त्याप्रमाणें ते लोक निघून जाऊं लागतांच पुण्यांतल्या सर्वच लोकांचा धीर सुटून पळापळीस सुरुवात झाली ! वांईपर्यंत भाड्याच्या तट्टास दहा व डोलीस पंचवीस रुपये पडूं लागले ! ही धामधूम पहातांच सर्जेरावानें शहराभोंवतीं चौक्या बसविल्या व पळणाऱ्या लोकांस पकडून त्यांच्या कंठाळा वगैरे अजबाब हिसकून घेऊन त्यांस गांवांत परत हांकून लाविलें.

आतां तर शिंदे व पेशवे यांमधला बेबनाव उघडा झाला ! श्रीमंतानीं दोन चार हजार शिलेदार गोळा केले आणि त्या वेळीं अमृतरावांचा मुक्काम भीमातीरीं होता त्यांस परत येण्याविषयीं सांगून पाठविलें. शिंद्याची फौज आपणास घेरण्याकरितां येईल तर आबाकाळे याचीं पलटणें व मालोजी घोरपडे वगैरे सरदार यांच्या बळावर शिंद्याच्या फौजेस धुडकावून लावावें व शहरांतून निघून अमृतरावांस जाऊन मिळावें असा बाजीरावांचा बेत ठरला होता. इतक्यांत आणखी एक विलक्षण प्रकार घडून आला व त्यामुळें सर्जेरावाची नाचक्की करण्याची व दौलतरावांचा पाणउतारा करण्याची श्रीमंतांस आयतीच चांगली संधी मिळाली ! तो प्रकार एका पत्रांत वर्णिला आहे तो असा कीं " विदुराकडील कारभारी याणीं गांवांत मनस्वी उपद्रव करून कोणास मानीत नव्हते. आज आठ रोज जाहले. घाटगे नानाच्या वाड्यांत होते त्यांजकडील दाजी देशमुख व काळोजी नांगरस (तेथेंच) होते. त्यांजपाशीं वै॥ शु० १५ स रात्रीं पुरंदरे यांजकडील दासीपुत्र याणें जाऊन उभयतां यजमान (बाजीराव व चिमाजी आपा) निघून गेले म्हणून बातमी सांगितली ! त्याचा शोध न करितां त्याणीं लष्करांत चिठी पाठविली त्यावरून

विदुर घाबरे होऊन सारे लष्करची तयारी करून वाटोवाट फौजेची रवानगी करून पुण्याच्या बंदोबस्ताचा उद्योग आरंभिला. तें समजल्यावर यजमानानीं शहरचा बंदोबस्त नाकेबंदीसुद्धां केला होता. प्रातःकाळ जाहला. त्याजवर विदुर यांस वर्तमान खोटेसें समजल्यावर आपले जागां फार बजीद होऊन नांगरस यास धरावयासीं स्वांर पाठविले तों नांगरस पळोन गेला. दाजी देशमुख यास नेला. बेअब्रू करणार होते. परंतु घाटगे व गाढवे याणीं पदर पसरून राहविलें. पुरंदरे यांजकडील दासीपुत्रास तोफेचे तोंडीं दिला. तों दोन घटका दिवस आला. नंतर श्रीमंतांकडे कारभारी बोलावयासीं पाठवितों म्हणून चिठी पाठविली. त्याचें उत्तर उदासपणाचें गेलें. त्याजवर बारा घटका दिवसास घाटगे व गाढवे बोलावयासीं आले. त्यांस बुधवारचावडीपाशीं 'सरंजामसुद्धां जाऊं द्यावयाची आज्ञा नाहीं' म्हणोन सांगोन चौकीदार याणीं अडविलें. श्रीमंतांची परवानगी आणून सडे मात्र गेल्यावर त्यांजपाशीं उदासपणाचेच व्यवहार बोलण्यांत येऊन कांहीं जरबेचेही आले. त्याजवर 'आम्हांपासून गोष्ट गेली. क्षमा करावी.' अशा अन्वयें त्याणीं विनंती केली. परंतु रूक्षताच त्यांचे दृष्टीस पडली. ते बजीद होऊन गेले. दुसरे दिवशीं घाटगे यांचे घरीं (म्हणजे नानांच्या वाड्यांत) विदुर यांसीं मेजवानी जाहली. तेथून (सरकारच्या) वाड्यांत जावयाचा बेत होता. परंतु यजमानानीं रूक्षतेनेंच 'आज दिवस वाईट आहे, याजकरितां येऊं नये' असें सांगून पाठविलें. त्याजवरून बजीद होऊन ही गोष्ट मनास लागून डेऱ्यास गेल्यावर आज चार रोज जाहले, सफाईचें बोलणें लाविलें. त्याजवरून काल विदुर वाड्यांत दर्शनास आले होते. यजमानानीं सावधतेनें वाड्यांत चार हजार लोक बसविले होते. दिल्ली दरवाजाजवळ आल्यावर सरकार–आज्ञा सांगून पाठविली कीं,, 'सरंजामानिशीं येऊं नये. दोनशें माणसांनिशीं

यावें. त्याजवरून विदुर दरवाजांत उभे राहून सारे लोक बाहेर ठेवून दोनशेंनिशीं गेले. गेल्यावर बहुत प्रकारें क्षमा होण्याची विनंती केली. त्याजवर ' जाली गोष्ट हे बरीच जाहली. इत:पर येथील कारभारांत अक्षर विदुर याणीं बोलूं नये व उपद्रव करूं नये. सरकार आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून मागील कायद्याप्रमाणें असावें (असें बाजीराव बोलले). शिंदे हिंदुस्थानांत परत जाण्याविषयीं निरोप मागत होते. परंतु ' करवीरकर यांचें व नबाब यांचें पारिपत्य जाल्याखेरीज निरोप होत नाहीं म्हणून आज्ञा जाली. त्याजवरून रहावें असें ठरून परस्पर शपथा होऊन निखालसता होऊन विदुर डेऱ्यास गेले. आंतून यजमान सावधतेनेंच आहेत. नेहमीं वाड्यांत भले लोक बसलेलेच असतात व विदुर आला होता त्यादिवशीं तीन हजार खासा बसविला होता. विदुरासही समजलें कीं, अत:पर यांसीं वांकडी गोष्ट केली असतां परिणाम नाहीं, जाणून तेही नम्रभावें वर्ततात. "

या सुमारास साताऱ्याच्या महाराजांचा दंगा सुरू झाला होता व तो मोडण्यासाठीं श्रीमंतानीं माधवराव रास्ते यांस साताऱ्यास पाठविलें होतें. त्या प्रकरणीं महाराजांकडील कारकुनानीं श्रीमंतांकडे येऊन आपले जाबसाल बोलून घ्यावे तें न करितां ते आधीं शिंद्यांकडे गेले. सर्जेराव घाटग्यानें त्या लोकांस श्रीमंतांकडे आणून त्यांचें बोलणें विल्हेस लावावें तेंही केलें नाहीं ! तो स्वतःच्या मुखत्यारीवरच महाराजांशीं राजकारण ढवळूं लागला ! शिंद्यांशीं श्रीमंतांचें विरुद्ध वाढण्यास हेंही एक बलवत्तर कारण झालें होतें. या प्रसंगीं सर्जेरावानें विचार पाहिला कीं बक्षी वगैरे शेणवी तेजोभंग पावून नरम झाले, रायाजी पाटील वगैरे जुने कारभारी हद्दपार झाले, पुण्याच्या लोकांपासून द्रव्य उकळून फौजेच्या देण्याचा थोडा बहुत निकाल आपण केला असल्यामुळें तिला कुरकुर करण्यास जागा राहिली नाहीं, नाना फडनवीसही नगर-

च्या किल्ल्यांत अडकून पडले, यावेळीं दौलतरावानीं बायांचा बंदोबस्त आपल्या मनाजोगा पक्केपणाचा केला तर त्यांस नको म्हणणारें कोणी राहिलें नाहीं. शिवाय श्रीमंतांच्या मनांत शिंद्यां-विषयीं वितुष्ट आलें आहे त्याअर्थीं त्यानीं बायांची उठावणी कर-ण्याविषयीं कांहीं खटपट केली तर पुढें मसलत फार जड जाईल. याकरितां बायांचें लचांड येथून काढून लावण्याची वेळ हीच होय. असा विचार करून व दौलतरावांचा रुकार मिळवून त्यानें बायांच्या रवानगीची तयारी केली. परंतु त्या बायांस सर्जेरावाचा बिलकुल विश्वास नसल्यामुळें त्या आपली चीजवस्त जवाहीर वगैरे घेतल्याखेरीज व सुरक्षितपणाबद्दल श्रीमंतांची हमी मिळविल्या-खेरीज जाग्यावरून हालेनात! तेव्हां ज्येष्ठ शु० १ ता० १६ मे या दिवशीं सर्जेरावानें बायांस जबरदस्तीनें पालख्यांत बसवून त्यांची रवानगी केली. त्यानीं निघतांना मनस्वी आकांत केला तरी त्यास न जुमानतां त्या नरपशूनें त्यांस मारझोड करून पालख्यांत नेऊन कोंबलें! महादजी शिंद्यांच्या बायकांवर सर्जे-रावानें केलेला हा जुलूम त्या शिंदेशाही फौजेच्या मनास झोंबल्या-शिवाय राहिला नाहीं. मात्र तिनें त्यावेळीं कांहीं एक गलबल केली नाहीं. बायांस नेण्याच्या कामावर कांहीं पलटणें व पागांचा जुजबी सरंजाम नेमिलेला होता. जरी त्या बायांची ब्ऱ्हाणपुरास रवानगी झाल्याचा पुकारा करण्यांत आला होता, तरी पलटण-वाल्यांस आंतून दौलतरावाचा हुकूम असा होता कीं, बायांस अहमदनगरास नेऊन तेथील किल्ल्यावर अडकवून टाकावें! ती कुणकुण नारायणराव बक्षी व यशवंतराव शिवाजी व देवजी गौळी व मुशाफरखान पठाण वगैरे सरदारांस कळल्यावरून त्यानीं आपा-पली फौज तयार केली आणि बायांच्या पाठोपाठ जाऊन पलटणां-वर हल्ला करून बायांस सोडविलें. अर्थात् आतां हें बायांचें नवीनच बंड उपस्थित होऊन शिंद्यांच्या दौलतींत दुफळी झाली. बायांच्या

बाजूस वर सांगितलेले बक्षी वगैरे सरदार व बहुतेक घोडदळ मिळालें. दौलतरावाच्या बाजूस घाटगे, गाढवे वगैरे किरकोळ सरदार आणि कवाइती पलटणें राहिलीं. बायांच्या आसपास अमृतरावांचा मुक्काम होताच. त्यानीं तत्काळ अमृतरावांकडे जाऊन त्यांचा आश्रय संपादन केला व त्यांच्या द्वारें बाजीराव साहेबांशीं बोलणें लाविलें कीं, दौलतरावाची दौलत त्याजकडून काढून आम्ही नवीन दत्तक घेतों त्यास द्यावी व दौलतरावास पदच्युत करावें. शिंदे व घाटगे यांवर जरब बसविण्याच्या कामीं हें एक आपणास मोठेंच अस्त्र सांपडलें असें समजून श्रीमंतानींही बायांचें बोलणें मनावर घेण्याचें ढोंग माजविलें. तेव्हां श्रीमंतांस घाबरें करण्याकरितां शिंदे व सर्जेराव यानीं साताऱ्याच्या महाराजांस चिथावून दिलें !

सातारकर महाराजांचा दंगा आतां अनावर होत चालला होता व तो मोडण्याच्या कारभारांत श्रीमंतानीं जरी माधवराव रास्ते यांस घातलें होतें तरी रास्त्यांची कुमक करण्याचें साधन त्यांजवळ कांहींच राहिलें नव्हतें. अशी विकट परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें परशुराम भाऊंची मुक्तता होण्याचा योग आपोआप जमून आला. सातारकर महाराजांचा दंगा क्रमाक्रमानें कसा बळावत गेला व परशुरामभाऊनीं त्या दंग्याचा बंदोबस्त कसा केला हें विवेचन पुढील प्रकरणीं करण्यांत येईल.

नं. ४१२७   श्री

विज्ञापना. दैत्यगुरुवासरपावेतों कुशल आहे. शिखानष्टाबरोबर चिठी आली ती पावली. " घरचा प्रकार कळतच आहे ! श्री बुद्धि

---

१ बाबा काळे याचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. हें एप्रिल स. १७९७ मध्यें लिहिलेलें असून त्या महिन्यांतल्या पत्रांत घालावयाचें चुकून राहिलें सबब येथें घातलें आहे.

देईल त्याप्रमाणें करितील. " म्हणोन लिहिलें तें खरेंच आहे. हे दिवस कोण! अशा प्रसंगीं कशी वर्तणूक करावी हें ज्यांस समजेना त्यांस काय म्हणावें ? तेव्हां ईश्वरेच्छा इतकेंच समजून असणें प्राप्त आहे. परंतु कोणती गोष्ट सामदानभेदेंकरून रक्षावी. इतकेनें रक्षण होईना तर दंड अवसान धरून योजावा, म्हणजे आपेआप समजतात. चंद्र शीतळ म्हणून त्यास राहु उपद्रव बहुत करितो. तोच गभस्ति तीव्र म्हणून त्यास पीडा नाहीं. यांत सर्व आहे. पर्जन्य नाहीं म्हणून सुचविलें, त्यास इकडेही तसेंच आहे. एक वायु मात्र सुटला आहे. वळींव सुद्धां आजपर्यंत कांहीं नाहीं, तेव्हां एक पावसाचा तरी कां सुभत्ता व्हावा ? असो. सर्व संकटेंच आहेत त्यांतच हें एक! आज पांच सहा दिवस जाले—राजश्री गोविंदराव पिंगळे यांस श्रीमंत बाजीरावसाहेब याणीं बोलावून नेऊन पुसिलें कीं, " पटवर्धन हरामखोर. आम्हासीं कृत्रिम भाऊनीं केलें आणि कैा दादासाहेबांसीं गोपाळराव याणीं केलें. मागें पुणें जाळिलें. इत्यादिक अपराध पटवर्धनांपासोन घडले आहेत. तेव्हां पटवर्धन यांजकडे सरंजाम अथवा मिरज ठेवावयाची नाहीं. त्यास मिरज हातास कशी येईल ? सोईनें त्यांणीं हवालीं केलियास उत्तम. जर लढाईस प्रवृत्त जाले तर खर्च काय बसेल हें राजश्री नानांच्या कानावर घालून कळवा; " असें सांगितलें. तेव्हां गोविंदराव याणीं उत्तर केलें कीं, आज्ञेप्रमाणें नानांस पुसोन विनंती करीन. परंतु याचें कारण काय ? तेव्हां उत्तर जालें कीं, " भाऊमुळें त्यांचें पारिपत्य; असें नाहीं. पटवर्धन यांचें कुळच पहिल्यापासोन खोटें आहे. आमच्या वडिलांशीं बद्धकटाक्ष पटवर्धनांचा. सबब त्यांजकडे कांहीं एक ठेवावयाचें नाहीं. " हें सर्व वर्तमान पिंगळे याणीं कारभारी यांस समजाविलें. तेव्हां नानानीं बहुत विस्मय केला. " श्रीमंतांस काय म्हणावें ? मिरज (हातास) येते कशी ? एक भाऊ पेचांत आले म्हणजे काय जालें ? बाकीचे पटवर्धनांचें नकल जाहलें

कीं काय ? कोट्यावधि रुपये खर्च करून कार्य साधेल न साधेल ! " ऐसा विस्मय करीत बसले. " मुख्यांस ज्ञान नाहीं, " हेंही म्हणत बसले होते. इतक्यांत आनंदराव रास्ते यांचे हेजीब कृष्णाजीपंत ढेंकणे यांस बोलावून नानानीं हें सर्व साद्यंत वर्तमान त्यांस सांगितलें. " हें सर्व जाऊन तुम्ही आनंदरावदादास सांगावें, " असें नानानीं सांगितलें. तेव्हां कृष्णाजीपंत ढेंकणे याणीं नानांस उत्तर केलें कीं, "चिंतोपंत लिमये आमचेपाशीं होते त्यांस आणावयाचें त्या समयीं श्रीमंतांस शिकवून जबरदस्तीनें नेलें. तैसेंच हें शिकवून सर्वस्व बुडवावयाचें आहे कीं काय ! बरें हें एक, आणि ज्या समयीं तुम्ही घरच मागाल तर नंतर जगून तरी भीक मागावयाची आहे कीं काय ? तेव्हां ही गोष्ट कशी घडेल ? " म्हणोन ढेंकणे याणीं बरें लावून उत्तर केलें. तेव्हां नाना बोलले कीं, " आमचे मतें कांहीं करावयाचें नाहीं. श्रीमंत थोर आहेत ! मनस्वी बकवा करितात ! त्यांणीं नको म्हणावें, परंतु तुम्ही हें वर्तमान आनंदरावदादांस कळविणें आणि बारकाईनें तिकडे (मिरजेस) सूचना करविणें. कोणतेंही होणें नाहीं. खर्चास पैसा नाहीं, परंतु मनस्वी बकवा करितात ! अशा धनीपणानें कसा शेवट लागेल ! " ऐसें नाना म्हणत होते. सर्व वर्तमान काल माझे बिन्हाडीं राा ढेंकणे याणीं येऊन साद्यंत वर्तमान सांगितलें. आणि त्यांनीं मला सुचविलें कीं, ही गोष्ट मी कळविली असें प्रकटांत न यावें. मी त्यांस सांगितलें कीं, तुम्ही आम्हांस विश्वासानें सांगितलें, ते आम्ही तुमचे नांव कसें सांगूं ? अशी ढेंकणे यांची खातरजमाही केली. आणि उत्तर सांगितलें कीं, " तुम्ही व कारभारी[१] व यजमान[२] समजाल कीं भाऊ पेचांत आले, याजउपरी पाहिजे तें करूं ! " तर हें सर्व एकीकडे ठेवा ! कोणतीही गोष्ट विवेकानें व्हावी. कलह वाढवूं नये. आम्ही सेवक लोक

१ नाना. २ बाजीराव.

याजमुळें सर्व लौकीकही एकीकडे ठेवून जप्तीवाला आला आहे त्याची अडचण सोसतों. कशासाठीं कीं, कोणतीही गोष्ट समजून व्हावी. तें सर्व एकीकडे राहून किल्ला घेऊन तुम्ही भिक्षा मागा म्हटल्यास मग सर्व समजेल ! किल्याचे दरवाजे जप्तीवाले याणीं मना करावे कीं काय ? परंतु खातरजमा असूं या कीं, एक मिरजेच्या पायीं बहुतांची आंत बाहेरच्यांचीं डोचकीं बांधिलीं आहेत ! जे समयीं भाऊ कैद जाले ते समयीं सर्वांनीं अंगास राख लाविली आहे, ऐसें स्पष्ट समजावें. याजविशीं एकांतीं नानांसही विनंती करणें'' कीं, शेवटीं ते असेंही म्हणतील. याप्रमाणें तुम्ही बोलावें; म्हणून ढेंकणे यांजपाशीं बोललों. वडिलांस सुचवावेंकरितां लिहिलें आहे. त्यास इतक्यानें डगावें असें नाहीं. कोणतेंही बोलले म्हणजे शेवटास जातें असें नाहीं. या संमतांत शिंदे व नाना मिळणार नाहींत. परंतु कोणतेही गोष्टीची हुशारी गुप्तरूपें असावी. हे विज्ञापना.

नं. ४१२८ श्री (पौष – जानेवारी.)

गंगाधरपंत भानु, पिंगळे, देशमुख, बळवंत बाबूराव, निजसुरे, चक्रदेव वगैरे मंडळी बहुत आहे—सर्जेराव घाटगे व गोपाळराव चिटणीस, बाळोजी कुंजर, फकीरजी गाढवे ऐसे मिळोन आमचे वाड्यांत आले होते. अकस्मात् आले. वाड्यांत मी नव्हतों. येऊन पुढला सोपा दिवाणखाना वगैरे पाहून गेले. वाडा पहावयाचें कारण समजत नाहीं. कोणी म्हणतात कीं, '(घाटगे आमच्या) वाड्यांत रहावयास येणार ', याजकरितां स्थळ पहावयास आले होते. ऐसें ऐकण्यांत आहे. येणेंप्रमाणें (वर्तमान) आहे. दोन चार वाडे पाहून गेले. पुढें कोणचे वाड्यांत रहातात न कळे. वडीलांस कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. म्हैसूरकर[3] बहुत थोर आहे ! त्याचें थोरपण दुसऱ्यास यावयाचें

---

१ ही ज्याची पुरवणी तें मूळपत्र सांपडलें नाहीं. २ ज्यांपासून दंड वसूल करण्याचें सरकारांतून ठरलें आहे अशा लोकांच्या यादींत. ३ जनार्दन शिवाजी.

नाहीं. ज्याचे घरीं राहतील त्याचे घरचे वांसे मोजतील. यांत अंतर पडल्यास त्याचे जातीस वाट लागेल ! पेशजी मशारनिल्हेकडील उंट वगैरे मशारनिल्हेकडे आहे, तर त्याजविषयीं विनंती लिहिलीच होती त्याजवरून विदित जाहलेंच असेल. मशारनिल्हे पुण्यांतील एका गृहस्थाबरोबर देखील नीट नाहीं. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१२९ (पौष व० ४--६ जाने.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस रवाना छ० १८ रजब. समान तिसैन.-

" यशवंतराव घाटगे व उदाजी चव्हाण व बच्याजीपंत याणीं गड तालुका व पेठ तालुका यांपासून घासदाणा घेतला. कडलूर बेळगांवकरांचा गांव लुटून गढींतील प्यादे धरून नेले. उचगांव वगैरे दोन चार गांव लुटले. पेठ तालुक्यांपैकीं हनगनूर व आगसंगें व आळमगें व कदेगनूर व कुरेहाळ व कटनबावी इतके गांव जाळून फस्त केले. "

नं. ४१३० (पौष व. १०--११ जाने.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० २३ रज्जब—

"श्रीमन्महाराज गोकाकेस आले. हिंमतबहाद्दर व यशवंतराव घाटगे आधींच आले होते. गोकाकेचें ठाणें मागतात. घासदाणा नको म्हणतात. शहापूरचें ही ठाणें द्यावें म्हणून त्यानीं बोलणें लाविलें आहे. ",

नं. ४१३१ श्री. (पौष व० ११--१२ जानेवारी.)

पै॥ छ० २६ रजब. सन समानतिसैन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक रामाजी अनंत. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २४ रजब पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. गोकाकेहून बातमीचे गडी आतांच आले. त्यांचें वर्तमान करवीरकरांची फौज गोकाकेस कोसाचे अंतरें अडीबेटी पारनहट्टीवर आहे. गुरुवार पेठ घेतली. पेठेंतील दुकानें व घरें कांहीं जाळलीं. व कांहीं उकलोन लांकडें घेऊन गेले. रविवारपेठेंत मोर्चे लागू जाहले. गोकाक गांव भरलेला. एकाएकीं दगा जाहला. पैक्यावर तोड होईल म्हणोन लोक बेफाम होते. शेवटीं लढाईचाच प्रसंग प्राप्त जाहला! तिनी पेठेचे लोक झाडून कबिलेसहित किल्यांत आहेत. हा कालपावेतों किल्यांतील लोकांचा दम बराच आहे. पुढें काय घडतें पहावें. बुणगें बाजार अडीबेटीवर येऊन सडी फौज गुरुवार पेठेनजीक आहे. लष्करांत खुद्द महाराज आहेत. याप्रमाणें वर्तमान गड्यानें सांगितलेवरून सेवेशीं कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१३२ श्री. (पौष व० १२–१३ जानेवारी.)

पै॥ छ० २९ रजब. समानतिसैन. माघ शु॥ प्रतिपदा.

तीर्थस्वरूप[1] राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.–[2]

विज्ञापना. येथील विधि[3] समाप्तीस गेला! याजउपरी श्रीमंतांच्या राज्याचा आळा गेला! जो जबरदस्त त्याचे पागोटें वांचेल. तासगांवावर आपले कडील स्वारांची (शिंद्याच्या लोकांशीं) मारामारी जाहली असें ती॥ राजश्री आपासाहेबांनीं लिहिलें होतें, त्यास कलागत करों नये. शिंदे तूर्त प्रबळ आहेत. विचारेंकरून घडेल तें उपयोगी आहे. शिंदे यांचें सैन्यांत सहस्रबुद्धे आहेत, त्यांस पत्रें पाठवावीं कीं, ती॥ राजश्री भाऊसाहेब प्रकर्णीं बोलणें परिछिन्न बोलूं नये. मीही त्यांस दोन चार वेळां सांगितलें, परंतु त्यांचे विचारांत येत नाहीं.

---

१ फडणीस परगणे तेरदाळ. २ बाबा काळे याचें पत्र पुण्याहून मिरेजस. ३ नानास कैद करण्याचा.

तूर्त येथें आपलेकडील वकील कोणी नाहींत. राजश्री जनार्दनपंत भाऊ म्हैसकरही तूर्त तोंड चुकवून आहेत. त्यास राजश्री दाजीबा म्हैसकर अथवा दुसरा कोणी शहाणा विश्वासू पाठवावा. नाहीं तर तूर्त श्रीमंत आपले स्वसत्तेंत वर्ततात, तेव्हां आपलेकडील बोलणार असावा हें ठीक आहे. आजपर्यंतची गोष्टी निराळी होती. आतांचा मार्ग एक प्रकारचा आहे. वडील सर्वजाण आहेत; परंतु याजउपरी वडिलीं चार लोक जाजती बाळगून आपले जागीं बहुत सावध असावें. येथें ती॥ राजश्री जिवाजीपंत अण्णा आहेत त्यांचा मजकूर सर्व ती॥ राजश्री आप्पासाहेबांस लिहिला आहे. वडिलीं मनन करावा. आणि याची पैरवी व्हावी. आणि माझेविषयीं आपल्यास बहुत बहुता प्रकारें लिहितील तें ध्यानांत आणूं नये. आपण आणींत नाहींत ही माझी खातरी आहेच, परंतु सुचवितों. येथून लिहिणारे लिहितात त्याजमुळें संशय येत असेल. आतां अण्णा माझेकडे येतात, वर्तमान सर्व कळवितात, तेव्हां दुसऱ्याचे चित्तीं संशय येतो, आणि आपणांस लिहितात; त्यास इलाज नाहीं. सविस्तर मागाहून लिहितों. रवाना मंदवार. हे विज्ञापना.

नं. ४१३३ (पौष व. १२-१३ जाने.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० २५ रज्जब—

"छत्रपतींचा मुक्काम गोकाकेवरी आहे. तोफा बाहेर तीन आहेत. आंत दोन आहेत. गोकाककर देसायाचे चारशें काटक येऊन त्यानीं परवां छापा घालून मोर्चे उधळले. महाराजानीं नवलगुंद तालुका तोरगलकरांस दिला."

नं ४१३४ (पौष व० १३-१४ जाने.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० २६ रज्जब—

" महाराजानीं गोकाकेचें ठाणें घेतलें. शहापुरकरांसही बोलतात कीं, घासदाणा नको. ठाणें देणें. "

नं. ४१३५ (माघ शु. २-१९ जाने.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० १ साबान—

" महाराजानीं गोकाकेंत गुळें भरलें होतें त्यापासून दोन लाख रुपये घेतले व गांवापासून दोन लाख घेतले. पातशहापुरकरांपासून तेरा हजार रुपये घेतले. शिवाय दरबारखर्च ! "

नं. ४१३६ (माघ शु. ३-२० जाने.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ. २ साबान.-

" श्रीमन्महाराज गोकाकेहून कूच करून वण्णूर, प्रांत कित्तूर, येथें गेले. तें ठाणें तेच दिवशीं घेतलें. "

नं. ४१३७ श्री. (२० जानेवारी.)

पै॥ छ० २१ साबान. सन समानतिसैन. माघ.

सेवेसीं धोंडो बापूजी जोशी व मोरो आपाजी परांजपे दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत माघ शु ॥३ मंदवार पुणें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्रें फिरंगू जासूद व खिजमतगार यांजबरोबर श्रीमंतांचीं वगैरे पत्रें पाठविलीं. श्रीमंताचीं पत्रें राजश्री आपाजीराम सहस्रबुद्धे याणीं प्रविष्ट केलीं. राजश्री दौलतराव शिंदे यांचीं पत्रें राजश्री भास्करपंत याणीं प्रविष्ट करून पत्राचे जाब घेऊन हल्लीं पाठविले आहेत. सरकारचीं पत्रें आलीं त्यांचे जाबसालास एकदोन दिवस लागतील. याजकरितां- जासुदांची रवानगी भास्करपंतानीं केली आहे. इकडील राजकी मजकूर तरी एक तऱ्हेचा जाला आहे. पैसा सरकारांत नाहीं. राजश्री शिंदे यांजकडील जबरदस्ती बहुत. कांहीं एक चालत नाहीं. ईश्वर

इच्छा प्रमाण ! श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांजविषयीं बोलणें सरकारांत रास्ते बोलत आहेत. बोलणेंही ठरलें असें लौकिकांत आहे. दौलतीमध्यें हांक मारावयास माणूस नाहीं, असें श्रीमंत म्हणतात. श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब यांचे चित्तांत भाऊसाहेब यांजविषयीं कांहीं एक नाहीं. व आपासाहेब यांचेही चित्तांत नाहीं. किंचित् रोष श्री ॥ राजश्री बाजीराव साहेब यांचा आहे तोही जाईल. लौकर कार्य होईल असें आहे. मागाहून सविस्तर विनंती लिहीन. सरकार वाड्यांत गृहस्थ ठविले आहेत त्यांस अद्याप बाहेर येण्यास आज्ञा नाहीं. राजश्री जनार्दन शिवाजी म्हैसकर राजश्री जनार्दनपंत कात्रे याचे गुजारतीनें सरकारांत भेटले. जिवाजी रामचंद्र राजश्री बाळाजीपंत पटवर्धन—दिनकर पंताचे बंधु—यांचे घरीं बिऱ्हाडीं राहिले. पत्रें श्रीमंत राजश्री आपासाहेब यांस पुणेंस येणेंविषयीं (सरकारांतून) लिहिलीं होतीं. तीं पत्रें तूर्त राहिलीं. रवाना होत नाहीं. मागाहून लिहितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१३८

(माघ शु. ५–२२ जाने.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० ४ साबान.

“ कित्तूरकर देसाई याणीं श्रीमन्महाराजांसीं संधान लावून दोन लाख रुपये द्यावे आणि हुबळी संगोली वगैरे ठाणीं घालून द्यावीं असा करार करून फौजसुद्धां कित्तूर प्रातीं आले. महाराजांची व देसायांची भेट नागनुरास जाली. हुबळीचें ठाणें देसायानें महाराजांचे नांवें घेतलें तेथील ऐवज देण्याविषयीं तो अनमान करूं लागला, तेव्हां त्याचीं चार पांच खेडीं महाराजानीं जाळिलीं. हुबळीचा वसूल तडका चालला आहे. मारहाण करण्यांत बाकी ठेविली नाहीं ! ”

१ चिंतामणराव पांडुरंग यांस.

नं. ४१३९ (माघ शु ७–२४ जाने.)
देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ. ६ साबान.–

"कित्तूरकरानीं महाराजांस हुबळीबद्दल एक लक्ष सत्तर हजार रुपये द्यावे असें ठरलें. पैकीं तूर्त ५० हजार, चार दिवसानीं ५० हजार द्यावे', एक महिन्यांत बाकीचे सत्तर हजार रुपये द्यावे, तेथपर्यंत हुबळी व संगोली व वण्णूर हीं तीन ठाणीं महाराजानीं आपल्या ताब्यांत ठेवावीं, असें ठरलें. त्याप्रमाणें तिनी ठाण्यांत महाराजानीं लोक घालून बाकी प्रांत कित्तूरकराचे हवालीं केला. हिंमतबहाद्दर यांचें पथक खानापुरावर गेलें आहे. तें ठाणें सर करून येणार. राजाज्ञा व सरसुभे यांचा जाबसाल ५० हजारांवर ठरला."

नं. ४१४० श्री. (माघ शु० ७–२४ जानेवारी)

पै ॥ छ०–१० साबान. समान तिसैन. माघ.

सेवेसीं नारो हरी करंदीकर दोनी कर जोडून शिरसा ॥ नमस्कार विनंती विज्ञापना ता ॥ छ० ६ साबान पावेतों मु॥ लष्कर[1] नजीक हुबळी यथास्थित असे. विशेष. श्री ॥ रा॥ भाऊसाहेब यांचें येणें पुण्यास जालें असें वर्तमान कोणी सांगतो. बोलावणें गेलें असेंही ऐकतों सत्य मिथ्या कांहीं कळत नाही, यास्तव सेवेसीं विनंती लिहिली आहे. तरी पुण्यास आले, अगर बोलावणें गेलें, काय वर्तमान असेल तें कळवावयाची आज्ञा व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ४१४१ (माघ शु. ९–२६ जाने.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० ८ साबान.

---

१ लष्कर करवीरकरांचें. २ परशुरामभाऊ कैदेंत आहेत तेथें त्यांस सरकारांतून बोलावणें.

" महाराज हुबळीहून कूच करून मुरगोडच्या बारीनें करवीरास येण्यास परतले तों रत्नाकरपंत आपांची व सरसुभ्यांची जुनें हुबळीवर लढाई जाली. महाराजांस लवकर यावें म्हणोन निरोप आल्यावरून तिकडे गेले.[१] "

नं. ४१४२ श्री. (माघ शु० ९-२६ जाने.)

श्रीमंत रा॥ बाळासाहेब स्वामीचे सेवेसीं.

विनंती सेवेशीं बाबूराव बहिरव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० ८ साबानपर्यंत स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान राजमंडळकरांकडील स्वांर दोन हजार व पायदळ हजारपर्यंत करवीराहून मुतनहाळावर येऊन उतरले आहेत. शहापुराहून आठ कोस मुतनहाळ आहे. परगणे मजकुरावर चौथाई सेनाखासकील तोरगलकर याचे ऐवजाकरितां निमित्त करून स्वारी करणार म्हणोन वर्तमान आलें आहे. सविस्तर राजश्री देवराव देशपांडे निवेदन करितील त्याजवरून श्रुत होईल. आज्ञा करणें ते करावी. मनोळीहून जमाव येऊन मुरगोडाजवळ उतरला आहे. सांबरें तप्पाच्या खेड्यांस व त्यास समीप आहे. चार कोसांवर आहेत. तेही स्वारी करणार आहेत. ज्याप्रमाणें आज्ञा येईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति. स्वामीनीं चौथाईच्या मजकुराविशीं आज्ञापत्र पाठविलें तेंही पावलें. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करितों. हे विज्ञप्ति.

नं. ४१४३ श्री. (२७ जानेवारी.)

पै॥ छ० १४ साबान. समान तिसैन. माघ.

विनंती सेवक बाबूराव राम कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना

---

१ देवराव देशपांडे याचें याच तारखेचें दुसरें पत्र आहे, त्यांत "धोंडोपंत गोखले व बापुजी शिंदे हुबळीकरांच्या कुमकेस येणार आहेत " असा मजकूर आहे.

ता॥ माघ शु॥ १० मंदवारपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. क्षेत्र पंढरपुरीं शिंद्याचें ठाणें आलें आहे येविशीं बाळाजीपंतानीं सेवेशीं लिहिलें आहे त्यावरून निवेदन होईल. रा॥ बाळाजीपंताच्या शरीरीं वायूचा उपद्रव जाहला आहे. विशेष नाहीं. चार दिवस जाले. विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१४४ श्री. (२८ जानेवारी.)

पै॥ छ० १३ साबान. समान तिसैन.

पुरवणी [1]सेवेशीं विज्ञापना ऐसी जे—

मिती माघ शु॥ ११ पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. जकारनाम वाड्यांत येऊन दोन प्रहरांपासून सायंकाळपर्यंत खलबत होत असतें. तेव्हां वल्गना करितात कीं, आमची मसलत सिद्धीस गेली तरी जितके बाळासाहेबांकडील आहेत त्यांचीं डोचकीं फोडतों. किंवा त्यांचेंच जालें तरी ते आमचीं फोडतात. याप्रमाणें बोलणीं चाललीं आहेत. शेवटीं स्वामीचीं पत्रें बाबांस व बाळाजीपंत जोशी यांजला काय येतात हें कळत नाहीं. परंतु बहुत विचारें करून यावीं तरी परिणाम. नाहीं तर ठीक नाहीं. ते सर्वोपरी बोलणीं करितात कीं, भाऊसाहेब सुटले म्हणजे चिंतामणराव उभे जाले. चिंता नाहीं. याप्रमाणें भाषणें होतात. यास्तव विनंती लिहितों. रागास न यावें. ते सोयरे, आम्ही दहा महिन्यांचे चाकर, यास्तव लिहूं नये. त्यांजला वर्तमान कळतें सबब. परंतु त्यांचें (राज्य) जाल्यावर आमचें पारिपत्य अगोदर करणार आहेत. तेव्हां आम्ही विठलराव बापूस साफ उत्तर केलें कीं, आम्हांस चाकरीची दरकार नाहीं. हरकोठें दुसरी पाहून घेऊं. याप्रमाणें बोलणींही जाहलीं आहेत. सर्वत्र एकच

---

१ तारीख पैवस्तीची आहे.

आहेत. यास्तव विनंती आहे कीं, पत्र विसर्जन करून टाकावें. सेवेशी श्रुत होय, हे विज्ञापना.

नं. ४१४५ श्री. (माघ शु० ११–२८ जानेवारी)

पै॥ छ० १० साबान. समान तिसैन. माघ.

सेवेशीं विज्ञापना. श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति याणीं (मला) बोलावून नेऊन सांगितलें कीं, तूर्त प्रबलता शिंद्याची. श्रीमंतांचा धनीपणा त्याच्या स्वाधीन. रा॥ बालकृष्णपंत भाऊ नानाकडून करवीरास आले ते समयींही त्यांस सांगितलें कीं, परिणाम शुद्ध नाहीं. शिंदे बंदाबस्त करितात, सर्वोपरी विश्वास दाखवून दगलबाजी करितात, हा निश्चय पुर्तेपणीं असावा हें सांगितलें. तुम्ही या मसलतीबद्दल कोट दोन कोट रुपये खर्च करणार तत्राप परिणाम नाहीं. आम्ही या मसलतींत सामील होतों. आम्हांकडे फौज ठेवणें. बदल पंचवीस लक्ष रुपये द्यावे. आम्ही दोन महिन्यांत फौज जमवून येतों. हुजुरात वगैरे सरदार तुमचे लक्षांत आहेत. त्यापेक्षां एकटे शिंदे याणीं काय करणें आहे ? एक महिन्यांत मसलत समेटून देतों. असें कित्येक प्रकारें बोललों. त्यास बालकृष्णपत येथून निरोप घेऊन गेले ते मेजवान्या घेत घेत मिरजेस आले. तेथें आठचार दिवस राहून रा॥ नागोशामजी वगैरे मिळोन मसलती करोन पुण्यास पत्रें लिहिलीं कीं, तिथून फौज पाठवावी. म्हणजे आमचा बंदोबस्त करणार ! अशा मसलतींत शिरोन पंधरा विसावे दिवशीं पुण्यास गेले. ती ही मसलत साधली नाहीं. त्याजवर मशारनिल्हेजवळ मजकूर सांगितलेला पत्रीं व हुजरे मुद्दाम पाठवून कळविला. परंतु नानाच्या ध्यानांत भरला नाहीं. त्याचा परिणाम या प्रकारचा घडला. अमृतराव कारभार करूं लागले त्यापेक्षां तुमचे यजमानांचा परिणाम ठीक दिसत नाहीं.... ... सांगितलें. हल्लीं तुम्ही सडे यावें म्हणून खिजमतगार आले आहेत. त्यास खांद्यावर धोतर टाकून बसलेनें ठीक नव्हे. मागें कोळ्यानीं

---

१ करवीरकर महाराज आपणाजवळ काय काय बोलले तें नारो हरी करंदीकर यानें या पत्रांत बाळासाहेबांस कळविलें आहे.

दंगा मांडिला तेव्हां सरकारांतून फौज पारिपत्याबद्दल रवाना जाली. त्या काळीं त्यानीं डोंगरचा आसरा करून आपले जिवाचा बचाव केला. काल नानाकडील आरब याणीं आपले जुवामर्दीवर आपला बचाव करून निघाले. मागें कै॥ गोपाळराव यांनीं प्रधान पंतांसीं स्पर्धा करून मोंगलाईत जाऊन तिथून उद्योग करून पुणें जाळून पुढेंही मोंगल लुटला ते समयींही पहिलेपेक्षां त्याणीं बंदोबस्त करून घेतला. शिंदे याचे पांच राऊत तुमचे गावांत जातात तेथें हजार दोन हजार रुपये घेतात. तुम्ही कांहीं बोलत नाहीं. व बंदोबस्त करीत नाहीं. येणेंकरून आब जातो. थोर (तुमच्या) पदरीं भाऊ-कडील व तुम्हांकडील मंडळी. पांच चारशें गृहस्थ लहान मोठे पदरीं. त्यापेक्षां संस्थानास एकादा दगा जाहल्यास सर्वस्वें पेंचांत येऊन लौकिकही राहणार नाहीं. पुण्यांतील गृहस्थावर कसा समय आला? हलीं शेलूकर याचा बंधु अनायासें सांपडला. आम्हीं गुदस्त-पासोन वरकड जागा उपद्रव केला तसा तुम्हांकडील प्रांतांत उपद्रव जाला नाहीं. लष्करामुळें थोडाबहुत लागला. उपद्रव परंतु मनःपूर्वक उपद्रव करावा हें आमच्या ध्यानांत नाहीं याजमुळें (तुमचा) बचाव झाला. तुमचे यजमानांचें लक्ष आमचे ठिकाणीं ही खातरजमा जाणून ताकीद करीत असतों. त्यास हा समय कानांत तुळशी घालून रहावयाचा नव्हे. या प्रसंगीं जुवामर्दी-शिवाय बचाव व्हावयाचा नाहीं. येविषयीं कित्येक प्रकारचा मजकूर बोलावयास रा॥ बळवंतराव लेले हे मिरज व कुरुंदवाड या उभयतां-कडीलही माहितगार व त्यांस पुण्याकडीलही सर्व माहितगिरि आहे. त्यांस आपले यजमानांस लिहून आणवावें म्हणजे त्यांजवळ सविस्तर मजकूर बोलूं. त्यांचे येणेंविषयींची दिक्कत घेऊं नये. रा॥ बच्चयाजीपंत याणीही खातरजमा केली आहे. चिंता नाहीं. तुम्हास जाणेंविषयीं सांगितलें होतें त्यावरून तुम्ही (मिरजेस) पत्र लिहिलें

१ मिरजकरांचे.

होतें, त्याचें उत्तरही समर्पक आलें नाहीं. तुमचे यजमानांजवळ आपले चित्तांत दुसरा विचार नाहीं. पेचांत यावयाचा समय, यास्तव सांगावयाचें कारण. आम्हांकडील प्रांत व तुम्हांकडील शीव शेजारीं. या अर्थे शिंद्यासारखा जबरदस्त शिरला म्हणजे तुमचाही गळाठा व आम्हांसही उपद्रव ! व पुण्यासही तुम्ही तूर्त गेलें असतां ठीक नव्हे. असें बोलले. नंतर मी उत्तर केलें कीं, महाराजांनी आज्ञा केल्याअन्वयें विनंती श्रीमंत यजमान स्वामींना +

नं. ४१४६ श्री (माघ शु० ११–२८ जानेवारी)

छ० १० साबान. समान तिसैन. माघ.

[1]सेवेसीं विज्ञापना. शिंदे यांजकडील जमाव तासगावीं आहे त्यांहीं मिरजप्रांतांत दंगा माडिला आहे. दुधगांव व कुपवडें व बांबवडे व आरग व बेडग येथें त्यानीं ठाणीं घातलीं. मिरजेंतील थोर थोर मंडळी कांहीं कांहीं तजावजा जाली अशा नानाप्रकारच्या आवया ऐकतों. त्याजवरून चित्त स्वस्थ नाहीं. त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली आहे तरी ... असेल तें कळवावया ··· होय हे विज्ञापना.

नं. १४४७ श्री. (माघ शु० ११– २८ जानेवारी.)

छ० १० साबान समान तिसैन. माघ.

[2]सेवेसीं विज्ञापना. पुण्याहून रा॥ बाजीपंत याचीं पत्रें आलीं त्यांतील वर्तमान – पुण्याच्या शहरचा बंदोबस्त रा॥ गणेशराव बळवंत यांजकडे सांगितला. श्री॥ राजश्री नाना यांजकडील भोजनाचा वगैरे बंदोबस्त राजश्री आत्मारामपंत यांजकडे आहे त्याणीं परामर्ष करावा. वरकड ऐवजाचे व कारभाराचे बोलण्याची

+ पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें. १ नारो हरी करंदीकर यांचें पत्र करवीराहून. २ पत्र नारो हरी करंदीकर याचें करवीरकरमहाराजांचे लष्करांतून.

माहिती व किल्ले कोट यांजविशींचीं बोलणीं (बोलावयाचीं,) त्यास रा॥ नानांकडे रा॥ यादो भास्कर व बाळाजी त्र्यंकाजी व फकीरजी गाढवे व सखाराम घाटगे जात असतात. परंतु नाना सुदामत सांगतील न सांगतील हा अर्थ ध्यानांत आहे ! श्री ॥ राजश्री मोरोबादादा यांचे चिरंजीवास तेरीख घालणेंविशीं श्रीमतानीं आज्ञा केली त्यावरून त्याणी विनंती केली कीं, " ही आज्ञा वडिलांस व्हावी. वडिलांची आज्ञा मला होईल त्याप्रों वर्तणूक करीन." असें उत्तर जालेनंतर श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब च तेरीख घालितात. तूर्त चालीचे कारभारांत काळे व पिंगळे व त्रिंबकराव परचुरे वाड्यांत जात येत असतात. श्रीमंतांची स्वारी बाहेर निघाली असतां हत्तीवर खवासखान्यांत रा॥ आपा बळवंत बसत असतात. नानास कैद करण्याविशीं श्रीमंतानीं शिंद्यांस पैका कबूल केला आहे त्याची तरतूद व्हावी, त्यास हा वेळपर्यंत ऐवजाची तरतूद होत नाहीं. त्याजवरून पुढें काय घडतें पहावें. राजश्री सखाराम घाटगे याणीं शिंद्यांजवळून श्री॥ रा॥ भाऊसाहेब यांजकडील सरंजामाचे तालुके व फुटगांव व बत्तीस शिराळें व वाटेगांव वगैरे येथें ताकीदपत्रें घेतलीं हें वर्तमान रा॥ नारायणराव घोरपडे यांस समजलेनंतर त्याणीं शिंद्यास सांगून महकुबी करविली. पुण्यांत अद्याप बेदाच आहे. नानांच्या वाड्यांत शिंद्याची स्वारी चौकशीस येणार. सदरहू मजकूर पत्रांत आहे तो स्वामींस कळावयास्तव लिहिला आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१४८ श्री. (माघ व० ५–५ फेब्रुवारी)

पै॥ छ० १८ साबान. सन समान तिसैन. माघ.

[3]विज्ञापना. परवां आपल्यास दोन वेळां ती॥ राजश्री जिवाजी-

---

१ कैदेंत असलेल्या मोरोबादादांस. २ कापशीकर. ३ पत्र बाबा काळे यांचें पुण्याहून मिरजेस.

पंत अण्णाविषयींचा मजकूर लिहिला होता तो मजकूर सर्व समजलाच असेल. श्रीमंतांपाशीं राजश्री बाळाजीपंत व दिनकरपंत असतात त्यांची भेटी (जिवाजीपंतानीं) घतली हा मजकूर सर्व समजला; याकरितां लिहिलाच होता. नंतर श्रीमंताचीं पत्रें ती॥ राजश्री चिंतामणराव आपास यावीं कीं 'तुम्ही फौजसुधां यावें' अशीं पत्रें तेथें गेलीं म्हणजे त्याणी यावें, हा घाट होता तो तूर्त राहिलासा जाहला आहे. पत्रें लिहिलीं होतीं तीं राहिलीं. यांतील भाव श्रीमंतांस दीड लक्ष रुपये नजर (जिवाजीपंतानीं) कबूल केली. व दरबार खर्च चाळीस हजार पावेतों. याप्रमाणें ठराव होऊन पत्रें तयार व्हावीं तों हा मजकूर श्रीमंत रावसाहेबांस कळला. त्याणीं पत्रांस हिसका दिला. त्यामुळें पत्रें तयार होण्यास दिकत पडली आहे. हिसका देण्यास प्रयोजन काय, तर रावसाहेबहीं एकलाख दरबार खर्च मागतात ऐसें आयकिलें. फार रदबदली जाहल्यास पाऊणास कमी म्हणत नाहींत. ऐसें राजश्री शिवरामपंत थत्ते यांचे विद्यमानें बोलणें. आणि रावसाहेब यांजकडील मंडळी म्हणतां तो एक लाख. एकूण तीन लाख रुपये दरबारखर्चा सुद्धां बेरीज होती. रावसाहेबांचें बोलणें व्हावयाचें आहे म्हणोन पत्रें राहिलीं आहेत. हा भाव एक. दुसरा प्रकार आपली फौज आणविली आहे. सहस्रबुद्धे यांजकडील नातूच्या[1] द्वारें नाद लागला आहे. आज बालमेल करावी तर ठीक नाहीं. अशा अंदेशानें पत्रें राहविलीं असलीं तर असतील. परंतु दरबारखर्चाची कबुली देत नाहींत म्हणोन राहिलीं हेंच खरें आहे हा मजकूर मला अण्णा विचारीत होते कीं कसें करावें? तेव्हां मी त्यांना उत्तर केलें कीं, "आज तुमचें आणि बाळासाहेबांचें वाकडें आलें. परंतु मिरजकर यांचे घरीं काय आहे नाहीं हें तुम्हांस ठाऊक आहे! असें असतां दरबारखर्च करून दौलत करितां हें ठीक नाहीं. ती॥ राजश्री भाऊसाहेबही याउपरी

१ अमृतरावांस.

स्वल्प दिवसांत सुटतील. मग जसें बाळासाहेबांस भाऊसाहेब सांगतील तसें आयाकितील. दिक्कत नाहीं. तावत्पावेतों तुम्ही कोणताही कारभार करूं नये. स्वस्थ असावें. मला पुसाल तर मला याप्रमाणें भासतें; मग तुमचे विचारें येईल तें करावें!" याप्रमाणें त्यांस मी स्पष्ट सांगितलें आहे. वडिलीं जमेतसह बहुत हुषारीनें असावें. माझा मानस कायावाचा आज आपला (व) चिंतामणराव यांचा बखेडा करावा असा भाव नाहीं. अण्णांस मीही जितकें थोपून राखवेल तितकें राखितों. अमृतरावसाहेबांस दरबारखर्च कबूल करूं देत नाहीं; म्हणजे सहजच पत्रें तयार होत नाहींत. वडिलीं स्वस्थ असावें. आजच्या प्रसंगीं दहा पांच (हजार) रावसाहेबांस दिले असतां या पत्रांस अगदीं हिसका बसेलसें भासतें. वडील सर्वजाण आहेत. मी लिहून कळवावें असा भाव नाहीं. जेवढें आढळेल तेवढें कळवावें इतका हेतु आहे. पुण्य आपलें आहे तेथें दिक्कत किमपि पडावयाची नाहीं. रवाना बुधवार. हे विज्ञापना.

नं. ४१४९ श्री. (५ फेब्रुवारी)

पै॥ छ० २१ साबान. समान तिसैन. माघ.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक मोरो आपाजी परांजपे व धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना. तागायत माघ वद्य ५ इंदुवासर मुक्काम पुणें सेवकांचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. येसू काकडा खिजमतगार व फिरंगू जासूद श्रीमंतांचीं पत्रें देऊन स्वामींनीं पाठविले, त्यास पत्रें सरकारांत प्रविष्ट होऊन पत्रांचे जाब जाहले ते घेऊन आले आहेत. इकडील वर्तमान तरी राजश्री दौलतराव शिंदे यांची प्रबलता जाहली आहे. मनस्वी बखेडे करितात. त्यांजपाशीं कारभारी पाहतां सर्जेराव व बाणाजी व एक दोन खिजमतगार आहेत. फार करून याखेरीज

कोणाची गांठ पडत नाहीं. बाहेरचे बाहेर नानाप्रकारें रोखे करून मुलखामध्यें मनस्वी धामधूम मांडिली आहे. श्रीमंतानीं रागें भरून ताकीद करावी, तर प्रसंग नाहीं! पुण्यांत लोक बहुत तजावजा जाहले आहेत. सदाशिव मल्हार कारभारामध्यें नाहींत. राजश्री बाळोबा तात्या अटकेंत आहेत त्यांजकडे श्रीमंत राजश्री नानांस नजरबंद केल्यानंतर पत्रें पाठविलीं होतीं, कीं तुम्ही यांवें. लहान मोठे कारभार पूर्ववत्प्रमाणें संभाळावे. त्याणीं साफ सांगितलें कीं, बहुत दिवस आपली सेवा केली त्याचें सार्थक जाहलें! याउपर फिरोन कारभारांत पडावें असा अर्थ नाहीं. आजपावेतों सेवा केली त्याचें सार्थक जाहलें. आतां ही तुमचेंच अन्न भक्षून आहें. यांप्रमाणें सांगितलें. ते कारभारांत शिरत नाहींत. नबाब व भोसले यांचें एकचित्त जाहलें ते मसलत. सरंजाम लढाईचा होत आहें. फौज भागानगरास चाळीस हजार पावेतों जमाव जाहला. भोसलेही फौज ठेवितात. नागपूरपावेतों नबाबांनीं डांक ठेविली आहे. हें वर्तमान तहकीक आहे. पुण्यांत गलबल व्हावी असें लोक बोलतात. उभयतां श्रीमंत पंतप्रधान यांचें चित्त परस्पर शुद्ध नाहीं. सर्व कारभार श्रीमंत राजश्री अमृतरावसाहेब करितात. पहिले दौलतींतील मातबर गृहस्थ अथवा माहितगार यांचें प्रयोजन कांहीं एक नाहीं, व अगत्यही नाहीं. स्वारी श्रीमंतांची निघाली असतां कोणी एक बरोबर मागल्यांपैकीं नाहीं! वर्तमानकालीं संनिध आहेत तेच असतात. सरकारवाड्यांत पांचशें पात्रें भोजनास होतात. कोणाची कोणास दाद नाहीं. महादेवी राज्य जाहलें आहे! यांत परिणाम लागणें ईश्वरी इच्छा! आणखी एक मजकूर येसू काकडा यापाशीं सांगितला आहे. विनंती करील. ध्यानांत असावी. त्यांतून मर्जीस आल्यास कर्तव्य तें जाहलें पाहिजे. अलीकडे दोन पत्रें राजश्री भास्कर गणेश याजकडे आलीं, व सरकारचीही पत्रें सर-

कारांत प्रविष्ट करणेंचीं आहेत. लक्ष्मणपंत नातू याजपाशीं देऊन प्रविष्ट करावीं याप्रमाणें भास्करपंत याणीं विचार करून पत्रें मशारनिल्हेजवळ दिलीं आहेत. आज उद्यां पत्रें प्रविष्ट होतील. मागाहून सविस्तर विनंती लिहितों. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ४१५० **श्रीगजानन.** (माघ व० ५–५ फेब्रुवारी)

पै ॥ छ २१ साबान. समान तिसैन.

छ १८ साबान. पत्रासाठीं हिसके बहुत खाल्ले. पटवर्धनानीं श्रीमंत.स अर्ज करून जाब देविला तो पाठविला आहे. श्रीमंत राजश्री रावसाहेबांकडील जबाब आला नाही. प्रस्तुत सर्व कारभार रावसाहेबच करितात. तेरीख श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब घालितात. मोंगल व भोसले येणार ऐसी बाजार आवई आहे. श्री इच्छा. विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१५१ **श्री.** (माघ व० ५–५ फेब्रुवारी.)

छ० १८ साबान. समान तिसैन. माघ.

[1]सेवेसीं विज्ञापना. रा ॥ नागोपंत आपाकडील पत्रें आज भौमवारीं मिरजेहून आलीं त्यांत वर्तमान संतोषाचें लिहिलें होतें. श्री ॥ राजश्री भाऊसाहेब माघ शु॥ १४ स मुहूर्त करून येणार. रा॥ बाबूराव कागलकर मिरजेस आले. श्री॥ राजश्री आपासाहेब यांस फौज ठेवण्याची आज्ञा आली ...... जाजती फौज ठेवतात. बाळाजी राम शिंदे याजकडून तासगावीं फौज सुद्धां आले, मागाहून कंपू व फौज रवाना होणार, असें वर्तमान लिहिलें होतें. स्वामींकडे दोन तीन पत्रें मुद्दाम जासुदाबरोबर पाठविलीं परंतु अद्याप त्या पत्रांचीं उत्तरें कांहींच आलीं नाहींत ...... उत्तरें सत्वर यावयाची आज्ञा व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना

---

१ पत्र नारो हरी करंदीकर याचें करवीराहून. २ पटवर्धनांच्या साह्यानें करवीरकरांवर मोहीम करण्याकरितां.

नं. ४१५२ श्री. (माघ व. ५–५ फेब्रुवारी)

पै ॥ छ० १८ साबान. सन समान तिसैन.

[1]विज्ञापना. वडिलीं श्रीमंतांस दोन वेळां राजकीय वर्तमानाचीं पत्रें पाठविलीं तीं पत्रें राजश्री अप्पाजीपंत सहस्रबुद्धे यांजपाशीं पावतीं करून श्रीमंतांस प्रविष्ट करविलीं. उत्तरें अद्यापि जाहलीं नाहींत. उत्तरासाठीं राजश्री बाळाजीपंत हिपरगी हेलपाटे खात आहे. प्रत्युत्तरें तयार जाहलीं म्हणजे रवाना करून देतों. येथें दिक कोठें आहे! राज्य बुडतें ही काळजी कोठें आहे! कोणकोणता तपशील काय लिहावा! लिहून परिणाम लागण्याचा नाहीं. यास्तव वडिलांस येथील सर्व मजकूर समजावा, सर्व माहिती ध्यानांत यावी, याजकरितां राजश्री बाळाजीपंत जोशी यांस आपलेकडे आठ चार दिवशीं पाठवितों; म्हणजे वडिलांस सर्व समजेल. तूर्त येथें शिंदेशाई आहे. तेथें कारभारी घाटगे आहेत, तेव्हां परिणाम ईश्वर लावील! असो. ईश्वरी इच्छा प्रमाण. दक्षिण सारी करवीरकर यांणीं खराब केली हें वर्तमान श्रीमंतांचे कानावर राजश्री माधवराव रास्ते यांणीं घातलें. उत्तर जाहलें कीं, वकिलास आणून ताकीद करितों, म्हणजे उपद्रव सरकार तालुकियांस होणार नाहीं! ही समज श्रीमंतांची आहे! तूर्त कारभार श्रीमंत राजश्री रावसाहेब करीत आहेत. आपलीं पत्रें तपशीलवार येणें तीं रावसाहेबांस येत असावीं. वडील पत्रें माझेकडे पाठवितात. परंतु मला गुदरतां येत नाहीं. मी भाऊंकडील याजमुळें मी व्यर्थ आहें. अद्यापि श्रीमंत भाऊंविषयीं कंटाळा करितात तेव्हां दैव म्हणावें! रावसाहेब मात्र मऊ आहेत. शिंदेही भाऊंस (कैदेंतून) काढूं म्हणतात, परंतु द्रव्यलोभ त्यांस प्राप्त जाहला आहे. राजश्री मोरोबादादा यांस आणावयाचें, त्यांजपाशीं तीस लाख

---

१ बाबा काळे याचें पत्र पुण्याहून मिरजेस. यावरची मिती व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

रुपये मागतात ! त्याजपाशीं विषभक्षणास पैसा नाहीं. असें असून ही दशा आहे. तेव्हां आम्हांपाशीं (भाऊंच्या सुटकेबद्दल) काय मागतील हा भरंवसा नाहीं. याजमुळें कांहीं बोलतां येत नाहीं. जेव्हां ईश्वर कृपा करील तो दिवस सुदिन आहे. ती॥ रा॥ दादास फौजसुद्धां यावें म्हणून कुरुंदवाडास सरकारचीं पत्रें गेलीं आहेत म्हणोन आयकिलें. जर इकडे आले तर मागें मुलामाणसांची गति काय ? हा विचार त्याणीं केलाच असेल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

+नं. ४१५३ श्री. (माघ व. ५—५ फेब्रुआरी)

पै॥ छ. १८ साबान. माघमास. सन समान तिसैन. विज्ञापना; आज आठ दिवसांचे पाठीमागें राजश्री भास्करपंत सहस्रबुद्धे शिंदे यांचे सैन्यांत असतात ते येथें पुण्यांत राजश्री लक्ष्मणपंत नातू म्हणून पूर्वी श्रीमंत दादासाहेबांपाशीं होते, बहुत शहाणे कारस्थानी आहेत असें ऐकितों, त्यांजकडे सहस्रबुद्धे जात असतात. मला सर्व मजकूर मुद्दाम मशारनिल्हे याणीं सांगितला. त्यांतील भाव नातूंचें म्हणणें सहस्रबुद्धे यांजपाशीं पडलें कीं, आज शिंदे बहुत वाढले आहेत, कांहीं दिक्क राहिली नाहीं. तर शिंदे यांस जरब बसे असा मनसबा योजिला आहे. काय, तर सारे पागे जमा करावे. हुजुरात जमा करावी. रास्ते वगैरे सरदार सरंजामी मिळवावे. आज राज्यांत सरंजामींत मातबर मिरजकर. त्याणीं तूर्त फौज पंधरा हजार ठेवून तयार असावें. जेव्हां श्रीमंत अमृतराव डेरेदाखल होतील, येथून पत्रें जातील, तेव्हां मिरजेहून पंधरा हजार फौज सुद्धां श्रीमंतांसीं येऊन दाखल व्हावें. असा घाट सहस्रबुद्धे यांजपाशीं नातू बोलिले. सहस्रबुद्धे याणीं बहुत उत्तम आहे, आम्ही यजमानांस लिहितों आणि फौजेची तयारी करवितों, याप्रमाणें बोलिले. परशु-

+ इंग्रजी तारीख मिति आम्हीं घातलेली पैवस्तीची आहे.

राम भाऊही सुटावे असें सहस्रबुद्धे बोलिले. तेव्हां त्याणीं उत्तर केलें कीं, मिरजेस परशुरामभाऊंचे चिरंजीव आहेत त्याणीं ही पांच सात हजार फौज जमा करावी. ज्या समयीं बळवंतराव फौज घेऊन येतील, तेव्हा त्यांणीं आपली फौज बळवंतराव यांजबरोबर पाठवावी. आणि मिरजेंत त्याणीं स्वस्थ असावें. श्रीमंतांपाशीं बळवंतराव पंधरावीस हजारांनिशीं येऊन पोंचले म्हणजे मांडवगणाहून भाऊंस आणूं, म्हणजे जंगजोड बसेल. याप्रमाणें तपशीलवार मजकूर सहस्रबुद्धे सांगत होते. मला म्हणूं लागले कीं, तुम्ही आपासाहेबांस गुप्तरूपें सूचना लिहावी कीं, तुमचे सरंजामी फौजेस बोलावणीं पाठवावीं. याप्रमाणें लिहिणें म्हणून सांगूं लागले. मी कांहीं उत्तर केलें नाहीं. तेव्हां सहस्रबुद्धे यांस वाईट वाटलें कीं, 'आम्ही एकादा मनसबा करून तुम्हांस सांगावयास येतों, तुमचे विचारास येत नाहीं! असो.' असें म्हणूं लागले. तेव्हां मीं उत्तर केलें कीं, जो विचार अथवा जो मनसबा करणें तो यजमानांस श्रवण करून करणें तो चांगला. परंतु या काळांत फौज अंगावर ठेवून येणें अवघड दिसतें. मग तुम्ही कशावरून मनसबा करीत असाल तो ईश्वर जाणे! असें उत्तर केल्यावर मशारनिल्हे मजपासून उठून गेले. वरचेवर आपलेकडे अजूरदार येथील घाटाचे जात असतात असें ऐकितों. मग सत्यमिथ्या समजत नाहीं. मी वडिलांस सुचवावें असा भाव नाहीं. परंतु दस्ताऐवजीं न सांपडतां उत्तरें यावीं म्हणजे ठीक पडेल. आजचे प्रसंगीं श्रीमंतांचे दौलतींत एक शिंदे शिरजोर आहेत तेथें दुसऱ्याचें वजन पडणें कठीण आहे. मी आपलेस लिहिलें असें सहस्रबुद्धे यांस लिहूं नये. त्यांस मनसबा करावयाची हौस आली आहे! तेथें हिसका बसला म्हणजे रसभंग होईल. फोजा ठेवा म्हणतात परंतु पैका कोठें आहे हें समजत नाहीं. असो. सर्व राज्यच डुलावयाचा सुमार आहे. मग दैव कळेना. हे विज्ञापना[1].

---

१ पत्र बाबा काळे यांचें पुण्याहून बाळासाहेबांस.

नं. ४१५४ श्री. (६ फेब्रुवारी.)

पै॥ छ० २३ साबान. माघ मास. सन समान तिसैन.

सेवेशीं जनार्दन शिवाजी. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत माघ कृष्ण ६ स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. जासूदजोडीबरोबर पत्र पाठविलें आहे म्हणून लिहिलें नाहीं. पावल्यावर मजकूर समजेल. राजश्री विठ्ठल नाना यांसीं आपण पर्याय लिहिले, त्यास नानाची आमची भेट होऊन राजश्री भाऊ दिवाण याचें बोलणें जाहलें. व एक वेळ श्रीमंत रावसाहेबांचेंही बोलणें जाहलें. ऐशास जशी आपली मर्जी त्या अन्वयें जाबसाल घडून येतील असा बोलणेंतील भाव पुरतेपणें आहे. त्यास विना कांहीं अर्थाशिवाय जाबसाल उलगडण्यांत येतो असें नाहीं. त्यास येविषयींचा पर्याय कसा करावयाचा तो विचार करून आज्ञा व्हावी. म्हणजे ज्या गोष्टीनें कार्य होईल ती गोष्ट करितां येईल. + + + + + + उद्योग मांडिला आहे. त्याचा बंदोबस्त आपल्याकडील जाबसाल ठरण्यांत आल्यावर सहजांत घडून येईल सविस्तर मजकूर ती ॥ राजश्री दाजीबाकडे लिहून पाठविला आहे. सेवेशीं लिहितील, अथवा येऊन समक्ष विनंती करितील, त्यावरून निवेदन होईल. पुढें उत्तर जसें येईल त्याप्रमाणें बोलोन विनंती लिहीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं ४१५५ श्रीगजानन. (माघ व. ८–८ फेब्रुवारी.)

पै॥ छ० २१ साबान. सन समान तिसैन. माघ.

विज्ञापना. बाजारी अफवा. हुताशनीचे आंत बाहेरी मोठाच डहुणा होणार म्हणोन बोलतात. शेलूकरांस १५ गद्रे ७

---

१ बाकाजी गणेश जोशी कारकून यांचें मिरजेस पत्र. यावरची इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

सिराळेकर ·॥· येणेंप्रमाणें लक्षांच्या बेरजा निशा जाहल्या, म्हणोन बोलवा आहे. हे विज्ञापना.

+नं ४१५६ श्री. (माघ व. ११–११ फेब्रुवारी.)

पै॥ छ. २४ साबान. समान तिसैन.

विज्ञापना. जिकार नामक यांजविषयीं विदुराचे कारभारी वर लिहिले (?) त्यांचें वचन खाचित घेतलें कीं, तुमचे मतलबाप्रमाणें करितों. मतलब स्वामीचे ध्यानांत आहेच. व माझीही गांठ जिकार नामक याची रस्त्यांत पडली. उमगला आहे असें भासलें. ज्याचे गृहीं वास आहे त्यासीं बोलून ठरावून सेवेसीं लिहितों. गणेश बाजीराव यांजविशीं सरकारचीं पत्रें आलीं त्यांची नकल स्वामीनीं पाठविली त्यास सविस्तर सुतरस्वार रवाना करितों त्याजसमागमें. कितेक मजकुराची विनंती लिहितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१५७ श्री. (माघ व० ३०– १५ फेब्रुवारी.)

पै॥ छ० २८ साबान. समान तिसैन. माघमास.

[1]विज्ञापना. जिकारनामक याची उमेद भारी. शिशुनामक पटवर्धन याचे घरीं गेलों तेथें त्याची भेट जाली. त्याजवरून बहुत उमेदीच्या गोष्टी अन्योविन्य बोलले व मजला पुणियास येणियास मशीर याणीं पत्र लिहिलें सबब आलों. तेंच पत्र सेवकास म्हैसकर याचें हातचें दाखविलें व चाळीस हजार रुपये पर्वतमुक्ततेस लागले हें सांगितलें. त्यापैकीं शोध करितां सेवकास पसातिसांचें ठिकाण लागलें सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१५८ श्री. (माघ व. ३०–१५ फेब्रुवारी)

पै ॥ छ० ३ रमजान फाल्गुन मास. समान तिसैन.

+ या पत्रावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे. १ धोंडो बापूजी यांचें पत्र. मिरजेस पुण्याहून. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

[1]विज्ञापना. " महाराजानीं जुने हुबळीस मोर्चे लाविले आहेत. नवे हुबळीस नागवावें ही दृष्टि धरिली आहे. दीक्षित बावाही तेथें आहेत. सरकारांतून पैरवी जाहल्यास उत्तम, नाहींतर सर्व अंमल त्यांचा बसतो, सरकारचा अंमल उठतो," म्हणून लिहिलें तें कळलें. सरसुभेकडे हुबळी असून तिनें दम राजमंडळाबराबर धरिला एवढें नवल भासतें. येथून त्या प्रांताची खराबी होती म्हणोन कोणी तरतूद करीत नाहींत ! ईश्वरें जें योजिलें असेल तें होईल. वारंवार रास्ते ही हकीकत सांगत असतात. त्यांस (श्रीमंतांकडून) उत्तर होतें कीं "राजमंडळकर वकील आले आहेत त्यांस ताकीद करितों. म्हणजे सरकार अमलास उपद्रव न करितां फौजेस निरोप देऊन (महाराज) करवीरास जातील." असें म्हणत असतात. श्रीमंतानी शिंद्यांस पुसिलें. तेही उत्तर ' वाकिलास ताकीद करविली आहे ' याप्रमाणें करितात. यांत काय होईल तें हो ! शिंदे यांचे घरीं राजमंडळकरांचे वकील राजश्री सदाशिव मल्हार यांजकडे आहेत. परवां मी सदाशिव मल्हार यांजकडे गेलों होतों. त्यांचा चढ पाहतां आम्ही सांगूं तसेंच राजमंडळकर आयकितील याप्रमाणें बोलिले. अलीकडे शिंदे यांचे घरीं भाऊ दिवाण कांहीं कारभारही करीत असतात. याजउपरी त्यांजकडेही प्रवेश करितों. तेथें आपलेकडील राजश्री विठल नरसिंह आहेत त्यांसही वडिलीं लिंहावें कीं: माझी भेटी घेणें ऐसें ल्याहावें. अद्यापि दुरित सरत नाहीं. ईश्वर कृपा करील तो सुदिन. रवाना[2] गुरुवार हे विज्ञापना.

नं. ४१५९ श्रीगणराज. (माघ व० ३०–१५ फेब्रुवारी.)

पै ॥ छ० ३ रमजान. फाल्गुनमास. सन समान तिसैन.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार, विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० २८ साबान यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नव्हतें सेनानी जासूद

---

१ पत्र बाबा काळे याचें पुण्याहून मिरजेस. २ सदाशीव मल्हार.

याजबरोबर आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. खेमाजीबरोबर राजश्री गणपतराव महादेव कानिटकर यांचे लाखोटे दोन व भास्कर गणेश सहस्रबुद्धे यांचे नांवें लखोटे २ होते. कानिटकर यांचे प्रविष्ट केले. सहस्रबुद्धे मिरजेस गेले, सबब लखोटे जासुदाजवळ आहेत. कळावें. इकडील वर्तमान तर अधिकोत्तर नाहीं. राजश्री मोरोबादादा यांचे चिरंजीव राजश्री नाना यांस श्रीमंतानीं कोथरूड बागेंत भोजनास बोलाविलें होतें. बरोबर तीन पागा नेमून दिल्या आहेत. पर्वतीस राजश्री नाना शिवरात्रीस गेले होते. बाहेर हिंडूं लागले. राजश्री बळवंतराव नागनाथ यांस श्रीमंतानीं वामोरीहून आणिलें. सरकारांतून वस्त्रें दिलीं. अलिजाबहाद्दरांचें लग्न फाल्गुन शुद्धांत होणार. श्रीमंत राजश्री आप्पासाहेब यांचे लग्नाकरितां नवऱ्या पाहण्यासाठीं वाकनीस कोंकणांत गेले होते. नवऱ्या पाहून आले. श्रीमंत कैलासवासी रावसाहेब यांचे द्वितीय लग्नाचा दाखला लिहून काढितात. साहित्याची तरतूद अद्याप दिसत नाहीं. बाजारी अफवा फाल्गुन शुद्धांतच होणार असेंही आहे. काशी पवार, धोंडी जाधव यांस वडिलांकडे पाठवून पंधरा रोज होत आले. सावकाराकडून हजार रुपये घेतले त्याचा वाइदा अमावास्येचा जाहला. त्याची निकड बसणार, व फाल्गुन महिन्यांत खर्चास नाहीं. तर खर्चाचा बंदोबस्त होऊन आज्ञा जाहली पाहिजे. देणेंदारांनीं तसदी देण्यांत बाकी ठेविली नाहीं. मी तर वाडिलांस बारंवार विनंती लिहिली त्याची काय ती आज्ञा यावी. त्याप्रमाणें वर्तणूक करीन. कळावें. हे विज्ञापना.

नं. ४१६० श्री. (फाल्गुन शु० १–१६ फेब्रु.)

विनंती. सेवक बहिरोराम सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ छ० २९ माहे साबानपर्यंत स्वामींचे कृपेंकरून

---

१ सवाई माधवराव यांच्या दुसऱ्या लग्नाचा दाखला काढून त्याबरहुकूम चिमाजी आपाचें लग्न करणार.

सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. आज्ञेप्रों यथाधैर्यानुसार किल्ले वगैरेची बंदोबस्ती करून असतों. समयविशेषीं काय घडेल तें खरें. काल हुबळीचे मुक्कामचीं लष्करचीं पत्रें रा॥ सखोपंत यांचीं आलीं. "जुनी हुबळी लढती. राजे याचें बोलणें लागलें आहे. गोळ्याही उडतात. सावनूर प्रांत अकरा महाल सरसुभ्याकडे होते त्यास झाडून ठाणीं राजमंडळकरांचीं पडलीं. नवे हुबळीस तीन लक्ष रुपये दंड म्हणून घेतले. पेठेच्या खराबीसही पारावार नाहीं. महाराजांची उमेद दिवसेंदिवस विशेष दिसती. कृष्णा धरून तुंगभद्रापर्यंत एक राज्य जाहलें. बहुत करून ठाणीं पडलीं. थोडीं बहुत राहिलीं तींही घेणार ऐसें चिन्ह आहे. वचन प्रमाण स्नेह भीड अंदेशा कांहीं ध्यानांत रक्षीत नाहींत ! प्रांत कुटावा, ठाणीं घालावीं, याशिवाय दुसरा विचार कांहींच नाहीं." ऐसें लिहिलें आहे. लिहिल्याप्रों घडतही चाललें ...... कित्तूरकर देसाई विद्यमानकाळीं महाराजांजवळ चाहते झाले आहेत. बागेवाडी व संपगांव व शहापूर तालुक्यांतील इनामगांव वतनबाब आपले स्वाधीन करून घेणार. महाराजांजवळ आज्ञा घेणेंविशीं बहुत जपत असतात. दरबार सर्व देसाई याणीं वश्य करून घेतलें आहे. देसाई यांचे मनोदयानुरूप महाराजांची आज्ञा व्हावयासही उशीर नाहीं. ...... सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. पै॥ छ० रमजान सन समान तिसैन.

+नं ४१६१ **श्रीगजानन.** (फाल्गुन शु. ३–१८ फेब्रुवारी.)

पै॥ छ०१ रमजान. फाल्गुन मास. सन समान तिसैन.

विज्ञापना. राजश्री दादा गद्रे व बजाबा सिराळेकर व

+ पत्रावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आ॰. हें बाळाजीपंत हिपरगीकर जोशी यानें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस लिहिलें.

बाबाजी जयराम बापट ऐसे अलिजाबहादर यांचे लष्करांतून सुटोन आले. अलिजाबहादर यांचे जिलबीचे माणसांवर ब्राह्मण मारला हा आरोप आला; त्यांजमुळें सात असामींचा शिरच्छेद जाहला. पंढरपुरास चौकी गेली त्यांसही मावारे आणविले आहेत म्हणोन अफवा आहे. खरें लटकें न कळे बाजारी अफवा. सेवेशीं विदित होय. वरातेच्या तगाद्याचें काय जाहलें, ही आज्ञा करावी. आमची सहा हजारांची वरात गोविंद बापूजीकडे आहे ती घेऊन पाठविण्याची आज्ञा जाहली पाहिजे, म्हणजे वरात गैरआदा करावयाचा यत्न होईल याजकरितां लिहिलें आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१६२ **श्रीगजानन.** (फाल्गु० शु० ४– २० फेब्रुवारी.)

पै॥ छ० ३ रमजान. फाल्गुन. सन समान तिसैन.

[1]विज्ञापना. मशीर डेरेदाखल जाहले. इंग्रजांचें कांहीं सामान मुंबईत आलें म्हणोन वदंता आहे. करवीरचे वकील येथें आले आहेत. अलिजाबहादर यांजकडील सरदार डेरेदाखल होणार. दुरोखी डेरे होणार. नबाबावर आणि करवीरकरांवर ऐसा रोख बोलतात. पत्रें होण्याचा बेत तूर्त अनमान. फडके, परचुरे, यांजकडून तीन लक्ष रुपये तूर्त निशा जाहली. फडके वाड्यांतच आहेत. येणें-प्रमाणें बाजारी अफवा. हे विज्ञापना.

नं. ४२६३ **श्री.** (फाल्गु० शु० ४–२० फेब्रुवारी.)

पै॥ छ० ३ रमजान. फाल्गुन मास. समान तिसैन.

[2]विज्ञापना. वाडिलीं लिहिलें कीं, " घराऊ मजकूर तुम्ही लिहिला त्यास मागाहून लिहितों, व वडिलांची[3] मुक्तता जाहली

---

१ बाळाजी गणेश जोशी याचें पत्र पुण्याहून मिरजेस. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे. २ बाबा काळे याचें पत्र पुण्याहून मिरजेस. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे. ३ परशुरामभाऊंची.

म्हणजे ते आज्ञा करितील त्याप्रमाणें गुंता नाहीं;" म्हणोन सुचविलें, त्यास आजपर्यंत वाडिलीं तीा राजश्री आर्यानीं आज्ञा केली ती मान्यच केली. जें वडिलाचे मुखांतून आलें तें आपण मान्य करीतच आहेत यांत दिकत काय आहे? तीा राजश्री चिंतामणराव आप्पास मात्र दम निघेना! नाहींतर गत वर्षीं मींच आर्यांचा निरोप घेऊन आपलेकडे आलों होतों. मजकूर विदित केला, आपण मला आज्ञा केली कीं, तूं पुण्यास जाणें. जशी वडील आज्ञा करितील त्यास शिरसावंद्य आहे. पुढें कांहीं एक मार्ग काढावा तों आश्विन मासीं अशी अवस्था जाहली. पुढें आप्पासाहेबानीं उगाच खटला घातला हें सर्व समजलेंच आहे. हल्लीं येथें तीा राजश्री जिवाजीपंत अण्णा आहेत हे उभयतां पटवर्धन यांचे आश्रयानें आहेत. यानीं मनसबा केला आहे हा मी वाडिलांस दोन वेळ सर्व समजावा याकरितां लिहिला आहे. पुढें पत्रें जाहलेल्यांस हिसका बसला आहे. त्याचें कारण श्रीमंत अमृतराव साहेब दरबारखर्च लक्ष रुपये मागतात यासाठीं तटलें आहे. मला अण्णा विचारीत होते कीं, मुख्य श्रीमंतांकडे दीडपावेतों खर्च कबूल केला आहे, आणि रावसाहेब एक मागतात; यास कसें करावें? याजमुळें काम अडलें असें सांगूं लागले. तेव्हां मी अण्णांस सांगितलें कीं, मनस्वी दरबारखर्च करून चिंतामणराव आपाची उभारणी करणें हें चांगलें नाहीं. दौलत खराबीस आली आहे. असें असून मनस्वी दरबार खर्च कशास करितां? ईश्वर कृपा करील तर वाडिलांची मुक्तताही थोडकेच दिवसांत होईल. मग जसें पाहिजे तसें वडील उभयतांची समजूत करून देतील. तूर्त तुम्ही स्वस्थ असावें हें मला बरें दिसतें. त्याजवर आज महिनाभर स्वस्थ आहेत. रावसाहेब यांजकडील

---

१ हा लेखक परशुरामभाऊंस आर्य शब्दानें उल्लेखीत असतो. २ बाजीरावसाहेबांच्या मर्जीतले दोघे बाळाजीपंत व दिनकरपंत.

दरबारखर्च कबूल करिते तर पत्रें होतीं. ते करीत नाहींत. असें वर्तमान आहे. मला आर्यांचा निरोप आला होता कीं जिउबाचें आणि आपलें मिटवून देणें. त्यास हा मजकूर वडिलांस कळावा. मग जशी आज्ञा होईल तसें करितां येईल. हे विज्ञापना.

नं. ४१६४ श्री. (फाल्गुन शु० ११ – २६ फेब्रुवारी.)

पै॥ छ० १३ रमजान. सन समान तिसैन.

[1]राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं. सेवक सदासिव मल्हार. कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ. ९ रमजानपावेतों यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन संतोष जाहला. याचप्रकारें निरंतर पत्रीं संतोषवीत असावें. वरकड कितेक प्रकारें स्नेहार्थी सुचविलें त्यास आपणाविषयीं इकडील दुसरा भाव आहे असें नाहीं. यदर्थी राजश्री विठ्ठल नरसिंह यासीं बोलणें झालें आहे ते आपल्यास लिहितील त्याजवरून समजणेंत येईल. सदोदित पत्रीं तोषवावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं.४१६५ श्री. (फाल्गुन शु० १४ – १ मार्च.)

पै॥ छ १२ रमजान फाल्गुन मास. समान तिसैन.

[2]विज्ञापना ऐसीजे, शिंद्याकडील पलटणें वाड्यापाशीं चौकीस होतीं तीं सोमवारीं सायंकाळीं सरकार आज्ञेप्रमाणें त्याणीं लष्करांत बोलावून नेलीं. सरकारचीं पलटणें कवाइती व तोफा पेशजीप्रमाणें ठेवून बंदोबस्त त्याप्रमाणेंच केला आहे. श्रीमंत राजश्री मोरोबा दादा याणीं त्रिंबकेश्वरीं खालीं येऊन प्रायश्चित्त घेतलें. वस्त्रें घेतलीं. सरकारांतून दहा हजार रुपये रोख खर्चास देविले. येथें चिरंजीवांकडे

---

१ शिंद्यांचे दिवाण सदाशिव मल्हार यांचें पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस.
२ पत्रावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे. पत्र बाळाजीपंत जोशी यांचें मिरजेस.

खास बारदार घोडीं माणसें वगैरे किरकोळ सरंजाम देविला. (मोरोबास) आणण्याचा अद्यापि कांहीं बेत नाहीं. कोणी तिकडे जावें याप्रमाणें कोणास आज्ञा जाहली नाहीं. शिंद्यांकडे लग्न उदईक तेवीस घटका दिवसास आहे. सेवेशीं विदित होय. हे विज्ञापना. धोंडोपंत गोखले यांचे चिरंजीव येथें सरकारांत येऊन आपले वडिलांची तारीफ केली. नंतर पांच हजार फौज ठेवावी अशी आज्ञा जाली. व दोन तोफा धारवाडापैकीं व हत्ती निसबतीस दिला. व हरएक ऐवजीं कर्नाटकपैकीं लाख रुपयांची वरात दिली. सेवेशीं विदित होय. हे विज्ञापना.

नं. ४१६६ (फाल्गुन व० ४–६ मार्च.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. र० छ. १७ रमजान समान तिसैन.

" राजश्री धोंडोपंत गोखले यांचा मुकाम बयापूर नजीक मुदगल येथें आहे. बरोबर चार हजार फौज आहे. "

नं. ४१६७ (फागुन व० ४–६ मार्च.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० १७ रमजान समान तिसैन–

" जुने हुबळीस करवीरकरांचे मोर्चे बसले होते. ठाणें हस्तगत होत नव्हतें, परंतु आंतील लोकांचा रोजमरा पंचेचाळीस हजार रुपये थकला आहे तो महाराजानीं द्यावा व रिकामें झालेलें ठाणें महाराजानीं घ्यावें असें ठरलें. महाराजानीं कूच करून दहा कोस जावें, नंतर आंतील लोकानीं सर्व सामान घेऊन वाटेल तिकडे बाहेर पडून जावें, असा बेत ठरला असतां महाराजानीं कूच करून धारवाडच्या वाटेवर हुबळीकर येतील तेव्हां त्यांस लुटावें अशा बेतानें दबा धरून बसले होते. ही बातमी हुबळीकरांस कळतांच त्यानीं निरनिराळ्या वाटानीं मुलेंमाणसें आसऱ्यास लावून देऊन किल्यांत न-

वीन सामान भरून महाराजांचे मोर्चे होते ते मोडून त्यांस निरोप पाठविला कीं, आतां तुमचा आमचा तह मोडला. हुबळीकरानीं चांगला बंदोबस्त केलासें पाहून महाराज पुन्हा हुबळीस वेढा न घालतां दुसरीकडे गेले. ''

नं. ४१६८ श्रीगणराज. (फाल्गुन व० ६–८ मार्च.)

पै॥ छ० २४ रमजान. सन समान तिसैन. फाल्गुन मास.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ. १९ रमजान यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. इकडील वर्तमान तर नारायणराव बक्षी व जिऊबा दादा याचे बंधु बाळा भाऊ, बाजीबा मोदी, देवजी गौळी आणखी दोन असाम्या असे सहा असामी (शिंद्यानीं कैद करून) नगरच्या किल्यास रवाना केले. कारण काय म्हटलें तर आबा शेळूकर याचे मतांत मिळून मोंगलाशी संधान करीत होते. हा फितवा अलिजाबहादर यांस समजला. नंतर गृहस्थांस कैद करून पर्वतास रवाना केले. गोपाळराव चिटणीस यांस बक्षीगिरीची वस्त्रें आज होणार. आबा चिटणीस यांस बोलावणें गेलें असी ही बोलवा आहे. येणेंप्रमाणें बाजारी वर्तमान आहे. खरें लटकें नकळे. ऐकींव वर्तमान लिहिलें आहे. बाळोबा पागनीस व धोंडीबा यांसही जांबगांवाहून किल्ले नगर येथें नेणार, म्हणोन अफवा आहे. खरें लटकें नकळे. कळावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१६९ श्री. (९ मार्च.)

पै ॥ छ० २४ रमजान. सन समान तिसैन. फाल्गुन मास.

विज्ञापना. तागायत फाल्गुन व॥ ८ भृगुवार प्रातःकाळ. राजश्री अलिजाबहादर याणीं बक्षी वगैरे मंडळी कैद केली असें समजून झाडून फौजेनें एका करून बसल्यावर मागती बक्षी वगैरे आणिले.

---

१ नगराहून बक्षी वगैरे परत आणिल्याची बातमी खोटी.

दहा प्रहर नगरचे किल्ल्यावर होते. लष्करावाहेर उतरले आहेत. पुढें काय होतें पहावें. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

न. ४१७० श्री. (१२ मार्च)

पै ॥ छ० २९ रमजान. समानतिसैन. चैत्र.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत फाल्गुन वद्य १० पावेतों वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. राजश्री बापू लेले फडीं कारभार करूं लागले. वीस लाख रुपयेपर्यंत जमा करून देतों असें लेले श्रीमंतांपाशीं बोलिले नंतर कारभार फडचा श्रीमंतानीं सांगितला. लेले याणीं वाड्यांत मंडळी बाबा फडके वगैरे आहे त्यांजवर मंडळीचा सुमार पाहून पैक्याचा आंख घातला. कोणी राजी नाहींत. पैका आम्हांस साफ मिळत नाहीं असा सर्वांनीं जाबसाल केला. त्याजवरून सर्वांस उपोषणें होतात. रात्रीस आज दोन रोज भोजनास घालितात. याउपर काय ठरतें पहावें. राजश्री रामचंद्र नाईक परांजपे, वानवळे, बळवंतराव वाकडे, यांजला ऐवज मागतात. त्यास रामचंद्र नाईकानीं साफ सांगितलें कीं, आम्हांजवळ ऐवज मिळावयाचा नाहीं. काय मर्जी असेल ती करणें. असें उत्तर जालें. मामलती आजपर्यंत सांगितल्या त्यांची घालमेल केली. चढ करून दुसरे यांजला सांगितल्या. याप्रमाणें जालें. तूर्त आहे यांत कोणी रदबदली केल्यास श्रीमंतानीं आयकूं नये असी लेले याणीं श्रीमंतांस विनंती केली आहे. याउपर काय होतें पहावें. याप्रमाणें बाजारी वर्तमान आहे. राजश्री गोपाळराव–आबा चिटणीस यांचा भाऊ–तूर्त शिंदे याजकडे कारभारामध्यें प्रमुख आहेत. बक्षीगिरीची वस्त्रें शिंदे गोपाळराव याजला देणार अशी बाजार अवाई आहे. वेदमूर्ति राजश्री मातृभूतेश्वर सोमयाजी आज पांच सहा रोज येतात. 'मिरजेहून घटाटोप पावल्याचें उत्तर आलें कीं नाहीं; आम्हांस तूर्त ऐवजाची गर-

१ फडाकडील. हिशेबी व जमाबंदी खात्याचा.

ज आहे,' असें बोलतात. उत्तर आणवावें असें सांगतात. वडिलीं घटाटोप पावल्याचें पत्र सोमयाजीस पाठविण्यास आज्ञा करावी. सोमयाजी ऐवजाविशीं बोलत आहेत त्यास वडिलांचें उत्तर येईल त्याप्रमाणें भटजींस सांगेन. उत्तर पाठवावया आज्ञा करावी. राजश्री बापूजी नाईक भावे याणीं ऐवजाविशीं वडिलांस पत्र लखोटा करून दिला तो पाठविला आहे. राजश्री बापू लेले वडिलांवर वरात पांच लाखांची करणार. श्रीमंतांस विनंती करून करणार अशी बाजार आवाई आयाकिली आहे. त्यावरून आजच राजश्री गणपतराव कानिटकर याजला हें वर्तमान पांच लाख वरातेचें सांगितलें. मशारनिल्हे बोलिले कीं, आम्ही याचा शोध करितों. तुम्हांस पक्कें समजल्यास कळवावें. पक्का शोध लागला म्हणजे श्रीमंतांस विनंती करुन गैरआदा वरात करितों. याजप्रमाणें मशारनिल्हे बोलिले, त्यास वरचेवर मशारनिल्हेस स्मरण करितों. मला जिकडून समजलें त्याजलाही पुसोन कानिटकर यांजला सांगतों. वडिलांस कळावें. ती॥ राजश्री मोरोपंत दादाचीं पत्रें आलीं. वर्ष प्रतिपदा जाली म्हणजे निघोन येतों, असें दादानीं लिहिलें आहे. आज्ञा आल्यास मग हिपरगी याजला ऐवज देईन. नवीन कांहीं काम करूं नये, असे वडिलींही हिपरगीस लिहावें. कळावें बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं० ४१७१ (फाल्गुन व. ११ – मार्च)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. र० छ. २४ रमजान. समान तिसैन. –

" रायरहुबळीस मागती रा॥ रत्नाकरपंत आपा याणीं यऊन तीन लाख रुपये खंडणी घेतली. जुने हुबळीस कित्तूरकर देसाई वेढा घालून आहे. आंतील लोकांचा दम ताजा आहे. "

नं. ४१७२ श्रीगजानन. (फाल्गुन व० ११—१३ मार्च.)

पै॥ छ २९ रमजान. सन समान तिसैन. चैत्र. शु ॥ १

विज्ञापना तागायत छ २४ रमजान. यथास्थित असे. विशेष. बाजारी वर्तमान ऐकींव—खरें नव्हे—उगाच धूर ऐकला तो सेवेशीं लिहिला आहे. श्री॥ राजश्री नाना फडणवीस यांचें बोलणें आबा चिटणीस बोलतात कीं, दीडकोट रुपये फक्त देतों. मुक्तता करावी. पूर्ववतप्रमाणें कारभार दौलतीचा नानानीं करावा, आपण अलीजाबहाद्दर याचे दौलतीचा कारभार करावा, हा बेत ठरला आहे. सत्य मिथ्या न कळे. परवां वाड्यांत उपोषणें राजश्री बाबा फडके वगैरे मंडळीस जाहलीं. जाबसाल अद्याप उरकणेंत आला नाहीं. शंकर जोशी याणीं चैत्र मासीं मुक्तता होईल हें ही लिहून दिलें असें लोक म्हणतात. खरें लटकें भगवान् जाणे. राजश्री त्रिंबकराव भाऊ परचुरे आश्रम घ्यावयास भांबवड्यास गेले म्हणोन वर्तमान आहे. बाळोबानें जांबगांवाहून निघते वेळेस शिखासूत्र वर्ज करून त्याग केला म्हणोन आवाज निघाला आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. अलिजाबहाद्दर यांचे लष्करांत भोसल्याचा वकील व मोंगलाचा वकील आला असें म्हणतात. दीडकोट रुपये जांबगांवास दाखल जाहल्यावर द्यावे हा बेत ठरल्यास द्यावे. नाहींतर ऐवज द्यावयाचा नाहीं. आबा चिटणीस कारभारांत यावयाचे नाहींत. सेवेशीं विदित होय. उगाच खबरी बोलतात बाजारी तें लिहिलें आहे. हे विज्ञापना.

नं. ४१७३ श्री. (फाल्गुन व० ११— १३मार्च)

पै॥ छ० २४ रमजान. सन समान तिसैन. फाल्गुन.

विज्ञापना ऐसी जे. श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब फाल्गुन शु० ११ स डेरेदाखल जाहले. सहा तोफा, हजार दीड हजार स्वार, गाडद, वगैरे सरंजामसुद्धां गारपिरावर आहेत. कूच होऊन पुढें जाण्याचा

१ बाबा काळे यांचें पत्र मिरजेस.

निश्चय नाहीं. राजश्री आलिजाबहाद्दर यांचे घरीं लग्नाचा मोठा समारंभ जाहला. रुपेचे बोहलें व सोनेरी चांदवा व मोत्यांच्या झालरी याप्रमाणें भारीच काम जाहलें. छ० २१ तारखेस शिंदे याणीं आपल्याकडील मुत्सद्दी मंडळी वगैरे कैद करून नगरास रातोरात रवाना केली. नारायणराव बक्षी व बाळा भाऊ व बाजी मोदी व देवजी गौळी व आणखी पांच चार छोटेखानी असे व पुढें ही राहिले आहेत त्यांस ही सदरहू प्रमाणें होणार, अशी वदंता आहे. राजश्री गोपाळराव चिटणीस कारभारी होणार. मशारनिल्हे यांचे बंधु कृष्णराव यांस करवीरची मसलत सांगितली. समागमें मुकेल साहेब याचा कंपू व दहा हजार स्वार असे कूच छ० २२ तारखेस करून हडपसरावर राहिले आहेत. राजश्री आबा चिटणीस यांस येण्याविशीं शिंदे यांचीं पत्रें गेलीं आहेत. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१७४ (फाल्गु० व० १३—१५ मार्च)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. र॥ छ० २६ रमजान.

"जुने हुबळींतून राघोपंतभट आपलें सामान तोफखानासुद्धां घोडीं हत्तीसह निघोन धारवाडास गेले. धारवाडीं फौज ठेऊन राजमंडळकरानीं घेतलेला मुलूख परत घेणार. करजगीस महाराजांकडील रा॥ जाखो सखाराम याणीं मोर्चे लाविले होते त्यांजवर सरसुभ्याकडील राघोपंत जोगळेकर याणीं छापा घालून त्यांस लुटलें."

नं. ४१७५ श्री. (फाल्गुन व० ३०— १७ मार्च.)

'सेवेशी विज्ञापना. ता. छ. २८ रमजान शनिवार दीड प्रहर दिवस पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्याहून मालोजी निकम व बहिरजी गायकवाड यांचीं पत्रें काल आलीं त्यांतील मजकूर— " त्रिवर्ग श्रीमंत एकत्र होऊन खलबत करून रा॥ दौलतराव

---

१ पत्र नारो हरी करंदीकर याचें करवीराहून मिरजेस.

शिंदे यांसीं म्हणाले कीं, " तुम्ही सरदार आमचे पदरचे असतां दौलत बुडविली, व धनीपणाची रीत कांहीं राखिली नाहीं. करवीरीं सोयरीक करून एकमत होऊन राज्यही गमाविलें. त्यापक्षीं आम्ही पुण्यांत राहण्याची बाकी राहिली नाहीं. आम्हास ज्या जाग्याहून आणिलें आहे तेथें पोंहोंचवून देणें. (नाहीं तर) तुम्हीं सरदारीच करून रहावें. कारभारांत पडों नये. आमचा बंदोबस्त आम्ही पाहून घेतों." याप्रमाणें बोलणें होऊन श्रीमंतानीं फौजसुद्धा मिरज प्रांतीं येऊन छावणी करून कर्नाटक प्रांताचा बंदोबस्त करावा हा निश्चय करून मिरज व कुरुंदवाडीं दहा हजार फौज ठेवणेंविशीं पत्रें पाठविलीं. श्रीमंतांची स्वारी निघणार " म्हणोन लिहिलें आहे. शिंदे यांजकडील लोकांस [२]निरोप देऊन रवानगी केली ते डोंगरास (?) जाऊन राहिले आहेत. राजश्री [३]बाजी रामचंद्र यांजला त्यांजकडे बोलावयासीं पाठविलें आहे जे रा॥ दौलतराव शिंदे यांसीं बोलून श्रीमंतांची स्वारी तालुक्यांत नये, याप्रमाणें बंदोबस्ती करावी म्हणोन संधानास पाठविले आहेत. आणि बाजी रामचंद्र यांस ही याच मसलतीस पुण्यास पाठवून देणार ...... सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१७६ श्री. (चैत्र शु० १—१८ मार्च.)

पै ॥ छ० २९ रमजान. सन समानतिसैन. चैत्रमास.

विज्ञापना. घाटगे याणीं करवीरास [४]लग्नाचिठी पाठविली होती. त्यास त्या कारकुनास करवरिकर महाराज अधिक उणें बोलिले. त्याजवरून [५]यांचे बोलणार पुण्यांत होते त्यांस छ० २३ रोजीं राजश्री अलिजाबहाद्दर याणीं कैद करून लष्करांत नेलें. कळावें. हे विज्ञापना.

नं. ४१७७ (चैत्र शु. १—१८ मार्च.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र. रवाना छ०२९ रमजान.

---

१ जुनराहून. २ करवीरच्या स्वारीकरितां. ३ बाजी रामचंद्र यास शिंद्याकडे करवीकरानीं पाठविलें. ४ चिठी नारोपंत करंदीकर याची करवीराहून. ५ महाराजांचे.

" कित्तूरकरानीं जुने हुबळीचें ठाणें श्रीमंत महाराजांकरितां घेऊन आपले लोक आंत भरले आहेत. तेथें सरसुभेचे मामलेदार होते ते खटल्यासुद्धां धारवाडास निघून गेले."

नं.४१७८   श्री.   (२४ मार्च)

पै॥ छ० ५ सवाल. सन समान तिसैन.

विज्ञापना. वडिलीं छ० २३ रमजानचें आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. " बक्षी कैद जाहले त्याचें कारण काय ? करवीरकर महाराज माघारे आले, हुबळीची वगैरे बाकी राहिली नाहीं, तडसांत ठाणें राजमंडळचें बसलें ; " म्हणोन तपशीलवार लिहिलें तें कळलें. बक्षींस (कां) कैद केलें याचा शोध बहुत जागीं केला, परंतु राजश्री नारायणराव (बक्षी) यांजकडे कांहीं अंतर दिसत नाहीं. मुख्य राजश्री गोपाळराव चिटणीस हिंदुस्थानांतून आले. हिंदुस्थानांत तीन वर्षेपर्यंत नजरबंदींतच होते ते सालगुदस्त राजश्री कृष्णोबा बाबा चिटणीस याणीं दहा लक्ष रुपये देऊन चिटणिसी करून घेतली त्यासमयीं गोपाळराव भाऊस सोडविलें. ते येथें येऊन दोन महिने जाहले. चिटणीसांचे हितैषी गाढवे तूर्त बहुत पेश आहेत. घाटगे याणीं आपली कन्या शिंदे यांस दिली, याजमुळें बहुत पेश आहेत. या लगत्यामुळें घाटगे व गाढवे व गोपाळराव चिटणीस त्रिवर्गानीं मसलत करून शिंदे यांस सांगितलें कीं, बक्षीनें फौजेचे बखेडे बहुत केले आहेत. सरकारचे माथां फौजेचें देणें बहुत केलें आहे. तर याजउपरी आम्हीं पांसष्ट लाख रुपये देतों, बक्षीस कैद करावें. शेणवी मंडळी कैद जहाली म्हणजे ऐवजाची निशा करितों. ऐशी समजूत गोपाळराव चिटणीस याणीं करून हें काम केलें. बक्षीकडे कांहीं दोष नाहीं. सर्व लोभ पैक्याचा दिसतो. थोर मनुष्याची अब्रू कैद करून घेतली ! राजश्री बाळोबा तात्यासही

---

१ रामचंद्र श्रीधर उर्फ बाबा काळे वकील याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

नगरास नेलें. आमचा अगदीं घाटच माघारा राहिलासा जाहला आहे. बक्षी कैद जाहल्यापासून शिंदे यांची फौज अगदीं बेदिल जाहली. दोनचार हजार पठाण आहेत तेही बेदिल. तसेंच मराठी फौज ही बेदिल. तसेंच कंपूचे सरदार ही बेदिल आहेत. आज चार दिवस खुद्द शिंदे यांचें दारीं पठाण व मराठे सरदार अडवून दोन तीन हजार लोक ' पैका द्यावा, आम्ही याजउपरी चाकरी करीत नाहीं," म्हणोन बसले आहेत. पैका मागण्यासाठीं धरणीं नेहमीं बसतात, परंतु हीं धरणीं एका प्रकारचीं दिसतात! बक्षीमुळें बहुत मलई जाहली आहे. कोणत्या थरास जातें पहावें. लोक अनेक प्रकारचें बोलतात. आणि शिंदे यांची अपकीर्तिही बहुत जाहली आहे. याजउपरी दौलत एकमुखी चालणें अवघड दिसतें. मग दौलतराव शिंदे यांचें दैव कळेना! परंतु लोक बहुत बेदिल दिसतात. काय होतें पहावें. फौजेचा आज फडशा केल्यास दोन कोट रुपये पाहिजेत! तूर्त रुपयांची टंचाईच आहे. एकमात्र द्रव्यांचें कुळ त्यांजपाशीं आहे. शेवटीं त्यास खातीलसें भासतें. अद्यापि धरणीं आहेत तशींच आहेत. राजे मागें आले, त्यास वडिलीं त्यांची बातमी यथास्थित राखीत जावी. दगा अथवा फितूर करावयास चुकणार नाहींत. तडस वगैरे ठाणीं गेलीं, ईश्वर इच्छा! रवाना मंगळवार तृतीया चैत्र शु॥ हे विज्ञापना.

नं. ४१७९ श्री. (२१ मार्च)

पै॥ छ० ५ सवाल. समानतिसैन. चैत्र.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी शिर साष्टांग नमस्कार. विज्ञापना. चैत्र शु॥ ४ वर्तमान बालकाचें यथास्थित असे. विशेष. राजश्री भाऊ कापशे व राघोपंत पेंडसे नानाकडील यांजला शिंदे याणीं लष्करांत नेलें. ऐवजाची माहितगिरी त्यांस पुसिली. त्याणीं आपल्यास

---

१ परशुरामभाऊंस मुक्त करण्याचा. २ चमत्कारिक. ३ दंगा ४ नाना फडनवीस ५ करवीरकर.

माहितगिरी आहे तितका ऐवज दाखविला. भाऊ कापशे गांवांत येऊन ज्यां ज्यांकडे ऐवज होता तो दाखविला. तितके गृहस्थ लष्करांत नेले. अजमास बाजार वर्तमान पन्नास साठ ऐशीं नवद लाख पर्यंत जवाहीरसमेत ऐवज सांपडला, असें वर्तमान बाजारी बोलतात. राजश्री त्रिंबकराव परचुरे यांणीं आपणापाशीं ऐवज होता त्याची सात लक्ष रुपयांची यादी लिहून श्रीमंतांस दिली. आणि पायावर हात ठेविला. 'याशिवाय पैसा आपणाजवळ नाहीं. मर्जीस येईल तो ऐवज घ्यावा, बाकी आम्हास द्यावा,' ऐशी विनंती केली. तेव्हां श्रीमंतानीं पांच लाख रुपये घेऊन दोन लाख त्यांस दिले, त्रिंबकराव याणीं लागलीच भावांची वाटणी तिघांची करून, आपण पन्नास हजार रुपये घेतले. श्रीकाशीस जाण्यास सरकार आज्ञा घेतली. श्रीमंतांस आज उभयतांस मेजवानी केली. वस्त्रें जवाहीर दिलें. शिंदे याणीं मार्गांतील दस्तकें लिहून दिलीं. सत्वरच परचुरे श्रीकाशीस जाणार. याजप्रमाणें बाजारी वर्तमान आहे. मेजवानी जाहली हे खरी. वडिलांस कळावें. दिनचर्या लोक घालवीत आहेत, सर्व मजकूर दरबारी राजश्री गणपतराव कानिटकर याणीं वडिलांस लिहिला असेल. कळावें बहुत काय लिहिणें सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४१८०   श्री.   (२१ मार्च.)

पै॥ छ० ४ सवाल. चैत्रमास. सनसमान तिसैन. प्रहर रात्र.

विज्ञापना. तागायत चैत्रशुद्ध ४ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. [1]राजश्री नारायणराव बक्षीस कैद करून किल्यावर नेल्याचें कारण गोपाळराव चिटणीस याणीं कारभार आपणाकडे केला. पांसष्ट लाख रुपये कबूल केले. शेणवी मंडळ भारी फौज (त्यांच्या) स्वाधीन याजकारितां ऐवज कबूल करून त्यांचा बंदोबस्त (चिटणीस यानीं) करविला. राजश्री अलिजाबहाद्दर यांचे दारीं चार पांच दिवस फौजेचें धरणें फारच निकडीचें होतें. घाटगे पाटण-

[1] गणपतराव कानिटकर नि॥ कुरुंदवाडकर यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.

कर कारभारीसुद्धां (धरणेंवाल्यानीं) बसविले होते. शु॥ २ रात्री ऐवज फौजेस जमाखर्च करून देविला. अठरा लक्ष रुपये रोख, बाकी एक महिन्याचे मुदतीनें, येणेंप्रमाणें ठराव होऊन लोक उठविले. श्री॥ कैलासवासी दादा साहेब याणीं इंग्रजाकडे जवाहीर ठेविलें तें जवाहीर हल्लीं इंग्रज घेऊन सरकारांत आला आहे. वरकड स्वामीनीं सूतर-स्वारासमागमें आज्ञापत्र श्री॥ राजश्री रावसाहेब यांचे नांवचें व राजश्री आलिजाबहाद्दर यांचें नांवचें पत्र स्वामीनीं पाठविलें त्यास आज तागायत सेवकास समाधान नव्हतें. दहा बारा दिवस बाहेर गेलों नाहीं. याजकरितां दिरंग लागला. हल्लीं पत्रें देऊन आज्ञेप्रमाणें उत्तर पाठवितों. राजश्री जनार्दनपंत म्हैसकर काळे यांचे घरीं होते. तेथें शिंद्यांकडील स्वार धरावयास आले. तों मशारनिल्हे निघून गेले. स्वार घरोघर शोध करीत आहेत. लेखकाचे खाजगी कारकून शिंद्यानीं धरून झाडून लिहून घेतलें. जवाहीर बावीस पावेतों व रोकड त्रेचाळीस त्याचे हातीं लागले. श्रीमंत राजश्री दादासाहेबांची स्वारी (कुरुंदवाडाहून इकडे येण्यास) दिरंग लागल्यामुळें मर्जी खट्टी होऊन कोणताही जाबसाल पुसिला असतां उत्तर करीत नाहीं. तेव्हां काय करावें ? मर्जी स्वामीची ! आज्ञा जालियास उभाउभी इकडील वृत्त निवेदन सेवेशीं येऊन करून जाईन. येविशीं आज्ञा (असावी.) सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१८१ श्रीगणराज. (चैत्र शु० ६ – २३ मार्च.)

पै॥ छ० ४ सवाल सन समान तिसैन. चैत्र मास.

प्रहर रात्र आवशीची.

विज्ञापना. राजश्री नानांकडील राघोपंत पेंडसे व भाऊ कापशे यांस घाटग्यानीं धरून नेलें. त्यानीं सोळा लक्षांचें जवाहीर सांगितलें तें ज्या गृहस्थाचे घरीं होतें तेथून नेलें. कृष्णाजी भैरव थत्ते

१ पत्र विठ्ठलराव पांडुरंग यांचें. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची.

यांजकडे सत्तावीस लक्ष रुपये ठेव नानाची होती म्हणून थत्ते यांचे चिरंजीव राजश्री शिधोबानाईक यांस धरून नेलें होतें ते काल परत घरीं आले. काय ठरलें हें समजणेंत आलें नाहीं. गांवांतील सावकारांचे दारीं सरकारचीं माणसें निराळींच बसलीं आहेत. आलिजाबहादरही धरून निराळेच नेतात. राजश्री त्रिंबकराव भाऊ परचुरे श्रीमहायात्रेस जावयास निरोप घेणार. काल श्रीमंतांस मेजवानी जाहली. बक्षी यांस कैद केलें, हें कारण समजलें असल्यास लिहिणें म्हणोन लिहिलें, त्यास गृहछिद्र जनान्यांतील होतें तें जाहिराण्यांत आलें, सबब राजश्री नानाकडील फितव्यांत (बक्षी वगैरे) आहेत हा बहाणा करून किल्यास रवाना केले; इतकी बाजारी अफवा आहे. आणखी काय आहे न कळे. दुसरें, हे चार कारभारी आलिजाबहादर यांजवळ आहेत यांणीं कारभारांत असूं नये, ऐसें ठरलें आहे म्हणून ही ऐकतों. काय आहे नकळे. चैत्र पौर्णिमेपावेतों गडबड ऐसें लोक बोलतात. काय आहे न कळे. खर्चाचा मजकूर व मागील देण्याचा मजकूर वडिलांस परवां लिहून पाठविलेंच आहे त्याजवरून विदित जाहलें असेल. कळावें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१८२ (चैत्र शु० ७–२४ मार्च)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस र॥ छ० ५ सवाल–

"राजश्री धोंडोपंत गोखले मुद्गलाजवळच आहेत. सात हजारपर्यंत फौजेचा जथ पडला आहे. पुण्याहून एक हत्ती निशाणाचा व खर्चास यावयाचें आहे त्याची वाट पहात आहेत."

नं. ४१८३ श्रीगजानन. (चैत्र शु० १०–२७ मार्च.)

पै॥ छ० ८ सवाल. सन समान तिसैन. माघ.

पत्रें तयार जाहलीं आहेत. परंतु श्रीमंत राजश्री रावसाहेब याणीं कांहीं आक्षेप केला आहे म्हणोन ऐकितों. खरें लटकें न कळे. विदित होय हे विज्ञापना.+

नं. ४१८४ श्रीगणराज. (चैत्र शु० १२–२९ मार्च.)

पै॥ छ० १५ सवाल. सन समान तिसैन. चैत्र.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १० सवाल. यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून पंधरा रोज वर्तमान कळत नाहीं, तर सदैव पत्रीं सांभाळ करावयाची आज्ञा जाहली पाहिजे. इकडील वर्तमान तर रा॥ सखाराम बापू सर्जेराव घाटगे यांची स्वारी पुण्यांत (रहावयास) आली, हें वर्तमान वडिलांस लिहिलेंच होतें. वाड्यांतील मंडळीस निकड बेमुरवत जाहली. रा॥ नारायणराव वैद्य सेनासाहेब सुभा भोसले यांजकडील वकील यांची बेअब्रू फार जाहली. कोरड्यांचा मार दिला. नंतर लोकांची तोड पडावयास प्रारंभ जाहला आहे. राजश्री त्रिंबकराव परचुरे याणीं आठ लक्ष रुपये दरबारखर्चासुद्धां देऊन श्रीमहायात्रेस जाण्यास निघोन गेले. एक दोन रोजीं प्रयाण होईल. याजप्रमाणें बेत ठरला आहे. वरकड मंडळी वाड्यांत आहेत. जनार्दन शिवाजी म्हैसकर याची तोड चाळीस हजारांवर जाहली. ईश्वरें अब्रू न जातां तोड पाडिली. त्याणीं वडिलांकडे (माझे) चाळीस हजार रुपये येणें म्हणोन घाटगे यांजकडील लोकांस सांगितलें आहे. त्याणीं सांगितलें कीं " तुमचे रुपये लोकांकडे येणें ते वसूल करण्यास आम्हांस पुरवत नाहीं. रुपयेची तुम्ही निशा करणें." म्हणोन निकड बसली आहे. रामाजी महादेव यांचे वाड्यांत आहेत. बाळासाहेब यांचे पुतणे व कारकून चार पांच

---

१ पुण्यास येण्याविषयीं श्रीमंतांचीं चिंतामणरावांस पत्रें. + चिठी बाळाजीपंत जोशी कारकून याची. यावर आम्हीं घातलेली मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची. २ नानाच्या पक्षांतली मंडळी शनवारवाड्यांत अटकेंत आहे त्यांस. ३ बाळासाहेबमिरजकर यांजकडे. ४ मी व माझे कारकून.

असामींची नांवनिशी लिहून दिली आहे. त्यांस निकड करून ऐवज घेणें." याजप्रमाणें लिहून दिलें म्हणोन ऐकितों. गृहस्थ आपण पेंचांत आले तरी दुसऱ्याचें वाईट करण्याची बुद्धि सुटत नाहीं !

नं. ४१८५　　श्री. (चैत्र शु० १३– ३० मार्च.)

पै॥ छ ११ सवाल. सन समान तिसैन. चैत्र मास.

विज्ञापना. हल्लीं आपलेकडे जप्तीस स्वांर गेले आहेत त्यांचे देखरेखीस सरकारांतून राजश्री केसो विष्णु सहस्रबुद्धे रवाना जाहले आहेत ते हल्लीं सेवेशीं आले आहेत. मशारनिल्हे पुर्वीपासून पदरचे आहेत. यांचे वस्तु अमर्यादा होणार नाहीं. यांचें नांव निघालें तेव्हां मींच तुम्ही जावें म्हणोन सांगितलें. नाहींतर गैरमाहीत जाता तर ठीक नव्हे, यास्तव हे आपले सोईचे आहेत. वडिलीं केसोपंताविषयीं दिक्कत आणूं नये. सविस्तर मागाहून लिहीन. रवाना तृतीय प्रहर. हे विज्ञापना.

नं. ४१८६　　श्री.　　(१ एप्रिल)

पै॥ छ० १५ सवाल. सन समानतिसैन. चैत्र.

सेवेसी धोंडो बापूजी जोशी साष्टांग नमस्कार विज्ञापना चैत्र व॥ १ वर्तमान क्षेम असे. विशेष. राजश्री जनोबा म्हैसकर यांचा खंड चाळीस हजारांवर जाहला. पंधरा हजार रोख द्यावे, बाकीचे हफ्ते द्यावे, (असें ठरलें.) 'राजश्री मोरो आपाजी व धोंडो बापू व बाळाजीपंत हिपरगी व जिवाजीपंत अण्णा व गणपत रावजी येथें मिरजकरांकडून आहेत. माझा ऐवज (मिरजकर) यजमानांकडे येणें तो यांजपासून घ्यावा' ऐसें सर्जेराव यांजपाशीं (म्हैसकर याणीं) लिहून दिलें, परंतु त्याणीं कबूल अद्याप केलें नाहीं. (गणपत) रावजी वकील यास्तव वाड्यांत गेले, परंतु उलेख निघाला नाहीं. याप्रमाणें वर्तमान आय-

---

१ रामचंद्र श्रीधर ऊर्फ बाबाकाळे यांचें पुण्याहून पत्र. यावरची मिति व इंग्रजी तारीख पेवस्तीची.

किलें. वकिलानें सांगितलें. त्यांणीं वडिलांस लिहिलें असेल. वडिलांस कळावें. बहुत काय लिहिणें. सर्जेराव नानांचे वाड्यांत राहणार. वाड्याची झाडलोट होत आहे. पारिपत्यें लोकांचीं होत आहेत. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१८७　　श्री. (चैत्र व० ३–३ एप्रिल)

आज्ञा केली ऐसीजे. राजश्री बाबूराव नरसिंह यांसीं कित्येक आज्ञा करून पाठविलें. तर कोणे विषयीं हरकत न घेतां त्याचें उत्तर विनंती पत्र पाठविणें. जाणिजे. सुा समान तिसैन. मय्या अल्लफ. र॥ छ० १५ सवाल. बहुत काय लिहिणें.

बार.

पै॥ छ० २९ सवाल. वैशाख मास. सन समान तिसैन.

नं. ४१८८　　श्रीशंकर प्रसन्न. (चैत्र व० ७–७ एप्रिल.)

पै॥ छ० २२ सवाल. सन समान तिसैन. चैत्र मास.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं

पोष्य माधवराव अनंत. सा॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावें. विशेष. करवीरकर याणीं चहूंकडे हंगामा मांडिला यास्तव त्यांचे तोंडावर आपण फौजसुद्धां जावें म्हणोन सरकारचीं पत्रें (आपणांस) गेलीं हा मजकूर रा॥ शिवरामपंत यानीं आपणांस लिहिला आहे; त्यास श्रीमंतांचीं पत्रें आपणांस गेलीं त्याजवरून आपण विचार काय केला हें समजलें पाहिजे. प्रस्तुत विचार पाहतां करवीरकरांचें माहात्म्य वाढत चाललें. तेणेंकरून तूर्त आपलेकडे तालुका आहे तोही गलबलून दुसरे तालुके गलबलतात. चातुर्मास्य वाट पाहिली असतां त्यांचा दाब बसोन जड पडेल. यास्तव श्रीमंतांची आज्ञा व आपला नक्ष पुन्हा त्यांस दाखवावयाचा प्रसंग हाच आहे. याजकरितां हरप्रकार करून

---

१ करवीरकर महाराजांचें स्वदस्तूरचें आज्ञापत्र मिरजकर बाळासाहेबांस. २ रास्ते. ३ थत्ते. ४ करवीरकरांस.

करवीरकरांवर आपली जरब बसवावी हें दोहीं अर्थें प्रशस्तसें दिसतें. आपला मुलूख बचावून लौकिकांत चांगलें व श्रीमंतांचें अंतःकरण (पटवर्धनांविषयीं) स्वच्छ होत जातें. तेणेंकडून पुढें श्रीमंतांस विनंती[1] करावयाचे अर्थाची शक्कल निघती. सुचला विचार लिहिला आहे. आपण काय योजना केली तें लिहून कळवावें. रा॥ छ० १९ सवाल. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

नं. ४१८९ श्रीगजानन. (चैत्र व० ७–७ एप्रिल)

पै॥[2] छ २२ सवाल. समान. चैत्र व॥ १० भौमवासर

छ १९ सवाल मंदवासर. दोनप्रहर. बाजारी वर्तमान वडिलांस घाटगे म्हणतात कीं, "ऐवजाचा जाबसाल उरकणें म्हणजे मुक्तता करितों. नाहींतर (डोंगरी) किल्लेस पाठवितों. दुसरा विचार—येथेंच (तुम्हांस) आणावे लागतील." ऐसें बोलणें घाटगे यांचें आहे. "पैक्याचा जाबसाल बोलिला असतां (ही) सरंजाम वगैरे (परत) द्यावयाचा नाहीं. जीवप्राणाची मुक्तता होते. श्री क्षेत्रीं वास करावा;" म्हणून बोलणें लागलें ऐसी अफवा आहे. काय योग आहे न कळे! सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१९० श्री. (७ एप्रिल)

पै॥ छ० २२ सवाल. चैत्र. समान तिसैन. व॥ १० भौमवार.

[3]सेवेशीं विज्ञापना. तागायत चैत्र व॥ ७ मंदवार सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील राजकी वर्तमान तरी शहरांतील मुत्सद्दी व मातबर गृहस्थ श्रीमंत राजश्री नाना फडणवीस यांजकडील राजकारणांत व मायेंतील होते ते नाना नजरबंद जाहल्यापासून सरकार वाड्यांत होते. कांहीं परवानगी घेऊन घरांत शहरांत होते. त्यांजकडे पैक्याचे ठरावाचा जाबसाल जाहला न्हवता.

---

[1] विनंती परशुराम भाऊस सोडण्याची. [2] बाळाजी गणेश जोशी हिपरगीकर कारकून यांचें बाळासाहेब यांस पत्र. [3] मोरो अपाजी परांजपे वकील याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

हलीं पंधरा दिवस जाहले, राजश्री सखाराम घाटगे याणीं अंतर्यामीं श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांजपाशीं बोलणें बोलोन गृहस्थांस तगादा बहुत केला. हलींही तगादा बहुत चालिला आहे. राजश्री नारायणराव वैद्य यांस छड्यांनीं मारिलें. व बाबूराव केशव याचे पुत्रास मारिलें. राजश्री चिंतोपंत देशमुख यांस ही मारिलें. चाप देशमुख यांजपुढें ठेविले. लाविले मात्र नाहीं. पांच लक्ष रुपये बाबूराव केशव याचे पुत्रांनीं करार केले. देशमुख याणीं पन्नास हजार रुपये कबूल केले आहेत. वैद्य यांणीं तीन लक्ष रुपये कबूल केले आहेत, त्यास त्यांजपाशीं इतका पैका नाहीं. कबूल तो जाहले. पुढें पैका मिळत नाहीं. देवपूजा देखील बाजारांत विकावयास काढिली! या तऱ्हेनें जाहलें आहे. राजश्री त्रिंबकराव परचुरे यांजपासून आठ लक्ष रुपये घेऊन (झाल्यावर ते) श्रीमंतांजवळून निरोप घेऊन, श्रीमहायात्रेस जावयाकरितां भांबवड्यास गेले. फिरोन त्यांस अटकाव केला आहे. राजश्री जनार्दन शिवाजी म्हैसकर याणीं चाळीस हजार रुपये कबूल केले. पैकीं पांच हजार रुपये दिले. बाकीचा पैका मिळत नाहीं. त्यांचे मामा खाडीलकर यांस घाटग्यानीं बांधोन मारिलें. दोनचार दिवस शहरांत रामाजी महादेव यांचे वाड्यांत होते. पैका न मिळे तेव्हां आज प्रातःकाळीं शिंद्याचे लष्करांत घेऊन गेले. वरकड गृहस्थांस ही तगादा बहुत चालिला आहे. श्रीमंतांसमक्ष शिवीगाळ सर्जेराव करितात. श्रीमंताचे चित्तांत कांहीं एक येत नाहीं! बाळोजी कुंजर व सखाराम घाटगे पैका काढावयाचे मसलतींत आहेत. शहरांत मोठा प्रळय जाहला आहे. आज सरकार दौलतीमध्यें व शिंदे यांजकडे दौलतीमध्यें जें करणें तें घाटगे करितील तें प्रमाण. दुसऱ्याचें कोणाचें चालत नाहीं. सखाराम घाटगे नाना फडणवीस यांचे वाड्यांत येऊन राहिले. या रीतीचा प्रकार तूर्त चालिला आहे. आबा शेलूकर यांस गुजराथेचा

सरसुभा सरकारांतून सांगितला. कालच रात्रौ वस्त्रें जाहलीं. खंड त्याचा पेशजी जाहलाच होता. हल्लीं पंधरा लक्ष सरकारांत पैका सरसुभेदारीबद्दल द्यावयाचा करार केला. या रीतीनें चालिलें आहे. मागाहून वरचेवर विनंतीपत्रीं आढळेल तें लिहितों. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असों दिला पाहिजे. हे विज्ञापना.

नं. ४१९१ श्रीगजानन. (चैत्र व० ८-८ एप्रिल)

पै॥ छ० २२ सवाल. समान. चैत्रवद्य १० भौमवार.

छ० २० सवाल. गोपाळराव चिटणीस व यादवराव भास्कर व घाटगे वगैरे चार असामींस प्रतिबंध जाहला म्हणून अफवा उठली, परंतु मिथ्याच गोष्ट! अनुष्ठानाचें पूर्वांग होऊं लागलें. कानिटकर वाकिलानीं न येण्याविसीं पत्रें घेऊन पाठविलीं आहेत म्हणून ऐकितों, त्यास खरें किंवा काय ही आज्ञा व्हावी. स्थळास[2] अपाय बहुत लोक म्हणतात याजकरितां सावध राहिलें पाहिजे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. श्रीमंत राजश्री रावसाहेब ओझरास जाणार. तेथें मोरोबा दादा फडणवीस यांस भेटावयास आणविणार म्हणोन बोलवा आहे. श्रीमंत राजश्री आप्पासाहेब[3] यांचें नांवचा सुभा जाहला तो दुसरेस शेलूकरांस सांगितला. हे विज्ञापना.

नं. ४१९२ श्री (८ एप्रिल.)

पै॥ छ० २४ सवाल. पांचवा तास. चैत्रमास. सन समान तिसैन. तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब. वडिलांचे सेवेशीं —

विज्ञापना. वडिलीं छ० १२ सवालचें पत्र व छ १७ सवालचें पत्र पाठविलें तें पावलें. नांवानिशी लिहून पाठवावी म्हणोन आज्ञा, त्यास

---

१ बाळाजी गणेश जोशी याचे मिरजेस पत्र. २ मिरजेच्या किल्ल्यास. ३ चिमाजी आपा. पेशव्यांचे बंधु. ४ रामचंद्र श्रीधर उर्फ बाबा काळे यांचें पत्र. ५ मिरजेच्या किल्ल्यांत सर्जेराव घाटग्यानें फितूर केला होता त्यांत ज्या जमाती सामील होत्या त्यांची.

मी त्याच शोधांत आहें. ज्या गृहस्थापाशीं थांग लागावयाचा तेथें आज दोन तीन दिवस जात आहें. परंतु त्याची गांठ यथास्थित पडली नाहीं. कारण काय म्हणतील तरी श्रीमंत राजश्री नाना फडणवीस यांस शुक्रवारीं रात्रीस चंद्रोदय जाहल्यानंतर दोन घटिकांनीं अमदानगरास कैदेस नेलें. याजमुळें ते गृहस्थ बहुत दिक्क आहेत. याजमुळें चार दिवस अवकाश करून पत्ता लागला म्हणजे तपशीलवार लिहून पाठवितों. वडिलीं काळजी करूं नये. जसजसा येथें थांग लागेल तैसें कळवितों. नामावळीचें खर्च कशावरून? परंतु जें आयकिलें होतें तें श्रवण व्हावें यास्तव ती॥ राजश्री सखोपंत काकाबरोबर विनंती सांगून पाठविली होती. वडिलीं सावध आहों म्हणून लिहिलें, त्यावरून बहुत आनंद जाहला. करवीरकर याणीं चंडीच्या[1] जपास प्रारंभ केला आहे म्हणून लिहिलें तें कळलें. राजश्री रत्नाकरपंत सावनूर तालुकेंत ठाणीं बसवीत आहेत त्यांस (करवीरास परत) आणावयास पाठवावयाचें प्रयोजन काय? महाराज स्वारीस निघून कोणीकडे जाणार? आजचा प्रसंग जो जबरदस्तीनें राहील त्याचा आहे! कोणी कोणास विचारावयाचें नाहीं. ईश्वराचे चित्तीं याजउपरी ब्राह्मणाचा हुकूम चालू नये याप्रमाणें आलें आहेसें भासतें. मग दैवदशा कळत नाहीं. तूर्त शिंदे यांचे घरीं कारभारी एक सर्जा आहे. तेव्हां दौलत चालणें कळतच आहे! परंतु आज सद्दी त्याचीच उभी राहिली आहे. पुण्यांत मारामार चालली आहे यांत कोण पार पडतात पहावें! तूर्त श्रीमंतांपाशीं मुखत्यार राजश्री चक्रदेव, पिंगळे व कुंजर आहेत. शिंदे यांची फौज करवीरच्या पारिपत्यास येती, परंतु दिवसगत आहे. याचें कारण बक्षी कैद जाहले याजमुळें फौज अगदीं बेदिल. तसेच कंपूही बेदिल आहेत. पैक्याचा गवगवा बहुत आहे. याजमुळें कोणाचा पायपोस कोणाचे पायांत नाहीसा जाला आहे. देव (करवीरकर महाराजांचें) चांगलें आहे (परंतु) करवीरकर

[1] शतचंडीचा जप शत्रुनाशार्थ।

दैवहीन आहेत. आजपर्यंत साताऱ्यापर्यंत मुलूख घ्यावा तें कांहीं करीत नाहींत ! वडिलीं ही महाराजांशी विरुद्ध मांडूं नये. उगाच एक दोरा राखावा. सविस्तर मागाहून लिहीन. रवाना चैत्रवद्य अष्टमी रविवार हे विज्ञापना.

नं. ४१९३ श्री. (८ एप्रिल.)

पै॥ छ० २४ सवाल. पांचवा तास. चैत्रमास. सन समान तिसैन.

विज्ञापना. येथें ती॥ राजश्री दादाकडील[2] राजश्री गणेशपंत म्हणोन वकील आहेत ते शिंदे यांचे घरीं वगैरे जाऊन बोलत असतात, कीं " दादांस करवीरची मसलत सांगावी. सरकारांतून मुतालकीचे शिक्के देवावे. वस्त्रें देवावीं. पांच हजार फौज कुमक देवावी. लागेल तो पैका खर्च करितों, आणि करवीरकर यांचें पारिपत्य करितों. पांच रुपये दरबार खर्चही करितों. " याप्रमाणें शिंदे यांचे घरीं अगत्यवादाचें बोलत असतात. पुण्यांत आवाई कीं रघुनाथरावदादा याणीं करवीरची मसलत पतकरिली आहे. ऐसी दाट आवाई आहे. वडीलही[3] या घाटांत आहेत म्हणोन ऐकितों. त्यास आज करवीरकर जबरदस्त आहेत. शिंदे यांचे घरीं बैदा आहे. सरकार आहे हें कळत आहे ! यांत करवीरासीं विरोध लावणें चांगलें दिसत नाहीं. वडील सर्वजाण आहेत. जें करणें तें विचार करून करावें. परिणाम लागेल तें करावें. सुचला प्रकार लिहिला आहे. काल परम कठिण आला आहे ! राज्य बुडतेंसें भासतें. रवाना चैत्र वद्य अष्टमी रविवार. हे विज्ञापना.

नं. ४१९४ श्रीगणराज. (१० एप्रिल.)

पै॥ छ० २२ सवाल. चैत्र व॥ १० सन समान तिसैन.

---

१ रामचंद्र श्रीधर ऊर्फ बाबा काळे याचें पुण्याहून मिरजेस पत्र. २ रघुनाथराव कुरुंदवाडकर. ३ तुम्ही.

[१]विज्ञापना. राजश्री नाना फडणवीस यांस छ० १९ सवाल भृगुवारीं अर्ध रात्रीस स्थळांतर केलें. डांकेवरून नगरचे किल्ल्यावर नेलें. कळावें हे विज्ञापना.

नं. ४१९५ **श्रीगणराज**. (चैत्र व० १०–१० एप्रिल.)

पैा छ० २२ सवाल. सन समान तिसैन. चैत्र.

[२]विज्ञापना. मिरजेचे किल्ल्यास कांहीं दुष्ट बुद्धि करून घाटगे याणीं फितवा केला आहे. दोन तीन जमाती फितल्या आहेत म्हणोन काल येथें काळे आले त्याणीं मजजवळ सांगितलें. वडिलांसही सांगून पाठविलेंच आहे, असें म्हणत होते. त्यास मीं मशारनिल्हेस सांगितलें आहे कीं, पांच रुपये खर्च करून त्यांचीं नांवें समजोन घ्यावीं म्हणजे लिहून पाठवूं ऐसें सांगितलें आहे. त्यास किल्ल्याची बंदोबस्ती चांगली राखिली पाहिजे. घाटगे याचें मानस हर कसेंही करून स्थळ हस्तगत करून घ्यावें म्हणजे मोठी जागा बसावयास जाहली, ऐसें ऐकणेंत आलें. याजकरितां सूचनार्थ विनंती लिहिली आहे. श्रींनें सर्वोपरीं राक्षिलें पाहिजे. बहुतकरून हीं गोष्ट तथ्य नसेलच. परंतु ऐकलेलें वर्तमान वडिलांस विदित व्हावें करितां विनंती लिहिली आहे. कळावें. सेवेशी विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१९६ **श्रीगणराज**. (चैत्र व० १२–१२ एप्रिल.)

पै॥ छ० ३ जिलकाद. सन समान तिसैन. वैशाख मास.

[३]अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० २४ सवाल. यथास्थित असे. विशेष. इकडील वृत्त सविस्तर सूतरस्वार याजबरोबर लिहिलें आहे. राजश्री

---

१ विठ्ठलराव पांडुरंग यांची पुण्याहून मिरजेस चिठी. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची. २ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पुण्याहुन मिरजेस पत्र. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे. ३ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस पत्र.

गंगाधरपंत भानू यांस सरकारचे वाड्यांतून सर्जेराव याणीं राजश्री नाना यांचे वाड्यांत आणिलें होतें. नंतर लष्करांत नेलें. तेथें ऐवजाची तोड पडेल म्हणत होते, परंतु ऐवज पटला नाहीं. कोणी विष घेऊन वारले म्हणतात. एकूण चैत्र शु॥ ११ मंगळवारीं अर्ध रात्रीस काल जाला. ईश्वरें अनुचित केलें. भवितव्यापुढें उपाय नाहीं. राघोपंत गोडबोले, भाऊकापशे, बळवंत बाबूराव यांजवरही प्रसंग कठीणच! प्राणासीं गांठ! दररोज वस्त्रविरहित (करून) तोफेवर[1] बसवितात म्हणोन ऐकितों. खरें लटकें भगवंत जाणे! जे जे ज्याचे कपाळीं संस्कार असतांत ते चुकत नाहींत! ईश्वर इच्छेस उपाय नाहीं. कळावें सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४१९७ श्रीगणराज. (चैत्र व० १२–१२ एप्रिल.)

पै०॥ छ० २७ सवाल. सन समान तिसैन.

विज्ञापना. तागायत छ० २४ सवाल. यथास्थित असे. गोपाळराव चिटणीस याणीं बक्षीगिरी सोडिली. यादवराव भास्कर याचे बंधूस वस्त्रें बक्षीगिरीचीं देणार, म्हणोन वर्तमान एक. दुसरें नारायणराव बक्षी वगैरे मंडळीस आणविणार म्हणोन वर्तमान एक. ऐसी बाजारी अफवा आहे. सौभाग्यवती चिमाबाईस राजश्री मोरोबादादा यांचे भेटीस जाण्याची आज्ञा जाहली आहे. कधीं जातात पहावें. इंग्रजांचे वकील आले होते ते अलीजाबहाद्दर यांस भेटले. ठर काय जाहला समजलें नाहीं. मागाहून लिहून पाठवितों. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४१९८[2] श्री. (१२ एप्रिल.)

पै॥ छ० २६ सवाल. मंदवार. तीन तास रात्र. सन समान तिसैन.

---

१ दोन प्रहरीं उन्हांत तापलेल्या तोफेवर. २ विठ्ठलराव पांडुरंग यांचें मिरजेस पत्र.

श. १७२० मिरजकरांचें घरगुती भांडण. इ. स. १७९८

विज्ञापना. तागायत चैत्र वद्य ११ गुरुवासर प्रातःकाळ वर्तमान यथास्थित असे. विशेष. तेथून आले गृहस्थ त्यानीं येथें उपद्व्याप बहुत केला. आणखीही करीत आहेत. परंतु चालत नाहीं हें समजोन राजश्री बजाबा शिराळेकर यांचे गुजारतीनें राजश्री गणपतराव महादेव यांजकडे बोलणें लावावें, आणि स्वामींस गणपतराव याणीं लिहून स्वामीचें अभय आल्यानंतर मग मिरजेस जावें ऐसा भाव आहे, म्हणोन राव मशारनिल्हे किंचित् बोलिले. ऐशास येथील विचार पाहतां सारीच गलबल. पुढें राजकारण कोणते तऱ्हेस जातें समजत नाहीं. स्वामीकडे करवीरची मसलत सरकारांतून सांगणार त्याचे जाबसाल कित्येक सरकारांतून बोलणें होऊन यादीवर करार श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांचा होऊन निश्चयात येईल त्यांत यादींत हें कलम गृहस्थ आमचे हातीं यावे हें असेलच. हेच गृहस्थ तिकडे गेले नंतर मग फार करून खूळच मोडिल. तूर्त प्रसंगीं येथें वाडच्यांत मोठी मौज जाहली आहे. जिवाजीपंत याचें व श्रीमंत राजश्री बापूसाहेब यांचें खलबत. व मातुःश्रींचें व अण्णाचें खलबत. राजश्री कोन्हेरराव भगवंत नरगुंदकर हे त्यांत आहेत. आणखी गोविंद भट गाडगीळ, राघवाचार्य, अण्णांजवळ वासुदेव म्हणून कऱ्हाडा आहे तो, आणखीही एक दोन गृहस्थ, याप्रमाणें मोठे सायास मांडिले आहेत. श्री॥ राजश्री चिंतामणराव अप्पा (श्रीमंतांच्या बोलावण्यावरून)पुण्यास येतात ऐसें येथें प्रथम कळलें ते समयीं सर्वांस बहुत संतोष जाहला होता. अलीकडे अप्पासाहेब (मिरजेस गणपतीच्या) मळ्यांत येऊन राहिलेआहेत. येतात न येतात हें कळत नाहीं.(त्यामुळें हे गृहस्थ) दोन दिवस चिंताग्रस्त जाहले आहेत. आम्हां उभयतांजवळ[3] निर्मळ कोणी बोलत नाहीं. असोत !

---

१ मोरो आपाजी परांजपे याचें पत्र पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस. २ जिवाजी रामचंद्र जोशी पोतनीस. ३ मी व धोंडो बापूजी जोशी यांजवळ.

कामही लागत नाहीं. राजश्री बाबा काळे यांचा व अण्णांचा एक विचार दिसतो. वडिलांचे समजण्यांत आला असेल तो प्रमाण ! स्वामीनीं करवीरची मसलत कबूल केली तरी या गृहस्थास (येथून) घेऊन जावें. श्रीमंत राजश्री बापूसाहेब याणीं मिरजेस यावें, सरकारांतून त्यांस निरोप द्यावा, हा विचार असावा. पुण्यांत काय म्हणोन रहावें ? चाकरीचे दिवस, त्याअर्थीं सरकारकामावर असावें. बापूसाहेब मिरजेस गेले म्हणजे मसलती राहिल्या. राजश्री आबा काळे यांचे गुजारतीनें (विठलराव बापूनीं) श्रीमंतांचें दर्शन घ्यावें, याप्रमाणें खलबत येथें जाहलें. एक दोन दिवसीं भेट व्हावी, असें बोलण्यांत आलें तेंही राहिलें. येथें मोठी वळवळ मांडिली आहे. असोत ! ईश्वरी इच्छा प्रमाण. राजश्री गणपतराव यांस सूचना करून ठेविली कीं, जिवाजी-पंताचे बोलणें शिराळेकर यांचे मार्फतीनें तुम्हांजवळ होऊन, बोलण्यांत भाव मला श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांचें अभय आलें असतां मी मिरजेस जातों. ऐसे बोलणें जाहल्यास ‘ विनंतीपत्र मिरजेस पाठवितों. आज्ञा येईल त्याप्रमाणें बोलणें ठरेल. आज्ञेखेरीज तुम्हांजवळ काय म्हणोन उगेंच सांगावें ? ’ ऐसें बोलावें म्हणोन सूचना केली. तें त्यांचेही युक्तीस आलें. राव सेवेशीं विनंती लिहितील. स्वामीचें उत्तर मात्र दस्ता-ऐवजीं नसतां यावें. त्या गृहस्थाचें अवसान कमी जाहलेंसें दिसतें. असोत. हरिपूरच्या संस्थानाकडे एक पैसा देखील द्यावयाचा योग होऊं नये. देतों घेतों म्हणावें. ‘ प्रसंग या प्रकारचा, कर्जाशीं गांठ पडली आहे, तूर्त हरकसें करून चालवावें, ’ याप्रमाणें सांगावें. जशी पायमल्ली होईल ती गोष्ट हरतऱ्हेनें जाहली पाहिजे. यथाज्ञानें लिहिलें आहे. स्वामी सर्वज्ञ. मर्जीस येईल तें केलें पाहिजे. श्रुत होय हे विज्ञापि.

नं. ४१९९ **श्रीगजानन**. (चैत्र व० १३–१४ एप्रिल.)

पै॥ छ० ३ जिलकाद. सन समान तिसैन. वैशाख मास.

विज्ञापना. तागायत छ० २६ सवाल. क्षेम असे. विशेष. राजश्री अमृतराव टकले येथें होते. धारवाडचा किल्ला प्रथम ठाणें बसलें ते वेळेस कांहीं तफावत जाहली म्हणून तजकरा उभा राहिला आहे. स्थळांतरही येथून जाहलें म्हणोन ऐकतों. खरें लटकें न कळे. आलिजाबहाद्दर याणीं आपल्याकडील मुकेरी साहेबाचा कंपू रवाना केला. आज जेजुरी किंवा लोणीचे मुकामास गेला. मुकेरीचे लेंकास कपितान हा किताबा दिला. वीस हजार पेंढार आलिजाबहादर याणीं (हिंदुस्थानांतून) आणविलें आहे. फौज पंधरा हजार. शिवाय घाटगेकडील फौज दहा हजार. त्यांत सरदार हिरोजीराव पाटणकर, रखमाजी जाधव, गोपाळराव मोहिते, आणखी दोन गृहस्थ, ऐसे तिकडे येणार. घाटगे याची कलमजारी आहे. पायदळ फौज ठेवीत आहेत. कोणे वेळेस काय होईल हें समजत नाहीं. श्रीनिर्मित न कळे. त्रिंबकराव भाऊ परचुरे येथून गेले. टोंकेंस जातों म्हणोन गेले. सेवेशीं विदित होय, हे विज्ञापना.

नं. ४२००   श्री   (चैत्र व० १३-१४ एप्रिल.)

पै॥ छ० २६ सवाल. तीन तास. मंदवार. चैत्र. सन समान तिसैन.

विज्ञापना. सखाराम घाटगे श्रीमंत राजश्री नानांचे वाड्यांत येऊन राहिले. नानांचे देवघरांत अजापुत्राचा वध नित्य चालला आहे ! नानाची बैठक होती तेथें कारभारास (घाटगे) बसत असतात. पुण्यांतील गृहस्थांस दाक्षिण दिशेच्या स्वामीप्रमाणें (घाटग्याचें) भय जाहलें आहे. राजश्री गंगाधरपंत भानु यांस शिंदे यांचे लष्करांत नेलें आहे. पांच लक्ष रुपये मागतात. मोठें संकट त्यांजवर आहे. असोत ! जनार्दन शिवाजी याचा खंड पसतीस हजार रुपयांवर ठरला. त्यापैकीं दहा हजार रुपये दिले. बाकी पंचवीस हजार रुपये

---

१ बाळाजी गणेश जोशी कारकून यांचें पुण्याहून मिरजेस पत्र. २ मोरो अप्पाजी परांजपे वकील यांचें पुण्याहून मिरजेस पत्र. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

आजपासून एक महिन्यांत देतों म्हणोन तगादा मना केला. (शिंद्याच्या) लष्करांत राहुटी देऊन आहेत. रखवालीस गाडदी वीस असामी मात्र आहेत. निकड नाहीं. त्यांचे मातुल वेदमूर्ति राजश्री सदाशिव भट्ट खाडीलकर ऐवज आणावयास जेथें राजश्री दाजीबा म्हैसकर आहेत तेथें गेले आहेत. ऐवज येईल तेव्हां मुक्तता होईल, असें आहे. उभयतां श्रीमंतांचें अंतर्यामीं चित्त शुद्ध नाहीं. हल्लीं श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांजपाशीं कारभार पिंगळे, काळे, नारोपंत चक्रदेव करितात. फडचा कारभार राजश्री बापूजीपंत लेले करितात. तृणाची प्रबलता जाहली आहे ! ब्राह्मण म्हणजे पदार्थ काय याजप्रमाणें शिंद्याचें घरीं तूर्त जाहलें आहे ! ईश्वर इच्छा ! श्रीमंत राजश्री मोरोबादादा येणार. लोक वर्तमान दाट बोलतात. मागाहून विनंती लिहितों. हे विज्ञप्ति.

नं. ४२०१ **श्रीगणराज.** (१० एप्रिल.)

पै।। छ० २६ सवाल. समान.

चैत्र वद्य १० भौमवार. विज्ञापना. राजश्री आबा शेलूकर यांस अमदाबाद येथील सुभा सांगितला, त्यास राजेबहादर यांचे मार्फतीनें श्रीमंतांसी बोलून छ० १८ सवाल गुरुवासरीं रात्रौ वस्त्रें घेऊन आपले वाड्यांत दाखल जाहले. शिरपेंच एक दिला. बेवीस लक्ष रुपये ऐन खंड व तीन लक्ष रुपये दरबारखर्च याजप्रमाणें ठराव होऊन जमाखर्च सरकारचे कागदीं होऊन मग वस्त्रें जाहलीं. केसोपंत दातार याणीं फौज पायदळ जमा केलें होतें, तें चहूंकडे गेलें. पैक्याखालीं गृहस्थ फुकट आले ! भिकंभट अण्णा निजसुरे व गंगाधरपंत भानु ऐसे उभयतांस राजश्री नाना यांचे वाड्यांत घाटगे राहिले आहेत तेथें आणिलें. मोठा कहर शहरांत आहे. श्री इच्छा प्रमाण. कळावें करितां विनंती लिहली आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

---

१ बाजीराव व अमृतराव. २ बाजीराव. ३ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पुण्याहून मिरजेस पत्र.

नं. ४२०२ श्रीगणराज. (चैत्र व० ३०-१६ एप्रिल.)

पै॥ छ० ३ जिलकाद. सन समान तिसैन. वैशाखमास.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० २८ सवाल यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. इकडील वर्तमान तर वकिलाकडील माणसाबरोबर लिहिलें आहे त्याजवरून कळलेंच असेल. गोविंदपंत भानु आंबेगांवास होते. चैत्र व॥ ९ इंदुवारीं अकस्मात् काल जाहला. वृद्धकाळीं पुत्रशोक पाहण्याचा नव्हता (हें त्यांचें सुदैव होय !) चैत्र वद्य ११ बुधवारीं अर्धरात्रीस काल गंगाधरपंताचा जाहला. आलिजाबहादर यांचे लष्करांत घाटगे याणीं गंगाधरपंत भानू यांस नेलें होतें. तेथेंच काळ जाहला. आंबेगांवास (शिंद्याची) चौकी गेली होती, तेथून मुलें मनुष्यें सारीं परागंदा जाहलीं. गंगाधरपंत तात्या यांची थोरली स्त्री वांईस आहे तेथें आस्थि पाठवावयाची आज्ञा जाहली आहे म्हणोन ऐकतों. तीर्थस्वरूप आप्पा बळवंत यांस चैत्र व॥ १३ मंदवासरीं तिसरे प्रहरापासून अंगाची काहिली जाहली. वायु जाहला. चैत्र व॥ १५ रविवासरीं सकाळच्या दीड प्रहर दिवसास काल जाहला. ईश्वरें मोठें अनुचित केलें. होणार भवितव्यास उपाय नाहीं. राजश्री गणपतराव बन्याबा बापू मेहेंदळे यांचा धाकटा मुलगा दोन महिन्यांचा आहे तो आप्पास (दत्तक) दिला. श्रीमंतांस विनंती करून आप्पांचे ओट्यांत घातला. आप्पांसारखा पुरुष होणें कठीण ! श्री इच्छेस इलाज नाहीं. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना. आप्पांचे दहनाचे समयीं मीही नदीस गेलों होतों. फडके वगैरे मंडळीही तेथें आली होती. कळावें हे विज्ञापना.

नं. ४२०३ श्री. (१६ एप्रिल.)

पौ॥ छ० २ जिलकाद. सन समान तिसैन. वैशाख मास.

---

१ विठ्ठलराव पांडुरंग यांचें पुण्याहून मिरजेस पत्र.

सेवेशीं गणेश महादेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत चैत्र व॥ ३० पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील मजकूर तरी सरकारचा निरोप मोठ्या जबरदस्तीनें सिद्ध. सक्त रदबदलीनें निरोप जाहला. लवकरच सेवेशीं तत्पर होतों. वरकड मजकूर सविस्तर भेटीअंतीं निवेदन करीन. वद्य दशमीस गंगाधर गोविंद भानु–विदुराचे घरीं प्रतिबंधांत होते तेथें निकड होऊं लागली. सबब अविचार करून देवलोक पावले. त्याचे पूर्वी एक दिवस मशारनिल्हेचे तीर्थरूप आंबेगांवीं होते–समाधान फारच नव्हतें– तेही देवलोकास गेले. मशारनिल्हेची स्त्री समागमें गेली. आज तिसरे प्रहरीं रविवारीं अप्पा बळवंत मेहेंदळे भागवतपारायणें होत असतां वायूचा प्रादुर्भाव होऊन सहा प्रहर मलमूत्र बंद होऊन दोन प्रहरीं काल जाहला. मोठें अनुचित जाहलें. ईश्वर–इच्छा प्रमाण. आप्पासाहेबांस दत्तपुत्र सरकारांतून राजश्री गणपतराव मेहेंदळे यांचा दिला. स्वामींस विदित व्हावें येतदर्थीं विनंती. वरकड निरोप समयीं श्रीमंतासीं एक प्रहर एकान्तीं बोलणें जालें. भेटीअंतीं निवेदन करीन. स्वामी प्रतापवंत. त्यापेक्षां श्रीमंतांची कृपा पूर्ण जाहली. सविस्तर निवेदन करीन. पंधरा दिवसांचा निरोप दिला. राजश्री अलिजाबहादर यांचे येथील मुत्सद्दी रामजी पाटील व रायाजी पाटील व मीरजी बावीकर; रामजी कुवर यांस लष्करांबाहेर (शिंयानीं घालवून) लाविलें. तूर्त कारभारी घाटगे मात्र मुख्य आहेत. करवीराहून वकिलींस[1] जोशीराव व यादव ऐसे येथें येऊन दाखल जाहले. कळावें. येथून सरकारांतून कारकून तेथें[2] दहा जासूद देऊन बातमीस रवाना जाहला. मुख्य फौज नित्य जारी किती होती तें लिहावें, येविषयीं

---

१ कानिटकर वकील. २ मिरजेस. तुम्ही किती फौज ठेवितां याच्या चौकशीस.

आज्ञा होऊन रवाना जाहले. कारकून ममतेचा आहे. येथें मुख्य मसलतदार काळे व पिंगळे + + +[1]

नं. ४२०४   श्री. (वैशाख शु० १–१७ एप्रिल.)

पै॥ छ० २ जिलकाद. वैशाखमास. सन समान तिसैन. एक घटका दिवस प्रातःकाळ.

सेवेशीं येसाजी गोविंद व बाबाजी विश्वनाथ साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २९ सवाल सोमवासरपावेतों मुक्काम सातारा यथास्थित असे. विशेष स्वामींची आज्ञा घेऊन निघालों ते माहुलीस मंदवारीं आलों. रविवारीं व इंदुवारीं दोन प्रहर पावेतों दिनशुद्धि चांगली नव्हती, सबब भेटीस गेलों नव्हतों. दोन प्रहरानंतर साताऱ्यास आलों. नंतर श्री॥ राजश्री माधवराव रास्ते सरकारचे वाड्यांतच आहेत तेथेंच भेट जाहली. राजश्री कृष्णाजीपंत ढेकणे पुण्याहून आले आहेत. राजश्री शिवरामपंत थत्ते पुण्यास गेले आहेत. रास्ते यांच्या फौजेचा मुक्काम करंज्यानजीक वेण्णातीरीं आहे. फौजेंत गंगाधरराव रास्ते कैलासवासी यांचे कनिष्ठ पुत्र असतात. दिवसास व रात्रीस स्वारांचा छबीना चौकीस वाड्याजवळ असतो. राजश्री आबा काळे याचे निसबतचें मुसा वास याचें पलटण एक आलें आहे तें सरकारचे वाड्यांत व शहरांत चौकीस आहे. महाराजांचेही हजार पांचशें लोक शहरांत आहेत. स्वार दोन चारशें आहेत. त्यास महाराजांस विनंती करून, 'लोक वरचेवर कशास पाहिजेत? जी आज्ञा करणें ती आपणास करावी,' अशी रास्ते याणी विनंती करून महाराजानीं लोकांस निरोप द्यावा असें केलें आहे. स्वार चाळीस पन्नासांस निरोप जाहला. बाकीच्या लोकांस निरोप देतात. थत्ते यासीं महाराजांशीं बेबनाव. येथें थत्ते नसावे असा महाराजांचा आग्रह. यास्तव थत्ते पुण्यास गेले. थत्ते याजकडील कारकून येथें आहेत.

---

१ पत्र इतकेंच अपूर्ण सांपडलें.

तेंही नसावे असें महाराजांचें म्हणणें आहे. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं० ४२०५ (वैशाख शु. २–१८ एप्रिल.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० १ जिल्काद समान तिसैन.

" रत्नाकरपंत राजाज्ञा यांचा मुक्काम काल ज्याडर हेबळीवर होता. समागमें गाडे दीड हजार व गुरें वीस हजारपर्यंत आहेत. आज संगोळी परगणे कित्तूर येथील मुक्कामास येणार आहेत. कित्तूरकर सरदेसाई होंगलाहून त्यांचे भेटीस जमावसुद्धां जाणार आहेत. रत्नाकरपंत खानापुरावरून आजरेकडे जाणार ही एक आवई व दुसरी बेळगांव शहापुराकडे जाणार अशी आहे. "

नं ४२०६ श्री. (वैशाख शु० ३–१९ एप्रिल.)

पै॥ छ २ जिलकाद समानतिसैन.

[1]विज्ञापना सातारेंतील मजकूर तरी महाराजांस व राजश्री शिवरामपंत थत्ते यासीं ठीक पडेना. सबब माघारे वेण्येवर लष्करांत आले. तेथेंही राहूंनये असा आग्रह पडला तेव्हां पुण्यास गेले. हल्लीं बोलणें महाराजांचें रास्ते यांचे विद्यमानें होत आहे. राजश्री बाबूराव आपटे एकटेच किल्ल्यावर आहेत. सारें कुटुंब भाऊ व पुतणे शहरांत कैदेंत आहेत. राजश्री सदाशिवपंत फडणीस यांचे घरीं व राजश्री कुशाबा कारभारी यांचे घरीं महाराजांची चौकी आहे. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं ४२०७ श्री (वैशाख शु० ३–१९ एप्रिल.)

पै॥ छ० २ जिल्काद. समान तिसैन.

---

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चाफेकर यांचें नजीक सातारा येथून रास्त्यांच्या लष्करांतून पत्र मिरजेस, यावरची मिती व इंग्रजी तारीख पेनसलीची आहे.

[1]विज्ञापना. राजश्री अप्पा बलवंत यांसीं पैका मागों लागले. पुढें कसें घडतें हें समजेना. त्याणीं रात्रौ अमृतप्राशन केलें आणि देवाधीन जाहले, असें वर्तमान श्रीमंत राजश्री माधवरावजी रास्ते याणीं सांगितलें. परंतु आपलें लिहिणें आलें नाहीं. वर्तमान बहुत करून खरेंच असें (रास्ते) म्हणाले. हे विज्ञापना.

नं ४२०८ श्री (वैशाख शु० ३–१९ एप्रिल.)

पै॥ छ० २ जिलकाद. समान तिसैन.

[2]पु॥ सेवेशीं विज्ञापना. राजश्री गंगाधरपंत भानु यांस शिंदे याणीं आपले लष्करांत नेऊन बेअब्रू केली. सर्व अंगास चाप लाविले. तोफेवर बसकून पायास धोंडे बांधून विपत्त्य होऊन मृत्यु पावले. याप्रमाणें रास्ते यांचे डाकेचें पत्र आलें. ईश्वरें मोठी अनुचित गोष्ट केली. हें वर्तमान स्वामींस कळलेंच असेल. भाऊंस देव आज्ञा जाहल्याचा अमुक दिवस असा समजला नाहीं. स्वामींस पण्याचीं पत्रें आलींच असतील. विदित होय हे विज्ञापना.

नं. ४२०९ श्री. (वैशाख शु० ३–१९ एप्रिल.)

पै॥ छ० २ जिलकाद. समान तिसैन.

[3]विज्ञापना. रास्ते यांची डाक पुण्याची बसली आहे. दिनचर्येचें वर्तमान येतें. इंदुवारीं अस्तमानीं पत्रें आलीं त्यांतील वर्तमान राजश्री खंडोपंत वर्तक व राघोपंत गोडबोले यांची नेअब्रू केली व राजश्री मोरोपंत गोडबोले यांचीही सदरप्रमाणें शोभा जाहली

---

१ पत्र साताऱ्याहून रास्त्यांच्या लष्करांतून बाबाजी विश्वनाथ चांफेकर कारकून शिलेदार याचें मिरजेस बाळासाहेबांस. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची. २ पत्र. साताऱ्याहून रास्त्यांचे लष्करांतून बाबाजी विश्वनाथ चांफेकर याचें. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची. ३ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चांफेकर याचें पत्र, नजीक सातारा येथून रास्त्यांच्या लष्करांतून मिरजेस. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे

सर्व करणें तें घाटगे राजश्री नानांचे वाड्यांत राहून करीत आहेत. रायाजी पाटील व फकीरजी गाढवा व रामजी पाटील या त्रिवर्गांवर इतराजी शिंदे यांची होऊन त्यांस घरास जाणें म्हणोन निरोप दिले. प्रस्तुत सर्वाभ्य (धिक) कारभार घाटगे यांचा आहे. पुढें परिणाम लागोन कोणत्या थरास जातें पहावें. राजश्री गोपाळराव व कृष्णोबा चिटणीस उभयतां कारभारी शिंदे यांजवळ आहेत ते—शिंदे यांचें घटकेस एक (कारस्थान) होतें. भरंवसा त्यांस पुरत नाहीं, कोणे वेळेस आपलेवर इतराजी होईल हा भरंवसा नाहीं, — यास्तव उभयतां निरोप मागणार. याप्रमाणें वर्तमान आहे. राजश्री त्रिंबकराव परचुरे श्रीमंतांची आज्ञा घेऊन महायात्रेस गेले. टोक्यांस गंगातीरीं पोंचले. कफक्षयाची भावना झाली आहे. राजश्री तात्या जोशी हल्लीं सातारे-यासीं महाराजांचे बोलणेंबद्दल पुण्याहून आले आहेत. राजश्री मोरोबादादा त्रिंबकीं आहेत. त्याणीं त्रिंबकचा किल्ला व धोडप व कोळवणचे वगैरे पांच चार किल्ले बळकावून हजार दीड हजार फौज ठेवून आहेत. पुण्यास प्रस्तुत येत नाहींत. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

+ नं. ४२१०　　**श्रीगणराज.** (वैशाख शु० ४—२० एप्रिल.)

पौा छ० ३ जिलकाद. सन समान तिसैन. वैशाख मास.

विज्ञापना. भानूंस पंधरा लक्ष तजकरा व आठ लक्ष खंड मागत होते. ऐवज उत्पन्न न होय, तेव्हां हाता पायांस दगड बांधिले. शेवट वस्त्रविरहित करून दोन प्रहरां तोफ उष्णांत तप्त होते त्या तोफेवर बसविलें. त्याची झळ नाजूक जाग्यास लागली. नंतर ताडणही जाहलें. शेवट काल जाहला. कांहीं भक्षून वारले हा बहाणा म्हणतात. दैव-योगानुसार गोष्टी घडतात. भानूंच्या येथील घरांत सर्व जिन्नब होतें तें घाटगे याणीं आणिलें. आंबेगावास ही जप्ती गेलीसें म्हणतात.

---

१ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें मिरजेस पत्र. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैनस्तीची आहे.

जनार्दन शिवाजी म्हैसकर याची तोड पाडिली. ऐवज आणावयास पंत मशारनिल्हेचे मातुळ मंगळवेढ्यांस गेले आहेत. मंगळवेढ्यांहून दाजीबा म्हैसकर मुलें माणसेंसुद्धां स्थळांतर केलें ऐसें म्हणतात. खरें लटकें न कळे. गंगाधरपंत तात्या बहुत थोर होते. ईश्वरें त्यांवर मोठा समय गुदरला. श्री इच्छेस इलाज नाहीं. राजश्री[1] गोविंदपंत नानास पुत्रशोक जाहला त्यांचे दुःखास पारावार नाहीं. ईश्वर इच्छा प्रमाण. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री रामकृष्णराव[2] अण्णाही आंबेगांवास आहेत. कळावें हे विज्ञापना.

नं. ४२११ **श्रीगणराज.** (वैशाख शु० ४–२० एप्रिल.)

पै॥ छ० ३ जिलकाद सन समान तिसैन. वैशाख मास.

विज्ञापना[3]. रास्त्यांस अलिजाबहादर पन्नास लक्ष रुपये मागतात. तेथें राजश्री काशीराव रास्ते होते त्याणीं स्थळांतर केलें म्हणोन ऐकतों. राजश्री आनंदराव दादा मात्र (येथील) वाड्यांत आहेत. चौकीही (शिंद्याची) बसली आहे म्हणोन ऐकितों. ईश्वरी तंत्र काय आहे न कळे. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. विदित होय. विज्ञापना.

सेवेशीं विज्ञापना. दुसरें बाजारी वर्तमान—

आप्पांस बन्याबा बापू मेहेंदळे यांचा पुत्र दोन महिन्यांचा दिला. त्यास राजश्री सर्जेराव घाटगे याजकडील कारकून व नवती (?) पंचवीस असामी जाऊन दहनाचे पूर्वी आप्पाचे घरीं बसले;

---

१ पण गंगाधरपंत वारले त्याच्या आदल्याच दिवशीं आंबेगावास गोविंदपंत वारले होते. २ ज्यांस हें पत्र लिहिलें आहे त्या गंगाधरराव गोविंद पटवर्धन यांचे हे रामकृष्ण गंगाधर भानु जांवई व पत्र लिहिणाराचे चुलत मेहुणे. ३ विठ्ठलराव पांडुरंग याचें मिरजेस पत्र.

कीं पुत्र घेतला त्या पक्षीं सरकारांत पांच लक्ष रुपये द्यावे, (आणि दत्तक घेतला असें सरकारच्या) कानावर घालावें. त्यास त्याणीं सांगितलें कीं, श्रीमंतांस अर्ज पूर्वी करून हा विधि केला. परंतु घाटगे याजकडील कारकुनाचे चित्तास नये. तेव्हां नारोपंत चक्रदेव वगैरे याणीं श्रीमंत साहेबांचे कानीं घातलें. नंतर घाटगे याजकडे परवानगीस हुजरे कारकून आले. त्याजवर मग दहन जाहलें; म्हणोन ऐकितों. खरें लटकें न कळे. भानूकडील मजकूर वांईस थोरली स्त्री होती ती लोहगडास गेली. आंबेगांवचीं सर्व लोहगडास गेलीं. उभयतां स्त्रिया (सती) जाणार. परंतु घाटगे यांचें म्हणणें पांच लक्ष रुपये तूर्त द्यावे, म्हणजे अस्थि देतों; विधि उरकावा. नाहींतर अस्थींस परवानगी देत नाहीं. असें (घाटग्याचें) म्हणणें आहे म्हणोन ऐकतों. खरें लटकें न कळे. काय भोक्तृत्व आहे हें न कळे. प्राण जाऊन हा भोग भोगावा, दोरास आधार नाहीं, ऐसें निर्मित दिसतें. श्री इच्छा प्रमाण. एक दोन रोजांत अमावास्या जाहलेवर श्रीमंत राजश्री राव[1]साहेब यांचें कूच होणार म्हणोन अफवा आहे. लोहगडचें बोलणें आलिजाबहादर यांजकडे लागलें. एक वस्त्रानिशीं अब्रूनें सोडावें. याणीं मान्य केलें. निजसुरे यांस सोडावें असें ठरलें. लौकरच ठाणें अलिजाबहादर यांचे किल्लेस बसेलसें दिसतें. भगवत् इच्छा प्रमाण ! सर्व बाजारी वर्तमान. खरें म्हणावयाचें नाहीं. विठ्ठलराव गोळे यांस घाटगे याणीं आपले वाड्यांत आणिलें. काय गत होते पहावी. सेवेशीं विदित होय. वकिलांकडे[2] पहिलीं पत्रें पाठविलीं. हल्लींही पाठविलीं. कधीं पावतील न कळे. हे विज्ञप्ति.

नं. ४२१२   श्री. (वैशाख शु० ९–२४ एप्रिल.)

पै॥ छ० ७ जिलकाद सन समान तिसैन.

---

१ अमृतराव. २ वकील कोण ?

[1]विज्ञापना. गंगाधरपंत सुभेदार देवआज्ञा जाहले, त्यास रावेजींची आज्ञा घेऊन राजश्री बाबाजीपंत याणीं वाईस जाऊन विहीण व चिरंजीव राजश्री रामकृष्णपंत जांवई तेथें असतील त्यांचा समाचार घेऊन यावें. व रा॥ पांडुरंगपंत यांस पत्र लिहिलें आहे हें ही घ्यावें म्हणोन पत्रीं आज्ञा, त्यास सुभेदार यांच्या अस्थि पुण्याहून आल्या. सुभेदार यांच्या दोघी स्त्रिया होत्या त्या दोघी अस्थींबरोबर सहगमन गुरुवारीं तृतीय प्रहरीं गेल्या. पुण्याहून जप्तीस कारकून आला तो जाऊं देत नव्हता, शिंद्याची परवागी पाहिजे म्हणोन प्रहरभर (त्यानें) अडथळा केला, परंतु न ऐकतां गेल्या. राजश्री कोंडोबा नानांनीं[3] साहित्य केलें. तीनशें रुपये खर्चाची परवानगी पुण्यांची[2] होती. धाकटे बायकोचा पुत्र अडीच वर्षांचा होता तो लेंकीचे स्वाधीन करून गेल्या. राजश्री रामकृष्णपंत — वडील चिरंजीव सुभेदारांचे — आंबेगांवास गेले आहेत. वाईस नाहींत. राजश्री बाबाजीपंत सेवेशीं आले आहेत त्यांस आज्ञा होईल त्याप्रमाणें वांईस जातील. आतां वांईस कोणाकडे जावें ती आज्ञा व्हावी. हें सविस्तर ध्यायासमागमें काल प्रातःकाळीं रविवारीं पत्र लिहून सेवेशीं पाठविलें आहे. हे विज्ञापना.

नं. ४२१३ (वैशा० शु० ७–२३ एप्रिल.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० ६ जिल्काद—

" रत्नाकरपंत आपा मोरबेवर आहेत. पेंढारी व गुरें व गाडे व तोफा व बुनगें मनोळीच्या बारीनें गेलें. सडी फौज व दोन तोफा मात्र मोरबेवर आहेत. अमीनबावी वगैरे चार खेडीं व धारवाड

---

१ पत्र साताऱ्याहून रास्त्यांच्या लष्करांतून मिरजकरांस लिहिलेलें दिसतें. पण कोणी लिहिलें हें समजत नाहीं. २ माधवराव रास्ते यांची ३ कोंडोपंत रास्ते ? ४ बाजीराव साहेबांची.

पैकीं पांच खेडीं लुटून फस्त केलीं. मोरबेहून बेटगिरेवर येणार आहेत. तेथून खानापुराहून सडी फौज परत करवीरास जाणार. गोखले शिरहट्टी परगणा लक्ष्मेश्वर येथें आहेत. ”

नं. ४२१४ श्री. (वैशाख शु० १०–२५ एप्रिल)

पै॥ छ८ जिलकाद समान तिसेन.

[1]विज्ञापना. राजश्री राघोपंत गोडबाले वारले असें वर्तमान आलें आहे, परंतु रास्ते यांचे लिहिलें आलें नाहीं. वर्तमान खरें आहे असें बोलतात. श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब देवदर्शनास वोझरास गेले. तिकडून राजश्री मोरोबादादा यांजकडे जाणार असें बोलतात. देवास गेल्याचें उत्तर आलें. पुढें जाणार ही वदंता आहे. लोहगड[2]चें संधान सरकारांत आलें, कारकून रवाना जाहला आहे, (असें) [3]थत्ते याणीं राव[4]जींस लिहिलें आहे. विदित होय. हे विज्ञापना.

नं. ४२१५ श्री. (वैशाख शु०१०–२५ एप्रिल)

पै ॥ छ०८ जिलकाद. सन समान तिसैन.

वि[5]ज्ञापना. गंगाधर गोविंद भानु देवाधीन जाहले त्यांच्या अस्थी वांईस आल्या. उभयतां बायका भानूंच्या चतुर्थी गुरुवारीं सहगमन जाहल्या म्हणोन वाईहून वर्तमान रास्ते यांजकडे आलें. विदित होय. हे विज्ञापना.

नं. ४२१६ (वै० शु. ११–२६ एप्रि.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस छ०९ जिल्काद.–

“ राजमंडळची सडी फौज दहा हजार बेटगिरें येथें आहे.

---

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चाफेकर याचें नजीक सातारा येथून रास्त्यांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे. २ किल्ला सरकारच्या हवालीं करतों असें किल्लेदार धोंडोपंत निजसुरे याचें चालणें. ३ शिवरामपंत. ४ माधवराव रास्ते यांस. ५ पत्र सातान्याहून रास्त्यांच्या लष्करांतून मिरजेस. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

काल संगोली प्रांत कित्तूर येथें दौड आली होती. धारवाड तालुक्यांत स्वांरी करून नित्य खेडीं मारितात."

नं. ४२१७ (वैशाख शु. १३–२८ एप्रि.)

देवराव देशपांडे यांजकडून बाळाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० ११ जिल्काद–

"आपा राजाज्ञा व गोखले यांमध्यें ८ कोसांची तफावत आहे. गोखल्यानीं राजमंडळाचीं एक दोन ठाणीं घेतलीं याजमुळें राजाज्ञा सडे स्वारीनें दहा हजार फौजेनिशीं चालून गेले आहेत. हिंमत बहाद्दरांचा आग्रह शहापूर चंदगड आजरें वगैरेकडे स्वारी करावयाचा होता, तों ही लढाई होण्याचें उपस्थित जालें. त्यामुळें हिंमतबहाद्दर यानीं आग्रह सोडला."

नं. ४२१८ श्री. (वैशाख शु० १५–३० एप्रिल.)

पै॥ छ० १३ जिलकाद. सन समान तिसैन. वैशाखमास.

विज्ञापना. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब चयनपूर्वक आधान सिद्ध जेष्ठ मासीं करणार म्हणून बाजारी अफवा आहे. खरें लटकें न कळे. सेवेशीं विदित होय विज्ञापना.

नं. ४२१९ श्री. (वैशाख व० १–१ मे.)

पै॥ छ१४ जिलकाद. सन समान तिसैन.

[2]विज्ञापना. श्रीमंताचें व शिंद्यांचें वांकडें पडलें, याजमुळें श्रीमंतानीं आप्त आप्त पाहून (त्यांस पुण्यांतून) निघण्याची सूचना केली. राजश्री बाबा फडके व गद्रे व शेलूकर हे निघोन गेले. आणखी बहुत लहान मोठे कुटुंबेंसह जिकडे सोय दिसली तिकडे निघोन गेले. याजप्रमाणें वर्तमान आजच डांकेचें आलेवरून लिहिलें आहे. विदित होय. हे विज्ञापना.

---

१ चिठी पुण्याहून बाळाजीपंत जोशी याची. हिजवरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे. २ पत्र रवाना साताऱ्याहून रास्त्यांचें लष्करांतून. यावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

नं. ४२२० श्री. (वैशाख व० १-१ मे.)

पै॥ छ० १४ जिलकाद. सन समान तिसैन.

+विज्ञापना. श्रीमंत राजश्री अमृतराव ओझरचें देवदर्शन घेऊन निकडीनें कोरेगांव भीमातीरास आलेचे डाकेंत लिहिलें आहे. श्रीमंत आपली मजबुदी दोन तीन पलटणें व हुजरात दोन तीन हजार चक्रदेवाचे विद्यमानें जमाव करून सावधतेनें आहेत. शियानीं वाडयाची पूर्ववत् प्रमाणें बंदोबस्ती करूं लागल्यास धुडावून बाहेर पडावें, श्रीमंत रावसाहेब भीमातीरास आहेत त्यांजवळ जाऊन मिळावें, असे बेत आहेत. त्रिंबकेश्वराकडचे जाण्याचे (अमृतराव यांचे) बेत ऐकण्यांत होते. त्यास इकडील निकडीमुळें गेले नाहींत. इकडेच देवदर्शन घेऊन निघोन आले. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं.४२२१ श्री. (२ मे.)

पै॥ छ० १९ जिलकाद. सन समान तिसैन. वैशाख.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी व मोरो आपाजी चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत वैशाख वद्य तृतीया सौम्यवासर मुक्काम पुणें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्यांत लोकांस सर्जेराव याजकडील तगादा बहुत लागत होता. अलीकडे सात आठ दिवस (झाले.) राजश्री अलिजाबहाद्दर यांची स्वारी सरकार वाडयांत आली होती. श्रीमंतांचें व शिंदे यांचें दोन घटका खलबत जाहलें. त्याणीं दोन चार मुद्दे घातले. श्रीमंतानीं कबूल केलें नाहीं. श्री॥ राजश्री आप्पासाहेब याणीं रागें भरून बाबासाहेब यांस सांगितलें कीं, " तुमचे स्वाधीन काय आहे ? जें त्यांचे विचारास येत असेल तें सुखरूप त्यानीं करावें. आपण धनीपणा कोणते गोष्टीचा करितां ? अर्थ कांहीं राहिला नाहीं." असें

+ पत्रावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

बोलिल्यानंतर श्रीमंतानीं (आपासाहेबांस) उगेच असावें म्हणोन सांगितलें. अलिजाबहादर उगेच अर्ध घटिका होते. नंतर दुसरा मजकूर बोलों लागले. गोविंदराव पिंगळे, चक्रदेव, व कुंजर मग खलबतांत आले. तोंपावेतों कोणी नव्हते. आणखी दोन घटका बोलणें होऊन शिंदे गेले. " राजश्री बाबा फडके व काळे, पिंगळे, चक्रदेव, यांस आमचे स्वाधीन करावें, फौजेचा पेंच आम्हांवर भारी आहे. (या मुत्सद्यांपासुन) चार रुपये येतील ते घेऊं. आमचे धरण्याचें निवारण होईल," हीं बोलणीं (शिंद्यानीं) घातलीं. श्रीमंतानीं 'साफ हातीं द्यावयाचें नाहीं. ' या प्रमाणें सांगितलें. नंतर शिंदे गेले. फडके यांस श्रीमंतानीं कुटुंब कोंकणांत न्यावयाची सूचना केली. त्यावरून राजश्री मोरोबादादा[1], आत्या, व मुलें बायका देखील कुटुंबसुद्धां कोंकणांत गेलीं. त्यावरून शहरांत लोकांस धीर पुरेना सारिखा जाहला. फार कुटुंबें कोंकणांत गेलीं. नंतर हें वर्तमान सर्जेराव यांस कळलें, तेव्हां त्यांनीं शहरासभोंवती नाकेबंदी करून चौक्या बसविल्या. कोणी जाण्याची मनाई केली. आज चार दिवस झाले, कोणास जाऊं देत नाहींत. तगादे तो लोकांस मनस्वी होत आहेत. श्रीमंतांचें (व) शिंदे यांचें रहस्य राहिलें नाहीं. या उपर ईश्वरी इच्छा. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिला पाहिजे. हे विज्ञापना.

नं. ४२२२ श्री. (वैशाख व० ३–३ मे.)

नकल.

[2]विज्ञापना ऐसी जे, इकडील वर्तमान तरी सिंदे यांचे लष्करांत मंगळवारीं दोनप्रहर रात्री बातमी गेली कीं, उभयतां[2] श्रीमंत पळाले ! त्याजवरून त्याणीं लष्कर झाडून तयार करून जागोजाग

---

१ मोरोबा व आत्या हे दोघेही बाबा फडक्यांचे बंधु. २ मूळपत्र शिवरामपंत थत्ते यानीं पुण्याहून साताऱ्यास माधवराव शास्त्र्यांस लिहिलें त्याची ही नक्कल मिरजेस साताऱ्याहून आली. २ बाजीराव व चिमाजी आपा.

नं. ४२२०   श्री.   (वैशाख व० १–१ मे.)

पै॥ छ० १४ जिलकाद. सन समान तिसैन.

+विज्ञापना. श्रीमंत राजश्री अमृतराव ओझरचें देवदर्शन घेऊन निकडीनें कोरेगांव भीमातीरास आलेचे डाकेंत लिहिलें आहे. श्रीमंत आपली मजबुदी दोन तीन पलटणें व हुजरात दोन तीन हजार चक्रदेवाचे विद्यमानें जमाव करून सावधतेनें आहेत. शियानीं वाड्याची पूर्ववत् प्रमाणें बंदोबस्ती करूं लागल्यास धुडावून बाहेर पडावें, श्रीमंत रावसाहेब भीमातीरास आहेत त्यांजवळ जाऊन मिळावें, असे बेत आहेत. त्रिंबकेश्वराकडचे जाण्याचे (अमृतराव यांचे) बेत ऐकण्यांत होते. त्यास इकडील निकडीमुळें गेले नाहींत. इकडेच देवदर्शन घेऊन निघोन आले. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२२१   श्री.   (२ मे.)

पै॥ छ० १९ जिलकाद. सन समान तिसैन. वैशाख.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी व मोरो आपाजी चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत वैशाख वद्य तृतीया सौम्यवासर मुक्काम पुणें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. पुण्यांत लोकांस सर्जेराव याजकडील तगादा बहुत लागत होता. अलीकडे सात आठ दिवस (झाले.) राजश्री अलिजाबहाद्दर यांची स्वारी सरकार वाड्यांत आली होती. श्रीमंतांचें व शिंदे यांचें दोन घटका खलबत जाहलें. त्याणीं दोन चार मुद्दे घातले. श्रीमंतानीं कबूल केलें नाहीं. श्री॥ राजश्री आप्पासाहेब याणीं रागें भरून बाबासाहेब यांस सांगितलें कीं, " तुमचे स्वाधीन काय आहे ? जें त्यांचे विचारास येत असेल तें सुखरूप त्यानीं करावें. आपण धनीपणा कोणते गोष्टीचा करितां ? अर्थ कांहीं राहिला नाहीं. " असें

+ पत्रावरची मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

बोलिल्यानंतर श्रीमंतानीं (आपासाहेबांस) उगेच असावें म्हणोन सांगितलें. अलिजाबहादर उगेच अर्ध घटिका होते. नंतर दुसरा मजकूर बोलों लागले. गोविंदराव पिंगळे, चक्रदेव, व कुंजर मग खलबतांत आले. तोंपावेतों कोणी नव्हते. आणखी दोन घटका बोलणें होऊन शिंदे गेले. " राजश्री बाबा फडके व काळे, पिंगळे, चक्रदेव, यांस आमचे स्वाधीन करावें, फौजेचा पेंच आम्हांवर भारी आहे. (या मुत्सद्यांपासून) चार रुपये येतील ते घेऊं. आमचे धरण्याचें निवारण होईल," हीं बोलणीं (शिंद्यानीं) घातलीं. श्रीमंतानीं 'साफ हातीं द्यावयाचें नाहीं.' या प्रमाणें सांगितलें. नंतर शिंदे गेले. फडके यांस श्रीमंतानीं कुटुंब कोंकणांत न्यावयाची सूचना केली. त्यावरून राजश्री मोरोबादादा[1], आत्या, व मुलें बायका देखील कुटुंबसुद्धां कोंकणांत गेलीं. त्यावरून शहरांत लोकांस धीर पुरेना सारिखा जाहला. फार कुटुंबें कोंकणांत गेलीं. नंतर हें वर्तमान सर्जेराव यांस कळलें, तेव्हां त्यांनीं शहरासभोंवती नाकेबंदी करून चौक्या बसविल्या. कोणी जाण्याची मनाई केली. आज चार दिवस झाले, कोणास जाऊं देत नाहींत. तगादे तो लोकांस मनस्वी होत आहेत. श्रीमंतांचें (व) शिंदे यांचें रहस्य राहिलें नाहीं. या उपर ईश्वरी इच्छा. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिला पाहिजे. हे विज्ञापना.

नं. ४२२२　　　　श्री.　(वैशाख व० २-३ मे.)

नक्कल.

[2]विज्ञापना ऐसी जे, इकडील वर्तमान तरी सिंदे यांचे लष्करांत मंगळवारीं दोनप्रहर रात्री बातमी गेली कीं, उभयतां[3] श्रीमंत पळाले ! त्याजवरून त्याणीं लष्कर झाडून तयार करून जागोजाग

---

१ मोरोबा व आत्या हे दोघेही बाबा फडक्यांचे बंधु. २ मूळपत्र शिवरामपंत थत्ते यानीं पुण्याहून सातान्यास माधवराव रास्त्यांस लिहिलें त्याची ही नक्कल मिरजेस सातान्याहून आली. ३ बाजीराव व चिमाजी आपा.

राऊत पाठविले. हें वर्तमान श्रीमंतांस समजलें. त्याजवरून कांहीं मानकरी वाड्यांत बोलाविले. बुधवारीं प्रात:काळीं पानशे यांचे चीरंजीव सरकारवाड्यांत येत होते त्यास नेवासकर देशमुख नानाचे वाड्यांत होते त्याणीं त्यांस घोड्यावरून उतरून चौकींत बसविलें आणि त्यांचें घोडें पळवून नेलें. हें वर्तमान श्रीमंतांस समजलें. तोफखान्यांत पानशे यांस समजलें. त्याजवरून पानशे याणीं तोफखाना तयार करून नेवासकर देशमुखाचें पारिपत्य करावें या भावेंकरून बुधवारचावडी पावेतों आले. त्यास श्रीमंतानीं सांगून पाठविलें, 'तुमचा मूल सोडवून आणवितों. तुम्ही कारखानेसुद्धां माघारे जाणें. त्याजवरून ते माघारे गेले. मग श्रीमंतानीं आबा काळे याचा कंपू तयार करून तोफा नानाचे वाड्यापलीकडे शिऱ्यांवर नेल्या. आणि आज्ञा जाली कीं, "तोफा लावून वाडा पाडून टाकणें आणि पानशे याचा मूल धरला आहे तो सोडवून आणणें." त्यावरून नेवासकर घाबरून पानशे याचा मूल सरकारच्या हवालीं केला. श्रीमंतांस राग फार आला आहे. झाडून मानकरी तयार करून वाड्यांत आणिले. भवानी पेठेच्या शिऱ्यांस चार तोफा व मालोजी घोरपडे व मानाजी फांकडे या प्रों शिंदे यांच्या तोंडावर ठेविले आहेत. बाकी झाडून वाड्याचा बंदोबस्त केला आहे. मानकरी हजार पावेतों वाड्यांत जेवीत असतात. इतकें झाल्यानंतर सखाराम घाटगे व फकीरजी गाढवे असे शिंद्याकडून दोन प्रहरां आले. त्यांस बुधवारचे चावडीजवळ अडविलें. मग (त्यानीं पुढें यावयास) सरकारची परवानगी नेली. नंतर नानाचे वाड्यांत येऊन बसले. सरकारची आज्ञा जाली कीं, तृतीय प्रहरीं वाड्यांत यावें. पालखी जिलीब नित्य चौकांत येत असते त्याप्रों येऊं नये. दिल्लीदरवाजेवर सारें ठेवून सडे वाड्यांत यावें. त्याजप्रों ते वाड्यांत जाते समयीं जिलीब पालखी आंत चालविली. मग सरकारचे लोकानीं बंदुकांचे दस्ते मारले आणि लोक

फिरविले. पालखींतून दिलीदरवाज्याबाहेर उतरविलें आणि पाय उतारा पांच सात माणसांनिशीं आंत घेतले. रूबरू बोलण्यांत (श्रीमंतानीं) घाटग्याचा निषेध फार केला. याजप्रों घाटगे यांची प्रतिष्ठा जाली. आतां कांही यांची त्यांची गोडी राहिली नाहीं. ईश्वर-कृपेकरून पुढें काय होईल तें पहावें. जालें वर्तमान सविस्तर लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२२३　　श्रीगणराज. (वैशाख व० २–२ मे.)

पैा छ १९ जिलकाद. सन समानतिसैन. वैशाख.

विज्ञापना. तागायत छ १५ जिलकाद बुधवार दोन प्रहर यथास्थित असे. यशवंतराव पानशे आपले वाड्यांतून सरकारचे वाड्यांत येत होते. सर्जेराव घाटगे यांचे वाड्यांतून लोक दहा पांच असामी येऊन यशवंतराव पानशे यांस धरून घाटगे यांचे वाड्यांत नेलें. नंतर पानशे यानीं तोफखान्यांतून तीन चार तोफा व बाणदार व गारदी पायदळ सुद्धां तयार होऊन घाटगे यांचे वाडया पावेतों चालून आले. इतकेंत श्रीमंतानीं हुजरे व कारकून पाठवून पानशे यांस सरकारचे वाड्यांत घेऊन गेले. तेथून बरोबर माणसें देऊन पानशे यांस आपले घरीं पोहोंचविलें. तोफा वगैरे सरंजाम माघारा गेला. कळावें विदित होय. हे विज्ञापना.

नं. ४२२४　　श्री.　　(३ मे)

पै॥ छ० १९ जिलकाद. सन समानतिसैन. वैशाख.

सेवेशीं विज्ञापना तागायत वैशाख वद्य ३ सौम्यवासर सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. काल शिंदे यांचे सैन्यांतून एक गृहस्थ आला त्यानें वर्तमान सांगितलें कीं, राजश्री नारायणराव बक्षी यांस आणावयास शिंदे याणीं कारकून पाठविला. राजश्री गोपाळराव चिटणीस यांस ताकीद केली कीं, तुम्ही निघोन

---

१ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन यांचें पत्र पुण्याहून मिरजेस.　२ मोरो आपाजी परांजपे याचें पत्र पुण्याहून मिरजेस.

आपलें घरीं जावें. याप्रमाणें जाहलें म्हणोन चांगले गृहस्थानें सांगितलें आहे. आज उद्यां निश्चय कळेल. वैशाख वद्य प्रतिपदेस राजश्री अलिजाबहादर यांची स्वारी राजश्री सर्जेराव घाटगे यांजकडे पुण्यास आली. सरकारवाड्यांत जावयाचा बेत होता. यादवराव भास्कर याजबरोबर श्रीमंतांकडे सांगोन पाठविलें. श्रीमंतानीं आज्ञा केली कीं, वाड्यांत हुजुरातीचें व पागा शिलेदार यांचें धरणें आहे. तुम्ही शेंदोनशेंनिशीं येऊं नये. वीस पंचविसांनिशीं यावें. याप्रमाणें सांगोन पाठविलें. नंतर शिंदे सरकारवाड्यांत गेले नाहींत. विंचूरकर यांजकडे उत्सव आहे तेथें जाऊन अर्धघटिका बसोन फिरोन गोटास गेले. श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब यांचा मुक्काम केंदुरास आहे. एक दोन दिवसांत तुळापुरास येणार असें वर्तमान आहे. मागाहून सविस्तर विनंती लिहितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२२५

(वैशाख व. ५–५ मे)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० १८ जिल्कादचें.–

" रत्नाकरपंतांचा मुक्काम कुरहट्टी बेणीहाळावरी आहे. धोंडोपंताचा मुक्काम कोळवाडावरी आहे. दोघांची अजून लढाई जाहली नाहीं. गोखले जुन्या हुबळीचें ठाणें घेण्यास येणार. हिंमतबहाद्दर यांचा महाराजांस आग्रह फार आहे कीं, खानापूर जांबोटी शहापुर चंदगड वगैरे मारून पैका हुबळी प्रमाणें वसूल करावा. "

नं. ४२२६　　श्रीगणराज. (वैशाख व० ६–६ मे.)

पैा छ० १९ जिलकाद. सन समानतिसैन. वैशाख.

अपत्यें विठोबानें दोनीकर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत वैशाख वद्य ३ पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष,

वडिलांकडून अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. इकडे गडबड शहरांतील लोक पळूं लागल्याचें वर्तमान लिहिलें होतें त्याजवरून विदित जाहलेंच असेल. त्या अलीकडे वर्तमान वैशाख शुा त्रयोदशी शनवारपावेतों लोक बाहेर गेले तितके गेले. त्यावर सर्जेराव घाटगे याणीं शहराचे बाहेरून नाकेबंदी करून लोक माघारे आणून गांवांत घातले. त्यांच्या कंठाळा वगैरे सोडवून त्यांचें वित्त विषय बहुतकरून घेतलें, अशी बातमी आहे. खरें लटकें न कळे. अतःपर कोणी गांवास निघोन जात नाहीं. बंदी अगदीं जाहली आहे. भाडें वांईपावेतों प्रथम तीन रुपयेपर्यंत होतें तें दहा रुपयेपर्यंत जाहलें. डोळीस तीस पसतीस रुपयेपर्यंत भाडें जाहलें. येथून मिरजेस गडी अजूरदार करून पाठवितों असें बोलल्यास सात रुपये मागतो ! राजश्री मोरोबा-दादा फडकेसुद्धां सुवर्णदुर्गास गेले. श्रीमंतांचे लग्नाचें साहित्य होत आहे. अप्पाजीराम सहस्रबुद्धे व दिनकर रघुनाथ पटवर्धन यांचीं कुटुंबें जाणार होतीं. परंतु तूर्त राहिलीं. सरकारच्या वाड्यांत हुजुरात दोन रोज अडून बसली होती. एक दुमाही द्यावी ऐसा ठर जाहला. श्रीमंत साहेब दरबारास येऊन लोकांची समजूत पाडली. दोनशें खासा रात्रौ भोजनास राहविला होता. हुजरातीसही यजमानांनीं कांहीं आंतून गुप्त खर्चास दिलें आहे म्हणोन ऐकतों. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

(वैशाख. व० १०—१० मे)

नं. ४२२७

नारायणराव व्यंकटेश यांजकडून गंगाधरराव बाळासाहेब यांस पत्र. रवाना छ० २३ जिल्काद समान तिसैन.

" आतांच सुळकुडाहून चिट्ठी आली. आज सकाळीं चार घटका दिवसास संवदलग्याचें ठाणें (करवीरकरानीं) घेतलें. "

नं. ४२२८　　श्री.　　(वैशाख व० १३–१३ मे)

पै॥ छ० २७ जिलकाद. सन तिसां तिसैन. चैत्र.+

सेवेशीं नारो हरी करंदीकर दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ जिलकाद गुरुवार पावेतों मुक्काम वेडकीहाळ वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं चोविसावे तेरिखेचीं पत्रें पाठविलीं तीं पंचविसावे मिनहूस पावलीं. लिहिला मजकूर कळला. राजश्री बाळोबा पागनीस व त्यांचे पुतणे धोंडीबा यांची व शिंदे यांची भेट वद्य तृतीया इंदुवारीं जाहली. बहुमानार्थ वस्त्रें वगैरे दिलेचें लिहिलें तें कळलें. राघू संवदुत्ती यानें दोन चार दिवसांत ऐवजाची तरतूद करून देतों म्हणून आज्ञापत्रीं लिहिलें, त्यास तरतूद करून दिल्यास उत्तम. नाहींपेक्षां राघूस पाठवून देतों म्हणून आज्ञा, ऐशियास मजकूर प्रत्यक्ष ज्या प्याद्यांनीं येथें पाहिला तेच प्यादे दुकित्ता पत्रें देऊन सेवेशीं रवाना केलेच आहेत व पत्रांतहीं कार्याकारण मजकूर लिहिलाच आहे. त्याजवरून ध्यानांत येईल. राघू संवदत्ती यास यावयाची आज्ञा जाहली नाहीं. त्याजवरून येथील निकडीचा अर्थ जाहला आहे तो पत्रीं त्याचा विस्तार कोठवर लिहावा ? राघूनें तेथें रहावें. आम्ही येथें परदरबारीं तसदी सोसावी ऐसी स्वामीची मर्जी ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२२९　　श्री.　　(१४ मे)

पै॥ छ० २ जिल्हेज. सन समान तिसैन. ज्येष्ठ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी व मोरो अप्पाजी परांजपे दोनीकर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत वैशाख व॥ १४ मुक्काम पुणें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील राजकी बर्तमान तरी राजश्री दौलतराव शिंदे आलिजाबहादर यांज-

---

+ पैवस्तींत समान तिसैन. वैशाख. अशीं अक्षरें पाहिजेत. १ करवीरकर महाराजांच्या लष्करांतून मिरजेस पत्र.

कडील शहरांत लोकांस उपद्रव बहुत लागत होता. सर्जेराव घाटगे याणीं पुण्यांतील न्याय पंचायती देखील मनास आणाव्या, मनस्वी लोकांस तसदी द्यावी, याप्रमाणें जाहलें होतें. परंतु सांप्रत आठ दहा दिवस जाहले, श्रीमंत राजश्री पंत प्रधान याणीं शिंदे यांस येविषयीं किंचित् रागें भरून सांगितलें. 'पुण्यांतील कारभार सर्जेराव यांणीं कांहीं एक मनास आणूं नये.' याप्रमाणें सांगितलें. त्यावरून शिंदे यांणीं कबूल केलें. सर्जेराव यांस ही एक दोन वेळां रागें भरले. त्याजवरून बंदोबस्त करून शहरासभोंवत्या चौक्या सर्जेराव याणीं बसविल्या होत्या त्या उठवून दिल्या. याप्रमाणें जाहलें. राजश्री नारायणराव बक्षी व देवजी गौळी यांस शिंदे यांणीं नगराहून आणिलें. भेटीचे समयीं बहुमान कंठी, चौकडा, शिरपेंच, दिला. तुमचें काम तुम्ही करावें म्हणोन सांगितलें. आलिजाबहादर यांस बक्षी यानीं विनंती केली कीं, आम्हांस नगरास पाठविलें त्यांत अपराध मजकडे काय असेल तो सांगावा. हल्लीं आपलें कामकाज करणें म्हणोन आपली आज्ञा, त्यास आणखी कोणी गैरवाका समाजाविला असतां पुन्हां ही याच थरास गोष्टी येणार, त्या अर्थीं मला कारभार नलगे. पोटास द्यावें, आज्ञा होईल तेथें राहीन; म्हणोन विस्तारें बोलिले. त्याजवरून दौलतराव याणीं बहुत खातरजमा करून सांगितलें. पूर्ववत् प्रमाणें कामकाज करूं लागले. तूर्त तो पुण्यांतील उपद्रव शिंदे यांजकडील मना जाहला आहे. श्रीमंत राजश्री चिमाजीआपा यांचे लग्नाचा निश्चय झाला. साहित्याचे तरतुदीस सरकारांतून कारखानदार लागले. आपाजीपंत दामले यांची नात वधू पाहिली आहे. निश्चय जेष्ठ शुद्ध नवमीस व्हावें. निश्चय व्हावयाचा राहिला आहे. मागाहून विनंतीपत्रीं लिहितों. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४२३० श्री. (जेष्ठ शु० ३-१८ मे.)

पै ॥ छ ८ जिल्हेज. जेष्ट मास. सनसमान तिसैन.

सेवेशीं धोंडो बापूजी व मोरो अप्पाजी परांजपे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १ जिल्हेज. सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. महादजी शिंदे यांच्या बायका व नाटकशाळा दौलतराव शिंदे यांणीं जेष्ट शु॥ १ स किल्ले नगरास रवाना केल्या. बायकांनीं मोठा प्रळय केला, परंतु जबरदस्तीनें पालख्यांत घालून रवाना केल्या. त्यांचें जवाहीर वगैरे वस्तवानी कांहीं एक दिली नाहीं. कार्याकारण अंगावर होती ती मात्र दिली. बाकी झाडून ठेविलें. याप्रमाणें सर्जेराव यांणीं सल्ला देऊन केलें. राजश्री नारायणराव बक्षी व देवजी गौळी आले. पूर्ववत् प्रमाणें त्यांचें कामकाज त्यांजकडे सांगितलें. राजश्री नारायणराव बक्षी याणीं साफ सांगितलें कीं, पैक्याखेरीज मला जे आज्ञा होईल ते मी करीन. मजपाशीं चार रुपये फौजेस द्यावयास सामर्थ्य आहे नाहीं हें कळतच आहे! फौजेचा गवगवा बहुत जाहला आहे. मागें दौलतीमध्यें राजश्री बाळोबा तात्या होते. पांच रुपये समयीं पाहिजेत तरी पदरचे देत होते. नाहींतरी सावकारीमध्यें त्यांची पत होती. पाहिजे ऐवज तो मिळत होता. आज पावेतों दौलतीमध्यें मातबर माणूस असल्याशिवाय निभावणी जाहली नाहीं. देशीं आल्यानंतर फौजेचा खर्च भारी. चार रुपये श्रीमंतांकडून आले म्हणोन हरकसें चालिलें. याउपर पैसा सरकारचा यावयाचा नाहीं. पुण्यांत राहिलें असतां खर्चाचा विचार पाहतां मनस्वी. येविषयीं विचार होऊन आज्ञा होईल त्या प्रमाणें वर्तणूक करीन. त्यावरून आलिज्या-बहाद्दर वगैरे पांच चार ममतेंतील मिळोन राजश्री बाळोबा तात्या यांस आणावें हा विचार जाहला आहे. पत्रें लिहिलीं. एक दोन दिवशीं पागा आणावयास पाठवितात. या प्रमाणें तहकीक लोक बोलतात. सहस्रा गोष्टींनीं हा विचार घडावा ऐसें आहे. मागाहून विनंती लिहितों.

इकडील वर्तमान तरी येथें श्रीमंतांस व चक्रदेव यांस व पिंगळे यांस कोणी लुच्यानें समजाविलें आहे कीं, मिरजेस अद्याप फौज एक स्वार देखील ठेविला नाहीं! हजार दोन हजार प्यादे मात्र ठेविले आहेत. हें वर्तमान आबा काळे यांजकडे एका गृहस्थानें समजाविलें. व दिनकरपंत पटवर्धन यांजकडे कोणी एका गृहस्थानें सांगितलें. दिनकरपंत पटवर्धन बाळाजीपंताकडे बोलिले. या प्रकारचें वर्तमान येथें जाहलें आहे. राजश्री गणपतराव यांची रवानगी होईल तेव्हां श्रीमंतांस पत्रें मशारनिल्हे हस्तगत व्हावयाविसीं आलीं पाहिजेत. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२३१　　(जेष्ठ शु० ६–२१ मे)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० ४ जिल्हेज. समान तिसैन—

" राजश्री धोंडोपंत गोखले यांचा मुक्काम मुदलावीस आहे. रा॥ रत्नाकरपंत राजाज्ञा यांचा मुक्काम सुरीबन नजीक तोरगल येथें आहे. गोखले यांस व राजाज्ञा यांस तीन कोसांचें अंतर आहे. यादवाड प्रांताची पांच खेडीं गोखले याणीं मारलीं. उभयतांची लढाई होणार म्हणून वर्तमान आहे. "

नं. ४२३२　　श्री.　　(ज्येष्ठ व० ७–२२ मे)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सदाशिव महादेव स्वामी गोसावी यांसीं

सेवक गंगाधरराव गोविंद. नमस्कार. विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. मौजे दुधोंडी येथील मोकदमांकडे[3] कर्ज येणें असें शिंद्यांकडील पठाणांस सांगून मौजे मजकुरीं (तुम्ही) स्वार बसाविले आहेत. ते मन मानेसा खर्च वेंच घेतात म्हणून गावकरांची अर्जदास्त आली. त्याजवरून तुम्हास हें पत्र लिहिलें असे.

---

१ कानिकटर वकील. २ येथील मुत्सद्यांस मिरजेच्या खोट्या बातम्या देणारे जिवाजीपंत पोतनीस. ३ ग्रामाधिकारी यांजकडे.

तरी मागील खत काढून दुसऱ्याचे आश्रयें करून गांवास परभारें उपद्रव करितां हें ठीक नव्हे. दंगा स्वस्थ जालेवर मिरजेस येणें, तुम्हांजवळ खतें पत्रें काय असतील तीं आणून समजावणें, पाहून वाजवी असेल त्या प्रों ताकीद करावयास येईल. उगाच परस्पर दंगा करून ऐवज घेतल्यास तो तुम्हास जिरेल असाही अर्थ नाहीं. तशांत तुम्ही परकी नव्हे. जें करणें तें समजून करावें. रा॥ छ० जिल्हेज. बहुत काय लिहिणें हे विनंती.

नं. ४२३३ श्री. (वैशाख--मे.)

नक्कल.

विनंती विशेष. आपणाकडून पत्र येऊन वर्तमान समजलें नाहीं. सविस्तर वर्तमान लिहीत असलें पाहिजे. विदुराकडील[1] कारभारी याणीं गांवांत मनस्वी उपद्रव करून कोणास मानीत नव्हते. आज आठ रोज जाहले, घाटगे नानांच्या वाड्यांत होते त्यांजकडील दाजी देशमुख व काळोजी नांगरस होते. त्यांजपाशीं वैशाख शुद्ध पौर्णिमेस रात्रौ पुरंदरे यांजकडील दासीपुत्र याणें जाऊन ' उभयतां यजमान[2] निघोन गेले ' म्हणून बातमी सांगितली. त्याचा शोध न करितां त्याणी लष्करांत चिठी पाठविली. त्याजवरून विदुर घाबरे होऊन सारे लष्कराची तयारी करून वाटोवाट फौजेची रवानगी करून पुण्याचे बंदोबस्ताचा उद्योग आरंभिला. तें समजल्यावर यजमानानीं शहरचा बंदोबस्त नाकेबंदीसुद्धां केला होता. प्रातः-काळ जाहला. त्याजवरून विदुर यांस वर्तमान खोटेंसें समजल्यावर आपले जागां फार बजीद होऊन नांगरस यास धरावयासीं स्वार पाठविले तों नांगरस पळोन गेला. दाजी देशमुख यास नेला. बेअब्रू करणार होते, परंतु घाटगे व गाढवे याणीं पदर पसरून राहाविलें. पुरंदरे याजकडील दासीपुत्रास तोफेचे तोंडीं दिला. तों दोन घटका

१ शिंद्याकडील. २ घाटगे.

दिवस आला. नंतर श्रीमंतांकडे कारभारी बोलावयासीं पाठवितों म्हणून चिठी पाठविली. त्याचें उत्तर उदासपणाचें गेलें. त्याजवर बारा घटका दिवसास घाटगे व गाढवे बोलावयासीं आले. त्यांस बुधवार चावडीपासीं ' सरंजामसुद्धां जाऊं द्यावयाची आज्ञा नाहीं, ' म्हणोन सांगोन चौकीदार याणीं अडविलें. श्रीमंतांची परवानगी आणून सडे मात्र गेल्यावर त्यांजपाशीं उदासपणाचेच व्यवहार बोलण्यांत येऊन कांहीं जरबेचेही आले. त्याजवर ' आम्हांपासून गोष्ट गेली, क्षमा करावी,' अशा अन्वयें त्याणीं विनंती केली. परंतु रूक्षताच त्यांचे दृष्टीस पडली. ते बजीद होऊन गेले. दुसरे दिवशीं घाटगे यांचे घरीं[1] विदुर यांसीं मेजवानी जाहली. तेथून वाड्यांत जावयाचा बेत होता. परंतु यजमानानीं रूक्षतेनेंच ' आज दिवस वाईट आहे याजकरितां येऊं नये,' असें सांगून पाठविलें. त्याजवरून बजीद होऊन ही गोष्ट मनास लागून डेऱ्यास गेल्यावर आज चार दिवस जाले, सफाईचें बोलणें लाविलें. त्याजवरून काल विदुर दर्शनास वाड्यांत आले होते. यजमानानीं सावधतेनें वाड्यांत चार हजार लोक बसाविले होते. दिल्लीदरवाजाजवळ आल्यावर सरकार आज्ञा सांगून पाठविली कीं,' सरंजामानिशीं येऊं नये. दोनशें माणसांनिशीं यावें.' त्याजवरून विदुर दरवाजांत उभे राहून सारे लोक बाहेर ठेवून दोनशेंनिशीं गेले. गेल्यावर बहुता प्रकारें क्षमा होण्याची विनंती केली. त्याजवर " झाली गोष्ट ते बरीच जाहली. इतःपर येथील कारभारांत अक्षर विदुर याणीं बोलूं नये व उपद्रव करूं नये. सरकार आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून मागील कायद्याप्रमाणें असावें." निरोप मागत होते. परंतु करवीरकर यांचें व नबाब यांचें पारिपत्य जाल्याखेरीज निरोप होत नाहीं म्हणून आज्ञा जाहली. त्याजवरून रहावें असें ठरून परस्पर शपता होऊन निखालसता होऊन विदुर

१ म्हणजे नानांच्या वाड्यांत.

डेऱ्यास गेले. आंतून यजमान सावधतेनेंच आहेत. नेहमीं वाड्यांत भले लोक बसलेच असतात. व विदुर आला होता त्या दिवसीं तीन हजार खासा बसविला होता. विदुरासही समजलें कीं अतःपर यांसी वांकडी गोष्ट केली असतां परिणाम नाहीं. जाणून ते ही नम्रभावें करून वर्ततात. परवां सर्जेराव घाटगे वाड्यांत आले होते. तेव्हां "साताऱ्याकडील संधान यांचे घरीं आलें आहे तें पुसावें" म्हणोन (मी) श्रीमंतांस विनंती केली. त्याजवर श्रीमंतानीं घाटग्यास विचारिलें. त्यावर आजपावेतों व्यासांचे वगैरे विद्यमानें जें संधान आलें होतें तें कच्चें सांगितलें. त्याजवरून " विदुर याणीं साताऱ्याप्रकरणीं बोलूं नये. कोणाचेही विद्यमानें संधान आलें तरी सरकारांत समजवावें. " अशी आज्ञा होऊन इतःपर त्यांचे दरबारीं संधान व्हावयाचें नाहीं अशी खातरजमा यजमानानीं करून घेतली. अलीकडे पत्रच न पाठविलें म्हणून तेथें राग मजवर जाहला असेल. त्यास एक कोणताही प्रकार ठरण्यांत येईना. व सर्वही प्रकार एक[1] प्रकार दिसूं लागले. त्यांत हें कारण जाहलें. हेंच बळावून प्रकार जरबेचा मोठ्या बलानें करविला.. तेव्हां यजमानांस परिणामीं गोडसा वाटला. पुढें ईश्वर सर्व यथास्थित करील. कळावें कृपा करावी. हे विज्ञप्ति +

नं. ४२३४ श्री. (ज्येष्ठ शु० ९-२४ मे)

[2]सेवेशीं विज्ञापना. (महादजी) शिंदे यांच्या रक्षेची कन्या (येथील) महाराजांच्या रक्षेच्या पुत्रास द्यावयाचा निश्चय होऊन मुलास टिळा लाविला. इकडून साखरपुडा वगैरे सामान जावयाची तरतूद होत होती. तों इतक्यांत कैलासवासी महादजी शिंदे यांचें

+ शिवरामपंत थत्ते मुत्सद्दी याणीं साताऱ्यास माधवराव रास्ते यांस पत्र पाठविलें त्याची ही नक्कल रास्त्यांनीं मिरजेस बाळासाहेबांकडे पाठविलेली. १ एक प्रकार = चमत्कारिक. २ नारो हरी करंदीकर यांचें करवीरकर महाराजांच्या लष्करांतून पत्र. यावरची मिति व तारीख पेवस्तीची.

स्त्रीनें कांहीं फितुराच्या राजकारणांत शिरली त्यामध्यें ती रक्षाही होती. हें वर्तमान राजश्री दौलतराव यांस समजलें. नंतर शिंदे यांच्या स्त्रीस व रक्षेस व कन्येस त्रिवर्गांस अशेरीच्या किल्यास पाठविली. याप्रमाणें मजकूर जाहला. कळावें. राजश्री सखाराम घाटगे यांजवरी पुण्यांत अनाहूत पीडा लोकांस केल्यावर शिंदे यांची इतराजी जाहली होती. त्यास शिंदे यांची मर्जी संपादन करून घ्यावी याबद्दल आपली स्त्री व कन्या व कळवंतीण ऐशा तिघी एक खोलींत घालून तेथें दौलतराव यांस नेलें. चारी प्रहर त्रिवर्ग स्त्रिया व शिंदे एकत्र होते. याप्रमाणें जाहलें. सदरहू दोनी मजकूर राजश्री बळवंतराव खांडेकर यांचीं पत्रें पुण्याहून आलीं त्यांत लिहिलें होतें. सत्य मिथ्या काय असेल तें असो ! आढळलेला मजकूर सेवेशीं कळावयाकरितां लिहिला आहे. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. शिंदे याणीं मुलीस कैदेंत पाठविली याजमुळें मर्जी महाराजांची ठीकसी नाहीं. कळावें सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

पै॥ छ० ७ जिल्हेज. सन समान तिसैन.

नं. ४२३५ श्रीगणराज. (जेष्ट व० ५–२ जून)

पै॥ छ० २१ जिल्हेज. सन तिसां तिसैन. ज्येष्ठ व॥ ९ गुरुवार. प्रातःकाळचा दहा घटका दिवस.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १७ जिल्हेज यथास्थित असे. विशेष. अलीकडे बारा रोज वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तरी सदैव पत्रीं सांभाळ करावया आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तर राजश्री दौलतराव शिंदे यांचें व बायांचें अद्यापवत यथास्थित नाहीं. बैदा आहे त्याजप्रमाणेंच आहे. बायांजवळ पंधरा हजार फौज आहे. श्री॥ राजश्री रावसाहेब यांचें वचन बायांस व बक्षीस पक्केपणाचें आहे म्हणतात. श्रीमंतांचे भेटी-

विषयीं मी उद्योग केला होता त्याजप्रमाणें छ० १७ जिल्हेज रविवारीं भेट घेतली. नजराणा एक मोहर केली. श्रीमंतांचे लग्नाचें व॥ ९ स निश्चयांत आणिलें आहे. गडगनेर होत आहेत. अक्षतेस प्रारंभ ज्येष्ठ व ॥ ६ रविवासरीं सुमहूर्तावर होणार. येणेंप्रमाणें आहे. श्री ॥ राजश्री बाजीराव बाबासाहेब व विनायकराव बापूसाहेब वगैरे मंडळीसुद्धां अक्षतेस (आमच्या) वाड्यांत आले होते. अक्षत देऊन स्वारी गेली. वस्त्रें देत होतों. आज्ञा जाहली कीं अक्षतेस वस्त्रें द्यावयाचीं नाहीं. ऐसी आज्ञा जाहली आहे. सरकारी वाड्यांत श्रीमंतांचे दर्शनास जातसमयीं मला घोडें देखील बसावयास नाहीं. जवळ पुढें चालावयास एकदेखील माणूस वडिलीं ठेविलें नाहीं व दहा पांच लोक देखील ठेविले नाहींत ! स्वारीस जावयाचें झाल्यास मला बोलावणें आलें तर एकटें जावयाचें कीं काय ? वडिलांस याजविशीं पेशजी विनंती लिहिलीच होती. तर वडिलीं विनंतीपत्र पावतांच तरतूद करून सरंजाम पाठवावा. यांत लौकिक वडिलांचाच होईल. कृपा करून पाठवून द्यावा. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. ती॥ राजश्री नारायणराव दादा व (माधवराव) बाबा व (गोविंदराव) नानासाहेब व (गोपाळराव) रावसाहेबांस आशीर्वाद. लिहिलें परिसोन लोभ करावा हे आशीर्वाद.

सातारकर महाराजांचा दंगा.

बाजीरावसाहेबांनीं नानांस शिंद्याकडून कैद करविलें त्या वेळीं सर्वत्र स्वराज्यांत व परराज्यांत आपण नानांस अधिकारभ्रष्ट केल्याचें जाहीर केलें होतें; व नानांच्या ताब्यांत प्रतापगड, रायगड, लोहगड वगैरे किल्ले होते तेथील अंमलदारांस याउपर नानांचा हूकूम न मानण्याविषयीं ताकीदपत्रें पाठविलीं होतीं. फार वर्षांपासून साताऱ्याचा किल्ला व तेथील महाराजांचा बंदोबस्त नानांकडे होता तो त्यांच्या ताब्यांतून काढून आपल्या हातीं घेण्याचें नाजूक काम आजच करूं जावें तर तें कदाचित् बिनसेल अशी बाजीराव साहेबांस शंका आली; शिवाय नानांचा मुक्काम पुण्यास शिंद्याच्या छावणींत असेपर्यंत त्यांस शिंदे द्रव्याच्या आशेनें सोडतील किंवा कसें होईल हाही भरंवसा श्रीमंतांस वाटेना! सबब त्यानीं तूर्त साताऱ्याच्या महाराजांस इतकेंच लिहिलें कीं, आजपर्यंत राज्याचा कारभार नाना फडनवीस करीत होते, परंतु हल्लीं आम्ही त्यांस कारभारांतून काढिलें आहे. याकरितां इतःपर साताऱ्याच्या किल्ल्यावर नानांची हुकमत चालूं देऊं नये. इकडील कारकून नानांच्या नेमणुकीचे तेथें आहेत ते कैद करावे. मागून आमच्या विश्वासाचा कोणी कारकून तेथील बंदोबस्ताकरितां पाठवून देऊं तोंपर्यंत महाराजानीं किल्ला आपल्याच हातीं ठेवावा. याप्रमाणें पेशव्यांचें पत्र जातांच महाराजानीं आपली सोयरे मंडळी गोळा केली व त्यांच्या मदतीनें गडकरी सामील करून घेऊन नानांच्या तर्फेचा कारकून बाबूराव आपटे यास कैद केलें व किल्ल्यावर स्वतःचा अंमल बसविला. याप्रमाणें साताऱ्याचा दंगा उत्पन्न होण्यास अवसर मिळून तो क्रमाक्रमानें फैलावत गेला.

तूर्तापुरती कां होईना, पण सत्ता हातीं आली म्हणजे ती कायम करण्याविषयीं कोणाच्याही तोंडाला पाणी सुटणारच. त्यांतून ते

तर छत्रपति महाराज! स्वतंत्र होण्याचा इतका अवसर पेशव्यानीं त्यांस दिल्यावर पुनः कारागृहांत राहण्याची इच्छा त्यांस कशी होईल? राज्यांत चोहोंकडे धामधूम माजलेली असल्यामुळें आपणावर पगडा बसविण्यास बाजीराव यावेळीं असमर्थ आहेत, तर आपला फायदा करून घेण्याची ही अमोलिक संधि व्यर्थ जाऊं देऊं नये, असें महाराजांच्या मनांत आलें. किल्ला आयता आपल्या हातीं आलाच आहे त्यापक्षीं सातारा शहर व भोंवतालचा टापू ताब्यांत घेऊन आपण करवीरकरांप्रमाणें स्वतंत्र रहावें, अशी त्यानीं मसलत केली. या मसलतीस त्यांचे बंधु चतुरसिंग व आप्तविषयी बापूजी महाडीक, भवानजी शिर्के व येलोजी मोहिते यांचें पूर्ण प्रोत्साहन होतें इतकेंच नव्हे, तर जुने दरकदार, कारकून, मुत्सद्दी, भट भिक्षुक पुराणिक, वगैरे सुद्धां सर्व नोकर महाराजांस अनुकूळ झाले होते.

या मनसब्याची सातार्‍यास वाटाघाट चालू असतां शिंद्यांनीं पुण्याहून नानांस नगरच्या किल्ल्यास पाठवून दिलें. त्याबरोबर बाजीरावानीं शिवराम नारायण थत्ते यास सातार्‍यास रवाना केलें व सातार्‍याचा किल्ला थत्ते याच्या हवालीं करण्याविषयीं महाराजांस विनंतीपत्र पाठविलें. परंतु महाराजांच्या मनांत निराळाच डाव घोळत असल्यामुळें त्यानीं थत्ते यास किल्यावर घेण्याचें साफ नाकारलें.

ती गोष्ट बाजीरावसाहेबांच्या कानावर जातांच त्यांस चिंता उत्पन्न झाली व महाराजांवर वजन पाडण्याकरितां व त्यांभोंवतीं गोळा झालेल्या मराठे मंडळीवर दहशत बसविण्याकरितां त्यानीं माधवराव रास्ते यांची फौजेसह सातार्‍यास रवानगी केली. रास्ते सातार्‍यास गेले ते राजधानीची मर्यादा राखण्याकरितां वेण्णेअलीकडे फौज ठेवून बाकी सरंजाम व जुजबी लोक बरोबर घेऊन शहरांत गेले. त्यांचा मुक्काम पेशव्यांच्या

वाड्यांत होता व सरंजाम शहरांत जागोजाग उतरला होता. महाराजांशीं माधवराव रास्ते यांचें किल्ला हवालीं करण्याविषयीं बोलणें बहुत वेळां झालें, परंतु दरखेपेस महाराजांकडून त्यांस टाळाटाळीचींच उत्तरें मिळत गेलीं. रास्त्यांशीं हें बोलणें चालू असतां त्याच वेळीं महाराजांचे वकील पुण्यास शिंद्यांचा छावणींत व पेशव्यांच्या दरबारांत आपली बाजू मांडून दाखवून तिचें समर्थन करीत होते. त्यांत महाराजांचे मुद्दे कबूल करण्याकडे सर्जेराव घाटग्याचा कल दिसूं लागतांच शिंद्यांविषयीं व खुद्द महाराजांविषयीं बाजीरावांच्या मनांत तेढ उत्पन्न झाली. असा दोहीं तिहींकडे साताराप्रकरणीं वाद माजून राहिला असतां त्याच संधींत बाजीराव व दौलतराव शिंदे यांमध्यें दुसऱ्याच कारणांवरून जबरदस्त विरोध उत्पन्न झाला. मे महिन्याच्या अखेरीस हा विरोध उत्कटावस्थेला पोंचला होता. त्यावेळीं बाजीरावसाहेबांस संकटांत पाडण्याकरितां सर्जेरावानें साताऱ्यास माणसें पाठवून महाराजांस आश्वासन दिलें कीं, तुम्हीं पेशव्यांचें वर्चस्व झुगारून द्यावें व स्वतंत्रपणानें रहाण्याचा हेत तडीस न्यावा. पेशव्यांशीं लढण्याचा प्रसंग आल्यास शिंद्यांचीं पलटणें पाठवून मी तुमची कुमक करितों इतकेंच नव्हे, तर करवीरकरांचें व तुमचें सूत्र मिळवून देतों! आठ चार दिवस गेले नाहींत तों घाटग्यानें बोलल्याप्रमाणें करून दाखविलें सुद्धां! साताऱ्याहून सूचना येतांच आपण स्वतः फौज घेऊन तेथें येतों असें करवीरच्या शिवाजी महाराजानीं सातारकर शाहुमहाराजांस सांगून पाठविलें. इतकी आंतून तयारी झाल्यावर सातारकरांच्या वर्तनांत एकदम वक्रता उत्पन्न झाल्याचें रास्त्यांच्या निदर्शनास आलें. महाराजानीं आठ चार दिवसांत फौज जमा करून शहर ताब्यांत घेतलें, व रास्त्यांस सांगून पाठविलें कीं, तुम्ही येथून बऱ्या बोलानें निघून जावें. न जाल तर बळजबरीनें घालवून देऊं! त्या धामधुमीचें वर्णन एका पत्रांत आलें आहे तें असें:—

"सातारा प्रकरणीं वर्तमान तर महाराजानीं दोन हजार फौज व किल्यासुद्धां दोन हजार पायदळ आज चार दिवसांतच जमा केलें. वरचेवर जमाव होतच आहे. दहा हजार पर्यंत जमाव आठचार दिवसांत होईल असें आहे. यास कारण तर शिंदे यांजकडील बोलणार आले होते त्यांचीं बोलणीं होऊन संधान मिळून हा जमाव जाला. वरचेवर स्वार व पायदळ आणखी जमा होत आहे. महाराज किल्याखालीं उतरणार आहेत. राजश्री माधवराव (रास्ते) यांसही निघून जाणें असें महाराजांकडून बोलण्यांत आलें आहे. हेही श्रीमंतांच्या वाड्यांत आहेत. ही जागा सोडून कृष्णेच्या सुमारें जावें या बेतांत आहेत. सारांश महाराजांचें बळ दिवसेंदिवस आधिक पडत चाललें. महाराज शहराबाहेर डेरे देऊन फौज उतराविणार, रास्ते यांस येथून काढणार, असें आहे ...... महाराजांची मसलत स्वाऱ्या करून व गांवगन्ना व शहरांत वगैरे धामधूम करून ऐवज करावा अशीही आवाई आहे. शहरचे लोक गडबडले आहेत ."

साताऱ्यास घडत असलेलीं हीं वर्तमानें बाजरिवसाहेबांच्या कानावर जातांच त्यांची जी त्रेधा तिरपिट उडाली तींतच परशुराम भाऊंची कैदेंतून सुटका होण्याचा योग आयताच जमून आला ! साताऱ्याचें खूळ बळावूं दिलें तर पेशवाईच्या पदास आपणास मुकावें लागेल हें बाजीरावसाहेबांस पक्कें ठाऊक होतें. त्या खुळाचा बीमोड करण्यासारखा फौजबंद नामांकित इभ्रतीचा सरदार दौलतराव शिंद्याखेरीज त्यांच्या पदरीं कोणी राहिला नव्हता आणि दौलतरावाकडे पहावें तर त्यानें धन्याशींच भांडण्याकरितां चंग बांधला होता व जाणूनबुजून सातारकरांची उठावणी केली होती ! शिवाय करवीरकर महाराज सातारकरांस अनुकूळ झाल्यामुळें अधिकच घोंटाळा माजण्याचें भय होतें हें निराळेंच ! शिंदे, सातारकर, व करवीरकर या त्रिवर्गाचें कूट एक होऊन आपल्या

सत्तेस विरोध करण्याकरितां सज्ज झालें त्याचा परिहार कसा करावा, हा श्रीमंतांपुढें विचार उभा राहिला. शिंदे व त्यांच्या बाया यांचें झोंबट याच वेळीं सुरू झालें होतें ही गोष्ट मात्र श्रीमंतांच्या पथ्यावर होती. तें झोंबट तसेंच पुढें चालू राहिलें तर पुणें मुक्कामीं शिंद्यांस जखडून धरितां येईल ही श्रीमंतांची खात्री होती. पण करवीरकर व सातारकर यांचा बंदोबस्त करण्यास परशुराम भाऊखेरीज दुसरा कोण सरदार समर्थ होता ? असा बिनतोड प्रसंग आल्यामुळें भाऊंच्या सुटकेविषयीं रास्त्यांची रदबदली मान्य करणें बाजीरावसाहेबांस नाप्राप्त झालें.

आजपर्यंत परशुराम भाऊंच्या सुटकेबद्दल गंगाधरराव पटवर्धन मिरजकर व माधवराव रास्ते यानीं बहुत खटपट केली होती. नाना फडनवीस, अमृतराव व दौलतराव शिंदे यांची मर्जी भाऊंस न सोडावें अशी नव्हती. पण बाजीरावांच्या दुराग्रहापुढें कोणाचाच यत्न चालला नाहीं. मांडवगणास गेल्यापासून भाऊंच्या शरीरास आराम नव्हता. आमांशाच्या विकारामुळें त्यांची वारंवार हैराणगत होत असे. यंदां तर त्यांची प्रकृति फारच बिघडल्यामुळें हवा पालटण्यासाठीं त्यांचें स्थलांतर करणें जरूर झालें. त्यामुळें चिपळुणाजवळ खेडच्या खाडीवर सुस्वेरी म्हणून गांव आहे तेथें त्यांस नेऊन ठेवावें अथवा वांई प्रांतीं घेऊन जावें असा रास्त्यानीं घाट घातला. तों पुण्यांत सर्जेरावी माजली. कांहीं पैका हबकल्याखेरीज भाऊंस जाग्यावरून हालूं देऊं नये अशी सर्जेरावाच्या मनांत कल्पना आली आणि त्यानें भाऊंच्या जाण्यास हरकत केली. हल्लीं तरी बाजीरावसाहेबानीं परशुरामभाऊंस पूर्णपणें कैदेंतून मोकळें केलें असें नाहीं. त्यानीं रास्त्यास बजाविलें कीं, साताऱ्याचें खूळ मोडण्याकरितां तुम्ही परशुरामभाऊंस तिकडे घेऊन जाणार तर जा, त्यांच्या वजनाचा व फौजेचा उपयोग करून घ्या, पण आम्ही त्यांची कैदेंतून सुटका

केली असें मात्र समजूं नका ! गुन्हेगारीबद्दल त्यांनीं दहा लक्ष रुपये द्यावे असें तुम्ही म्हणतां, आम्ही पंधरा लक्ष म्हणतों. यांतून जी रक्कम ठरेल तिचा भरणा सरकारांत होईपर्यंत ते कैदेंतच आहेत व कारण पडल्यास त्यांस आणून सरकारांत हजर करण्याची जबाबदारी तुम्हांवर आहे ! रास्त्यांनीं तीच पडत्या फळाची आज्ञा घेऊन परशुरामभाऊंची प्रकृति नीट नव्हती तरी त्यांस मांडवगणाहून हालविण्याची त्वरा केली. ता. १६ जून रोजीं परशुरामभाऊ आपलें कारागृहाचें स्थळ सोडून रास्त्यांच्या लोकांबरोबर भीमा उतरून अलीकडे आले.

इकडे सातान्यास महाराजानीं माधवराव रास्ते यांस निघून जाण्याविशीं तगादा लाविला असतां शहर सोडून जाण्यास ते अनमान करीतच होते. परशुरामभाऊ आल्यावर आपण व ते येथेंच राहून फौज जमा करावी, म्हणजे सातारकरांस दहशत बसून त्यांची पांगापांग होईल असें त्यांस वाटत होतें. परंतु त्यांचें इतकें प्राबल्य होईतों महाराजानीं मुळींच वाट पाहिली नाहीं ! ज्या दिवशीं परशुरामभाऊ मांडवगणाहून निघाले त्याच दिवशीं म्हणजे १६ जून रोजीं रात्रौ महाराजानीं किल्यावरून उतरून रास्त्यांवर छापा घातला, व त्यांस लुटून शहरांतून हुसकून लाविलें ! तो प्रसंग एका पत्रांत वर्णिला आहे तो असा---

" परवां मंदवारीं श्रीमन्महाराजांकडील लोक सातान्यावरून उतरून (त्यानीं) सरकारचे लोक शहरांत होते ते जबरदस्तीनें बाहेर लावून दिले. माधवराव रास्ते पेशव्यांच्या वाड्यांत राहिले होते त्यांची कांहीं चीजवस्त तशीच राहिली. सरकारचे लोक बाहेर येतांच महाराजानीं झाडून शहरांत चौक्या बसवून बाहेर तयार होऊन येऊन रास्त्यांवर चालोन घेतलें. तेव्हां इकडील लोक तयार होऊन त्यांजवर चालोन गेले. कांहीं लढाई जाली. ते गांवांत,

याजमुळें बाहेरच्या लोकांची काटगिरी होईना. तों तोफा लाविल्या परंतु कांहीं काटगिरी जाली नाहीं. किल्यावरीलही तोफा त्यानीं मारिल्या. रास्ते शहरात राहिले होते त्याजमुळें गळाठा फार जाला."

वर लिहिल्याप्रमाणें महाराजानीं माधवराव रास्ते यांस साताऱ्याबाहेर हुसकून लाविलें. यानंतर वेण्णेच्या पैलतीरीं राहूनसुद्धां आपला निभाव लागणार नाहीं असें समजून ते फौजेचा तळ हालवून कृष्णेपलीकडे गोव्याजवळ जाऊन राहिले व मांडवगणाहून परशुरामभाऊंच्या येण्याची प्रतीक्षा करूं लागले. जूनच्या २५ तारखेस भाऊ रास्त्यांच्या लष्करासमीप येऊन समारंभानें उभयतांच्या भेटी झाल्या. त्या प्रसंगीं खुशालीच्या तोफा झाल्या. रास्त्यांच्या चौक्या आजपर्यंत परशुरामभाऊंभोंवत्या होत्या त्या उठवून रास्ते यानीं त्यांची मोकळीक केली. त्या लष्करांत पटवर्धनांचे तीन चारशें स्वार मिरजेहून आलेले होते तेवढ्यानिशींच परशुरामभाऊनीं शेजारीं मालगांवच्या रानांत आपला निराळा गोट केला. पूर्वीं भाऊंस कैद करतेवेळीं रास्त्यानीं त्यांची शिक्केकट्यार, लगी, डंका, निशाण वगैरे सरंजाम काढून घेतला होता तो या प्रसंगीं भाऊंच्या डेऱ्यास येऊन समारंभानें त्यांच्या हवालीं केला. तोच सरंजाम बरोबर घेऊन त्याच मुहूर्तावर भाऊंचे द्वितीय पुत्र हरीपंतबाबा स्वारीस निघाले ते श्रीकृष्णाबाई व श्रीकोटेश्वर यांचें दर्शन घेऊन गोटास आले. पुण्याहून बाजीरावसाहेबानीं रास्त्यांच्या कुमकेस नरसिंगराव विंचूरकर यांची पथकसुद्धां रवानगी केली होती ते २७ तारखेस येऊन पावले. नंतर परशुरामभाऊनीं चोहोंकडे पत्रें व माणसें पाठवून स्वार पायदळ गोळा करण्याचा जारीनें उद्योग केला. लढाऊ महाराष्ट्रावर त्यांच्या नांवाचें इतकें वजन होतें कीं, पावसाची मुसळधार सुरू असतांही प्रत्यहीं दूरदूरच्या ठिकाणांहून शेंदोनशें स्वार शिपाई चाकरीस रहा-

वयाकरितां त्यांच्या लष्करांत हजर होऊं लागले. असें होतां होतां जुलैच्या अखेरीपर्यंत त्यांजवळ सात आठ हजारपर्यंत लोक गोळा झाले. शिवाय रास्ते व विंचूरकर यांची तीन चार हजार फौज होती ती निराळीच.

ही परशुरामभाऊंची फौज गोळा होत असतां त्यांच्या लष्करास बेरडांकडून फार उपद्रव होत असे. साताऱ्याच्या महाराजानीं हे बेरड चाकरीस ठेविले होते, व त्यांची संख्या पांच सातशेंच होती तरी ते वारंवार अचानक घाले घालून लष्करचीं घोडीं व इतर माल लांबवीत व शिपाई जायां जखमी करीत. कोरेगांवाच्या अलीकडे लष्करापर्यंतची वाट त्यानीं बंद पाडिल्याप्रमाणेंच होती. परशुरामभाऊनीं सातारकरांवर चालून जावें तर पर्जन्य फार व कृष्णेस पूर येऊन उतार मोडलेले, सबब त्यांस स्वस्थ रहाणें प्राप्त झालें. सातारकरही स्वस्थच होते. त्यानीं प्रारंभीं पांच सहा हजार फौज जमा केली होती ती त्यानीं वाढविली नाहीं व बेरडांचा उपद्रव वर सांगितला त्यापेक्षां अधिक उपद्रव त्यानीं प्रतिपक्षास दिला नाहीं. इतका बेफिकीरपणा त्यांच्या अंगीं येण्याचें कारण असें होतें कीं, शिंद्यांकडून व करवीरकरांकडून आयत्या वेळीं आपल्या मदतीस फौज येईल असा त्यांस भरंवसा वाटत होता. पण सोक्षमोक्ष होण्याची वेळ आली तेव्हां त्यांस दोन्ही ठिकाणांहून काडीचीसुद्धां मदत झाली नाहीं व लढाईचा सर्व बोजा त्यांचा त्यांसच सोसावा लागून त्यांतच त्यांचा नाश झाला! शिंदे व करवीरकर सातारकरांचें साहाय्य कां करूं शकले नाहींत ही वाचकांची जिज्ञासा तृप्त करण्याकरितां करवीरकरांच्या लष्कराची काय हालहवाल होती, व शिंद्यांच्या लष्करांत व पेशव्यांच्या दरबारांत कोणचे विलक्षण प्रकार घडून येत होते, हें सांगितलें पाहिजे.

रास्त्यांवर छापा घालून त्यांस साताऱ्यांतून काढून लाविल्या-बरोबर तेथील महाराजानीं करवीरकर महाराजांस पत्र लिहिलें कीं, रास्त्यांच्या हलाखीचें वर्तमान पुण्यास पोंचून तेथून बंदोबस्ताची तजवीज होण्याआधीं आपण सत्वर निघून येथें दाखल व्हावें. तें पत्र येतांच ताबडतोब सुमारें तीन हजार स्वार, दोन हजार पायदळ, व एक थोरली तोफ असा सरंजाम घेऊन करवीरचे महाराज स्वारीस निघाले. पेशव्यांच्या जाचांतून आपले भाऊबंद सातारकर यांची सुटका करण्यासाठींच करवीरकरानीं या स्वारीचा उपक्रम केला असें मात्र कोणी समजूं नये. लूट मिळवून गबर व्हावें यापलीकडे त्यांचा कोणचाही उद्देश नव्हता. पेशव्यांवर दाब बसविण्याकरितां पुण्यास येऊन आमची कुमक करावी असा शिंद्याकडून— म्हणजे सर्जेराव घाटग्याकडून— याच वेळीं त्यांजकडे प्रेष आला होता, व त्यास अनुसरून साताऱ्याचें काम उरकल्यावर पुण्यापर्यंत पल्ला मारण्याचा त्यांचा इरादा होता. असो. करवीरकरांचा पहिला मुक्काम इस्लामपुरावर झाला तेथें मंत्री यांजपासून खंडणी घेऊन व अष्टें येथें ठाणें बसवून ते कांबेरीवर गेले. तेथें एक दोन मुक्काम करून कासेगांवास आले. त्या ठिकाणीं कऱ्हाडकरांचा कारकून त्यांजकडे येऊन गरीबीनें बोलूं लागला कीं, आमच्या मुलखास बिलकुल उपद्रव न देण्याचें कबूल करीत असाल तर आम्ही तुम्हांस उंब्रजेजवळ कृष्णा उतरावयास मार्ग देऊं. त्यावर महाराजांचे बोलणें पडलें कीं, तुम्ही आम्हांस मार्ग दिलाच पाहिजे, आणि खंडणीही दिली पाहिजे! शिवाय सन १७७६ त भवानराव प्रतिनिधींनीं आमचा जरीपटका व निशाणाचा हत्ती व नौबत लढाईंत पाडाव करून नेली तें सर्व परत दिलें पाहिजे. असें उत्तर येतांच पुढें कसें करावें हा कऱ्हाडकरांस विचार पडला. इतक्यांत भोवतालचीं खेडीं लुटण्याचा करवीरकरानीं सपाटा लाविला. पंचगंगा, कृष्णा व वारणा या नद्यांच्या उत्सवाकरितां प्रतिनिधींनीं ब्राह्मणांस पंधरा गांव इनाम दिले होते तेही या सपाट्यांत लुटले

गेल्यामुळें कऱ्हाडकरांचें मन करवीरकरांच्या सद्धेतूविषयीं साशंक झालें. त्याचवेळीं रास्त्यांकडून त्यांस इशारा आला कीं तुम्ही करवीरकरांस मार्ग देऊं नये. आम्ही तुमची कुमक करितों. तेवढा धीर मिळाल्यावर कऱ्हाडकरानीं करवीरच्या महाराजांस साफ सांगितलें कीं, आम्ही तुम्हास मार्ग देणार नाहीं अथवा खंडणी वगैरे कांहींएक देणार नाहीं. तुम्हीं परत जावें.

खरें पाहिलें तर परत फिरण्यास करवीरच्या महाराजांस योग्य सबब यावेळीं नव्हतीशी नाहीं. कारण कीं, ते साताऱ्याकडे येणार हें वर्तमान कळतांच बाजीरावसाहेबानीं त्यांस विनंतिपत्र पाठविलें तें या कासेगांवच्या मुक्कामींच पोचलें होतें. 'आपण पुढें येऊं नये, जेवढा मुलूख आपण घेतला असेल तेवढा तूर्त आपणाकडे असूं द्यावा, पुढें स्वस्थता झाल्यावर तहाचा ठराव होईल तो आपल्या मर्जीप्रमाणेंच होईल.' अशी मागणी त्या पत्रांत पेशव्यानीं करवीरच्या महाराजांजवळ केली होती. परत फिरण्यास आणखी दुसरी एक योग्य सबब उत्पन्न झाली होती ती अशी—थोडे दिवसांपूर्वीं कर्नाटकांतून परत येतांना तिकडील मुलखावर पन्नास लक्षांची वरात करवीरच्या महाराजानीं रत्नाकरपंत राजाज्ञा यांच्या हवालीं करून रकमेच्या वसुलाकरितां पांच हजार फौजेसह त्यांस तिकडे ठेविलें होतें. हल्लीं पेशव्यांचे सरदार धोंडोपंत गोखले यांची व राजाज्ञा यांची लढाई सुरू झाली होती तींत राजाज्ञांचा पराजय वारंवार होत होता. सबब त्यांच्या कुमकेस धारवाड सावनुराकडे करवीकर-महाराजांस जाणें प्राप्त होतें. परंतु या दोनी कारणांकडे डोळेझांक करून त्यांनीं साताऱ्यास जाण्याचेंच नक्की ठरविलें व कऱ्हाडकरांचें पारिपत्य करावें या उद्देशानें कासेगांवाहून निघून कऱ्हाडाशेजारीं कालें व वाडें या खेड्यांच्या दरम्यान लष्कराचा तळ देऊन ते राहिले. तेथें त्याचा सुमारें पंधरा दिवस मुक्काम होता. त्या अवधींत त्यानीं कऱ्हाडकरांच्या गांवांपासून आधीं खंडणी

घेतली आणि मागून दगाबाजीनें ते सर्व गांव लुटून फस्त केलें ! रयतेवर हा प्रळय कसा गुदरला असेल ही कल्पना आम्ही उदाहरणार्थ येरोळें गांवाची हकीगत पुढें देत आहों त्यावरून होण्याजोगी आहे. येरोळें हा गांव सातारकर महाराजांच्या खासगत संस्थानापैकीं असून त्या महाराजांस मदत करण्याच्या निमित्तानें निघालेल्या करवीरकर महाराजांनीं त्या गांवाची अशी दुर्दशा करावी ही फार आश्चर्याची गोष्ट होय !

" मौजे येरोळें हा गांव सातारकर महाराजांकडील आहे. तेथील व येथील महाराजांचे तूर्त काळीं रहस्य, याजमुळें इंग, चचेगांव व तलबीड व कालें वगैरे पांच चार गांवचें गुळें तेथें जाऊन राहिलें होतें. कारण तेथें उपद्रव व्हावयाचा नाहीं हें समजूनच गेले होते. ऐशास सारी लष्करचीं कही जाऊन तो गांव दरोबस्त गुरांढोरांसुद्धां लुटला गेला ! गांवची खराबी बहुत जाली. बायकांचीं वस्त्रें देखील नेलीं ! तीन चार हजार पर्यंत गुरें लुटलीं. विषय लाख रुपयेपर्यंत लुटला गेला. साताऱ्याकडील रा॥ बापूजी महाडीक व राघोपंत इकडील फौज (साताऱ्यास) नेणेंबद्दल आले आहेत त्यांस वर्तमान कळलेवर बहुत खट्टे जाले. तेव्हां महाराजानीं गुरें वगैरे परत देवावितों म्हणून समाजाविसी केली व शोध करविला. तेव्हां गुरें शंभर दीडशें जमा करविलीं व कांहीं वाकळा व दाणे दहा मणपर्यंत व पांच चार भाले इतकें जमा जालें ते त्यांचे स्वाधीन करविलें ! वरकड कांहीं ठिकाण लागला नाहीं. अशी अवस्था जाली. "

" येरोळें लुटलें तेव्हां त्या दंग्यांत सात आठ बायकांनीं नदींत उडी टाकून जीव दिले. त्या बायका कऱ्हाडास लागल्या. वस्त्रें देखील नाहींत ! एका बायकोच्या खाकेंत मूल लहान होतें तें मूल तसेंच मेलेलें सुद्धां बायको होती ! हें वर्तमान कळलेवर कऱ्हाडकर

श्री॥ मातुश्री बाईसाहेबानीं अग्न देविली. बायका ब्राह्मणांच्या होत्या. वरकड तीन चार शूद्रांच्या."

या अवधींत साताऱ्याहून करवीरच्या महाराजांकडे वारंवार निकडीचीं पत्रें येत होतीं. 'फौजेसह सत्वर निघून यावें. परशुराम-भाऊंची तयारी होऊन साताऱ्यावर चालून येण्याकरितां ते पर्जन्यानें उघाडी देण्याची वाट पहात आहेत. आम्ही तुम्हांवर भार घालून बसलों आहों. तुम्ही न याल तर आमची धडगत नाहीं.' असे भाव त्या पत्रांतून दर्शविलेले असत. त्या पत्रांस उत्तर म्हणून करवीरच्या महाराजानीं एक पत्र देऊन आपला हुजऱ्या पाठविला त्याची हकीगत पटवर्धनांचा कारकून देतो ती—"हुजऱ्या साताऱ्यास तेथील फौजेचा व श्री॥ राजश्री भाऊसाहेबांच्या फौजेचा अजमास पहावयास गेला होता हें अंतर्याम. बाह्यात्कारें इकडून तेथील महाराजांस पत्र होतें कीं, फौज सत्वरच रवाना होईल, असें पत्र पाठविलें होतें. त्यास हुजरे यास सातारकर महाराजानीं तिवट व शेला जैनाबादी आपल्या अंगावरचा दिला. अदमासें किंमत दोनशें अडीचशेंचा आहे."

साताऱ्याचा प्रसंग किती आणीबाणीचा आहे हें करवीरच्या महाराजांस समजल्यावर त्यानीं वाळवें व रेटरें येथील नावा आणून मालखेडाजवळ कृष्णापार व्हावें अशी मसलत योजिली. तों पटवर्धनी मुलखांतल्या लोकानी त्या नावा लांबवून नदींत कोठें बुडवून टाकिल्या हा पत्ता देखील लागेना! नदी उतरण्याची ती मसलत सिद्धीस जात नाहींसें पाहून करवीरकरानीं कऱ्हाडकरांशी पुनः संदर्भ लाविला कीं, आम्हांस दुसरें कांहीं नको. आम्ही तुमच्या रयतेस याउपर इजा देणार नाहीं. कृष्णेस जेथें तुमच्या मुलखांत उतार असतील तेथून पलीकडे जाण्याकरितां फक्त आम्हांस मार्ग द्या म्हणजे झालें! या बोलण्यांत आपले गुरु नरसिंगपूरकर भटजी-

बावा यांसही त्यांनीं मध्यस्तीस घालून पाहिलें, परंतु कऱ्हाडकर बिलकुल ऐकेनात. त्यामुळें कऱ्हाडकरांवर चालून जाऊन बलात्कारानें आपला हेतु सिद्धीस नेल्याखेरीज करवीरकरांस दुसरा उपाय राहिला नाहीं. कऱ्हाडांत भवानराव प्रतिनिधीची स्त्री काशीबाई होती. तिची हिंमत व कर्तृत्व हीं तिच्या पतीच्या पराक्रमास अनुरूप अशींच होतीं. युद्धाचा प्रसंग पडला तरी डगमगणारी ती बायको नव्हती !

ता० २१ जुलै रोजीं करवीरकरांची फौज कऱ्हाडावर चालून आली. तों आंतून दीड हजारपर्यंत पायदळ व हजार बाराशें स्वार तयार होऊन आग्नेयीच्या बाजूनें निमजग्यापावेतों आले. तेथें उभय सैन्यांची गांठ पडून थोडी झटपट झाली. करवीरकर मागें सरकून आपल्या गोटास गेले व कऱ्हाडकर गांवांतून तोफा आणवून लढाईच्याच जागीं मुक्काम करून राहिले.

कृष्णा उतरण्यास मार्ग मिळत नाहीं, सबब तुम्ही साताऱ्याहून दोनशें स्वार व पांचशें पायदळ कोयनेच्या पैलतीरास पाठवाल तर आम्हीं कोयना उतरून येतों, असें करवीरकरानीं सातारच्या महाराजांस सांगून पाठविलें.त्यावरून साताऱ्याहून त्याप्रमाणें ताबडतोब कोयनेच्या पैलतीरास फौज आली. तेव्हां करवीरकर कोयना उतरण्याची तरतूद पाहूं लागले. तों कोयनेच्या तीरास कऱ्हाडकरांचें कोळें हें ठाणें मजबूत व जबरदस्त होतें, तेथील लोकांनीं करवीरकरांशीं लढण्याची तयारी केली. शिवाय जेथें कोयनेस उतार आहे तेथें वसंतगडावरील तोफांचे गोळे लागू होतात हेंही वर्तमान समजलें. तेव्हां कोयना उतरण्याचा विचार करवीरकरांस रहित करावा लागला. नंतर कऱ्हाडावर आणखी एकदां एलगार करून पहावा असें योजून ता. ३ आगष्ट रोजीं करवीरकर पुन्हा कऱ्हाडावर चालून आले. त्याप्रसंगीं बरीच मोठी लढाई होऊन करवीरकरांस

पुन: मागें हटावें लागलें. उभयपक्षीं शेंपन्नास लोक ठार व जखमी झाले. करवीरकरांच्या बाजूस नारायणराव घोरपडे कापशीकर, आनंदराव व नागोजी घाटगे, गोविंदराव मोहिते बेलवडेकर या सरदारांस जखमा लागल्या.

जून व जुलै महिन्यांत सातारा व कऱ्हाड या प्रांतीं काय काय धामधुमी चालल्या होत्या त्यांचें हा वेळपर्यंत वर्णन झालें. या मुदतींत पुणें प्रांतीं याहूनही विलक्षण व फार महत्वाच्या गोष्टी घडत होत्या त्यांकडेही आतां लक्ष्य दिलें पाहिजे. सातारा प्रकरणाचा बीमोड होण्याशीं या गोष्टींचा थोडा फार संबंध आहेच. शिवाय त्यांचा उल्लेख करणारीं पत्रें ज्याअर्थी आम्हीं या प्रकरणांत गोविलीं आहेत त्याअर्थी त्या पत्रांच्या विशदीकरणार्थ त्या त्या गोष्टींचा सविस्तर वृत्तांत आम्हांस येथें दिलाच पाहिजे.

शिंद्याच्या बायांनीं अमृतरावांचा आश्रय केला आणि अमृतराव तुळापुरावर होते ते बक्षी पठाण व मराठे सरदार यांच्या फौजांसह बायांस बरोबर घेऊन थेउरावर आले, हें मागच्या प्रकरणांत लिहिलेंच आहे. त्या मुक्कामीं सर्जेराव घाटगे कांहीं फौज घेऊन त्यांवर चालून आला. तेव्हां अमृतरावानीं घाटग्याचा मोड करून शिंद्याच्या छावणीपर्यंत त्याचा पाठलाग केला. या अपमानाचा सूड सर्जेरावानें अमृतरावांवर कसा घेतला हें पुढें येईलच. असो.

याप्रमाणें सर्जेरावानें आपण होऊन कुरापत काढल्यावर बक्षी, पठाण व अमृतराव यांचीही शिंद्याच्या छावणीसमीप येऊन लढाई देण्याकरितां हालचाल सुरू झाली. हा तंटा विकोपास गेला, व आतां लढाई होणार ती पुण्याजवळच होणार, हें पाहतांच बाजीरावांचें धाबें दणाणलें ! उभय पक्षांची समजूत करण्याकरितां श्रीमंतानीं फार खटपट केली, परंतु त्यांच्या मध्यस्थीस कोणीच विचारीना ! शेवटीं श्रीमंतानीं दोहीं पक्षींच्या लोकांस आज्ञा ऊर्फ प्रार्थना केली कीं, मीं चिमाजीआपांचें लग्न करण्याचें ठरविलें आहे

तो समारंभ सिद्धीस जाईपर्यंत तरी एक दोन दिवस सबुरी करावी ! तेवढें मात्र त्यांचें म्हणणें दोनी बाजूंच्या त्या उतावीळ युयुत्सूनीं मान्य केलें.

ज्येष्ठ व० ९ शुक्रवार या दिवशीं गोरज मुहूर्तावर चिमाजी-आपांचें लग्न व्हावयाचें ठरलें होतें, व आपाजीपंत दामले यांची नात वधू नेमिली होती. लग्नाचा समारंभ अशा धामधुमीच्या दिवसांत होणार असल्यामुळें तो सामान्यच व्हावयाचा हें उघड आहे. पुण्यांत वेळोवेळ घडलेल्या समारंभांचे वृत्तांत ऐतिहासिक-लेख–संग्रहाच्या निरनिराळ्या भागांतून पुष्कळदां आले आहेतच. हलींचा समारंभ विशेष डौलाचा नसला तरी ऐ. ले. संग्रहांत बहुधा हा शेवटचाच येणारा असल्यामुळें त्याची उपेक्षा करणें योग्य नाहीं. या समारंभाची हकीगत एका पत्रांत आली आहे ती अशी—

" श्रीमंतांच्या लग्नाचा समारंभ—पुढील नऊ खणांचे चौकांत महतापी केली होती. खांब सकलादीनें मढविले होते. चौकाचे दरवाज्यापासोन दिल्लीदरवाजापावेतों जागा खुली होती त्याचाही महतापी मंडप मढविला होता. वाड्याभोंवता चिरागान बुधवार, कापड ओळी, झाडून फडक्याच्या वाड्यापावेतों चिरागानाचीं लांकडें उभीं केलीं होतीं. रोषनाई माफक होती. फडक्यांच्या वाड्यापुढें रस्त्यांत अकरा खणांचा मंडप लंबोत्तर महतापी होता. व० ९ स भृगुवासरीं (८ जून) श्रीमंत मुत्सद्दीसुद्धां दामले व्याही यांचे घरीं भोजनास गेले होते. रात्रौ पांच घटका रात्रीस गृहप्रवेशास मुहूर्त होता. स्वारीपुढें आतषबाजी, घोड्यांचा व हत्तीचा रथ, जरीपटका व दोन तक्तरावे होते. सोयऱ्यांच्या घरांतून वरात दहा घटका रात्रीस वाड्यांत दाखल जाली. वाड्यांत दाखल जालेनंतर पांच सहा ठिकाणीं बैठक करून नाच होत होता. रोषनाईचा बैठकेचा भोजनाचा बेत व्यवहाराप्रमाणेंच होता. समारंभ चांगला जाला म्हणावयाचा !"

चिमाजी आपांच्या लग्नाची वरात शनवारच्या वाड्यांत येते न येते तों तिकडे वानवडीवर शिंदे व बाया यांची लढाई जुंपली ! बायांच्या बाजूस पठाण, मराठे व अमृतराव सुद्धां दहा हजारांवर फौज होती. शिंद्यांजवळ दोन कंपू व किरकोळ गारदी मिळून पंधरा हजारपर्यंत पायदळ, तीनचार हजार स्वार व पन्नासांहून अधिक तोफा असा सरंजाम होता. उजाडेपर्यंत गोळीबार चालला होता. उजाडल्यावर बायानीं छावणीभोवतीं गराडा घातल्याचें दिसून आलें. तेव्हां त्यांस धुडकावून लावण्याकरितां डू प्राट नांवाचा फ्रेंच सरदार पांच पलटणें व तोफा घेऊन निघाला. तो चालून येतोसें पाहून बाया मागें हटूं लागल्या आणि तो छावणीपासून बऱ्याच अंतरावर आलासें पाहून बायानीं त्यावर एकदम लगट केली. तेव्हां पलटणें घाबरीं होऊन मागें सरकूं लागलीं व छावणी गांठतां गांठतां त्यांस पुरेसें झालें !

ही लढाई झाल्यावर महादजी शिंद्यांच्या वेळचे जुने मुत्सद्दी रामजी व रायाजी पाटील व आबा चिटणीस यांच्या मध्यस्थीनें दौलतराव शिंद्यानीं बायांशीं समेटाचें बोलणें लाविलें. त्या बोलण्यांत त्यांची वृत्ति आर्जवाची व नम्रपणाची दिसून येत होती. बाजीरावसाहेबानींही बायांस सांगून पाठविलें कीं, दौलतरावाकडून तुमचे मुद्दे कबूल करवितों. तुम्ही पुण्याजवळ याव. बाया व अमृतराव यानीं त्यावेळीं आपल्या फौजेचा तळ यवतावर आणिला होता. शिंद्यांच्या व श्रीमंतांच्या बोलण्याचा भरंवसा धरून त्यानीं यवताहून आपलें लष्कर पुण्याजवळ आणिलें. विठ्ठलवाडीवर बाया उतरल्या व त्यांस पाठीशीं घालून तोंडावर भांबुर्डें येथें अमृतरावानीं मुकाम केला. यावेळीं शिंद्याच्या कंपूंत कांहीं मतभेद उत्पन्न झाल्याचा पुकारा करण्यांत आला. मुकेरीच्या पलटणांचा कल बायांच्या बाजूस व ड्रुजियनूचीं पलटणें मात्र दौलतराव व सर्जेराव यांच्या विश्वासांतलीं असा देखावा दाखविण्यांत आला. आमच्या पलटणांत तुम्हीं फितुर

केलात, तेव्हां आतां आमच्यानें तुमचें पारिपत्य काय होणार, असा भास उत्पन्न करून अमृतराव व बाया यांस बेफाम राहूं द्यावें व त्यांस गोड भुलथापांच्या नादांत गुंतवून अकस्मात् दगा करावा ही घाटग्याची मसलत होती व त्यासाठींच हा सारा खटाटोप होता. सर्जेरावानें आपलें तें दुष्ट कर्म ता० २५ जून रोजीं सिद्धीस नेलें तो प्रकार असा.—

"काल द्वादशी सोमवारीं दोन प्रहरीं शिंद्याचीं पलटणें अमृतराव साहेबांच्या गोटावर चालून गेलीं. गोटावर तोफांची मारगिरी केली. खासा रावसाहेब मात्र सडे फौजेनिशीं खडकीकडे गेले. खासे डेरे, जामदारखाना, देवपूजासह मुदबकाचें सामान, भांडीं सुद्धां सारें लुटलें. डेरे राहुट्या कंपूच्या लोकांनीं जाळिल्या. अस्तमानपर्यंत उभे राहून परत गेले. काल हरिवासर होता. रावसाहेबांचीं भोजनें जालीं नव्हतीं. बक्षीचें बुणगें लुटलें गेलें नाहीं. मारगिरी सरकारावरच जाली ! शहरही मारलें जाणार म्हणतात. श्रीमंतानीं रावसाहेबांची कुमक केली नाहीं एवढ्यांत बरें !"

"शिंद्याचीं पलटणें चालून आलीं तों अमृतरावांचा गोट तोंडास होता तो लुटला गेला. बाया व पठाण निभावले. अलाव्याचे ताबूत नदींत टाकावयास गेले त्या गलबलींत तोफा वीस व चार पांच पलटणें जाऊन गोळे लागू केले. सायंकाळीं पठाण पलटणांवर चालून आले, परंतु काटगिरी जाली नाहीं."

पठाणांची काटगिरी झाली नाहीं असें येथें लिहिलें आहे खरें, परंतु दुसऱ्या एका पत्रांतील उल्लेखावरून अमृतरावानीं हीं पलटणें आपल्या तळावरून हुसकून लावून त्यांच्या छावणीपर्यंत मागें रेटीत नेलीं असें दिसतें. हीं पलटणें छावणींत परत येतात न येतात तोंच "शिंद्याकडील रामजी पाटील व रायाजी पाटील उभयतां श्री॥ राजश्री बाजीराव साहेब यांजकडे आले. आणि

बोलले कीं, शिंदे यांजकडे सेवकपणा असोन लढाई जाली हा सेवकपणाचा धर्म नव्हे. असो. जालें तें बरेंच (!) जालें. आपण चित्तांत रोष धरूं नये. सरंजाम वगैरे लुटला गेला तो वगैरे झाडून देतों. आपण धनी. गुन्हा माफ करावा. आणि बायांची व अमृतरावं साहेब यांची येखलासी करून देवावी. शिंदे आपले आज्ञेशिवाय नाहींत. आपण आज्ञा करितील त्या अन्वयें वर्तणूक करितील;' ऐसें कितेक प्रकारचें बोलणें रहस्य व्हावयाचें उभयतां बोलले. बाजीरावसाहेब याणीं ऐकून मात्र घेतलें. उभयतांस उत्तर तिलमात्र केलें नाहीं, आणि जाबसालही कांहींच न बोलतां संध्येस उठोन गेले."

शिंद्यांच्या वर्तनाचा श्रीमंतांस आतिशय राग यावा, शिंद्यानें माझ्या भावावर हल्ला केला तो मजवरच केला असें त्यानीं मानावें, हें अगदीं साहजिक आहे. त्यांच्या मनांत क्रोध व भय एकदम उत्पन्न झालीं व त्या विकारांच्या प्रेरणेवरून त्यानीं निजामअल्ली आणि भोंसले यांशीं नवीन तह ठरविण्याचा घाट घातला. त्या तहाचा अभिप्राय हाच कीं, त्या दोघांनीं फौजा पाठवून शिंद्याशीं सुरू झालेल्या लढाईत आपणास मदत करावी! परंतु पुढें चार दोन दिवस गेल्यावर श्रीमंतानीं विचार केला कीं, झालेली अप्रतिष्ठा गिळून शिंद्यांशीं सौरस्य ठेवण्यांतच सुरक्षितपणा आहे! गरीब बिचारा बाजीराव! एका दुर्बळपणामुळे त्याचें पेशवाईचें पद हलक्या लोकांच्या कुचेष्टेस पात्र झालें होतें. सर्जेरावासारख्यांनीं आधीं लाथ मारावी, आणि मागून लगेच पायावर डोकें ठेवावें, असें वर्तन बाजीराव रघुनाथ पेशवे यासीं आजपर्यंत अनेकवेळां केलें तरी त्यांची क्षमावृत्ति जी ढळली नाहीं, ती या वेळीं तरी कशी ढळणार? त्यानीं शिंद्याचा अपराध माफ करून बायांशीं समेट घडवून आणण्याचा पुनः यत्न केला. व अमृतरावाची ही समजूत घालून पाहिली. परंतु अमृतरावाची समजूत होईना, व बायानीं एकच बोलणें धरिलें कीं, "धनी आपण आज्ञा करितां,

उत्तम आहे. आम्ही मान्य करितों. परंतु आम्हीं विनंती करितों ती ऐकून घ्यावी. त्याप्रमाणें शिंयांस मान्यता पडते असें जाल्यास उत्तम आहे. सखाराम घाटगे व फकीरजी गाढवे वगैरे सहा असामी कारभारी आमचे स्वाधीन करावे. आम्हीं सांगू ते जुन्या कारभाऱ्यांपैकीं कारभारी जवळ ठेवावे. कारभार करणें तो आमचे विचारें करावा. याप्रमाणें जाल्यास समजूत ठरेल." परंतु बायांच्या म्हणण्याप्रमाणें सर्जेराव वगैरे कारभारी हवालीं करण्याचें दौलतरावानीं साफ नाकारिलें. मग समेट कसा होणार? शेवटीं बायांनीं बाजीरावांस शेवटचें उत्तर सांगितलें कीं "याउप्पर तिकडील बोलण्याचा नाद सोडून द्यावा. आम्ही त्यास मारूं किंवा तो आम्हांस मारील. हीच त्याची आमची समजूत! पाटीलबावा देवाधीन जाले तेंव्हांच आम्हीं बरोबर जावें तें न जालें. त्यास तोच दिवस कल्पून लढाईतच मरून जाऊं! चिंता नाहीं."

पूर्वीं ज्या वेळीं शिंद्यानीं आपल्या लष्कर.तून जबरदस्तीनें बायांची रवानगी केली त्यावेळीं आपलें जवाहीर देण्याविषयीं बायानीं आक्रोश केला असतांही शिंद्यानीं तें दिलें नाहीं. हलीं तेंच जवाहीर व पोषाखाचीं सनगें शिंद्यानीं बायांस देण्याकरितां श्रीमंतांकडे पाठविलीं; परंतु "आम्ही एका वस्त्रानिशीं बाहेर निघालों तसेच चिरंजीव शिंदे लष्कर सोडून ज्या काळीं निघतील त्या काळीं जवाहीर व वस्त्रें जवळच आहेत. तूर्त घ्यावयाचीं नाहींत." असें बोलून बायांनीं जवाहीर व सनगें घेण्याचें नाकारिलें.

'बायांच्या बोलण्यांत यद्यपि श्रीमंत मध्यस्थी करीत आहेत तथापि ती मध्यस्थी निव्वळ बाह्यात्कारी असून श्रीमंतांच्या चिथावणीमुळेंच हें बायांचें खूळ उपस्थित झालें व हलींही त्यांचेंच पाठबळ मिळत असल्यामुळें त्या इतक्या शेफारून गेल्या आहेत;" अशी दौलतरावांची समजूत होत चालली होती. अमृतरावानीं बायांस आश्रय दिला तो बाजीरावांच्या

सल्ल्याशिवाय दिलेला नाहीं असा त्यांचा तर्क होणें स्वाभाविक आहे. हाच द्वेष आपणाशीं पुढेंही चालवावा या उद्देशानें निजाम अली व भोसले यांशीं मिलाफ करून घेण्याच्या खटपटीस श्रीमंत पडले आहेत असें वर्तमान जेव्हां शिंद्यांस कळलें, तेव्हां बाजीरावांचें वर्म नाना फडनवीस असें समजून त्यांनीं नानांची कैदेंतून मुक्तता करण्याचा बेत केला. असा बेत करण्यांत त्यांचे तीन हेतु होते. बाजीरावांच्या मनांत दहशत उत्पन्न करावी हा पहिला हेतु. नानांच्या मध्यस्थीनें बायांचा तंटा मिटवावा हा दुसरा, व सुटका केल्याबद्दल नानांकडून कांहीं द्रव्य काढावें हा तिसरा हेतु !

या बेतास अनुसरून शिंद्यांनीं फकीरजी गाढवे यास सहा पलटणें व पांचशें स्वार बरोबर देऊन नगरास पाठविलें. तों बायांची फौजही नानांस मिळवून घेण्याकरितां नगरास गेली ! किल्लेदारानें दोघांसही किल्ल्याजवळ येऊं दिलें नाहीं. मग नानांचा मानस आपणांस येऊन मिळण्याचा दिसत नाहींसें पाहून बायांची फौज उठून गेली व दोन कोट रुपये द्याल तर तुम्हांस सोडतों असें नानाशीं फकीरजीचें बोलणें सुरू झालें. पुष्कळ प्रकारें आढेवेढे घेऊन हो ना म्हणतां म्हणतां शेवटीं दहा लक्ष रुपये देण्यास नाना तयार झाले आणि तेवढ्यांतच शिंद्यांची समजूत झाली ! त्यांतही पुनः असा करार ठरला होता कीं शिंद्यांनीं नानांस मुक्त करावें एवढेंच नव्हे, तर पूर्वीप्रमाणें त्यांची कारभाऱ्याच्या जाग्यावर पुनः स्थापना करावी; आणि नंतर नानांनीं शिंद्यांस दहा लक्ष रुपये द्यावे, आणि बायांशीं त्यांचा समेट करून देण्याचा उद्योग करावा. हा करार ठरल्यावर फकीरजीबरोबर ता० १५ जुलै दिवशीं नानांनीं पुण्याकडे येण्यास कूच केलें. दुसरे दिवशीं मार्गांत बायांकडील चार हजार पठाण आडवे आल्याची हूल उठली. तेव्हां पलटणें नानांस घेऊन मारदौंडे-

च्या ठाण्यांत शिरलीं व उठलेली बातमी निराधार आहे अशी पक्की खात्री करून घेतल्यावर पुनः मार्ग चालूं लागलीं. नाना फडनवीस जुलैच्या सतराव्या तारखेस रात्रौ वानवडीवर शिंद्याच्या छावणींत दाखल झाले. दुसरे दिवशीं दौलतराव शिंद्यांनीं मोठ्या समारंभानें त्यांची भेट घेतली व खुशालीच्या तोफा केल्या. छावणींत आल्यावर सुद्धां कांहीं दिवस नाना प्रतिबंधांतच होते तरी तो प्रतिबंध त्यांच्या रक्षणार्थ त्यांच्याच इच्छेवरून राखिलेला होता. आबा शेलूकर व बजाबा शिराळेकर व पिंगळे वगैरे नानांची मित्रमंडळी त्यांजकडे खुशाल जात येत होती. लोहगडास त्यांचा फौज पायदळ वगैरे जमाव होता तो घेऊन धोंडोपंत निजसुरे त्यांजवळ रहावयास आले तेव्हां त्यांनीं शिंद्याच्या छावणींतच आपला निराळा गोट केला.

दौलतराव शिंदे नानांस सोडतात असें पाहतांच बाजीराव साहेबांनीं त्यावर तोड म्हणून मोरोबा दादास सोडण्याचा हुकूम केला ! त्यावेळीं मोरोबा त्रिंबकच्या किल्ल्यावर होते. श्रीमंतांचा हुकूम येतांच किल्लेदारानें त्यांस मोकळें केलें व ते पुण्याकडे येऊं लागले. तों वाटेंत जुन्नरच्या मुक्कामीं त्यांस श्रीमंतांचें पत्र आलें कीं, तूर्त तुम्हीं पुढें येऊं नये. तेथें शिवनेरीच्या किल्ल्यावर तुमच्या रहाण्याची तजवीज केली आहे तेथें जाऊन रहावें. मोरोबास कैदेंतून सोडून नानांशीं बरकशी वाढविण्यांत परिणाम नाहीं, नानांशीं सख्य करावें हेंच उत्तम, असें वाटल्यावरून तें पत्र मोरोबादादास श्रीमंतानीं लिहिलें होतें. त्याप्रमाणें शिंद्याच्या छावणींत नाना येतांच बाजीराव साहेबांनीं त्यांशीं सौरस्याचें बोलणें लाविलें, व तुमच्या भेटीस येतों असें सांगून पाठवून ता. १ आगष्ट हा भेटीचा दिवस मुकरर ठरविला. ठरलेल्या दिवशीं श्री॥ बाजीराव साहेब नानांच्या भेटीस आले. तों भेटीच्या वेळीं शिंद्याकडील ड्रुजियन याच्या पलटणांनीं नानाभोंवतीं गराडा देऊन लोहगडकर वगैरे त्यांचे लोक हुसकून लाविले ! पलटणांच्या

घेऱ्यांत शिरल्याखेरीज नानांची भेट होत नाहींसें पहातांच श्रीमंतांस भय वाटलें व ते तसेच परत आले. ड्रुजियन यासच आपले लोक दुर्जन असें म्हणत असत. त्याच्या पलटणानीं हें असें उद्धटपणाचें वर्तन कां केलें हें समजत नाहीं. नानांकडे शिंद्यांचे दहा लक्ष रुपये येणें, त्यापैकीं सात लक्षांची फेड झाली होती. बाकी रक्कम वसूल होण्याआधींच श्रीमंतांच्या स्वारीबरोबर नाना निसटून जातील अशी तर त्यांस शंका आली नसेलना? अथवा बाजीरावां-च्याच मनांत नानांस दग्यानें धरून न्यावें असें कशावरून नसेल असेंही त्यांस वाटलें असावें! कसेंही असो. एवढें मात्र खरें कीं, या दिवसापासून दुर्जनावर दौलतराव शिंद्यांची नाराजी झाली व अलीकडे कंपूवर हुकमत चालविण्याचा मुख्य अधिकार त्याजकडे आला होता तो शिंद्यानीं त्याजकडून काढून मुकेरीच्या हवालीं केला. ज्यानें बायबलाची शपथ घेऊन प्रथम नानांस विश्वास दाखविला व मागून कैद केलें तोच हा मुकेरी साहेब होय!

यावेळीं आपल्या सरळपणाच्या चालीबद्दल नानांच्या मनांत विश्वास उत्पन्न करणें व बायांच्या मनांतलें किल्मिष काढून टाक-ण्याचा यत्न करणें या दोन गोष्टी साध्य करावयाचें धोरण शिंद्यांनीं धरिलें होतें. हे हेतु सफळ करण्यासाठीं सर्व अनर्थाचें मूळ जो उत्पाती सर्जाराव घाटगे—खुद्द दौलतरावांचा सासरा व मुख्य कारभारी—त्यासही कैद करण्यास त्यानीं मागेंपुढें पाहिलें नाहीं! घाटग्यास कैद करण्याचें मनांत एकदां ठरविल्यावर तसें करण्यास कांहीं तरी निमित्त शोधून काढणें फारसें अवघड नव्हतें!

एके रात्रीं फकीरजी गाढवे "दिवटी न लावितां बाहेर जात असतां मुकेरीच्या पहारेकऱ्यानें उभा केला. गाढवे म्हणोन सांगितलें असतां जाऊं न देई. तेव्हां गाढव्यानें पहारेकऱ्यास धकावून गेला. जखमही लागली. पहारेकरी यानें कंपूवाल्यांस जाऊन सांगितलें.

तेव्हां रात्रीचे कांहीं बोलले नाहींत. दुसरे दिवशीं मुकेरीचा लेंक व जान साहेबाचा लेंक दोन तीन पलटणें तयार करून घेऊन शिंद्याकडे गेले. आणि सांगितलें कीं, गाढवे यानें पहारेकऱ्यास कैद मोडून जखमी केलें. त्यास पाहोन घेतों! म्हणोन सांगोन चालोन गेले. गाढवा घाटग्याचे गोटांत गेला तेथें भोंवते उभे राहोन उभयतांस धरिलें. घाटगे यास जखम लागली. यादो भास्कर बंधूसह आले तेही तेथेंच कैद करून मुसक्या बांधून कंपूंत आणोन ठेविले. शिंदे यानीं गडबड करून दुर्जनाचें पलटण तयार करविलें तों रायाजी पाटील व रामजी पाटील याणीं थोपून राखलें."

यावेळीं घाटगे, गाढवे, यादो भास्कर वगैरे एकंदर एकोणीस असामींस कारागृह प्राप्त होऊन घाटगेशाहीचा पक्का बंदोबस्त या वेळेपुरता तरी झाला. ता० २५ जुलई रोजीं म्हणजे अमृतरावावर छापा पडल्यापासून बरोबर एक महिन्यानें सर्जेराव घाटग्यास कैद करण्यांत आलें. कोणी म्हणतात कीं, बायांकडील पठाण व बक्षी यांचें व कंपूवाल्यांचें बोलणें खासगी रीतीनें होऊन शिंद्यांच्या संमतीखेरीज कंपूवाल्यानीं हें कृत्य केलें. कोणी म्हणतात, नानांच्या प्रेरणेवरूनच ही गोष्ट झाली. परंतु आंतून शिंद्याचा हुकूम मिळाल्याखेरीज कंपूवाल्यानीं आपल्याच जबाबदारीवर अशी गोष्ट केली असेल हें बिलकुल संभवत नाहीं. घाटग्यास धरल्याबरोबर शिंद्यानीं रागानें गडबड केल्याचा प्रकार निव्वळ थोतांड होय!

या सालच्या आगष्ट महिन्यांत पुणें शहरास जी संकटाची स्थिति प्राप्त झाली होती ती अत्यंत विलक्षण होय! बक्षी पठाण व मराठे सरदार व अमृतराव साहेब गणेशखिंडीपासून पर्वतीपर्यंत पसरले होते. मध्यें शहरांत बाजीराव साहेब दोन तीन हजार शिलेदार व तितकेंच पायदळ बाळगून राहिले होते, आणि भवानीपेठ वगैरे नाक्यानाक्यानीं तोफा व चौक्या ठेवून रात्रंदिवस बंदोबस्त राखण्यावर

श्रीमंतांनीं मालोजी घोरपडे व मानाजी फांकडे यांसारख्या योद्ध्यांची योजना केली होती. पलीकडे वानवडीवर शिंद्यांचें लष्कर होतें त्यांतले बहुतेक शिलेदार कंटाळून घरोघर निघून गेले होते व जात होते. राहतां राहिलीं पलटणें व तोफा. बायांकडील पठाण व मराठे शिंद्यांच्या लष्कराभोंवती रात्रंदिवस घिरट्या घालीत, पलटणवाल्यांचीं माणसें लष्करच्या हद्दीबाहेर गेलीं कीं कापून काढीत, लष्करावर बाण टाकीत, व साधल्यास गोळ्याही मारीत ! याप्रमाणें कहीकबाड वगैरे बाहेरून आणण्याची सोय जरी शिंद्याच्या लष्करास राहिली नव्हती तरी शहराचें सानिध्य असल्यामुळें उपासमार होण्याचें त्यास भय नव्हतें ! बाजीराव तिऱ्हाईतपणानें वागत असल्यामुळें शहरच्या लोकांस त्यांची ताकीद असे कीं, बाया अगर शिंदे यांपैकीं कोणाच्याही लोकांस धान्य व वैरण देऊं नये. पण या ताकिदीचा उपयोग मात्र कांहींच होत नव्हता ! कारण कंपूवाले शहरच्या लोकांजवळ धान्य विकत मागत तेव्हां त्यानीं देत नाहीं म्हटल्यास शहरावर तोफांचा भडिमार करण्याचें भय घालीत ! कंपूवाल्यानीं शहरावर तोफा फिरवलेल्या पाहतांच शहरवाले गलबलून जात व कंपूवाल्यांस लागेल तितकें धान्य ते सांगतील त्या दरानें मुकाट्यानें देत !

इकडे शहरांत शिलेदार होते त्यांस बाहेर जाऊं देण्याची छाती बाजीराव साहेबांस होत नसल्यामुळें ते शिलेदार बेलाशक लोकांच्या घरांत शिरून दाणा वैरण नेत व गुजारा चालवीत ! पावसाची संतत धार एकसारखी सुरूच होती. धनवान् व बडे लोकांचे वाडे आंतील मनुष्यानीं स्थलांतर केल्यामुळें रिकामे पडले होते. त्यांतून आरब व गारदी यानीं निवाऱ्याकरितां आसरा धरिला होता ! या उपलाणू लोकांपैकीं कोणास पुरलेल्या द्रव्याच्या आशेनें बसल्या बसल्या राहत्या वाड्याची जमीन खणून पहाण्याची बुद्धि सुचली व प्रयत्ना अंतीं द्रव्यही सांपडलें ! ती वार्ता पसरतांच

सर्वच आरबानीं व गारद्यानीं सर्वत्र राहत्या वाड्यांच्या जमीनी खणून काढून मातीचे ढिगारेच ढिगारे निर्माण केले!

वर्णनाच्या ओघांत आम्ही आगष्ट अखेरपर्यंतची पुण्यांतली हकीगत सांगत आलों, त्यामुळें वाचकांस साताऱ्याकडील दंग्याचें विस्मरण पडलें असेल. तो दंगा या प्रकरणाचा मुख्य विषय असल्यामुळें आतां त्याचाच खुलासेवार वृत्तांत देऊन हें प्रकरण संपवूं.

साताऱ्याजवळ कृष्णेपलीकडे मालगांव व गोवें येथें रास्ते, विंचूरकर व परशुरामभाऊ तळ देऊन होते व तेथें परशुरामभाऊ फौजेची तयारी करीत व पाऊस उघडण्याची वाट पहात राहिले होते हें मागें सांगितलेंच आहे. ती त्यांची तयारी पूर्ण होऊन रास्ते विंचूरकरसुद्धां जुलैअखेरीस बारा पंधरा हजार फौज त्यांजवळ गोळा झाली व पाऊसही उघडला. सातारकरांस शिंद्याकडून कुमक यावयाची, तों ती कुमक पाठविणारा सर्जेराव घाटगेच मुळीं कैदेंत पडला, तेव्हां तिकडून कुमक होण्याची सातारकरांस आशाच राहिली नाहीं. करवीरकरांची फौज कऱ्हाडापर्यंत आली असल्यामुळें तीच आयत्या वेळीं येऊन आपल्या उपयोगीं पडेल अशी साताऱ्याच्या महाराजांस फार फार उमेद होती, परंतु करवीरची फौज कऱ्हाडकरानीं अडवून धरल्यामुळें मदत मिळण्याचा तोही मार्ग खुंटला. सातारकरांस दोहींकडून कुमक होत नाहीं, व आपली फौजही गोळा झाली, त्या अर्थी पावसाची उघाडी आहे तों जलदी करून सातारकरांशीं लढाई द्यावी व बंड मोडून बंदोबस्त करावा असें परशुरामभाऊनीं मनांत योजिलें; व ती मसलत ता० ४ आगष्टपासून अमलांत आणण्याची सुरुवात केली. त्या प्रसंगाचें वर्णन व पुढें काय काय प्रकार झाले त्यांचा वृत्तांत आम्ही येथें प्रायः परशुरामभाऊंच्याच शब्दांनीं देऊं. भाऊ लिहितात—

"काल सप्तमीसह अष्टमी मंदवारीं प्रातःकाळीं आम्ही व रास्ते व राजश्री नरसिंग खंडेराव कूच करून श्रीकृष्णापार होऊन बुणगें मागें लिंबखिंडीनजीक ठेवून सडे फौजेनिशीं वेण्णापार जालों. दोन प्रहर दिवसाचे सुमारें महाराजांकडील व आम्हांकडील फौजेचें रास्ते व शिवाजीविठ्ठलसह तोंड लागलें. महाराजांकडील लोक शहरापुढें तोफेच्या माराबाहेर आले होते त्यांस हटवून माघारें घालविलें. झटपट जाली त्यांत चि॥ राजश्री विठ्ठलराव यांस उजव्या डोळ्यानजीक बोटाच्या अंतरानें कानसुलास बर्चीची जखम लागली आहे. क्षेत्रोजी शितोळे यांचा धाकटा लेंक ठार जाला. चाळीस पन्नास घोडे तिकडील इकडे पाडाव आले. आणखीही इकडील कांहीं जखमी जाहले आहेत. महाराजांकडीलही मोहिते व शिर्के महाडीक वगैरे जायां जखमी वीस पंचवीसपर्यंत जाहले. महाराजही किल्याखालीं आपले फौजेंतच होते. अस्तमानच्या प्रहर दिवसाचे अदमासें त्यांजकडील उगेंच नादाचें बोलणें बोलावयाकारितां रा॥ विश्वनाथजी वगैरे भले माणूस चार पांच असामी आले होते. त्यांचें म्हणणें वेण्णानदी उतरून फौजेसुद्धां परत जावें. प्रातःकाळीं बोलणार पाठवितों. तें आम्ही मान्य न करितां आज रात्रीस सडे फौजेनिशीं तोफेच्या गोळ्याचा मारा टाकून उभे आहों. बहुतकरून आज बोलणेंच बोलतील!"

आणि सातारकरानीं बोलणें बोलण्याखेरीज कांहीं केलें नाहीं हेंही खरेंच. शहरावर हल्ला करावा तर ती राजधानीची जागा लुटली जाईल व दुष्कीर्ति होईल हें परशुरामभाऊंच्या पोटांत भय होतें. त्यामुळें दरडावणी दाखवून अथवा गोड बोलून बंदोबस्त करावा आणि या मसलतींतून मोकळें व्हावें असें भाऊ इच्छीत होते. पण तें कांहीं केल्यानें तडीस जाईना! बोलण्याचा नाद लावून दिवस घालवावे असें महाराजांनी धोरण धरण्याचें कारण

असें होतें कीं, करवीरची फौज येण्याची त्यांस अजूनसुद्धां आशा होती ! भाऊंच्या फौजेशीं पहिली लढाई झाल्याबरोबर महाराजांनीं करवीरच्या महाराजांस तांतडीनें पत्र पाठविलें त्याविषयीं पटवर्धनांचा वकील करवीरकरांच्या लष्करांत होता तो असें लिहितो—

"सातार्‍याहून महाराजांचें पत्र स्वदस्तूरचें इंदुवारीं प्रहर रात्रीस आलें. त्यांत लिहिलें होतें कीं, 'आपले भरवंशावर आम्हीं उद्योग केला, असें असतां अद्याप फौज येऊन पोंचली नाहीं. त्यास हल्ली निदान समय आहे. येथें एक दोन रोजांत फौज येऊन पोंचल्यास उत्तम. नाहीं तर आपला प्राण रहात नाहीं. याउपर वाट पाहावयाची पराकाष्टा राहिली नाहीं.' अक्षर कांहीं बाळबोध व कांहीं मोडी असा कागद होता. ऐशास येथून हल्लीं फौज जावयाचा संकेत राहिला. श्री॥ राजश्री भाऊसाहेब कृष्णापार होऊन सातार्‍यानजीक गेले तेव्हां इकडून फौज जाणें कळतच आहे !"

महाराजांची मसलत टाळटाळ करून दिवस कंठावे अशी असल्याचें दिसून येतांच सातार्‍यावर हल्ला करण्याचा शेवटचा उपाय भाऊंस करावा लागला. त्याची हकीकत ते देतात कीं "सातार्‍यावर निकड करावी तरी शहर लुटलें जातें, याकरितां चार पांच दिवस वाट पाहिली. तिकडील बोलणारही येत होते, परंतु भाग तुटावयाचें बोलणें एकही नाहीं. दिवसगतीवर घालविण्याचा प्रकार ! आणखी आठ चार दिवस इकडून लांबणीवर टाकावें तरी पर्जन्याचे दिवस. बुनगें वेण्णेच्या पलीकडे, सडी फौज अलीकडे, नदीस पाणी आलें असतां अडचण जाणून व बोलणेंही धराचें नाहीं हें पाहून आज प्रातःकाळीं गुरुवारीं रास्तेसह पायदळसुद्धां तीन टोळ्या करून शहरावरी चालोन घेतलें. पायदळसुद्धां लोक शहरांत गेले. शहर लुटलें गेलें. ताकीदही न लुटण्याविशीं केली आहे. फौजेंत दोन चार-

शेंपर्यंत घोडे व चार पांच हत्ती आले. घोडें माणूस जायांजखमी दोन्हींकडील जालें तें समजलें नाहीं. शहर लुटलें जाऊं नये म्हणून चार पांच दिवस लांबणीवर टाकिलें, परंतु होणार सोडीत नाहीं! इकडील लोक व पायदळ शहरांतच आहेत. याउपरी लुटूं नये अशी ताकीद वरचेवरी करून नाकेबंदी करविली आहे."

सातऱ्यांतली फौज चोंहोंकडे दाणादाण होऊन पळून गेली तेंव्हां महाराज किल्ल्यावर गेले आणि चतुरसिंग व भवानजी शिर्के पांच सहाशें स्वारांसह करवीरकरांकडे जाण्याकरितां पळाले. भाऊनीं टाकोटाक आपले पुत्र हरीपंत बाबा यांस त्यांच्या पाठीवर रवाना केलें. बाबानीं दौड करून वसंतगडाखालीं चतुरसिंग व शिर्के यांस गाठिलें व त्यांचे निम्मे स्वार मारून त्यांची घोडीं पाडाव केलीं. तरी चतुरसिंग व शिर्के तेथून निसटून पळाले. तों कोयना उतरतां उतरतां कोळेंकर व कऱ्हाडकर यानीं त्यांवर झडप घालून त्यांची राहिलेलीं घोडीं वगैरे सर्व सामान लुटून घेतलें! केवळ पांच पंचवीस लोकांनिशीं ते मोठ्या शर्थीनें जीव बचावून करवीरकरांच्या लष्करांत पोंचले. सातारकरांची दुर्दशा ऐकल्यावर करवीरचे महाराज कऱ्हाडाजवळ थांबले नाहींत. यापुढें येथें राहिल्यास रास्ते व पटवर्धन व कऱ्हाडकर एकत्र होऊन आपणावर हुल्लड करितील असें समजून ते घाईघाईनें करवीरास निघून गेले. वाटेंत बत्तीसशिराळ्यांच्या मुक्कामीं परशुरामभाऊनीं करवीरच्या महाराजांवर मारेकरी घातल्याची बाड अलीकडे तयार केलेल्या करवीरच्या एका बखरींत लिहिलेली आहे. आणि त्या महाराजानीं चौघा मारेकऱ्यांस चार गांव इनाम देऊं करून भाऊंस मारण्याकरितां सातान्यास पाठविल्याचा मजकूर या प्रकरणांतल्या पांच चार अस्सल पत्रांतून आलेला आहे! कोणचें खरें?

ता० ९ आगस्टची लढाई होऊन सातान्यांत चौक्या बसल्यानंतरची हकीगत ता० १५ आगष्टच्या पत्रांत भाऊ लिहितात कीं—

" आज छ० २ रबिलावलीं बुणगें वेण्णेपलीकडे होतें तें अलीकडे आणवून सडी फौज सातान्याचे शहरापासून एक कोसावरी मुक्काम होता तेथून बुनगेंसह पुढें येऊन शहरापासोन पावकोसाचे तफावतीनें मुक्काम रास्तेसह करून आहों. किल्यावरील बोलणें आहे, परंतु अद्यापि कोणती एक गोष्ट ठरावांत नाहीं. आणखी किती दिवस लांबणीवर पडतें पहावें. "

पुनः चार दिवसांनीं भाऊ लिहितात—

" सातान्याचे शहरचा बंदोबस्त जाला. शहरांत गार्दी ठेवून नाकेबंदीनें चौक्या बसविल्या. किल्ल्यावरील बोलण्याचा शिलशिला आहे, परंतु धराचें बोलणें बोलून एकादी गोष्ट ठरावांत लवकर आणावी हें ध्यान नाहीं ! दिवसगतीवर घालावें असें चाललें आहे. असेंच करून शहरची खराबी केली ! "

नंतर ता. २६ आगष्टच्या पत्रांत म्हणतात—

" सातान्याचे किल्यावरून मातोश्री आईसाहेबांचा निरोप आला कीं, आम्ही किल्याखालीं येतों. तेथें रास्तेसह बोलण होऊन जाबसाल ठरावांत आणावे. त्याप्रमाणें बंदोबस्त व्हावा. त्याजवरून आठ दिवस वाट पाहिली, परंतु त्याप्रमाणें घडण्यांत येईना ! उगाच नाद मात्र बोलण्याचा लावून दिवसगतीवरी घालवावें असें दिसोन आल्यावरोन आमचा मुक्काम किल्याच्या उत्तरेस होता तेथून छ० २२ तारखेस कूच करून किल्याचे ईशान्येस अर्ध कोसाचे तफावतीनें येऊन राहिलों. रास्ते व इंचूरकर किल्याचे पूर्वेसच आहेत. शहरांत किल्यावरील लोकाचीं घरें आहेत त्यांचे दारीं चौक्या बसविल्या. लांकूड फाटें वगैरे किल्यावर जाऊं नये याप्रमाणें बंदोबस्त केला. "

इतकें झालें तरी आईसाहेब खालीं येईनात व किल्यावरचे लोक खालीं उतरून रास्त्यांचे लोक वर चढावे तेंही होईना ! तेव्हां येथें राहून व्यर्थ कालक्षेप करावा हें ठीक नाहींसें जाणून पांच हजार गारदी व कांहीं स्वार किल्याच्या चौक्यांस ठेवून परशुरामभाऊ आगष्टच्या ३० व्या तारखेस कूच करून कृष्णेपलीकडे माहुलीस जाऊन राहिले. तों आईसाहेब किल्यावरून उतरून पोवईच्या नाक्याजवळ फोडजाईच्या देवळांत येऊन राहिल्या. त्यानीं भाऊंस भेटीकरितां बोलाविलें. त्यावरून ते पुनः नदी उतरून आले व आईसाहेबांचें दर्शन घेऊन बोलण्याचा ठराव करून परत गेले. नंतर मुहूर्तानें रास्त्यांचा कारकून पांच प्याद्यांसह किल्यावर चढला. तेथें महाराजाचें पंधराशें माणूस होतें तें आस्ते आस्ते आपल्या सोईप्रमाणें खालीं उतरलें व रास्त्यांचें तितकें माणूस वर गेलें. इतकें होण्यास बरेच दिवस लागले. असा दिरंग लागण्याचें कारण भाऊ लिहितात कीं, "पदाची जागा. निकड करतां येत नाहीं. कांहीं महाराजांची मर्जी, कांहीं सरकार काम, असें पाहून कारभार विल्हेस लाविला पाहिजे, या बेतानें चालिलें आहे. यामुळें जे दिवस लागतील ते लागोत" ! या मुदतींत महाराजानीं किल्यावरून हरतऱ्हेनें निघून करवीरास जाण्याची मसलत केली होती तीही साध्य झाली नाहीं. तेव्हां शेवटीं किल्ला रास्त्यांच्या हवालीं पूर्णपणें करून पूर्वीप्रमाणें अटकेंत राहणें साताऱ्याच्या शाहू महाराजांस भाग पडलें. याप्रमाणें साताऱ्याच्या धामधुमीचें हें प्रकरण संपलें.

कैदेंतून सोडल्याबद्दल गुन्हेगारीची रकम परशुरामभाऊंनीं पेशवेसरकारास किती द्यावयाची ह्याचा निकाल त्यांस साताऱ्याच्या मुक्कामींच करावा लागला. जेथपर्यंत आपण फौज बाळगून आहों तेथपर्यंत पेशव्यांस रकमेचा वसूल सक्तीनें करतां येत नाहीं हें खरें, तथापि देणें चुकविण्याकरितां बारमहा फौजेचा खर्च बाळगून कसा

निभाव लागेल ? त्यापेक्षां देण्याचा निकाल केलेलाच बरा, असा विचार करून भाऊनीं पेशव्यांस देण्याच्या रकमेचा आंकडा दहा लक्ष रुपये नक्की ठरवून घेतला व त्या रकमेचा सरकारांत भरणा अमुक मुदतींत करूं असें कबूल करून माधवराव रास्त्यांस व स्वतःस सरकारी पेंचांतून मुक्त केलें. ते माहुलीस आले त्याच दिवशीं रहिमतपुरास त्यांचें ठाणें बसलें. त्यामुळें माहुलीहून निघाल्यानंतर वाटेंत थांबण्याचें त्यांस प्रयोजन राहिलें नाहीं. ते भाद्रपद शु० १ ता. ११ सपटेंबर या दिवशीं गणपतीच्या उत्सवाकरितां तासगांवास दाखल झाले. हा मंगलमूर्तीचा उत्सव तासगांवच्या मुक्कामीं केलेला असा त्यांच्या आयुष्यांतील शेवटचाच होय !

नं. ४२३६ श्री. (३ जून)

पै॥ छ० २१ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. ज्येष्ठ.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं

अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत ज्येष्ठ वद्य ५ रविवार पावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलांकडून बहुत दिवस आशीर्वादपत्र येऊन सांभाळ होत नाहीं. तर सदैव आशीर्वादलेख येऊन सांभाळ करावा. शिंदे यांचे घरीं बखेडा जाहला आहे हा मजकूर दोन वेळ पेशजी व हल्लीं ती॥ राजश्री आपासाहेबांस लिहलें आहे त्यावरून समजलेंच असेल. परवां चंद्रग्रहणास तुळापुरास गेलों होतों. तेथून श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब यांचें लष्कर दोन कोस होतें तेथें गेलों होतों. तेथून बक्षीच्या फौजेंत गेलों होतों. बक्षींची भेट जाहली. त्यांच्या म्हणण्यांत आपलीं मुलें मनुष्यें सर्व मिरजेस पाठवावीं, असा उद्दू मजपाशीं बक्षीचे मावस बंधु गणोबा तात्या आहेत त्याणीं गोष्टी काढिल्या कीं बक्षीचीं सारीं माणसें मिरजेस पाठवितों असें बोलले. तेव्हां मी उत्तर केलें. कीं, घर आपलें

आहे. आधीं रवाना करावीं. जशीं आमचीं मुलें मनुष्यें आहेत तशींच हीं आम्हांस. दुसरा विचार नाहीं. याप्रमाणें मी त्यांस उत्तर केलें. वडिलांस कळावेंकरितां लिहिलें आहे. पाठवितीलसें भासतें. त्यास वडिलीं जागाजुग्याची योजना करावी. कदाचित आलींच तर बहुत बरदास्तीनें ठेवून घ्यावीं. चार रुपये खर्चाकडे पाहूं नये. समय जाणून आपलें घर म्हणोन येत आहेत. (बक्षी हे) दौलतराव शिंदे यांचे वैरी—त्यांचे माणसांस कसा आश्रय द्यावा'? हा विचार ध्यानीं आणूं नये. ईश्वरानिर्मित कांहीं चुकावयाचें नाहीं. परंतु स्नेह आज राहणार आहे. मी बक्षीची खातरजमा बेवसंवसा[1] कुटुंब मिरजेस पाठवावें अशी केली आहे. बहुधा पाठवितील. आणि जर येथील खटला लौकर त्यांचे मनोदयाप्रमाणें घडल्यास •प्रयोजन नाहीं. मग धाडणार नाहींत. पूर्वसूचना आपल्यास असावी या करितां विनंती लिहिली आहे. अलीकडे वाडिलांकडून[2] अगदीं लेख येत नाहीं. असो. लेखच कशास पाहिजे ! दया असली म्हणजे जाहलें. मला जसे ती॥ राजश्री भाऊसाहेब तसे आपण. दुसरा भाव माझे चित्तांत नाहीं. कृपा लोभ करावा. हे विज्ञापना.

नं. ४२३७ श्रीगजानन. (जेष्ठ व० ६–४ जून.)

पै॥ छ० २१ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. जेष्ठ.

विज्ञापना[3] छ० १८ जिल्हेज. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचा मुक्काम रविवारीं थेऊरावर आला म्हणोन अफवा आहे मुशाफरखान व बक्षी व बाया ऐसे समागमें आहेत ऐसी बाजारी आवाई आहे. हे विज्ञापना.

नं. ४२३८ श्रीगजानन. (जेष्ठ व० ६–४ जून)

पै॥ छ२१ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. जेष्ठ.

---

१ मनांत किंतु न बाळगतां. २ तुम्हांकडून. ३ पुण्याहून बाळाजी गणेश कारकून यांची मिरजेस चिठी.

विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १८ जिल्हेज. इकडील वर्तमान तर यथास्थित असे. अधिकोत्तर नाहीं. राजश्री बाबा तुळापुरावर श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे सैन्यांत गेले होते. तिकडील वर्तमान बालाग्रं जाहिराण्यांत आलें नाहीं. बाजारी वर्तमान श्री॥ राजश्री रावसाहेब याणीं श्रीमंतांचें वचन घेऊन बोलतात. रास्ते ही बोलतात. श्रीमंत रावसाहेब बोलतात ते कांहीं हिरण्याचें पंधरा वीस पावेतों आहे म्हणोन ऐकतों. यांत खरें लटकें न कळे. लढाई व्हावी असें ही बोलतात. येणेंप्रमाणें आहे. महाराजांस निकडीचीं पत्रें गेलीं आहेत म्हणोन ही ऐकतों. काय आहे न कळे. होळकर दोहींकडेसही आहे म्हणतात. या दिवसांत श्रीनें कृपा करून वडिलांची मुक्तता जाहली तर जाहली. नाहींतर दिनमेकावर पाडिलें. काळे मागती सैन्यांत जावें म्हणतात. काय शकटभेद आहे न कळे. सारांश श्रीनें कृपा करावी. जप्तीचे स्वार उठोन आले म्हणतात. येथें दाखल जाहले. लोकवार्तेत एक वेळ लढाई होईल असें म्हणतात. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४२३९ श्री. (४ जून.)

पै॥ छ० २१ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. जेष्ठ.

सेवेशीं धोंडो बापूजी जोशी व मोरो आपाजी परांजपे साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत ज्येष्ठ वद्य ६ इंदुवासर मुक्काम पुणें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींकडून अलीकडे पत्रें येऊन सांभाळ होत नाहीं. तरी वडिलीं पत्रीं सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील राजकी वर्तमान तरी राजश्री अमृतरावसाहेब यांचा मुक्काम कोरेगांवानजीक आहे. मुशाफरखान तेथेंच आहे.

---

१ बाळाजी गणेश जोशी कारकून याचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ थोडें देखील. ३ परशुरामभाऊंच्या सुटकेविषयीं रदबदली करितात. ४ शिंदे व अमृतराव यांची. ५ तुम्हांस. ६ परशुरामभाऊंची. ७ विलंबावर.

शिंदे यांजकडील फौज पलटणें फुटोन तिकडे गेलीं. बक्षी, देवजी गौळी, वगैरे पथकें मिळोन पठाण सुद्धां आठ दहा हजार जमाव जाहला आहे. राजश्री दौलतराव शिंदे (यांच्या मनांत) चालोन लढाईस जावें याप्रमाणें होतें. परंतु दोनचार दिवस जाण्याचा मजकूर बोलत नाहींत. अलिजाबहाद्दर यांजपाशीं पांचसात हजार फौज आहे. परंतु तिचा विश्वास नाहीं. कंपू दोन इकडे आहेत. त्यांचें म्हणणें कीं आपण चालोन जाऊन लढाई द्यावी हें ठीक नाहीं. तुम्ही लढाई देतां कोणाजवळ? तुमचें व मातोश्रीचें एखलास[2] हरतऱ्हेनें होईल ते गोष्ट करावी. मातुश्रीचा आग्रह कीं, ' हल्लीं पांच असामी कारभारांत आहेत त्यांस आमचे हातीं द्यावें. मागील महादजी शिंदे यांचे वेळेस कारभार करीत होते त्यांस सर्व दौलतीची माहीतगारी आहे, त्यांचे हातून कामकाज घेतलें असतां पांच रुपये कर्जवाम मिळेल. फौजेचा गवगवा होणार नाहीं. याप्रमाणें करावें. हें होत नाहीं तरी जें घडतां घडेल तें घडो ! ' श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब याणीं बायांस वचन दिलें आहे कीं तुम्हांस त्यांचे हातीं देत नाहीं. त्या अर्थीं हें राजकारण लौकर मिटत नाहीं. दौलतराव यांणीं तो नेट धरिला आहे कीं, सर्जेराव प्रमुख पांच असामींस हातीं द्यावयाचें नाहीं. याबद्दल जें होणें असेल तें सुखेनैव होऊ ! श्री॥ राजश्री आपासाहब[3] यांचे लग्न नवमीस सौम्यवारीं निश्चय जाहला. आमंत्रण पुण्यांत जाहलें. श्री॥ राजश्री बाबासाहेब[4] आमंत्रणांस श्रीगणपतीस काल गेले. खासगीवाले यांजकडे व नीलकंठराव यांचे पुत्राकडे व आमच्या वाड्यांत व काळे पिंगळे इतक्या घरांस गेले. आमंत्रणास आमचे वाडयांत आले. श्री॥ राजश्री बापूसाहेब[5] दरवाजापावेतों पुढें गेले होते. वाड्यांत आल्यावर श्रीमंतांस

---

१ बायांकडे पलटणें गेलीं होतींसें वाटत नाहीं. २ सख्य. ३ चिमाजीआपा. ४ बाजीरावसाहेब. ५ विठ्ठलराव पांडुरंग पटवर्धन.

पोषाख द्यावयास काढिला. तेव्हां सांगितलें कीं, आमंत्रणास वस्त्रें कोणाचीं घेत नाहीं. तेव्हां वस्त्रें ठेविलीं. याप्रमाणें जाहलें. श्री॥ राजश्री बापूसाहेब यांस आमंत्रण करून दोन पळें मात्र बोलत बसोन गेले. श्री॥ राजश्री बापूसाहेब याणीं राजश्री नारोपंत चक्रदेव व गोविंदपंत गोडबोले यांचे मार्फतीनें काल प्रात:काळीं श्रीमंतांची भेट घेतली. पाव घटका श्रीमंतांजवळ बसले. विडे श्रीमंतांनीं दिले. तेव्हां 'माझी विनंती करावयाची आहे. स्वस्थपणें गांठ पडल्यावर करीन;' म्हणोन विनंति केली. 'उत्तम आहे' म्हणोन श्रीमंतानी सांगितलें. श्रीमंतांकडे लग्नाबद्दल अहेराचीं सणगें पाठविलीं त्या खेरीज लुगडें १ किंमत रुपये शंभर व भहमुद्या चार खरेदी करून देणें म्हणोन पत्रीं आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें सणगें देतों. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४२४० श्रीजगदंब (जेष्ठ व० ७–५ जून)

पै॥ छ० २१ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. जेष्ठ मास.

सेवेशीं अंताजी गोपाळ फडके. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १९ जिल्हेजपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. राजश्री रावजींचें पत्र प्रविष्ट करून उत्तर घेऊन पाठविलें आहे. पुण्याकडील वगैरे मजकूर त्यांचे पत्रीं तपशीलवार लिहिला आहे. त्याजवरून कळेल. यांजबरोबर तोफा होत्या त्या आजपर्यंत वडुथावर होत्या. हल्लीं करंज्यास नदीअलीकडे आणविल्या. किल्याखालीं मार्गावर त्यांच्या चौक्या आहेत. एकादा कागद सांपडल्यास वर नेऊन पाहून पाठवून देतात. कांहीं जमा करावयाचा त्यांचा मनसबा आहे. काशीपंत याची गोटगणती घेऊन रविवारीं प्रात:काळीं यजमानांकडे रवाना केले. राजश्री सदाशिवपंत ही त्यांजबराबर तिकडे गेले. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ फडके कारकून शिलेदार यांचें साताऱ्याहून रास्त्यांच्या लष्करांतून मिरजेस पत्र बाळासाहेबांस. २ माधवरास्ते यांस तुम्ही पाठविलेलें. ३ रास्त्यांचरोबर. ४ महाराजांच्या ५ परशुरामभाऊंकडे ६ काळे.

नं. ४२४१ **श्रीशंकरप्रसन्न.** (जेष्ठ व० ७–५ जून)

पै॥ छ० २१ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. ज्येष्ठ

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवेशीं. पोष्य माधवराव अनंत साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १९ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. विशेष आपण छ० १६ मिनहूचें पत्र पाठविलें तें पावलें. करवीरकरांकडील मजकूर लिहिला तो कळों आला. बत्तीस शिराळें येथून त्यांचा जमाव कांहीं येऊन कऱ्हाडास दंगा करून माघारे गेले असें येथें वर्तमान आलें. पुण्याकडील मजकूर श्रीमंत राजश्री रावसाहेब व शिंयांच्या बायका असे थेवरावर मुकामास आले. सरकारची फौज पांच सहा हजार व पायचें माणूस चार हजार व बायकांकडील दहा बारा हजार फौज व पायदळ दोन तीन हजार याप्रमाणें आहे. व राजश्री दौलतराव शिंदे यांजवळ कंपूचे लोक व फौज दहा हजार आहे. यांची त्यांची लढाई कवडविर होणार असें वर्तमान आहे. श्रीमंत राजश्री आपासाहेब यांचें लग्न नवमीचें निश्चयांत आलें आहे तो समारंभ पुण्यांत चालला आहे. काय घंडल तें खरें. गुंडेवाडीचा मजकूर लिहून पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळों आला. श्रीमंतांकडून शिंयांस सांगणें गेलें आहे कीं, "तूर्त लग्नाचा समारंभ होईतोंपर्यंत युद्धाचा प्रसंग पाडूं नये. नंतर तुमची व त्यांची समजूत करितों." त्यास शिंयाचें मानस एक वेळ लढाई यावी. परंतु फौजेची अनुकूलता नाहीं म्हणून दम खाल्ला आहे. बायांकडीलही एक वेळ लढाई यावी असाच मनोदय आहे. फौज एकदिल आहे. व श्रीमंत ही अनुकूल आहेत. बायांचा मुकाम कवडीवर रविवारीं पंचमीस यावा असा बेत होता. मुक्काम तेथें येऊं देऊं

---

१ रास्ते. २ अमृतराव. ३ समारंभाची तयारी.

नये, लढाईच करावी, असें शिंद्यांचें मानस. परंतु थेवरावर मुक्काम श्रीमंतसुद्धां आले. पुढें लिहून येईल तें कळेल. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करीत जावा. हे विनंति.

नं. ४२४२ श्री (ज्येष्ठ० व० ३–१ जून)

पै॥ छ० २२ जिल्हेज सन तिसा तिसैन.

तीर्थस्वरूप रा॥ बाळासाहेब यांसी—

विज्ञापना. वडिलांकडून आलतागायत आशीर्वादपत्र न आलें. मी दोन चार वेळां मजकूर इकडील लिहिला आहे. हल्लीं पुणेंयास गेलों होतों. ग्रहणाचे दिवसीं येथें आलों. येथील मंडळी सर्व सुखी आहे. वडिलांची प्रकृत मात्र अशक्त जाहली आहे. औषध घेत असतात. बऱ्यामध्येंच आहे. शिंदेकडील वर्तमान तर फौज[3] झाडून बायांकडे आहे. कंपूचेंही सूत्र त्यांजकडेच आहे. शिंदेपाशीं दोन हजार फौज तूर्त आहे. श्रीमंतांपाशीं पागेसुद्धां व मानकरी सुद्धां फौज घोडेवरील चार हजारपर्यंत होईल. पायचें माणूस दहा पंधरा हजारांपर्यंत आहे. पैका कोटेंच नाहीं. श्रीमंतांची कृपा पटवर्धनांठाईं बरीच आहे. कृपा करितीलसें दिसतें. या उपरी दिवसेंदिवस कृपेचें लक्षण आहे यांत गुंता नाहीं. राऊत उठून आले जप्तीचे हे कांहीं माघारी जावयाचे नाहींत. खचित आहे. याचा मजकूर चिरंजीव पुण्याहून तपशीलवार लिहितील त्याजवरून विदित होईल. श्रीमंत राजश्री विठ्ठलराव बापू व मातुश्री भेटलीं होतीं. खर्चाची वोढ फार सांगत होतीं. मागील बाकी आजपर्यंत काय असेल तें पाठविण्याची आज्ञा व्हावी. राजश्री बाळाजीपंत भेटले होते. सर्वा जणांचा आशीर्वाद वडिलांस आहे तेव्हां या उपरी कल्याण होतें. गुंता नाहीं. चहूंकडून बरेंसें दिसतें. वाईट काल थोडा राहिला आहे. ज्येष्ठअखेरी आषाढ शुद्धापर्यंत कल्याण ईश्वर करील यांत संदेह नाहीं. वेदमूर्ति राजश्री

१ केसोपंत काळे यांचें मांडवगणाहून पत्र मिरजेस. २ परशुरामभाऊंची. ३ शिंद्यांचें लोढदळ. ४ अमृतरावांपाशीं.

शामभट बावाही मिरजेस आले आहेत, तेव्हां ते कृपेचा प्रकार सांगत असतील यांत गुंता नाहीं. आपले हेताप्रमाणें परमेश्वर कृपा करतो. गुंता नाहीं. राजश्री नाना फडनवीस यांस आणावयाकरितां शिंदेकडील पलटणें दोन तीन गेलीं आहेत. व विठ्ठल महादेव निसबत बाणाजी श्रीगोंदेकर गृहस्थ गेले आहेत. याप्रमाणें बाजारी वर्तमान आहे. काय घडतें पहावें. पत्रें होत आहेत. संजीवनी[१] व बायका एक आहेत. शेणवी यांचा मनसबा खोल फार आहे. दिवसगतीचा आहे. विठ्ठल नरसिंह यांजकडून कळतच आहे. चिरंजीवानें मिरजेहून लिहिलें होतें कीं घराचा धणी आला आहे. जाग्याची अडचण आहे. त्यास राजश्री जिवाजी गोपाळ याजकरवीं ममतेनें सांगावें. तोही गृहस्थ जाण आहे. सर्व काळजी माझी वडिलांस आहे. रवाना भृगुवासर. हे विज्ञापना.

पै॥ छ० १९ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. अवलसालं. ज्येष्ठमास.

+नं. ४२४३   श्री.   (ज्येष्ठ व० १०–९ जून.)

सेवेशीं अंताजी गोपाळ फडके कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २३ जिल्हेजपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. मांडवगणाहून पत्र आलें जे, यजमानसुद्धां[२] गुरुवारीं निघोन वांईकडे येतों. त्यावरून राजश्री रावजीनीं आम्हांबरोबर पंचवीस राऊत देऊन आडवे रवाना केलें आहे. आज निघोन गेलों. पुण्याहून परवानगी जाली. तिकडून परभारें राजश्री दादासाहेब यांजकडून कारकून तेथें गेला आहे. दादांस ही भृगुवारीं निरोप होणार. तेही वांईस येणार. याउपर लोक पाठवावे. तरतूद सत्वर करावी. लोक तयार नसलेस श्री॥ राजश्री बाळासाहेब यांजकडील तरी अगत्य लवकर पाठवावे. सखोजी घोरपडे येथें होते ते ही बरोबर घेतले. बसावयास घोडा त्यांचाच घेतला आहे. बरोबर सांडणीस्वार आहे. कोणत्या मार्गें येतात नकळे. आमची आज अथवा उद्यां गांठ पडेल.

---

१ अमृतसंजीवनी म्हणजे अमृतराव.   + रामचंद्र परशुराम यांस पत्र.
२ परशुरामभाऊंसुद्धां.

आम्ही आज सालपेचे घाटाखालीं मुक्कामास जाणार. याउपर लोकांच्या रवानगीस त्वरा असावी. सेवेसीं श्रुत होय. पुण्याकडील पूर्ववत् आहे. मांडवगणाकडून ही परभारें पत्र आलेंच असेल. हे विज्ञापना. रवाना मंदवार. प्रहर दिवसास. मुकाम करंजें. हे विज्ञापना.

नं. ४२४४ (जेष्ट शु. १४–२८ मे)

देवराव देशपांडे यांजकडून बाळासाहेबांस पत्र मिरजेस. र॥ छ० ११ जिल्हेज. समान तिसैन.

" कित्तूरकर देसाई शहापुरानजीक धामणें व मुचंडी हे त्याचे इनामगांव आहेत तेथें येणार. श्रीमन्महाराज गोकाकेस येणार. रत्नाकरपंताच्या उपराळ्याकरितां येणार आहेत. "

नं. ४२४५ **श्रीगजानन.** (९जून.)

पै॥ छ० ३ मोहोरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

विज्ञापना. श्रीमंतांचे लग्नाचा समारंभ पुढील नऊ खणाचे चौकांत महतापी केली होती. खांब सखलादीनें मढविले होते. चौकाचे दरवाजापासोन दिल्लीदरवाजापावेतों जागा खुली होती त्याचाही महतापी मंडप मढविला होता. वाड्याभोंवता चिरागान बुधवार, कापड ओळी, झाडून फडक्याचे वाड्यापावेतों चिरागानाचीं लांकडें उभीं केलीं होतीं. रोषनाई माफक होती. फडक्यांचे वाड्यापुढें रस्त्यांत अकरा खणांचा मंडप लंबोत्तर महतापी होता. व॥ नवमीस भृगुवासरीं श्रीमंत मुत्सद्दीसुद्धां दामले व्याही यांचे घरीं भोजनास गेले होते. रात्रौ पांच घटका रात्रीस गृहप्रवेशास मुहूर्त होता. स्वारीपुढें आतषबाजी घोड्याचा–हत्तीचा–रथ, जरीपटका, दोन तख्तरावे होते. सोयऱ्यांचे घरांतून वरात दहा घटका रात्रीस वाड्यांत दाखल जाहली. वाड्यांत दाखल जाहलेनंतर पांच सात ठिकाणीं बैठक करून नाच होत होता. रोषनाईचा बैठकेचा भोजनाचा बेत व्यवहाराप्रमाणेंच होता. समारंभ

१ बाळाजीपंत जोशी यांचें मिरजेस पत्र. यांत चिमाजी आपाच्या लग्नाचा समारंभ वर्णिला आहे.

चांगला जाहला म्हणावयाचा. दोनी मंडप बुलंदीस कमी याजमुळें गर्मिणा भारी. हजमा भारी होता. शिंद्याचा कलह कोठवर लांबतो, काय होतें, हें न कळे. लोकवार्ता ऐकण्यांत बाकी नाहीं! भगवंत इच्छेनें घडेल तें खरें. जेष्ठ व॥१० भृगुवासर. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना. राजश्री मोरोपंत नाना पोंक्षे व फडके व्याही इष्ट मंडळीस शिर सा॥ नमस्कार. तपोनिधि लक्ष्मणदास बावा यांस जयगोपाळ. कृपा असावी.

नं. ४२४६ श्री.

पै॥ छ० १७ जमादिलाखर सन सब्बांतिसैन.

राजश्री बाळकृष्णपंत गोसावी यांस—

[3]अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बापूजी शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे. तुम्ही पत्र पाठविलें तें पावून लिहिला मजकूर कळला. राजश्री बाळासाहेब यांचें पत्र पाठविलें तें पावलें. त्याचें उत्तरही लिहून पाठविलें आहे. तुम्हांकडे उपद्रव होणार नाहीं येविशीं वारंवार काय लिहावें? तुम्हांस खातरजमा असावी. मूळगुंदचे कमावीसदाराविशीं तुम्हांस लिहिलेप्रमाणें करावें. रवाना छ० १४ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ४२४७ श्री.

पै॥ छ० मजकूर.

राजश्री बाळकृष्णपंत गोसावी यांस—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित बापूजी शिंदे

---

१ तलखी २ गलबला. ३ धारवाडचा सुभेदार बापूजी शिंदे यानें बाळकृष्ण लक्ष्मण लागू, मामलेदार ता० लक्ष्मेश्वर यास स० १७९६ च्या अखेरीस लिहिलेलें हें व पुढच्या नंबरचें पत्र हीं मागें छापावयाचीं चुकून राहिलीं तीं येथें छापलीं आहेत. दोहोंची रवाना तारीख १५ नोवेंबर ही आहे.

रामराम विनंती उपरी कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. परगणे मुळगुंद येथील माजी कमावीसदार याणें शिरहट्टींत राहून जमाव करून मुळगुंदावर तोंड टाकणार म्हणोन ऐकतों. ऐशास राजश्री परशुराम भाऊविसवतचीं महालचीं ठाणीं (आम्ही) सरकारमजीनेंच बसविलीं आहेत. ऐसें असतां तुम्ही आपलेजवळ(त्या कमावीसदारास)ठेवोन घेवोन परगणे मजकुरास उपसर्ग लागों लागल्यास राजश्री बाळासाहेब यांचा आमचा स्नेह, त्यांस हें कळलें असतां आपल्यास शब्द येईल, त्यास (आपण) ठेवोन घ्यावें; मुळगुंद महाल त्याकडे होता त्यापेक्षां सरकारी जासाल त्याजकडे पुसावयाचीं कारणें पडतील. कळावें. रा छ० १४ जमादिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

नं. ४२४८ श्री. (जेष्ट व० १३–१२ जून)

पै॥ छ २६ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. ज्येष्ठ.

सेवेशीं मोरोबाचे साष्टांग नमस्कार विज्ञापना. पेशजी पत्रीं व हल्लींचे पत्रीं मला मिरजेस येण्याविषयीं आज्ञा, त्यास धोंडोपंत याचें आशौच सरल्यावर सेवेशीं निघून येतों. राजश्री गणपतराव महादेव यांस तिकडे फार दिवस लागले याचें कारण कांहीं निराळें दिसतें. येथें वाडयांत मंडळी फार जमली. खलबतें चाललीं आहेत. उमेदीच्या गोष्टी बोलतात. वल्गना करितात त्या ऐकवत नाहीं. असोत. मी सेवेशीं लवकरच येतों. सविस्तर विनंती करीन. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२४९ श्रीगजानन. (जेष्ट व० १३–१२ जून)

पै॥ छ० २६ जिल्हेज. सन तिस्सातिसैन. ज्येष्ठ.

विज्ञापना. गडगनेरास वगैरे भेटीचें आबा काळे म्हणोन

---

१ गोरो आपाजी परांजपे यांचें पत्र बाळासाहेबांस. यावरची तारीख व मिति पैवस्तीची. २ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें पुण्याहून बाळासाहेबांस पत्र.

आहेत त्याणीं व चक्रदेव याणीं केलें. बाबा काळे श्री॥ राजश्री अमृतराव साहेब यांजकडे गेले होते. दहा[1] रुपयेपावेतों बोलिले. परंतु श्री॥ राजश्री बाबांसाहेब[2] यांचे मर्जीस गोष्ट आली नाहीं. याजमुळें राहिलें. दैवापुढें उपाय नाहीं ! समय होता, परंतु श्रीचे चित्तांत गोष्ट आली नाहीं. सेवेशी विदित होय हे विज्ञापना.

नं. ४२५०   श्रीजगदंब.   (ज्येष्ठ व० १४– १३ जून.)

सेवेशीं अंताजी गोपाळ फडके. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २७ जिल्हेजपावेतों यथास्थित असे. विशेष. आपला निरोप घेऊन निघालों ते इंदुवारीं मुक्काम मांडवगण येथें पावलों. (येथून भाऊसाहेबानीं) निघावयाचा बेत राहिला. यजमानांची शरीरप्रकृत बहुत नाजूक जाहली. शरीरांत कांहीं बाकी नाहीं. दिवसा शौचास पंचवीस वेळ जातात. हगवणीचा उपद्रव भारी झाला आहे. यास्तव आपणाजवळ वैद्य राजश्री लक्ष्मणराव आहेत अथवा धोंडी वैद्य या उभयतांपैकीं एकास इकडे पाठविला पाहिजे. येथें वैद्य आहेत ते कर्नाटकी. प्रकृत ताळ्यावर येत नाहीं. यास्तव अगत्य रवानगी केली पाहिजे. येथून निघावयाची निकडीची मर्जी बहुत आहे. परंतु वाटेस वारा भारी. प्रकृत कठीण. यास्तव तूर्त राहणें जालें. राजश्री सदाशिवपंत याणीं सर्व विनंती केलीच असेल. मीही उदईक निघोन सेवेशीं येतों. सविस्तर विनंती करीन. वैद्य त्वरेनें पाठवावा. श्रुत होय. राजश्री दिवाणजी यांस वैद्याविशीं आज्ञा झाली. त्याणीं ही लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. हे विज्ञापना.

नं. ४२५१   श्री. (ज्येष्ठ व० १४–१३ जून)

पै॥ छ० २७ जिल्हेज. ज्येष्ठ मास सन तिस्सा तिसैन. दोन घटका दिवस सायंकाळचा. बुधवार.

---

१ दहा लक्ष रुपये देतों, परशुरामभाऊंची सुटका करावी असें बोलले. २ पेशव्यांच्या.

विज्ञापना. पुण्याच्या दोन पत्रांच्या नकला दाखविल्या त्याविषयीं आज्ञा जाहली जे, या समयीं लिहिलेप्रमाणें फौज मिरजेहून साताऱ्यास जावी हें उत्तम आहे. श्रीमंत राजश्री नारायणराव खासे, गणतीची दोन हजार फौज, या प्रमाणें सिद्ध करून लौकर कूच करावें. मिरजेहून पुसेसांवळीचें सुमारें एक कूच एक मुक्काम असें करीत यावें. पुसेसांवळीवर आठ चार मुकाम जाहालियासी चिंता नाहीं. परंतु कूच त्वरेनें करवावें. याप्रमाणें मला आज्ञा लिहिणेंविशीं जहाली. त्याजवरून सेवेशीं विनंती लिहीत आहें. राजश्री दौलतराव शिंदे यांची व बायांची भृगुवारीं मध्यरात्रीपासून लढाईस प्रारंभ जाहला. श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब बायांकडेस फौजसुद्धां आहेत. येविषयींची बातमी स्वामीनी चांगली राखावी. येविशीं आज्ञा जाहली आहे. श्रीमंतांकडे पत्रें वरचेवर जात असावीं. फौजेचें कूच होऊन चालती झाली हा प्रकार लिहिणेंत यावा, असें ही सांगणें आहे. "तिकडे करवीरकरांचा शिलशिला बहुतच लागला आहे. परंतु सरकारची आज्ञा आली, समय जाणून फौज रवाना चिरंजीवाबरोबर केली आहे. इकडे करवीरकरांच्या सिलसिल्याची दाटी होत चालली आहे, याजकरितां फौज आणखी जमा करीत आहोंत" ऐसे भाव सरकारांत लिहावे म्हणून आज्ञेवरून सेवेशीं लिहिलें आहे. श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब व बाया फौजेसह शिंद्याचे गोटावर चालून आले. तेव्हां शिंद्याचीं पलटणें तोफा व फौज तीन हजार, गाढवे सरदार—याज प्रमाणें तोफा तोफांची लढाई सुरू जाहली. पलटणें पाठीवर घेत घेत उरळी पावेतों आले. बायांचे फौजेचें बुणगें या तोंडास येवताबर आलें. श्रीमंत राजश्री बाजीराव साहेब यांची फौज व तोफखाना व पायदळ भवानीपेठेचे पुढें जमीन उतरविले आहेत. द्वैतभाव आहे किंवा कसें हें न कळे.

---

१ कारकून शिलेदार बाबाजी विश्वनाथ चाफेकर याचें पत्र नजीक सातारा येथून रास्त्यांच्या लष्करांतून.

नगरास पलटणें लेखकास आणावयास गेले त्यांचे पल्लयावर बायांकडील फौज गेली. तेव्हां किल्लेदारानीं दूर उतरविलें. जवळ कोणास येऊं दिलें नाहीं. इतकियांत दौलतराव यांचें पत्र गेलें कीं, (नानांस) सध्यां आणूं नये. किल्यांत बाणाजी शेट्याचा भाऊच आहे. बाणाजी खाशांजवळ आहे. तेव्हां स्थळ निखालस शिंद्यांकडे आहे. पुढें कलह कोणत्या पल्लयावर जातो पहावा. मी लौकरच निरोप घेऊन येतों. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४२५२ श्री. (ज्येष्ठ व० १४–१३ जून.)

पै॥ छ० २८ जिल्हेज. सन तिस्सा तिसैन. ज्येष्ठ मास.

सेवेशीं सदाशिव महादेव साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २७ रोज बुधवार दोन प्रहर वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं श्रीमंत राजश्री माधवरावजीचे नांवें राजश्री अंताजीपंताचे नांवें पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. रावजीचे पत्राचें उत्तर घेऊन पाठविलें आहे. व जकातवाडीचें उत्तर व गोखल्यांचें उत्तर घेऊन पाठविलीं आहेत. मी भीमातीरास गेलों होतों तो येथें येऊन चार दिवस झाले. अंताजीपंत भीमातीरास गेले आहेत. राजश्री बाळाजीपंत भिडे काल येथें आले. आज राजश्री बाबा फडणीस रास्तेकडील व काशीपंत व बाळाजीपंत असे भीमातीरास गेले. " यजमानांस तेथून इकडे घेऊन यावें. वडूतच्या सुमारें आल्यावर येथून रावजीनीं भेटीस जावें, यांचे त्याचे विचारें कोठें राहणें तें रहावें, " असें ठरलें आहे. रावजीनीं बाळाजीपंत आले नाहीं म्हणोन पत्र लिहिलेनंतर मशारनिल्हे येथें येऊन पोहोचले. कळावें. अतःपर लोक रवाना करावे म्हणोन रावजीनीं लिहावयास सांगितलें, तरी रवानगी व्हावी. श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४२५३ श्रीगजानन. (आषा० शु० १–१५ जून)

पै॥ छ० ३ मोहरम सन तिसा तिसैन. आषाढ.

विज्ञापना ता॥ छ० २९जिल्हेज. येथें क्षेम असे. विशेष. अलीकडे (आपलें) आज्ञापत्र येत नाहीं. इकडील वर्तमान अधिकोत्तर नाहीं. श्री॥ राजश्री नाना यांचे सुटकेचें बोलणें लागलें म्हणोन दाट बोलतात. गाढवे (व) पाटणकर नगरास गेले आहेत असें म्हणतात. येणेंप्रमाणें बाजारी अफवा. एक दोन रोज हंगामा तुरळक गोळागोळी होत आहे. सरकारचे तोफखानेपैकीं तोफा भवानीपेठ नानाची पेठ अशा जागांनीं नाक्यावर जरबा ठेविल्या आहेत. पायदळाची चौकी चांगली व कांहीं स्वारही ठेविले आहेत. येणेंप्रमाणें बाजारी अफवा आहे. बायांजवळ दहा पंधरा हजार फौज आहे. शिंद्यांजवळ तीन कंपू, फौज चार हजार, दोन अडीचशें तोफा, ऐसा सरंजाम. येणेप्रमाणें सरंजाम आहे म्हणतात. खरें लटकें न कळे. वाटाही चालत नाहींत. श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब यांचा मुकाम घांटाचे तळवटीं आहे. महाराजांकडील फौज समयास येत नाहीं म्हणोन किंचित रोष आहेसें ऐकतों. खरें लटकें न कळे. येथें शहराची गत काय आहे न कळे. गांव कहीखालीं खराब. वैरण चिंधी चोळा सुद्धां जातो. भुकुम असें ओस होणार असें आहे. हे विज्ञापना.

नं. ४२५४ **श्री.** (आषाढ शु० २-१६ जून)

पै॥ छ० ४ मोहोरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ. आवशीची तास रात्र.

सेवेसीं बाबाजी विश्वनाथ. सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १ मोहोरम. मंदवासर. आवशीची प्रहर रात्रपावेतों मु॥ भीमा दक्षिणतीर यथास्थित असे. विशेष. श्री॥ राजश्री भाऊसाहेब आज मंदवारीं आवशीचे तीन घटका रात्रीस भीमा दक्षिणतीरास आले. रास्ते यांजकडीस कारभारी फौजसुद्धां बरोबर आहेत. उदईक मोरेश्वरास

---

१ कारकून बाळाजी गणेश जोशी याचें पुण्याहून पत्र बाळासाहेबांस.
२ तुम्हांकडील.

स्नान करून पुढें जाणार. रा॥ बाळाजीपंत भिडे येऊन पोहोचले. मला मिरजेस जाण्याची आज्ञा जाहली म्हणजे निघोन येतों. श्री॥ राजश्री भाऊसाहेबांची प्रकृत भृगुवारापासोन बरी आहे. आमांशाचा उपद्रव राहिला. पुण्याकडील अधिकोत्तर नाहीं. मदार सांडणीस्वार काल दोनप्रहरीं आला. पत्रें पाहून बक्षीकडे रवाना जाला. सेवेसीं विदित होय हे विज्ञापना.

नं ॥ ४२५५ श्री. (आषाढ शु० २—१६ जून)

पै॥ छ० ३ मोहोरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

सेवेसी सदाशिव महादेव सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १ मोहोरमपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री आपाजीपंत येथें येऊन पोचले. टकले मात्र देऊरावर आहेत त्यांस ही येणेंविशीं रावजीनीं सांगितलें आहे. आपाजीपंत त्यांजकडे गडी पाठवितील. तेही येतील. अद्याप वडिलांचें निघणें भीमातीराहून अमुक दिवशीं हा बेत समजण्यांत आला नाहीं. वडिलांचे प्रकृतीस आमांश होऊन शौचाचा उपद्रव जाला आहे. येथूनही रावजी वैद्य पाठविणार आहेत. राजश्री बाबा फडणीस व बाळाजीपंत व काशीपंत तिकडे गेले आहेत ते अद्याप पोंचल्याचें पत्र आलें नाहीं. तिकडील पत्र आल्यावर निघण्याचा बेत कळेल. त्याअन्वयें राजश्री आपाजीपंत व टकले यांचे निघण्याचा बेत करूं म्हणोन रावजीनीं सांगितलें आहे. कळावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२५६ श्री. (१७ जून)

पै॥ छ ६ मोहरम. आषाढ मास. सन तिसातिसैन.

विज्ञापना. वडिलीं आशीर्वाद पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री बक्षीचे कुटुंबाविसीं खातरजमा लिहिली. बहुत उत्तम आहे. सर्व मज-

---

१ माधवराव रास्ते. २ पत्र बाबा काळे यांचें पुण्याहून मिरजेस.

कुर लिहितां त्यावरून समजतो म्हणून लिहिलें, त्यास आणखी काम काय आहे ? एक काळजी वडिलांचे सुटकेची आहे ते दिवस समीप येईनातसे जाहले आहेत. इकडील राजकी मजकूर तर संजीवनी बायांसुद्धां पुण्यानजीक आले आहेत. कांहीं तहाचीं बोलणीं बोलतात. परंतु कांहीं बनाव बसेलसा भासत नाहीं. मग देव कळेना ! तूर्त प्रांत मात्र बुडत आहे. आणि करवीरकर यांचे दैवास पार नाहीं ! तूर्त या राज्यावर शत्रूची चाल नाहीं म्हणोनच कांहीं बरें आहे. नाहींतर दौलत गमवावयास कांहीं दिक्कत नाहीं ! परंतु देव कांहीं ब्राम्हणांचें आहे म्हणोन कोणी परचक्र उभें राहीनासें जाहलें आहे. आज राज्यांत शिंद्याचा आब होता तोही गेला. परंतु कोणास चाल करावी हें सुचत नाहीं. असो. ईश्वर इच्छा प्रमाण. आजचे प्रसंगीं जो बळकट तो वांचतो. यांत सर्व आहे. वडील सर्वजाण आहेत तेथें लिहून कळवावें ऐसा अर्थ नाहीं. र॥ चतुर्थी रविवार, अस्तमान. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२५७ श्री (१७ जून)

पै॥ छ० ५ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

सेवेशीं महिपतराव पाटील फराटे मौजे मांडवगण साष्टांग दंडवत विज्ञापना तागायत आषाढ शु॥ ३ रविवार प्रातःकालपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥ राजश्री भाऊसाहेब काल शनिवारीं रात्रीं प्रथम प्रहरीं सर्व मंडळीसुद्धां नदी उतरोन दक्षिणेकडे वाईस गेले. हें वर्तमान सविस्तर राजश्री बाबाजीपंत चांफेकर याणीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. मींही बरोबर जात होतों, परंतु मला एकट्यास मात्र राहविलें. वरकड मंडळी बरोबर घेऊन गेले. हें वर्तमान सेवेशीं लवकर कळावें याजकारितां बाणाजी फराटे सेवेसीं पाठविले आहेत. वरकड वर्तमान सेवेसीं निवेदन करितील. मी ही एका दो दिवसीं निघोन सेवेसीं येतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२५८ श्री. (आषाढ शु० ५-१८ जून)

पै छ० ४ मोहोरम सन तिस्सा तिसैन. आषाढमास. आवशीची सहा घटका रात्र. पत्र ढालाइताबरोबर आलें.

सेवेशीं आपाजी दामोदर सा॥ नमस्कार विज्ञापना ता. छ. ३ मोहोरम इंदुवार पावेतों मु॥गोवें कृष्णा उत्तरतीर येथें स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. परवां मंदवारीं श्री॥ महाराजांकडील लोक साताऱ्यावरून उतरून सरकारचे लोक शहरांत होते ते जबरदस्तीनें बाहेर लावून दिले. श्री॥ राजश्री माधवराव रास्ते पेशव्यांचे वाड्यांत राहिले होते त्यांची कांहीं चीजवस्त तशीच राहिली. लोक बाहेर येतांच झाडून शहरांत चौक्या बसवून बाहीर तयार होऊन चालोन घेतलें. तेव्हां इकडील लोक तयार होऊन त्यांजवर चालोन गेले. कांहीं लढाई झाली. ते गांवांत याजमुळें बाहेरचे लोकांची कांहीं काटगिरी होईना. तों तोफा लाविल्या परंतु कांहीं काटगिरी जाहली नाहीं. किल्यावरील ही तोफा त्यानीं मारिल्या. आम्हांकडील लोकांसही पुढें जाणेंविशीं सांगितलें. त्याजवरून त्यांचे लोकांत मी लोक घेऊन होतों. मल्लापा मान्या मोळेकर यासीं डोचकींत जखम गोळीची आहे व श्री॥ राजश्री आपासाहेब यांजकडील गणोजी पुणदकर यांसीं पायास उजवे पिंडरीस गोळी चाटून गेली आहे. याप्रों जाहलें. रास्ते यांजकडील कांहीं जखमी जाहले. दोन चार ठार भले माणूस जाहले. शहरांत राहिले होते त्याजमुळें गळाठा फार जाहला. टकले देऊरास गेले आहेत ते अद्याप आले नाहींत. येथें जासूद अगर भालदार कोणीच नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

+ नं. ४२५९ श्री. (आषा. शु० ५-१८ जून)

पै॥ छ० ३ मोहोरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

१ कारकून शिलेदार. उपनांव करमरकर. यांचें हें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. + पत्रावर मिति व इंग्रजी तारीख आम्हीं घातली आहे ती पैवस्तीची.

सेवेशीं सदाशिव महादेव. सा॥ नमस्कार विज्ञापना येथील साताराप्रकरणीं वर्तमान तर महाराजानीं दोन हजार फौज व किल्ल्यासुद्धां पांच हजार पायदळ आज चार दिवसांतच जमा केलें. आणखी ही वरचेवर जमाव होतच आहे. दहा हजारपर्यंत जमाव आठ चार दिवसांत होईल असें आहे. यास कारण तर शिंदे यांजकडील बोलणार आले होते त्यांचीं बोलणीं होऊन संधान मिळून हा जमाव जाला. वरचेवर स्वार व पायदळ आणखी जमा होत आहे. महाराज किल्ल्याखालीं येऊन उतरणार आहेत. राजश्री माधवराव यांसही येथून निघोन जाणें असें (महाराजांकडून) बोलण्यांत आलें आहे. हेही श्रीमंतांच्या वाड्यांत आहेत. ही जागा सोडून कृष्णेच्या सुमारें जावें या बेतांत आहेत. सारांश महाराजांचें बल दिवसेंदिवस अधिक पडत चाललें. महाराज शहराबाहेर डेरे देऊन फौज उतरविणार, रास्ते यांस येथून काढणार, याप्रमाणें आहे. आणखी वरचेवर काय होईल तें कळवीन. रावजींचींही पत्रें याप्रमाणें जाल्याचें वर्तमान लिहून पुण्यास गेलीं आहेत. सदरहू वर्तमान लिहिलें आहे हें रावजींनीं आपण सांगोन रुबरू पत्र लिहिविलें त्याजवरून लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. महाराजांची मसलत स्वाऱ्या करून व गांवगन्ना व शहरांत वगैरे धामधूम करून ऐवज करावा अशीही आवई आहे. शहरचे लोक गडबडले आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. ह विज्ञापना.

नं. ४२६०   श्री   (आषाढ शु. ५-१८ जून)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. रवाना छ० ३ मोहरम तिस्सा तिसैन—

"श्री॥ राजश्री छत्रपति आज तिसरे प्रहरीं इंदुवारीं कूच करून घुणकीच्या मुक्कामास गेले. सातारकर महाराज यांचीं पत्रें

निकडीनें येणेंविशीं आलीं. कारण 'पुण्यास वर्तमान समजोन बंदोबस्त जाला नाहीं तों जलदीनें यावें' अशीं आलीं, त्यावरून जलदीनें निघाले. इसलामपुरास ही ठाणें घालावयाचा बेत आहे. आणखी पुढें काय होतें पहावें."

नं. ४२६१ (आषाढ शु. ६–१९ जून.)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. रवाना छ० ४ मोहोरम. तिस्सा तिसैन—

"सावनूरच्या स्वारीमुळें (?) घासदाण्याचे वगैरे रोखे मोजे भडकंब येथें होऊन पाटील कुलकर्णी धरून आणिले म्हणून कळलें, त्यावरून बच्याजीपंत यांचे विद्यमानें बोलोन मनाचिठ्या घेतल्या. मेजवानीबद्दल १०० रुपये पडले. दुधगांव व कवठें व सावनवाडी येथेंही रोखे केले आहेत म्हणोन कळलें. लष्करचें कूच होऊन इसलामपुराकडे पेठेजवळ अगर कांबेरी नजीक मुक्काम होणार आहे."

नं. ४२६२ **श्रीगणपति** (आषा० शु० ६–१९ जून)

आशीर्वाद उपरी. मेडद व होळें (मुरुमच्या) मुक्कामीं वर्तमान कळविलेंच आहे. आज होळें मुरुम नीरातीराहून निघालों ते अदरकीचे घांटातळीं मुक्कामास येतों. साताऱ्यास राजश्री आपाजी दामोदर व टकले येऊन इकडे मुकाम मजकुरीं रास्ते याणीं रवानगी केली ते पावले. साताऱ्यांत राजश्रीनीं रास्ते यांचें सामान शहरांत येऊन उतरलें होतें तें उधळून दिलें. ते कृष्णातीरीं गोव्यांस येऊन सरकोन राहिले. झटपट जाहली. दहा पांच माणूस जायां जखमी झालें. परंतु संभाळून निघाले. हें वर्तमान आज मशारनिल्हेनीं सांगितलें. गोष्ट बिघडली त्यांत संभाळून निघाले हेंच फार म्हणावें! रास्ते मागें सरकले. सरकारचें कमी पडलें. रास्ते ज्या कामांत आहेत त्याचें उणें पडूं नये या अर्थी त्यांची कुमक जाली पाहिजे याचा विचार व्हावा; त्यास

१ पत्र परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस मिरजेस.

प्रस्तुत आपले जवळ फौज आहे त्याजपैकीं फौज दोन हजार रास्ते यांजकडे जलद येऊन पावे अशी रवानगी व्हावी; आणि पत्र रास्ते यांस आपलें यावें जे, "हें वर्तमान ऐकोन चित्तास प्रशस्त वाटलें नाहीं. कुमक व्हावी याजअर्थें रवाना केले आहेत. वडीलांचे आगमन तेथें होणार. एक दोन दिवसीं पोहोंचणार असें ऐकण्यांत आलें. ते पावले न पावले, या वेळीं शरीर प्रकृत कशी, तें लिहावें." असें लिहोन जलद फौज पत्र यावें तोंच रवानगी व्हावी. या समयीं कुमक जाली म्हणजे रास्ते यांस संतोष व श्रीमंतांचीही चाकरी झाली असें होईल. यांत बहुत उपयोगी गोष्टी आहेत. रवाना भौमवासर सायंकाळ. हे आशीर्वाद.

पै॥ छ ६ मोहरम गुरुवार प्रातःकाळचा प्रहर दिवस सन तिस्सा तिसैन.

नं. ४२६३　　श्री　　(आषा० शु० ७–२० जून)

छ० ७ मोहरम. तिस्ता तिसैन. आषाढ.

विज्ञापना. आजचा मुक्काम जेऊरचा जाला. उदैक नजीक मालगांवचे सुमारें होईल. म्हणजे रा॥ माधवराव यांची भेटीही होईल. मग मनसबा काय ठरेल तो पहावा. सातारकर याणीं रावजींस फार धुडाविलें. हल्लीं बाजारी वर्तमान आलें आहे कीं, करवीरकर यांची कुमक थोडी बहुत (सातारकरांस) आली. बाजारी वर्तमान आहे. वडिलांची प्रकृत आहे त्याप्रमाणें आहे. याउपरी श्रीगजानन कृपाच करील. वडील पुण्यवान् आहेत. फौज पाठविणेंची त्वरा असावी. काल पत्र गेलें आहे त्याप्रमाणें रवानगीच व्हावी. येथें नूतन ठेवणूक होतच आहे. वडिलांची आज्ञा यजमानांस आली आहे. गुंता पडावयाचा नाहीं. मंडळींपैकीं वडिलांच्या भेटीस येणारानीं याउपरी तरी यावें. आपणांस पत्र वडील मुहूर्तानें 'गणपतीचें' एक दोन दिवसानीं लिहिणार आहेत. प्रकृतही दिवसें दिवस (सुधारेल.) श्री कृपा करील.

आपणही पुण्यवान्. वडिलांचें येणें श्रीनें केलें. फौजाही जमा होतील. वाईट काळाचे दिवस गेले. किंचित् आडवी (?) आहे. वे॥ रा॥ शामभट बावा म्हणत होते त्यांस विनंती करावी म्हणजे कृपावचन सांगतील. रा॥ बाळाजीपंत भिडे व रा॥ आपाजी दामोदर व टकले मोठे समयास येऊन पोचले. फार चांगले केलें. रा॥ बुधवार सायंकाळ. हे विज्ञापना.

नं. ४२६४	श्री.	(२१ जून)

पै॥ छ० ७ मोहोरम. सन तिस्सातिसैन. आषाढ शु॥ ११ रविवार. आवशीची दोन घटका रात्र.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं. अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत आषाढ शु॥ ८ गुरुवार प्रहर रात्र पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडील मांडवगणाहून वाईकडे आले. श्रीमंतांस विनंति रास्ते यांणीं केली. याजउपरी श्रीमंतही वडिलांची मुक्तता करणार असा भाव आहे. मुख्य वडिलांपाशीं फौज जमा व्हावी. सरकारची खातरजमा व्हावी कीं, पटवर्धन साहेबचाकरीस हजर आहेत. असें समजलें म्हणजे श्रीमंत वडिलांची सुटका करितात. तर वडिलीं याउपरी मनांत कांहीं अंदेश न आणितां आपलेकडील दोन हजार राऊत इकडे रवाना करावे.रावतांनीं एकदांच येऊं नये. शेंपन्नास एक एकदां, येणें प्रमाणें वडिलांपाशीं जम पडावा. आजपर्यंत पांचसातशें आलेच आहेत. बाकीची तरतूद व्हावी. येणें प्रमाणें वडिलांकडून आपलेकडे सूचना येईल. शिंदे याजकडील ठाणीं उठवून आपला अंमल बसवावा. दिकत नाहीं. बक्षी आम्हांस वश आहेत.

ती॥ राजश्री अप्पासाहेबांस सांगून हजार राऊत ठेवून वडिलांकडे पाठविल्याविना आमच्या फौजेचा जम वडिलांपाशीं (पडणार नाहीं. तो) पडला म्हणजे काम जाहलें. दिकत नाहीं.

सारांश इतकें सातारकर राजेश्रीनीं बल धरून रास्ते यांचा अपमान जाहलेमुळें काम पटलेंसें भासतें. अद्यापि ईश्वर सुटका जाहली ऐसे ऐकवील तेव्हां खरें. परंतु वडिलांपाशीं फौजेचा जथ पाडिला असतां मोठेंच काम होईल. आणखी मागाहून सविस्तर लिहून पाठवितों. एक दोन दिवसीं राजश्री नरहर विठ्ठल यास पाठवितों. परंतु लिहिल्याप्रमाणें पैरवी व्हावी. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. येणेंप्रमाणें ती॥ आप्पासाहेबांस ही पत्र लिहिलें आहे.

नं. ४२६५ (आषाढ शु ८–२१ जून.)

नारो हरी यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पैवस्ती छ ० ६ मोहरम तिस्सा तिसैन.–

" श्रीमन्महाराज छत्रपति यांचा फौजसुद्धां मुक्काम कांबेरी नजीक इसलामपुर येथें आहे. आज बुधवारीं भोजनोत्तर कूच होऊन पेठेवर मुक्कामास जाणार. इस्लामपुरकर यांचें खंडणीचें बोलणें आलें आहे. अद्यापि ठराव नाहीं. महाराजांचें म्हणणें वीस हजार रुपये द्यावे असें आहे. कऱ्हाडकर यांजकडील थोडीशी फौज काल्यांवर हजार पर्यंत राऊत व हजार पायदळ आल्याची आवई आहे. कराडकर यांजकडील कारकूनही बोलणेंस आला आहे. खंडणीचें बोलणें नाहीं. " उपद्रव लागों नये, स्वांरी जावयासी मार्ग सुरळीत पणें (आम्ही) द्यावा, उंबरज अगर दुसरे जागां उतरावयास मार्ग द्यावा, " असें आहे. यांचें म्हणणें हत्ती व जरीपटका व खंडणी द्यावी असें आहे. महाराजांबरोबर फौज अडीच हजार तीन हजार-पर्यंत आहे व पायदळ दोन हजारपर्यंत आहे. एक तोफ थोरली आहे."

नं. ४२६६ (आषाढ शु. ८–२१ जून.)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस.–

" श्री॥ राजश्री भाऊसाहेब पुण्यास आले. श्रीमंतांच्या भेटी जाल्या. (असें कळलें.) लष्करांतही तोफा वीस पंचवीस पर्यंत आवाज ऐकूं आले. परंतु कोठें तोफा जाल्या हें खचित वर्तमान कळत नाहीं. भाऊसाहेब पुण्यास आल्याचें वर्तमान ऐकून तोफा संतोषाच्या जाल्या असल्यास लिहावें. "

नं. ४२६७ श्रीगणपति. (२२ जून)

आशीर्वाद. उपरी काल मल्हारी भोराबरोबर अदरकीचे मुकामीं इकडील सविस्तर लिहिलेंच आहे. आज देऊरचे मुक्कामास आलों. उदईक राजश्री माधवराव रास्ते यांचा मुक्काम गोवें कृष्णातीरास आहे त्यांचे समीप जातों. करवीरचें सामान कांहीं साताऱ्यास आल्याचें वर्तमान बाजारी आलें आहे. रास्ते मागें सरकले. आम्ही त्यांजवळ जातों तेपक्षीं मजबुतीनें रास्ते राहिल्यास आम्हांस हिताचें आहे. याजकरितां फौज आपली दोन हजार पत्रदर्शनीं काल बेत लिहिला आहे त्याअन्वयें रास्ते यांची कुमक व्हावी याजअर्थें रवानगी अविलंबें होऊन लांबलांब मजलीनें येऊन पोहोचत असें व्हावें. त्वरेची वेळ हीच आहे. जलदी करावी. चिरंजीवांकरवीं लोक जमा करवावे येविसीं त्यांस कालही लिहिलें आहे. बहुत काय लिहिणें लोभ करावा. हे आशीर्वाद.+

अपत्यें हरीचे साष्टांग नमस्कार विज्ञापना. समय हाच आहे. जलदी सामान पाठवावें. हे विज्ञापना.

पै॥ छ० ७ मोहरम सन तिसा तिसैन. आषाढ शु॥९ भृगुवार.

नं. ४२६८ श्रीगणपति. (आषाढ शु० १०–२३ जून)

पुरवणी. आशीर्वाद उपरी. तुम्ही छ० ५ मोहरमचीं पत्रें पाठविलीं तीं काल तारखेस पावलीं. शनिवारीं तीन घटका रात्रीस

---

१ हें पत्र व पुढच्या नंबरची पुरवणी परशुरामभाऊनीं बाळासाहेबांस लिहिलेली. + पत्रावर आम्हीं घातलेली मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे. २ हरि परशुराम.

मांडवगणाहून निघाल्याचें वर्तमान बहिरजी फराटेबरोबर चाफेकराचें पत्र आल्यावरून संतोष जाहला म्हणोन लिहिलें तें कळलें. टकले व आपाजी दामोदर पावल्याचें परवांच लिहिलें आहे. सातारकर महाराजानीं रास्ते यांजवर गडवड केल्याचें कळलें म्हणोन लिहिलें तें कळलें. 'करवीरकर खासे वारणातीरास आले. सातान्याकडे जाणार. वडिलांची स्वारी मिरजेसच यावी' म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास जागा सोडावी, बहुत दिवस जाले, म्हणोन इकडे यावयाचें योजिलें. त्यास राजश्री माधवरावजीचा रुकार बसला. त्याणीं उद्योग फारच केला. आमची प्रकृत आमांशानें बिघडली होती ती निघावयाचे अगोदर दोन दिवस उपशम जाला. शक्ति नाहीं. परंतु शक्तीची वाट पाहूं म्हटल्यास यांचे मनांत दोहों दिवशीं कसें येतें न कळे, या अर्थे निघावयासीं तांतड त्यांजकडून होतांच रुकार देऊन निघालों. तुम्हांकडील स्वार येऊन पावले, वरचेवर येतात, असें समजून निघालों. रावजींचा मनोदय पाहतां ममता आम्हावर बहुत. त्यांजवर भार घालोन आहों. ईश्वर त्यांसच यश देईल तेव्हां देऊ. ते पक्षीं तिकडे यावयाचें ठीक नाहीं. प्रस्तुत रावजींची मसलत बिघडल्यामुळें दिलगीर आहेत. त्यांस जे गोष्टीचा संतोष होईल तीच गोष्ट सिद्ध करावयाची. सरकारचे पत्राची व प्रतिनिधीचे पत्राची नकल आलेल्याची करून पाठविली ती पाहिली. त्याचें उत्तर कसें द्यावें तें लिहाव म्हणून लिहिलें; त्यास पुरवणी पत्रांत लिहिलेप्रमाणें द्यावें. फौजेची रवानगी लवकर व्हावी. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे आशीर्वाद. घासी सांडणीस्वार यास ठेवून घेतला आहे. मागाहून पाठवितों. त्याचीं उत्तरें हलीं पाठविलीं आहेत. त्यास ही मागाहून पाठवितों. हे आशीर्वाद.

पै॥ छ०८ मोहरम. तिस्सातिसैन.

नं. ४२६९ श्रीगणराज. (आषाढ शु० १०–२३ जून)

पै॥ छ० ८ मोहोरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

[1]विज्ञापना. शिंद्यांचा व बायांचा अद्याप जाबसाल समेटण्यांत आला नाहीं. समेटण्यांत आला असतां उत्तम. नाहीं तर कलह उत्पन्न होणार. सातारकर महाराज याणीं रास्ते यांची फौज साताऱ्यास खासा माधवराव रास्तेसुद्धां होते त्यांजवर रात्रौ छापा घालून लुटलें. खासा रास्ते फौजसुद्धां लिंबगोव्याजवळी येऊन राहिले. करवीरकर महाराज खासा महाराज फौज व तोफा बत्तीसशिराळ्यास आले, पुढें कऱ्हाडावर तोंड टाकणार, तेथून सप्तऋषीकर महाराज यांस येऊन सामील होणार, ऐसी लोक वार्ता आहे. खरें खोटें न कळे. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब अमृतराव साहेबांचे भेटीस गेले होते. तेथें अमृतराव साहेब यांची व बायांची व मुशाफरखान यांची (अशा) भेटी जाल्या. काल बायांस लष्करांत श्रीमंतांनीं [2]मेजवानी केली असें वर्तमान येथें आहे. मागाहून होईल तें तपशीलवार लिहून पाठवितों. कळावें. या समयीं वडिलांकडून पैसा पावत नाहीं. पुढें आमचा चरितार्थ चालणें कठीण आहे. यदाकदाचित् चार दिवस वडिलांकडून पैसा येत नाहीं म्हणोन एकाद्याचें कर्ज काढीन म्हटलें तर पैसा कोणी देत नाहींत. मागें एकाचे हजार रुपये घेतले म्हणोन पंचवीस वेळां विनंती लिहिली असतां त्याचें कांहीं उत्तर येत नाहीं. सावकाराचे महिन्याचे मुदतीचे घेतले होते. पुढें माझी पत कशी राहील ? माझे दैवास येथें सावकारांचे हातून 'तुम्हीं फार लबाड बोलतां' म्हणोन घेणें प्राप्त जाहलें ! कोणाचें ही देणें असतां त्याणीं शिव्या दिल्या तरी लाचार होऊन बसणें प्राप्त आहे. याजहून अधिक काय लिहूं? तुर्त प्राणांसी गांठ पडली आहे. चहूंकडून वेदना लागल्या आहेत. काय श्रीगजानन परिणाम करवील तो खरा ! वडील सर्वजाण आहेत. कळावें सेवशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ विठ्ठलराव पांडुरंग याचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ अमृतरावांनीं.

नं. ४२७० श्रीगणपति. (२३ जून)

पै॥ छ०८ मोहोरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ शु०१० शनवार.

चिं॥ राजश्री बाळासाहेब यांस आशीर्वाद उपरी. काल देऊरचे मुकामाहून पत्र पाठविलेंच आहे त्यावरून कळलेंच असेल. आज तेथून निघोन मालगावनजीक वंदन येथें आलों. येथून राजश्री माधवराव यांचा मुकाम पावणाकोस गोव्यानजीक आहे. भेटीचा योग आज घडावासा आहे. भेट जाल्यावर वर्तमान लिहून पाठवूं. फौज रवाना रास्ते यांचे कुमकेकरितां व्हावी येविशीं दररोज लिहीतच आहों. चालती जालीच असेल. त्वरा व्हावी. नवे लोक जमा करावे, शेंपन्नास जमा झाले म्हणजे रवाना व्हावे, असें चिरंजीवांस सांगून वरचेवर रवाना होत जावे, आणि आपलेकडील फौज अविलंबें पेशजी लिहिलेप्रमाणें रवाना करावे. पुण्याकडील वर्तमान पठाण व बायांची फौज येवताकडे होती ती खडकीवर श्री॥ राजश्री अमृतराव सुद्धां कूच होऊन गेले. लढाई बायांची व शिंद्याची होणार अशी आवई आहे. अलीकडे चार दिवस जाले. कोणी माणूस आलें नाहीं. प्रकृत बरी आहे. आवांका नाहीं. ईश्वरकृपेनें येईल. फौज लवकर आली असतां आमचे उपयोगीं बहुत पडेल. रवानगीस विलंब होऊं नये. नवी ठेवण्याविशीं चिरंजीवांस लिहिलें, त्यास वरचेवर येतील ते जमा करवावे. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ४२७१ श्रीगणपति. (आषा० शु० १०–२३ जून.)

पै॥ छ० ८ मोहरम. दोन तास रात्र. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

पु॥ आशीर्वाद उपरी. सरकारचे पत्राचें उत्तर ल्याहावें जे, "करवीरकर कऱ्हाडपावेतों तालुक्यास उपद्रव कारितात. त्यांस पुढें

१ पत्र परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस. यावर आम्हीं घातलेली मिति व तारीख पेवस्तीची. २ रामचंद्र परशुराम यांस. ३ परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस.

वाढूं देऊं नये, हटवावें, म्हणोन आज्ञा,'' त्यास करवीरकरांचे सामान पैकीं दोन हजार फौज खासा वारणातीरास राहून पुढें सातारियाचे कुमकेस रवाना जाली. राजश्री माधवराव रास्ते यांजवर सातारकरानीं गलबल केली. हे ते एक जाल्यावर पुण्यापावेतों तालुका जाईल, हें समजोन दोन हजार फौज रास्ते यांचे कुमकेस पाठविली तेथें तोंड मजबुदीनें राखावें या अर्थे रवाना केली. इकडे (करवीरकरांचा) शिलाशिला समीप लागला आहे तो कोठवर ल्याहावा ? स्वामीचे प्रतापें त्यांचेही तोंडावर शहास फौज आहे. आणखी नवी ठेवितों.'' असे त्यांस गोड वाटे असे भाव आणखी ल्याहावे. करवीरकर मनसबे मोठे मोठे करण्याचे विचारांत आहेत त्या बातमीचीं पत्रें पाठविलीं त्यांच्या नकला सरकारांत कळावयाकरितां पाठविल्याच असतील. नसल्यास नकला करून पाठवाव्या. हे आशीर्वाद.

नं. ४२७२ **श्रीगणपति.** (आषा. शु० १२–२५जून.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० १० मोहरम इंदुवार मुकाम मालगांव नजीक वंदन जाणून स्वकीय कुशल लिहिणें. विशेष. तुम्ही पत्र छ० ६ मोहरमचें रघू केदार खिजमतगार याजबरोबर पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. ' करवीरकरांचा मुकाम कामेरीवर आहे. मंत्री यांजवळ पंचवीस हजार रुपये मागतात. प्रतिनिधीचा जमाव हजार स्वार व पायदळ हजार असें काल्यावर आहे' म्हणोन लिहिलें तें कळलें. सरकारचे पत्रांचे जाब 'आजच रास्ते यांचे कुमकेस फौज रवाना केली' म्हणोन विस्तारें लिहोन दिल्हे म्हणोन लिहिलें तें कळलें. प्रतिनिधींस ही याजप्रमाणें उत्तर लिहोन दिलें आहे, म्हणून लिहिलें तें कळलें. अदरकीचे घांटाचे मुकामचें पत्र मल्हारीबरोबर रवाना केलें तें तुम्हास गुरुवारीं पावलें. त्याजप्रमाणें फौज रा॥ आपाजीगोविंद याजबरोबर रवाना करितों म्हणून

लिहिलें तें कळलें. त्यास फौज अमुक मुक्कामीं आल्याचें वर्तमान अद्याप येत नाहीं. निकडीचा प्रकार. लवकर फौज आली असतां सरकारची चाकरी व रास्ते यांची कुमक जाली असतां रास्ते यांस संतोष, आणि आमचा उपयोग; असे अर्थ दर्शवून त्वरेस मोल हा प्रकार तुम्हास कळोन आज पांच दिवस जाले. येथून मार्ग म्हणावा तरी मध्यें एक मुक्काम. दुसरे दिवशीं येथेंच पोंचावें असें समीप असतां फौज येत नाहीं! रास्ते आवाई खातात. सातार्‍यांत चार हजार पायदळ फौज मिळोन जथ आहे म्हणतात. रातबेरात मिळोन न जाणो, हुल्लड केल्यास आम्हांस आवाई समीप असतां खाऊं देणें चांगलें नव्हे. यास्तव जलद दोन हजार फौज रवाना करावी. दररोज पत्रें येविशींचीं लिहितों. रवानगी जाहलीच असेल. नसल्यास अतित्वरेनें व्हावी. फौजेच्या खर्चाच्या वगैरे अनुपती लिहिल्या त्या तितक्या खर्‍या, परंतु नाइलाज! ईश्वर सुबत्ता करील तेव्हां करो! तोंपर्यंत कसेंही करून दिवस घालविलेच पाहिजेत. पांच सहाशें लोक भारी दरमहाकरी आहेत हे दूर करावयाचे म्हणोन लिहिलें, त्यास तूर्त महिना दोन महिने राखावे. नंतर विचार करावा. प्रस्तुतच करूं नये. असो. पत्रीं लिहिलें त्याप्रमाणें करावें. विदित होय हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ मोहोरम. सन तिस्सा तिसैन.

नं. ४२७३　　श्रीगणपति.　　(२५ जून.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्र छ० ५ मोहरमचें पाठविलें तें छ०८ मोहरमीं पावलें. लिहिला मजकूर कळला. करवीरकरांचा मुक्काम कामेरीवर आला. स्वार पायदळ (मिळून) चार हजार व दोन तोफा याप्रमाणें सातार्‍यास जाणार, म्हणोन लिहिलें तें कळलें. बातमी वरचेवर कळवावी.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस.

' आपण सातान्याकडे जाऊं नये, इकडेच यावें, ' म्हणून लिहिलें, त्यास सरकारची परवानगी येथेंच यावयाची, रास्ते यांची दरम्यानगत आहे, ते पक्षीं तिकडे येतां येत नाहीं. सातारकरांनीं रास्ते यांस मागें हटविलें. ते जमाव करून मसलत करणार. आम्हास ही जमाव करावा (असें रास्ते) म्हणतात, असें असतां कसें यावें ? येथेंच राहून जमाव करून सरकारकाम रास्ते यांजबरोबर करावें. अनायासें मोठेपण अंगीं येत आहे. नंतर सहजांतच सारेच गोष्टीस नीट पडेल. करवीरकरांची फौज कऱ्हाडाअलीकडे आली म्हणोन बाजारी बातनी आहे. इकडून ही बातनीस माणसें पाठवीत आहेत. तुम्ही बातमी पक्की राखोन वरचेवर लिहावी. फौज दररोज रवानगीविशीं लिहितों त्याजप्रमाणें लवकर रवाना करावी. फौजेचे रवानगीविशीं लिहिलें आहे त्याजप्रमाणें पाठवावी. याजउपर लवकर यावी म्हणजे आम्हांस फार उपयोग आहे. आजपर्यंत फौजेची रवानगी जाहलीच असेल. नसल्यास त्वरा करावी. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे आशीर्वाद.

चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांस आशीर्वाद उपरी. फौजेचे रवानगीविशीं लिहिलें आहे त्या प्रमाणें पाठवावी. आणखी जी जमा होईल ती वरचेवर पाठवावी. दोन राहुट्या व बिचोबा पाठवून देणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १० मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ शु॥ १२ इंदुवासर. दहा तास दिवस.

नं. ४२७४ **श्रीगणपति.** (आषा. शु० १२–२५ जून)

पुरवणी. चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस आशीर्वाद उपरी. आज राजश्री माधवरावजींची भेट दीड प्रहर दिवसाचे आंत होणार. बोलण्यांतील भाव परस्परें समजण्यांत आले ते वरचेवर तुम्हांस लिहीतच गेलों. आज समक्ष ही समजण्यांत आल्यावर मागाहून

लिहितों. सारांश फौजेचा जथ पडला पाहिजे. करवीरकरांचे फौजेंत बातनीस कारकून आहे त्यास बातनी तुम्हांस येते, तुम्हांकडून इकडे येते त्यास दिवसगत लागते, याजकरितां त्यास इशारा कीं, " सातान्यास रोख येण्याचा आहे. चाल त्वरेची आहे किंवा अवडंबर दाखविण्याचें आहे, हें अधिकउणें आढळेल तें आधीं कळतांच बातनी आम्हांकडे पाठविणें, " असें असावें. पांच सहाशें लोक भारी दरमहाचे आहेत. खर्चाच्या तंगचाईमुळें दूर करावयाचे तेपक्षीं ते लोक चिरंजीव रा॥ आपाकडे रोजमुरे वगैरे तैनाता असतील त्याज- प्रमाणें याद लिहून देऊन द्यावे. चिरंजीवांस ही लिहिलें आहे. लोक आपलेकडे लावून घेऊन पाठविण्याविशीं लिहिलें आहे. सारांश लोक दूर करूं नयेत. लोक इकडे रवाना करावे. रोजमुऱ्याच्या यादी व स्वार किती हें तेथें चिरंजीवास समजवावें. त्याप्रमाणें ऐवज देतील. लोकांच्या रवानगीस गुंता असूं नये. जलद रवानगी व्हावी. रा॥ आपाजी गोविंद यांची रवानगी लौकर व्हावी. येथें आम्ही यांजवळ आहों. यांचा संतोष ठेवावा. आणि आम्हांस मोठा उपयोग. याहून विशेष काय लिहिणें ? रा॥ आपाजी दामोदर व बाळाजीपंत वगैरे यांची बुणगीं लावून द्यावीं. येथें तीन सव्वा तीनशांचा सुमार काशीपंतासुद्धां होईल. छ० १० मोहरम. इंदुवार. हे आशीर्वाद. अपत्यें हरीचे साष्टांग नमस्कार. विज्ञापना. फौजेचे रवानगीविसीं लिहिलें आहे त्याजप्रमाणें पावली असतां बहुत कार्यावर येईल. समय आहे. तर याजउपर त्वरा असावी. आपण सर्वजाण आहांत. विशेष काय लिहूं ? श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ११ मोहरम. सन तिस्सातिसैन. आषाढ शु॥ त्रयोदशी. भौमवार. अस्तमान.

नं. ४२७५ श्रीगणपति. (आषा. शु० १२–२५ जून)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. तुम्हीं छ० ८ मोहरमचें पत्र पाठविलें तें १० मिनहू इंदुवारीं प्रातःकाळीं पावलें. लिहिला मजकूर कळला. राजश्री आपाजी गोविंद याजबरोबर फौज देऊन रवानगी करितों. अलाऱ्याचे दिवस–कांहीं मागाहून चालती होईल–म्हणून लिहिलें तें कळलें. फौजेची रवानगी व्हावी हें पत्र पावून आज सहा दिवस होत आले. अद्याप चालती जाल्याचें पत्र नाहीं ! येथील प्रकार निकडीचा, तोंडासीं एके समयास फौजेचा जथ असावा, हे भाव दररोज पत्रीं लिहीतच जातों. याजउपरी क्षणाचा विलंब न लागतां आधीं लांब लांब मजलींनें येऊन पोचावें. आज इंदुवारीं बारा घटकांनंतर भेटी होणार म्हणोन काल प्रातःकाळचे रवानगीचे सांडणीस्वाराबरोबरचे पत्रीं लिहिलें होतें, त्यास राजश्री माधवरावजीनीं समारंभानें येऊन [2]डेऱ्यांत भेटी बारा घटकांनंतर जाल्या. निशाण मुहूर्तानें डेऱ्यांत आणिलें. भेटीसमयीं तोफा करविल्या. बोलणें समक्ष जालें. उभयपक्षीं येकमेकांस कसाही प्रसंग पडला असतां अंतर देऊं नये, असें खातरजमेचें (बोलणें) जालें. याज उपरी रावजीनीं निखालसपणें सांगितलें. 'फौज जमा करावी.' चवक्यांचा प्रकारही मोकळा करितात. येणारा जाणारास याजउपरी गुंता नाहीं. चिरंजीव उभयतां व सारी मंडळी रास्ते यांचे डेऱ्यास जाऊन आले. सरकारचा जाबसाल मोकळीकेचा तरी त्याणीं इकडे आणावयाची परवानगी (श्रीमंतांकडून) घेतली. शिंद्यांचे घरचा खटला तूर्त आहे हा तुटल्यावर मोकळीक करितों असे ही भाव (श्रीमंतांच्या) बोलण्यांत आहेत. तूर्त साताऱ्याची मसलत यांजवर पडली. " आपण

१ आम्हांवरच्या चौक्या उठवणार. आम्ही मोकळे झालों. २ माधवराव रास्ते याणीं.

आम्ही मिळोन ही व करवीरची दोनही करूं. सरकार काम बजावल्यावर कृपा करितीलच. आपण आम्ही एक होऊन हरामखोरी करीत नाहीं. सरकार चाकरी करितों. ईश्वर त्यांचे चित्तांत शिरोन कृपाच करवील." असे (रास्ते यांच्या) बोलण्यांतील भाव. समर्पक कळावें याजकरितां लिहिलें आहे. स्वदस्तुरचें पत्र यावें म्हणोन लिहिलें, त्यास मध्यें मुहूर्तही नव्हता. आणि रावजीचे भेटीच्याअंतीं भावही कळावयाचा होता. याजकरितां पत्रावर 'गणपति' करीत नव्हतों, इतकाच प्रकार. कळावें. भेटीची अपेक्षा लागली आहे म्हणून लिहिलें, त्यास श्रीनेंच कृपा करावी म्हणजे सातार्‍याचें काम आटोपांत आणून तिकडे येतच आहों. भेट होईल तो सुदिवस श्री आणील. चिंता नाहीं. सारांश फौजेची रवानगी व्हावी. याहून अधिकोत्तर नाहीं. छ १० मोहरम. लोभ असावा हे आशीर्वाद.

पै॥ छ० १२ मोहरम. पांचवा तास. आषाढ मास. सन तिस्सा तिसैन.

नं. ४२७६ श्रीजगदंब. (आषा० शु० १३–२६ जून.)

पै॥ छ० १२ मोहरम. सन तिस्सा तिसैन.

सेवेशीं अंताजी गोपाळ फडके कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० ११ मोहरमपावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. पुण्याकडील मजकूर श्री॥ राजश्री माधवरावजी यानीं लिहिला आहे त्यावरून विदित होईल. मागाहून सविस्तर वर्तमान येईल तें सेवेशीं लिहीन. फौज लवकर इकडे रवाना व्हावी, आणि तेथेंही वरचेवर जमाव पायळदळाचा व्हावा. व दिरंग असूं नये. फौजेशिवाय परिणाम नाहीं. जमेत असावी. पुढें श्रीगणेश[1]बा करिल तें खरें ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. यजमानांची व राव-

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

जींची काल सोमवारीं दहा घटका दिवसास भेट जाहली. समारंभ चांगला जाहला. निशाणसहवर्तमान श्री॥ राजश्री बाबासाहेब स्वारीस सुमुहुर्ते जाऊन श्रीकृष्णाबाईचें व श्रीकोटेश्वर यांचें दर्शन घेऊन गोटास आले. स्वामीस कळावें. हे विज्ञापना.

नं. ४२७७ श्रीगणराज. (आषा० शु० १३–२६ जून.)

पै॥ छ० १४ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं. अपत्यें बाळानें व केशवानें कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील क्षेमें तागायत छ० ११ माहे मोहरमपर्यंत मुक्काम नजीक मालगांव समीप चंदनवंदन कृष्णातीर असे. विशेष काल इंदुवारीं त्रयोदशीस राजश्री माधवराव रास्ते यांच्या (व) वडिलांच्या भेटी उत्तम प्रकारें समारंभानें डेऱ्यांत आमचे येथें जाहल्या. तोफांचे बारही केले. आनंद बहुत जाहला तो पत्रीं कोठवर लिहावा ? रास्ते याणीं इस्तकबील तागायत आजपर्यंत सर्व गोष्टी थोरपणाच्या केल्या. वडिलांतागायत जो स्नेह होता त्याचें सार्थक केलें. वडीलही बहुत समाधान पा.ले. रास्ते याचे येथील मंडळी सर्व अनुकूल, आमचे बरें तें सर्वांचे चित्तांत, यांत कांहीं दिकत राहिली नाहीं. आपणही आज वीस महिने सर्वांविसीं दुःखें पाहिलीं व भोगिलीं त्याचें सार्थक श्रीगजाननानें केलें. समयावरी फौजेच्या रवानग्याही झाल्या. त्याप्रमाणें राजश्री आपाजीपंत यांची रवानगी सत्वर व्हावी म्हणजे रास्तेही बहुत आनंदातें पावतील. मागाहून रवानग्या वरचेवर होत असाव्या. आपणांस वडिलानीं खास दस्तूरचे 'गणपतीचें' पत्र पेशजी लिहिलेप्रमाणें आज मुहूर्तेंकरून लिहिलीं आहेत. वडिलांची मर्जी आपणावर बहुतच संतोषाची आहे तें आजपर्यंत आम्हीं लिहिलें नाहीं. कां म्हणाल तरी आजपर्यंत दुःख होतें तें श्रीनें व उभयतां बावांच्या आशीर्वादेंकरून परिहार केलें. रात्रंदिवस आपलें स्मरण करीत अस-

तात. व तीर्थरूप मातोश्री साळू आकाचें करीत असतात. बाकी भेटीचा योग राहिला आहे तोही दिवस श्रीगजाननें नेमिला असेल तो खरा ! फौजांची रवानगी वरचेवरी आपणाकडून व यजमानांकडून होतच असावी. नेमणूक नाहीं. कनिष्ठ पक्ष पंचवीस हजार फौज व दहा हजार पायदळ यास पैका कोठील म्हणाल तरी जेथें जमात तेथें कमी नाहीं ! आणि वडीलही पुण्यवान् आहेत. या उपरी यांत कमी करीत नाहीं. येथूनही लोकांस आणविले आहेत व ठेवीत चालले आहेत. तीन मसलती. एक बारीपलीकडील तालुकेचा बंदोबस्त. व करवीरकरांचा व येथील राजश्रींचा व पुणेंकडील कुमक. येणेंप्रमाणें विचार श्रीनें योजिला आहे. आपली आज्ञा घेऊन वडिलांचे दर्शनास आलों त्यास साडेतीन महिने जाहले. त्याचें सार्थक श्रीनें केलें. मागाहून होईल तें लिहीत जाईन. वडिलानींही आपणास तपशीलवार लिहिलें आहे त्यावरून कळेल. रास्ते याणीं डेरियास येऊन निशाण व लगी स्वाधीन केली. तसेच स्वारी श्रीकोटेश्वरास जाऊन रास्ते यांच्या डेरियास जाऊन माघारे डेऱ्यास आलों. आल्यावर येथें चि॥ राजश्री बाबा काळे याणीं घोडा नजर केला. रास्ते याणीं ममतेचें सार्थक केलें तें पत्रीं कोठवर लिहावें ? बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विज्ञापना.

नं. ४२७८ श्री. (२६ जून.)

पै॥ छ० १५ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं. अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे शिर साष्टांग नमस्कार. विज्ञापना. येथील कुशल तागायत आषाढ शु॥ त्रयोदशी मंगळवारपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखरूप असों. विशेष. वडिलीं आशीर्वादपत्र पाठविलें तें पावलें. पत्राची तालीक पाठविली त्याचें अस्सल पत्र पाठवावें

---

१ रामचंद्र परशुराम यांजकडून.

म्हणोन आज्ञा, त्यास चांगली सोबत पाहून पाठवून देतों. तीर्थरूप राजश्री आपासाहेबांचे पायास शेगडींतून आंच लागून कांहीं पायास फोड आले आहेत म्हणोन लिहिलें, त्यास भोग जेथें असेल तेथें येतो. सोडीत नाहीं. वडिलांचा मुकाम राजश्री माधवराव रास्ते यांजपाशीं निंबाजवळ आहे. मलाही पत्र आलें होतें. याउपरी आपलेकडील फौजही लवकर यावी. वडिलांकडून दिनचर्या रोजचे रोज कळतच असेल. इकडील वर्तमान काल द्वादशी सोमवारीं दोन प्रहरीं शिंदे यांचीं पलटणें श्री॥ राजश्री रावसाहेबांचे गोटावर चालून गेलीं. गोटावर तोफांची मारगिरी जाहली. खासा रावसाहेब सडे फौजेनिशीं मात्र निघून खडकीकडे गेले. खासे डेरे जामदारखाना देवपूजासह मुदबकाचें सामान भांडींसुद्धा सारें लुटलें गेलें. गोटांतून घोड्याशिवाय पुसी निघाली नाहीं ! डेरे राहुट्या कंपूच्या लोकांनी जाळल्या. गोटावर अस्तमानपर्यंत उभे राहून अस्तमानीं (आपल्या) गोटास माघारे आले. काल द्वादशी वा हरिवासर होता. भोजनें रावसाहेबांचीं जाहलीं नव्हतीं. कालचें क्षेत्र जाहलें. बक्षीचें बुणगें कांहीं फारसें लुटलें गेलें नाहीं. मारगिरी जाहली ती सरकारावर जाहली. येणेंप्रमाणें वर्तमान जाहलें. पुढें काय होतें पहावें. शहरास अपाय होईल असेंही लोक बोलतात. मग दैव शहरचें ! शंभर हिश्शानीं मारलें जाणार नाहींसें भासतें. याचें कारण, श्रीमंतांनीं कुमक रावसाहेबांची केली नाहीं, एवढीच सुभत्ता आहे. नाहीं तर बाकी नाहीं. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२७९ श्रीगणपति. (आषा० शु० १५–२८ जून.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. काल बुधवारीं प्रातःकाळीं इकडील सविस्तर लिहिलेंच आहे. काल संध्याकाळीं राजश्री नरसिंगराव विंचूरकर खासा व चिमणाजी खंडेराव कारभारी असे आपले फौजेंत येऊन पावले. बरोबर राजश्री हरबाण्णा आले

तेही येथें येऊन भेटले. सारांश पुण्यांत फौजेंत कांहीं ताळ नाहीं. शिंद्याचीं पलटणें चालून जाऊन श्रीमंत राजश्री अमृतराव यांचा गोट व पठाणांचा उधळोन दिला म्हणोन काल लिहिलेंच होतें. त्यास श्रीमंतांचें बुणगें तळावर राहिलें. अकस्मात् तोंडासीं गोट होता. आलाव्याचे ताबूत नदींत टाकावयास गेले त्या गलबलींत तोफा वीस चार पांच पलटणें चालून जाऊन गोळे लागू केले. बुणगें तळावर तसेच राहिलें. संडे जीव घेऊन निघाले. शहरांतून थोरले श्रीमंतांची कुमक जाली नाहीं. पठाण बक्षी बुणगें आपलें लादून मागें सरकले आणि पलटणांवर चाल केली. परंतु संध्याकाळ जाला. काटगिरी चालली नाहीं. पलटणें तोफांसुद्धां मागें गोटास निघोन गेले. याजप्रमाणें जालें. कळावें. चि॥ राजश्री बाबा काळे यांचे पत्राची व श्रीमंताचे पत्राची व बक्षीस पत्राची नक्कल व श्रीमंताचे पत्राचें (आम्ही) उत्तर लिहिल्याची नक्कल पहावयास पाठविल्या त्या पाहिल्या. 'फौजेची रवानगी केली, कुपवाडावर मुकामास गेले,' म्हणोन लिहिलें तें कळलें. फौज लौकर लांबलांब मजलीनीं यावें अशी ताकीद करून लवकर पोंचतें करावें. फौजेंत माणूस निवडक यावें. भरण्याचें उपयोगीं नाहीं. समय नव्हे. असें समजून रवानगी जालीच असेल. नसल्यास तशी व्हावी. चि॥ राजश्री चिंतामणराव आपाचा पाय घोडा चरकी येऊन खाली पडोन सांपडला, खैर मोठी जाहली, म्हणोन लिहिलें तें कळलें. ईश्वरें खैर मोठीच केली. शाखभाजी पाठविली ती यादीप्रमाणें पावली. छ० १३ सफर. सारांश फौजेचा जथ पडावा. हे आशीर्वाद. पै॥ छ० १५ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ व॥ तृतीया. शनिवार. प्रथमप्रहर.

नं. ४२८० **श्रीगणपति.** (आषा. व० ३–१ जुलै.)

चि॥ राजश्री गंगाधरराव यांप्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी येथें तोफा राजश्री माधवरावजींबरोबर सरकारच्या चार

आहेत. त्यास तोफांचे गोळ्यांचें प्रयोजन आहे. याजकरितां तोफांचे फर्मे देऊन तोफखान्याकडील माणसें पाठविलीं आहेत. त्यास तेथें गोळे असतील त्यास फर्मे फर्म्यांस येतील ते निवडून पांचशें गोळे भाडेकरी करून रवाना करावे. येथे गोळे थोडके, समयास पुण्याहून दंग्यामुळें येत नाहींत, याजकरितां सत्वर येऊन पावेत अशी रवानगी व्हावी. रा॥ छ० १६ मोहरम. सु॥ तिस्सा तिसैन मय्या व अल्लफ बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० १९ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ व० ६ बुधवार.

नं. ४२८१   (आषाढ व. ३–१ जुलै.)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. मुक्काम नजीक कासेगांव येथून. पै॥ छ० १६ मोहरम.

" आपण लिहिलें कीं, वडिलांचा मुक्काम निंबगोळ्यावर आहे, त्यास लष्करांत तुम्हांस जी बातमी कळेल ती वडिलांकडे जलदीनें पाठवावी. ऐशीयास श्री॥ रा॥ भाऊंकडेही[1] बातमी लिहून पाठवीत जाऊं. "

नं. ४२८२   (आषाढ व० ३–१ जुलै.)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० १६ मोहोरम—

" पंचगंगा व वारणा व कृष्णा या तिन्ही नद्यांच्या उत्साहाकडे कऱ्हाडकरांकडून ब्राह्मणांस इनाम गांव आहेत त्या गांवांस कहींचा उपद्रव होऊन पंधरा गांव लुटले गेले. कऱ्हाडकर श्रीमंत महाराजांस खंडणीही देत नाहींत व तिकडून जावयास मार्गही देत नाहींत. भटजीबावा नरसिंगपूरकर श्रीमन्महाराजांचे गुरु यांणींही निरोप पाठविला आहे कीं, स्वारी निघण्याची उतावळी जाली. उतावळीचा हा समय नव्हे. भटजीबावांस हल्लीं नूतन गांव इनाम

---

१ परशुरामभाऊंचा.

कृष्णातीरीं आळतें तर्फ (पैकीं) चिंचवाड हें दिलें आहे."

नं. ४२८३　　(आषाढ व० ३–१ जुलै.)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० १६ मोहोरम—

" शिंदे यांचें व बायांचें मिटत नाहीं. लढाई होणार. रा॥ मोरोबादादांस आणावयास गेले. पुलापलीकडे स × + + च्या रानांत श्रीमंतांचा फौजसुद्धां मुक्काम आहे. व बाया व बक्षी व मुजफरखान वगैरे दोनी नद्यांचे दरम्यान आहेत. गोखले यांची व राजाज्ञा यांची लढाई जाली असें लिहिलें, त्यास इकडील वकिलांचीं व राजाज्ञा यांचीं पत्रें आलीं त्यांतही हें वर्तमान आहे. अलीकडे लढाई जाली असल्यास सेवकास कळवावयाची आज्ञा व्हावी."

नं. ४५८४　　(आषाढ व० ३–१ जुलै)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० १६ मोहरम.—

"श्री॥ राजश्री छत्रपति यांच्या स्वारीचा मुक्काम शिराळ्यास व्हावा, रायाजी जाधव यांजबरोबर फौज देऊन रवाना करावें, (असें ठरत आहे.) उघड बोलण्यांत शिंदे यांच्या कुमकेस जाणार. अंतर्यामीं ' सातान्यास जावें, तेथील महाराजांस जाऊन ही फौज मिळावी,' असा संकेत योजिला आहे. कऱ्हाडकरानीं कऱ्हाडाजवळ मार्ग दिल्यास उत्तम. नाहीं तर वाळवें येथील नाव व रेठरें येथील नाव आणून मालखेडानजीक नदीपार होणार, अशी मसलत सिद्ध जाली आहे. आज लोकांचे खर्चाची तोड काढून उदईक अथवा परवां रविवारीं फौजेची रवानगी करणार. फौज विशेष नाहीं. सारी तरतूद दोन हजार फौज व हजार पायदळ इतका जमाव आहे. त्यास जाधव यांचें म्हणणें आहे कीं, " सामान थोडकें. पलीकडे जाणें, तेव्हां नद्या भरल्यावर एखादा प्रसंग बलकुबल पडल्यास

नदीपार व्हावयाचें संकट. व आसराही एखादें ठाणें मातबर आपलें नाहीं. साताऱ्याच्या आसऱ्यानें रहावें तर तेथील विचार पडेल त्याप्रमाणें आपण गुंतावें; (असें होईल.) पुण्याकडे शिंयांस जाऊन मिळावें, तर इतक्या सामानानें पुण्यास जाणें कसें होतें ? व घांटही बंद जाले आहेत.'' ऐसा अंदेशा जाधव याणीं घेतला आहे. परंतु महाराजांचा आग्रह जावें असा बहुत आहे. फार करून जातीलसें दिसतें. जाधव यांजबरोबर दोन हजार फौज दिल्यावर व हजार पायदळ दिल्यावर महराजांजवळ पांच सातशें स्वांर व हजार पायदळ राहील. रत्नाकरपंत आपा यांचीं पत्रें काल आलीं. घोडीं जायां जखमी वीस व माणसें जायां जखमी पन्नास येणेंप्रमाणें याद्च आली. आहे. ''शिरटीकर व गदगकर यांजकडील सामान गोखले यांस मिळालें आहे. जोरा त्यांचा आहे. खर्चाचा गळाठा बहुत आहे. त्यास दोन लाख रुपये खर्चास व दोन हजार फौज आल्यास बचाव होईल. नाहीं तर आपला परिणाम ठीक नाहीं. तिकडे यावयासही मार्ग नाहीं.'' असा मजकूर लिहिला होता. त्याचीं उत्तरें लिहून दिलीं कीं, हुजूरची स्वारी तिकडे लवकरच येईल. काळजी करूं नये. असें आशीर्वादार्थ पत्र लिहून पाठविलें आहे !''

नं. ४२८५

(आषाढ व ३–१ जुलै.)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकराच्या लष्करांतून पत्र मिरजेस. मु॥ कासेगांव नजीक येथून. पै॥ छ० १६ मोहरम.

''भाऊ साहेबांकडे जासूदजोडी भृगुवारीं रवाना केली. इकडील मजकूर तपशीलवार लिहून पाठविला आहे.''

नं. ४२८६

(आषाढ व. ३–१ जुलै.)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० १६ मोहारम.

'' बाजीराव साहेब यांजकडे बायांचे समजतीचें बोलणें

(शिंद्यांकडून) पडलें कीं, "बायांस सरंजाम बेजमीचा निराळा तोडून देतों. त्यानीं खटल्यास पडों नये." असें पडलें. त्यावरून बाजीराव साहेब बायांकडे गेले होते. त्यानीं बायांस शिंद्यांच्या बोलण्याचा भाव समजाविला. नंतर बायांनीं उतर केलें कीं, "धनी आपण आज्ञा करितां, उत्तम आहे. त्यास आम्ही मान्य करितों. परंतु आम्ही विनंती करितों ती ऐकून घ्यावी. त्याप्रमाणें शिंद्यांस मान्यता पडते असें जाल्यास उत्तम आहे." त्यास बायांचें म्हणणें कीं, "सखाराम घाटगे व फकीरजी गाढवे वगैरे सहा असामी कारभारी आमचे स्वाधीन करावे. आम्ही सांगूं ते जुन्या कारभाऱ्यांपैकीं कारभारी जवळ ठेवावे. कारभार करणें तो आमचे विचारें करावा. याप्रमाणें जाल्यास समजूत ठरेल." त्यास हें बोलणें शिंद्यांस मान्य पडत नाहीं, तेव्हां समजूत राहिली! बायांनीं बाजीराव साहेब यांस सांगितलें कीं, "याउपर तिकडील बोलण्याचा नाद सोडून द्यावा. आम्ही त्यास मारूं किंवा तो आम्हांस मारील, हीच त्याची आमची समजूत ! पाटीलबावा देवाधीन जाले तेव्हांच आम्हीं बरोबर जावें तें न जालें. त्यास, तोच दिवस कल्पून लढाईतच मरून जाऊं ! चिंता नाहीं." शिंद्यांकडे कंपूच्या खर्चाचा गवगवा बहुत पडला तेव्हां वीस लक्षांचें जवाहीर त्यांस देऊन समजूत केली आहे. परंतु अलीकडे कंपूंतही फितूर आहे असें बोलतात. (शिंद्यांजवळ) फौज[1] दोन तीन हजार आहे. ज्यास्ती नाहीं.

नं. ४२८७ (आषाढ व. ३-१ जुलै)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस.

पै॥ छ १६ मोहरम.

" इकडून पुण्यास आपाजी बल्लाळ सरुडकर हे होते ते काल पुण्याहून कासेगांवच्या मुक्कामीं बाजीरावसाहेबांचें पत्र घेऊन आले.

---

१ घोडेस्वार.

त्यांतील भाव " महाराजानीं शिंद्यांस किंवा सातारकर महाराजांस साह्य होऊं नये. तूर्त स्वारी करवीरास जावी. तूर्त प्रांत घेतला आहे तो महाराजांकडे असावा. साताऱ्याचा व शिंद्यांचा बेदा निवारण होऊन बंदोबस्त जाला म्हणजे मग महाराजांकडील बोलणें समजून घेऊन विनंती करूं त्यांत तह ठरेल त्याप्रमाणें चालावें. किंवा समक्ष आपण येऊन भेट घेऊं. भेटींत ठराव होणें तो होईल. " यावर महाराजांचें उत्तर (सरूडकर यांस) जालें कीं, " बाजीरावांच्या विनंतीप्रमाणें आम्ही पुढें येत नाहीं. येथें शिराळ्यास किंवा दुसरे कोठें राहूं. परंतु आम्ही पत्रें लिहून देतों तीं बाजीरावांकडे पोंचवून उत्तर घेऊन येणें. तेथपर्यंत आम्ही येथें राहतों. " परंतु सरूडकर जाण्याविषयीं अनमान करितात. याचें कारण करवीराकडील वकील बाजीरावसाहेबांस पुणें येथें नको आहे. ही गोष्ट सरूडकर यांस कळून अपमानाची गोष्ट प्रसिद्ध न व्हावी याकरितां बाजीरावांचें पत्र मिळवून इकडे आले आहेत ! "

नं. ४२८८ (आषाढ व. ३–१ जुलै)

नारो हरी यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ. १६ मोहरम—

" बाजी रामचंद्र यांचीं पत्रें काल गुरुवारीं पुण्याहून आलीं त्यांतील वर्तमान बायांकडील जवाहीर व पोषाखी सनगें वगैरे सरंजाम श्री॥ राजश्री बाजीराव साहेब यांजकडे रा॥ दौलतराव बाबा याणीं बायांस देणेंविशीं पाठविला. [1]त्याणीं सरंजाम घेऊन गेलेल्या गृहस्थाजवळ उत्तर केलें कीं, " आम्ही एका वस्त्रानिशीं बाहेर निघालों तसेच चि॥ शिंदे लष्कर सोडून ज्या काळीं निघतील त्या काळीं जवाहीर व वस्त्रें जवळच आहेत; तूर्त घ्यावयाचीं नाहींत. " असें बोलोन माघारी सरंजाम पाठविला. व हुजूरची स्वारी व फौज येणार

---

1 बायांनीं.

त्यास येऊं नये असा भाव लिहिला होता. “ बाजीरावसाहेब यांची मर्जी हुजूरचे ठायीं अलक्षाची जाली, त्यास राजश्री रत्नाकर अण्णाजी यांची रवानगी हुजुरून होणार म्हणोन ऐकलें, त्यास रत्नाकर अण्णाजी न येतांच बरें आहे. आल्यानें बंदोबस्त होतो असा अर्थ नाहीं. ” वरकड स्वामीनीं वर्तमान– लढाई होणार. रा॥ मोरोबा-दादास आणावयास गेले– वगैरे वर्तमान लिहिलेप्रमाणेंच लिहिलें होतें. ”

+नं. ४२८९　(आषा. व० ४–२ जुलै)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकरांच्या ल१करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० १७ मोहरम.

“ राजश्री दौलतराव शिंदे यांचें व कंपूवाले यांचें इमान-प्रमाण जालें. कंपूवाले याणीं आपली टोपी दौलतराव यांचे डोईस घातली. येथपर्यंत करारांचें इमान जालें. वरकड पांच चार हजार फौज आहे त्यांत फूट आहे. त्या फौजेचा शिंद्यांस इतबार नाहीं. अलीकडे होळकर त्यांचे लक्षास लागले आहेत. जाली लढाई ईतक्यावरच विवेक होतो किंवा आणखी लढाई होते पहावी ! ”

नं. ४२९०　श्री.　(२ जुलै.)

पै॥ छ० १९ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं.

अपत्यें केसो सदाशिव काळे साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत आषाढ व॥ पंचमी इंदुवारपर्यंत मुक्काम मालगांव नजीक वंदन यथास्थित असों. विशेष. अलीकडे वडिलांकडून आशीर्वाद

---

१ करवीरकर महाराजांच्या ठिकाणीं. + पुण्याचीं बातमीपत्रें करवीरकरांच्या ल१करांत येत त्यांतली बातमी करंदीकर यानें या व पुढच्या अनेक पत्रांतून मिरजेस लिहून पाठविली आहे.

पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं. सविस्तर लिहावयाची आज्ञा व्हावी. पुणेंकडील चि॥ राजश्री बाबा लेखन करीतच आह. प्रस्तुत बायांचा चढ भारी. कंपूसुद्धां नेइमीं घेरून रात्रंदिवस गोळागोळी चालली आहे. थोडकेच दिवसांत काम नमुदांत त्रयोदश[1] अवतार व विशीक[2] मिळून आणितात यांत गुंता नाहीं. दौलतरावाकडील फौज नित्य उठून जात आहे. राजश्री नानांस नगराबाहेर काढिले आहेत. परंतु आणावयाचे नाहीं.कांहीं काढण्याची आशाही दाखवावी, आणि हिरण्य[3] मिळाल्यास पहावें! कंपूतल्यांनीं सांगितलें कीं, त्या गृहस्थास[4] आणिलें तरी आम्हीं बायांकडे परिछिन्न जाऊं. तेव्हां त्यांसीं (दौलतरायांनीं) शपथ आण दिली. याप्रमाणें वर्तमान पक्कें आहे. संजीवनीचा बुणगेंचा प्रकार लुटून कंपूनें फस्त केलें. पेशजी विनंतीपत्राचा लखोटा करून पाठविला आहे त्याचे उत्तर मर्जीस येईल त्याप्रमाणें द्यावें. काम सरकारचें आहे. राजश्री महादाजी जिवाजी यास पेशजी भगवंत टिकदेव याचे असामीकारितां आणिले आहेत. त्यास एक वर्ष महादाजी जिवाजीकडे व भगवंत टिकदेव यांजकडे दोन वर्षें, याप्रमाणें पेशजी वडिलीं करार करून दिला आहे. वडिलांची प्रकृत सध्यां बरीच आहे. आमचा सर्व भार रा॥ माधवराव रास्ते यांजवर आहें. बहुत थोर माणूस याप्रमाणें व्हावयाचा नाहीं. फौजा जमा होत चालल्या आहेत. बहुत काय लिहिणें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

+नं. ४२९१ श्री. (आषाढ व० ४—२ जुलई)

पै ॥ छ० १७ मोहरम. सन तिस्सा तिसैन.

सेवेसी[5] विज्ञापना श्रीमंतानीं शिंदे यांस मोडून गोटांत नेऊन

---

१ त्रयोदश अवतार म्हणजे अमृतराव. कारण कीं अमृत हें तेरावें रत्न. २ विशीक = विशिख म्हणजे यवन. अर्थी मुशाफरखान पठाण. ३ अजूनसुद्धां नानांजवळ हिरण्य असल्याचा भ्रम होताच! ४ नानांस कैदेंतून सोडून पुण्यास आणिल्यास. + मिति व तारीख पैवस्तीची. ५ पत्र शिवरामपंत थत्ते यांचें पुण्याहून माधवराव रास्ते यांस.

घातलेनंतर सर्वेंच रा॥ रामजी पाटील व रायाजी पाटील उभयतां श्री ॥ राजश्री बाजीराव साहेब यांजकडे आले आणि बोलले कीं, शिंदे यांजकडे सेवकपणा असोन लढाई झाली हा सेवकपणाचा धर्म नव्हे. असो. जें जाहलें तें बरेंच झालें. आपण चित्तांत रोष धरूं नये. सरंजाम वगैरे लुटला गेला तो वगैरे झाडून (परत) देतों. आपण धनी. गुन्हा माफ करावा आणि बायांची व अमृतराव साहेब यांची येखलासी करून देवावी. शिंदे आपले आज्ञेशिवाय नाहींत. आपण आज्ञा करितील त्याअन्वयें वर्तणूक करितील. ऐसें कितेक प्रकारचें बोलणें रहस्य व्हावयाचें उभयतां बोलले. बाजीराव साहेब याणीं ऐकून मात्र घेतलें. उभयतांस उत्तर तिलमात्र केलें नाहीं. आणि जाबसालही कांहींच न बोलतां संध्येस उठोन गेले. याप्रों जालें. पुढें काय होतें पहावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२९२   श्री (आषा० व० ४–२ जुलै)

पै॥ छ० १७ मोहरम. सन तिस्सा तिसैन.

सेवेशीं विज्ञापना. श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति यांस रा॥ बाजी रामचंद्र याणीं स्पष्ट फौज अथवा हुजूरची स्वारी शिंदे यांच्या कुमकेस येऊं नये म्हणोन लिहिलें आहे. परंतु आकाराम यादव व जानराव जाधव या उभयतांतून कोणी येईजेपर्यंत अथवा त्यांचीं पत्रें येत तोंपर्यंत जावें न जावें हा निश्चय करीत नाहींत. तूर्त कासेगांव नजीक मुकाम आहे. फौज अडीच हजार तीन हजार आहे व पायदळ दीड हजार दोन हजार पर्यंत आहे. नवे लोक आल्यास ठावतात. परंतु राऊत कोणी आतां येत नाहींत. पाईचें माणूस थोडें बहुत येतें. तूर्त पर्जन्यानें बहुत गळाठा केला आहे. आसमंत भागींचें गांव खेडें यांची कांहीं बाकी राहिली नाहीं. काल मंदवारीं दोन

---

१ हें व पुढच्या नंबराचें पत्र करवीरकरांच्या लष्करांतून नारो रि करंदीकर याचें मिरजेस बाळासाहेबांस.

तीन तास रात्रीं तोफा जाहल्या, परंतु काय निमित्य जाहल्या हें वर्तमान आलें नाहीं. आलेवर सेवेशीं कळवीन. पुण्याकडील वर्तमान अधिकोत्तर आलें असल्यास कळविण्याची आज्ञा जाहली पाहिजे. इकडे पुण्याचें वर्तमान लिहिलें इतकें आहे. आणखी होईल तेंही कळवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२९३

श्री. (आषाढ व० ४—२ जुलै.)

पै॥ छ० १७ मोहरम सन तिसा तिसैन.

सेवेशीं विज्ञापना. श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांचे सुटल्याचें व (ते) फौज ठेवितात (हें) व मिरजेहून श्री॥ राजश्री आपासाहेब यांजकडूनही (सातान्याकडे) फौज रवाना जाहली, आणखीही फौज ठेवीत आहेत, पूर्ववत्प्रों तालुक्याचें व साहेबसुभ्याचें काम सांगितलें, असें वर्तमान (येथें) अंतर्यामीं आहे. परंतु खचीत वर्तमान बोलत नाहींत. बाह्यात्कारी वर्तमान नानाप्रकारचें उठवितात. पुण्याच्या वकिलाकडून पत्रें आणवितात त्यांत वर्तमान वकील लिहितात कीं, 'मांडवगणाहून आणिलें, परंतु रास्ते यांचे कैदेंत आहेत. पांडवगडास नेऊन ठेवणार असें आहे.' काल नारोजी निकम शिराळेकर याजकडील बातमीस प्यादे निंबगोन्यास गेले होते ते काल मंदवारीं आले. त्याणीं बातमी आणली कीं, 'भाऊसाहेब रास्त्यांचे पागेंत एक राहुटी दिली आहे तेथें आहेत. भोंवतीं चौकी रास्ते यांची आहे, असें वर्तमान उठविलें ! याचें कारण आपले फौजेंत लोक हवालदिल होतील या अर्थे मिथ्या वर्तमान उठवितात. त्यास बंदोवस्त जाला, पक्केंपण, हें वर्तमान सर्वत्रांस समजलें आहे. बहुत करून लोकांसही पत्रें येणेंविशीं आलीं. यांच्या वर्तमानानें केवळ झालेला बंदोबस्त फिरतो असें नाहीं. परंतु जसा व्यवहार तसें वर्तमान उठवितात ! कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२९४   श्री.   (आषा० व० ४-२ जुलै.)

पै ॥ छ ० १८ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ.

सेवेसीं येसाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ० १७ मोहरम प्रातःकाल मुकाम मालगांव वर्तमान यथास्थित असे; विशेष. स्वामींचा निरोप घेऊन निघालों ते काल येथे मु ॥ मजकुरास पावलों. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांची भेट घेतली. 'लोक किती आले' म्हणोन विचारिलें, त्यास आम्हांबरोबर तीनशें लोक गणतीचे आले म्हणोन सांगितलें. लोक वरचेवर आज उद्यां दोन दिवसांत पांचसहाशेंपर्यंत येऊन पावतील. चार पांच दिवसांत हजारांची भरती होईल. आम्हांबरोबर हजार लोकांची नेमणूक जाली, त्यास आमची रवानगी निकडीनें केली. आम्ही निघालों. लोक अलाव्यास गुंतले. यावयास दोन दिवस आळस पडला. पुढें निघाले तों मार्गीं पर्जन्य चार दिवस लागला आहे. याजमुळें हलक्या मजली करून लोक वरचेवर येत आहेत. याप्रमाणें विनंती केली. 'पागेनें सामान बरोबर किती आलें' म्हणोन विचारिलें, त्यास पागेचे पांचसात बारगीर आम्हांबरोबर आहेत. मागाहून राजश्री आपाजी गोविंद यांची रवानगी केली आहे त्यांजबरोबर पागा वगैरे लोक येणार आहेत. 'टकले वगैरे लोक पुढें आले यांचें बुणगें आलें किंवा नाहीं' म्हणोन विचारिलें, त्यास सर्वांचे बुणग्यास ताकीद जाहली होती. बुणग्याचें कूच मिरजेहून जाहलें होतें म्हणोन विनंती केली. तेथें कांहीं फौजेस निरोप दिला म्हणोन कळलें, त्यास तेथें ज्यांस निरोप जाहला असेल त्यांस इकडे रवाना करावें. येविशीं स्वामींस श्रीमंतांनीं एक दोन पत्रें लिहिलीं आहेत म्हणोन सांगितलें. त्यास स्वामीस पत्रें आलींच असतील. सारांश येथें फौज व पायदळ जें मिळेल तितकें ठेवणार. तमाम लोकांस पत्रें पाठविलीं आहेत. वरचेवर येथेंही जमा होत आहेत. वरकड सविस्तर सेवेसीं मागाहून लिहून

पाठवितों. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचें शरीर फार कृश जाहलें आहे. हल्लीं प्रकृत बरी आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४२९५

(आषाढ व. ५–३ जुलै.)

नारो हरी यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस.

रवाना छ० १८ मोहरम मु॥ नजीक कासेगांव येथून—

" भाऊसाहेबांकडे घडेल तें वर्तमान लिहीत जाणें. राजाज्ञा परत येणार कीं काय ? विंचूरकर पथकासुद्धां भाऊसाहेबांस येऊन मिळाले " म्हणून लिहिलें तें कळलें. राजाज्ञा तूर्त येत नाहींत. महाराजानीं अष्ट्यांकडे लोक रवाना केल्याचें भाऊसाहेबांस लिहिलें आहे. आणखीही होईल तें कळवीत जाऊं."

नं. ४२९६

(आषाढ व. ७–५ जुलै.)

नारो हरि करंदीकर याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ. २० मोहरम.

" नाना फडनवीस नगरास आहेत तेथील वर्तमान तर नानाकडील कागदपत्र मोंगलाकडे व भोसले यांजकडे व इंग्रजांकडे व शिंयांकडे जाणेंस परस्पर दिक्कत नाहीं. कागदपत्र जाणेंची मोकळीक जाली आहे. शिंद्यांचें म्हणणें कीं, पुण्यास (नानांनीं) यावें. त्यास नानांचा मानस ' किल्ला आपले स्वाधीन व्हावा. येथून आपण मसलत सांगूं त्याप्रमाणें तुम्ही तेथें करीत असावें. " असें म्हणणें; त्यासही शिंदे रुकार द्यावयास सिद्ध. परंतु किल्लेदार म्हणतो कीं, घरकलह बायांचा व शिंदे यांचा तुटून धनीपणा ठरेल त्याचे आज्ञेनें वर्तणूक करूं. तोंपर्यंत उभयतांकडील आज्ञा वंदावयाची मानावयाची नाहीं. तूर्त नानांस स्वाधीन करीत नाहीं. दुसरें वर्तमान किल्लेदार नानांस शिंदे यांचें स्वाधीन करणार होते, परंतु किल्लेदाराकडून नानानींच सदरहूप्रमाणें उत्तर करविलें ! " पुण्यास जावें तर बायांकडे जमाव व श्री॥ राजश्री अमृतराव साहेब यांजपाळ फौजेचा

जथ. त्यापेक्षां जाऊन परिणाम कसा लागतो नकळे. भोसले मोंगल यांजकडीलही फौज तूर्त (जवळ) नाहीं, त्या अर्थे किल्ला स्वाधीन जाल्यास इकडे राहून मसलत साधल्यास करून पाहूं " या प्रमाणें वर्तमान आहे. सत्य मिथ्या काय असेल तें असो ! "

नं. ४२९७ (आषाढ व. ७–५ जुलै.)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस.

पै॥ छ० २० मोहरम.

" कऱ्हाडकर यांजकडील खंडणीचा प्रकार वडावयाचा राहिला. आतां बोलणें ठरलें आहे कीं, " तुमचा आमचा एक विचार असावा, म्हणजे तुमच्या प्रांतास उपसर्ग करीत नाहीं व जालेला आहे तोही मना करवितों. आम्हांस जाण्यायेण्यास व नदीपार होण्यास तुम्हांकडून हरएकविशीं दिक्कत नसावी. याप्रमाणें व्हावयास तुमचा आम्हांस भरंवसा पुरवत नाहीं, त्यास नरसिंमपुरकर भटजीबावा आमचें गुरुस्थान. तुम्हासही गुरुस्थानादाखल. त्यांचे विद्यमानें शपथ होऊन भटजीबावा दरम्यान रहावे. " असें बोलून निश्चयांत आणिलें आहे. अंताजी कृष्ण फडणीस कऱ्हाडाहून येथें आले आहेत त्यांचेजवळ बोलणें जालें. त्यानीं कऱ्हाडास श्री॥ मातोश्रीकडे लिहून पाठविलें आहे. त्यांचा रुकार आल्यास सदरहूप्रमाणें ठराव होईल. दिकतीचें उत्तर आल्यास जसी मसलत ठरेल त्याप्रमाणें लिहून पाठवीन. "

नं. ४२९८ (आषाढ व. ७–५ जुलै)

नारो हरि करंदीकर यांचें करवीकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ २० मोहरम.

"आकाराम यादव व जानराव निकम हे पुण्यास पावल्याचें पत्र आलें. 'शिंद्याची भेट झाल्यावर सविस्तर लिहूं' म्हणून (त्यानीं) लिहिलें होतें. उत्तरें येतपर्यंत कारेगांवचा मुक्काम आहे. अष्टयांस

ठाणें घालावयाकरितां नारोजी निकम याजबरोबर दोनशें गाडदी व शिरोळचे प्यादे दोनशें देऊन काल इंदुवारीं दोन प्रहर रात्रीस रवाना केला. भौमवारीं यशवंतराव घाटगे यांजकडील शंभर दीडशें प्यादे व कदमाकडील शंभर दीडशें स्वार रवाना केले. भाऊसाहेबांचें ठाणें अष्ट्यास पडलें असें ऐकून लोक पाठविले आहेत. थोडका जमाव आहे तों ठाणें घालावें, गांव लुटावा; पुढें ठाणें ठरो अगर न ठरो ! याप्रमाणें मसलत आहे.''

नं. ४२९९

(आषाढ व.–७–५ जुलै)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० २० मोहरम.

''रत्नाकरपंत राजाज्ञा यांजकडून आज भौमवारीं प्रहर दिवसास सांडणीस्वार आला. रा॥ धोंडोपंत गोखले (यांजवळ) सावनुरांत चार हजार फौज व पायदळ चार पांच हजार येणेंप्रमाणें सरंजाम आहे. राजाज्ञा कारडी हुलगूर नजीकसावनूर दोन तीन कोसांवर आहेत. (त्यानीं) खर्चाची बहुतच हलाखी लिहिली आहे. ''गोखले यांचा अंमल सावनुरांत व सावनूरप्रांतांत ठाणीं बसून सर्व जमीदार त्यांजकडेच मिळाले. आम्हाकडे प्रांत तूर्त राहिला त्याची लावणी अद्यापि नाहीं. रात्रंदिवस गोखले यांचा शह राखितां पुरे आहे. खर्चास नाहीं यामुळें लोक बेदिल आहेत. निघोन यावें तर गोखले दुमदारीवर येऊन मार्गास कोठें तरी गळाठा करणार. तेव्हां राहिलें असतांही परिणाम नाहीं व निघून आलें असतांही निभावणी पडत नाहीं. खर्चास व दोन हजार फौज कुमकेस आलेशिवाय बचाव होत नाहीं. याउप्पर खर्चाची (व) कुमकेची तरतूद न जाल्यास माघारे येण्याचे मार्गही बंद होणार;'' याप्रमाणें वर्तमान लिहिलें होतें. तीं पत्रें महाराजानीं पाहून उत्तर केलें कीं, ''पन्नास लक्षांची वरात स्वाधीन असतां फिरोन फिरोन आम्हांसच रड लिहि-

तात! मी तरी खर्चास येथील फौजेस द्यावें कीं तिकडील फौजेस द्यावें? काय करावें? " याप्रमाणें बोलोन पत्रें चिटणिसांकडे टाकून दिलीं. तूर्त राजाज्ञा व हिंमतबहाद्दर कोणी (इकडे) येत नाहींत आणि आले असतां वाटेनें सुरक्षित गोखले येऊं देत नाहींत!"

नं.४३०० **श्रीगणपति.** (आषा० व० १०–८ जुलै.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. फौजेची रवानगी राजश्री आपाजी गोविंद याजबरोबर केली म्हणोन (तुम्हीं) लिहिलें, परंतु अद्याप येत नाहीं. तरी लवकर तरतूद जाहली असेल त्याजप्रमाणें रवाना व्हावी. इकडील वर्तमान तरी नवल विशेष पुण्याकडून कांहीं आलें नाहीं. पर्जन्य पडत आहे. सातान्याचा जमाव आहे तोच आहे. याजउपरी फौजेचा जथ पडावयाचाच गुंता आहे. त्यास खर्चास आधीं दिले पाहिजे. तें एक मोठें संकटच आहे. ईश्वर इच्छेनें काय घडेल तें पहावें. रवाना छ० २३ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० २३ मोहरम. सहा घटका रात्र. सनतिस्सा तिसैन.

+नं. ४३०१ **श्रीगणपति.** (आषा० व० ११–९ जुलै.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब व आपा यांसीं आशीर्वाद उपरी. नारो हरी करंदीकर यांचीं पत्रें करवीरकरांचे लष्करांतून आलीं त्यांतील मजकूर "अष्ट्याचें ठाणें घेतलें. याजउपरी कृष्णा वाळवेचे आजू बाजूस पार होऊन शिंद्याचे कुमकेस जावें, सातान्याचे कुमकेस जावें, अशी आवाई; परंतु पोटांत अर्थ आमचा जथ पडला नाहीं तों जाऊन गांठावें असी कस्त आहे " असें लिहिलें आहे. तुम्हाकडे ही हें वर्तमान लिहिलेंच असेल. त्यास वाळवेंची नाव व भिलवडीची नाव व सांगलीची नाव ऐशा त्यांस प्राप्त होऊं नयेत. अलीकडे आणून

+ हें व पुढचीं दोन पत्रें परशुरामभाऊंचीं.

ठेवाव्या अथवा पाण्यांत बुडवून टाकाव्या. असें कारितां ते टोकरे वगैरे मेळवून उतरतील, त्यास उतरते समयीं (स्वार पायदळ वगैरे) सामान पाठवून उतरण्यास खलेल व्हावी. तत्रापि उतरून इकडे येऊं लागल्यास पिछावर फौज व प्यादे पाठवावे. गलबल करून पायबंद बसवावा. आम्ही सावधच आहों. बाबूराव कामलकरांचें पत्रच आलेलें पाठविलें आहे त्याजवरून सर्व कळेल. छ० २४ मोहरम. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २५ मोहरम सन तिस्सा तिसैन– आषाढ.

नं. ४३०२ **श्रीगणपति.** (आषाढ व० ११–९ जुलई)

आशीर्वाद उपरी. "नारो हरी करंदीकर यांचें पत्र आलें कीं कांहीं शिलेदार व पायदळ लोक (करवीरकरांकडून) तिकडे निघोन येणार. त्यांस पत्र देऊन लावून द्यावें किंवा कसें याचें उत्तर पाठवावें म्हणोन लिहिलें आहे. त्यास कसें लिहावें ती आज्ञा व्हावी" म्हणून (तुम्हीं) लिहिलें, त्यास मशारनिल्हे तेथें आहेत त्याणीं आपला बचाव होऊन जी गोष्ट साधेल तैसी करावी. बातनी तरी युक्तीनें लिहून कळवावीच. लोक फोडून पाठवणार त्यास येविशींचा आणविण्याचा गुंता नाहीं. जे येथील ते पाठवून देणें म्हणून लिहिणें. राजश्री माधवराव रास्ते यांस (तुमचें) पत्र होतें तें पावतें केलें. त्याचें उत्तर घेऊन पाठविलें आहे. तयार फौज यावयासीं बरेच दिवस लागले. छ० २४ मोहोरम. लोभ कीजे. आपाजी दामोदर व बाळाजीपंत भिडे, टकले, यांचे लोक थोडे आहेत. बुनगीं तेथें आहेत तीं पाठवून द्यावीं. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २५ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ व॥ १२ भौमवार. तृतीय प्रहर.

नं. ४३०३ **श्रीगणपति.** (आषा० व० १२–१० जुलै.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस आशीर्वाद उपरी. तुम्हीं

पत्र छ० २२ मोहरमचें पाठविलें तें छ० २४ मिनहूस पावोन सविस्तर कळलें. "करवीरकरांनी अष्टाचें ठाणें घेतलें. पुढें कवठें डिगरज व दुधगांव वगैरे खेड्यांस उपद्रव होणार, म्हणोन नारो हरी यांचें पत्र आलें तें पहावयास पाठविलें आहे. (त्यानीं) आपलेकडे-ही बातमी लिहोन पाठविली आहे, म्हणोन लिहिलें होतें." तें कळलें. इकडेही याजप्रमाणेंच वर्तमान (त्यानीं) लिहिलें. करवीरकरांची कस्त वाळवेंजवळ कृष्णापार होऊन आम्हांस गांठावें ही कस्त आहे म्हणोन तुम्हींही लिहिलें व मशारनिल्हेमीं लिहिलें, ऐशास स्वार-पायदळ मिळोन (करवीरकरांचा) चारपांचांचा जमाव आहे. कृष्णापार व्हावयास चार दिवस तरी पाहिजेत. इतके सामानानिशीं मैदानांत येतीलसें वाटत नाहीं. तत्रापि पार व्हावयास लागले तरी तुम्ही स्वारप्यादे दोन चार कोसांचे अंतरानें जमवून एक जागीं ज्या घाटास उतरूं लागतील तेथें बातनी राखोन पोंहोंचून उतरूं देऊं नये. येविशीं परवांचे पत्रीं लिहिलेंच आहे. आम्हीं सावध आहों. फौज जमा होत आहे. 'राजश्री आपाजी गोविंद वड्डीवरून कूच करून अलीकडे आले. लोकांचा गवगवा फार. उरकोम लौकरच चालते होतील.' म्हणोन लिहिलें तें कळलें. दिवस या प्रकारचे आले. तापत्रय असें. सर्वाठाई तेंच आहे. त्यास परिणाम लावणार श्री आहे. पुण्याकडील वर्तमान लिहिणें म्हणोन लिहिलें, (त्यास) पुरवणीपत्रीं लिहिलें आहे त्यावरून कळेल. छ० २५ मोहरम. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ४३०४ **श्रीगणपति.** (आषा० व० १२–१० जुलै)

पुरवणी. चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस आशीर्वाद उपरी. चिरंजीव राजश्री श्रीपतरावभाऊ यांचे मळ्यांतील पोकळ्याची भाजी व फुलें नऊ पाठाविलीं तीं पावलीं व तोंडलीं हीं पावलीं. राजश्री धोंडोपंत गोखले यांजकडील वर्तमान लिहिलें तें कळलें. तिकडील सरंजाम महाल

वगैरे विषयीं लिहिलें तें कळलें. कलमदान लांकडी लाल मखमलीनें मढवून सुरी कातर आदीकरून सरंजाम तयार करून पाठविला तो यादीप्रमाणें पाहून घेतला. रुमाल, मेणकापड कोरें, कापलेलें बंद, व मेणाच्या गोळ्या, डिंकदाणीची काडी, आदीकरून पावलीं. व अरगजाचे गोळ्यांच्या पुड्या दोन पाठविल्या त्यांजपैकीं एक पुडी राजश्री माधवराव रास्ते यांस व पत्र लिहिलें आलें तें असें पावतें करून उत्तर घेऊन पाठविलें आहे. एक पुडी आम्हीं घेतली. पुण्याकडील वर्तमान अधिकोत्तर नाहीं. बाया व बुनगें शिवापुरास घांट चढोन येऊन राहिलें आहे. श्रीमंत राजश्री अमृतराव व पठाण नक्षी सडे होऊन पर्वतीचे पाठीमागें आहेत. भोंवते तलावे करीत आहेत. पुण्यांतील कांहीं घरांत शिरोन कडबे काढून नेतात. गांवांत आहेत ते तेथील तेथेंच कही करितात ! शिंद्यांचे त्यांचे[१] अंगें शहरांतील (कही) करितात ! गांवांत लोक बहुतकरून आहेतच. घर सोडून कोणी अगदीं गेले. कोणी सडे आहेत त्या घरांत पुण्यांत गाडदी सरकारचे आहेत ते निवाऱ्याकरितां त्या घरांत राहतात. घरें खणतात. कोणास कांहीं सांपडतें. कोणास सांपडत नाहीं. परंतु लालची लागली याजमुळें ही प्रवृत्त चालली आहे. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब बायांचें व शिंद्यांचें मेळवून द्यावयाचें म्हणतात. बोलण्याचे अंतीं कशास कांहीं मिळत नाहीं. शिंद्यांजवळची फौज बहुतेक उठोन गेली. दोन तीन हजार घोडें सारे लष्करांत असेल. वरकड सारे कंपूचे बळावर आहेत. बाहेर रस्त बंद जाहली. परंतु शहर सन्निध (सबब) तूर्त पोटास मिळतें. ईकडील[२] काटगिरी चालत नाहीं. त्याणीं शहराचा आश्रय धरिला. गडबड केल्यास शहर लुटतों म्हणतात. शहरावर तोफा फिरवितात ! तेव्हां गांवांतून दाणावैरण विकत देतात. याजप्रमाणें प्रवृत्त चालली आहे. बायांचें मत एक. श्रीमंतांचे गांवांत

१ अमृतरावांची. २ बाजीरावसाहेबांची फौज.

आहेत त्यांचें मत एक. शिंद्याचें मत एक. त्यांत कंपूचे मतलब निराळे. असा प्रकार दिसतो. पुढें परिणाम कसा लागतो पहावा. तूर्त शहराची धुळधाण होईलसी दिसते. चि॥ राजश्री आपा गुरुवारीं रात्रीं निघाले. दोन दिवस लागतील. नंतर चालते होणार होते. त्यास तेथें लोक जमा करावयाचे. आम्ही येथें बेसरंजाम त्याची तरतूद व्हावयाची व ते एकटे येणें ठीक दिसत नाहीं. दोन चारशें स्वारांचा जमाव असावा. तेव्हां जम पडावयास आठ चार दिवस अधिक उणे लागल्यास लाऊन जमाव करोन यावें. यावयाची जलदी करूं नये. मुहूर्तानें बाहेर निघाला, उत्तम केलें. जमाव करावा. तेथें जमाव करितात ही अवाई पडते. हे सारे अर्थ समजून करावें असें परवांचे पत्रीं लिहिलें आहे. परंतु कालचे पत्रीं रविवारीं चालते होतों म्हणोन (त्यानीं) लिहिलें, तेव्हां चालते झाले न झाले हें न कळे. पत्र पावल्यावर काय करितात पहावें. छ० २५ मोहरम. लोभ करावा हे आशीर्वाद.

पै॥ छ० २७ मोहरम. सन तिस्सा तिसैन. आषाढ व॥ १४ गुरुवार. अस्तमान.

नं. ४३०५ **श्रीगणपति** (आषा० व० १३–११ जुलै)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस आशीर्वाद उपरी. तुम्ही पत्रें छ० २३ मोहरमचीं पाठविलीं तीं छ० २६ मिनहूस पावलीं. लिहिला मजकूर कळला. “ राजश्री नारोपंत जोग येऊन पावले. चि॥ राजश्री आपा मुहूर्तानें निघाले. राजश्री सदाशिव महादेव सहस्रबुद्धे यांजबरोबर (आपला) निरोप आला (कीं,) येण्याची जलदी करूं नये. फौजेचा जथ पडावा. चहूकडे दबाव असावा. त्याजवरून बुधवारीं मृगनक्षत्रावर चिरंजीव डेरे देऊन बाहेर राहतात. राजश्री आपाजी गोविंद यांजबरोबर फौज देऊन रवाना केले ते तूर्त चिरंजीवांजवळ जमाव दिसला पाहिजे, याजकरितां राहोन घेऊन

त्यांजवळ उतरावितों. चहूं दिवसांनंतर येथून आज्ञा होईल तैसे चालते करितों " म्हणोन विस्तारें लिहिलें तें कळलें. चिरंजीवास डेरे देऊन बाहेर उतरविलें तें चांगलें केलें. आपाजी गोविंद यांची रवानगी लौकर व्हावी असें पेशजी फार वेळ लिहिलें, रवाना करितों अशीं उत्तरें येत गेलीं, तरतूद पैशाची न होय याजमुळें दिवसगत लागली, असो. हल्लीं बेत झाला हाही बराच आहे. सध्यां येथें फौजेचा जम पडत चालला. नित्य शें दोन शें लोक येऊं लागले. याउपरी जमाव पडतो त्याअर्थी तिकडून फौज पाठवूं नये. इकडे पुष्कळ लोक येतात. तेथें नवे ही ठेवूं नयेत. साऱ्या गोष्टी करावयास अवघड नाहींत, परंतु पैक्याचे गोष्टीपुढें कांहीं चालत नाहीं. त्या अर्थीं हात चालेलअन्वयें चालावें. चिरंजीवासही पांचशें स्वार नवे ठेवून तेथेंच तूर्त असावें, ज्यास्ती ठेवूं नये; असें लिहिलें. तुम्ही ही ज्यास्ती ठेवूं नये. आहे त्यांतच संभाळून रहावें. इकडे खर्चीची अनुपतच. परंतु रास्ते यांची मसलत बिघडली आहे. त्याणीं आम्हांवर उपकार बहुत केले. तेव्हां त्यांचा पुस्तपना करून मसलत सुधारावी त्याअर्थीं फौज जमा करणें प्राप्त. इकडे ही याजउपरी लोक बहुतच येऊं लागले. चिंता नाहीं. करवीरकर कृष्णापार होणार. त्यास कोठें होतात त्याची बातमी राखोन अलीकडे दोनचार कोशीं स्वार प्यादे जमाव राखोन पार होऊं देऊं नये. सारांश ज्यास्ती जमाव ठेवूं नये. आहे त्यांतच होईल तें करावें. छ० २६ मोहरम. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

पै॥ छ० २९ मोहरम. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण शु॥ १ शनिवार, प्रथम प्रहर दिवस.

नं. ४३०६

श्री. (आषा व० १४–१२ जुलै.)

पै॥ छ० २७ मोहरम. सन तिस्सा तिसैन, आषाढ.

पुरवणी. सेवेशीं विज्ञापना. श्रीमंत राजश्री आपासाहेब याणीं तेथें फौज जमवावी. तिकडील वळणाचे लोक येथें यावयासीं दूर पडेल, यास्तव तेथेंच दोन चार हजार फौज जी मिळेल ती ठेवून वरचेवर इकडे रवाना होत असावी, असें येथें श्रीमंत बोलतात. परंतु तिकडून फौजेचा भरणा होत नाहीं. आणि आपासाहेब येणार त्यास फौज मिळवून आल्यास चांगलें. त्यास तेथील प्रकार कसा हें येथें कशावरून समजतें? लोक तेथें मिळत नसल्यास आपासाहेब तरी काय कारितील? येथें मात्र फौज लवकर यावी हेंच म्हणणें श्रीमंतांचें. पायदळ ही ठेवीत आहेत. पुण्याकडील वर्तमान मार्गच चालत नाहीं. शिंदे यांच्या बायका हजार दीड हजार फौजेनिशीं शिवापुरास येऊन राहिल्या आहेत. पुण्यांत बावरी राहिली नाहीं. कही तरी शहरांत होती. बाजारी वर्तमान पुणें शिंदे लुटणार असें बोलतात. पुढें काय घडेल तें पहावें. हें पत्र पाहिलेवर फाडून टाकिलें पाहिजे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३०७ श्री. (अधिक श्रावण शु० २–१५ जुलै)

पै॥ छ० २ सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

सेवेशीं विनंती सेवक अण्णाजी रामचंद्र. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० १ सफर इंदुवार प्रातःकाळ मु॥ मौजे नागराळें स्वामीचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे; विशेष. स्वामींनीं काल पत्र पाठविलें तें पावलें. पुणदी व शिरगांवचे उताराचा बंदोबस्त करवितों. "आपले कडील गांवानीं ताकीद करून गांवचे दांडगे जमा करून त्यांजवळ गोफणी व दगड असावे. महाराजांचे लष्करांत बातमीस माणसें पाठवून बातमी कळवीत जाणें" म्हणोन आज्ञा, ऐशियास आज्ञेप्रमाणें मौजे मजकुरीं ताकीद केली. दुधोंडी वगैरे

---

१ रास्त्यांचें लष्कर नजीक सातारा येथून बाबाजी विश्वनाथ चांफेकर यांचें पत्र मिरजेस.

गांवांसही ताकीद करितों. बातमीस माणसें पाठविलीं तीं काल अस्तमानीं आलीं. त्यानीं सांगितलें कीं, परवां कूच जाहलें असतां लष्करचा मुक्काम व्हावयाचें कारण पांढरे रुसले होते. सारी फौज तयार झाली असोन त्यांची तयारी नाहीं, ऐवज रोजमऱ्याचा वगैरे तटला त्याचा फडशा केल्याशिवाय येत नाहीं म्हणों लागले. यास्तव मुक्काम जाला. काल त्यांची समजूत काढिली. आज इंदुवारीं कूच व्हावयाची बोलवा नदी उतरोन अलीकडे येण्याचीं दाट बोलतात. बरोबर लष्करांत सामान चार टोकरे व शेंदीडशें सांगडी येणेंप्रमाणें आहे. पलीकडील बोरगांव वगैरे गांवांस तसदी करून सांगडी काढणार. गोठखिंडीपाशीं कांहीं टोकरे जमा केले आहेत. तोफा दोन आहेत. याप्रों माणसानीं सांगितलें. घोगावाहून येक गांवचा माणूस व येक करवीर तालुक्याचा वाणी वस्तीस आहे त्यास दोघांस रोजमरा करार करून पाठविले होते. गांवचा माणूस लष्करचे चौकीदारानीं बसविला. त्यास वाण्याची ओळख तेथील लोकांची होती त्यानीं सोडवून आणिला. आज आणखी बातमीस माणसें पाठवितों. लष्करचे लोकांचे बोलण्यांत कांहीं लोकांचे बोलणें नदी उतरावयाचें नाहीं. कूच करून मौजे कालें प्रांत कऱ्हाड येथें जाणार. नारोजी निकम याचे निसबतीचे लोक तेथील ठाण्यांत होते त्यांस कऱ्हाडाहून स्वारी येऊन कापून काढलें, यामुळें तिकडे फौज जाणार म्हणोन, व काल शेंसवाशेंपर्यंत स्वारही काल्याचे मार्गे गेले, याप्रों वर्तमान आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना. गोठखिंडीस टोकरे आहेत म्हणतात यास्तव तेथें पाहोन यावयाजोगा कोणी शहाणा माणूस पाठवून बातमी आणवून सेवेशीं लिहितों. तलाव्यास स्वार[1] येणार म्हणोन आज्ञा, त्यास इकडे अद्याप

---

१ स्वार रामचंद्रपंत आपाचे.

तलाव्यास आले नाहींत. परवां भिलवडीस आले होते असें ऐकिलें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३०८ **श्रीगणपति.** (आधि. श्राव. शु. ३–१६ जुलै.)

आशीर्वाद उपरी. राजश्री नाना नगराहून गारदौंडचे मुकामास आले, तेथें भीमापार होणार. सहा पलटणें, पांचशें स्वार, गाढवा[1] बरोबर आहे. राजश्री बाळोबा यांस ही पत्रें येण्याविशीं शिंद्याचींच घाटगे यांचेच मध्यस्थीनें बक्षीसीं संधान करून घेऊन पाठविलीं आहेत. बोलण्यांतील भाव 'वडील तात्या. ते आलेवर आपली व बायांची एकवाक्यता करितील तशी उभयपक्षीं मान्य' असे भाव[3] आहेत. राजश्री मोरोबादादास त्रिंबकेश्वराहून आणविले ते शिवनेरीस आले. पुढें तूर्त येवूं नये असें श्रीमंतांचें पत्र गेलें म्हणोन ऐकितों. श्रीमंतांचे मानस शिंद्याचें व बायांचें मिटवावें असें आहे. इकडे नानास आणितात, इकडे ही असी वाटाघाट होते ! कशास कांहीं संधान मिळत नाहीं. यांत खरें लटकें देव जाणे. सारांश बचबच. यांत श्रीनेंच परिणाम काय योजिला असेल तो न कळे. राजश्री बाळोबा तात्याचें लिहिलें, परंतु पक्कें नाहीं. राजश्री नाना आले खरे, परंतु मोकळे नाहींत. निकडच आहे. छ. ०२ सफर. हे आशीर्वाद.

पै॥ छ० ५ सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण शु॥ सप्तमी. गुरुवार प्रथम प्रहर दिवस.

नं. ४३०९ **श्रीगणपति.** (अधि० श्राव० शु० ३–१६ जुलै)

चि॥ राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती[1] परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. राजश्री आपाजी गोविंद याची रवानगी केली, चालते जाहले, म्हणून लिहिलें तें कळलें. त्यांचें ही पत्र भालवणीचे मुक्कामाचें आलें होतें.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें बाळासाहेबांस. २ शिंद्याचा सरदार फकीरजी गाढवे. ३ बक्षीचें बोलणें घाटगे व शिंदे यांजकडे लागलें त्यांतले भाव.

दरमजल येतों म्हणून लिहिलें आहे. येतील. करवीरकरांचा मुक्काम अष्टावरच आहे. वाळवेंजवळ कृष्णापार व्हावयाची बोलवा आहे. जरूर उतरतील. असो. बातमी राखली आहे म्हणोन लिहिलें, त्यास कृष्णापार होऊं लागल्यास बातमी राखोन स्वारपायदळ पाठवून उतरूं देऊं नये. नावा जिकडील तिकडे विल्हे केली. टोकऱ्यांनीं लष्कर व तोफा उतरणें हा प्रकार कळतच आहे! बातमी राखोन घाट धरावा. राजश्री बाबूराव नरसिंह यांचें पत्र पाहून माघारें पाठविलें आहे म्हणून लिहिलें तें कळलें. मदार सूतर स्वार रवाना जाहला तो चि॥ राजश्री आपानीं आपलीं पत्रें व कांहीं ऐवज रवाना करावयाकरितां ठेवून घेतला म्हणोन लिहिलें तें कळलें. लौकर रवाना करावा. नारोहरीचें पत्र आलें त्यांतील मजकूर लिहिला तो कळला. करवीरकरांचा असा अनाहूत प्रकार तेथें अधिक उणें काय मोजावें! करवीरकरांचे लष्करांतून स्वार येणार त्यांची नांवनिशी लिहिली ती कळली. हरिपुरचे उतारास चिठी दिली म्हणोन लिहिलें तें कळलें. फौजेचा मजकूर नारोपंत जोगाबरोबर सांगून पाठविला त्याचें उत्तर आलें म्हणजे मोहोळकडे वगैरे जागीं स्वार आहेत त्यांस पत्रें पाठवून आणून ठेवून पाठवितों म्हणोन लिहिलें, त्यास येविशींचा मजकूर मशारनिल्हे पाठविला आहे त्याजबरोबर सांगोन पाठविला आहे. येथें फौजेचा जम बराच होत आहे. दररोज शेंपनास येतच आहेत. नवी दोन हजार जमली. तोंडलीं व शेंगा शेवग्याचा पाठविल्या त्या पावल्या. आतां तूर्त फौज नवी ठेवून पाठवूं नये. आपलेजवळ जमेत असेल ती एक जागां करून नदी उतरावयास ते पहातात ते पक्षीं—तयार असावी. उतरले तर प्रांताची कांहीं बाकी रहावयाची नाहीं. इकडे पाऊस अतिशय याजमुळें (लढाईचा उद्योग) कांहीं होत नाहीं. चिरंजीव आपास असेंच लिहिलें आहे. छ २ सफर बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ५ सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण शु॥ सप्तमी. गुरुवासर. प्रथम प्रहर दिवस.

नं. ४३१० श्रीगजानन. (आषाढ व० ११ – ९ जुलई.)

पै॥ छ ५ सफर अधिक श्रावण. सन तिस्सा तिसैन.

+ विज्ञापना तागायत छ० २४ मोहरम. श्रीमंत साहेबांचे भेटीस छ १७ मोहरमीं गेले. भेटीनंतर कांहीं श्रीमंतानीं विचारिलें तें सविस्तर यजमानानीं मागेंच लिहिलें. तदोतर छ० २० मोहरमीं श्रीमंतांचे नमस्कारास गेले. स्वामीनीं वाड्यांत रात्रौ भोजनास राहविलें तेव्हां एकांतीं गांठ पडली होती. घरच्या गृहच्छिद्राचा मजकूर स्वामीस अगोदरच कोणी समजाविला आहे तें न कळे. त्याजवरून साहेबानीं विचारलें कीं, तुम्हां जवळ स्वार व सरंजाम किती आहे, व चिंतामणराव स्वारीस जातात कीं नाहीं ? गेले तर बरोबर स्वार सरंजाम किती असतो ? दिनकरपंत पटवर्धन यांस चितामणरावाचे खटल्याकरितां गंगाधरराव याणीं बाहेर घातलें हें उत्तम केलें नाहीं. तेव्हां यजमान साहेबानीं विनंती केली कीं, येथें मजजवळ एक स्वार नाहीं. घोडें बसावयास नव्हतें. साहेबांचे पाय दृष्टीस पडल्यानंतर वडिलांनीं दोन घोडीं पाठविलीं. चिंतामणराव आपा ही मळ्यास अगर कृष्णेस जाऊं लागले तर एकटेच घोडेवर बसून चार माणसांनिसी जात असतात. मी येथें बहुत हलाखींत आहें अशी विनंती केली. श्रीमंतानीं तुमची मातुश्री कोठें आहे म्हणून पुसिलें. नंतर दोन अडीच वर्षें येथें साहेबांचे पायांजवळ आहे. सर्व बंदोबस्त करून देणार स्वामी समर्थ आहेत. ऐसीं भाषणें जाहलीं. मी ही यजमानांबरोबर होतों. तफावतीनें बसलों होतों. परंतु गृहकलह त्यांस विदित जाहला. हें ऐकिलें वृत्त मागेंच विनंती लिहून

+ विठ्ठलराव पांडुरंग यांचा कारकून बाळाजी गणेश जोशी यांचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र. यांत विठ्ठलराव व बाजीराव यांचें काय बोलणें झालें तें लिहिलें आहे.

पाठवावी, परंतु मार्ग चालला नाहीं. पत्र जात नव्हतें याजमुळें लिहिलें नाहीं. ऐकिलें वृत्त विदित व्हावें याजकरितां लिहिलें आहे. हें पत्र मजकडून आलें असें दुसरेस कळूं नये. सारांश येथें राहणार त्यांचा मृत्यु आहे ! श्रीनें पार पाडावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

\+ नं. ४३११ **श्रीगणपति.** (२१ जुलै.)

पै॥ छ० ७ सफर. तिस्सा तिसैन. अधिक श्रावण शु॥ ९ शनिवार.

चि॥ राजश्री बाळासाहेब यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्र छ०१ सफरीं पाठविलें तें छ०४ सफरीं पावोन सविस्तर मजकूर कळला. "चि॥ राजश्री आपानीं पांचशें स्वार ठेवून नेहमीं तेथें असावें. ज्यास्ती ठेवूं नये. व तुम्हीं ही जाजती ठेवूं नये. म्हणोन आज्ञापत्रीं लिहिलें, त्यास करवीरकरांची करस्त नदी पार व्हावयाची आहे. परंतु पार होणें दुरापास्त. न जाणो, जोरबेजोर उतरूं लागल्यास इकडील सामान पोक्त असल्याखेरीज ठकि पडणार नाहीं. याजकरितां दोन हजार फौजेचा जथ असावा. येविशीं चिरंजीवास समर्पक फौज ठेवावयाची आज्ञा यावी;" म्हणोन लिहिलें, ऐशास आम्ही येथें फौज जमा करितों यांची खर्चाची अडचण पडली ती कोठवर लिहावी ! परंतु नाइलाज, निर्वाह नाहीं. तेथेंही अडचण, पांचशें स्वार ठेवूं सांगितलें त्यासच संकट पडणार ! तेव्हां जाजतीचा निभाव कसा पडेल ? करवीरकर तूर्त पर्जन्य काळचे कृष्णा उतरतील हें तशासारखेंच आहे. तत्रापि पांचशें स्वार चिरंजीवाजवळ. याजखेरीज तुम्हांजवळ हजार स्वार जुनेच आहेत. इतके जमोन एक जागां बाहेर उतरावें म्हणजे फौजेचा जथ दिसण्यांत येईल. चि॥ राजश्री नारा-

\+ पत्रावर आम्हीं घातलेली मिति व इंग्रजी तारीख पैवस्तीची आहे.

यणराव याणीं फौजेंत बाहेर डेऱ्यांत जाऊन रहावें. उभयतां चिरंजीव बाहेर डेऱ्यांत राहिल्यानें चार लोक जमून राहतील. करवीरकरांसही समजेल. कृष्णा उतरूं पावणार नाहींत. अलीकडील खेडीं गडबडणार नाहींत. उतारानीं प्यादे ठेविलेच आहेत. तलावे कृष्णेपावेतों पाठवीत जावे. असे युक्तीनें चार दिवस घालवावे. ज्यास्ती ठेवूं नये. सातान्याचें खटपट करून उरकावें म्हटल्यास पर्जन्यामुळें कृष्णेस पाणी येऊन उतार मोडले, तेव्हां येथीलही दिवसगतीवर पडलें. खर्चाचें संकट. मोकळे येथून होऊं म्हटल्यास हें काम उरकल्याखेरीज होतां नये, असें चहूंकडून संकट. ईश्वर यांत परिणाम लावील तो लावो! मौजे हेबाळ परगणे करकंब येथील ठाणें बसाविणेंचें व म्हैसकराचें वगैरे सविस्तर लिहिलें तें कळलें. पुण्याकडील अयाप धरावर नाहीं. बेदा आहे तोच आहे. पेशजी सविस्तर लिहिलेंच आहे. राजश्री नानाही गारदौंडावर आले आहेत. पुढें गेल्याची बातमी नाहीं. वर्तमान आल्यावर कळवीन. बहुत काय लिहिणें. लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ४३१२　　　　(अधिक श्रावण शु० १०—२२जुलै)

नारो हरि करंदीकर याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० ८ सफर.—

" श्रीमन्महाराज यांची स्त्री मुरगुडकरीण भौमवारीं देवाधीन जाली. कऱ्हाडास तलावा जाऊन कोयनेच्या अंगानें शहरावर निकड करावी असा बेत जाला आहे."

नं. ४३१३　　　　(अधिक श्रावण शु० १०—२२जुलै)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ. ८ सफर.—

" लष्करचा मुक्काम काल्यांवर आहे. कालें यांत वस्ती अगदीं नाहीं. दाणा दुणा वगैरे लुटून फस्त केलें. बहुत नाश जाला. आतां

वाडे मात्र राहिले आहेत. मातबर वाडे ++णे व पेंढारकर व जोशी वगैरे यांचे दहा बारा आहेत. वरकड घरें सामान्य आहेत तीं दग्ध करावयाचा मानस आहे. कालेकर पाटील घरें जतन करावयाविशीं बोलत आहेत. परंतु थोडेबहुतावर उरकत नाहीं ! पंधरा वीस हजारांपावेतों घेणार. नाहींतर वाडे जाळून टाकणार ! आज कऱ्हाडास तलावा जाणार आहे. तूर्त आठचार दिवस मुक्काम येथेंच पडावा असें आहे. ''

नं. ४३१४　　(अधिक श्रावण शु० १०—२२जुलै)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ ८ सफर.

" लेखकाचें (नाना फडनवीस यांचें) वर्तमान व इंग्रजाकडील पत्रें (नानांस आलेलीं) सांपडल्याचें लिहिलें तें कळलें. ''

नं. ४३१५　　(अधिक श्रावण शु० १०—२२जुलै)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ०८ सफर.

"इकडील हुजऱ्या साताऱ्यास तेथील फौजेचा व श्री॥ राजश्री भाऊसाहेबांच्या फौजेचा अजमास पहावयास गेला होता हें अंतर्याम. बाह्यात्कारें इकडून तेथील महाराजांस पत्र होतें कीं, फौज सत्वरच रवाना होईल. असें पत्र पाठविलें होतें. त्यास हुजरे यास सातारकर महाराजानीं तिवट व शेला जैनाबादी आपल्या अंगावरचा दिला. अदमासें किंमत दोनशें अडीचशेंचा आहे.. ''

नं. ४३१६　　(अधिक श्रावण शु० १०—२२ जुलै)

नारो हरि यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० ८ सफर—

" इकडील कारकून नागोजी घाटगे याचे विद्यमानें मुंबईस पलटणें कांहीं चाकरीचीं व कांहीं कुमकेस आणावयाकरितां गेले

त्याचीं पत्रें काल भृगुवारीं आलीं. त्यांतील वर्तमान–" फरांचिसांची व इंग्रजांची लढाईची तरतूद होत आहे. खुषकीवर व ठिकाणें इंग्रजांचीं फरांचिसानें घेतलीं. व फरांचिसांचीं ठिकाणें पाण्यांतील इंग्रजांनीं घेतलीं. फरांचिसांचें सामान नवीं जहाजें तयार होत आहेत त्यांची लांबी हजार हात एक एक अशीं पंचवीस तयार होत आहेत. एका एका जहाजास तोफा पांचशें सातशें असाव्या (अशी तरतूद झाली आहे.) शिवाय सामान पहिलें आहे. व इंग्रजांचेंही सदरहू अन्वयें तयार होत आहे. जालेवर उभयतांकडील सरंजाम तयार होऊन परस्पर लढाई होणार. फरांचिसांस टिपूकडील सलामत आहे. इकडे काहीं मुंबईहून सरंजाम यावयाचा रंग तूर्त दिसत नाहीं. फरांचिसांचा इंग्रजांस पायबंद जबरदस्त बसला आहे. "

नं. ४३१७ श्री. (अधि० श्राव० शु० ११–२३ जुलै)

पै॥ छ० ९ सफर सन तिस्सातिसैन. अधिक श्रावण.

सेवेशीं विनंती सेवक अण्णाजी रामचंद्र. कृतानेक साष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत छ० ९ सफर प्रातःकाल मुकाम घोगांव स्वामीचे कृपेंकरून यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं छ० ६ सफरचीं दोन पत्रें पाठविलीं तीं काल पावलीं. महाराजांचे लष्कराचा मुकाम मौजे कालें व मौजे वाडें या दोहीं गांवचे दरम्यान आहे. तेथून तलाव्यास कऱ्हाडापर्यंत भृगुवारीं छ० ७ सफरीं गेले होते. कऱ्हाडाहून दीड हजारपर्यंत पायदळ व हजार बाराशें स्वार तयार होऊन निमजग्यापावेतों आले. तेथें गोळागोळी होऊन पांच चार असामी जायां जखमी जाहले. नंतर महाराजांची स्वारी माघारी मुक्कामास आली. कऱ्हाडची फौज शहराबाहेर निमजग्याजवळच राहिली आहे. तोफाही बाहेर काढिल्या आहेत. महाराजांकडील बोलणें " सातान्यास फौज जावयाची आहे. नांव उतान्यास देऊन पार करणें. " कऱ्हाडकरांचें बोलणें 'या मार्गें जाणें

घडावयाचें नाहीं.' याप्रमाणें वर्तमान आहे. अलीकडे दोन दिवस पर्जन्य फार लागला यास्तव फौज तलाऱ्यास निघाली नाहीं. हल्लीं पर्जन्य उघडला आहे. काय होतें पहावें. कऱ्हाड प्रांताची तमाम गांव खेड्यांनीं पेशजी खंडणी जाहली असोन प्रस्तुत लूटही करितात! कऱ्हाडकरांनीं मार्ग न दिल्यास कोयना नदीं उतरावयाचा सुमार दिसत नाहीं. सध्या पाणी फार आलें व कऱ्हाडचे पश्चिमेस लष्करचे मार्गावर कोळ्याचें ठाणें मातबर आहे तेथें बंदोबस्ती चांगली आहे म्हणतात. व वसंतगडावरील तोफेचे गोळे कोयनेच्या उतारापर्यंत येतात म्हणून ऐकण्यांत आहे. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

नं. ४३१८ श्री. (अधि० श्राव० शु० ११–२३ जुलै)

पै॥ छ० ९ सफर तिस्सा तिसैन. आधिक श्रावण शु० ९ शनिवार.

विज्ञापना. इकडील राजकी वर्तमान तरी लेखक गारदौडेहून पुण्यास आणीत होते. मौजे पाटस येथील मुक्कामास येत होते तों पठाण चार हजार बातमी कळून तिकडे जातांच फिरून दौंडेंत मशारनिल्हे यांस पलटणवाले घेऊन गेले. दशलक्ष रुपये मात्र आशा दाखवून घेतले. कोणत्या प्रकारें जाहलें तरी हिरण्यश्राद्ध मात्र करितात. सुटकेचा प्रकार ईश्वराचे स्वाधीन आहे पुणेंयांतील प्रकार म्हणावा तरी कोणाचा पायपोस कोणाचे पायीं नाहीं. श्रीमंतांचे चित्तांत सर्वांस एक करून राज्य चालावें असें आहे. परंतु कोणांत कोणी मिळत नाहीं. चि॥ राजश्री बाबा रविवारीं राजश्री दौलतराव शिंदे य.जकडे गेला. जाऊन त्यांची भेटी घेतली. बोलणें जाहलें तो मजकूर वडिलांनीं लिहिलाच आहे त्यावरून विदित होईल. सारांश दौलतराव याचा उपाय कंपूंतून बाहेर पडणें कठीण आहे हें खचीत

---

१ पत्र केसो सदाशिव काळे यांचें साताऱ्याहून परशुरामभाऊंच्या लष्करांतून.

आहे. याजउपरी सर्व गोष्टींनें इंग्रज बळावेल. इंग्रजमय होतें याप्रों थोरांचे सांगणेंत आहे. परंतु शेवटीं यश ब्राह्मणांस आहे ! राजश्री बाळोबा तात्यास आणावयास दोन हजार फौज व पत्रें शिंदे यांचीं गेलीं (हें) खचित वर्तमान आहे. बाया फौजसुद्धां पुरंदरचे पश्चिमेस आहेत. हलके मजलीनें पुलावरून वडिलांस मिळावयास येणार हें एक वर्तमान आहे. श्री गजाननाची व उभयतां बावांची आज्ञा व देवब्राह्मणांचा आशीर्वाद पूर्ण आहे. तेंव्हां सर्व मंडळ वडिलांजवळ जमा होत आहे. आपण पुण्यवान् व आपली निष्ठा श्रीचरणीं होती, तेंव्हां श्रीनें हे दिवस दाखविले ! या उपरी काळजी काडीमात्र करूं नये. वडिलांचा लोभ आपले ठायीं पूर्ववत्प्रमाणें आहे. जकार नामक म्हैसकर यास युक्तीनें हाताखालीं घालावा. अनमान न करावा. वडिलांचीही आज्ञा आहे. आळस न करावा. पांच रुपये खर्च पडला तरी चिंता नाहीं. परंतु हस्तगत करावा. सगळा कुफार तो आहे. याउपरी होईल तें वर्तमान सेवेसीं लिहीन. + +

नं. ४३१९ **श्रीगणपति.** (अधि० श्राव ० शु० ११–२३ जुलै.)

पै॥ छ० १० सफर सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

चि॥ राजश्री बाळासाहेब यांसीं प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. तुम्ही पत्रें छ० ४ सफरचीं व छ० ६ सफरचीं पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. राजश्री नारो हरीकडून बातमीचीं पत्रें पुरवण्या सात आल्या त्या पहावयास पाठविल्या त्या पावल्या. पाहिल्या. इकडे ही म॥निल्हेकडून याच मजकुराचीं पत्रें आलीं होतीं. इचलकर्जीहून पत्रें आलीं त्यांतील मजकूर लिहिला तो कळला. इकडेही पत्रें आलीं होतीं. वर्तमान कळलें. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा भिलवडीस गेलेचें लिहिलें व आलेचें लिहिलें तें कळलें.

---

१ शिंद्याच्या पलटणांवरील इंग्रज अंमलदार कर्नल ब्राऊन् वगैरे. २ उभयता बावा=शामभटबावा व चिदंबर दीक्षित.

चि॥ राजश्री हरबाअण्णा मुहूर्तें निघोन विठ्ठलतळ्यावर राहिले व चि॥ सौ॥ ठकाबाई गदगाहून आली. गरोदर आहेत. किल्यांत येऊन राहिली. व चि॥ राजश्री विठ्ठलराव बापू याचे स्त्रीस रजोदर्शन जाहल्याचें लिहिलें तें कळलें. पुण्याहून इकडेही पत्र आलें त्यांत हेंच लिहिलें होतें. ' शिंद्यांची हुकमत कंपूवर चालत नाही म्हणोन बाजारी वर्तमान येथें ऐकतों. तथ्य मिथ्या तेथें कळलेंच असेल. ल्याहावें. ' म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास हुकमत चालत नाहीं हें वर्तमान मिथ्या. राजश्री नाना फडणीस मंगळवारीं चतुर्थीस रात्रौ शिंद्याचे लष्करांत आले. बुधवारीं शिंदे भेटीस गेले. भेटी जाहल्या. खुशालीच्या तोफा जाहल्या. अद्याप बोलणें चालणें जाल्याचें वर्तमान आलें नाहीं. (नानाभोंवतीं) कंपूचा परिघ आहे. कोणी राजश्री नानाकडे जातों म्हणोन सांगतात तेव्हां परिघवाले नानांचे कानावर घालतात. नानांनीं परवानगी सांगितल्यास नानांकडे जाऊं देतात. असें वर्तमान ऐकण्यांत आहे. लिहिलें आलें नाहीं. इकडून राघोपंत गोडबोले व शागीर्दपेशाचीं माणसें कांहीं थोडीं बहुत गेलीं म्हणोन सांगतात. सत्य मिथ्या न कळे. पठाण बाया बक्षी व श्रीमंत व पुण्यांत श्री॥ राजश्री बाजीराव साहेब हे स्तब्ध आहेत. राजश्री बाळोबास[1] आणावयास पाठविलें आहे म्हणोन वाट पहातात, किंवा राजश्री नाना आले, पुढें विचारणेंत पडले, हें कांहीं समजत नाहीं. चार दिवस पत्र आलें नाहीं. काय वर्तमान येईल तें मागाहून लिहितों. छ० ९ सफर. हे आशीर्वाद.

नं. ४३२० श्री. (अधिक श्रावण शु० १२-२४ जुलै.)

पै॥ छ० ११ सफर. सन तिस्सा तिसैन.

सेवेसीं विनंती सेवक अण्णाजी रामचंद्र कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ. १० सफर मु॥ घोगांव स्वामीचे कृपेंकरून

---

१ अमृतराव.

वर्तमान यथास्थित असे; विशेष. महाराजांचे लष्करचें वर्तमान काल स्वारी कऱ्हाडावर गेली होती. तेथें गोळागाळी होत होती. आजही तोफा ऐकावयास येतात. कोणी मच्छिंद्रगडच्या तोफा म्हणतात. त्याजवरोन फिरोन बातमीस माणूस आज आठवे तासीं आतांच पाठविला. वर्तमान आलेवर सेवेशीं लिहितों. लष्करांतून माणूस आला त्यानें सांगितलें कीं श्री॥ रा॥ आपासाहेब यांची स्वारी भिलवडीस आल्याचें वर्तमान कळल्यावरून महाराजांनीं अष्टचास शंभर स्वार व दोनशें प्यादे परवां रविवारीं दोन प्रहरानंतर रवाना केले. मौजे कालें येथें थोर थोर इमारती आहेत त्या जाळावयास नारोजी निकम गेला होता. गांवकरानीं महाराजांस पंचवीस हजार रुपये कबूल केलेवरून (इमारती जाळावयाचें) मना केलें. मौजे येरोळें हा गांव साताऱ्यांचे[1] डौलाकडे आहे तेथें कही गेली होती. गांवच्या लोकांनीं धुडाविलेवरून स्वारी करून गांव लुटला ! फिरोन गांवकरांनीं साताऱ्याकडे गांव आहे असें सांगितलेवरून नागावा माघारा देविला. महाराजांची स्वारी माघारी जावयाची योजना बोलत[2] होते. कऱ्हाडचे शहास गुंतल्यामुळें राहिले असें वर्तमान सांगितलें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३२१ श्री. (अधि०श्राव०शु०१२–२४जुलै.)

पै॥ छ० १० सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

विज्ञापना. साताऱ्यास महाराजांनीं बेरड पांच सातशेंपर्यंत ठेविले आहेत. चोरीचा व दरवडयाचा उपद्रव नित्य लष्करास बहुत होतो. व मार्गासही कोरेगांवापासून अलीकडे उपद्रव होतो. कोरगांवास रास्त्यांकडील स्वार व आम्हाकडील रा॥ आपाजी दामोदर आहेत. तेथून नेहमीं चोरीनें घोडीं जात असतात. परवां रात्रीस बेर-

---

१ सातारकर महाराजांच्या संस्थानापैकीं. २ बातमीदार सांगत होते. ३ पत्र परशुरामभाऊंचें लष्कर नजीक सातारा येथून कारकुनाचें मिरजेस बाळासाहेबांस.

डांनी येऊन सिलदार पन्नासे (?) बेलदार आम्हांकडील तेथें होते त्यांजवर आले. मारामार जाहली. बेरडांचा एक मुडदा पडला. परंतु पन्नासे (?) व बेलदार थोडे, सबब दहा पांच माणूस जखमी करून आठ दहा घोडीं व उंट एक घेऊन गेले. सर्वस्वी पन्नासे व बेलदार बुडाले. बेलदारांचीं तीन घोडीं राहिलीं. याप्रमाणें काल दोन प्रहरीं वर्तमान आलें त्याजवरून शोधास जासूद पत्र देऊन पाठविला आहे. पत्र आल्यावर कोण कोण जखमी जाहले तें समजेल. हे विज्ञापना.

नं. ४३२२ श्री. (अधि० श्राव० शु० १२–२४ जुलै.)

पै॥ छ० १० सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

[1] विज्ञापना. राजश्री जिवबा अण्णा पुण्याहून येथें आले म्हणोन वर्तमान ऐकिलें, त्यास आले न आले हेंही लिहिणें-विषयीं आज्ञा, त्यास मशारनिल्हे येथें आले नाहींत व यावयाचें वर्तमानही येथें नाहीं. राजश्री नाना फडनवीस पुण्यास शिंदे यांज-जवळ आले. अद्याप चौकींत आहेत. पुढें सोडतात किंवा काय करि-तात पहावें. शिंद्यांचे बायकांचा मुक्काम पुलाचे सुमारें आला म्हण-तात. पठाण व बक्षी फौजसुद्धां विठ्ठलवाडीचे सुमारें आहेत असें बोलतात. हे विज्ञापना. आबा शेलूकर व बजाबा शिराळेकरही अलीकडे फौज ठेवांवयास लागले म्हणोन बोलतात. श्री॥ राजश्री भाऊसाहेब याणीं सविस्तर पुण्याकडील लिहिलेंच असेल. हे विज्ञापना.

नं. ४३२३ श्री. (अधि० श्राव० शु० १२–२४ जुलै.)

पै॥ छ० १० सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

सेवेशीं विज्ञापना. खर्चाविसीं बहुत संकट, लोकांचें देणें

---

[1] शिलेदार आपाजी गोविंद सखदेव याचें हें व पुढच्या नंबरचें पत्र सातान्याहून मिरजेस.

भारी, येविशीं वडिलांस विनंती करावी म्हणोन आज्ञा, त्याजवरून पुरवणी होती ती श्रीमंतांस दाखविली. व परवां येतांच दुसरे दिवशीं विनंती केली. त्यास उत्तर जहालें जे, खर्चाविषयींचा उपाय आम्हीं काय करावा ? (मिरजेस) फौज फार ठेविली. आम्हांस आजपर्यंत इतकी फौज आहे हें समजलें नव्हतें, असें बोलले. तेव्हां मीं विनंती केली कीं शिंद्यांचे उपद्रवामुळें हजार दीड हजारपर्यंत फौज नेहमीं गांवगन्ना कामगारीस होती. त्याशिवाय समीप करवीरकरांचा शिलशिला. कसा प्रसंग पडतो न कळे, व पुण्या-कडील प्रकारही गडबडीचा, याजमुळें फौज जास्ती ठेवावी लागली. पुढें उपाय काय करावा ? तेव्हां उत्तर जाहलें, तूर्त आपण मिरजेकडे येईपर्यंत पागासुद्धां तीन हजार फौज असों द्यावी. नंतर कमी ठेविली तरी (कामास) येईल. अशी आज्ञा जाहली आहे. हे विज्ञापना.

नं. ४३२४   श्रीगणपति. (अधि.श्राव.शु० १२–२४जुलै)

आशीर्वाद उपरी. "करवीरकर महाराजांनी चार मोरकरी यांस चार गांव इनाम चौघांस देऊं करून आपल्यास दगा करावया-करितां पाठविले आहेत म्हणोन वर्तमान सांगितलेवरून वडिलांस कळावयाकरितां लिहिलें आहे. सावधता असावी. निगेवानीस शहाणा कोणी योजून ठेवून बंदोबस्त असावा." येविषयीं विस्तारें लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. सावधतेस आळस नाहीं, परंतु ईश्वर रक्षणार आहे. त्यास येथें कोणते वेषें येणार, चाकरीस राहोन (कृत्य) करणार किंवा काय तऱ्हा करणार, हें बारकाईनें ज्याणें हें वर्तमान सांगितलें त्याजकडूनच कांहीं आशा दाखवून शोध करून पत्ता कसा असेल तसें तपशिलें लिहोन पाठवावें. मुळाखेरीज पत्ता लागणार नाहीं. याचा शोध जरूर करावा. इकडील वर्तमान तरी पर्जन्य फार लागला आहे. कृष्णेस पाणी. उतार नाहीं. काम खटपट चालत नाहीं.

रास्ते याणीं येथील कामाची निकड करावी तरी मागाहून श्रीमंतांचाही नेटाचा प्रकार मिळमिळीत ! इकडे एक, परभारें राजश्रींकडे निराळेंच बोलणें ! अशी बचबच. त्याजवरून करितां नये, सोडितां नये ! प्रस्तुत राजश्री नानाही आले आहेत. याजउपरी घाट काय होतो (पहावें.) असे प्रकार आहेत. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १० सफर सन तिस्ता तिसैन. अधिक श्रावण.

नं. ४३२५

श्री.

(२४ जुलै.)

पै॥ छ० १२ सफर. अधिक श्रावण मास. सन तिस्सा तिसैन.

अपत्यें केसो सदाशिव काळे सा॥ नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता॥ आधिक श्रावण शु० १२ भौमवासर तीन प्रहर दिवस पावेतों यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. पुणेंकडील वगैरे सर्व वर्तमान वडिलानीं लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. चि॥ राजश्री बाबा पुणेंयांत आहे. तेथील बारीक मोठें वर्तमान वडिलांस लिहिलें येतच असेल. लेखक आले. बहुमान शिंदे यानीं केला. वगैरे मडळी भेटी घेऊन आले. शिंदे व बाया व नाना व पिंगळे व श्रीमंत व श्रीमंत रावसाहेब व बक्षी इत्यादिकांचीं लक्षें वडिलांकडे आहेत. वडीलही फौज जमा करीत आहेत. नित्यानीं दोन तीनशें स्वार येत असतात. तसेंच पायदळही येत आहे. सध्यां फौज एकंदर सात हजार व तीन हजार पायदळ आहे. वरचेवरी येत आहे. कागदपत्र शिलेदार घेऊन जात आहेत. चारी रस्ते वहात आहेत. उभयतां बावांनीं आशीर्वाद दिला त्या प्रों घडत आहे. मुख्य गोष्ट खर्चाची मात्र वोढ आहे. जमात जमत चालली आहे. ईश्वरास चिंता आहे तोच तरतूद करील ! सदैव पत्र पाठवीत जावें. राजश्री बळवंतराव दीक्षित यांस सध्यां

बरें आहे. ज्वर निघाला आहे परंतु शक्त कमी जाहली आहे. बरे होतील. कर्नाटकांत चार हजार फौज जावी व जमखिंडी प्रांतांत चार हजार फौज जावी. दानोळी, कोथळी व दुधगांव यासुमारें चार हजार फौज रवाना व्हावी. तिनीकडील फौज पाठवावी. तिकडेच पोट भरतें. स्वामीवर खर्च पडणार नाहीं आणि लौकिक थोर. आतां वडील आले. चिंता करावी नलगे. श्रीगजाननाची कृपा पूर्ण पटवर्धनांवरी आहे. वडिलीं याप्रमाणें करावें याविशीं सरकारचीं पत्रें आपणास आलीं होतीं. सूचनाप्रकारें सेवेसीं लिहिलें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३२६ **श्रीगणपति.** (अधि. श्राव. शु. १२—२४ जुलै.)

पै॥ छ० १२ सफर. तिस्सा तिसैन. आधिक श्रावण शु॥ १४

चि॥ राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी. तुम्ही सांडणीस्वाराबरोबर व खिजमतगाराबरोबर अशीं दुकित्ता पत्रें पाठविलीं त्याचीं उत्तरें सुतरस्वाराबरोबर पाठविलींच आहेत. खिजमतगार ठेऊन घेतले होते ते हल्लीं पाठविले आहेत. इकडील सविस्तर पेशजी लिहिलेंच आहे त्यावरून कळेल. राजश्री नाना शिंद्यांजवळ आले. त्यांजकडे किरकोळ जाणार येणार, त्यास नानानीं परवानगी सांगावी त्यास जाऊं येऊं देतात. श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब द्व्यामुष आहेत. कोणीकडे अंग आयते वेळेस देतील याचा प्रकार कळतच आहे ! श्रीमंत मातुश्री बाईसाहेब[1] यांस सिंहगडास जावें (असें सांगितलें,) वाड्यांतील जवाहीरही काढिलें, असे वर्तमान ऐकतों. बाईसाहेबांचें मनांत जाण्याचें नाहीं. अशी भानगड पडली आहे. राजश्री नाना आले. राजश्री बाळोबातात्यांस आणावयास पाठविलें (आहे. तूर्त बायांची व शिंद्यांची) गोळागोळी बंद आहे. पुढें कोणत्या डौलावर येतें पहावें. आज पांच चार दिवस कागदपत्र

१ सवाई रावसाहेब यांची स्त्री यशोदाबाई.

नाहीं. आल्यावर लिहून कळवूं. छ० १० सफर बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

नं. ४३२७   (अधिक श्रावण शु० १३–२५ जुलै.)

नारो हरि याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० ११ सफर—

" मौजे येरोळें हा गांव सातारकर महाराजांकडील आहे. तेथील व येथील महाराजांचे तूर्त काळीं रहस्य, याजमुळें इंग चचे-गांव व तलबीड व कालें वगैरे पांच चार गांवचें गुळें तेथें जाऊन राहिलें होतें. कारण तेथें उपद्रव व्हावयाचा नाहीं हें समजून गेले होते. ऐशास सारी लष्करची कही जाऊन तो गांव दरोबस्त गुरांढोरांसुद्धां लुटला गेला ! गांवची खराबी बहुत जाली. बायकांचीं वस्त्रें देखील नेलीं ! तीन चार हजार पर्यंत गुरें लुटलीं. विषय लाख रुपयेपर्यंत लुटला गेला. सातान्याकडील रा॥ बापूजी महाडीक व राघोपंत इकडील फौज (साताऱ्यास) नेणेंबद्दल आले आहेत त्यांस वर्तमान कळलेवर बहुत खट्टे जाले. तेव्हां महाराजानीं गुरें वगैरे माघारीं देवावितों म्हणून समजाविसी केली व शोध करविला. तेव्हां गुरें शंभर दीडशें जमा करविलीं व कांही वाकळा व दाणे दहा मणपर्यंत व पांच चार भाले इतकें जमा झालें तें त्यांचे स्वाधीन करविलें ! वरकड कांहीं ठिकाण लागला नाहीं. अशी अवस्था जाली. "

नं. ४३२८ **श्रीगणपति.** (आधिक श्रावण व०८–५आगस्ट)

चि॥ राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसीं आशीर्वाद उपरी. पुण्याहून रास्त्यांकडील डांकेचें पत्र आज आतांच प्रातःकाळीं आलें त्यांतील वर्तमान श्रीमंतांची व राजश्री नानांची भेट बुधवारीं होणार होती. राहिली. दुसरे दिवशीं भेटीकरितां श्रीमंतांची स्वारी तयार होऊन गेली. नाना तयार जाहले. पुढें भेट व्हावी तों इतक्यांत

दुर्जनाकडील दहा पलटणें येऊन नानाचे सभोंवतीं चौकी दिली. त्यांजवळ लोहगडकरी यांचा वगैरे जमाव होता त्यांस धुडावून लावून दिलें. नंतर भेटीचें राहिलें. श्रीमंतांची स्वारी माघारी फिरून वाड्यांत आली. छ० २२ सफर. रविवार. हे आशीर्वाद.

नं. ४३२९ **श्रीगणपति.** (अधि० श्राव० शु०१५–२७ जुलै)

आशीर्वाद उपरी. पुण्याहून डांकेचीं पत्रें रास्ते यांजकडे आलीं. त्यांतील मजकूर शिंद्यानीं सखाराम घाटगे व फकीरजी गाढवे, यादो भास्कर व त्याचा बंधु असे चवघे कैद केले. गोट लुटला, घाटग्यास जखम जाहली, याजप्रमाणें शु॥ १३ बुधवारीं जाहलें म्हणोन लिहून आलें. पुढें काय घाट कारितात तो समजल्यावर लिहितों. छ० १३ सफर हे आशीर्वाद.

पै॥ छ० १५ सफर. आधिक श्रावण मास. सन तिस्सा तिसैन.

नं. ४३३० **श्रीगणपति.** (अधि० श्राव. शु० १५–२७ जुलै.)

चि॥ राजश्री बाळासाहेब यांसीं प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्रें छ० ८ सफरचीं पाठविलीं तीं छ० १२ सफरीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. चि॥ राजश्री बापू येथें गुरुवारीं चतुर्दशीस येऊन पोहोंचला. मंगळवारीं पाडळीस आला. द्वादशी ते दिवशीं. म्हणोन मुक्काम करविला. बुधवारीं त्रयोदशी वैधृत याजमुळें दोन दिवस तेथेंच मुकाम करवून काल गुरुवारीं पावला. गोमांतकी आंबे दहा रास्ते यांस व आम्हांस पंधरा पाठविले ते पावले. आमचे आम्हीं घेतले. रास्ते यांचे पावते लिहिले प्रों केले. जाब घेऊन पाठविला आहे. मिरजेकडे पर्जन्य नाहीं म्हणोन लिहिलें तें कळलें. इकडे पर्जन्य बहुत आहे. परंतु घांटाखालीं पूर्वेकडे नाहीं. इकडेच पडतो. कृष्णेस उतार नाहीं. पुण्याकडील वर्तमान ल्याहावें

---

१ डुजेन हा शिंद्याच्या पलटणांवरचा फ्रेंच अंमलदार.

म्हणोन लिहिलें, त्यास जो बैदा आहे तोच आहे. अद्याप धरावर नाहीं. श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब व पठाण बक्षी ऐसे सडे फौजेनिशीं वडगांवावर आहेत. बाया बुनगें किकवी शिवरेचेमध्यें पुरंदर डोंगर माळ जमिनीनें उतरलें आहे. शिंद्यानीं राजश्री नानांस आणोन मोकळें केलें. ते याजउपरी मनसबा काय करितात पहावें. शिंदे नाना हे एक, मध्यें श्री॥ राजश्री बाजीरावसाहेब शहरांत, व पठाण बक्षी व श्री॥ राजश्री अमृतराव हे (पश्चिमेस.) मध्यें श्रीमंत थोरले दोहींकडे नाद लावून आहेत. कोणीकडे कल देतील न कळे. राजश्री नाना आल्यापासोन श्री॥ मातुश्री बाईस वाड्यांतून काढून सिंहगडास पाठविणेंचा बेत होत आहे. आपणही शहरांत राहूं नये, बाहेर निघावें, अशीही ध्वनी निघते. परंतु अद्याप कोणतें एक ठरलें नाहीं. वरकड राजकारणें आपले आपले जागीं करीत आहेत. काय शेवटास जातील तीं पहावीं. तहकीक वर्तमान येतें. कोणीं कांहीं सांगतात. तथ्य पुरतें समजत नाहीं. छ ० १३ सफर. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० १५ सफर. तिस्सा तिसैन. अधिक श्रावण व० २ रविवार दोन घटका रात्र आवशीची.

नं. ४३३१ (अधिक श्रावण व० १–२८ जुलै.)

अण्णाजी रामचंद्र याजकडून बाळासाहेबास पत्र मिरजेस. रवाना १४ सफर—

" महाराजांचा मुक्काम काल्यानजीकच आहे. कऱ्हाडकर आपण होऊन चालोन येत नाहींत व महाराजांकडीलही स्वारी कऱ्हाडाकडे जाली नाहीं. कऱ्हाडकरांचें बोलणें लागलें आहे असें बोलतात. मलकार्जुनाच्या डोंगरावर किल्ला बांधावयाचा कारखाना सुरू जाला आहे. आसपासच्या गांवांत बिगाऱ्यांबद्दल रोखे जाले आहेत. "

१ हा मिरजकरांचा कारकून.

नं ४३३२ (अधिक श्रावण व० २–२९ जुलै.)

नारो हरि याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ. १५ सफर—

" श्रीमंत महाराज यांची स्वारी अष्ट्याहून येते समयीं गोठखिंडीनजीक डोंगरावर मलकार्जुन देव आहे तेथें स्वारी देवदर्शनास गेली. देवदर्शन होऊन डोंगर अवलोकन जालेनंतर त्या स्थळीं किल्ला बांधावा हा मनसबा सिद्ध जाला. नांव विलासगड योजिलें. निश्चयांत येऊन ते दिवशीं मुक्काम काल्यास जाला. किल्ला हुजूर रहावा, (असें ठरून) वहिवाट रा॥ हणमंतपंत नि॥ हिंमतबहाद्दर यांजकडे व नारोजी निकम या उभयतांकडे सांगून इमारतीच्या कारखान्यास उभयतांस नेमून पाठविलें. दोन रोज जाले. किल्याच्या कारखान्याकडे खर्चास गांव नेमून दिले त्यांची याद अलाहिदा पाठविली आहे. "

नं. ४३३३ (अधिक श्रावण व० २–२९ जुलै.)

अण्णाजी रामचंद्र याचें बाळासाहेबांस पत्र मिरजेस. रवाना छ० १५ सफर—

" इकडील फौज कोयनापार होणार. पैलतीरास साताऱ्याकडील जमाव यावा असा करार होता, त्यास हल्लीं साताऱ्याकडील जमाव दोनशें स्वार व पांचशें पायदळ कोयनातीरीं आलें म्हणून सातारकरांकडील कारकून येथें आहे त्यानें वर्तमान सांगितलें. त्यावरून इकडील जासूद बातमीस गेले आहेत. किती जमाव आहे हें जासूद आलेवर कळलेनंतर सेवेशीं लिहीन. नाना फडणिसांकडून मिरजेस कारकून आला आहे असें येथें बाजारी वर्तमान आहे. "

नं. ४३३४ (अधिक श्रावण व. २–२९ जुलै.)

नारो हरि करंदीकर याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० १५ सफर—

" धोंडोपंत गोखले यांच्या तहाच्या बोलण्यांत बाळंभट वष्ट व बाळ दीक्षित नरगुंदकर व काळापा नरगुंदकर होते त्यांच्या हातून जाबसाल उलगडला नाहीं. याकरितां त्यांजवर फितुराचा आरोप ठेऊन राजाज्ञा यानीं कैदेंत ठेविलें आहे. बेड्या घातल्या आहेत. "

नं. ४३३५ (अधिक श्रावण व० २–२९ जुलै.)

अण्णाजी रामचंद्र याचें बाळासाहेबांस पत्र मिरजेस. पै॥ छ० १५ सफर.–

येरोळें लुटलें गेलें तेव्हां त्या दंग्यांत सात आठ बायकांनीं नदींत उडी टाकून जीव दिले. त्या बायका कऱ्हाडास लागल्या. वस्त्रें देखील नाहींत. एका बायकोच्या खाकेंत मूल लहान होतें तें मूल तसेंच मेलेलेंसुद्धां बायको होती. हें वर्तमान कळलेवर कऱ्हाडकर श्री ॥ मातुश्री बाईसाहेबानीं अन्न देविली. बाईका ब्राह्मणांच्या होत्या. वरकड तीन चार शूद्रांच्या. काल्यांतील घरें पंधरा वीस जाळिलीं. बाकीचीं घरें राहाण्याकरितां गांवकरानीं सात हजार रुपये कबूल केले आहेत. "

नं. ४३३६ (अधिक श्रावण व ० २–२९ जुलै.)

अण्णाजी रामचंद्र याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै ॥ छ. १५ सफर—

" कऱ्हाडकरांशीं घांसावें व खंडणी घ्यावी हा यांचा मानस. त्यास कऱ्हाडकरांचाही निश्चय कीं, एक पैसा देऊं नये ! कऱ्हाडीं सामान हजार दीड हजार स्वार व पायदळ तीन हजार येणें-प्रमाणें सामान चांगलें आहे. प्रसंग पडल्यास लढाई देणार. पळोन जावें तर (मार्गांत) कृष्णा, तेव्हां मरावें पण ठाणें सोडूं नये असा निश्चय करून बसले आहेत. "

नं. ४३३७ **श्रीगणपति.** (अधि० श्राव० व० ३–३० जुलै.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं परशुराम रामचंद्र.

आशीर्वाद उपरी. काल पुण्याहून चि॥ राजश्री रामचंद्रपंत काळे यांचीं पत्रें आलीं त्यांतील मजकूर घाटगे गाढवे यादो भास्कर बंधूसह असे चौघे कैद जाले. याचे अगोदर रास्ते यांचे डांकेचे लिहिण्यांत वर्तमान आलें, त्यावरून पेशजी हें वर्तमान लिहोन पाठविलेंच आहे. हल्लीं चिरंजीवाचे लिहिण्यांतील भाव मुकेरी व जानसाहेब दोनी कंपू (व) पठाण बक्षी यांचें आदले दिवशीं बोलणें रात्रीचें गुलटेकडीवर चोरून होऊन आणा शपथा जाहल्या. दुसरे दिवशीं मुकेरीचे पहारेकऱ्यासीं गाढवे दिवटी न लावितां बाहेर जात असतां पाहरेकऱ्यानें उभा केला. गाढवे म्हणोन सांगितलें असतां जाऊं न देई. तेव्हां गाढव्यानें पहारेकऱ्यास धकावून गेला. जखम ही लागली. पहारेकरी यानें कंपूवाल्यांस जाऊन सांगितलें. तेव्हां रात्रीचे कांहीं बोलले नाहीं. दुसरे दिवशीं मुकेरीचा लेंक व जानसाहेबाचा लेंक दोन तीन पलटणें तयार करून घेऊन शिंद्याकडे गेले. आणि सांगितलें कीं, गाढवे याणें पाहरेकऱ्यास कैद मोडून जखमी केलें, त्यास पाहून घेतों, म्हणोन सांगोन चालोन गेले. गाढवा घाटगेचे गोटांत गेला. तेथें भोंवते उभे राहून उभयतांस धरिलें. घाटगे यास जखम लागली. यादो भास्कर बंधूसह आले तेही तेथेंच कैद करून मुसक्या बांधून कंपूंत आणोन ठेविले. शिंदे गडबड करून दुर्जनाचें पलटण तयार करविलें. रायाजी पाटील रामजी पाटील याणीं थोपून राखिलें. गोष्ट नासेल म्हणोन जिकडील तिकडे तयारी मोडविली. याजप्रमाणें लिहिलें आहे. बाहेर हें कृत्य राजश्री नानानीं केलें असें म्हणतात. आंत असें लिहिलें आहे. यांत काय असेल तें असो. पुढें घाट काय होतो पहावा. छ० १६ सफर. लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० १८ सफर. सन तिस्सातिसैन. अधिक श्रावण वा॥ ५ बुधवार. तृतीय प्रहर दिवस.

नं ४३३८ श्रीगणपति. (अधि० श्राव० व० ४–१ आगष्ट.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्रें छ० १३ सफरचीं पाठविलीं तीं छ० १७ सफरीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. पुण्याकडील वर्तमान लिहावें म्हणोन लिहिलें, त्यास जो बेदा आहे तोच आहे. घाटगे वगैरे कैद जाहल्याचें पेशजी लिहिलेंच आहे. पुढें बेत अमुक आहे असें अद्यापि नाहीं. करवीरकरांचे लष्करांतून नारो हरीचें पत्र आलेलें पहावयास पाठविलें तें पाहोन वर्तमान कळलें. राजश्री धोंडो अनंत यांचें दोडवाडाहून पत्र आलेलें पहावयास पाठविलें तें पाहून वर्तमान कळलें. बापूजी शिंदे पाडाव गेला, जखमी जाहला, माणूस बहुत चांगला सरकार उपयोगी होता. ईश्वरइच्छा प्रमाण ! कऱ्हाडकरांचें (करवीरकरांशीं) बोलणें होत आहे म्हणोन अण्णाजी रामचंद्र यांचे पत्रीं लिहिलें आलेलें पहावयास पाठविलें तें पाहोन वर्तमान कळलें. असें होत असल्यास प्रतिनिधींनीं आपल्या बचावाचें केलेंसें दिसतें. राजश्री राघो बाबाजी भट यांचें पत्र आलेलें पाहोन वर्तमान कळलें. तोंडलीं व कोथिंबीर पाठविलीं तीं पावली. " राजश्री नारायण आनंदराव देशपांडे प्रांत पन्हाळा यांचे मजकुराचें पत्र श्रीमंत राजश्री प्रतिनिधी यांचें आलें त्याची नक्कल करून पहावयास पाठविली आहे त्याजवरून कळेल. त्यास त्यांचें उत्तर काय द्यावयाचें ती आज्ञा व्हावी" म्हणोन लिहिलें, त्यास इतका मजकूर स्मरणांत नाहीं. परंतु सखो बळवंत देशपांडे इंगळीकर प्रस्तुत नरसोबाचे वाडींत आहेत त्यांस बोलावून आणोन कच्ची वहिवाट कागदपत्र कसे जाहले, कसें ठरलें, तें त्यांजपासून माहितगारी करून घेऊन नसें उत्तर द्यावें. छ० १८ सफर. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २१ सफर. सन तिस्सातिसैन. अधिक श्रावण वद्य अष्टमी. शनिवार. वहा तास दिवस.

नं. ४३३९　**श्रीगणपति.** (अधि० श्राव० व० ५–२ आगष्ट)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. जवळ विश्वासू लोक रात्रंदिवस असून चवकशी असावी म्हणोन व ये विषयींचा मजकूर विस्तारें लिहिला तो कळला. चवकशी व सावधता असावयाची ते आहे. मुख्य गोष्ट सर्व भार श्रीगजाननावरी. त्याचे इच्छेनुरूप घडणें तें घडावयाचें तत्रापि सावधतेस अंतर नाहीं. श्री इच्छा प्रमाण. छ० १९ सफर हे आशीर्वाद.

पै॥ छ० २२ सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

नं. ४३४०　**श्री.** (अधि० श्राव० व० ५–२ आगष्ट)

छ० २१ सफर. सन तिस्सा तिसैन. आधिक श्रावण.

अपत्यें केसो सदाशिव काळे सा॥ नमस्कार विज्ञापना येथील क्षेम तागायत छ० १९ माहे सफरपर्यंत यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिला मजकूर कळला. राजकी वर्तमान तरी घाटगा व गाढवा व यादो भास्कर बंधूसुद्धां चवघे धरले. हल्लीं काल वर्तमान विंचूरकरांचे येथें आलें त्यांत एकोणीस असामी धरली. कोण काय हा तपशील कळला नाहीं. रा॥ नाना फडणीस यांच्या भेटी काल बुधवारच्या होणार याप्रों बेत होता, परंतु श्रीमंत रावसाहेब यांचे मतें पर्वतीस व्हाव्या, यजमानांच्या मतें वाड्यांत व्हाव्या, नानांच्या मतें बाहेर डेरियांत व्हाव्या, याप्रों चिलमी खबर उठली आहे. अद्यापि नानापाशीं पलटणें आहेत. सरकारची फौज पांचशें स्वार व त्याणीं आपली खासगत रा॥ बज्याबानीं पांचशें स्वार जमा केले आहेत. कांहीं पायदळही जमा झालें आहे. परंतु हें सामान कंपूचे बाहेर आहे. पुण्यांतील गृहस्थ जमा होत आहेत.

---

१ करवीरकरानीं परशुराम भाऊंवर मारेकरी घातल्याची बोलवा होती त्या-संबंधानें हें लिहिणें.

इकडून फौज करवीर तालुक्यांत व कर्नाटकांत रवाना करावयाचा निश्चय करून श्रावण शुद्धांत श्री॥ राजश्री दाजींची[1] रवानगी करणार. समागमें लोक पांच हजार फौज दोन हजार पायदळ देणार. जशी जमा होईल तसतशी येथील बेगमी ठेवून वरचेवर रवानगी करणार याप्रों नमुदामध्यें आणिलें आहे. राज्यांत म्हणावें तरी चोहोंकडे बैदा जाहला आहे. यांत जो जमात बाळगील तो बळकट ! पैका (कोठचा असें) वडील म्हणतील तरी राज्य मोठें. जमात मोठी जाली असतां पैकाही त्यांचे कपाळानें मिळतो. मिरजेंतील बिन्हाडांत दाटण फार आहे. वडीलीं तरी स्थळ रिकामें करून दिलें म्हणोन आज्ञा केली, परंतु याप्रमाणें मजकूर आहे. जर्कानामक[2] यांस हाताखालीं सत्वर घालावा. जलदी करावी. लांबणीवर न पडावें. हे विज्ञापना.

नं. ४३४१ (अधिक श्रावण व० ५—२ आगस्ट)

अण्णाजी रामचंद्र यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ १९ सफर—

" आपाजी विठल सरूडकर यांचीं पत्रें काल इंदुवारीं पुण्याहून आलीं त्यांत वर्तमान— सखाराम घाटगे व फकीरजी गाढवे व यादो भास्कर व त्यांचे बंधु असे चार असामी कैद केले त्यासमयीं घाटगे यांस जखम लागली आहे. शिंदेही कैदेदाखल आहेत. कंपूचें व इंग्रजाकडील वकील पामरसाहेब यांचें चित्त एक आहे. श्री॥ राजश्री नानांचें साह्य करणेंविशीं मुख्य इंग्रजाचें संमत आहे, यामुळें येथील कंपूवाले व पामरसाहेब यांचें चित्त एक आहे असें लिहिलें आहे. दुसरा भाव— इंग्रजानीं आपला मतलब साधावा हा अंतर्यामींचा हेतु. शिंदे नानासुद्धां कैदेदाखल आहेत असाही भाव लिहिला आहे. महाराजानीं करवीरास जावें असेंही लिहिलें आहे. इकडील

[1] परशुरामभाऊंचे तिसरे पुत्र महादेवराव. [2] फितुरी जनोबा म्हैसकर.

फौज साताऱ्यास जावयाचा रंग दिसत नाहीं. कऱ्हाडकरांस जरब देऊन हत्ती व जरीपटका घ्यावा हा बेत जाला होता, परंतु कऱ्हाडकर यांचा नेट चांगला आहे. दीड हजारपर्यंत राऊत व तीन हजार पर्यंत पायदळ चांगलें येणेंप्रमाणें जमाव आहे व पंतही पुण्याहून निघाले व रास्ते यांजकडीलही कुमक येणार, तेव्हां कऱ्हाडकरांचें बोलणें नरमाईचें नाहीं. याणीं गुंतावें तर कऱ्हाडकर, श्री॥ राजश्री भाऊसाहेब, व रास्ते यांच्या फौजा एक होऊन तूर्त शहास गुंतावें! करवीर लांब, मध्यें नद्या दोन, असे कितेक प्रकारचे अंदेश चित्तांत आणून माघारे जावें अशी मसलत होत आहे. तूर्त शिराळ्यांस जाऊन रहावें, तेथें राहून पुढें जसा पुण्याकडील डौल पडेल तसें करावें, असें सिद्ध जालें आहे."

नं. ४३४२   (अधिक श्रावण व. ५–२ आगष्ट)

अणाजी रामचंद्र याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ० १९ सफर—

साताऱ्याचा कारकून व महाडीक यांस आजपर्यंत नाद लाविला होता. अद्यापिही नाद लाविला आहे, परंतु मिथ्या नाद हें आजपर्यंत त्यांचे निदर्शनास आलें नव्हतें. हल्ली त्यांचीही खातरजमा जाली. जावयास निरोप मागतात. परंतु हे निरोपही देत नाहींत! अद्यापिही फौज पाठवितों म्हणतच आहेत!"

नं. ४३४३   श्रीगणपति. (अधि० श्राव० व० ८–५ आगष्ट.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव व रामचंद्रपंत आपा यांसी प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. काल सप्तमी सह अष्टमी मंदवारीं प्रातःकाळीं आम्ही व रास्ते व राजश्री नरसिंग खंडेराव (विंचूरकर) कूच करून श्रीकृष्णा पार होऊन बुणगें मागें निंबखिंडीनजीक ठेवून सडे फौजेनिशीं वेण्णापार जाहलों. दोन प्रहर दिवसाचे सुमारें महाराजांकडील व आम्हांकडील फौजेचें रास्ते व

शिवाजी विठ्ठल सह तोंड लागलें. झटपट बरीच जाहली. महाराजांकडील लोक शहरापुढें तोफेचे माराबाहेर आले होते त्यांस हटवून माघारें घालविलें. झटपट जाहली त्यांत चि॥ राजश्री विठ्ठलराव यांस उजव्या डोळ्यानजीक बोटाच्या अंतरानें कानसुलास बरचीची जखम लागली आहे. खैर आहे. कांहीं चिंता नाहीं. क्षेत्रोजी शितोळे यांचा धाकटा लेंक ठार जाहला. चाळीस पन्नास घोडें तिकडील इकडे पाडाव आलें, आणखींही इकडील कांहीं जखमी जाहले आहेत. महाराजांकडीलही मोहिते व शिर्के महाडीक वगैरे जायां जखमी वीस पंचवीसपर्यंत जाहले. महाराजही किल्ल्याखालीं आपले फौजेंतच होते. अस्तमानच्या प्रहर दिवसाचे अजमासें त्यांजकडील उगेंच नादाचें बोलणें बोलावयाकरितां राजश्री विश्वनाथजी वगैरे भले माणूस चार पांच असामी आले होते. त्यांचें म्हणणें वेण्णा नदी उतरून फौजेसुद्धां जावें. प्रातःकाळीं (समेटाचें बोलणें) बोलणार पाठवितों. तें आम्ही मान्य न करितां आज रात्री सडे फौजेनिशीं तोफेच्या गोळ्याचा मारा टाकून उभे आहों. बहुत करून आज बोलणेंच बोलतील. काय होईल तें मागाहून लिहून पाठवितों. छ ० २२ सफर. रविवार प्रातःकाळ. हे आशीर्वाद.

पै॥ छ ० २५ सफर. सन तिस्सा तिसैन. आधिक श्रावण वद्य एकादशी. बुधवार दोन प्रहर दिवस.

नं. ४३४४ **श्रीगणराज.** (अधि० श्राव० व० ८—५ आगष्ट)

पै॥ छ२५ सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं. अपत्यें बाळानें व केशवानें दोनी कर जोडून शिरसाष्टांग नमस्कार. विज्ञापना तागायत छ० २२ माहे सफर मुक्काम नजीक सातारा एक कोस सडे यथास्थित असों विशेष. काल शनिवारीं दोन प्रहरीं दिवसास लढाई जाहल्याचें वर्तमान वडिलांनीं लिहिलें आहे त्याजवरून विदित

होईल. बुणग्याचा मुक्काम वेण्णा नदीपार आहे. वडील सडे व पायदळ फौजा मुक्काम मजकुरीं आहेत. आज तोफा अलीकडे आल्या. आजही पेठेवर चालोन जावें असा बेत आहे. ईश्वर यश देईल. वाडिलांचें पुण्य विशेष आहे. आमचे शरीरीं समाधान नाहीं. परंतु वडील आले म्हणोन समागमें आलों आहें. बहुत काय लिहिणें कृपा कीजे. लढाईचा प्रसंग पडला आहे. आशीर्वाद वाडिलांचा आहे तों कांहीं चिंता नाहीं. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३४५ श्रीगणपति. (अधि० श्राव० व० ८–५ आगष्ट)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांसीं परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. इकडील मजकूर सविस्तर गोपाळ अनंत यांजबरोबर सांगोन पाठविला आहे. सविस्तर सांगतील. सारांश पेशजी आम्ही मांडवगणीं होतों ते समयीं तुम्ही सुटकेची तरतूद करीत होतां. तोच[1] विचार हल्लीं जाहल्याखेरीज मोकळेपण होत नाहीं. फौज जमा केली याजमुळें मोकळें करितों अशीं बोलणीं प्रस्तुत होतात. वोढून धरावें तरी फौजेचा खर्च पडोन शेवटीं परिणाम कसा पडतो न कळे. एकदां मोकळे व्हावें हे अर्थ ध्यानांत आणून कबूल करावें लागेल. त्याची तरतूद करावी. बहुत काय लिहिणें. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २२ सफर. अधिक श्रावण. सन तिस्सा तिसैन.

नं. ४३४६ श्रीगणपति. (अधि. श्राव. व. ९–६ आगष्ट.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २० सफरपर्यंत यथास्थित असे. विशेष. आपण छ० २० सफरचे तारखेचीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. त्यांतील मजकूर बीतपशील–

---

१ पेशवे सरकारांत दहा लक्ष रुपये गुन्हेगारी भरून भाऊंची सुटका करून घ्यावी असें मागें रास्त्यांजवळ तुम्ही बोलणें घातलें होतें तोच विचार.

राजश्री नारो हरि करंदीकर यांजकडून करवीरकरांकडील बातमीचें पत्र आलें त्यांतील मजकूर लिहिला तो कळला. येविषयीं आणखी वर्तमान येईल तें लिहून कळवावें. क॥ १

सातारकरांकडून करवीरकरांकडे महाडीक वकिलीस गेल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशीयास येथें छ० २१ तारखेस सातारकरांची व आमची झटपट जाली त्यांत महाडीक यांस जखम लागली असें वर्तमान आहे. तेव्हां ते करवीरकरांकडून फिरोन साताऱ्यास आले असतीलसें वाटतें. क॥ १

कऱ्हाडकरांचे व करवीरकरांचें बोलणें लागल्याचें व करवीरकर कऱ्हाडकरांकडे मेजवानीदाखल कांहीं ऐवज मागतात येविशींचें लिहिलें तें कळलें. श्रीमंत राजश्री प्रतिनिधी कऱ्हाडास यावयास पुण्याहून निघाले असें वर्तमान आहे म्हणोन लिहिलें, त्यास इकडे कांहीं हें वर्तमान नाहीं. समजल्यानंतर लिहून पाठवूं. क॥ १

बापूजी शिंदे धारवाडकर करवीरकरांकडे पाडाव आले आहेत त्यांस मनोळीहून करवीरास आणिल्याचें लिहिलें तें कळलें. शिंदे सांपडले हें कांहीं चांगलें जाहलें नाहीं. होणारास उपाय काय ! क॥ १

धानाईचे काटर्चांची (?) जमीन कांहीं खचली म्हणोन लिहिलें तें कळलें. श्री इच्छा प्रमाण. क॥ १

साताऱ्यास लोक चाकरीस गेले त्यांचे घरीं उपद्रव जाहल्यामुळें कांहीं लोक साताऱ्याहून चाकरी सोडून आपले घरास गेल्याची बातमी आल्याचें लिहिलें तें कळलें. गेले असतील. क॥ १

मिरजेहून इकडे यावयाकरितां चि॥ राजश्री हरबा अण्णा व पांडोबा बाबा व नारायणराव विंनायक व राजश्री सदाशिव पंतें जोशी व भगवंत भिमाजी निघाल्याचें लिहिलें तें कळलें. क॥ १

बंकापुराकडे रत्नाकरपंत याचा तलावा गेला होता त्यानीं गोखले यांजकडील कही गेली होती त्यांतील तट्टें उंटें कांहीं नेल्याचें लिहिलें तें कळलें.

क॥ १

गोखले यांची व रत्नाकरपंत यांची लढाई जाहल्याचे वर्तमानाचें पत्र राजश्री बाळकृष्णपंत लागू यांचें आलें त्याची नक्कल पहावयास पाठविली ती पाहिली. वर्तमान कळलें. क॥ १

पुण्यांत घाटगे वगैरे चार असामी कैदे जाहले त्या अलीकडे कांहीं वर्तमान आलें असल्यास लिहावें म्हणून लिहिलें, त्यास अलीकडे कांहीं अधिकोत्तर वर्तमान आलें नाहीं. येईल तें लिहून पाठवितों.

क॥ १

येणेंप्रमाणें दहा कलमें लिहिलीं आहेत त्यावरून कळेल. छ० २३ सफर इंदुवार. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २४ सफर. तिस्सा तिसैन. अधिक श्रावण भौमवार आवशीची सहा घटका रात्र.

नं. ४३४७ श्री. (अधिक श्रावण व० ९–६ आगष्ट.)

पै॥ छ २४ सफर. सन तिस्सा तिसैन.

सेवेशीं विनंती सेवक अण्णाजी रामचंद्र. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना. ता॥ छ० २३ सफर मु॥ घोगांव स्वामीचे कृपावलोकनें वर्तमान यथास्थित असे. विशेष. मौजे मजकूर येथील उताराचे रखवालीस पंचवीस प्यादे पाठविले आहेत म्हणोन रा॥ राघो भगवंत काळे यांचे नांवचें पत्र मोकदमास घेऊन काल तिसरे प्रहरीं सात असामी प्यादे आले आहेत. आज आणखी राहिलेले येणार म्हणतात. सरकारचें पत्र अथवा श्रीमंत रा॥ आपासाहेबांचें पत्र नाहीं. पलुसाहून आलों म्हणतात. याजवरून ठेऊन घेऊन सेवेशीं

विनंती लिहिली आहे. आज्ञा येईल त्या प्रों राहतील. महाराजांचे लष्करचा मुक्काम काल्यांनजीकच आहे. आज बातमीस माणूस पाठविला आहे. उदयीक आल्यानंतर सेवेशीं वर्तमान लिहून पाठवितों. विदित होय हे विज्ञापना.

नं. ४३४८ (श्रीगणपति. अधि० श्राव० व० ११–८ आगष्ट)

पै॥ छ० २७ सफर. तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. पुण्याहून चि॥ राजश्री विठलराव बापू यांचें पत्र आलें तें पाठविलें आहे त्याजवरून कळेल. चिरंजीवांनीं खर्चाविशीं बहुत लिहिलें आहे. पत्रावरून कळेल. रवाना छ० २५ सफर हे० आशीर्वाद.

नं. ४३४९ श्री. (अधिक श्राव० व० १२–९ आगष्ट.)

पै॥ छ० १ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण.

सेवेसीं नारो हरी करंदीकर दोनी कर जोडून शिर सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २६ सफरपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान मुक्काम लष्कर कालें येथें यथास्थित असे. विशेष. श्री॥ महाराज राजश्री छत्रपति याणीं आज्ञापत्र पाठविलें आहे, व मला समक्ष आज्ञा जाहली आहे कीं, फिरंगी लोकांकडे चापाच्या बंदुका खरेदी करणेंबद्दल मिरजेंत फिरंगी यांजकडील दोन असामी शिपाई ठेवून बंदुखा खरेदी करितील. बोहारियाचा व खरेदी करणाऱ्याचा बनाव बसोन सवदा झाल्यास बंदुकांच्या ओझ्यास हजीरबिगारी द्यावयाची आज्ञा व्हावी. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. सदरहू बंदुका खरेदी केल्या आहेत. हजीरबेगारीची आज्ञा व्हावी. हे विज्ञापना.

नं. ४३५० श्रीगणपति. (अधि० व० १२–९ आगष्ट.)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब व रामचंद्रपंत यांसीं प्रति परशुराम

रामचंद्र. आशीर्वाद उपरी. सातान्यावरी निकड करावी तरी शहर लुटलें जातें, याकरितां चार पांच दिवस वाट पाहिली. तिकडील बोलणार ही येत होते. परंतु भाग तुटावयाचें बोलणें एक ही नाहीं. दिवसगती घालविण्याचा प्रकार. आणखी आठचार दिवस इकडून लांबणीवर टाकावें तरी पर्जन्याचे दिवस. बुणगें वेण्णेच्या पलीकडे. सडी फौज अलीकडे. नदीस पाणी आलें असतां अडचण, जाणून व बोलणें ही धराचें नाहीं हें पाहून आज प्रातःकाळीं गुरुवारीं रास्तेसह पायदळसुद्धां तीन टोळ्या करून शहरावरी चालोन घेतलें. पायदळसुद्धां लोक शहरांत गेले. शहर लुटलें गेलें. ताकीदही न लुटण्याविशीं केली आहे. फौजेंत दोनचारशेंपर्यंत घोडे व चार पांच हत्ती आले. घोडें माणूस जायां जखमी दोंहींकडील जालें तें (किती हें) समजलें नाहीं. मागाहून लिहून पाठवितों. शहर लुटलें जाऊं नये म्हणून चार पांच दिवस लांबणीवर टाकिलें, परंतु होणार सोडीत नाहीं ! इकडील लोक व पायदळ शहरांतच आहे. याउपरी लुटूं नये अशी ताकीद वरचेवर करून नाकेबंदी करविली आहे. रवाना छ० २६ सफर रोज गुरुवार दोन प्रहर दिवस. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २७ सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण मास आवशीच्या घटका रात्रीस भृगुवार.

नं. ४३५१ श्रीगणपति. (अधि० श्राव० व० ११–८ आगष्ट)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २५ सफरपर्यंत यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. " करवीरकरांचा मुकाम काल्यावरच आहे. कऱ्हाडावर फिरोन स्वारी तलाव्यास जाणार अशी बातमी आहे. " म्हणोन लिहिलें ते कळलें. ऐशीयास छ० २० सफरीं भृगुवारीं करवीरकरांची स्वारी कऱ्हाडास

आली. तेथें कऱ्हाडकरांची करवीरकरांची झटपट चांगली होऊन करवीरकरांकडील माणूस जायांजखमी फार जालें त्यांतच नारायणराव घोरपडे व आनंदराव व नागोजी घाटगे व गोविंदराव मोहिते बेलवडेकर व रघोजी गायकवाड यांस जखमा लागल्या. पांढरे मंडळींपैकी पंचवीस तीस असामी जायां जखमी जाहल्या. कऱ्हाडकरांकडील दहा वीस माणूस जायां जखमी जाहलें. या प्रमाणें वर्तमान आलें. कऱ्हाडकरांनीं करवीरकरांस जरब चांगली बसविली. या उपरी काय बेत करितात पहावें. इकडील मजकूर तरी सातारकर महाराजांकडील बोलणें बोलावयाकरितां (वकील) येतात. परंतु अद्यापि कोणताही ठराव नाहीं. एकदो रोजांत दोहींतून एक ठरेल. इकडून निकड करावी तरी शहर लुटलें जातें या अंदेशामुळें युक्ती युक्तीनें बंदोबस्त जाहल्यास करावा असा विचार आहे. ईश्वर इच्छेनुरूप काय घडेल तें पहावें. मोठी गोष्ट येथें आल्यापासून पर्जन्यानें उघाडी दिली. आहे. येथें (सातारकरांचा) सरंजाम तर विशेष नाहीं. परंतु राजधानीचा जागा, शहर लुटलें जाईल, म्हणोन बोलण्याखालीं पडलें आहे. आठ चार दिवसांत येथील काय होतें तें समजेल. पुण्याकडील विशेष नाहीं. अद्यापि रा॥ नानांच्या व श्रीमंतांच्या भेटी जाहल्या नाहींत. जाहल्याचें वर्तमान आलें म्हणजे लिहितों. राजश्री गोपाळपंत पावलेच असतील. कुमक जाहली पाहिजे. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २५ सफर. सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण वद्य चतुर्दशी भृगुवार आवशीची सहा घटका रात्र.

नं. ४३५२ श्री. (अधिक श्रावण व. १३-१० आगष्ट)

छ० २७ सफर सन तिस्सा तिसैन. अधिक श्रावण.

सेवेसीं विज्ञापना. सातान्याहून महाराजांचें पत्र स्वदस्तूरचें

---

१ करवीरकरांच्या लष्करांतून नारो हरी कदंडीकर वकील याचें मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

इंदुवारीं प्रहर रात्रीस आलें त्यांत लिहिलें होतें कीं, " आपले भरंवशावर आम्ही उद्योग केला. असें असतां अद्याप (आपली) फौज येऊन पोहोचली नाहीं. त्यास हल्लीं निदानसमय आहे. येथें एक दोन रोजांत फौज येऊन पोहोंचल्यास उत्तम. नाहीं तर आपला प्राण रहात नाहीं. याउप्पर वाट पहावयाची पराकाष्ठा राहिली नाहीं." अक्षर कांहीं बोळबोध व कांहीं मोडी असा कागद होता. ऐशास येथून हल्लीं फौज जावयाचा संकेत राहिला. श्री॥ रा॥ भाऊसाहेब कृष्णापार होऊन सातार्‍यानजीक गेले तेव्हां इकडून फौज जाणें कळतच आहे ! कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३५३　　श्री. (अधिक श्रावण व. १४–११ आगष्ट.)

पै॥ छ० २८ सफर. सन तिस्सा तिसैन.

सेवेशीं विनंती सेवक अण्णाजी रामचंद्र. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २८ सफर मंदवार प्रातःकाळ मुक्काम मौजे घोगांव स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. छ. २६ सफरीं कर्‍हाडास कुमक हजारपर्यंत फौज येऊन पोहोचली. याजमुळें कर्‍हाडकरानीं खुशालीच्या तोफा केल्या. फौज रास्ते यांचे निसबतीची म्हणतात. करवीरकर महाराज याणीं काल्यावरून कूच करून माघारे वाठारावर येऊन काल मुक्काम केला. याप्रमाणें बातमी आली. सेवेशीं निवेदन व्हावयाकरितां विनंती लिहिली आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३५४　　श्री. (श्रावण शु. ४–१५ आगष्ट.)

पै॥ छ० ३ रबिलावल. सन तिस्सा तिसैन.

सेवेशीं विनंती सेवक अण्णाजी रामचंद्र कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २ रबिलावल मु॥ घोगांव स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष. करवीरकर महाराज फौज

सुद्धां कूच करून शिराळ्यास गेले. तेथून खासा स्वारी करवीरास गेली असें वर्तमान आहे. याजमुळें शिराळ्यास आज प्रातःकाळीं दोन माणसें पाठविलीं आहेत. बातमी येईल ती सेवेशीं लिहून पाठवितों. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३५५ श्रीगणपति. (श्रावण शु० ४–१५ आगष्ट)

पै॥ छ० ८ राबिलावल.

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांस प्रति परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी येथील कुशल ता॥ छ० २ राबिलावलपर्यंत यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें सांडणी स्वाराबरोबर पाठविलीं तीं पावलीं. त्यातील मजकूर———————————बितपशील. सनगें पाठविलीं तीं यादीप्रमाणें पावलीं. कलम १

पुण्यास चि॥ राजश्री विठलराव बापू यांजकडे खर्चास पाठविलें, आणखी पाठवितों, म्हणून लिहिलें तें कळलें. उत्तम आहे. कलम १

नबाबाकडील बातमी करकंबेहून आलेली तपशीलवार लिहिली ती कळली. आणखी वर्तमान येईल तें लिहून कळवावें. कलम १

" करवीरकरांचें कूच होऊन शिराळ्यानजीक एक कोसाचे तफावतीने मुक्काम आहे, " (म्हणून लिहिलें त्यास) याप्रों नारोपंत यांचेंही लिहिलें आलें होतें. कलम १

चि॥ राजश्री हरीपंतबाबा तळ्यास साताऱ्याचे पळाच्या पाठलागास गेले ते तिकडे वसंतगडाच्या सुमारें आहेत. आणखी एक दोन दिवस राहून येतील. कऱ्हाडास कुमकेस गाडद पाठविले होते, परंतु प्रयोजन नाहीसें कळल्यावरून माघारे आणिले. कलम १

साताऱ्याचे लढाईत जायांजखमी कोण कोण जाले तें ल्याहावें म्हणोन लिहिलें, त्यास पहिले लढाईंत व दुसरे मिळोन शितोळे यांचे लेकसुद्धां चार असामी ठार व वीस असामीपर्यंत जखमी याप्रों

शिलेदारांत, व गाड्यांत पंधरा वीस असामीपर्यंत जखमी व चार पांच घोडीं ठार, याप्रों इकडील, याच अन्वयें रास्ते यांजकडील व राजश्री नरसिंग खंडेराव यांजकडील मिळोन आहेत. विशेष कांहीं जायां जखमी जाले नाहींत.　　　कलम १

इकडील मजकूर तरी बुनगें वेण्णेपलीकडे होतें तें आज छ० २ रबिलावलीं अलीकडे आणवून सडी फौज सातान्याचे शहरापासून एक कोसावरी मुक्काम होता. तेथून बुनगेंसह पुढें येऊन शहरापासोन पावकोसाचे तफावतीनें मुक्काम रास्तेसह करून आहों. किल्ल्यावरील बोलणें आहे, परंतु अद्यापि कोणती एक गोष्ट ठरावांत नाहीं. आणखी किती दिवस लांबणीवर पडतें पहावें.　　　कलम १

एकूण सात कलमें लिहिलीं आहेत त्यावरून कळेल. तोफखान्याकडील लखोट्याचा जाब लखोटा आला तो पाठविला आहे. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. ४३५६　　श्रीगणपति.　(श्रावण शु० ८–१९ आगष्ट.)

पै ॥ छ ० ८ रबिलावल. तिस्सा तिसैन. श्रावण शु ॥ १० भौमवार.

चि ॥ [1] राजश्री बळवंतराव यांस आशीर्वाद उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. चि ॥ राजश्री रामचंद्रपंत आपा इकडे भेटी कारितां यावयास निघाल्याचें व राजश्री धोंडोपत गोखले यांची व करवीर-करांकडील रत्नाकरपंत यांची लढाई होऊन धोंडोपंतास जखमा लागल्याचें लिहिलें तें कळलें. बातमीचीं पत्रें आलीं त्यांच्या नकला पहावयास पाठविल्या त्या पाहिल्या. चि ॥ राजश्री हरीपंत बाबा सातान्याचीं फौज पळोन गेली त्याचे पिछापरी तला-श्यास गेले होते वसंतगडपावेतों जाऊन काल छ ० ५ रबिलावलीं मंदवारीं आले. कळावें. रवाना छ ० ६ रबिलावल. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें.

नं. ४३५७   **श्रीगणपति.** (श्रावण शु० ८—१९ आगष्ट)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रति परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी येथील कुशल तागायत छ० ६ राबिलावल पर्यंत यथास्थित असों. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. " चिरंजीव राजश्री हरीपंत बाबा तलाऱ्यास गेले आहेत. तिकडील वर्तमान लिहिलें पाहिजे, व मौजे बेबळें परगणें करकंब येथें शिंयाकडील रोखा घेऊन स्वार आले आहेत त्याविशीं लिहिलें येईल तसें करकंबेस लिहूं. पुण्याकडील अधिकोत्तर कांहीं असल्यास लिहावें. सांडणीस्वाराबरोबर ऐवज पाठविला तो पावलाच असेल. राजश्री निळोपंत पोंक्षे येथें आले " म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशास साताऱ्याचे पळाच्या पिछावरी चि॥ राजश्री हरीपंत बाबा यांस पाठविलें होतें ते वसंतगडपर्यंत गेले. पळापैकीं कांहीं घोडीं ही सांपडलीं. कांहीं पळ प्रतिनिधीकडील कोळ्यांस गेला तेथें कोळेंकरांनीं कांहीं घोडे पाडून घेतले. बहुतकरून पळाची लुटालूटच जाहली. महाराजांचे बंधु चतुरसिंग वगैरे दहा वीस असामीनिशीं कोयना पार होऊन करवीरकरांचे फौजेंत गेले असें वर्तमान आहे. तहकीक बातमी आली म्हणजे लिहून कळवितों. करवीरकर काल्याचे मुक्कामास होते तेथून कूच करून शिराळ्याचें मुक्कामास गेले. तेथून ही वारणापार होणार असेंही वर्तमान आहे. कऱ्हाडास येथून एक हजार गाडद कुमकेस पाठविले आहेत. चिरंजीव तलाऱ्यास गेले होते त्यांस येण्याविषयीं लिहिलें आहे. आज उद्यां येतील. शिंयाकडील स्वार मौजे बेबलें येथें रोखा घेऊन आल्याचा मजकूर तरी, रोखा माघारा टाकावयाचा. परंतु तेथें दबावाकरितां शेंदीडशें स्वांर करकंबेस पाहिजेत. त्याचा बेत होऊन स्वांर ठेविल्यास मग रोखा धरूं नये. माघारा टाकावा. उगाच टाकिल्यानें ते ऐकावयाचे नाहींत. स्वार जाऊन टाकिला असतां दबावानें पुढें उपद्रव लागा-

वयाचा नाहीं. पुण्याकडील जें वर्तमान आहे तेंच आहे. बैदा कांहीं मोडत नाहीं. ईश्वर इच्छानुरूप घडेल तें खरें. सांडणीस्वाराबरोबर ऐवज पाठविला तो पावला. सांडणीस्वार पुण्यास चि॥ राजश्री विठ्ठलराव बापू यांस आंगरखा व पायजमा मिरजेहून येथें आलेला देऊन पाठविले आहेत. तिकडून आले म्हणजे आपणाकडे पाठवितों. साताऱ्याचे शहरचा बंदोबस्त जाहला. शहरांत गाडदी ठेऊन नाकेबंदीनें चौक्या बसविल्या. किल्ल्यावरील बोलण्याचा शिलाशिला आहे. परंतु धराचें बोलणें बोलून एकादी गोष्ट ठरावांत लवकर आणावी हें ध्यान नाहीं. दिवसगतीवर घालावें असें चाललें आहे. असेंच करून शहरची खराबी केली. पुढें काय घडेल तें खरें. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद. पै॥ छ० ८ रबिलावल सन तिस्सा तिसैन. श्रावण शु॥ १० भौमवार. एक तास रात्र आवशीची.

नं. ४३५८ श्री. (२० आगष्ट.)

तीर्थस्वरूप राजश्री बाळासाहेब वडिलांचे सेवेशीं. अपत्यें रामचंद्र श्रीधर काळे. शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत श्रावण शु॥ ९ पावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून सुखी आहें. विशेष. आज दोन महिने वडिलांकडून आशीर्वादपत्र येऊन समाचार कळत नाहीं. सदैव आशीर्वादपत्र पाठवून सांभाळ केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तर राजश्री नाना फडणवीस यांस शिंदे यांणीं नगराहून आणिलें. मुख्य आणावयाचें कारण बाया बक्षी फौज सारी उठोन गेली, एक कंपूचे सरदार मात्र राहिले. तेव्हां नानांस आणून बक्षीचे पारिपत्य करावें आणि पैका ही मिळेल, हा मनसबा करून आणिले. येतांच दर्शनी दहा लक्ष द्यावे हा करार. येथें आले. पैक्याचा भरणा बहुतकरून केला. दहांपैकीं तीन देणें राहिले आहेत. नानानीं ही मोंगलाची फौज आणविली आहे.

बक्षीपाशीं ही पैसा नाहीं, परंतु लौकिक मोठा आहे. श्रीमंत अमृतराव साहेब त्यांस मिळून आहेत त्याजमुळें आजच बक्षीचें पारिपत्य होतें असें नाहीं. भोसले आणविले आहेत. सर्व समारंभ दसरेच्या सुमारें होईल. श्रीमंतांचें लक्ष नानांकडे आहे. मुख्य श्रीमंत ज्याचें बळ त्याचे लौकिकी नानांचें बोलणें (बाजीराव साहेबांशीं) पडतें कीं, मला शिंदे यांणीं जीवदान दिलें आहे. त्यांचे दौलतीचा बंदोबस्त करून द्यावा. आणि श्रीमंतांचा निरोप संतोषेंकरून घेऊन कोठें तरी स्नानसंध्या करून रहावें, अथवा अविराणशीस[1] जावें; अशीं प्रसिद्ध बोलणीं आहेत. मग पोटांत काय आहे समजत नाहीं ! श्रीमंत रावसाहेब यांजकडे व बक्षीकडे ही नानाचीं बोलणीं चाललीं आहेत, सर्व समजण्यांत येतात, परंतु घाट समजत नाहीं. मी नानांचे दर्शनास गेलों होतों. ती॥ राजश्री भाऊसाहेबांविषयीं बहुत बोलणीं जाहलीं. भाऊसाहेबांविषयीं बहुत निखालस आहेत. दिकत नाहीं. माझी बहुत प्रकारें खातरजमा केली. याजउपरी भाऊसाहेबांचे नानांचें एक होण्यास दिकत राहिली नाहीं. वडिलांस कळावें. महिन्या दोन महिन्यांत विलक्षण घाट होईल. सविस्तर मागाहून लिहीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १२ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण.

नं. ४३५९   श्रीराम.   (२० आगष्ट.)

श्री॥ राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं—

विनंती सेवक भगवंत भिमाजी सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ श्रावण शु॥ ९ इंदुवासरपर्यंत स्वामीचे कृपेनें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींची आज्ञा घेऊन निघालों ते साताऱ्याच्या मुक्कामास सुखरूप पावलों. इकडील मजकूर तरी काल श्री॥ राजश्री आपासाहेब यांचा मुक्काम साताऱ्याहून एक कोसावर होता. आज पांच घटका दिवसास श्री॥ राजश्री बाबासाहेब व

१ अमृतरावाचें ।

दाजीसाहेबांच्या भेटी जाहल्या. नंतर राजश्री माधवराव रास्ते व चिमणाजी खंडेराव व नरसिंह खंडेराव यांच्या भेटी जाहल्या. नंतर सर्वत्र मिळोन आले. अर्ध्या वाटेस विठल शिवदेव व रास्ते आपले गोटास गेले. नंतर त्रिवर्गानीं मिळोन कचेरीच्या डेऱ्यास आले. श्री॥ राजश्री भाऊसाहेब देवपूजेच्या राहुटींत होते तितक्यांत श्री॥ राजश्री आपासाहेब आले हें वर्तमान कळून बाहेर बोवळे होऊन आले. तितक्यांत आपासाहेब कचेरीच्या डेऱ्यांतून बाहेर आले. मध्यें उभयतांच्या भेटी जाल्या. बहुत समारंभ जाला. उभयपक्षीं प्रेमाश्रु पडिल्यानंतर सर्वत्रांस विडे देऊन श्री॥ राजश्री भाऊसाहेब उठले. बैठक कचेरीच्या डेऱ्यांत जाली होती. सर्व कच्चें वर्तमान स्वामींस विदित व्हावें म्हणून विनंती लिहिली आहे. घरीं चि॥ राजश्री वेंकटराव व रघुनाथराव आहे त्यांचे संरक्षणाचा भार स्वामीस मिळाला आहे. विदित होय हे विज्ञापना.

पै ॥ छ० १५ रबिलावल. तिस्सा तिसेन. श्रावण.

नं. ४३६० श्री. (श्रावण शु० ११–२२आगष्ट.)

पै॥ छ० ९ रबिलावल. सन तिस्सा तिसेन. श्रावण.

सेवेसीं विज्ञापना. श्रीमंत राजश्री बाबासाहेब यांजबरोबर फौज चार हजार देऊन कराडचे नदीपर्यंत गेले आहेत. कराडास रास्ते यांजकडील पांचशें स्वार प्रथम गेले आहेत. हल्लीं श्री॥ राजश्री भाऊसाहेब याणीं सातशें गारदी काल रवाना केले. करवीरकर काल्याहून कूच करून बत्तीसशिराळ्यास गेले. सातान्यावर हल्ला जाहला ते दिवसीं महाराजांचे बंधु चतुरसिंग व भवानजी शिरके चार पांचशें स्वार सुद्धां पळोन गेले. करवीरकरांकडे जाणार होते. कोळ्याजवळ कोयना नदी उतरले. कोळेकरानीं कराडास सांगून पाठविलें

१ पत्र आपाजी गोविंद सखदेव याचें सातान्याहून मिरजेस बाळासाहेबांस. यावरील इंग्रजी तारीख पैवस्तीची.

त्याजवरून कराडकरानीं स्वार पाठवून झाडून स्वार येथील गेलेले दोन तीनशेंपर्यंत त्याणीं नेले. वरकड आपले आपले घरास गेले असतील. स्वांर चाकरीस महाराजांकडे होते त्यांची चौकशी रास्ते करीत आहेत. कराडकरांकडे पन्नास पावणाशें स्वांर सांपडले. वरकड जिकडे ज्यास मार्ग जाहला तिकडे निघोन गेले. चतुरसिंग व भवानजी शिरके कोळ्यांस सांपडले होते परंतु पळोन गेले. श्री॥ राजश्री बाबासाहेब पुढें गेले होते ते फौजसुद्धां काल आले. श्री॥ राजश्री रामचंद्रपंत आपाही उदयीक येथें येणार आहेत. याजउपर येथील कांहीं फौज तिकडे कृष्णापार जावयास पाठविणार आहेत. विदित होय हे विज्ञापना.

नं. ४३६१ श्रीगणपति (श्रावण शु० ११–२२ आगष्ट.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० ९ रबिलावल पर्यंत यथास्थित असों. विशेष. आपण स्वाराबरोबर पत्रें पाठविलीं होतीं त्याचीं उत्तरें पाठविलीं आहेत तीं पावलींच असतील. सांडणीस्वार चि॥ राजश्री विठलराव बापू यांचीं सणगें देऊन पुण्यास रवाना केले होते ते पोहोंचवून आले आहेत. काल मंगळवारीं दशमीस चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा आले. भेट जाहली. इकडील मजकूर तरी किल्लयावरील बोलणें बोलतात. नाद तोंडीत नाहींत व लौकर उलगड्यांतही आणीत नाहींत! दिवसगतीवर घातलें आहे. आणखी किती दिवस लांबणीवर पडतें पहावें. करवीरकरांकडील बातमी आली त्यांतील मजकूर महाराज करवीरास गेले. तोफखाना व फौज ही पार जाली. शिराळ्यांचे ठाण्याच्या रखवालीस पांढऱ्याचें पथक ठेविलें आहे असें लिहून आलें होतें. कळावें. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा तेथून निघाले. मंडळीसुद्धां येथें येऊन पावले. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै॥ छ० ११ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण शु॥ १३ भृगुवार. आवशीची सहा घटका रात्र.

नं. ४३६२ (श्रावण शु. ११–२२ आगष्ट.)

नारो हरि करंदीकर यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ ९ राबिलावल.—

" यशवंतराव घाटगे सर्जाराव व बच्याजीपंत काल इंदुवारीं वारणा उतरून पारगांवास आले त्यांबरोबर मीही आलों. महाराजांची स्वारी करवीरास काल इंदुवारीं सायंकाळीं दाखल जाली."

नं. ४३६३ श्रीगणराज. (श्रावण शु. १२–२३ आगष्ट)

पै॥ छ० २१ राबिलावल सन तिस्सा तिसैन. श्रावण. इंदुवार.

अपत्यें विठोबानें दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम तागायत छ० १० राबिलावल. यथास्थित असे. विशेष. अलीकडे वडिलांकडून पत्रें येऊन वर्तमान कळत नाहीं. इकडील वर्तमान तर हिंदुस्थानांतून लखोबा लाड वीस हजार फौजेनिसीं व एक कंपू ऐसा येतो आहे. तिकडे अंमल झाडून मातुश्री बायांचा जाहला. ऐवजाच्या हुंड्या हिंदुस्थानांतून बायांकडे खर्चास येणार. येथें कंपू आहेत यांचीं लक्षें यथास्थित नाहींत म्हणोन उभई[1] साहेब इकडे येणार ऐसी वदंता आहे. येणेंप्रमाणें बाजारी अफवा आहे. येथें दुर्जेन[2]साहेब याचा कंपू आहे त्याचें लक्ष आलिजाबहादर यांजकडे पक्केपणानेंच आहे. राजश्री नानांजवळ दोन हजार फौज व पायदळ दोन हजार याप्रमाणें जमाव आहे. सालमजकुरीं दक्षिणा राजश्री नानांनीं दिली. मशीर डेरेदाखल जाहले. करमाळ्यांचे अलीकडे दोन मजली असदअलीखां दहा हजार फौजेनिशीं आले. पिछाडीनें रावरंभा पन्नास तोफा चार पलटणें दहा पंधरा हजार

---

१ जनरल डिबाईन. हा तर यापूर्वीच दोन वर्षें हिंदुस्थानांतून फ्रान्सला गेला होता!
२ डूजेन हें फ्रेंच अंमलदाराचें नांव.

फौज घेऊन येणार. भोंसले यांजकडील विठ्ठलपंत सुभेदार दोनशें सुतरनाळा शिवाय व दहा हजार फौजेनिसीं येणार. आलिजाबहादर यांचें व बायांचें चित्त शुद्ध होऊन यथास्थित होत नाहीं अशी बाजारी अफवा आहे. कळावेंकरितां विनंती लिहिली आहे. पुढें काय होतें पहावें. आणखी मागाहून आढळेल तें सेवेशीं लिहून पाठवितों. कळावें. सेवेशीं विदित होय हे विज्ञापना.

सेवेशीं बाळाजी गणेश साष्टांग नमस्कार विज्ञापना. लोक फिरोन गडबड बोलतात. काय घडतें न कळे. हे विज्ञापना.

नं. ४३६४   (श्रावण शु. १३–२४ आगष्ट.)

अण्णाजी रामचंद्र याचें करवीरकरांचे लष्करांतून पत्र मिरजेस. रवाना छ. ११ राबिलावल.—

"धोंडोपंत गोखले यांची व राजाज्ञा यांची लढाई जाली. राजाज्ञाकडील फौज होती त्या तोंडावर (गोखल्यानीं) झाडास पेत बांधून पाजळले. त्यावरून फौजेच्या रोंख तिकडे पडला. गोखले आपण तोफा घेऊन फौजसुद्धां इकडील फौजेच्या पिछाडीस आले व तोफांची मारागिरी केली. तेव्हां राजाज्ञास गोखल्याची कवाईत समजली ! त्याजवर इकडील फौज फिरली व तोफा सुरू जाल्या. लढाई चांगलीच जाली. उभयतांकडील माणूस पांचशेंपर्यंत जायां जखमी जालें असें वर्तमान येथें आलें आहे. कधीं युद्ध जालें तें चौकशी करून मागाहून लिहितों. स्वामीकडेही वर्तमान कळलें असेल."

नं. ४३६५   श्री.   (श्रावण शु० १४–२५ आगष्ट.)

पै ॥ छ० ११ राबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण.

सेवेशीं बाळाजी महादेव भिडे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १२ रबिलावल पावेतों मु॥ सातारा येथें स्वामीचे आशीर्वादेंकरून क्षेम असे. विशेष. इकडील वर्तमान तरी

---

१ उंटावरच्या जेजाला.

साताऱ्याचे महाराजांकडील बोलणें बोलत होते. परंतु कांहींच अद्याप ठरलें नाहीं. कालपासून महाराजांच्या मातोश्रीनीं सांगोन पाठविलें कीं, चार दिवस अवकाश करावा. मी येऊन बोलोन ठराव करित्यें; म्हणोन त्यांचा निरोप आजच आला आहे. जामदारखान्याची रावटी होती ती श्रीमंत राजश्री आपासाहेबांनीं येथून माघारी नेली. तेव्हां माझी रावटी जामदारखान्यास दिली. त्यास येथें रावटी करावी तरीं पैका भारी पडणार. यास्तव रावटी अंगच्या कनाथा असाव्या, लांब नसावी, थोर असों नये, ऐशी पाठवावयास आज्ञा व्हावी. अथवा जामदारखान्यास पाठविल्यास मी आपली घेईन. राजश्री आपाजी गोविंद यांचे मुदबखास रावटी येथें खरेदी केली. तूर्त न पाठविल्यास चिंता नाहीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३६६   श्री.   (श्रावण शु० १४–२५ आगष्ट.)

पै॥ छ० १३ रविलावल सन तिस्सा तिसैन. श्रावण शु॥ १५ रविवार अस्तमान चार घटका दिवस.

सेवेसीं गणेश गोविंद. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १२ रबिलावलपावेतों वर्तमान यथास्थित असे. विशेष. काळ मल्हार व घासी सांडणीस्वार यांजबरोबर पत्रें पाठविलीं आहेत त्याजवरून सविस्तर विदित होईल. राजश्री आनंदराव लिमये पुण्यांत आहेत त्यांचें पत्र काल दोन प्रहरीं आलें त्यांतील वर्तमान पुण्यांत श्रीमंतानीं शहरांत ताकीद केली. "शहरांत कोणी राहूं नये. चार दिवसांत निघोन जावें. इतकें असोन राहिल्यास लुटले जाल." याप्रमाणें ताकीद रोज करूं लागले. तेव्हां शहरांत लोक फार गडबडले. निघोन जातात. यास्तव आनंदराव याणीं पत्र पाठविलें जे, आपलीं घोडीं तेथें लष्करांत आहेत तीं सत्वर पाठवून द्यावीं, म्हणजे आपण

१ पत्र साताऱ्याहून मिरजेस. २ खासगीवाले.

निघणार. असें पत्र आलें त्याजवरून येथें त्यांचीं घोडीं होतीं त्यांस श्रीमंतानीं पुण्यास जाण्याची आज्ञा केली. ते आजच निघोन गेले. त्याचें कारण कंपूवाले शहरावर येणार. तेव्हां श्री॥ राजश्री अमृतराव, बक्षी व पठाण हे त्यांजवर चालोन जाणार. तेव्हां शहराची बाकी राहाणार नाहीं. यास्तव श्रीमंतांनी लोकांस ताकीद केली. राजश्री नाना फडणीस यांस चौकीचा बंदोबस्त (शिंद्यानीं) विशेष केला. त्याचें कारण नबाबाकडील कांहीं फौज परांड्यास आली, कांहीं मागाहून येणार, भोंसले यांची कांहीं फौज येणार व विडास कांहीं फौज चार पांच हजार व पायदळ चार पांच हजार जमलें आहे तें लेखकाकडून कारकुनानेंच जाऊन ठेविलें, असें वर्तमान कंपूवाले यांस समजल्यावरून विशेष बंदोबस्त जाहला; असें वर्तमान पुण्याहून माणूस आला त्याचे सांगण्यांत आहे. माणूस एक दिवसांत पुण्याहून निकडीनें आला. याप्रमाणें वर्तमान ऐकिलें तें सेवेसीं लिहिलें आहे. खर्चाकारितां खिजमतगाराबरोबर विनंती लिहिली आहे. रवानगी परवां जाहलीच असेल. नसल्यास रवानगी लौकरच व्हावी. दहा हजार रुपये अवघे आले. परंतु दीड महिना जाहला. खर्चाचें तूर्त अवघड पडलें आहे. उसनवारीस देखील ऐवज जामदारखान्यांत नाहीं. यास्तव कृपा करून रवानगी लौकरच जाहली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३६७ श्रीगणपति. (श्रावण शु० १५–२६ आगष्ट.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० १३ रबिलावलपर्यंत यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. करवीरकरांकडील बातमीचीं पत्रें राजश्री महादाजीपंत दातार व नारो हरी करंदीकर यांजकडून आलेलीं पाठविलीं व मोंगलाची फौज परांड्यास आल्याचें पत्र परांड्याहून बाळाजी केशवांचे नांवें आलें तें ऐशीं

तीन पत्रें पाठविलीं. मजकूर कळला. इकडील मजकूर तरी साताऱ्याचे किल्ल्यावरून मातुश्री आईसाहेबांचा निरोप आला कीं, आम्ही किल्ल्याखालीं येतों. तेथें रास्तेसह बोलणें होऊन जाबसाल ठरावांत आणावे. त्याप्रमाणें बंदोबस्त व्हावा. त्याजवरून आठ दिवस वाट पाहिली. परंतु त्याप्रमाणें घडण्यांत येईना. उगांच नाद मात्र बोलण्याचा लावून दिवसगतीवरी घालवावें असें दिसोन आल्यावरून आमचा मुक्काम किल्ल्याचे उत्तरेस होता तेथून छ० १२ तारखेस कूच करून किल्ल्याचे ईशान्येस अर्ध कोसाचे तफावतीनें येवून राहिलों. रास्ते व इंचूरकर किल्ल्याचे पूर्वेसच आहेत. शहरांत किल्ल्यावरील लोकांचीं घरें आहेत त्यांचे दारीं चौक्या बसविल्या. लांकूड फांटें वगैरे किल्ल्यावर जाऊं नये याप्रमाणें बंदोबस्त केला. शहरांत कोणी कोणी आपले घराचे आस्थेनें होते तेही आपलाले सोईनें निघोन जाऊं लागले. याउपरी पुढें कोणता बेत ठरेल तो मागाहून लिहून पाठवूं. पुणेंही पळत आहे. काय होतें पहावें. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद. पै॥ छ २१ रबिलावल सन तिस्सां तिसैन. श्रावण.

नं. ४३६८ (श्रावण शु. १५–२६ आगष्ट.)

अण्णाजी रामचंद्र याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरेजस. पै ॥ छ ० १३ रबिलावल.—

" श्रीमन्महाराज याणीं श्रावण मासची दक्षिणा श्रीअंबेच्या देवालयीं वांटली. ब्राह्मण दीड हजारपर्यंत जाले. उत्तम प्रत पांच रुपये. तेथून चार, तीन, दोन, फारकरून एक, याप्रमाणें प्रत जाली. एकंदर अदमास शिष्टसुद्धां पांच हजार रुपये लागले. सालमजकुरींच हा सांप्रदाय नवीन घातला आहे. "

नं. ४३६९ (श्रावण शु. १५–२६ आगष्ट.)

अण्णाजी रामचंद्र याचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पे ॥ १३ रबिलावल.–

" महाराज यांणीं गरनाळ थोर आठ खंडी धातूची करून ओतविली. लांबी तीन साडेतीन हात आहे. मातबर गरनाळ थोर आहे. "

नं. ४३७० (श्रावण व० १–२७ आगष्ट.)

अण्णाजी रामचंद्र यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र.

मिरजेस. तै॥ छ० १४ रबिलावल.

" श्रीमन्महाराजांकडील फौज रुकडीनजीक पंचगंगा उतरत आहे. करवीराहून ऐलतीरींच फौज आणविली. इचलकर्जीचा रोख राहिला. कोगनोळी शिरगांव वगैरे गांवांस उपद्रव करणार. बुधवारीं वद्य तृतीयेस महाराज निघणार. मुहूर्त पाहिला आहे. "

नं. ४३७१ श्रीगणपति. (श्रावण व० ४–३० आगष्ट.)

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० १७ रबिलावल पर्यंत यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री नीळकंठ आपाजी पोंक्षे येऊन पोंचले. इचलकर्जीहून व शिरटीहून पत्रें आलेलीं पहावयास पाठविलीं तीं पावलीं. मजकूर कळला. करवीरकर महाराज इचलकर्जीच्या मसलतीस बाहेर निघतील म्हणोन लिहिलें तेंही समजलें. ऐशीयास (जवळ) फौज आहे त्या अर्थे बाहेर निघतीलच. इकडील मजकूर तरी साताऱ्याचे किल्ल्यावरील लोक उतरोन बंदोबस्त व्हावयाचा तो लवकर होईना, व वरते लोकही फार नाहींत, उगेच येथें गुंतोन रहावें हें ठीक नाहीं, याकरितां किल्ल्याचे भोंवतालच्या चौक्या ठेवाव्या आणि येथून कूच करावें, या प्रों ठरावांत आणून पांच हजार पर्यंत गाडद वगैरे पायदळ व कांहीं फौज ठेवावयाचा बेत करून चि॥ राजश्री महादाजीपंत दाजी व राजश्री हरबा[1] आपा यांचें कूच काल छ० १६ तारखेस बुधवारीं

---

[1] हरबाजी नरसिंगराव घायगुडे.

कृष्णापार रहिमतपुराकडे करविलें. ते कूच करून गेलें. आज आमचें-ही कूच व्हावयाचा बेत आहे. रहिमतपुरास ठाणें बसंविण्याविशीं चिरंजीवास सांगितलें आहे. ठाणें बसवितील. आम्ही कूच करून कृष्णापार होणार. रास्ते यांच्याही कुचाचा बेत ठरावयाचा आहे. निश्चयांत आलें म्हणजे लिहून पाठवूं. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

पै ॥ छ ० २० रबिलावल. तिस्सा तिसैन. श्रावण. रविवार. आवशीची दोन घटका रात्र.

नं. ४३७२ श्री. (श्रावण व० ६-१ सप्टेंबर.)

पै॥ छ० २१ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण. इंदुवासर.

सेवेशीं गणेश गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ० १९ रबिलावलपावेतों मुकाम महागांव नजीक माहुली कृष्णा उत्तर तीर येथें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं छ० ९ तारखेचीं पत्रें पाठविलीं तीं छ० १३ तारखेस पावलीं. "गोविंद बापूजी वारले. त्यांचा पुत्र व बायको वगैरे येथून निघाले. पुण्यास जात होते. कडेपुरचे मुकामावरोन वे॥ राजश्री बाळंभट वाटवे याणीं त्यांस धरून लष्करांत नेलें व घोडीं त्यांचीं तासगांवास आणिलीं, त्याजविशीं श्रीमंतांस पत्र पाठविलें आहे तें प्रविष्ट करून त्यांस सोडून द्यावें. आणि त्यांचें पत्र आपाजी नाईक सहस्रबुद्धे यांस घेऊन पाठवावें; म्हणजे सरकाराचा ऐवज निशा घेतलेला उगवेल" म्हणोन आज्ञा, त्यास आज्ञेप्रमाणें श्रीमंतांस पत्र होतें तें प्रविष्ट केलें. त्यावरून सोडून देण्याविषयीं आज्ञा जाहली. परंतु स्वामीचें पत्र यावयाचे पूर्वीं राजश्री चिमणाजी खंडेराव याणीं राजश्री हरबा धायगुडे यांस सांगोन श्रीमंतांस विनंती करून गोविंद बापूजी यांचे पुत्र व बायकोस व कारकून यांस आपले स्वाधीन करून घेतलें होतें, हें आम्हांस कळल्यावर श्रीमंतांस आणखी विनंती करून हरबा

धायगुडे यांची सोडचिटी घेतली. तेव्हां हरबा धायगुडे बोलले जे, तुम्ही आपले स्वाधीन करून घेऊन काय करणार ? त्यांस सांगितलें जे, आणखी कांहीं करावयाचें नाहीं. पुण्यास लावून देणार. त्यास चिमणाजी खंडेराव याणीं पेशजी याजविशीं श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांचें पत्र स्वामीस घेऊन पाठविलें होतें. त्यांजवळ असले तरी चिंता नाहीं. ते पुण्यास पाठवितील. असें बोलले. तेव्हां असें असल्यास चिंता नाहीं. परंतु गोविंद बापूजी यांचे लेकाचें पत्र अपाजी नाईकाचे नांवे आणवून यावें असें सांगितलें. त्याजवरून त्याणीं माझे नांवचें पत्र लिहून पाठविलें तेंच पत्र बजिन्नस सेवेसीं पाठविलें आहे. येथें श्रीमंतांसही पत्र दाखवलें. श्रीमंतांचे पत्राचें उत्तर घेऊन मागाहून पाठवून देतों. रहिमतपुरास ठाणें घालावयाकरितां श्री॥ राजश्री दाजीसाहेब व हरबा धायगुडे यांस रवाना केलें. काल सिरंबेर मुकाम होता. आज रहिमतपुरानजीक जातील. आम्हांसही रहिमतपुरास जाण्याची आज्ञा जाहली. परंतु आम्ही श्रीमंतांबरोबर काल कृष्णा उत्तरतीरास आलों. आमचें बुणगें पाणी फार याजमुळें पलीकडे राहिलें आहे. बुणगें आल्यानंतर जाऊं, याप्रमाणें सांगितलें. आणि काल श्रीमंतांनीं बोलावून सांगितलें जे, रहिमतपुर ठाणें घालावयाचें, त्यास ठाणें घातल्यावर राखलें पाहिजे. राखावयाचें असल्यास ठाणें घालवूं. नाहींतर ठाणें घालूं नये. असें बोलले तेव्हां मीं विनंती केली जे, ठाणें घालावें. राखावयास येईल. दोन वर्षें शिंदे यांजकडे ठाणें होतें तसें समजावें. येथील ऐवज तेथेंच खर्च जाहल्यास चिंता नाहीं. परंतु ठाणें घ्यावें. तूर्त गाडदी शंभर ठेवावे. याप्रमाणें विनंती केली. स्वामींसही पत्र याप्रमाणें पाठविणार आहेत. ठाणें बसल्यावर शंभर गाडदी व शंभर दीडशें प्यादे ठेवावे लागतील. श्री॥ राजश्री भाऊसाहेब काल कृष्णा उत्तरतीरास माहुलीजवळ संगमाजवळ उतरले.

पाणी फार याजमुळें कांहीं लष्कर उतरून आलें. कांहीं लष्कर पलीकडेच आहे. कांहीं नावेनें उतरून येतात. आमचें बुणगें वेण्णा उतरलें. कृष्णा उतरावयास माहुलीजवळ उंटास घांट चांगला नाहीं, याजमुळें दुसरे खेड्यांकडे उतरावयास गेले तों तेथें कृष्णेस पाणी आलें. याजमुळें मध्येंच काल राहिले. आज पाणी उतरल्यास येतील. श्रीमंतांचें बुणगें आलें. राहिमतपुरचें ठाणें बसलें म्हणजे श्री॥ राजश्री भाऊसाहेब लौकरच मिरजेस येणार. अमावास्येचे अगोदर स्वारी तेथें येईल असें आहे. राजश्री माधवराव रास्ते सातार्‍यानजीक आहेत. तेथील बदोबस्त करून व कांहीं फौज व पायींचे लोक ठेवून खासे माधवरावही तिकडेच येणार. किल्यावरून काल आईसाहेब खालीं आलीं. याजउपर बोलणें लौकरच उरकेल. वरचे लोक खालीं उतरल्यानंतर रास्त्यांकडील लोक वर चढावे; अशीं बोलणीं होत आहेत. आईसाहेब काल श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांचे भेटीकरितां आलीं. याजकरितां श्रीमंतांची स्वारी आज आणखी अलीकडे आईसाहेबाचे भेटीस जाणार आहेत. आज येथें मुक्काम आहे. झाडून लष्कर उतरलें म्हणजे येथून कूच होऊन सापाचे मुक्कामास जाणार. पुण्याकडील वर्तमान तूर्त विशेष नाहीं. लेखकास[1] मुकेल फिरंगी याचे लोकांची चौकी आहे. दुर्जनाकडे एकत्यारी होती ती डभईने[2] तगीरी केली. आतां एक पलटणानिशीं वरकडांप्रमाणें चाकरीवर आहे. कैद नाहीं. तगीरी जाहली म्हणोन कैद जाहली असें वर्तमान आलें होतें. विदित होय हे विज्ञापना.

नं. ४३७३ श्रीगणपति. (श्रावण व० ७–२ सपटेंबर.)

पै॥ छ० २२ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण व॥ ९ भौमवासर. अस्तमान.

---

१ नानाफडणवीस यांस. २ डभईच्या म्हणजे जनरल डिबाइनच्या जागीं मुसा पिरूचें नांव पाहिजे.

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल ता॥ छ० २० रबिलावलपर्यंत यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. "साताऱ्याचे किल्यावर रास्ते यांजकडील लोक चढले, आपलें कूच इकडील रोखें जाहलें, व पुण्यांतील लोकांस निघण्याविशीं सरकारांतून आज्ञा जाली, व कंपूची नजर एक प्रकारची जाली अशी वार्ता लोक बोलतात," म्हणोन व "करवीरकर महाराज करवीरास गेले होते ते फिरोन बाहेर निघोन कोगनोळी वगैरे गांवीं उपद्रव करण्याचें" वगैरे तिकडील बातमी व श्रावण मासची दक्षणा दिल्याचें लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशियास साताऱ्याचे किल्लयावरी रास्ते यांजकडील मुहूर्तानें एक कारकून व पांच प्यादे येणेंप्रों गेले. किल्यावरी अदमासें पंधराशेंपर्यंत माणूस आहे तें तीन रोजांत खालीं उतरावें, नंतर रास्ते यांजकडील लोक चढोन बंदोबस्त होणें तो व्हावा, याप्रों बोलण्यांत आहे. घडतां घडेल ते खरें! आम्ही परवां छ० १८ तारखेस साताऱ्याजवळून कूच करून वेण्णा व श्रीकृष्णा माहुलीचे उतारास पार होऊन उत्तर तीरास आलों. उतार मोडल्यामुळें पृथक वेण्णापार होऊन आलों. उत्तरतीरचे माहुलीनजीक मुक्काम आहे. आम्ही इकडे मुक्कामास आलों, तिकडे किल्यावरून श्री ॥ मातुश्री आईसाहेब किल्याखालीं उतरोन साताऱ्याचे शहरानजीक पोवईजवळ फोडजाईचे देवालयांत आलीं. तेथें येऊन रास्ते यांस स.गून दर्शनाकरितां आम्हांस येण्याविशीं बोलावणें पाठविलें. तेच दिवशीं जावें, परंतु अस्तमान जाहला, दोन नद्या पार होऊन जावें लागतें, यामुळें न गेलों. आईसाहेबही खालींच मुक्काम करून राहिलीं. किल्यावर गेलीं नाहींत. सबब काल प्रातःकाळींच भोजन करून माघारे सडे जाऊन दर्शन घेऊन अस्तमानचे प्रहर दिवसास फिरोन गोटास आलों. आईसाहेब किल्लयावर

गेलीं. याउपरी कराराप्रमाणें किल्ल्यावरील लोक उतरोन रास्ते यांजकडील लोक वरते घेतात किंवा आणखी दिवसगतीवरी घालतात कीं कसें, पहावें ! रास्ते व राजश्री नरसी खंडेराव आपलाले सरंजामसुद्धां शहरानजीकच मुक्काम करून आहेत. पुण्यांतील लोकांस निरोप दिल्याचें व कंपूची नजर एक प्रकारची होऊन कंपूतील दुर्जन म्हणोन सरदार होता त्यास कामांतून काढिल्याचें वगैरे पेशजी लिहिलें आहे तीं पत्रें पावलींच असतील. सारांश चहूंकडे बेदा. चि॥ राजश्री महादाजीपंत दाजी व हरबा आपा यांस अदमासें चार हजार फौज व कांहीं गाडद देऊन रहिमतपूरचे रोखें पुढें रवाना केले आहेत ते रहिमतपुरापासोन दीड कोसावरी अलीकडे मुक्काम करून आहेत. रहिमतपूरचें ठाणें बसवून चि॥ राजश्री जनार्दनपंत लागू याचे स्वाधीन करण्याविशीं सांगितलें आहे. म॥ निल्हे येथें भेटीकारितां आले होते त्यांसही चिरंजीवाबरोबर दिले आहेत. कळावें. राजश्री आपाजी गोविंदही पाठविले आहेत. सारांश ठाणें घेतल्यासारखें राहिलें पाहिजे. येविशीं चि॥ राजश्री जनार्दनपंत लागूंस ल्याहावें आणि स्वारांविशीं आपाजी गोविंद यांसींही ल्याहावें, म्हणजे बंदोबस्त राहील. नाहीं तर मागती ठाणें (हातचें) जाईल असे होऊं देऊं नये ! बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद.

नं. ४३७४ **श्रीगजानन.** (श्रावण व. ८–३ सप्तंबर.)

पै ॥ छ ० २१ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण.

दुर्जन साहेब एक कंपूचा सरदार होता त्यास मुकेल याचे लेंकानें कैद केला अशी आवाई आहे. कळावेंकारितां विनंती लिहिली आहे. विदित होय हे विज्ञापना.

---

१ बाळाजी गणेश जोशी याची चिटी पुण्याहून मिरजेस

नं. ४३७५ (श्रावण व. १३–८ सपटेंबर.)

अण्णाजी रामचंद्र याचें करवीरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ. २६ रबिलावल.—

" साताऱ्याहून महाराजांकडून शेषभट काल बुधवारीं करवीरास आले. त्यांतील कारण इकडील फौज कुमकेस यावी ती गोष्ट घडत नाहीं. तर आपण किल्यावरून निघोन हरतऱ्हा करून करवीरास येतों, असा निरोप घेऊन आले आहेत. अद्यापि येथील उत्तर काय तें जालें नाहीं. उत्तर होईल त्याचा शोध व भटजीचें नांव गांव ठिकाण लिहून पाठवितों."

नं. ४३७६ (श्रावण व. १२–७ सपटेंबर.)

अण्णाजी रामचंद्र यांचें करवीरकरांच्या लष्करांतून पत्र मिरजेस. पै॥ छ. २५ रबिलावल.

" रत्नाकरपंत राजाज्ञा यांजबरोबर फौज आहे तीपैकीं मकरंद नाईक निंबाळकर यांचें पथक तीनशें स्वारांचें खर्चास मिळत नाहीं या सबबीनें परत करवीरास आलें. राजाज्ञा यांचींही पत्रें आलीं कीं धोंडोपंत गोखले यांस बागलकोटाहून खर्चास एक लाख रुपये व पायदळ व फौजही कुमकेस आली. व सामानसुमान कमतर होतें तेंही (त्याणीं ठाण्यांत) घातलें. आतां त्यांस पहिलेपेक्षां बळ अधिक जालें. इकडे खर्चाचा गळाठा फार जाला आहे. गोखले यांच्या शहांतून फौज पार पडणें कठीण आहे. गोखले यांस अमृतरावसाहेबानीं पत्रें व हुजरे पाठविले आहेत कीं करवीरकरांचा पराभव करावा."

नं. ४३७७ **श्रीगणपति.** (श्रावण व. १३–८ सप्टेंबर.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. येथील कुशल तागायत छ० २६ रबिलावलपर्यंत

यथास्थित असे. विशेष. आपण पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला मजकूर कळला. साताऱ्यास अजमासें तीनशेंपर्यंत लोक चढले. दरवाजा इकडील लोकांचे स्वाधीन जाहला. किल्यावरी पंधराशेंपर्यंत माणूस चाकरीचें होतें त्यांपैकीं तीनचारशें माणूस व कांही किल्यावरील अधिकारी यांचे आप्तविषयी यांचीं मुलें माणसें खालीं उतरलीं. आणखी वरचेवर लोक उतरतात; काम व्हावयाचें तें होतच आहे, परंतु लांबण लागते ! पदाची[1] जागा. निकड करितां येत नाहीं. कांहीं (महाराजांची) मर्जी, कांहीं सरकार काम, असें पाहून कारभार विल्हेस लाविला पाहिजे; या बेतानें चालिलें आहे. यामुळें जे दिवस लागतील ते लागोत. बहुत करून लौकरच उलगडा पडेल. रहिमतपुरच्या ठाण्याचा मजकूर तरी ठाणें बसवून चि॥ राजश्री जनार्दनपंत लागू यांचे स्वाधीन केलें. दोनशें प्यादे रखवालीस ठेवण्याविषयीं त्यांस सांगितलें. व राजश्री आपाजी गोविंद यांस सांगून दोनशें स्वार ठेविले. आणि आपणांसही ठाणें बसविलें, परंतु रखवाली व्हावी, असें लिहिलेंच आहे. सारांश ठाण्याची रखवाली जाहली पाहिजे. पांडुरंगपंत शिंदेनिसबत होता त्यास कौलानें राजश्री हरबा आपा याणीं ठाण्यांतून बाहेर काढिला. तो मोठा हरामखोर ! त्यास सोडावयाचाच नाहीं, परंतु बचन गुंतलें, आणि बंदोबस्त तो जाहला पाहिजे, याकरितां रास्ते यांस लिहून परभारें तो कोरेगांवीं आहे त्याजकडे स्वार व गाडदी पाठवून बंदोबस्त करविला आहे. रहिमतपूरचे मुक्कामाहून चि॥ राजश्री दाजीची रवानगी पुढें राजश्री हरबा आपासुद्धां केली होती. मागाहून आम्हीं कूच करून वडी तीरमलीचे मुक्कामास येऊन फौज व गाडदसुद्धां चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांची रवानगी

---

१ छत्रपतींच्या सिंहासनाची.

मायणीचे रोखें चार दिवस चारणीकारितां केली. चिरंजीव कूच करून गेले. त्यांचे रवानगीमुळें एक दिवस मुकाम करून दुसरे दिवशीं बेलवडें येथील मुकामास आलों. आज येथून कूच करून मौजे हिंगणगांव नजीक वांगी येथील मुकामास येतों. प्रतिपदेस श्रीगणपतीचे दर्शनास तासगांवीं येऊं. चिरंजीव राजश्री बळवंतराव दीक्षित, विनोबाआबा व हरबा अण्णा, व विठ्ठलराव व चि॥ राजश्री जनोबा सुभेदार यांचे चिरंजीव गोपाळराव व आबाचे चिरंजीव नारायणराव व यशवंतराव धोंडदेव व माधवराव वासुदेव व चि॥ राजश्री बाबा[1] व बापू याप्रमाणें मंडळी समागमें आहे. करवीरचे बातमीचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन व पुण्याकडील व नबाबाकडील वर्तमान आलें तें लिहिल्यावरून सविस्तर कळलें. सारांश अद्यापि कालाचा फेरा चुकोन कोणती एक गोष्ट धरावरी बसत नाहीं ! चहूंकडे बेदाच आहे. ईश्वरइच्छेनुरूप घडेल तें प्रमाण ! आम्हांकरितां घोडी एक तयार करविली आहे म्हणोन (तुम्ही) लिहिलें, उत्तम आहे. भेटही लौकरच होऊन सविस्तर कळेल. फौज झाडून चिरंजीवांकडे लावून दिली. आम्हांबरोबर राजश्री आपाजी गोविंद व किरकोळ आम्हांकडील पांचशें होतील. तेही लाऊन द्यावयाचे. गाडदी रहिमतपुरास पाठविले म्हणोन लिहिलें तें कळलें. दोनशें स्वार आपाजीपंताकडील टेविले आहेत. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे आशीर्वाद

पै॥ छ० २६ रबिलावल. रात तास रात्र. सन तिस्सा तिसैन. श्रावणमास.

नं. ४३७८[2] श्री (श्रावण ब० १३–८ सप्टेंबर)

पै छ२६ रबिलाबल सन तिस्सा तिसैन.

सेवेशीं विज्ञापना. शाहू महाराजांचा काल प्लवंग संवत्सरीं जाहला. त्याचे अगोदर दोन वर्षें विश्वावसु संवत्सर माघ मासच्या

---

[1] हरीपंत बाबा व गणपतराव बापू हे परशुरामभाऊंचे द्वितीय व चतुर्थ पुत्र.
[2] पत्र नारो हरि करंदीकर यांचें करवीराहून मिरजेस.

करारनाम्याचें खोटें पत्र केलें. श्रावण वद्य नवमी दशमी दोन रोज पत्र राजश्री हंबीरराव चिटणीस यांचे घरीं राजश्री आबाजीराम व बच्याजी बल्लाळ व हंबीरराव त्रिवर्ग बसोन कृत्य केलें. त्यांतील शक संवत्सर व महिना तीथ वार तेरीख सन साल यथास्थित लागलें पाहिजे, तेव्हां मागील पंचांगाखेरीज ठीक कळावयाचें नाहीं. तेव्हां राजश्री जखंभटजी येरनाळकर हे आज वरीष दोन वर्षे करवीरास आहेत. येरनाळ तो महाराजानीं घेऊन फडतरे शिलेदार यास घेऊन दिल्हें. त्यास गांवाचे खटपटी करितां आबाजीराम याचे लगत्याने आहेत. त्यास त्याणीं मागील पंचांगाचा शोध पाहून शक व संवत्सर व महिना वार साधून दिला. भटजींस केवळ काल्पित कागद करितों असें सांगितलें नाहीं. जन्मकाळ मागला पहावयाचा आहे असें सांगोन भटजींकडील साधन पाहिजे होतें तें करून घेतलें. नंतर समजत समजत पत्राचा मजकूर (आम्हांस) समजला. सदरहू मजकूर भटजीनींही सांगितला. पत्रें तयार करून काल सायंकाळीं तिसरे प्रहरीं त्रिवर्ग विप्रानीं महाराजांस समजाविलें. जसें साधन पाहिजे तसें तयार जाहलें. पुढें परिणाम कसा होईल तसा होवो ! दोनही[3] पत्रांतील मजकूर ध्यानांत असावा व भाऊसाहेबांकडे ही श्रुत व्हावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. हीं साधनें रघुनाथ भट वैद्य याजबरोबर रत्नाकर अण्णाजी देऊन रवाना करीत आहेत. त्यास भटजी मजकडे एक दोन वेळ आले होते. भटजी गणपतिभक्त आहेत. श्रीमंतांच्या कल्याणप्रद दोन दोन उपोषणें, एक दिवस भोजन, याप्रों कांहीं अनुष्ठान यांचें चाललें आहे. नेहमीं याप्रमाणें करितात. यांसही मजकूर गणपतीची शफत घालून श्रुत केले. भटजीही भाऊसाहेबांची भेट घेऊन पुण्यास जाणार. कळावें हे विज्ञापना.

---

१ नारो हरि करंदीकर यांचें करवीराहून मिरजेस बाळासाहेब यांस पत्र. २ जखंभट याणीं. ३ या व मागच्या पत्रांतला.

नं ४३७९   श्री.   (श्रावण व. १३—८ सप्टें.)

पै॥ छ० २६ रबिलावल सन तिस्सा तिसैन.

+सेवेशीं विज्ञापना. कैलासवासी संभाजी महाराज पेशजी भागानगराकडे रांगण्याहून पळोन गेले. वर्ष दोन वर्षे तिकडे राहून तेथील फौज दहा हजार घेऊन करवीरास येऊन साताऱ्याकडील प्रांतांत दंगा करूं लागले. तेव्हां शाहू महाराजांस कळलें कीं, आतां यांनीं[१] बल बांधलें. तेव्हां ताराबाईनीं उभयतांची समजूत पाडिली. कृष्णेपलीकडे याणीं रहावें व अलीकडे त्याणीं[२] रहावे याप्रो। ठरविलें. येविशींचे भागानगरचेहीं फारसी कांहीं कागदपत्र आहेत तेही पारसनीसाकडून याच आधारें हिंदवी पत्र तयार केलें. असें कांहीं त्या साधनाचे उपयोगीं पडे असें पारसी करावयाचा बेत आहे. कळावें. सेवेशीं श्रुत होय हें विज्ञापना. आज पारसी कागदपत्र पाहत आहेत. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३८०   श्री.   (श्रावण व. १३–८ सप्टें.)

पै॥ छ० २६ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण.

सेवेशीं[३] विज्ञापना. राजश्री रत्नाकर अण्णाजी पुण्याहून काल्याच्या तळावर आले ते समयीं श्रीमंतांशी करार करून आले कीं, " महाराजांची स्वारी करवीरास जावी आणि पेशजीचे करार मदार असतील त्याअन्वयें (आम्ही) चालावें असें वचन श्रीमंतांचे आहे " म्हणोन म॥ निल्हेनीं सांगितलें. त्यास स्वांरी अनायासेंच माघारी आली, तेव्हां रत्नाकर अण्णाजी यांची व रघुनाथभट वैद्य यांचीं रवानगी (पुण्यास करणार.) पेशजीचे करार चिकोडी मनोळीसंबंधें राजश्री नागोपंत आपानीं करून आणिलेले ते यादी व आणखी कैलासवासी शाहूमहाराज यांचे वेळेस कैलासवासी

+ नारो हरि करंदीकर याचें पत्र करवीराहून मिरजेस बाळासाहेबांस.
१ संभाजी महाराजानीं. २ शाहूमहाराज याणीं. ३ पत्र नारो हरि करंदीकर याचें करवीराहून मिरजेस बाळासाहेबांस.

संभाजी महाराज यांचे त्यांचे करार—याणीं त्याणीं अमुक मर्यादेनें राहावें—असे काहीं संकलित बोलण्यांतील व कांहीं कागदपत्र कार्याकारण साधन होतें, त्यास करारनाम्याचे पत्रच हल्लीं नवें काल्पित कादंबरी करून शाहूमहाराजांचा काल जाहल्यापूर्वी दोन वर्षांचा कागद केला. कागदास धूर देऊन कागद जुना केला सुरळी करून टांचांस कडेनें घांसून पन्नास साठ वर्षांचा कागद दिसे असा तयार केला ! व पेशजी शाहूमहाराजाचे कागदपत्र आलेले वगैरे काढून त्या शिक्यासारखा शिक्का नवा तयार करवून करारनाम्याचें पत्र लिहिलें त्याजवर शिक्काही केला आहे. याप्रमाणें साधन करावयाचें कारण काय तर श्री॥ रा॥ नाना पूर्वींपासून कारभारांत व सर्व गोष्टींत माहितगारी त्यांची होती. ते कारभारांत नाहींत. श्रीमंत गैरमाहीत. व नानाप्रमाणें दुसरा कारभारी कोणी माहीत नाहीं. त्यापेक्षां मागील कराराप्रमाणें साधनसंपत्ति दाखवून कृष्णेअलीकडील प्रांत आपणाकडे करून घ्यावा ही मसलत चालली आहे ! त्यास आजपर्यंत कोणती गोष्ट घडली नाहीं, ती आतां घडते असा अर्थ नाहीं. परंतु साराच व्यवहार खोटा तेव्हां त्यास साधनही तसेंच करितात ! सदरहू कराराची आणखी पुरवणी आहे त्यावरून कळों येईल. हा मजकूर श्री॥ रा॥ भाऊसाहेबांकडे कळविण्याची आज्ञा व्हावी. हा मजकूर उपयोगीं पडण्याचा आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३८१ श्री. (एप्रिल स. १७९९.)

सेवेशीं विज्ञापना. मातुश्री बाई शिंदे यांजकडून राजश्री साबाजी नारायण कारकून श्रीमंत राजश्री भाऊसाहेबांकडे गेला होता. तो काल शनिवारीं बायांकडे आला. भाऊसाहेबांची

---

१ हें पत्र येथें चुकून छापलें गेलें. हें नारो हरि करंदीकर याचें पत्र करवीरकरांच्या लष्करांतून. हें इतकेंच अपूर्ण सांपडलें.

आज्ञा जे, "महाराजांकडून पैका उगवाल तितके ओढून घ्यावें. तुमची फौज बहुत जमून बेकैदी वर्तणूक करितात. पैक्याविषयींचा बेदा पडतो त्यास जो सरदार जाईन म्हणेल त्यास निरोप द्यावा. राहतों म्हणतील त्यांस ठेऊन कैदीनें वर्तणूक करीत याप्रमाणें बंदोबस्त करावा. आमचें व महाराजांचें संधान करून मिटवून द्यावयाचें संधान तुम्ही लाविलेंच आहे. मिटल्यास उत्तमच आहे. नाहीं त्यापक्षीं तुमचे फौजेची बंदोबस्ती जाहलेनंतर तुमची आमची भेटी होऊन पुढें मसलत करणें तें करावयासीं येईल. इतक्यांत आम्ही ही येथून पुढें येतों म्हणून लिहून पाठविलें आहे. येविशींच्या बंदोबस्तीविशींचे बोलणें करून मसलत ठरवून कारकून आणखी भाऊसाहेबांकडे जाणार आहे. बायांच्या लष्करांत पैक्याविषयीं दंगा होऊन नित्य धरणीं पारणीं होतात. याजकरितां कूच मुक्कामाचा घोळ पडतो. पेशजी वीस हजार देविले होते. याशिवाय रास्ते यांजकडील खंडणीच्या ऐवजीं आज पंचवीस हजार रुपयेची चिठी दिली. उदईक कूच करून ऐनापूरचे मुक्कामास बायांनी यावें, हुजूरची स्वारी मौजे हलकलच्या मुक्कामास जावें, असा बेत ठरला आहे. राजश्री पंत आपा राजाज्ञा दोन हजार फौजेनिसीं अघाडीस गेले. तालुक्यांत रोखेपत्र करून गांवकरी आणून नागवावयाचा कारभार ××××

नं. ४३८२ (श्रावण व० १४-९ सपटें.)

आपाजी हरीकडून बाळासाहेबांस पत्र रवाना छ० २७ रविलावल—

" बेरडांचा जमाव विजापूर प्रांती येऊन हलसंगी परगण्यावर स्वारी करून गुरें नेलीं. बरडोल परगण्यावर एक दोन दिवसांत स्वारी करणार."

नं. ४३८३ **श्रीगणपति.** (श्रावण व० ३०–१० सप्टेंबर)

चि॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रती परशुराम रामचंद्र. आशीर्वाद उपरी. आपण चिठी पाठविली ती पावली. भेटीस येण्याचे मुहूर्ताचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशीयास चांगल्या मुहूर्तावरी यावें. भेट होईल. आम्ही बोरमली नजीक चिंचणी येथें मुक्कामास आलों. रवाना छ० २८ रबिलावल. अस्तमान. सहा घटका दिवस. हे आशीर्वाद.

पै॥ छ० २८ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण. इंदुवार

नं. ४३८४ **श्रीगणराज.** (श्रावण व० ३०–१० सप्टेंबर)

पै॥ छ० २८ रबिलावल. सन तिस्सा तिसैन. श्रावण.

विज्ञापना. आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. वडिलांची स्वारी वांगीपलीकडील हिंगणगांवास आली. भौमवारीं तासगांवास येणार. उत्सवाचे अंतीं मिरजेस येणार म्हणोन लिहिलें तें कळलें. रवाना छ० २८ रबिलावल. विदित होय हे विज्ञापना.[1]

नं. ४३८५ **श्री.** (भाद्रपद शु ०११–२० सप्टेंबर)

पै॥ छ ० ९ रबिलाखर चार घटका रात्र. भाद्रपद. तिस्सा तिसैन

सेवेशीं विज्ञापना ता॥ छ ० ९ र॥खर पावतों वर्तमान यथास्थित असों. विशेष. आज श्री॥ राजश्री भाऊसाहेब प्रातःकाळीं साडेतीन घटका दिवसास मुहूर्तानें निघोन तासगांवचे नैऋत्य कोणास ओढ्याअलीकडे येऊन राहिले. उदैक दुसरा दिवस, यास्तव कोस दीड कोसाचें कूच होणार. कोणत्या जाग्यास जावयाचा निश्चय होईल तो मागाहून लिहून पाठवितों. खर्चाविशीं विनंती केलीच आहे. बहुतच अवघड पडलें आहे. पागेचे माणसांस हुकेरी रुपये देतों

१ रघुनाथराव कुरुंदवाडकर यांची चिठी मिरजेस. २ आपाजी गोविंद सखदेव याचें पत्र बाळासाहेबांस.

अशी स्वामीनीं आज्ञा केली म्हणोन ऐकलें, त्यास पांच सातशें रुपये हुकेरी व दहा हजारांचा ऐवज दुसरा तूर्त पाठविल्यास रबिलावल श्रावण मासचे रोजमरेचा गुंता उरकेल. पागेचे चंदीस दाणे दर रोज पांच मण उंटांवरून पाठविण्यास आज्ञा करावी. उद्यांचे चंदीस दाणे तेथून आले पाहिजेत. येथें जामदारखान्यांत ऐवज अगदीं नाहीं यास्तव हल्लीं विंनती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३८६   श्री. (भाद्रपद शु. १३—२२ सपटेंबर)

पैा छ. १९ रबिलाखर. भाद्रपद मास. सन तिसा तिसैन.

सेवेसीं बाळकृष्ण महादेव. कृतानेक साा नमस्कार विज्ञापना ताा छ. ११ रबिलाखरपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान तर श्री॥ राजश्री-पंतप्रधान व श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब व श्री॥ राजश्री आपासाहेब यांच्या व राजश्री दौलतराव शिंदे अलिजाबहाद्दर व श्री राजश्री नानाच्या भेटी भाद्र॥ शु॥ दशमीस सायकांळचे चार घटका दिवसास गुलटेंकडीनजीक श्री॥ राजश्री मोरोबादादाचे बागेंत जाहल्या. द्वादशीस नाना व शिंदे सरकारच्या वाड्यांत भोजनास आले होते. शिंदे यांच्या बायांस आणावयासीं राजश्री बजाबा शिराळेकर गेले आहेत. त्या आल्यावर भेटी होतील. बक्षी व पठाण फौजसुद्धां वाघोलीनजीक मुक्काम करून आहेत. गावगन्ना खंडणी घेतात. बायांची समजी जाहल्यावर त्यांचीही समजावीस होईल असें आहे. सेवकानें चार पत्रें विनंतीचीं पाठविलीं तीं प्रविष्ट जाहलींच असतील. एकाही पत्राचें उत्तर न आलें यास्तव चित्त उदास आहे. तर आज्ञापत्र सेवेविसीं येत असलें पाहिजे. आज्ञा येईल ते सेवकास शिरसा (वंद्य) आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

परशुरामभाऊंची शेवटची स्वारी.

पूर्वार्ध.

स. १७९८ सप्टेंबर ते स. १७९९ फेब्रुवारी अखेर.

परशुरामभाऊनीं कर्नाटकांत अनेक स्वाऱ्या केल्या त्यांचें वर्णन ऐ. ले. संग्रहांत आजपर्यंत जागोजाग आलेंच आहे. आतां त्यांच्या या शेवटच्या स्वारीचें वर्णन या प्रकरणांत द्यावयाचें, पण या स्वारींतल्या वर्णनाचा असा वास्तविक विषय थोडाच असून तो विशेष महत्वाचाही नाहीं. याचें कारण असें कीं, सरकारच्या कोणा बलिष्ठ शत्रूला जेरीस आणण्याकरितां भाऊनीं ही स्वारी केलेलीच नव्हती. आपल्या बचावासाठीं मोठी फौज पदरीं बाळगावी, आणि तिचें पोट भरण्यासाठीं मुलखांतून खंडणी उकळीत हिंडावें, यापलीकडे ही स्वारी पतकरण्यांत भाऊंचा दुसरा कोणताच उद्देश नव्हता. यामुळें जरी या प्रकरणाला आम्ही परशुरामभाऊंची शेवटची स्वारी असें नांव दिलें आहे, तरी यांत स्वारीच्या वर्णनापेक्षां तत्कालीन अनुषंगानें येणारे पुणें दरबार, शिंदे व त्यांच्या बाया, करवीरकर, वगैरेसंबंधाचे वृत्तांतच वाचकांस अधिक महत्वाचे वाटतील.

गणेशचतुर्थीच्या उत्सवाकारितां परशुरामभाऊ सप्टेंबरच्या प्रारंभीं तासगांवास आले असें मागच्या प्रकरणांत सांगितलें आहे. साताऱ्यास असतां त्यांनीं बारा तेरा हजार फौज जमविली होती ती अजून त्यांजवळ होतीच. चतुर्थीचा उत्सव होतांच त्या फौजेपैकीं सात आठ हजार स्वार, कांहीं पायदळ, व तोफा असा सरंजाम बरोबर देऊन भाऊनीं आपले ज्येष्ठ पुत्र रामचंद्रपंत आपा यांस सुरा-

पुराकडे स्वारीस पाठविलें. तेथील संस्थानिकाकडून दरसाल खंडणी यावयाची ती त्यानें तीन चार वर्षे दिली नव्हती व तो सरकारच्या मुलखांत फार आवाडाव करूं लागला होता. त्यामुळें त्याजवर जरब बसवून खंडणी वसूल करणें भाऊंस अगत्याचें झालें होतें.

रामचंद्रपंत आपांची सुरापुराकडे रवानगी झाल्यावर सपटेंबर अखेरपर्यंत भाऊ तासगांवींच होते. आणि ता० ५ अक्टोबर दिवशीं जरी त्यांनीं तासगांवाहून कूच केलें, तरी मिरजेपासून आठ दहा कोसांच्या टापूंत कवठें, गुंडेवाडी, केंपवाड वगैरे मुक्कामीं राहून त्यानीं आणखी १५ दिवस घालविले. त्यानीं अशी दिरंगाई धरण्याचें कारण त्यांची सरदारी किती संकटावस्थेंत होती हें पाहिलें असतां कळून येईल. त्यानीं साताऱ्यास एवढी महत्त्वाची कामगिरी बजावून दाखविली असतांही श्रीमंतांचा त्यांवर पूर्वीपासून रोष होता तो अजून तिळप्राय कमी झाला नव्हता. श्रीमंतांनीं भाऊंना नुसतें सोडून मात्र दिलें, परंतु सरंजामाचा सर्व मुलूख सरकारच्या जप्तींत होता तो कांहीं अद्यापि सोडिला नव्हता. भाऊंची कैदेंतून सुटका झाली ती तरी रास्त्यांनीं आपला गळा सरकारांत अडकाविला तेव्हांच झाली ! रास्ते भाऊंस हजरजामीन झाले होते. लागेल तेव्हां भाऊंस आणून हजर करूं असा त्यांनीं सरकारांत कतबा लिहून दिला होता. रास्ते जामीनकींतून मोकळे व्हावे आणि श्रीमंतांची इतराजी दूर होऊन सरंजामाचा मुलूख सुटावा, याला उपाय म्हटला तर दंडादाखल जी रक्कम श्रीमंत मागतील तिची भरपाई करणें एवढा एकच होता. परंतु गेल्या दोन तीन वर्षांत झालेल्या दुर्दशेमुळें भाऊंची सांपत्तिक स्थिति अगदींच खालावली असल्यानें ते दंड भरण्यास असमर्थ होते. गेल्या वर्षी रामचंद्रपंतआपांनीं संसारखर्च चालविण्याकरितां सोन्यारुप्याचे दागिने गहाण ठेवून सावकाराकडून अठ्ठेचाळीस हजार रुपये कर्ज काढलें होतें ती रक्कम देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें यंदां भाऊंनीं तें

सोनें रुपें विकून सावकाराची फेड केली ! या एकाच उदाहरणावरून त्यांची गृहस्थिति किती नातवानीची झाली होती हें दिसून येईल ! बरें, कुणी सावकार उभा करून श्रीमंतांनीं मागितलेला दंड यदाकदाचित् भरला, तरी दुसरें एखादें संकट आणून ते आपला नाश करणार नाहींत कशावरून ? हें भाऊंच्या मनांत भय होतेंच.

कैदेंतून सुटून नाना फडनवीस पुण्यास आले होते व दसऱ्याच्या मुहूर्तानें ते श्रीमंतांच्या राज्याचा पुन्हा कारभार करूं लागणार अशी बातमी पसरली होती. श्रीमंतांचें वर्म नाना फडनवीस ही गोष्ट प्रसिद्धच होती. श्रीमंतांच्या रोषावर उतारा म्हटला तर नानांची कृपा एवढा एकच होता. पण नानांची कृपा तरी भाऊंस प्राप्त व्हावी कशी ? कारण गेल्या तीन वर्षांत नाना भाऊंनीं एकमेकांच्या घातपातास प्रवृत्त होऊन एकमेकांविषयीं आपलीं मनें इतकीं विटवून घेतलीं होतीं कीं त्यांमध्यें पुन: स्नेहभाव उत्पन्न होणें दुरापास्तच होतें. तथापि यावेळीं असाच कांहीं योग जुळून आला कीं, जेणेंकरून भाऊ व नाना यांनीं गतगोष्टी विसरून पुन: स्नेहसंबद्ध व्हावें! हा योग कसा प्राप्त झाला हें समजण्याकरितां पुणेंदरबाराच्या स्थित्यंतराकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

जुलै महिन्यांत नाना फडनवीस नगरच्या किल्ल्यांतून सुटून शिंद्यांच्या लष्करांत आले ते दोन अडीच महिने तेथेंच होते. सुटका केल्याबद्दल दहा लक्ष रुपये रोख व पुढें निर्वेधपणें यथापूर्व राज्यकारभार करूं लागल्यावर आणखी पंधरा लक्ष रुपये शिंद्यांस नानांनीं द्यावयाचे, असा करार ठरला होता; आणि त्या करारांत शिंद्यांनीं नानांस पूर्वीचा अधिकार मिळवून देण्याची हमी पतकरिली होती. त्या कराराप्रमाणें नानांकडून शिंद्यांस दहा लक्ष रुपये पोंचले होते. आणखी पंधरा लक्ष मिळावयाचे ते नाना कारभारी झाल्याखेरीज कसे मिळणार ? त्यामुळें त्यांस कारभारी नेमण्याबद्दल शिंद्यांनीं

बाजीरावसाहेबांस सक्त तगादा बसविला. शिंद्यानीं नानांस सोडून दिलें, तेव्हां आतां त्यांच्या हातीं कारभार दिल्यावांचून सुटका नाहीं; हें जाणून बाजीरावसाहेबानीं निरुपायानें शिंद्यांच्या म्हणण्यास रुकार दिला; व कारभारी होण्याविषयीं नानांची प्रार्थना केली. पण ज्या श्रीमंतांनीं सर्जेराव घाटग्यासारख्या हलकट व क्रूर माणसाकडून नानांच्या मंडळीचा छळ व हालअपेष्टा करविल्या व त्यांपासून कोट्यवधि रुपये उकळले, व ज्या श्रीमंतानीं शिंद्यांकडून नानास कैदेंत घालवून त्यांची कोट रुपयांची नुकसानी केली, त्या श्रीमंतांची प्रार्थना किती नम्र असली तरी तिच्यावर नानांचा विश्वास कसा बसावा! त्यानीं श्रीमंतांस साफ सांगितलें कीं, तुमच्या कारभारांत पडल्यानें माझ्या अब्रूस आणि जीवितास धक्का बसणार नाहीं याबद्दल इंग्रज व निजामअल्ली जर हमीदार होतात असतील तरच आपण कारभार पतकरूं! त्या दोघांकडून अशी हमी मिळविणें श्रीमंतांच्या इभ्रतीस बट्टा आणणारें व नुकसानीचें होतें एवढेंच नव्हे, तर तें अशक्यही होतें!

ज्याला राजकीय उलाढाली करावयाच्या, तो कितीही शहाणा मुत्सद्दी असला तरी फौजेचें पाठबळ असल्याखेरीज त्याच्या निग्रहानुग्रहाला कोणी जुमानीत नसतें हें तत्व नानांस अनुभवानें चांगलेंच अवगत झालें होतें. शिंदे तर केव्हांतरी हिंदुस्थानांत जाणारच, आणि जरी ते दक्षिणेंत राहिले तरी त्यांचा भरंवसा मानतां येत नाहीं. कारभासंबधानें आपणांवर नेहमीं वेडेवांकडे प्रसंग येणार; त्या प्रसंगांचा परिहार करण्याकारितां कुणी नामांकित फौजबंद सरदार आपल्या पाठीशीं पाहिजे; हें जेव्हां नानांच्या मनांत घोळूं लागलें तेव्हांच परशुरामभाऊखेरीज तसा नामांकित फौजबंद सरदार आतां राज्यांत कोणी राहिला नाहीं ही गोष्टही त्यांस सहजच सुचली. अर्थात् भाऊंशीं कसेंही करून पुनः स्नेह जमवून घ्यावा असें त्यांस वाटूं

लागलें. भाऊंची इच्छाही तशीच होती हें पूर्वीं सांगितलेंच आहे. याप्रमाणें स्नेहाविषयीं दोघांचीही अनुकूल वृत्ति झाल्यावर स्नेह जुळण्यास कितीसा उशीर ? पूर्वीं भाऊंचें व नानांचें मनस्वी वांकडें पडून राज्यक्रांतीच्या एवढाल्या वावटळी उत्पन्न झाल्या तरी मिरजकर गंगाधरराव बाळासाहेब यानीं अजूनपर्यंत नानांच्या सख्यसंबंधाचा धागा आपल्या हातीं ठेविला होता. त्याच धाग्याचा उपयोग करून प्रथम बाळासाहेबानीं व नंतर भाऊनीं नानांशीं पत्रव्यहार सुरू केला. नानांस बाळासाहेब लिहितात—

" ती॥ राजश्री परशुरामभाऊ यांचा आपला ऋणानुबंध कोणेप्रकारें चालत आला हें सर्वांस विदित आहेच. कालपरत्वेंकरून विक्षेप आला, त्यास पूर्वींपासून वडिलांदारभ्य आमचे घरावर आपली ममता; त्यांत न व्हावयाची गोष्ट होऊन सरकारची गैरमर्जी वडिलांवर झाली. रास्ते यांचे योगेंकरून वडिलांस सातान्यानजीक आणिल्यावर फौज जमा करून सरकारकामही केलें. कृपा श्रीमंतच करितील. माझे मतें उभयपक्षीं चित्तांतील किलाफ दूर करून पूर्ववत् ममतेनें निखालसपणें आपण व वडिलीं असावें. श्रीमंतांचे पदरीं आपणासारखीं व भाऊसारखीं माणसें कोठें आहेत ? "

परशुरामभाऊंचेंही नानांस पत्र गेलें त्यांतला मजकूर पुढीलप्रमाणें—

" आपला आमचा स्नेह पूर्वीं चालत होता. मध्यें विपर्यास कित्येक गोष्टींवरून चित्तांत आला तो आम्ही सोडिला. पूर्वीं आपला आमचा स्नेह श्री॥ कै॥ माधवराव नारायण पंतप्रधान यांचे समाप्तीपर्यंत चालत आला त्याप्रमाणें चालूं. यांत अंतर होणार नाहीं. येविशीं श्रीगणपतीच्या दूर्वा दिल्या आहेत. याउपर कांहीं किंतु मनांत नसावा. मजकडूनही नाहीं. "

इतकें झाल्यावर नानानींही याच तऱ्हेनें स्नेहाविषयीं भाऊंची खातरजमा केली व उभयपक्षीं पूर्वीप्रमाणें प्रांजळपणाचा व्यवहार सुरू झाला.

श्रीमंतांच्या सद्धेतूबद्दल खात्री पटल्याखेरीज आपण कारभार पतकरीत नाहीं व तो पतकरायचा झालाच तर इंग्रज व निजामअल्ली यांची हमी आधीं मिळाली पाहिजे, वगैरे नानांचें बोलणें पूर्वी सांगितलेंच आहे. नानांचा कारभार जरी बाजीरावांस अत्यंत अप्रिय होता, तरी राज्याच्या बंदोबस्ताची जोखीम नानांकडे सोपवून आपण हिंदुस्थानांत जाणार असा शिंद्यानीं आग्रह धरिल्याबरोबर आतां नानांच्या हातापायां पडून त्यांचीं मर्जी प्रसन्न करून घेणें बाजीरावसाहेबांस भागच पडलें ! नाना जरी श्रीमंतांस झिडकारीत होते तरी त्यांचें मन हरप्रयत्नानें वळविण्याची आशा श्रीमंतानीं सोडिली नव्हती. लीनतेचें प्रदर्शन, मिष्ट भाषण, आर्जव, स्तुतिपाठ वगैरे कला बाजीरावसाहेबांस इतक्या लहान वयांतसुद्धां पूर्ण अवगत झाल्या होत्या ! त्या सर्व कलाकौशल्याचा भडिमार नानासारख्या अत्यंत अनुभवी व चाणक्ष मुत्सद्यावर करून श्रीमंतानीं आपला हेतु सिद्धीस नेला ही केवढ्या शिताफीची गोष्ट ! शिंद्यांचें लष्कर सोडून सपटेंबर महिन्यांतच नाना फडनवीस आपल्या पेठेंत वानवळ्यांच्या वाड्यांत येऊन राहिले होते. नोव्हेंबरच्या चौदाव्या तारखेस आवशीच्या अकरा घटका रात्रीस बरोबर फक्त एक शिपाई घेऊन बाजीरावसाहेब अकस्मात् वानवळ्याच्या वाड्यांत गुप्तपणें नानांच्या भेटीस गेले, आणि त्यांचे घट्ट पाय धरून व डोळ्यांत आंसवें आणून राज्य संभाळण्याविषयीं त्यांनीं त्यांची प्रार्थना केली ! बाळाजी विश्वनाथ भटाच्या वंशजानें आपली पायधरणी करून पेशवाई राज्य बुडतें तें कसेंही करून रक्षावें अशी परोपरीनें विनवणी करावी, यापेक्षां बाळाजी महादेव भानूच्या वंशजास अधिक दुर्धर संकट कोणतें वाटणार ?

श्रीमंतांच्या मागील वर्तनाचे गुणदोष न पाहतां नानानीं निमूटपणें त्यांचें म्हणणें मान्य केलें ! मात्र त्यांत थोडा पर्याय ठरविला. तो एवढाच कीं नानांच्या वतीनें नारोपंत चक्रदेव यानीं श्रीमंतांजवळ राहून राज्यकारभाराचीं कामें सांभाळावीं, आणि त्यांत नेहमीं नानाचा सल्ला घेऊन त्याप्रमाणें वागत असावें. पुढें कांहीं दिवसांनीं फडणिशीची तेरीखसुद्धां आमच्या वतीनें तुम्हींच घालीत जा असें नानानीं चक्रदेवांस सांगितलें. कारभार सुरळीत चालावा, व श्रीमंतांशीं प्रत्यक्ष संबंध तर फारसा येऊं नये, एवढ्यापुरती नानानीं योजिलेली ही तजवीज ठीकच होती.

सपटेंबरच्या प्रारंभीं बायांचा मुक्काम पुरंदरच्या आसपास होता व त्यांचे बक्षी, गवळी, पठाण, वगैरे सरदार अमृतरावासुद्धां पुण्याच्या पश्चिमेस धामधूम करीत होते, हा मजकूर मागच्या प्रकरणांत आलाच आहे. बायांचें प्रस्थ डोईजड होण्यास अमृतरावांचा आश्रय हेंच मुख्य कारण झालें होतें. सबब त्यांजकडे शिंद्यांनीं स्नेहाचें बोलणें लाविलें व त्यांस बायांच्या कटांतून फोडण्याविषयीं पेशव्याची प्रार्थना केली. त्यावरून पेशव्यानीं अमृतरावांस सात लाखांची जहागीर निराळी तोडून देण्याचें आश्वासन दिलें व त्यांची समजूत करून गणेशचतुर्थीच्या उत्सवांतच त्यांस पूर्वीप्रमाणें शनवार वाड्यांत रहावयास आणिलें.

नाना व भाऊ यांचें सख्य होण्याचें ठरल्यावर पटवर्धनांच्या वकिलानें नानांची भेट घेऊन तींत घडलेली हकीगत जशीच्या तशीच परशुरामभाऊंस लिहून कळविली आहे ती पुढें देतों. भाऊंकडून व नानांकडून परस्परांकडे वस्तु गेल्याआल्याचा यांत उल्लेख आहे त्या वस्तु म्हणजे भाऊंकडून गेलेल्या गणपतीच्या दूर्वा व नानांकडून भाऊंकडे जावयाच्या विष्णूवरच्या तुळशी होत !

" स्वामीनीं इकडे रवाना केलें. आज्ञेप्रमाणें येथें पांचवे दिवशीं छ० २० जमादिलावलीं पुण्यास आलों. तेच दिवशीं (नानांची) भेट मात्र जाली. बोलणें कांहीं एक जालें नाहीं. छ० २४ जमादिलावलीं प्रातःकाळीं गांठ पडली. दोन घटका बोलणें जालें " येथें तुम्हांजवळ सांगितल्याप्रमाणें भाऊंजवळ तुम्ही बोलल्यानंतर भाऊ काय बोलले? '' म्हणोन पुसिलें. त्यावरून सांगितलें कीं " श्री॥ राजश्री भाऊसाहेबानीं सर्व गोष्टी मान्य केल्या. आपले लक्षाखेरीज दुसरें लक्ष नाहीं. मसुदा करून दिल्याप्रमाणें (त्यानीं) खासदस्तुरचें पत्र दिलें आहे. येथून राजश्री लक्ष्मणपंत पेंडसे गेले होते त्यांजबरोबर वस्तुही दिली ती मशारनिल्हे याणीं प्रविष्ट केलीच आहे. '' "पावली" म्हणोन उत्तर जालें. " याचप्रमाणें पत्र व वस्तु मजपाशीं द्यावी '' म्हणोन बोललों. " उत्तम आहे. दिनशुद्धि चांगली पाहून देतों '' म्हणोन बोलले. त्याजवर विनंती केली कीं" शिंदे यांचे घरांतील कलह वाढला आहे याचा समेट होत आला कीं कसें काय ? श्री॥ राजश्री पंतप्रधान (यांनीं) लौकिकामध्यें जें करणें तें आपणांस पुसोन करावें असें आहे , परंतु नाभिकमळापासून भाव कसे आहेत ? राजश्री नारोपंत चक्रदेव श्रीमतांजवळ कारभार येकत्यारीनें करितात. त्यांजखेरीज कांहीएक कारभार होत नाहीं. परंतु तेही दोन चार दिवशीं येऊन आपणास सर्व विदित करून कामकाज विल्हे लावितात. त्यांचें लक्ष आपणाजवळ एकनिष्ठेनें आहे किंवा काल देश पाहून बोलणें तें बोलतात ? श्री॥ राजश्री (अमृत) रावसाहेब यांचे विचार आपणापाशीं कसे आहेत ? हें सविस्तर पुसोन उत्तर काय होईल तें लिहोन पाठविणें '' म्हणोन मला आज्ञा आहे. त्यास याचा विचार सांगितला पाहिजे. त्यावरून बोलले कीं " शिंदे यांचे कलहाचा विचार हरतऱ्हेनें मिटावा असें चित्तांत आहे आणि त्याप्रमाणें घडेल. आजपावेतों इतका अवकाश लागों नये, परंतु

आंतून नानाप्रकारचे खेळ होतात त्यावरून बोलणें लांबतें. आमचा प्रकार राजमार्गानें करणें तें करावें. त्यांत लढे कित्येक येतात. असो उपाय नाहीं ! चार दिवस अधिक उणे लागतील, परंतु बेत बसेल. राजश्री दौलतराव यांचा विचार तरी कळतच आहे ! जवळ चार माणसें त्यांजपाशीं आहेत तींही तशींच ! त्यांजपाशीं या प्रसंगीं खलबत करणें प्राप्त ! हरतऱ्हा करून त्यांचे (शिंद्यांच्या) परिघांतून निघोन आपल्या पेठेंत येऊन राहिलों. त्यांचा इतला आम्हांकडे नाहीं. याप्रमाणें करावयास पांच रुपये खर्च जाला. उपाय काय ! आपले स्वसत्तेंत आहों. श्रीमंतांचा प्रकार—बोलावें एक, आणि करावें एक, असें होतें. विश्वास बोलण्यांत धरून परिणाम नाहीं. अमृतरावसाहेब यांचा विचार लोभी. शंभर रुपये दिले असतां सरकार दौलतीमध्यें लाख रुपयांची खामी जाली असतां चिंता नाहीं, हे समज तेथें आहेत ! वाड्यांत स्वस्थ बसले आहेत. आमचे जागां स्नेहही नाहीं आणि रागही नाहीं. कारभार प्रकरणीं कांहीं एक बोलत नाहींत. परंतु (पेशवे व अमृतराव यांचें) अंतर्याम कोणे रीतीचें आहे हें समजत नाहीं. लौकिकांत चित्त शुद्ध नाहीं असें आहे. परंतु खातरजमा होत नाहीं. त्याचा विचार काय ? तूर्त शिंद्याची (व बायांची) एकी करून त्यांणीं कूच करून जावें या बेतामध्यें आहों. ते गेल्यानंतर भाऊंचें आमचें एकचित्त जालें आहे, ते श्रीमंतांपाशीं आहेत, आम्ही सर्व सोडून हरएक उत्तमस्थळीं स्नानसंध्या करून राहणार. तेथें राहिलें असतां भाऊ दौलतीमध्यें सरदार आहेत. आम्हांस कांहीं एक चिंता नाहीं. माझे चित्तांत याउप्पर कारभार करावा हा विचार राहिला नाहीं. बहुत दिवस सरकारचें कामकाज केलें. उमेद राहिली नाहीं. " याप्रमाणें उत्तर जालें. " कदाचित् आपण भाऊंस इकडे बोलाविलें असतां श्री॥ राजश्री भाऊनीं सांगितलें आहे कीं विना खर्चाची बेगमी जाल्याखेरीज निर्वाह होणार

नाहीं. इकडे फौजसुद्धां आहों, त्यास रानांत आहों. पिकें जालीं आहेत. फौजेस दाणा वैरण लुटीची मिळते. पांच रुपये आगें मागें दिल्यास चालतें. पुढील आशा दाखविली असतां लोक मुरवतीवरून राहतात. तिकडे येणें जालें असतां पैक्याखेरीज लोक येणार नाहींत. त्यास खर्चाची तजवीज हरकसेंकरून करावी लागेल; म्हणोन सांगितलें आहे." म्हणोन बोललों. त्यास श्री॥ राजश्री नाना बोलले कीं "मजपाशीं कांहीं एक राहिलें नाहीं. रिकामे होऊन बसलों आहों." त्यास मी विनंती केली कीं "आपण हरकसें कोणास सांगून सावकाराकडून देवावें. कराराप्रमाणें त्यास पावेल. आपण खातरजमा मात्र करावी." तेव्हां उत्तर केलें कीं "शिंद्याकडे पांच हजार रुपये हुंडणावळीचे भरावयाचे होते याजकारितां सावकारांकडून आज आठ दिवस पटवितों ते पटत नाहींत. आतां सावकारांत जीव राहिला नाहीं हें तुम्ही पहातच आहां. आणखी पुण्यामध्यें कोणी पैकेकरी आहे नाहीं हे विचार कळतच आहेत. प्रसंग कोण आहे! याप्रमाणें लिहावें" म्हणोन सांगितलें.

बायांच्या फौजेंत प्रत्यक्ष पेशव्यांचे बंधुच सामील होते तोंपर्यंत राजधानीच्या आसपास शिंद्यांशीं टक्कर देण्याचें धारिष्ट बायांस कारितां आलें. अमृतराव निघून गेल्यावर बायांचा पक्ष हलका पडला. त्यांच्या फौजेस पुणें मुक्कामीं शिंद्यांशीं बरोबरीच्या नात्यानें लढणें निभेनासें झालें. नगराहून आल्यापासून शिंद्यांच्या वतीनें नानानीं समेटाचें बोलणें लाविलें असतांही बायानीं तें आजपर्यंत जुमानिलें नव्हतें, परंतु हल्लीं नानांकडून त्यांस पुन्हा निरोप गेला कीं, "तुम्हीं लढाई बंद करून जांबगांवास जावें. मी तुमचे मुद्दे यथास्थित विचारांत घेऊन तुमचा व शिंद्यांचा तंटा पडला आहे त्याचा खचित निकाल करितों." तेव्हां लढाई तहकूब करून दूर सरावयास हें निमित्त बरें आहेसें समजून बाया फौजेसह कूच करून जांबगांवाकडे निघून गेल्या.

अक्टोबरच्या अखेरीस परशुरामभाऊ कैंपवाड नजीक मिरज येथून तळ हालवून फौजेनिशीं सुरापुराकडे निघून चालले. परंतु तेथपर्यंत जाण्याचें त्यांस कारणच पडलें नाहीं. ते तिकडे येतात असें कळतांच सुरापुरच्या संस्थानिकानें रामचंद्रपंतआपाशीं समेटाचें बोलणें लावून खंडणीची बाकी चुकती केली; व कारण पडेल तेव्हां पांचशें स्वांर व हजार पायदळानिशीं पेशवे सरकारच्या चाकरीस हजर होईन अशी कबुली दिली. ही सुरापूरची छोटी मोहीम याप्रमाणें उरकल्याबरोबर भाऊ परत उलटून थेट करवीरावर चालून येणार अशी बातमी पसरली होती. परंतु त्यांचें लष्कर परत न फिरतां नोव्हेंबरच्या २८ व्या तारखेस गलगल्याजवळ कृष्णा उतरलें, व दुसरे दिवशीं घटप्रभा पार होऊन कनकागिरी व अनागोंदीचा रोंख धरून चाललें. भाऊनीं नवीन फौज चाकरीस ठेवण्याचा उपक्रम एकसारखा सुरू ठेविला असल्यामुळें यावेळीं पंचवीस हजार स्वांर, शिवाय गाडदी व जुजबी तोफखाना असा सरंजाम त्यांजवळ जमला होता. या सैन्याच्या तीन टोळ्या करण्यांत आल्या होत्या. सात आठ हजार स्वारांची एक टोळी घेऊन रामचंद्रपंत आपा अघाडीस चालत. त्यांच्या मागून दोन तीन कोसाच्या फरकानें दुसरी टोळी चाले, व तींत भाऊंचे तृतीय पुत्र महादेवराव दाजी हे मुख्य सरदार असत. त्या टोळीच्या मागून चार कोसांच्या अंतरानें खुद्द परशुरामभाऊ बाजारबुनगें व तोफा वगैरे लटांबरासह चालत असत.

या अवधींत परशुरामभाऊंचे प्रतिस्पर्धी करवीरकर यांच्या हालचाली काय चालल्या होत्या हेंही सांगितलें पाहिजे. मागें करवीरचे महाराज कर्नाटकांतून परत करवीरास आले तेव्हां त्यांनीं रत्नाकरपंत राजाज्ञा यांस फौजेसहित सावनूरप्रांतीं ठेविलें होतें व कर्नाटकाच्या त्या भागावर पन्नास लक्ष रुपये वसूल करण्याबद्दलच्या वराता त्यांच्या हवालीं केल्या होत्या, हा उल्लेख मागच्या प्रकरणांत

आलाच आहे. सावनूरतालुक्यांत महाराजांनीं ठाणीं बसविलीं होतीं तीं संभाळणें व मुलखांतून जितका पैका निघेल तितका उकळणें हीं दोन कामें राजाज्ञास तिकडे राहून करावयाचीं होतीं. त्यांच्या पारिपत्याकारितां पेशवे सरकारांतून धोंडोपंत गोखले यांची नेमणूक झाल्यावरून गोखले नवलगुंदाकडे होते ते सावनुराकडे आले. गोखले व राजाज्ञा यांची महिना दीड महिना बरीच झटपट होऊन अखेरीस ता. ३ आक्टोबर रोजीं उभयतांचें मोठेंच युद्ध झालें. त्या युद्धाची हकीगत गोखले लिहितात कीं—

" राजश्री रत्नाकरपंत नि ॥ करवीरकर यांचा मुक्काम फौज सुद्धां कसबे कारडगी नजीक सावनूर येथें होता. त्यांजवर सरकारची फौजसुद्धां छ०२२ रबिलाखरीं सायंकाळच्या प्रहर दिवसास सर्व गोष्टींचें संकट जाणोन चालोन गेलों. लढाई संध्याकाळच्या चार घटका दिवसास सुरू जाली. दोन घटका तोफातोफी होत होती. नंतर घोडे घातले. हातघाईची लढाई दोन घटका जाली. करवीरकरांची फौज अस्तमानीं मोडिली. तीन चारशें खासा जखमी जाला व सवाशेंपर्यंत ठार जाले; व पाऊणशेंपर्यंत घोडे ठार जाले. बुणगें झाडून लुटलें गेलें. हत्ती नौबतसुद्धां एक व तोफा दोन व नगारे निशाणें व पांचशेंपर्यंत घोडे लहानमोठे याप्रमाणें पाडाव आले. पंचवीस तीस त्यांजकडील शिलेदार मंडळी जखमा लागोन पाडाव आले आहेत त्यांची बरदास्त करून सोडून द्यावयाची चाल आहे त्याप्रमाणें करितों. ...... बाकीची फौज रत्नाकरपंतसुद्धां दाणादाण होऊन अनेक मार्गें बारीपार मनोळीस गेली."

या कारडगीच्या लढाईंत पराजित झालेली करवीरकरांची फौज प्रथम कुंदगोळास आली व तेथेंही दम न निघाल्यामुळें बारी अलीकडे सौंदत्ती मनोळी वगैरे आसऱ्याच्या जागीं येऊन उतरली. या लढाईंत नारायणराव पाटणकर व सटवोजी यादव व प्रीतिराव चव्हाण

हिंमतबहाद्दर यांस जखमा लागल्या. यशवंतराव पांढरे ठार पडलें व शहाजी पांढरे बेपत्ता झाले. नीलकंठराव शिंदे पाडाव सांपडले. या बातम्या करवीरास येऊन धडकल्या तरी राजाज्ञांचें काय झालें हा पत्ता प्रथम कोठें लागेना. अखेरीस तेही सुराक्षितपणें मनोळीस दाखल झाल्याचें पत्र येतांच तीच खुशाली मानून महाराजानीं तोफेचे बार करविले व साखरा वांटिल्या !

राजाज्ञा व करवीरचे दुसरे सरदार मनोळीस जमा झाल्यावर त्यानीं पुन्हा सावनुराकडे जाण्याचा नाद सोडून पटवर्धनांच्या यादवाड व गोकाक परगण्यांत लुटालूट आरंभिली. स्वतः महाराजही नोव्हेंबरच्या अखेरीस तिकडेच गेले. सुरापूरची मोहीम आटोपल्यावर परशुरामभाऊ आपणावर चालून येथील हें त्यांस भय होतें, परंतु त्यानीं कनकगिरीकडे मोर्चा वळविल्याचें पहातांच करवीरकर इच्छेस येईल तितका मुलूख निर्धास्तपणें लुटून ओसाड पाडण्यास मोकळे झाले !

भाऊ कर्नाटकांत दूर गेले ही गोष्ट पेशवे व नाना या दोघांसही पसंत पडली नाहीं. नानांच्या मतें भाऊनीं कार्याकारण पांच सात हजार फौज ठेवून भीमेच्या पाण्यावर पंढरपूरच्या सुमारें असावें अथवा मिरजेनजीक कोठें तरी रहावें. तें सोडून ते इतक्या लांब पल्ल्यावर कशाकरितां गेले ? इतकी मोठी फौज बाळगून कर्जाखालीं येण्याचें त्यांस कांहींच कारण नव्हतें. करवीरकरांच्या दहशतीमुळें त्यांनीं फौज ठेविली म्हणावें तर करवीरकरांचें सूत्र आमच्या हातांत आहे हें त्यांस माहीत आहे. करवीरकरांचें भांडण लढाईच्या पल्ल्यावर न नेतां सामोपचारानेंच मिटवून घेण्याबद्दल आम्ही भाऊंस सांगतच आहों. आम्हांस जर येथें त्यांच्या फौजेची गरज लागली तर इतक्या लांबून येऊन वेळेवर आमच्या उपयोगीं पडणें त्यांच्यानें कसें घडेल ?

हे झाले नानांचे विचार. बाजीरावसाहेबांचा भाऊंवर घुस्सा होण्याचीं कारणें निराळींच होतीं. कांहीं व्यक्तींसंबंधानें त्यांच्या मनांत शत्रुमित्रभाव वज्रलेपाप्रमाणें चिरस्थायी बिंबलेला होता. बाळोजी कुंजर, सर्जीराव घाटगा आणि फकीरजी गाढवा यांस ते जिवलग- सखे मानीत, आणि आपला विघ्नहर्ता वैभवदाता काय तो एक दौलत- राव शिंदा असें ते समजत ! दौलतरावानेंच मला पेशवाईच्या गादीवर स्थापिलें, त्याच्याच बळावर मी पेशवाईच्या गादीवर अजून टिकलों आहें, तो नसता तर नानानें मला कधींच गिळून टाकिलें असतें, असें त्यांनीं कित्येकदां बोलूनही दाखविलें होतें ! हें बाजी रावसाहेबांचें मित्रमंडळ सांगितलें. आतां त्यांचें शत्रुमंडळ होतें त्यांत नाना फडनवीस, परशुरामभाऊ व बाळोबातात्या यांचें त्यांस अम- र्याद भय वाटे. या तिघांस ते कृतांत समजत. एका वेळीं श्रीमंतांचे हे तिघेही कृतांत कैदेंत पडून सर्जेरावी अंमल भरभराटीस आला होता तेव्हां श्रीमंतांचें मन निश्चित व तृप्त होतें ! पुढें दैवयोगानें पूर्वोक्त तीन कृतांतांपैकीं परशुरामभाऊ साताऱ्याच्या मोहिमेच्या प्रसंगानें आपोआप सुटले ही गोष्ट श्रीमंतांस फार अप्रिय झाली. मागून नाना फडनवीसही असेच त्यांच्या इच्छेविरुद्ध सुटून शिवाय कारभारी म्हणून गळ्यांत बांधून घ्यावे लागले यामुळें तर श्रीमंतांच्या जिवास अगदींच चैन पडेनासें झालें. त्यांतल्या त्यांत त्यांस एवढी एक आशा होती कीं, नाना व भाऊ यांत आधींच द्वेष माजलेला असल्यामुळें एकाविरुद्ध दुसऱ्याला उठवून दोघांचेंही कर्तृत्व आपणास मारक न होईल असा उपाय योजितां येईल. परंतु त्यांस न कळत एकाएकीं नानाभाऊंचें सख्य झाल्यामुळें तीही आशा आतां निष्फळ झाली ! शिंदे तर जातों म्हणतात. इंग्रज, नबाब, व भोसले हे प्रथमपासून नानाच्या कूटांत आहेतच. त्यांतच आणखी हा परशुरामभाऊ मिळाला, तेव्हां आतां दौलतराव दाक्षिणेंतून यदाकदाचित् गेलाच तर नाना

फडनवीस आपला प्राण घेतल्याखेरीज सोडणार नाहींत; हें भय खुनशी व दीर्घद्वेषी बाजीरावाच्या डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभें राहिलें !

अशा स्थितींत परशुरामभाऊंस जरबेंत आणण्याचा जेवढा उपाय आपल्या हातीं आहे तेवढा करून पाहण्याचें श्रीमंतांनीं मनांत आणिलें. त्यानीं आनंदराव रास्त्यांस बोलावून आणून जबाब विचारिला कीं, परशुरामभाऊनीं आमच्या हुकमाखेरीज पंचवीस हजार फौज चाकरीस ठेवून मुलखाची नासाडी केली याचें कारण काय ? फौज चाकरीस ठेवून तुंगभद्रेपर्यंत मुलूख मारीत सुटण्याविषयींची आज्ञा आम्हीं त्यांस दिलेली नाहीं व स्वच्छंदानें वाटेल तें करण्यास ते मुखत्यार नाहींत. त्यांची आम्हीं मुक्तता केली असली तरी ते अजून सरकारचे कैदीच आहेत. तुम्ही त्यांस हजरजामीन झालेले आहां-त्यांच्या फौजेस रजा देववून तुम्ही त्यांस आणून हजर करा. तसें न कराल तर परिणाम ठीक होणार नाहीं. याप्रमाणें श्रीमंतानीं धनीपणाच्या नात्यानें रास्त्यांस तंबी दिली तेव्हां परशुरामभाऊ कोणत्या योग्यतेचे माणूस, त्यानीं आजपर्यंत सरकारची केवढालीं कामें केलीं, साताराच्या अरिष्टांतून श्रीमंतांस कसें सोडविलें, वगैरे गोष्टी रास्त्यांनीं श्रीमंतांपुढें लीनतेनें मांडिल्या व असा मोहरा पुन्हा कैदेंत घालून धुळीस मिळविण्याची वासना धरूं नये म्हणून वारंवार प्रार्थना केली. परंतु श्रीमंतांस कांहीं केल्या द्रव येईना ! शेवटी अगदींच निरुपाय झाला तेव्हां आनंदराव रास्त्यानीं साफ सांगितलें कीं, परशुरामभाऊंस आम्ही परत आणूं शकत नाहीं. मग हवालीं करण्याची गोष्ट दूरच राहिली ! श्रीमंतानीं इच्छेस येईल तें आमचें अगर भाऊंचें पारिपत्य खुशाल करावें ! रास्त्यांकडून तो जबाब येतांच दुर्बळ बाजीराव थंड पडले ! कारण कीं, रास्त्यांचा सरंजाम जप्त करून त्यांस कैदेंत घालावें ही मगदूर श्रीमंतांच्या अंगीं नव्हतीच. अशा विकोपाला हा तंटा पाचला असतां नानानीं मध्यें पडून श्रीमंतांस चार बोधाच्या गोष्टी सांगित-

त्या. नानांच्या तोंडून भाऊंची तरफदारी ऐकतांना श्रीमंतांच्या जिवास काय वेदना झाल्या असतील याची कल्पना वाचकांस होण्याजोगी आहे! कसेंही असो, निरर्थक मनाशीं जळफळाट करीत बसण्यापेक्षां नानांच्या शब्दास मान देऊन समजुतीवर येणें हेंच अखेरीस श्रीमंतांच्या मनास श्रेयस्कर वाटलें ! मग भाऊनीं सरकारांत दंड भरून गुन्हे माफ करून घ्यावे आणि रास्त्यांची जामीनगत रद्द व्हावी म्हणून आगष्ट– सप्तंबरांत ठरलें होतें त्या पहिल्या पल्लयावर बोलणें आलें. श्रीमंत त्यावेळीं द्यावयाची रक्कम पंधरा लक्ष म्हणत होते तेच आतां तीस लाख, चाळीस लाख, वाटेल तें अद्वातद्वा मागूं लागले. तेव्हां पुष्कळ घासावीस घालून त्यास मूळच्या पंधरा लक्षांच्या कबुलीवर आणण्याला रास्त्यांस फार प्रयास पडले ! पण पटवर्धन हे पंधरा लक्षही देण्याचें कबूल करीनात, तेव्हां पुन्हां बोलणें तटलें. प्रथम दहा लक्षांचें बोलणें आम्हांकडून झालें आहे तेवढे आपण देऊं. अधिक देण्याला आपणास ताकद नाहीं, असाच आग्रह पटवर्धन धरून बसले. शेवटीं नानांची मध्यस्थी पुन्हा उपयोगास येऊन पंधराचे चौदा झाले, व त्यांतही भाऊनीं दहा लक्ष रोख द्यावे व आणखी चार लक्ष द्यावयाचे त्याबद्दल सरकारांतून भाऊंस दोन वर्षांत कांहीं मोहिमेची कामागिरी सांगावी व तिच्या खर्चीकरितां पैका द्यावयाचा त्यांत हे चार लक्ष वजा घालावे, अशी नानानीं तडजोड काढिली.

याप्रमाणें तडजोड झाल्यावर परशुरामभाऊंची जेवढी म्हणून मिळकत सरकारच्या जप्तींत होती तेवढी सर्व मोकळी व्हावयाची; परंतु जप्ती उठवतांनासुद्धां बाजीरावसाहेबानीं आपला धनीपणाचा अधिकार थोडाबहुत गाजविलाच ! त्यानीं सरंजामाच्या मोकळीकचिठ्या लिहून दिल्या, परंतु म्हैसूरच्या स्वारींतल्या कर्जाच्या फेडीस सावनूरचे महाल भाऊंकडे लावून दिलेले होते त्यांच्या फेरसनदा द्यावयाच्या त्या दिल्या नाहींत; व पुण्यांतील वाडा व त्यांतील

चीजबस्त व सरंजामापैकीं मोशीं पुणतांबें हीं गांवें सोडिलीं नाहींत. पुन्हां नानानीं सक्तीची रदबदली केल्यावर हेंहीं सर्व सोडून देण्यास श्रीमंत कबूल झाले. मात्र त्यांनीं एवढीच शर्त ठेविली कीं, सरंजामाचीं वस्त्रें व बहुमान देण्याकरितां भाऊंच्या लष्करांत आम्ही कारकून पाठवूं. आम्हाशीं यापुढें एकनिष्ठेनें वागण्याबद्दल भाऊनीं त्या कारकुनाची खात्री केली म्हणजे त्यांचा राहिलेला अजबाब व सावनूरचे महाल त्यांच्या हवालीं करूं.

नंतर श्रीमंतानीं भाऊंच्या लष्करास कृष्णाजीपंत ढेकणे या नांवाच्या कारकुनाची रवानगी केली. भाऊंचा मुक्काम दोडवाडा-नजीक आला असतां तो कारकून लष्करांत येऊन पोंचला. त्यानें ता. १८ फेब्रुवारी स. १७९९ रोजीं मोठ्या समारंभानें सरंजामाचीं वस्त्रें व मोत्यांची कंठी व तुरा भाऊंस अर्पण केला. याच वेळीं भाऊंच्या चौघा पुत्रांस सरकारांतून वस्त्रें व शिरपेंच देण्यांत आले.

वर सांगितल्याप्रमाणें परशुरामभाऊंसंबंधानें रास्त्यांची रद-बदली, श्रीमंतांचा दुराग्रह, नानांची मध्यस्थी, वगैरे प्रकार पुण्यास दोन तीन महिने चालले होते. त्या अवधींत खुद्द भाऊंची मुलूखगिरी निर्धास्तपणें सुरूच होती! बरोबर तोफांचा सरंजाम विशेष नसल्या-मुळें ठाणीं घेण्याच्या भरीस फारसे न पडतां नुसतें भयप्रर्शन करून ते खंडणी वसूल करण्याचा कार्यभाग साधून घेत. गजेंद्र-गडच्या दक्षिणेस येलबर्गें म्हणून गढी आहे तेथील अमीलदारानें खंडणी देण्याचें नाकारल्यावरून त्या ठाण्यास वेढा घालून बसणें भाऊंस भाग पडलें व तेथें मात्र त्यांचे पंधरा वीस दिवस मोडले. बाकी या स्वारींत कोणत्याही ठाण्यानें चार दोन दिवसांपेक्षां त्यांचा अधिक खोळंबा केला नाहीं.

येलबर्ग्याची खंडणी उरकल्यावर भाऊंनीं रामचंद्रपंत आपा व महादेवराव दाजी यांस दहा बारा हजार फौज बरोबर देऊन सावनु-

राकडे पाठविलें. त्या प्रांतीं करवीरकरांचीं ठाणीं बसलीं होती तीं उठवून तेथें आपला अंमल बसविण्याचें काम या फौजेकडे सोंपाविलें होतें तें काम चालू असतां भाऊ हळूहळू मजली करीत गदगच्या मार्गानें फेब्रुवारींत दोडवाडापर्यंत येऊन तेथें मुक्काम करून राहिले. तेथेंच त्यांस श्रीमंतांकडून सरंजामाचीं वस्त्रें मिळालीं हें वर सांगितलेंच आहे.

गेलीं तीन वर्षें करवीरकरांनीं परशुरामभाऊंचा आणि पेशवे सरकारचा मुलूख वाटेल तसा लुटला, परंतु कुरुंदवाडकर व मिरजकर यांनीं अंतस्थ रीतीनें महाराजांस कांहीं देऊं घेऊं करून त्यांची मर्जी प्रसन्न राखिली होती व त्यामुळें त्यांच्या सरंजामाचा आजपर्यंत बराच बचाव झाला होता. परंतु या खेपेस महाराजानीं कुरुंदवाडकर व मिरजकर यांच्याही सरंजामाचे अनगोळ, तेरदाळ व शहापूर हे परगणे बेमुर्वतपणें लुटून, जाळून ओस पाडले व रयतेस त्राहि त्राहि करून सोडलें ! करवीरच्या फौजांची धाड पेशवाई मुलखावर आली म्हणजे रयतेची किती दैना होत असे याचे मासले मागच्या प्रकरणांतून प्रसंगतः आलेच आहेत. तसलाच आणखी एक मासला येथें देतों. हा पाच्छापूरच्या ब्राह्मणांसबंधाचा आहे व यांत इतर प्रसंगांप्रमाणेंच करुणरस भरला असून त्यावर हास्यार्चाही थोटी छटा पसरलेली आहे ! तो प्रसंग असा—

" पाच्छापुरांतील ब्राह्मण असामी पन्नास साठ व बायका व मुली पावणाशें शंभरपर्यंत गांवांतून निघाले. कोठें तरी भीक मागून रहावें याअर्थें जात होतीं. बायकांच्या नाकांतील मोतीं व गळ्यांतील मंगळसूत्रसुद्धां हरण जालें होतें. व पुरुषांस लज्जारक्षणार्थ दोन दोन हात मात्र वस्त्रें होतीं. तशींच बायकांस. हें वर्तमान राजश्री रघुनाथराव माने अंधळीकर हे करवीरासच आहेत, ते (हल्लीं) लष्करांत आहेत—त्यांस समजलें. त्याणीं ब्राह्मणांस एक एक धोतर व तितक्या

बायकांस मंगळसूत्रें हरण करून आणिलेलींच आपण खरेदी करून घेऊन दिलीं. गांवांतील नागवण्याचा विस्तार पत्रीं कोठवर ल्याहावा? भदेल्यांतून (मडक्याच्या कपऱ्यांतून) ब्राह्मण वगैरे पाणी पितात. यापरतें आणखी काय ल्याहावें? माने यानीं पदरचे दोन तीनशें रुपये खर्च करून धर्मकृत्य केलें व तितक्या मंडळीस एक रोज भोजनाचें साहित्य दिलें....... सद्दरहू माने याणीं गरिबांस अन्नवस्त्र देऊन लष्करच्याबाहेर बरोबर माणसें देऊन पोंचविलें. पुढें पाच्छापुरास (परत) जातानां गांवाजवळ शिधा व मंगळसूत्रें व धोतरें वगैरे दिलेलीं (लष्करच्या लोकांनीं) आणखी नागविलीं!!"

परशुरामभाऊ व विंचूरकर यांच्या फौजा साताऱ्याहून निघून गेल्यावर तेथील किल्यावर महाराजांजवळ कोण कारभारी नेमावयाचा व पुढची व्यवस्था कशी ठेवावयाची या गोष्टींचा निकाल पुणेंदरबाराकडून होण्यास तीन चार महिने अवकाश लागला. तेथपर्यंत रास्त्यांची मुख्य फौज साताऱ्यासच होती व तिची एक टोळी मात्र प्रतिनिधींच्या कुमकेकरितां कऱ्हाडास राहिली होती. करवीरकर महाराजांची थोडीशी फौज शिराळ्यांस राहून कऱ्हाड प्रांतींच्या गांवखेड्यांवर स्वाऱ्या करी, आणि तिच्या कऱ्हाडकरांशीं नेहमी बारीक सारीक चकमकी होत असत. शिराळ्यांच्या फौजेंत चतुरसिंग येऊन मिळाला तेव्हां या फौजेचा दंगा इतका माजला कीं सर्व कामें बाजूस ठेऊन हें चतुरसिंगाचें बंड मोडणें हेंच रास्त्यांच्या फौजेचें प्रधान कार्य होऊन बसलें. आणि त्याच कार्याकरितां तासगांवाहून हरी परशुराम पटवर्धन हजार पंधराशें स्वारांनिशीं रास्त्यांच्या कुमकेस आले. इतकें असून चतुरसिंगानें माधवराव रास्त्यांवर एकदां चांगलीच मात केली! जानेवारींत कांहीं कामाकरितां रास्ते वाईस गेले होते. साताऱ्यास ते आपल्या लष्करांत नाहींत ही बातमी राखून चतुरसिंगानें शिराळ्याहून येऊन त्या लष्करावर छापा घातला व

बहुत नासाडी करून तो त्वरेनें परत शिराळ्यास गेला. हरिपंत बाबा पटवर्धन यानीं रास्त्यांची विसकटलेली फौज सांवरून धरावी तें सोडून ते स्वतःच दहशत खाऊन खटावाकडे निघून गेले. मागून रास्त्यानीं सातार्‍यास येऊन पुन्हा आपल्या फौजेचें अवसान बसविलें व हरिपंत बाबास बोलावून आणून लष्करचा मुक्काम उंब्रजेस आणिला आणि तेथून चतुरसिंगावर निरनिराळ्या टोळ्या पाठवून त्याचा वारंवार पराजय केला. तरी त्यानेंही रास्त्यांच्या फौजेस आणखी एक दोन ठोकरा दिल्याच ! ही चतुरसिंगाच्या बंडाची धामधूम पांच सहा महिने चालली होती.

मागें मेस्तर बैट (Mr. Boyed) व त्याचीं दोन पलटणें नानानीं खुन्या मुरलीधर प्रकरणांत बडतर्फ केल्याचें लिहिलें आहे. बैट साहेब गेल्यावर त्याच्या जागीं पेशव्यानीं मेस्तर टोण (Mr. Tone) नांवाचा दुसरा एक इंग्रज चाकरीस ठेवून त्याजकडून नवीन दोन पलटणें तयार करविलीं होतीं. त्या पलटणांस चाकरी बजावून दाखविण्याची संधी आली. वाळव्यांच्या थोरातांवर पेशव्यांची कांहीं कारणामुळें इतराजी होऊन त्यानीं थोरातांचा सरंजाम राजपत्री असतांही अन्यायानें जप्त केला व गणेशराव पेठे निसबत अमृतरावसाहेब यास हजार दोन हजार स्वार व मेस्तर टोण याचीं पलटणें बरोबर देऊन वाळवें व शिराळें हीं ठाणीं घेण्याकरितां पाठविलें. पेठे यानें वाळवें काबीज केलें पण शिराळ्याचें ठाणें त्याच्या हातास लागलें नाहीं.

या सालीं इंग्रजांच्या मनांतून टिपूवर मोहीम करावयाची होती, आणि त्या कामीं पूर्वीच्या तहास अनुसरून मराठे व मोंगल यांनीं आपल्या कुमकेस फौजा पाठवाव्या अशी त्यांची अपेक्षा होती. त्याच्या म्हणण्यास कबुली देऊन निजामअलीनें म्हैसूरच्या स्वारीकरितां फौज सुद्धां नेमिली. परंतु इंग्रजांच्या मनोदयाप्रमाणें पुणें दरबाराकडून फौज पाठविण्याविषयीं तादृश उत्सुकता दिसून आली

नाहीं. याचें कारण असें कीं, कुमक मागण्यासाठीं इंग्रजांचा वकील पामरसाहेब ज्यावेळीं पुण्यास आला त्याच वेळीं टिपूचेही वकील तेथें आलेच होते. इंग्रजांस टिपूवर मोहीम करण्याचा प्रसंग पडला असतां त्यांस कुमक करण्याविषयीं पेशवे सरकार पूर्वींच्या तहांत बांधलें गेले असल्यामुळें म्हैसुरावर फौज पाठविली पाहिजे असा नानानीं बाजीराव साहेबांस सल्ला दिला व हें म्हैसूरच्या मोहिमेचें काम परशुरामभाऊंच्या गळ्यांत घालावें अशीही शिफारस केली. परंतु बाजीरावानीं इंग्रजांच्या कुमकेस फौज पाठविण्याची टाळटाळ चालविली. त्यांतलें बीज असें होतें कीं, बाजीराव व त्यांचे सल्लागार दौलतराव शिंदे या दोघाही लोभी बुभुक्षितांस टिपूच्या वकिलानीं आंतून पैका देऊन अनुकूल करून घेतलें होतें !

पुण्याहून कूच करून आपल्या मुलखास निघून जाण्याविषयीं दौलतराव शिंद्यांस नानानीं वारंवार सांगावें व त्यानीं .जातों जातों म्हणावें, असें पुष्कळ दिवस चाललें असतां त्यानीं तिकडे त्वरेनें निघून गेलेंच पाहिजे असें कारण यावेळीं एकाएकीं उपस्थित झालें. काबूलचा बादशहा तैमूरशहा यानें पंजाबावर स्वारी करून तेथील शीख संस्थानिकांचा पराजय केला व दिल्लीवर चालून येण्याचा त्याचा इरादा स्पष्ट दिसूं लागला. त्यावरून शिंद्यांचा तिकडील पलटणांवरचा मुख्य सरदार मुसा पिरू यानें युद्धाची तयारी केली व दिल्लीस जलदीनें निघून येण्याविषयीं शिंद्यांस पत्रें पाठविलीं. परंतु शिंद्यांच्या मनांतून जावयाचें नव्हतें व जाण्याजोगी त्यांची स्थितिही नव्हती. एक तर फौजेचें देणें फेडण्यास त्यांजवळ पैका नव्हता. शिवाय दुसरें असें कीं, माझ्या जिवाची तुम्हांस किंमत वाटत असेल तर नाना जिवंत असेपर्यंत तुम्ही मला सोडून जाऊं नका; अशी बाजी-रावसाहेब त्यांची गुप्तपणानें प्रार्थना करीत होते ! अशा स्थितींत सरकारांतून म्हणजे मुख्य कारभारी नाना यांजकडून पैका काढायला

ही वेळ बरी आहे असें जाणून शिंद्यानीं दिसेंबरपासूनच सरकारांत बोलणें लाविलें होतें कीं, आपणास दिल्लीकडे जाणें जरूर. आमच्या रवानगीस द्रव्य पाहिजे त्याची तजवीज करावी. शिंद्यांच्या शब्दावर नानांचा विश्वास नव्हताच. तथापि निमित्त टाळण्याकरितां त्यानीं त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं कूच करून जावें. आम्ही तुम्हांस पसतीस लक्ष रुपये देऊं. पण ते एकदम देणार नाहीं. येथून कूच करून जातांना सात लक्ष, जांबगांवास गेल्यावर चार लक्ष, तेथून बऱ्हाणपुरापर्यंत गेल्यावर बारा लक्ष, याप्रमाणें तेवीस लक्षांचा भरणा करूं. बाकी बारा लक्ष रहातात त्यांची वरात बुंदेले व झांशीवाले यांजवर देऊं. पुष्कळ दिवस भवति न भवति केल्यावर शिंद्यानीं तेवीस लक्षांच्या भरण्याबद्दल जामीन मागितले. तेव्हां नानानीं हरिभक्ति सावकार याचा भाचा दुल्लभदास व अन्याबा अभ्यंकर यांस शिंद्यांच्या हवालीं केलें. मग शिंदे जानेवारी अखेरीस सात लक्षांच्या जागीं दहा लक्ष रुपये घेऊन हिंदुस्थानांत जाण्याकरितां वानवडीहून निघून तीन कोसांवर मांजरीस गेले. अर्धेमुर्धें लष्कर त्यांबरोबर गेलें व बाकी राहिलें तेंही निघण्याची तयारी जारीनें करीत होतें. पण हें सारें अवडंबर फुकट आहे, शिंदे कोठें जात नाहींत, येत नाहींत, हें पुण्यांतील लोकांनीं कधींच ताडलें होतें. अखेरीस तेंच खरें ठरलें! शिंद्यांचा मांजरीपुढें मुक्काम गेलाच नाहीं. पंधरा वीस दिवस तेथें राहिल्यावर ते म्हणूं लागले कीं, देणेंदारांनीं फौजेंतल्या लोकांस अडविल्यामुळें माझें जाणें तटलें आहे. तेवीस लक्षांपैकीं राहिलेले रुपये पुढें देणार ते येथेंच द्या, म्हणजे निघून जातों! नानानीं ती मागणी नाकारिल्यामुळें शिंद्यांचें जाणें अर्थातच रहित झालें.

दौलतराव शिंद्यानीं निघून जाण्याची धामधूम उठविली ती जरी खोटी होती तरी त्यांविषयीं श्रीमंतांच्या मनांत कांहींसा अविश्वास उत्पन्न झाला. मला सोडून दौलतराव गेले तर माझें कसें होईल

हें त्यांस भय पडलें. शिंद्यांच्या घरांतल्या बाया चिथरलेल्या आहेत तोंपर्यंत कांहीं शिंद्यांस दक्षिणेंतून हालतां येत नाहीं हें त्यांस पक्कें ठाऊक होतें. सबब त्यांनीं आंतून बायांस चिथावणी देऊन पुन्हा दंगाधोपा माजविण्यास प्रवृत्त केलें ! श्रीमंत जर मध्यें न पडते तर यावेळीं बायांची समजूत झाल्यासारखीच होती. त्यांचा उत्कर्ष आतां लोपला होता. हिंदुस्थानांत बायांच्या वतीचा सरदार लखबादादा लाड फौज बाळगून उज्जनीच्या आसपास दंगा करीत होता त्याचा अंबाजी इंगळ्यानें पराभव केला. बायांच्या पुरस्कर्त्यांपैकीं मुशाफरखान पठाण मरण पावला व नारायणराव बक्षी दुखण्यानें हैराण झाल्यामुळें फौजेंत अव्यवस्था होऊन तिला पोटास मिळेनासें झालें. अशी एकदम चोंहोंकडून आपत्ति आल्यामुळें पूर्वीचीं चढेलपणाचीं बोलणीं बायांनीं आतां सोडून दिलीं होतीं. शिंद्याच्या नव्या कारभाऱ्यांवर बायांचा विश्वास नव्हता, पण महादजी शिंद्यांच्या वेळचे जुने कारभारी आबा चिटणीस हल्लीं शिंद्यांचा कारभार करीत होते ते व नाना फडनवीस जी व्यवस्था करितील ती बायांस मान्य होण्याजोगी होती. त्या दोघांनीं दौलतरावांची समजूत घालून बायांस निराळी तोडून द्यावयाची जहागीर, त्यांस रहावयास द्यावयाचे किल्ले, व त्यांनीं बाळगावयाची फौज व सरंजाम व शागिर्दपेशा वगैरे कलमें त्यांजकडून करार करून घेतलीं होतीं. तीं कलमें बायांनीं आतां मान्य करावीं, तों आगलाव्या बाजीरावानीं बायांचा बुद्धिभेद करून त्यांचा तंटा मूळ पदावर आणिला आणि त्यांच्या फौजेकडून आपलेंच राज्य लुटवून दीनदुबळ्या लाखों रयतेचा तळतळाट घेतला !

करवीरकरांशीं लढाईचा प्रसंग न आणितां सामोपचारानेंच त्यांची समजूत घालून त्यांस दंग्यापासून परावृत्त करावें ही नाना व बाजीराव या दोघांचीही इच्छा होती. अशा रीतीनें समजूत करून

घेण्यास करवीरकर आतुर होते हें सांगावयास नकोच. यासंबंधानें करवीर व पुणें येथील दरबारांत जी वाटाघाट चालली होती तीवरून असें दिसून येतें कीं, करवीरच्या महाराजांस छत्रपति या पदाच्या अभिमानापेक्षां क्षुद्र जहागिरीसारखा लाभ अधिक स्पृहणीय वाटत होता ! कारण बाजीरावसाहेबानीं मेहेरबानी करून करवीरच्या महाराजांस जो तह ठरवून दिला त्यांत असा करार घातला होता कीं, महाराजानीं पेशवे सरकारचीं आजपर्यंत घेतलेलीं सर्व ठाणीं सोडून द्यावीं; आणि त्याबद्दल मोबदला म्हणून पेशव्यानीं चिकोडी व मनोळी हे दोन तालुके महाराजांस परत द्यावे, व सरंजाम म्हणून पावणे तीन लक्षांचा मुलूख नवीन द्यावा; त्या सरंजामाच्या उत्पन्ना-पुरती निराळी फौज ठेवून महाराजांनीं "हुजूरचाकरी" करावी म्हणजे पेशव्यांजवळ राहून चाकरी करावी !!! हें सरंजामाचें विपरीत कलम पतकरिल्याबद्दल नानानीं करवीरच्या वकिलाचा धिकार केला व त्यास विचारलें कीं, पेशवे तुमचे चाकर, त्यानीं तुमची चाकरी करावयाची, तें बाजूलाच राहून तुम्हीच त्यांची चाकरी कबूल केलीत हें काय ?

करवीरकरांनीं याप्रमाणें आपल्या मनाजोगता तह पेशवे सर-कारांतून ठरवून घेतला, तरी तो अमलांत येणें पटवर्धनांच्या संमतीवर सर्वस्वी अवलंबून होतें; आणि पटवर्धन तर समेट करून घेण्यास बिलकूल कबूल नव्हते एवढेंच नव्हे, तर सरकारांतून आपली कुमक व्हावी, आपण करवीकरांचें यथास्थित पारिपत्य करून त्यानीं आज-पर्यंत केलेल्या अपमानांचें व नुकसानीचें उसनें फेडणार, असा त्यांचा जबरदस्त आग्रह होता. त्यांचें म्हणणें कीं "करवीरवासी महाराज यांची चाल कोणे रीतीची आहे हें राजश्री नाना यांसीं अविदित असा प्रकार नाहीं. त्यानीं आमचा सर्वस्वीं नाश केला. तासगांवचें घर जाळलें. मुलूख मारिला, ऐवज घेतला. हुबळीची पेठ बहुता दिवसांची.

तेथें साडेतीन लक्ष रुपये घेतले; परंतु सोनें हातानें अजमासें पांच तोळे सोन्यास दोन तोळे असेल असें म्हणून ऐवज़ घेतला ! दहा लक्ष रुपयांस पेठ बुडविली. (हुबळी) प्रांत जाळून लुटून वैराण केला त्याची आतां कौल दिल्याविना लावणी होणार नाहीं. बाकीच्या महालांची खराबी केली.. ऐवज दोन दोन वेळ घेतला. शहापूरप्रांतीं घरें जाळिलीं. बायकामुलें गाईंसहवर्तमान कित्येक गांव जाळून नाश केला. विस्तारें कोठवर लिहावें ? × × × × करवीरवासी यानीं सरकार तालुके गोकाक आदिकरून वल्लभगड आदिकरून प्रांत घेतला. लोकांचा नाश वल्लभगडांत बहुत जाला. सर्व विदित असेलच. राजश्री नानांवर गुदस्तां (कैद होण्याचा) समय गुदरला ते समयीं महाराज हुपरीचे मुक्कामीं होते. वर्तमान ऐकलें ते समयीं दोन प्रहरीं खुशाली करून चौघडा वाजविला. साखरा वांटिल्या. यंदां राजश्री नाना (सुटून) आलेवरही पेढे वांटले ! ! या प्रकारची रीत महाराजांची असतां समेट करावयाचा ठराव हुजूर ठरला तेव्हां महाराजांचे ताले शिकंदर दिसतात ! ”

तात्पर्य, पेशव्यानीं ठरविलेला तह पटवर्धनानीं अमान्य केल्यामुळें त्यांची करवीरकरांवर मोहीम होण्याचा संभव कायमच राहिला. कोणी म्हणेल कीं, भाऊंविषयीं पेशव्यांच्या मनांत शत्रुत्व असल्यामुळें त्यानीं या तंट्यांत करवीरकरांची बाजू संभाळावी हें ठीकच आहे. परंतु नानानीं पटवर्धनांच्या वाजवी तक्रारींकडे जाणून बुजून दुर्लक्ष करावें याचें कारण काय ? यावर उत्तर असें आहे कीं, या बाबतींत नानांचा निरुपाय होता. त्यानीं महाड मुक्कामीं असतां परशुरामभाऊंच्या मुलखावर स्वारी करण्याविषयीं जेव्हां करवीरच्या महाराजांस चिथाविलें, तेव्हांच ‘ पुढें कधीं काळीं या अपकाराचा प्रतिकार परशुरामभाऊ करूं लागतील तर आम्ही तुमची निभावणी करून देऊं ’ असें त्यानीं करवीकरांस वचन दिलें होतें. एका वेळेपुरता तरी करवीरकरांचा बचाव करून वचनांतून मोकळें व्हावें

अशी नानांची मनीषा असल्यामुळें ते भाऊंची समजूत घालीत कीं, या करवीरच्या भिकारड्या मसलतींत तुम्ही मन घालावें हें योग्य नाहीं. यापेक्षां फार मोठी मसलत टिपूवर मोहीम करण्याची आहे ती तुम्हीं पतकरावी. चवदा लक्ष रुपये तुम्हांस सरकारांत दंड भरावयाचा आहे तो पैका तुम्ही टिपूवर होणाऱ्या या मोहिमेच्या खर्चास लाविलात असें धरून तो सरकारांतून तुम्हांस माफ करवितों व आणखी तुमचे दुसरे पुष्कळ फायदे करून देतों. तुम्हीं करवीरचा नाद सोडावा. परंतु नानांचें हें म्हणणें भाऊंच्या मनास बिलकुल येईना. प्रसंगानुरूप वाटेल ती लटपट लढवून वेळ मारून नेणारा मुत्सद्दी सर्वांसच संतुष्ट करूं शकत नाहीं. कोणाच्या तरी अविश्वासाला पात्र तो होतोच. या प्रसंगीं नानांची दशा अशाच प्रकारची झाली होती ! पटवर्धनांचा वकील त्यांविषयीं आपल्या धन्यांस एका पत्रांत लिहितो कीं, " मुख्य गोष्ट श्री॥ रा॥ नानांचें बोलणें कोणते समयीं कसें होईल याचा भरंवसा धरावयाचा नाहीं. सारा दिवस बोलत असतां दस्तऐवज बोलण्यांत सांपडावयाचा नाहीं, या चाली बोलावयाच्या आहेत ! काम लागलें असतां साखरेपेक्षां गोड बोलायास उशीर नाहीं. काम जाहलेनंतर त्या गांवचे देखील नव्हत ! येथील विचार असा आहे." हें वर्णन नानासच काय, पण स्वतःस मुत्सद्दी समजणाऱ्या प्रत्येकास लागू पडणारें आहे ! ! !

नाना फडनवीस व आबा चिटणीस यांच्या खटपटीनें शिंदे व बाया यांचा समेट होत असतां बाजीरावसाहेबानीं त्यांत कसा बिघाड उत्पन्न केला हें मागें सांगितलेंच आहे. शिंद्यांच्या लष्करावर चालून येऊन लढाई देण्याचें जरी बायांच्या अंगीं सामर्थ्य नव्हतें तरी मुलूख लुटून पोट भरणें त्यांच्या स्वाधीनचें होतें. त्यांनीं श्रीगोंदें व जांबगांव वगैरे शिंद्यांचीं जेवढीं ठाणीं हातीं लागलीं तेवढीं घेऊन वऱ्हाडांत फौज पाठविली. यशवंतराव शिवाजी व देवजी गवळी व

सतारखान पठाण हे त्या फौजेंत मुख्य सरदार होते. त्या फौजेनें तो मुलूख लुटण्याची सुरुवात केली तों शिंद्याचीं पलटणें तिच्या पाठीवर येऊन पोचलीं. तें पहातांच बायांची फौज वऱ्हाड सोडून खानदेशांत घुसली व सरकारचाच मुलूख लुटूं लागली ! त्या फौजेंतले एक हजार पठाण नाशिकास आले व तेथील लोकांजवळ सहा लक्ष रुपये खंडणी मागूं लागले ! क्षेत्रस्थ भिक्षुकांकडून एवढी रक्कम कशी निघणार ! त्या वेळीं पैका काढण्यासाठीं पठाणांनीं त्या पुण्यक्षेत्रांत प्रळय केला तो काय वर्णावा ! “ पठाण बायकांचे आब घेतात. शेंदोनशें बायकांनीं प्राणत्याग केले. आणखीही प्रळय मांडिला आहे. श्रीमंतांचे दौलतीपासून या प्रकारचा अनर्थ जाला नव्हता. ” “नाशकास वेढा घातला आहे. ब्राह्मणांच्या बायकांची अब्रू घेतात. कांहीं घरें लुटलीं व खणलीं. पांच सात ब्राह्मण मेले. दहा बारा जखमी जाले. कांहीं बायकांनीं जीव दिले. शेंदोनशें ब्राह्मण हत्यारें धरून गंगातीरीं बसले आहेत. लुटितात, मारितात, त्याअर्थी मरोन जावें असा कट करून बसले आहेत. ” “ श्रीमंतांचे पुण्यप्रताप थोर त्या योगें असे अनर्थ होतात ! ” वगैरे उल्लेख या प्रकरणांतल्या पत्रांतून आले आहेत त्यावरून या अनर्थांची कल्पना होण्याजोगी आहे.

शिंदे व पेशवे यांच्या आग्रहावरून नाना फडनवीस कारभारी झाले होते तरी अजूनसुद्धां त्यांजवर केव्हां कोणता प्रसंग गुदरेल याचा नेम नव्हता ! बायांचा पक्ष सोडून उपद्व्यापी अमृतराव पेशव्यांजवळ रहावयास आले त्यांस कांहीं तरी उपद्व्याप केल्याखेरीज कसें चैन पडणार ! त्यांच्या प्रेरणेवरून गोविंदराव काळे व शिवराम नारायण थत्ते हे एके दिवशीं दौलतराव शिंद्यांस एकांतीं गांठून बोलले कीं, नाना फडनवीस व नारोपंत चक्रदेव यांस तुम्ही कैद करावें. त्या कामगिरीबद्दल आम्ही तुम्हांस चाळीस लक्ष रुपये देऊं ! शिंद्यानीं ती

गोष्ट नानांस तत्काळ कळविली. ही दगलबाजी पेशव्यांचीच असली पाहिजे असा तर्क करून नानानीं खुद्द पेशव्यांसच याबद्दलचा खुलासा विचारिला. तेव्हां या गोष्टीशीं आपला कांहीं एक संबंध नाहीं असें त्यांनीं शपथपूर्वक सांगितलें इतकेंच नव्हे, तर जे अपराधी असतील त्यांचें तुम्हीं वाटेल तें शासन करावें अशी परवानगी दिली. नंतर नानानीं काळे व थत्ते यांस ता० २८ फेब्रुवारी रोजीं शनवारवाड्यांत कैद केलें व त्यांच्या पायांत बिड्या ठोकिल्या. चौकशींत उभयतांनीं सुधेचे (अमृतरावाचें) नांव सांगितलें. नंतर काळे ह्यांची सिंहगडास व थत्ते यांची कोंकणांत कर्नाळयाच्या किल्यास रवानगी करण्यांत आली.

नाशिक प्रांतीं धुमाकूळ घातल्यावर बायांच्या फौजेचा मोर्चा दक्षिण महाराष्ट्राकडे वळला हें तिकडील रयतेचें केवढें मोठें दुर्दैव! तिकडे जातांना बायांनीं असा पुकारा केला कीं, परशुरामभाऊनीं मध्यस्थी पतकरून आमचा व शिंद्यांचा तंटा तोडून देण्याचें आश्वासन दिलें आहे; व त्यामुळें त्यांच्या भेटीकरितां आम्ही तिकडे जात आहों! परंतु हें म्हणणें अगदीं खोटें होतें. कुठें तरी हिंडून लुटीवर पोट भरावें याखेरीज तिकडे जाण्यांत त्यांचा दुसरा कोणता हेतु असणार? मिळेल तर परशुरामभाऊंचा आश्रय त्यांस अवश्य पाहिजेच होता; पण तसा तो न मिळेल तर त्यांचे प्रतिस्पर्धी करवीरकर यांचाही आश्रय पतकरण्यास त्या नाकबूल होत्या असें नाहीं. त्या बाया गांवोगांव जबर खंडणी घेत घेत इंदापुरावरून शंभुमहादेवाकडे आल्या व तेथून औंध खटावच्या मार्गानें फेब्रुवारी महिन्यांत मिरजेच्या आसपास येऊन धडकल्या.

मार्गांत पळसदेवाच्या मुक्कामीं देवजी गवळी व सात आठशें पठाण बायांचें लष्कर सोडून नीरा नरसिंगपुरावरून निंबाळकरांच्या मुलखांत गेले. निंबाळकरांच्या भाळवणीस त्यानीं जाळपोळ व मार-

हाण करण्याची इतकी पराकाष्ठा केली कीं त्या धास्तीनें कासेगांव, पंढरपूर, सांगोलें हीं गांवें ओस पडलीं ! इंडी, तांबें व होर्ती परगण्यांतून सुरापूरचा बेरड नुकताच खंडणी वसूल करून गेला होता. पटवर्धनांच्या सरंजामावर दोन लक्षांची वरात नानानीं मोंगलांस दिली होती तिच्या वसुलासाठीं यापूर्वीच मशीरउल्मुलूख फौज घेऊन बरडोल परगण्यांत येऊन उतरला होता. त्यांतच आणखी हें बायांच्या फौजेचें तिसरें अरिष्ट येऊन कोसळल्यावर त्या प्रांतांतल्या रयतेची दैना काय विचारावी ! गांवावर मन मानेल तीं खंडणी बसवून निर्दयपणानें वसूल करावी हा पठाणांचा उपक्रम नाशिकाप्रमाणेंच गांवोगांव दृष्टोत्पत्तीस येत होता. त्यांच्या क्रूरपणाचा हा आणखी एक मासला पहा-

" (पठाणानीं) मौजे टणू परगणे इंदापूर इनामी गांव येथील कुळकर्ण्यांस धरून झाडास टांगून मार दिला. सातशें रुपये मागों लागले. पैसा मिळेना तेव्हां गांवांतील रयतानीं वस्तवानी भरीस घातली. तथापि सहाशेंची भरती जाली. मग शंभरांच्या रकमेकरितां शेखदार ओलीस राहून कुळकर्णी सोडविला. ब्राह्मण मरेल किंवा वांचेल हा भरंवसा नाहीं. "

पठाणांचा हा राक्षसी जुलूम सर्वत्रच चाले असें नाहीं. क्वचित् कोणी उलट धक्काबुक्की देणारा भेटला तर त्यांस नरमपणाही धरावा लागे. जत येथें कांहींसा असाच प्रकार घडला. " जतेची खंडणी बायांकडील पठाण याणीं चाळीस हजार केली. त्यास हे (पठाण खंडणीच्या भरतीस) कापड घेईनात. रोख ऐवज मागों लागले. डफळे यांचा कारभार ओढगस्त. पैसा उत्पन्न व्हावयाचा नाहीं. दोन रोज गांवांत (पठाणांनीं) मारामार फार केली. दोन हजार रुपये वसूल झाले. माणसांचे तोंडास मशालीदेखील लाविल्या ! तगायाची बाकी राहिली नाहीं. तिसरे दिवशीं पठाणांनीं ठाण्यावर हल्ला केला. गांवांत व ठाण्यांत हजारपर्यंत प्यादा आहे त्याणीं ठासून रोखिलें.

मार मारिला. पठाण पांच असामी ठार जाले. वरकड माणसें वीसपर्यंत ठार जालीं. गांवाजवळून खिदडून पठाणांस काढिलें. नंतर बोलणें ठरलें कीं, कापड घ्यावें. ओली दिल्या होत्या त्या सोडिल्या. कापड घेण्याचें ठरलें. जतकरानीं मर्दुमी चांगली केली. ''

परशुरामभाऊ कनकगिरी कोपळ गजेंद्रगड या भागांत हिंडत होते तोंपर्यंत त्यांच्या तोंडावर चाळीस पन्नास कोसांचें अंतर ठेवून मनोळीच्या बारीवर करवीरचे महाराज आपल्या मुख्य फौजेचा तळ देऊन राहिले होते व लहान टोळ्या पाठवून बारीअलीकडचा गोकाक तेरदाळ शहापूर वगैरे प्रांत निर्धास्तपणानें लुटीत होते. पण येलबर्ग्याची खंडणी उरकल्यावर परशुरामभाऊ परत फिरल्याचें पहातांच महाराज मनोळीची बारी सोडून मुधोळ जमखिंडीकडे आले, व तेथून अथणी विजापूर पर्यंत रास्ते व प्रतिनिधि यांच्या जहागिरी लुटीत चालले. इतक्यांत शिंदे बाया समीप आल्या. तेव्हां त्यांस भाऊंकडे जाऊं न देतां आपणाकडे मिळवून घ्यावें या उद्देशानें महाराजांनीं तुमचा आमचा सलोखा असावा व परस्पर भेटी व्हाव्या असें बायांशीं बोलणें लाविलें. बायांस मिळवून घ्यावें व उभयतांनीं मिळून मिरजप्रांत लुटावा ही महाराजांची मसलत ओळखून परशुरामभाऊनीं व मिरजकर बाळासाहेबानीं बायांच्या लष्करांत आपले कारकून आगाऊच पाठविले होते. बायानीं महाराजांकडे जाऊं नये असें त्यांचें अगत्याचें सांगणें होतें, पण बायांस महाराजांची भेट घेण्यास एक चांगलेंच निमित्त होतें. महाराजांचा लेकवळा मुरारराव शिंदे व महादजी शिंद्यांच्या राखेची मुलगी यांचें लग्न यापूर्वीं वर्ष दोन वर्षें ठरून गेलें होतें. बाया अनायासानें इतक्या जवळ आल्या त्या अर्थीं तें लग्न आतांच व्हावें असें महाराजांचें म्हणणें होतें व तें बायांस मान्य झालें होतें. सबब पटवर्धनांच्या आग्रहाकडे दुर्लक्ष करून बायांनीं फौजेसह महाराजांच्या भेटीस जाण्याचीच मसलत मुकरर केली.

या प्रकरणाचा सारांश एवढा वेळ सांगितला त्यांत खलांचा उत्कर्ष, बलिष्ठांचा जुलूम आणि प्रजेचा संहार याचेंच विवेचन आलें असून तें संताप व उद्वेग उत्पन्न करणारें आहे. आतां कौतुक व मौज वाटण्याजोग्या चार दोन गोष्टी या प्रकरणांत आल्या आहेत त्यांचा उल्लेख करून हा लेख संपवूं.

" वांईस आवशीचे दोन घटका रात्रीपासून पुढें पांच घटका रात्रीपर्यंत मध्यें तीन घटकापावेतों पर्जन्य पडतो या प्रकारें नक्षत्रें पतन जालीं. वांईच्या सर्वा जणांनीं पाहिलीं. सरकारांत लिहून रास्ते नक्षत्रें यांजकडून आलें. व श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब यांचा पहिला पिता गंगापुरीं आहे त्याची म्हैस गाभण होती तिजला वासरूं पांच सात मुखांचें जालें. हें दोन प्रकारचें वर्तमान सरकारांत आल्यावर मग ग्रहमख व शांत केली."

" श्री नाशिकास गोदातीरीं घटका रात्रीस नक्षत्रवृष्टि दोन घटकापावेतों जाली. गंगेस ब्राह्मण संध्या करावयास गेले होते त्यांनीं पाहिली. गांवांतूनही सर्वांच्या दृष्टीस पडली. हजार पांचशें नक्षत्रें पतन पावलीं. त्याच दिवशीं कृष्णातीरीं वांईस नक्षत्रवृष्टि जाली. दोनी वर्तमानें श्रीमंतांस कळलीं त्यावरून शास्त्रतः विचार करून अद्भुतशांति सरकारवाड्यांत केली."

राज्यांत स्वतः निर्माण केलेलीं शेंकडों अरिष्टें डोळ्यासमोर नाचत असतां तीं शांत करण्याचें ज्यांच्या कधीं स्वप्नींही आलें नाहीं, त्या बाजीरावसाहेबांनीं दैवी अरिष्टें शांत करण्याची एवढी खबरदारी घ्यावी हें केवढें आश्चर्य ! पहिल्या उताऱ्यांतलें नक्षत्रपतन दिसेंबरांतलें व दुसऱ्यांतलें जानेवारी महिन्यांतलें आहे.

" नदीपलीकडे वृद्धेश्वर शिवालयासंनिध नदीतीरीं खडकावर ब्राह्मण उष्णामध्यें व पर्जन्यामध्यें सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत तपश्चर्या करीत होता. दहा वर्षें बारा वर्षें होत आलीं. हल्लीं श्री॥ राजश्री

पंतप्रधान यांची स्वारी जाऊन पूजा करून हल्लीशिका रुपये बारा हजार रोख दिले. शिवाय शालजोडी, धोतरजोडा व पवित्रक वगैरे दिलें. त्याशिवाय परचुरे वगैरे मिळोन आणखीही लोकांनीं तीन हजार साडेतीन हजार पावेतों विषय दिला. श्रीमंतानीं दारिद्र्य दूर केलें ! ”

गंगाधरराव गोविंद मिरजकर यानीं राजश्री जैन गुरुगोळ मठ मौजे नांदणी यांस पत्र लिहिलें कीं—

“ रेवाणा केंचापा रयत मौजे कुपवाड यानें विदित केलें कीं, आपली लेंक लिंबी लिंगापा जैन यास देऊन लग्न केलें. नंतर तो निघून गेला. त्याचा पत्ता कोठें लागेना. पोरगी थोर जाली. तेव्हां लिंगापाचा भाऊ सावंता यास विचारिलें. त्यानें सांगितलें कीं लिंगापा हल्लीं कोठें आहे त्याचा पत्ता लागत नाहीं. तेव्हां त्यापासून सोड-चिठी लिहून घेऊन मीं आपले लेकीचा पाट लावून दिला. त्यास गुदस्तां त्या पोरीचा दादला लिंगापा सरकारांत फिर्यादीस आला कीं, मी लग्नाचा दादला जिवंत असतां माझे बायकोचा पाट लागला ! त्यास माझी बायको माझे हवालीं करवावी. त्यावरून लग्नाचे दाद-ल्याचे हवालीं बायको जाली. परंतु आमचे जातींत पाट लागलेली बायको फिरोन लग्नाचे दादल्याचे घरीं नांदावयाची नाहीं. पोरगीही तेथून निघोन आली. ती पाटाकडे द्यावयास आज्ञा व्हावी” म्हणून; ऐसियास ही जैन जातीची गोष्ट. याकरितां तुम्हांस हें पत्र लिहिलें असे. तरी येविशींची चौकशी पुर्तेपणें करून तुमचे जातींत चाल असेल त्याप्रमाणें लिहून मिरजेस सरकारांत पाठविणें. उपरांतिक रेवाणा केंचापास आज्ञा होणें ती होईल ” हें कोडें त्या जैनस्वा-मींनीं कसें उलगडलें असेल देव जाणे !

सन १७९८ च्या अखेरीस सावंतवाडी संस्थानांत कऱ्हाडे व चितपावन यांमध्यें वृत्तीसंबंधानें तंटा उद्भवून तो बराच विको-

पास गेला. त्याची थोडक्यांत हकीगत अशी—कऱ्हाडे व चितपावन हे दोघेही शेणव्यांच्या घरीं दानधर्म हव्यकव्यादि सर्व प्रकारची वृत्ति चालवीत असतां मध्येंच शेणव्यांच्या घरीं वृत्ति करावयाची नाहीं असा कऱ्हाडयांनीं कट केला. त्यांत चितपावन सामील न झाल्यामुळें कऱ्हाडे त्यांस त्रास देऊं लागले. कऱ्हाडयानीं चार दोन वेळां पंक्तींत बसलेल्या चितपावनांस उठवून शेणव्यांकडे याजन केल्याबद्दल प्रायश्चित्तही दिलें. तेव्हां चितपावनांनीं क्रुद्ध होऊन कऱ्हाड्यांवर वाळीत घातलें व त्यांशीं अन्नोदकव्यहार बंद केला. मग कऱ्हाड्यांनीं खेमसांवत देसाई सावंतवाडीकर यांजकडे फिर्याद केली. सावतवाडीकर याणीं "कऱ्हाडयांशीं अन्नोदकव्यवहार वर्ज्य करण्यास तुम्हांजवळ कोणत्या शास्त्रांत काय आधार आहे तो दाखवा" म्हणून चितपावनांस सवाल केला व त्यांजकडून गुन्हेगारी व मसाले यांच्या रूपानें जबर दंड घेतले आणि त्यांस सावंतवाडीस बोलावून नेऊन तंबी दिली कीं, तुम्ही कऱ्हाडयांवरचा बहिष्कार काढा, नाहीं तर आमचें राज्य सोडून तीन दिवसांत घांटावर चालते व्हा! तसें न कराल तर तुम्हांकडून ब्रह्मदंड व राजदंड घेतला जाईल! तो हुकूम होतांच दोन तीनशें चितपावन घांटावर येऊन पटवर्धनांच्या व इचलकरंजीकरांच्या मुलखांत राहिले, व पेशव्यांच्या दरबारीं जाऊन त्यानीं मोठा गवगवा केला. पटवर्धन व इचलकरंजीकर हे स्वतः चितपावन असल्यामुळें त्यांनीं या कोंकणच्या ब्राह्मणांचा जोरानें पुरस्कार केला. गंगाधरराव मिरजकर यांनीं सावंतवाडीकर देसाई यांस एक गरमनरम पत्र लिहिलें. राजाश्रयामुळें क्षणिक प्राबल्य पावळेले कऱ्हाडे चितपावनांस म्हणूं लागले कीं, तुम्ही आमच्या पंक्तीस बसून जेवलें पाहिजे इतकेंच नव्हे, तर तुम्ही आपल्या मुलीसुद्धां आमच्या घरीं दिल्या पाहिजेत. हें बोलणें रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस फारच असह्य वाटलें. कऱ्हाडे मुली द्या म्हणतात हा शब्द 'लघु नव्हे' असें ते त्वेषानें लिहितात! अशा थोरथोर माणसांच्या अंगांत

हें वेडगळ जात्यभिमानाचें वारें शिरलेलें पाहून आम्हांस तर हसूं येतें ! चितपावनांच्या फिर्यादीवरून हा कऱ्हाडेचितपावनांचा तंटा तोडण्याविषयीं बाजीरावसाहेबानीं परशुरामभाऊंस हुकूम दिला. भाऊनीं या तंट्याचा काय निकाल केला हें समजत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, घांटावर आलेल्या ब्राह्मणांस इकडील ब्राह्मण संस्थानिकांनीं इकडेच स्वास्थ्य करून दिल्यामुळें ते परत कोकणांत गेले नाहींत; व या तंट्यानंतर शेणव्यांकडच्या वृत्तीला चितपावन कायमचे मुकले ते मुकलेच ! कऱ्हाडे मात्र ती वृत्ति पुनः करूं लागले आणि ती त्यांजकडे बरेच दिवस चालली. अलीकडे चाळीस पन्नास वर्षांपूर्वीं शेणव्यांनीं कऱ्हाड्यांची वृत्ति बंद करून आपल्याच जातींतल्या लोकांस उपाध्येपण दिलें आहे अशी माहिती मिळते.

नं. ४३८७

(२४ आगष्ट)

भगवंत बहिरव याजकडून पत्र बाळासाहेबांस. रवाना श्रावण शु. १२ चें.—

" मोगलांची फौज दहा पंधरा हजार परांड्याकडे आली आहे. आपा बळवंताचें गांव केम तेथपर्यंत कहीची दौड येते. "

नं ४३८८

(श्राव ० व ० ४–३० आगष्ट)

धोंडो अनंत याचें शहापुराहून पत्र मिरजेस. रवाना छ० १७ रबिलावल.—

" गोखले यांची व करवीरकरांची अलीकडे लढाई जाली. करवीरकर कारडगीहून तयार होऊन सावनुरावर गेले. गोखले यांस फौज येते अशी बातमी कळली. तेव्हां आंतच सर्व तयार होऊन राहिले. बाहेर एकजण पडला नाहीं. करवीरकरांची फौज गांवाजवळ गोळीचे मारांत येऊं देऊन मग तोफा व बाण व गोळ्यांचा मार केला, आणि फौज बाहेर पडली. ५० घोडे पाडून नेले. गोळ्यानीं

याप्रों लिहिलें आहे. आपणही राहिमतपुराविशीं सांगितलेंच असेल. परांजपे यांस आणखीही वरचेवरी राहिमतपुराविशीं व पुणें देशीं खेडीं आहेत त्यांविशीं लिहीत जावें. वरता मजकूर लिहिला आहे सबब पत्र विसर्जन करावें. आणखी आढळेल तें वरचेवरी मागाहून सेवेसीं लिहून पाठवीन. मनसबा सिद्धीस जाईलसा दिसतो. हिंदुस्थानांतील वर्तमान शिखांस गिलज्यानीं मोडिलें. दिल्ली ओस पडली. तमाम दंगा उडाला. व रा॥ लखोबा लाड उज्जनीहून माघारे गेले याप्रों बाजारी वर्तमान आलें आहे. पुण्यांत सरकारांतून मातबरांवरी सावकारसुद्धां करोड रुपयांची पट्टी जाहली आहे. अद्यापि प्रसिद्धतेंत आली नाहीं, परंतु येईल. लेखकांनीं पाहिली आहे. भाऊंस फौजसुद्धां आणावें हें श्रीमंतांच्या चित्तांत व लेखकाच्याही चित्तांत आहे. परंतु हर कसेंही करून विदुर यास मार्गस्थ करावें. तें न होय ते पक्षीं नबाब सुद्धां सारे एक करून सरकारचें कार्य करावें हें घाटत आहे. सर्व वर्तमान बाजारी, भटी, व येणार जाणार यांचे मुखचें आहे. बहुत काय लिहिणें सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४५० श्री. (२६ डिसेंबर.)

पै॥ छ० २४ रजब. मार्गशीर्ष मास. सन तिस्सा तिसैन.

श्रीमंत राजश्री बाळासाहेब स्वामीचे सेवेशीं विनंती सेवक धोंडो बापूजी जोशी दोनी कर जोडून त्रिकाल चरणावरी मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत मार्गशीर्ष व॥ ४ पावतों बालकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. वडिलीं पत्रें पाठविलीं तीं पावलीं. श्रीमंत राजश्री नानांस व राजश्री बाळकृष्णपंत भाऊ यांस व रास्ते यांजला पत्रें पाठविलीं तीं आज्ञेप्रमाणें मीच रास्ते यांचें पत्र दिलें. नानांचे पत्र भाऊंजवळ दिलें. गोळ्यांचा[1] प्रकार सर्व मला समजला होता तो भाऊंजवळ बोलिलों. ते नानापाशीं बोलले. परंतु आज चार रोज जाहले परंतु अद्याप तगादा मना होत नाहीं.

---

१ विठ्ठलराव गोळ सावकार.

माणसें मिरजेस पाठवावयाचीं, जाब घेऊन द्यावा, असें भाऊंस बोलिलों. त्यांनीं नानांस विनंती केली. चक्रदेव यांजला गोळ्यांचा मजकूर सांगून मग पत्र देऊं असें नानांनीं भाऊंस उत्तर केलें. मी नित्य भाऊंकडे जात आहें. वाईस आवशीचे दोन घटका रात्रीपासून पुढें पांच घटका रात्रीपर्यंत मध्यें तीन …वरून कळल… नक्षत्रें पर्जन्य पडतो … …हाव पतन … तलंग व द्रविड व माध्यांजन … …ली. सरका… यांस पंक्तिभद अन्नोदकाविषयीं नाहीं हें पूर्वापार चालत आ… श्री …हे.

त्यापैकीं चितपावन व कऱ्हाडे हे परशुरामक्षेत्रस्थ; परंतु क्षेत्र काशी-पासून रामेश्वरपर्यंत आहेत. 'चितपावन प्रांत कुडाळ' म्हणोन पत्रीं लिहिलें, तें समस्त चितपावन ज्ञातीस लिहिण्यास आधार चांगला पाहिजे. त्यास आचार व्यवहार प्रायःश्चित्त याचे अधिकारी चातुर्वर्ण्याचे शंकराचार्य आहेत. त्यांचें पत्र व महाक्षेत्रीं चितपावन आहेत त्यांचें संमतपत्र व सर्व राजसत्ता चातुर्वर्णांत राजश्री पंत प्रधान यांजवळ आहे—तेथें शास्त्रविचार विषय सर्व आहेत—त्यांचें पत्र अथवा पुण्यांत सर्व ब्राह्मणज्ञातीचा जथ आहे तेथें विचार होऊन कऱ्हाडे यांसीं अन्नोदकव्यवहार करूं नये असा सिद्धांत होऊन त्यांचें पत्र आणिलें असाल, केवळ वृत्तीविषयीं एवढी गोष्ट होणा… नाहीं, पूर्वी जाहलें नाहीं, तर याचें कारण समजलें पाहिजे. या… करितां समस्त चितपावन ब्राह्मण हुजूर यावे. या कामास ले… निसबत गोपाळ निरगुण व गोविंद कोठवळा पाठविले आहेत. …रून आजपर्यंत जाहलें नाहीं तें तुम्ही सावंतवाडींत मिळोन संमत …त्तीं पत्र लिहिलें तें सरकारांत दखल करून साधनें आणिलीं असाल …हे- दाखवून मग ठरेल त्याप्रमाणें करावें तें न केलें, याबद्दल तूर्त …माणें गारी रुपये ५०० पांचशें व मसाला दर घरास होन ।॥। प्रताप या…यांचें देणें. आणि क्षेत्रांचें, व पुण्यांतील ब्राह्मणांचें, राजश्री पंतप्रधान …सीं व श्री स्वामी याचें पत्र आणिलें असाल तर तें व तुम्ही संमतें कसव… ती. केली आहा तें ऐसीं घेऊन हुजूर येणें छ० २० रजब. हे विनं…

चाळीस पन्नास माणसें ठार जालीं. मोड जाला. फौज गोखल्यांची मागें लागली ते कारडगीपर्यंत पाठीस लागले. तेथून माघारे गेले. याप्रमाणें लढाई जाली. करवीरकर मोड खाऊन आले. गोखल्यांचा दम भारी आहे. रत्नाकरपंतांस परत येण्याविषयीं करवीराहून पत्रें आलीं आहेत. परंतु माघारे जात नाहींत. काय भविष्य आहे न कळे ! " *

नं. ४३८९　　(भाद्र. शु. ९–१८ सप्टें.)

भगवंत बहिरव याचें पत्र मिरजेस. पै॥ छ० १० रबिलाखरचें—

" मोंगलांचे फौजेंत नानाफडणिसांकडील कारकून महादेवभट शारंगपाणी हे मुख्य कारभारी आहेत. "

नं. ४३९०　　(भाद्र. शु. ९–१८ सप्टेंबर.)

भगवंत बहिरव याचें मिरजेस पत्र पै॥ छ० १० रबिलाखरचें—

" मोगलांच्या लष्करानें परांड्याहून तळ उठवून बारशी, आगळगांव, रातांजन, पांगरी, वैराग या तालुक्यांतून खंडण्या घेतल्या- प्रस्तुत तुळजापुरावर मुक्काम करून आहेत. तुळजापुरची खंडणी पसतीस हजार ठरविली. तेथून सोलापूर अकलकोट येथील खंडण्या उरकून इकडे यावें असा बेत आहे. "

नं. ४३९१　　(भाद्र. व० ५–३० सप्टें.)

नारो हरी करंदीकर याचें करवीराहून मिरजेस पत्र. पै॥ छ० २० रबिलाखर.—

" वाडीकर सावंत याणीं मालवण प्रांतांत व रांगण्याखालील प्रांतांत दंगा मांडिला आहे. दोन तीन हजार प्यादा इकडील प्रांतांत पाटगांवाजवळ तीन चार कोसांवर आला आहे. तमाम प्रांतांत दंगा

---

*-कारडगीची लढाई ता. ३ आक्टोबर रोजीं झाली त्याच्या आधींची ही लढाई. दोन्ही लढायांत रत्नाकरपंत राजाज्ञा यांचा मोड झाला.

करितात. अद्यापि तिकडे जमाव येथून पाठवावयाची योजना जाली नाहीं. मालवणकर व रांगणेकर मामलेदारांस बंदोबस्त करण्याविशीं आज्ञापत्रें गेलीं आहेत. "

नं. ४३९२ (भाद्र० व. ६—१ आक्टोबर)

श्री॥ राजश्री नाना स्वामीचे सेवेशीं.

पोष्य गंगाधरराव गोविंद सा॥ नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ० २० रबिलाखर इंदुवारपर्यंत आपले कृपेंकरून सुखरूप असों. विशेष. ती॥ राजश्री परशुरामभाऊ यांचा आपला ऋणानुबंध कोणे प्रकारें चालत आला हें सर्वांस विदित आहेच. कालपरत्वें करून विक्षेप आला, त्यास पूर्वींपासून वडिलादारभ्य आमचे घरावर आपली ममता. त्यांत न व्हावयाची गोष्ट होऊन सरकारची गैरमर्जी वाडिलांवर जाली. रास्ते यांचे योगेंकरून वाडिलांस सातार्‍यानजीक आणिल्यावर फौज जमा करून सरकारकामही केलें. कृपा श्रीमंतच करितील. माझे मतें उभयंपक्षीं चित्तांतील किलाफ दूर करून पूर्ववत ममतेनें निखालसपणें आपण व वाडिलीं असावें. श्रीमंतांचे पदरीं आपणासारखीं व भाऊंसारखीं माणसें कोठें आहेत ? आपली कृपा माझे ठायीं जाणून हा मजकूर लिहिला आहे. राजश्री बाळकृष्णपंतभाऊ व येथून राजश्री मोरो आपाजी परांजपे पाठविले आहेत. उभयतां विनंती करितील. समर्पक उत्तर यावें. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ४३९३ श्री. (भाद्रपद व. ६—१ आक्टोबर)

पै॥ छ० २० रबिलाखर. सन तिस्सा तिसैन. भाद्रपद.

सेवेसीं विज्ञापना. राजश्री बळवंतराव[3] खांडेकर यांचें पत्र (पुण्याहून) येऊन दोन रोज जाहले. त्यांत मजकूर "श्री॥ राजश्री

---

१ श्रीमंत राजश्री हें पद येथें निवळ गौरवार्थ आहे ! २ नारो हरि करंदीकर याचें पत्र करवीराहून मिरजेस. ३ करवीरकर महाराजांचा वकील.

नाना यांचा ऐवज दोन लाख रुपये द्यावयाचे आहेत, त्याजविशीं नानानीं आपणास पांच चार वेळां विचारलें व हल्लीं निक्षून सांगितलें कीं, महाराजांस लिहून पाठवून ऐवज लौकर आणावा. त्याजवरून लिहिलें आहे. तरी तरतूद करून ऐवज पाठवून द्यावा. व येथील कारभार फार करून समेटांत आला आहे. दसऱ्याचे सुमारें नाना कारभार करितील." श्रीमंतांचे आज्ञेवरून असेंही दर्शविलें होतें. व राजश्री बापूजी शिंदे मनोळींत (कैदेंत) आहेत त्यांचे मोकळिकेविशीं बळवंतराव यांस नानानीं सांगितलें होतें कीं त्यास सोडून द्यावा. त्याजवरून येथें बळवंतराव याणीं लिहिलें होतें. त्याचें उत्तर बळवंतराव यांचे नांवें पत्र राजश्री आबाजीपंत व हंबीरराव चिटणीस यांस लिहिलें. आपले नावें देणेंविशीं (महाराजांनीं) सांगितलें कीं, शिंदे धारवाडकरांसीं मिळोन इकडील तालुक्यांत व ठाण्यांस उपसर्ग करीत होते. याजकरितां त्यांस मनोळींत ठेविलें आहे. त्यांजकडून आगळीक जाली आहे. असा मजकूर आहे. त्यास नानांची मर्जी सोडून द्यावा असीच असल्यास उत्तर पाठवावें म्हणजे हुजूर अर्ज करून मोकळीक करावयासीं येईल. याप्रों उत्तर लिहिलें उभयतांचे नांवें दिलें आहे. ऐवजाचें उत्तर अद्याप दिलें नाहीं. दिल्यावर शोध करून लिहून पाठवितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३९४ **श्रीगणपति.** (भाद्र० व० १०–५ आक्टोबर)

चिं ॥ राजश्री बाळासाहेब यांसीं आशीर्वाद उपरी तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. " कोथरूडचे बागेंत (श्रीमंतांची) स्वारी जात असतां मारेकरी सांपडले असें वर्तमान दोहों चोहोंकडून आलें. तेथें आपल्याकडे आलें असेल तें ल्याहावें ' म्हणोन लिहिलें, 'त्यास इकडेही कोणी आले ते याजप्रमाणेंच सांगतात.

१ पत्र परशुरामभाऊचें तासगांवाहून मिरजेस.

पुण्याहून चि॥ बाबा काळे याचें पत्र तृतीया बुधवारचें आलें त्यांत हें काहीं वर्तमान नाहीं. पत्र घेऊन आलेला गृहस्थ जबानी वर्तमान सांगतो तेव्हां यास त्यास कांहीं मिळत नाहीं. सातान्याहून चिरंजीवाचें पत्र आलें त्यांतही तहकीक असें लिहिण्याचा भाव नाहीं. परंतु मारेकरी सांपडले असें वर्तमान दुणावतें तेव्हां असेलसें दिसतें. अद्याप तहकीक लिहिलें आलें नाहीं. रहिमतपूरची सनद मानाजी फांकडे याजकडे होणार असें रहिमतपूरचें लिहिलें आलें. त्यास मी रास्ते यांसीं लिहितों. आगण राजश्री नाना फडणीस यांस लिहून पाठवावें. आपण लिहिलें त्याचें तहकीक वर्तमान अद्यापि आलें नाहीं. छ० २४ रबिलाखर. बहुत काय लिहिणें. ती॥ [1]मातुश्री वहिनी काल चार घटकां रात्रीस आली. चि॥ सौ॥ [2]ताराबाई ही आली. आज जातील. परंतु पर्जन्य बहुत कांहीं काल तिनी सांजांपासून पडत आहे. भृगुवार प्रातःकाळ. हे आशीर्वाद. मालमळ्याच्या तळ्याजवळ कूच करून राहिलों. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १४ रबिलाखर. सन तिस्सा तिसैन. भाद्रपद.

नं. ४३९५ श्री (भाद्रपद व० १०–५ आक्टोबर.)

पै॥ छ० २४ रबिलाखर. तिस्सा तिसैन.

[3]सेवेशीं विज्ञापना. श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांचा मुक्काम मळ्याजवळ होता तेथून काल तिसरे प्रहरीं कूच करून कवठ्याचे तळ्यावर येऊन उतरले. हरिपुराहून श्री॥ मातुश्री वहिनी काल दोन घटका रात्रीस येथें श्रीमंतांचे भेटीस आलीं आहेत. राजश्री श्रीपतराव भाऊही काल सायंकाळीं येथें आले. राजश्री विनायकपंत चांफेकर

---

१ गोपाळराव गोविंद यांची स्त्री सरस्वतीबाई. हिनें केलेली काशीयात्रा ऐ. ले. संग्रहाच्या सातव्या भागांत वर्णिली आहे. ही भाऊंची चुलत भावजय हरिपुराहून लष्करांत भेटावयास आली. २ ही पांडुरंगराव गोविंद यांची कन्या लागूंकडे दिलेली. हीही चुलतीबरोबर आली. ३ आपाजी गोविंद सहदेव याचें पत्र. मिरजेस.

यांचें पत्र काल सातारेहून आलें तें सेवेशीं पहावयास पाठविलें आहे स्वामीनीं पाहून माघारें पाठवावें. पर्जन्य बहुतच लागला आहे. राजश्री मोरोपंत परांजपे यांणीं लाखोटे दोन स्वामीस दिलेले काल भोयाबरोबर पाठविले आहेत. पावले असतील. विदित होय हे विज्ञापना.

नं. ४३९६ श्रीगजानन. (भाद्र० व० ११—६ आक्टो.)

पै॥ छ ० ८ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधरराव स्वामीचे सेवेशीं. पोष्य धोंडो बल्लाळ. कृतानेक सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ २५ रबिलाखर पावेतों आपले कृपेंकरून वर्तमान यथास्थित आहे. विशेष. राजश्री रत्नाकरपंत नि॥ करवीरकर यांचा मुक्काम फौजसुद्धां कसबे कारडगी, नजीक सावनूर, येथें होता. त्यांजवर सरकारची फौजसुद्धां छ० २२ रबिलाखरीं सायंकाळचे प्रहर दिवसास सर्व गोष्टींचें संकट जाणोन चालोन गेलों. लढाई संध्याकाळचे चार घटका दिवसास सुरू जाहली. दोन घटका तोफा तोफी होत होती. नंतर घोडे घातले. हातघाईची लढाई दोन घटका जाहली. करवीरकरांची फौज अस्तमानीं मोडली. त्यांजकडील तीन चारशें खासा जखमी जाहला व सवाशेंपर्यंत ठार जाहले. पाउणशें पर्यंत घोडे ठार जाहले. बुणगें झाडून लुटलें गेलें. हत्ती नौबतसुद्धां एक व तोफा दोन व नगारे निशाणें व पांचशेंपर्यंत घोडे लहान मोठे याप्रों पाडाव आले. पंचवीस तीस त्यांजकडील शिलेदार मंडळी जखमा लागोन पाडाव आले आहेत त्यांची बरदास्त करून सोडून द्यावयाची चाल आहे त्याप्रों करितों. बाकीची फौज रत्नाकरपंत सुद्धां दाणादाण होऊन अनेक मार्गें बारीपार मनोळीस गेली. सरकारचे फौजेंतील दोनशें खासा जखमी व ठार व पायदळापैकीं पन्नास साठ माणूस जखमी व ठार. घोडें पाउणशें ऐशीं ठार व दोन-

---

१ गोखले.

शेंपर्यंत जखमी, याप्रों जाहलें आम्हां तिघांतून या लढाईंत जखम कोणास लागली नाहीं. श्रीमंतांचे पुण्येंकरून खैर आहे. पेशजी लढाईंत जखमा मला लागल्या आहेत त्याही महिना पंधरा दिवसांत बऱ्या होऊन स्नान करावयास मोकळीक होईल. लोकांनीं मेहनतही बहुत केली. परंतु यश श्रीमंतांचे प्रतापाचें ! बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ४३९७ श्री. (भाद्रपद व. १३–७ आक्टो.)

पै॥ छ० २७ रबिलाखर. सन तिस्सा तिसैन भाद्रपद.

सेवेसीं नारो हरि करंदीकर दोनी कर जोडून शिर साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ता॥ छ० २६ रबिलाखर पावेतों मु॥ करवीर. यथास्थित असे. विशेष. पुण्यास श्रीमंतांस दगा करावयाचा उद्योग जाहला होता, परंतु साधला नाहीं. मारेकरी यांची चवकशी होत आहे, असें येथें वर्तमान आहे. स्वामींकडे पुण्यांतून तपशीलवार वर्तमान आलेंच असेल. राजश्री रत्नाकरपंत राजाज्ञा यांची व राजश्री धोंडोपंत गोखले यांची लढाई जाहली. बेकामपणें गांठ घातलियामुळें राजाज्ञांचा मोड जाहला. हें वर्तमान स्वामींकडे तिकडून लिहिलें आलें असेल. कागदाचीं पानें पाठवावयाची आज्ञा व्हावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४३९८ श्री. (भाद्रपद व० १४–८ आक्टो.)

पै॥ छ० २७ राबिलाखर सन तिस्सा तिसैन. भाद्रपद.

[3]सेवेशीं विज्ञापना. काल मंदवारीं मनोळीहून पत्रें आलीं त्यांतील वर्तमान–"राजश्री रात्नाकरपंत राजाज्ञा यांची व गोखले यांची लढाई जाहली; राजाज्ञा यांचा मोड जाहला; लष्कराचा ठिकाण

---

१ मी व माझे पुतणे आपा व बापू या तिघांपैकीं. २ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. ३ नारो हरि करंदीकर यांचें पत्र करवीराहून.

नाहीं; मागाहून वर्तमान येईल तें लिहून पाठवीन;" असें वर्तमान आलें. त्याजवर आज रविवारीं चार घटका दिवसास राजाज्ञा यांचीं पत्रें आलीं त्यांतील वर्तमान कीं छ० २२ रबिलाखर बुधवारीं सायंकाळींच्या प्रहर दिवसास राजश्री धोंडोपंत गोखले सावनुराहून तोफखाना वगैरे सरंजाम फौजसुद्धां तयार होऊन आले, आणि लढाईचें तोंड लाविलें. तोफांची व बाणांची मारगिरी बहुत जाहली. तोफांच्या मारगिरीपुढें राजाज्ञाकडील फौजेचा इलाज चालेनासा जाहला. नंतर काढतें घेतलें. हा डौल पाहून गोखले याणीं चालोन घेतलें. मोड जाहला. बुणगें व तोफा व डेरे राहुट्या वगैरे सरंजाम झाडून तळावर राहिला. सडी फौज हजार पावेतों अजमासें बरोबर राहिली. कारडगीहून निघाले. कुंदगोळास आले. गळाठा लष्कराचा बहुतच जाहला. जायांजखमी माणूस सात आठशेंपर्यंत जाहलें. राजाज्ञा खैर आहेत. हें वर्तमान. ऐकोन खुशालीच्या तोफा पांच बार व वाड्यांत साखरा वांटल्या! याप्रमाणें वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. सुरापुरास[१] कुमकी फौजेचा नाद आहे, याकरितां राचय्या जंगम व कारकून यांची रवानगी आज होत आहे. कळावें हे विज्ञापना. राजश्री हिंमत बहाद्दर यांस जखम आहे परंतु खैर आहेत. कळावें हे विज्ञापना.

नं. ४३९९ श्री. (कार्तिक शु. ९ श. १७१८)
(९ आक्टो. स. १७९६)

चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा यांसीं आशीर्वाद उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. करवीरकरांकडील लोकांची व धोंडोपंत गोखले यांच्या भाच्याची खानापुरावर कलागत होऊन

---

१ तुमच्या कुमकेस फौज पाठवितों असा सुरापुरकरानें करवीरच्या महाराजांकडे नाद लाविला आहे. २ हें गंगाधरराव गोविंद यांचें स. १७९६ मधलें पत्र येथें चुकून छापलें.

गोखले यांच्या भाच्यास जखमा लागल्या. नंतर करवीरकरांचा जमाव पळून आला, व धोंडोपंत गोखले वकुंद प्रांत कित्तूर येथें आले. याउपर काय होतें तें पहावें म्हणून तुम्हीं लिहिलें तें कळलें. श्रीइच्छा प्रमाण ! येथून कारकून गेला त्याचें पत्र आलें नाहीं. आल्यावर समजेल. अलीकडील वर्तमान आलें असेल तें कळवावें. रा॥ छ० ८ जमादिलावल. पुण्याहून राजश्री बाबूराव शिवाजी व बाबाजी विश्वनाथ यांचीं पत्रें सोमवार दोन प्रहरचीं आलीं तीं आज दोन प्रहरीं पावलीं. श्रीमंत राजश्री बाजीरावसाहेब यांस प्रधानकीचीं वस्त्रें पंचमी रविवारीं बारा घटका रात्रीं आवशीचे जहालीं. कळावें. सोमवारीं होणार होतीं, परंतु षष्टी आहे यास्तव रविवारींच जालीं. पाच्छापुराहून बळवंतराव याचें पत्र आलें. महाराजांचा मुक्काम मनोळीस आहे. गोकाक तालुक्याचे गांव जाळून खराबी केली यास्तव धोंडोपंत गोखले याणीं मुरगोडास महाराजांचें ठाणें आहे तेथें पंचवीस हजार रुपयांचा रोखा केला आहे, म्हणून लिहिलें आहे. श्रीमंतांस वस्त्रें जालीं. तोफा येथें जाहलेल्या आइकावयास आल्याच असतील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे आशीर्वाद.

नं. ४४०० श्री. (आश्विन शु० १-१० आक्टो.)

पै॥ छ २९ रबिलाखर सन तिस्सा तिसैन. भाद्रपद.

[1]सेवेशीं विज्ञापना. श्रीमंत राजश्री पंतअमात्य यांस एक दोन पत्रें जमावसुद्धां येणेंविषयीं पत्रें व हुजरे श्रावणमासपासून (येथून) जातात. परंतु पंतांचें येणें जाहलें नाहीं. यास्तव त्यांच्या बाबती प्रांतांत आहेत तो ऐवज सालमजकुरीं जप्त केला आहे. राजश्री तुकारामपंत निसबत पांढरे याजकडील कारकून व लोक यादवाडचें ठाणें घालावयाकारितां गेले. दोन रोज झाले. पांढरे यांच्या सरंजामास यादवाड लाऊन दिलें आहे. कळावें. करवीरकर वाणी उदमी व

१ नारो हरी करंदीकर यांचें पत्र करवीरकर महाराजांचे लष्करांतून.

सावकार यांस (महाराज) ऐवज मागतात, याजमुळें आज दोन तीन दिवस सारे महानाडींनीं समा केला आहे. पुढें काय ठरतें पहावें. परंतु पैका सोडीत नाहींत ! नागवितात ! कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४०१　　श्री.　　(आश्विन शु० १-१० आक्टो.)

पै॥ छ० २९ रबिलाखर. सन तिस्सा तिसैन. भाद्रपद.

सेवेशीं विज्ञापना. राजश्री रत्नाकरपंत राजाज्ञा व हिंमत. बहादर व नारायणराव पाटणकर व सटवोजी यादव वगैरे संवदत्तीस आले. कुंदगोळास दम निघाला नाहीं. पाटणकर व यादव व हिंमत-बहादर यांस जखमा आहेत. राजाज्ञांची घोडी गोळी लागोन पडली. तोफांजवळ राजाज्ञा याणीं खस्त केली, परंतु उपाय चालला नाहीं. आजपर्यंत मनोळीस आले असतील, किंवा संवदत्तीवरच राहतील. येथून कांहीं डेरे राहुट्या राजाज्ञा यांजकडे काल इंदुवारीं रवाना जालें. हिंमतबहादर व यादव यांचे घराहूनही थोडें सामान रवाना जालें. पांढरे यांजकडील खांशांपैकीं यशवंतराव पांढरे यांचे बंधु ठार पडले. व शहाजी पांढरे गर्दींत सांपडले त्यांचा पत्ता नाहीं. व नीलकंठराव शिंदे धाडाव गेले. वरकडांचा पत्ता अद्याप पुरता लागला नाहीं. मागाहून जसें जसें वर्तमान येईल तसें कळवीन. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. कासेगांवावरी फौज आहे त्यांचा व शिराळ्यास इकडील जमाव राजश्री केदारजी माने व बचाजीपंत यांजबरोबर आहे त्यांचा वाटेगांवाच्या सुमारें मुकबला जाहला. शिराळे-वरील जमावानें कासेगावावरील फौजेस मागें सारिलें. काल्यास गेले असें वर्तमान माने व बचाजीपंत यांचें पत्र काल इंदुवारीं आलें त्यांत लिहिलें होतें. कळावें. जासूद चार असामी गेले आहेत त्यांपैकीं एकही अद्याप फिरला नाहीं. हल्लीं प्यादाबरोबर पत्रें सेवेशीं पाठविलीं आहेत. जासुदास जाबाची आज्ञा व्हावी. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना

१ पत्र नारोपंत करंदीकर वकील यांचें करवीराहून.

नं. ४४०२ (आश्विन शु. २–११ आक्टोबर.)

सेवेशीं बाळकृष्ण महादेव. कृतानेक सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० १ जमादिलावलपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामीनीं बहुता दिवशीं कृपा करून राजश्री मोरोपंत परांजपे यांजसमागमें पत्र पाठविलें तें पावलें. त्यावरून बहुत संतोष जाहला. श्री॥ राजश्री नानांस पत्र होतें तें प्रविष्ट करून मोरोपंतांची गांठ घालून सविस्तर बोलणें बोलवून पत्राचें उत्तर देऊन रवानगी केली. ते सेवेशीं येऊन निवेदन करितील. श्री॥ राजश्री नानानीं आपलेकडील खातरजमेचे गृहस्थ राजश्री लक्ष्मणपंत पेंडसे पत्र स्वामीस देऊन पाठविले आहेत व सविस्तर सांगितलें आहे. विनंती करितील त्याप्रमाणें श्रीमंत भाऊसाहेबांचे हातचें पत्र व दूर्वा देऊन म॥ निल्हेची रवानगी सत्वर जाली पाहिजे स्वामी उभयतांचे पूर्ववत्प्रमाणेंकरून देणार, फार चांगलें आहे. इकडील खातरजमा आपण आज्ञा करितील त्याप्रमाणें करून पाठवितों. तिकडील खातरजमा करून घ्यावी. थोरलें यश स्वामीनीं घ्यावें हेंच सेवकाचें मानस. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४०३ (आश्वि० शु० ३–१२ आक्टो.)

नारो हरी करंदीकर याचें करवीराहून मिरजेस पत्र. पै॥ छ० ३ जमादिलावलचें—

" राजश्री हिंमतबहाद्दर यांची चीजवस्त वगैरे सरंजामसुद्धां संभाळून आले. फक्त डेरा मात्र तळावर राहिला. हिंमतबहाद्दर यांस चार जखमा आहेत. राजाज्ञा यांचें व (हिंमतबहाद्दर) चव्हाण यांचें वांकडें अंतर्यामीं होतें याजमुळें गोखले यांचें व त्यांचें कांहीं फितुराचें संधान होतें असें कोणी लष्कराहून आलेले बोलतात. मग हिंमत-

---

१ गंगाधरराव गोविंद यांस नानांचा विश्वासू कारकून बाळकृष्णपंत बाळ यांचें पत्र पुण्याहून.

बहादुर तेवढे आपलें सामान संभाळून आले म्हणून म्हणतात कीं काय न कळे ! रायाजी जाधव व हैबतराव गायकवाड हजार लोकांनिशीं आजपर्यंत मनोळीस दाखल जाले असतील. राजाज्ञा यांचें म्हणणें कीं, करवीरास येत नाहीं. गोखल्यांचें पारिपत्य करूं किंवा तिकडेच मरूं ! कसा निभाव लागतो पहावें. जाधव व गायकवाड अद्यापि गोकाकच्या नदीवरच आहेत. खर्चास मिळाल्याशिवाय लोक आम्ही नदी उतरत नाहीं असें बोलतात. ''

नं. ४४०४ श्रीगणपति. (आश्विन शु० २–११ आक्टो.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. तोंडलीं व हदग्याच्या शेंगा व कढीलिंबाची जुडी पाठविली ती पावली. आज भृगुवारीं गुंडेवाडीनजीक मुक्कामास आलों. रवाना छ० १ जमादिलावल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन. आश्विन मास.

नं. ४४०५ श्री. (आश्वि० शु० ४–१३ अक्टो.)

पै॥ छ० ३ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन. आश्विन मास.

सेवेशीं विज्ञापना. कऱ्हाडाहून राजश्री मोरोपंत पेंढरकर फौजसुद्धां कासेगांवावर आले. शिराळ्यांस आणखी वरचेवर प्यादे व राऊत थोडे बहुत जमाव (येथून) रवाना होत आहे. किल्ले पन्हाळा येथून गडकरी दोनशें प्यादे रवाना व्हावयाची आज्ञा जाहली आहे. मुसा इस्मिथ याजकडील लोक पेशजी जाधव यांजकडे अंकलीस जावयास नेमिले होते, त्यास तिकडे जावयाचे राहिले. हल्लीं शिराळ्यांस रवाना करणार. त्यास आजपर्यंत मागील तलब राहिली व चालत्या महिन्याचा रोजमरा येणेप्रों फडशा झाला तर जाऊं, नाहींतर जात नाहीं, म्हणतात. अद्याप तोड पडली नाहीं. पांढरे व कदम यांचीं

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस. २ नारो हरी करंदीकर याचें पत्र करवीराहून.

पथकें शिराळ्यास आहेत त्यांणीं खर्चाचा बोभाट लिहिला आहे. चार दिवस वाट पहातों, नाहीं तर निघोन येतों, असें लिहिलें आहे. कळावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. कऱ्हाडकर व रास्ते यांची फौज कासेगांवाकडे होती ती झाडून कऱ्हाडास उठोन गेली. कासेगांव व वाटेगांव व मालखेड यांणीं आपणास कौल देणें म्हणोन शिराळ्यांस पत्र पाठविलें. सदर वर्तमान राजश्री बचाजीपंत याचें पत्र शिराळ्याहून आलें त्यांत लिहिलें आहे. परंतु तिकडे (येथून) फौज जावयाचें कारण समजत नाहीं. कळावें हे विज्ञापना.

नं. ४४०६ **श्रीगणपति.** (आश्विन शु० १०–१९ अक्टो.)

चिं ॥ राजश्री बळवंतराव यांसीं प्रति परशुराम रामचंद्र आशीर्वाद उपरी. आम्ही आज मौजे केंपवाड येथील मुक्कामास आलों. आपण कधीं येणार तें कळवावें. रवाना छ० ९ जमादिलावल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० ९ जमादिलावल. आश्विनमास. सन तिस्सा तिसैन. चार घटका रात्र आवशीची.

नं. ४४०७ **श्रीगणपति.** (आश्विन शु० १०–१९ अक्टो.)

चिंा० राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपा यांजकडून आज पत्रें आलीं. मुक्काम तालिकोट व अलमेलें व सुरापूर या तिहींच्या सरहद्दीवर माडबाळास आहे. रवाना छ० ९ जमादिलावल. हे आशीर्वाद.

पै॥ छ० १० जमादिलावल. सन तिस्सा तिसैन. आश्विन.

नं. ४४०८ (आश्वि०शु० ११–२० अक्टो.)

आपाजी गोविंद यांजकडून पत्र मिरजेस. पै॥ छ० १३ जमादिलावलचें.

---

१ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस. २ पत्र परशुरामभाऊंचें गंगाधरराव यांस.

" मोंगलांची स्वारी दसऱ्यास करकंबेवर येणार याविषयीं नाना फडणिसांची मोंगलांस आज्ञा आहे. खडर्याजवळ भाऊसाहेबाकडील घोडगांव आहे तें काल लुटलें. शारंगपाणी यांस युक्तीच्या वाटेनें नाना फडणिसांकडून पत्र आणविल्यास (तालुक्याचा) बचाव होईल. "

नं. ४४०९ (आश्विन शु० ११–२० आक्टो.)

नारो हरी करंदीकर यांचें पत्र करवीरकरांच्या लष्करांतून पै॥ छ० ११ जमादिलावल—

" धोंडोपंत गोखले व रत्नाकरपंत आपा राजाज्ञा यांमध्यें लढाई छ० २१ रबिलाखरीं होऊन राजाज्ञा यांचा मोड जाला व गोट लुटला गेला असें करवीराहून राजश्री सखाराम शेषाद्रि यांचें पत्र आलें तेंच बाजिन्नस सेवेशीं पाठविलें आहे. "

नं. ४४१० (आश्विन शु० ११–२० अक्टो.)

नारो हरी करंदीकर यांचें पत्र करवीरकारांच्या लष्करांतून मिरजेस. पै॥ छ० ११ जमादिलावल—

" धोंडोपंत गोखले व रत्नाकरपंत राजाज्ञा यांची लढाई जाल्याचें वर्तमान सविस्तर कृष्णाजी परशुराम गद्रे याणीं राजश्री व्यंकटराव नरगुंदकर यांस लिहिलें होतें त्या पत्राची नक्कल त्यांनीं पहावयास पाठविली तीच पाठविली आहे. "

नं. ४४११ **श्रीगणपति** (आश्विन शु० ११–२० आक्टो.)

नक्कल.[1]

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामीचे सेवेशीं. पोष्य परशुराम रामचंद्र. कृतानेक सा॥ नस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ० १० जमादिलावल मु॥ केंपवाड वर्तमान यथास्थित असे. विशेष. आम्ही मांडवगणास होतों तेथून सातार्‍यास

१ ही नक्कल गंगाधरराव यांच्या हातची आहे.

रास्ते यांचे योगें आलों. फौज दहा बारा हजार ठेविली. सातान्याचा बंदोबस्त जाल्यानंतर फौजसुद्धां इकडे आलों. आपलें येणें पुण्यास जालें हें ऐकोन संतोष जाला. श्री॥ राजश्री पंत प्रधान यांचा रोष मजवर आहे, त्यास आम्ही श्रीमंतांचे सेवक बहुता दिवसांचे. सेवकापासून अंतर पडलें असतां श्रीमंतांनीं कृपा करून सांभाळ करावा. चित्तांत अंतर पडलें तें आणूं नये. श्रीमंतांचे पायांखेरीज आश्रय आम्हांस कोणाचा नाहीं. येविशीं श्रीमंतांस आपण विनंती करून आम्हांविशीं खातरजमा होईल तो अर्थ केला पाहिजे. येथून राजश्री मोरो आपाजी कारकून पाठविले आहेत. विस्तारें करून विदित करितील. बहुत काय लिहिणें. कृपा करावी हे विनंती.

नं. ४४१२ श्री. (आश्विन शु० १२-२१ अक्टोबर.)

पै॥ छ० ११ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन. आश्विन.

सेवेसीं विज्ञापना. श्री॥ राजश्री पंत विशाळगडकर यांजकडे शिराळेचें ठाणें दिलें त्यास पंत शिराळ्यांस बंदोबस्ताकरितां जाणार. वाळवेकर व अष्ट्यांवरील जमाव व बहादूरवाडीकर हे मिळोन दंगा करितात. इकडील हिंगणगांव कवड्यानजीक आहे तें लुटलें. याजकरितां तिकडील बंदोबस्तही पंतांकडे सांगितला आहे. कदमांचें पथक नेमून दिलें आहे. अष्ट्यांकडे दंगा करितील याजकरितां सूचना लिहिली आहे. व कवठें दुधगांव वगैरे गांवांचाही बंदोबस्त करणेंविषयींची आज्ञा जाहली आहे. सारे गांवांस करवीरकरांनीं अभयपत्रें तों दिलीं आहेत, आणि असेंही ऐकितों! मध्यस्थासही मजकूर सांगितला आहे. त्याणीं उपद्रव होणार नाहीं म्हणून सांगितलें आहे. परंतु विश्वास नाहीं. याजकरितां तिकडे गांवगन्ना लोक आले म्हणजे बंदोबस्त राहील. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ नारो हरी करंदीकर यांचें पत्र करवीराहून.

नं. ४४१३ श्रीगणपति. (आश्विन शु० १२-२१ आक्टोबर.)

चिरंजीव राजश्री बळवंतराव यांसीं आशीर्वाद उपरी. पेदरू फिरंगी शंभर माणसांनिशीं तोफ आणावयास पाठविला आहे. तरी सरंजामसुद्धां रवानगी समक्ष बोलण्यांत आल्याप्रमाणें व्हावी. रवाना छ० ११ जमादिलावल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० १३ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन. आश्विन.

नं. ४४१४ श्रीगणराज. (आश्विन शु० १३-२२ अक्टो.)

नक्कल.

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेशीं.

पोष्य गंगाधर गोविंद सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ० १२ जमादिलावल इंदुवारपर्यंत आपले कृपेंकरून सुखरूप असे. विशेष. आपण राजश्री लक्ष्मणपंत पेंडसे यांजबरोबर पत्र पाठविलें तें छ० ८ जमादिलावलीं गुरुवारीं पावलें. सविस्तर म॥ निल्हे सांगतां कळेल म्हणून लिहिलें, त्याजप्रमाणें कळों आलें. नंतर परवां शनिवारीं पेंडसे यांस समागमें घेऊन सैन्यांत आलों. वडिलांची भेट करवून समक्ष खातरजमा वडिलांनीं केली. सारांश उभयपक्षीं द्वैतार्थ पूर्वींही नव्हता. आतांही नसावा. माझेसमक्ष वडिलांनीं खातरजमा केली आहे. आपण दुसरा अर्थ चित्तीं न आणावा. ममता पूर्ववत् करावी. वडील प्रस्तुत कूच करून सुरापूर प्रांताकडे गेले. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ४४१५ श्री. (आश्विन शु० १३-२२ अक्टो.)

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामीचे सेवेशीं

पोष्यें परशुराम रामचंद्र. कृतानेक सा॥ नमस्कार विनंती येथील कुशल तागायत १२ जमादिलावल इंदुवारपावेतों आपले

---

१ हें भाऊंचें पत्र पोंचल्यावर नाना फडनवीस यांनीं भाऊंस खातरजमेचें पत्र पाठविलें त्यांत असाच मजकूर आहे. सर्व पत्र नानांच्या हातचें आहे. तें येथें घेतलें नाहीं.

कृपेंकरून आम्हांकडील वर्तमान यथास्थित असे. विशेष. आपला आमचा स्नेह पूर्वी चालत होता. मध्यें विपर्यास कित्येक गोष्टींवरून चित्तांत आला तो आम्हीं सोडला. पूर्वी आपला आमचा स्नेह श्री॥ कैलासवासी माधवराव नारायण पंतप्रधान यांचे समाप्तीपर्यंत चालत आला त्याप्रमाणें चालूं. यांत अंतर होणार नाहीं. येविशीं श्रीगणपतीच्या दूर्वा दिल्या आहेत. याउपर कांहीं किंतु मनांत नसावा. मजकडूनही नाहीं. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

नं. ४४१६ **श्रीगणपति.** (आश्विन व. ३–२७ अक्टोबर)

चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांस आशीर्वाद उपरी. राजश्री शंकर नाईक नरगुंदे यांजकडे रुपें दागिने व सोनेचे दागिने गहाण ठेवून आठ आण्यांचें व्याज करार करून अठेचाळीस हजार दोनशें दहा रुपये दोन आणे, नवे हुकेरी, कर्ज चि॥ राजश्री रामचंद्रपंत आपांनीं घेतलें त्याची मुदत जाली. ऐवज मुदतींत यावयास मिळाला नाहीं. व्याज चढतें. ऐवज मिळोन गहाण सुटणें कळतच आहे ! ते पक्षीं मोडाभाज करून फडशा करावयाचा. त्यास गहाण दागिने सोनें व रुपेंचे आहेत, त्यास रुपें दागिने नवे हुकेरीचे टांकसाळेस शिक्का पाडून सोय कशी पडते, अथवा खंडून देणेंची सोय कशी पडते, याची रमारमी पाहोन सोय सरफेची दिसेल तैसें करून ऐवज नरगुंदे यांस पावता करावा. सोनेंचे दागिने आहेत तेच दागिने कस दराची चौकशी करून नरगुंदेस पुरविल्यास नरगुंदे घेतील. न पुरवे तरी दुसरे घेतील त्यांस विकून ऐवज नरगुंदे यांस पाववावा. व्याज चढतें याजकरितां लौकर उलगडून द्यावें. वजनाच्या व दागिन्यांच्या नरगुंदे यांजजवळ अजमासाच्या याद्या व खतें आहेत व विठ्ठल अनंत फडके यांजवळ मूळच्या वजनाच्या आहेत त्यांची

चौकशी करून उलगडा पाहून देववावा. रवाना छ० १७ जमादिलावल. बहुत काय लिहिणें हे आशीर्वाद.

पै॥ छ० २२ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन आश्विनमास.

नं. ४४१७ श्री. (आश्विन व० ८–१ नोव्हेंबर)

पै॥ छ० २३ जमादिलावल. दोन तास रात्र. आश्विन मास सन तिस्सा तिसैन.

सेवेशीं विनायक विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० २२ जमादिलावल मु॥ महागांव कृष्णादक्षिणतीर यथास्थित असे विशेष. स्वामींनीं छ० १९ मिनहूचें पत्र पाठविलें तें पावलें. शिलेदारांस वगैरे खर्चास पाठविलें तें पावलें. ऐवजाची पावती अलाहिदा आहे. वरकड इकडील मजकूर, अधिकोत्तर नाहीं. रास्ते यांचा मुक्काम सातार्‍याचे अलीकडे पावणा कोसावर आहे. तेथून कृष्णातीरास तांदुळवाडी आहे तेथें येणार म्हणोन जागा पाहिली आहे. परंतु येणेंची त्वरा नाहीं. श्री॥ राजश्री भाऊसाहेबांकडे वेदमूर्ति राजश्री बापू दिक्षीत जोग मागेंच गेले आहेत. व राजश्री केसोपंत काळे व रास्ते यांजकडील मार्तंडपंत ऐसे जाऊन चार दिवस जाहले. त्यांची वाट पहात आहेत. अद्याप सातारेवर राजश्रीजवळ ठेवावयाचा गृहस्थ तो कोणी ठरला नाहीं. सातारेचा कारभार हातकाढणीवरच आहे. पुण्याहून नानाचे चित्तांत महाराजाजवळ ठेवावयासीं हुजुरून कोणी रवाना करावा. रास्ते यांजकडे किल्ला ठेवूं नये असें आहे म्हणोन ऐकितों. सेवेशीं विदित होय हीं विज्ञापना.

नं. ४४१८ श्री. (आश्विन व० ९–२ नोव्हेंबर)

पै॥ छ०२३ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन.

[1]सेवेशीं विज्ञापना. राजश्री बाबा फडणवीस काळे यांची

---

१ नारो हरी करंदीकर यांचें पत्र करवीराहून.

पत्रें राजश्री बचाजीपंत व रघुनाथराव माने यांस आलीं होतीं त्यांतील मजकूर कीं, श्रीमंत राजश्री भाऊसाहेब यांचें व महाराजांचें रहस्य असावें. त्यास उभयतांची भेट जाहल्यास उत्तम आहे. अशीं पत्रें आलीं. उभयतांनीं महाराजांस पत्रें दाखविलीं. त्याजवरून बचाजीपंत यांस जावयाची आज्ञा जाहली आहे. शिरोळास बचाजीपंत येणार, तेथें काळे याणीं यावें, असा येथील संकेत आहे. मग कसें घडतें पहावें. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४४१९ (आश्विन व० १२–५ नोव्हें.)

सेवेशीं मोरो आपाजी परांजपे. दोनी कर जोडून शिर सा॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० २६ जमादिलावल मु॥ पुणें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं इकडे रवाना केलें. आज्ञेप्रमाणें येथें पांचवे दिवशीं छ० २० जमादिलावलीं पुण्यास आलों. तेच दिवशीं (नानांची) भेट मात्र जाली. बोलणें कांहीं एक जालें नाहीं. छ० २४ जमादिलावलीं प्रातःकाळीं गांठ पडली. दोन घटका बोलणें जालें. "येथें तुम्हांजवळ सांगितल्याप्रमाणें भाऊंजवळ तुम्हीं बोलल्यानंतर भाऊ काय बोलले ?" म्हणोन पुसिलें. त्यावरून सांगितलें कीं, "श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांणीं सर्व गोष्टी मान्य केल्या. आपले लक्षाखेरीज दुसरें लक्ष नाहीं. मसुदा करून दिल्याप्रमाणें खासदस्तूरचें पत्र दिलें आहे. येथून राजश्री लक्ष्मणपंत पेंडसे गले होते त्यांजबरोबर वस्तुही दिली ती म॥ निल्हे याणीं प्रविष्ट केलीच आहे." "पावली" म्हणोन उत्तर जालें. "याचप्रमाणें पत्र व वस्तु मजपाशीं द्यावी." म्हणोन बोललों. "उत्तम आहे. दिनशुद्धि चांगली पाहून देतों." म्हणोन बोलले. त्याजवर विनंती केली कीं "शिंदे यांचे घरांतील कलह वाढला आहे याचा समेट होत आला कीं कसें काय ? श्रीमंत राजश्री पंतप्रधान लौकिकामध्यें जें करणें तें आपणांस पुसोन करावें असें आहे, परंतु

नाभिकमलापासून भाव कसे आहेत? राजश्री नारोपंत चक्रदेव श्रीमंतांजवळ कारभार येकत्यारीनें कारितात. त्यांजखेरीज कांहींएक कारभार होत नाहीं. परंतु तेही दोन चार दिवशीं येऊन आपणास सर्व विदित करून कामकाज विल्हे लावितात. त्यांचें लक्ष आपणाजवळ एकनिष्ठेनें आहे किंवा कालदेश पाहून बोलणें तें बोलतात? श्री॥ राजश्री अमृतराव साहेब यांचे विचार आपणापाशीं कसे आहेत? हें सविस्तर पुसोन उत्तर काय होईल तें लिहून पाठविणें" म्हणोन मला आज्ञा आहे. त्यास याचा विचार सांगितला पाहिजे." त्यावरून बोलले कीं "शिंदे यांचे कलहाचा विचार हरतऱ्हेनें मिटावा असें चित्तांत आहे. आणि त्याप्रमाणें घडेल. आजपावेतों इतका अवकाश लागों नये. परंतु आंतून नानाप्रकारचे खेळ होतात त्याजवरून बोलणें लांबतें. आमचा प्रकार राजमार्गानें करणें तें करावें, त्यांत लढे कित्येक येतात! असो. उपाय नाहीं. चार दिवस अधिक उणे लागतील, परंतु बेत बसेल. राजश्री दौलतराव यांचा विचार तरी कळतच आहे. जवळ चार माणसें त्यांजपाशीं आहेत तींही तशींच! त्यांजपाशीं या प्रसंगीं खलबत करणें प्राप्त! हरतऱ्हा करून त्यांचे (शिंद्यांच्या) परिघांतून निघोन आपले पेठेंत येऊन राहिलों. त्यांचा इतला आम्हांकडे नाहीं. याप्रमाणें करावयास पांच रुपये खर्च जाला, उपाय काय! आपले स्वसत्तेंत आहों. श्रीमंतांचा प्रकार बोलावें एक आणि करावें एक असें होतें. विश्वास बोलण्याचा धरून परिणाम नाहीं. (अमृत) रावसाहेब यांचा विचार लोभी! शंभर रुपये दिले असतां सरकार दौलतीमध्यें लाख रुपयांची खामी जाली असतां चिंता नाहीं, हे समज तेथें आहेत! वाड्यांत स्वस्थ बसले आहेत. आमचे जागां स्नेहही नाहीं आणि रागही नाहीं. कारभारप्रकरणीं कांहीं एक बोलत नाहींत. परंतु उभयतांचें (पेशवे व अमृतराव यांचें) अंतर्याम कोणे

रीतीनें आहे हें समजत नाहीं. लौकिकांत चित्त शुद्ध नाहीं असें आहे. परंतु खातरजमा होत नाहीं. त्याचा विचार काय? तूर्त शिंद्यांची (व बायांची) एकी करून त्यांणीं कूच करून जावें या बेतामध्यें आहों. ते गेल्यानंतर भाऊंचें आमचें एक चित्त जालें आहे, ते श्रीमंतांपाशीं आहेत, आम्ही सर्व सोडून हरएक उत्तम स्थळीं स्नानसंध्या करून राहणार. तेथें राहिलें असतां भाऊ दौलतीमध्यें सरदार आहेत. आम्हांस कांहींएक चिंता नाहीं. माझे चित्तांत याउपर कारभार करावा हा विचार राहिला नाहीं. बहुत दिवस कामकाज सरकारचें केलें. उमेद राहिली नाहीं." याप्रमाणें उत्तर जालें. "कदाचित् आपण भाऊंस इकडे बोलाविलें असतां श्री॥ राजश्री भाऊंनीं सांगितलें आहे कीं, विना खर्चाची बेगमी जाल्याखेरीज निर्वाह होणार नाहीं. इकडे फौजसुद्धां आहों, त्यास रानांत आहों; पिकें जाहलीं आहेत. फौजेस दाणावैरण लुटीची मिळते. पांच रुपये आगेमागें दिल्यास चालतें. पुढील आशा दाखविली असतां लोक मुरवतीवरून राहतात. तिकडे येणें जालें असतां पैक्याखेरीज लोक येणार नाहींत. त्यास खर्चाची तजवीज हरकसेंकरून करावी लागेल, म्हणोन सांगितलें आहे;" म्हणोन बोललों. त्यास श्री॥ राजश्री नाना बोलले कीं, "मजपाशीं कांहीं एक राहिलें नाहीं. रिकामे होऊन बसलों आहों." त्यास मीं विनंती केली कीं "आपण हरकसें कोणास सांगून सावकाराकडून देवावें. कराराप्रमाणें त्यास पावेल. आपण खातरजमा मात्र करावी." तेव्हां उत्तर केलें कीं "शिंद्याकडे पांच हजार रुपये हुंडणावळीचे भरावयाचे होते त्याजकारितां सावकाराकडून आज आठ दिवस पटवितों ते पटत नाहींत. आतां सावकारांत जीव राहिला नाहीं हें तुम्ही पहातच आहां. आणखी पुण्यामध्यें कोणी पैकेकरी आहे नाहीं हे विचार कळतच आहेत. प्रसंग कोण आहे! याप्रमाणें

लिहावें " म्हणोन सांगितलें. त्याजवरून सेवेसीं विनंती लिहिली आहे. श्री॥ राजश्री नानांस उभयतां वडिलीं पत्रें लिहून पाठवावयाचे मसुदे पाठविले ते नानांस दाखविले. " चांगले आहेत. याप्रमाणें पत्रें आणविणें " म्हणोन सांगितलें. मुजरद जासूद पाठविला आहे. लौकर पत्रें यावीं. बहुत काय लिहिणें. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४२० श्री. (आश्विन व० १२–५ नोव्हेंबर.)

पै॥ छ० २९ जमादिलावल सन तिस्सा तिसैन.

[1]सेवेशी विज्ञापना तागायत छ० २६ इंदुवार मुकाम पुणें सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥राजश्री विठ्ठलराव बापू नानांचे दर्शनास गेले होते. समागमें राजश्री व्यंकटराव नरगुंदकर होते. नानांचें दर्शन परवानगी लागोन जाहलें. नानांजवळ अर्ध घटिका बसले होते. नानानीं पुसिलें कीं, अद्याप तुम्ही पुण्यांतच राहिलां आहां. मिरजेस गेलां नाहीं ? तेव्हां येथेंच आहें म्हणून उत्तर केलें. आणखी दहा पांच शब्द नाना बोलले त्याचें प्रतिउत्तर नरगुंदकर राव याणींच केलें. बापूसाहेब कांहीं बोलले नाहीं. हा मजकूर श्री॥राजश्री नानांनींच सांगितला. विठ्ठलराव यांचा विचार याप्रमाणेंच राजश्री चिंतामणराव यांचा विचार आहे कीं कसे आहेत म्हणोन (नानांनीं) पुसिलें. बाळकृष्णपंत भाऊ व मीं विनंती केली कीं, तिकडेही हाच विचार आहे. श्रीमंत राजश्री विठ्ठलराव बापू पुण्यांत दोन तीन वर्षें बसले आहेत. घरकलहाविषयीं लोकांजवळ मनस्वी भाषणें करितात. आबा काळे यांचे मार्फतीनें आठचार दिवसीं श्रीमंतांचे दर्शनास जात असतात. घरकलह नित्यच करावयास एकदोन लुच्चे मिळोन नानाप्रकारें मातुश्रीस व उभयतांस शिकवून या तऱ्हेस नेलें. कोणीं कांहीं एक समजाविलें असतां तेंच ध्यानांत आणून चार पांच वर्षें कलह मांडिला आहे. हें वर्तमान पेशजी श्रीमंत राजश्री बाळासाहेब यांणीं आपणांस

---

१ मोरो आपाजी परांजपे यांचें पत्र मिरजेस बाळासाहेबांस.

दोन चार वेळ लिहिलें आहे. ध्यानांत असेल. याचा विचार करणें तो आपणाखेरीज नाहीं. श्री॥ राजश्री बाळासाहेब यांचें लक्ष आपणाजवळ कोणते रीतीनें आहे याची खातरजमा स्वामींस आहे त्या अर्थी सर्व बंदोबस्त क्रमेंकरून आपणासच करावा लागेल. त्यांचा भरंवसा आपणावर. त्या अर्थी आपणच बंदोबस्त करणें तो करावा लागेल. " मला सर्व ठाऊक आहे. कांहीं चिंता नाहीं. सर्व यथास्थित होईल " म्हणोन उत्तर जाहलें. वडिलांस कळावें म्हणून लिहिलें आहे. लौकिकांत मजकूर होऊं नये. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४४२१ श्री. (आश्विन व० १२–५ नोव्हेंबर.)

पै॥ छ० २९ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन.

सेवेशीं विज्ञापना ऐसी जे, स्वामींनीं मला इकडे पाठविलें. प्रथम येथें बोलोन स्वामींकडे आलों. नंतर घटितार्थ घडोन आला. परस्पर खातरजमा जाहली. आपले पत्रावरून श्री॥ राजश्री नानांची खातरजमा जाहली कीं, राजश्री गंगाधर रावजी मध्यें आहेत. त्यांचे विचारें हा विचार जाहला. फार उत्तम गोष्ट जाहली. पुढें कोणीकडूनही लढा पडणार नाहीं. याप्रमाणें होऊन विचार जाहला. हल्लीं एक दोन दिवसांमध्यें श्री॥ राजश्री नानांस विनंती कोणी एका गृहस्थानें केली कीं, राजश्री भाऊंकडील जाबसाल बोलणें चालणें ते भाऊंकडील कोणी एक कारकून बोलतील. इतर भाऊबंदांकडून कोणी एक बोलणें बोलत असल्यास त्यांजकडून कामकाज घेऊं नये.

भाऊंचें बोलणें होतें तेव्हां भाऊंचा आमचा निखालसपणें विचार होता. अलीकडे त्यांचें आमचें विटलें होतें तें राजश्री गंगाधर रावजी यांजकडून बोलणें ठरून एक विचार जाहला आहे. त्यांजकडील कोणी बोलणें बोलेल त्यांचे हातूनच शेवट केला पाहिजे. तुम्हीं म्हणतां हे गोष्ट कशी घडेल ? म्हणोन उत्तर जाहलें. हा मजकूर श्रीमंत राजश्री नानांनीं मला सांगितला त्याजवरून विनंती केली कीं, श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व बाळासाहेब उभयतां एकच विचारें आहेत त्या अर्थी कोणीही बोललें तत्रापि चिंता नाहीं. त्यावरून " तशी गोष्ट कशी घडेल ? जें बोलणें तें गंगाधर रावजींकडून व्हावें यांत सर्वोपरी उत्तम, " म्हणोन सांगितलें. विनंती कोणीं केली म्हणोन एक दोन वेळां पुसिलें तेव्हां त्याचें नांव सांगावयाचें नाहीं म्हणून बोलिले. वाडिलांस कळावें. हें पत्र वाचून ध्यानांत मजकूर आला म्हणजे पत्र विसर्जन करून टाकिलें पाहिजे. या पत्राचा लखोटा निराळाच आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४२२ श्री. (कार्तिक व० ८–१ डिसेंबर.)

सेवेसीं विनंती सेवक सखाराम शेषाद्रि चरणांवर मस्तक ठेवोन शिर साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना ता० छ० २२ जमादिलाखर शुक्रवार दोन प्रहरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत "राजश्री बाळासाहेब यांजकडील शहापुर तालुक्यांतील खेडेकरी यांणीं तळीखोर ठेवोन घेऊन दड्डी कर्यातींत तळी करवों लागले, यास्तव कोडोली व किणी व कोवाडेंकर यासीं बोलोन घेवोन मार्ग द्यावा याप्रमाणें तिन्हाईतमतें वचन घेवोन दड्डीहून स्वारी करून त्या खेड्यांचीं गुरें आणावयाचा ठराव जाला. कोडोली व किणी व कोवाडेंकरांचे वचनावरून स्वारी गेली. जातांना कांहीं नांव घेतलें नाहीं.

घेतलीं. व खेड्यांनीं तीन घोडीं पाडोन घेतलीं. याप्रमाणें कोवाडेंतील कमावीसदारांनीं वचन देवोन विश्वासघात केला. कोडोलीकरांनीं आठ घोडीं घेतलीं. एकूण एकोणीस घोडीं गेलीं याची वाट काय ?'' म्हणोन राजश्री निंबाजी यादव यांणीं वर्तमान सांगितलें. त्यास आमच्या तालुक्यांतील कमावीसदार तळीखोर ठेवोन खटला करितील हे गोष्ट घडावयाची नाहीं आणि स्वारी करावयासीं वाट देणार नाहींत. दरम्यानदाराकडील लबाडी असेल. विचारोन घ्यावें. आम्हाकडोन अशा गोष्टी घडावयाच्या नाहींत; म्हणोन सांगितलें. येविशींचें वर्तमान स्वामींचे सेवेशीं आलेंच असेल. सविस्तर लेखानाज्ञा जाली पाहिजे. दड्डीहून कारकून मुद्दाम याच कामाकरितां हवालदार याजकडोन आला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ३० जमादिलाखर. सन तिस्सा तिसैन मय्या व अल्फ.

नं. ५४२३ श्री. (कार्तिक शु० ३–१० नोवेंबर.)

सेवेशीं विज्ञापना. पेशजी महाराजांजवळ राजश्री आत्माराम बावा म्हणोन सेवा करून होते. त्यांजवर कारभारामध्यें पेंच आला सबब पांच हजार रुपये दंड घेतले. नंतर येथून निघोन जावोन पुण्यांत राहिले. अलीकडे श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब यांचा व आत्मारामबावा यांचा स्नेह बहुत पडला. रा॥ रत्नाकर अण्णाजी याणीं राजश्रीचे विद्यमानें श्रीमंतांकडें संधान केलें होतें. हल्लीं रत्नाकर अण्णाजी यांजवर मर्जी रुष्ट होऊन 'सरकार तालुका झाडून सोडोन द्यावा' याप्रमाणें (श्रीमंतांची) आज्ञा होवोन निरोप जाला. त्यांसमागमें आत्माराम बावासही पाठविलें. उभयतांनीं येथें येऊन श्रीमंतांच्या आज्ञेप्रमाणें सर्व मजकूर श्रुत करोन मागती चिकोडी व मनोळी तालुका हुजूरचे सेवेशीं देऊन शिवाय दीड लाख रुपयेचा सरंजाम स्वामीस सरकारांतून द्यावा याप्रमाणें श्रीमंतांस विनंती करून तहांत

१ पत्र नारो हरी करंदीकर याचें करवीराहून मिरजेस.

गोष्टी आणोन देतों म्हणोन मर्जीनुरूप आत्मारामबावानीं विनंती केली असतां महाराजांनीं त्यांस पालखी, सरंजाम व खर्चास देऊन त्यास रवानगी करून दिली. तिकडे श्रीमंतासीं बोलोन तह कोणते रीतीनें करून येतात पहावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १ जमादिलाखर सन तिस्सा तिसैन मय्या व अल्लफ.

नं. ४४२४ श्री. (कार्तिक—नोवेंबर.)

सेवेशीं[1] विज्ञापना. श्री॥ राजश्री भाऊसाहेब फौजसुद्धां गलगलेवरी आलियाची बातमी लष्करांत आली आहे त्याजवरून निकडीनें ठाणें घ्यावयाची मसलत जाली. येथील शह वारलेनंतर कोणत्या रोखें निघतात पहावें. तेरदाळ तालुकेची खराबी जाली. लष्करांत आमचीं गुरें उमगलीं तींही सोडीत नाहींत. येथें कामें होणेंजाणेंची सुरत स्वामींस विदितच आहे. बातमीकारितां मात्र रहावें, त्यास पुढें मी येथें रहावें अगर निरोप घेऊन यावें येविशींची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. आजीपावेतों महाराजांची ममता रक्षून राहून शेवटास तालुकेची खराबी करून घेऊन अपकीर्ति घेतली याप्रमाणें जगप्रसिद्ध गोष्ट जाली. महाराजांसही बोलणाऱ्यांनीं बोलून ठेविलें. मीही याचप्रमाणें विनंती केली. 'तालुकेची खराबी न होई याअर्थें रहावें, ती गोष्ट होऊं लागले नंतर राहण्याचें काय काम आहे ?' म्हणोन विनंती केली. पुढें स्वामींची आज्ञा प्रमाण. उत्तर येईल त्याप्रमाणें राहणें अगर येणें करितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४२५ श्री. (कार्ति. वद्य—नोव्हेंबर)

सेवेशीं[2] विज्ञापना. बागेवाडीचे मुक्कामीं खासा स्वारी व श्रीमंत पंत प्रतिनिधि व जमनमुलुक हे सर्वत्र मिळाले. फौज दोन हजार पावेतों जमली आहे. मागाहून रा॥ मानसिंगराव पाटणकर येणार. आज कूच करून गोकाक तालुक्यांत जाणार. गोकाकचे ठाणेंतून देसाई

१ पत्र नारो हरि करंदीकर याचें करवीरकरांच्या लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस. २ पत्र नारो हरि करंदीकर याचें मिरजेस. तसेंच पुढच्या नंबरचें.

दोन चार वेळ लिहिलें आहे. ध्यानांत असेल. याचा विचार करणें तो आपणाखेरीज नाहीं. श्री॥ राजश्री बाळासाहेब यांचें लक्ष आपणाजवळ कोणते रीतीनें आहे याची खातरजमा स्वामींस आहे त्या अर्थी सर्व बंदोबस्त क्रमेंकरून आपणासच करावा लागेल. त्यांचा भरंवसा आपणावर. त्या अर्थी आपणच बंदोबस्त करणें तो करावा लागेल. " मला सर्व ठाऊक आहे. कांहीं चिंता नाहीं. सर्व यथास्थित होईल " म्हणोन उत्तर जाहलें. वडिलांस कळावें म्हणून लिहिलें आहे. लौकिकांत मजकूर होऊं नये. सेवेशीं श्रुत होय. हे विज्ञापना.

नं. ४४२१ श्री. (आश्विन व० १२–५ नोव्हेंबर.)

पै॥ छ० २९ जमादिलावल. सन तिस्सा तिसैन.

[1]सेवेशीं विज्ञापना ऐसी जे, स्वामींनीं मला इकडे पाठविलें. प्रथम येथें बोलोन स्वामींकडे आलों. नंतर घटितार्थ घडोन आला. परस्पर खातरजमा जाहली. आपले पत्रावरून श्री॥ राजश्री नानांची खातरजमा जाहली कीं, राजश्री गंगाधर रावजी मध्यें आहेत. त्यांचे विचारें हा विचार जाहला. फार उत्तम गोष्ट जाहली. पुढें कोणीकडूनही लढा पडणार नाहीं. याप्रमाणें होऊन विचार जाहला. हल्लीं एक दोन दिवसांमध्यें श्री॥ राजश्री नानांस विनंती कोणी एका गृहस्थानें केली कीं, राजश्री भाऊंकडील जाबसाल बोलणें चालणें ते भाऊंकडील कोणी एक कारकून बोलतील. इतर भाऊबंदांकडून कोणी एक बोलणें बोलत असल्यास त्यांजकडून कामकाज घेऊं नये. याप्रमाणें भाऊंचें व आपलें मागें बोलणें जाहलेंच आहे. त्यास हल्लींही भाऊंकडून कोणी बोलावयास येतील त्यांचे हातून कामकाज घेत जावें, म्हणोन पुसिलें. तेव्हां नानांनीं सांगितलें कीं, पहिलें आमचें

१ मोरो आपाजी परांजपे यांचें पत्र पुण्याहून मिरजेस. २ भाऊंशीं स्नेह जोडण्याचा.

भाऊंचें बोलणें होतें तेव्हां भाऊंचा आमचा निखालसपणें विचार होता. अलीकडे त्यांचें आमचें विटलें होतें तें राजश्री गंगाधर रावजी यांजकडून बोलणें ठरून एक विचार जाहला आहे. त्यांजकडील कोणी बोलणें बोलेल त्यांचे हातूनच शेवट केला पाहिजे. तुम्हीं म्हणतां हे गोष्ट कशी घडेल ? म्हणोन उत्तर जाहलें. हा मजकूर श्रीमंत राजश्री नानांनीं मला सांगितला त्याजवरून विनंती केली कीं, श्रीमंत राजश्री भाऊसाहेब व बाळासाहेब उभयतां एकच विचारें आहेत त्या अर्थी कोणीही बोललें तत्रापि चिंता नाहीं. त्यावरून " तशी गोष्ट कशी घडेल ? जें बोलणें तें गंगाधर रावजींकडून व्हावें यांत सर्वोपरी उत्तम, " म्हणोन सांगितलें. विनंती कोणीं केली म्हणोन एक दोन वेळां पुसिलें तेव्हां त्याचें नांव सांगावयाचें नाहीं म्हणून बोलिले. वाडिलांस कळावें. हें पत्र वाचून ध्यानांत मजकूर आला म्हणजे पत्र विसर्जन करून टाकिलें पाहिजे. या पत्राचा लखोटा निराळाच आहे. श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४२२ श्री. (कार्तिक व० ८—१ डिसेंबर.)

[1]सेवेसीं विनंती सेवक सखाराम शेषाद्रि चरणांवर मस्तक ठेवोन शिर साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना ता० छ० २२ जमादिलाखर शुक्रवार दोन प्रहरपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्रीमंत "राजश्री बाळासाहेब यांजकडील शहापुर तालुक्यांतील खेडेकरी यांणीं तळीखोर ठेवोन घेऊन दड्डी कर्यातींत तळी करवों लागले, यास्तव कोडोली व किणी व कोवाडेंकर यासीं बोलोन घेवोन मार्ग द्यावा याप्रमाणें तिन्हाईतमतें वचन घेवोन दड्डीहून स्वारी करून त्या खेड्यांचीं गुरें आणावयाचा ठराव जाला. कोडोली व किणी व कोवाडेंकरांचे वचनावरून स्वारी गेली. जातांना कांहीं नांव घेतलें नाहीं. स्वारी घेऊन येतांना कोवाडेकरांनीं आडवे होऊन सहा घोडीं पाडोन

---

१ पत्र रघुनाथराव कुरुंदवाडकर यांस.

घेतलीं. व खेड्यांनीं तीन घोडीं पाडोन घेतलीं. याप्रमाणें कोवाडेंतील कमावीसदारांनीं वचन देवोन विश्वासघात केला. कोडोलीकरांनीं आठ घोडीं घेतलीं. एकूण एकोणीस घोडीं गेलीं याची वाट काय ?'' म्हणोन राजश्री निंबाजी यादव यांणीं वर्तमान सांगितलें. त्यास आमच्या तालुक्यांतील कमावीसदार तळीखोर ठेवोन खटला करितील हे गोष्ट घडावयाची नाहीं आणि स्वारी करावयासीं वाट देणार नाहींत. दरम्यानदाराकडील लबाडी असेल. विचारोन घ्यावें. आम्हाकडोन अशा गोष्टी घडावयाच्या नाहींत; म्हणोन सांगितलें. येविशींचें वर्तमान स्वामींचे सेवेशीं आलेंच असेल. सविस्तर लेखानाज्ञा जाली पाहिजे. दडुहून कारकून मुद्दाम याच कामाकरितां हवालदार याजकडोन आला आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ३० जमादिलाखर. सन तिस्सा तिसैन मय्या व अल्लफ.

नं. ४४२३ श्री. (कार्तिक शु० ३–१० नोवेंबर.)

सेवेशीं विज्ञापना. पेशजी महाराजांजवळ राजश्री आत्माराम बावा म्हणोन सेवा करून होते. त्यांजवर कारभारामध्यें पेंच आला सबब पांच हजार रुपये दंड घेतले. नंतर येथून निघोन जावोन पुण्यांत राहिले. अलीकडे श्रीमंत राजश्री अमृतराव साहेब यांचा व आत्मारामबावा यांचा स्नेह बहुत पडला. रा॥ रत्नाकर अण्णाजी याणीं राजश्रीचे विद्यमानें श्रीमंतांकडे संधान केलें होतें. हल्लीं रत्नाकर अण्णाजी यांजवर मर्जी रुष्ट होऊन 'सरकार तालुका झाडून सोडोन द्यावा' याप्रमाणें (श्रीमंतांची) आज्ञा होवोन निरोप जाला. त्यांसमागमें आत्माराम बावासही पाठविलें. उभयतांनीं येथें येऊन श्रीमंतांच्या आज्ञेप्रमाणें सर्व मजकूर श्रुत करोन मागती चिकोडी व मनोळी तालुका हुजूरचे सेवेशीं देऊन शिवाय दीड लाख रुपयेचा सरंजाम स्वामीस सरकारांतून द्यावा याप्रमाणें श्रीमंतांस विनंती करून तहांत

१ पत्र नारो हरी करंदीकर याचें करवीराहून मिरजेस.

गोष्टी आणोन देतों म्हणोन मर्जीनुरूप आत्मारामबावानीं विनंती केली असतां महाराजांनीं त्यांस पालखी, सरंजाम व खर्चास देऊन ण्यास रवानगी करून दिली. तिकडे श्रीमंतासीं बोलोन तह कोणते ेतिनें करून येतात पहावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १ जमादिलाखर सन तिस्सा तिसैन मय्या व अल्लफ.

नं. ४४२४ श्री. (कार्तिक—नोवेंबर.)

सेवेशीं[1] विज्ञापना. श्री॥ राजश्री भाऊसाहेब फौजसुद्धां गलगलेवरी आलियाची बातमी लष्करांत आली आहे त्याजवरून निकडीनें ठाणें घ्यावयाची मसलत जाली. येथील शह वारलेनंतर कोणत्या रोखें निघतात पहावें. तेरदाळ तालुकेची खराबी जाली. लष्करांत आमचीं गुरें उमगलीं तींहीं सोडीत नाहींत. येथें कामें होणेंजाणेंची सुरत स्वामींस विदितच आहे. बातमीकारितां मात्र रहावें, त्यास पुढें मी येथें रहावें अगर निरोप घेऊन यावें येविशींची आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करीन. आजीपावेतों महाराजांची ममता रक्षून राहून शेवटास तालुकेची खराबी करून घेऊन अपकीर्ति घेतली याप्रमाणें जगप्रसिद्ध गोष्ट जाली. महाराजांसही बोलणाऱ्यांनीं बोलून ठेविलें. मींही याचप्रमाणें विनंती केली. 'तालुकेची खराबी न होई याअर्थे रहावें, ती गोष्ट होऊं लागले नंतर राहण्याचें काय काम आहे ?' म्हणोन विनंती केली. पुढें स्वामींची आज्ञा प्रमाण. उत्तर येईल त्याप्रमाणें राहणें अगर येणें करितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४२५ श्री. (कार्ति. वद्य—नोव्हेंबर)

[2]सेवेशीं विज्ञापना. बागेवाडीचे मुक्कामीं खासा स्वारी व श्रीमंत पंत प्रतिनिधि व जप्तमुलुक हे सर्वत्र मिळाले. फौज दोन हजार पावेतों जमली आहे. मागाहून रा॥ मानसिंगराव पाटणकर येणार. आज कूच करून गोकाक तालुक्यांत जाणार. गोकाकचे ठाणेंतून देसाई

१ पत्र नारो हरि करंदीकर याचें करवीरकरांच्या लष्करांतून मिरजेस बाळासाहेबांस. २ पत्र नारो हरि करंदीकर याचें मिरजेस. तसेंच पुढच्या नंबरचें.

व देशपांडे निघोन गेले. ठाणेंचें बोलणें जाहलें आहे. कुरबेट व कुण्णूर वगैरे गांवकरी येऊन गेले. गोकाकेस जाऊन तेथील बंदोबस्ती करून रा॥ आपा राजाज्ञा यांसीं मनोळीहून आणवून ते आपण मिळून यादवाड तालुक्यांत जावयाचा बेत असे. लष्करांत कांहीं कैद नाहीं. तालुक्यांत कांहीं बाकी राहत नाहीं. सर्व जाबसाल अविवेकाचा आहे. श्री॥ राजश्री भाऊसाहेब गलगलेचे सुमारें येणार म्हणोन मिरजेहून वडिलांचें पत्र आजच आलें. छ० १६ रोजचें पत्र आहे. येथील बातमी हिंमतबहाद्दरांची आली त्यांत तेंच वर्तमान आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४२६ श्री. (कार्ति० शु० ३–१० नोव्हेंबर)

सेवेशीं विज्ञापना. श्री॥ राजश्री भाऊसाहेबांच्या लष्करांतून पांढरे निसबत राजश्री मनोहरपंत यांजकडून गुरुवारीं अस्तमानीं दोन घटका रात्रीस गडी आला. त्यानें जबानी वर्तमान सांगितलें कीं, गलगलेनजीक फौजा नदी उतरून पार जालेनंतर दुसरे दिवशीं मी निघोन आलों. लष्कर सोडून आज तीन दिवस जाले. दरमजला करवीरच्या रोखें येतात म्हणोन. हेंच वर्तमान त्याच वेळेस महाराजांस सांगितलें. नंतर प्रमाण वाटलें नाहीं. पत्र आलें त्यांत कांहीं मजकूर विशेष लिहिलेला नाहीं. सुरापुरची खंडणी उरकली. कापडसुद्धां खंडणीचे ऐवजीं घेऊन फडशा केला. हजार पायदळ व पांचशें राऊतानिशीं चाकरीस रहावें याप्रों तह झाला. श्री॥ राजश्री आपासाहेब फौजसुद्धां येणार म्हणोन लिहिलें आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १ जमादिलाखर सन तिस्सा तिसैन मय्या व अलफ.

नं. ४४२७

(कार्तिक शु०५–१२ नोवेंबर.)

तें आहे. बाजे गांवांस गुरेंढोरें बंदोबस्तीविशीं ताकीद आहे.

१ हें बहुधा चिकोडीच्या मामलेदाराचें कुरुंदवाडकरांस पत्र. हें इतकेंच अपूर्ण सांपडलें.

परंतु रबीचे दिवस. रानांत न जातां परिणाम नाहीं. बातमी राखून सावधगिरीस अंतर नाहीं. कुरुंदवाडपैकीं एक दिमतीचे लोक दहा असामी रेणदाळचे रखवालीस ठाणेंत पाठवून देतों. गांवांत चौकी पहारा करून राहतील. शिरगांवकर तळी करून सद... व शिर्द-वाडची वाडी व बेडकीहाळ येथून गुरें आमचे गांवचीं घेऊन जातात, भोंवर गांवकरी मार्ग देतात, याजकरितां पत्रें पाठविलीं; परंतु आम्हांस स्वारी दाखल नाहीं म्हणोन उडवाउडव करून पत्र पाठवितात ! त्यांचे हकिमाचे इतलेशिवाय स्वारी निभावून जाणार नाहीं. गांवास लगत गुरें घेऊन जातात. कोणी आडवे होत नाहींत. जाहलें वर्तमान सेवेशीं निवेदनार्थ विनंती लिहिली आहे. बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विज्ञापना.

पै॥ छ० ३ जमादिलाखर सन तिस्ता तिसैन मय्या व अल्फ.

नं. ४४२८   श्री.   (कार्तिक—नोवेंबर.)

राजश्री महादाजीपंत स्वामी गोसावी यांसीं विष्णु कृष्ण नमस्कार. विनंती उपरी. आजच बातमी बोरगांवास करवीरकर आल्याची लिहिली, त्यास इतके जवळ आले त्यांचा विश्वास नाहीं. यास्तव टोकरा सांगडी आहेत, त्यास परिछिन्न मुलें बाळें आजच कागवाडास लावून देणें. गावांत गुरेंढोरें कांहीं एक ठेवूं नये. झाडून गुरें गांवांतील लावून देणें. सडे राहिलें म्हणजे चार दिवस झुंजावयास येईल. पत्र पावतांच आमच्या घरचीं मुलेंबाळें व आणखी ब्राह्मण मंडळींचीं उतरावयाची सोय करून देऊन लावून द्यावी. बेफाम असों नये. एकाएकीं आले तर तुमचा गळाठा होईल. तुम्ही निघोन जाऊं नये. धीर धरोन परिछिन्न झुंजावें. जागां जागां चौकीचा बंदोबस्त राखावा. .... तुम्हीं हिंमत झुजण्याची धरणें. अवसान असावें. गांव मात्र सडा करावा ... ... हे विनंती.

नं. ४४२९ श्री. (कार्तिक शु० ५–१२ नोव्हेंबर)

विनंती सेवक श्रीपाति श्रीनिवास मुकाम बोरगांव साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना ऐसीजे; साहेबांचा निरोप घेऊन बिरादरीसुद्धां ठाणेंस दाखल जालों. पत्रें रा॥ गंगाधरपंतांस प्रविष्ट केलीं. लोकांस, चौकी पाण्याच्या तळ्यावर एक; बाहेर पेठेंत एक, गांवांत मीर अहमदशहाची चौकी, अशा नेमून दिल्या आहेत. चोंहोकडील बातमी आणावयास ठाणेंचे लोकांस पाठविलें आहे. चोंहोकडून खबर आणोन सेवेसीं लिहोन पाठवितों. वरकड मजकूर रा॥ गंगाधरपंत यानीं लिहिला आहे त्यावरोन विदित होईल. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० ३ जमादिलाखर तिस्सा तिसैन मय्या व अल्फ.

नं. ४४३० श्री. (कार्तिक शु० ८–१६ नोव्हेंबर)

पै॥ छ० १९ जमादिलाखर. तिस्सा तिसैन. कार्तिकमास.

सेवेसीं विज्ञापना. ता॥ छ० ७ जमादिलाखर पावेतों सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥ पंतप्रधान खासा व श्रीमंत नाना सत्वरच एकरूप होतील. छ० ५ जमादिलाखरीं बुधवारीं अकरा घटका आवशीचे रात्रीस गुप्तरूपें पंतप्रधान लेखकांकडे आले होते. निखालसता जाहली. किंतु किमपि राहिला नाहींसें दिसोन आलें आहे. चिठी पाहून ठेवूं नये. हा अर्थ चित्तांत असावा. आतां सर्व बंदोबस्त चित्तानुरूप होऊन येतील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. पत्र ठेऊं नये. हे विज्ञापना.

नं. ४४३१ श्री. (कार्तिक शु॥ १३–२१ नोव्हें.)

सेवेशीं गोविंद वासुदेव. चरणावर मस्तक ठेवून शिर सा नमस्कार विज्ञापना ता॥ छ० १२ जमादिलाखर पावेतों यथास्थित

---

१ पत्र कुरुंदवाडकर रघुनाथराव यांस. २ नानांचा विश्वासू कारकून बाळकृष्ण महादेव बाळ याचें हें मिरजेस बाळासाहेबांस पत्र.

असे. विशेष. स्वामींनीं आज्ञापत्र पाठविलें तें पावलें. ऐवज वसूल करून घेऊन येणेंविशीं आज्ञा, त्यास ऐवज वसूल चालीस लाविला आहे. घेऊन आठ दिवसांत येतों. सेवेशीं श्रुत होय. श्री॥ रा॥ विठ्ठलराव बाबा फौजसुद्धां येऊन मौजे रबकवीनजीक तेरदाळ येथें येऊन उतरले आहेत. बरोबर हजार स्वार व पांचशें गाडदी आहेत. सेवेशीं श्रुत होय. गोकाक ठाणें बुधवारीं. पुढें बागेवाडी प्रांतावर स्वारी करणार आहेत. रा॥ देसाई कौजलगीकर यांचे उभयतां चिरंजीव श्री॥ रा॥ विठ्ठलराव बाबा यांजकडे चाकरीस देसाई यांणीं पाठविले. आज प्रातःकाळींच लष्करास जावयाकरितां गेले. तोरगलकर यांणीं लोक हजारपर्यंत जमा केले आहेत. यादवाड प्रांतावर स्वारीस एक दोन दिवसांत येणार आहेत. रा॥ हैबतराव गाइकवाड फौजसुद्धां बागेवाडीवर आहेत. हजार सुमारें स्वार बरोबर आहेत. रा॥ रत्नाकरपंत मनोळीस आहेत. पांचशें स्वार बरोबर आहेत. रा॥ हिंमतबहाद्दर पांचशें स्वारांनिशीं करवीरास गेले. नाना पाटणकर व रत्नाकरपंत उभयतां आहेत. तोरगलकर व रत्नाकरपंत व गायकवाड हे त्रिवर्ग मिळोन यादवाड व गोकाक प्रांतावर राजकारण करणार आहेत. फिरोन ठाणीं बसवून या प्रांतात राहवें, श्री॥ रा॥ भाऊसाहेब यांची फौज उपद्रवास आलिया लढाई द्यावी, म्हणोन बातमी पक्की मनोळीहून आली. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पै॥ छ० १४ जमादिलाखर सन तिस्सा तिसैन मय्या व अल्लफ.

नं. ४४३२ श्री. (कार्तिक व० ५–२८ नोवेंबर.)

नक्कल.

सेवेशीं बाळकृष्ण महादेव. कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ० १५ जमादिलाखर पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून

१ पत्र पुण्याहून गंगाधरराव यांस मिरजस.

सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. राजश्री मोरोपंतांची रवानगी येथून केली ते सेवेशी येऊन पावलेच असतील. श्री॥ राजश्री भाऊसाहेब यांची स्वारी लांबत चालली आहे. कोठपावेतों जाणार हा भाव लिहावयाची आज्ञा होत असावी. सविस्तर मोरोपंतासमागमें पत्र सेवेशीं लिहिलें आहे त्या अन्वयें अमलांत यावें. इकडील वर्तमान तर शिंदे यांच्या व बायांच्या समजीचा विचार ठरत आहे. सत्वरच समजी व्हावी आणि शिंदे याणीं हिंदुस्थानांत जावें हा विचार होत आहे. शिंदे गेल्यावर सर्व बंदोबस्त होऊन येतील. शिंदे यांच्या बाया समजी जाहल्यावर जांबगांवीं राहणार. शिंदे मात्र जातील. सेवकास आज्ञापत्र वरचेवर येत असावें. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४३३ श्री. (२८ नोव्हेंबर)

पै॥ छ० २५ जमादिलाखर सन तिस्सा तिसैन. कार्तिक.

[1]सेवेशीं उभयतांचे साष्टांग नमस्कार विज्ञापना. कार्तिक व॥ ५ वर्तमान यथास्थित असे. विशेष. सरकारांतून दोन हजार आंखी पोषाख व कंठी चौकडा शिरपेंच याजप्रमाणें वस्त्रें कार्तिक शु॥ १० प्रहर रात्रीस एक सांडणीस्वार व पंचवीस राऊत राजश्री बाळाजीपंत पटवर्धन यांजकडील व राजश्री खंडेराव व बाळोजी कुंजर ऐसे वस्त्रें घेऊन × × × × यांचे नाक्यावर गेले. तेथें तोफ जाहली. मग अवघे राजश्री नानांकडे गेले. तेथें चार घटिका बोलोन मागती अवघे जण शिंदे यांचे लष्करांतून पुढें दोन कोश गेले. तेथें पत्रें व वस्त्रें सांडणीस्वार यांजपासीं कुंजर व खंडेराव यांणीं देऊन सांडणी-

---

१ घोंडो बापूजी जोशी व मोरो आपाजी परांजपे यांचें पुण्याहून मिरजेस बाळासाहेबांस पत्र. हें फुल्या घातलेल्या ठिकाणीं फाटून अक्षरें गेलीं आहेत. यांत ज्यास गुप्तपणानें सरकारांतून वस्त्रें जवाहीर पाठविल्याचें लिहिलें आहे तो कोण असावा ? पत्र लिहिणारे तो गृहस्थ परशुरामभाऊच असला पाहिजे असें समजतात ! पण भाऊंकडे वस्त्रें जवाहीर पाठवावयाचें तें गुप्तपणानें काय णून ?

स्वार याचे कानांत सांगितलें कीं, गृहस्थाचें नांव सांगून वस्त्रें व पत्रें देऊन स्वार समागमें देऊन पुढें सांडणीस्वार रवाना केला. कुंजर व खंडेराव पुण्यांत आले. समागमें एका गृहस्थाचा गडी बातमीचा होता. फिरतांना सांडणीस्वार पुढें गेला हें पाहून तो शिंदे यांचे लष्करांत रात्रीस राहोन मग उदईक आला. त्याणें हें वर्तमान सांगितलें. जामदारखान्यांतून व जवाहीरखान्यांतून × × × जमाखर्च करावयाविशीं कारकून × × नांव पुसतात. उत्तर होतें कीं, स्मरण-यादीवर लिहून ठेवावें. असें तीन वेळां उत्तर जाहलें. × × × × × × × × × × × × कडून ऐकण्यांत आला. त्याजवरून वडिलांस लिहिलें आहे. कोणीकडे वस्त्रें गेलीं याचाही शोध लागल्यास मागाहून लिहितों. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. हे वर्तमान बहुत करून पक्कें आहे. श्रीनें कृपा केलीसी वाटते. दैव प्रमाण ! हे विज्ञापना.

नं. ४४३४   श्री. (कार्ति. व. ६–२९ नोव्हेंबर)

सेवेशीं[२] विनती. सेवक सखाराम शेषाद्रि चरणावर मस्तक ठेवून शिर साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत छ० २० जमादि-लाखर गुरुवार प्रातःकाळीं प्रहर दिवसपावेतों मुक्काम बागेवाडी वर्त-मान यथास्थित असे. विशेष. (महाराजांची) खासा स्वारी येथें राहून फौजा गोकाकेस पाठविल्या. तेथें जाऊन दोन दिवस जाले. गोकाककरांनीं बोलणें लाविलें आहे कीं, आम्हीं कांहीं गोळी वाज-वीत नाहीं. तुम्ही बाहेर उतरावें. आम्ही श्री॥ राजश्री भाऊसाहेबांस लिहून पाठवितों. तिकडील आज्ञा येईल त्याप्रों ठाणे देऊं अगर काय तें सांगूं म्हणोन. त्याजवरून राजश्री हिंमतबहाद्दर यांणीं रा॥ हैबतराव गायकवाड यांसीं हुजूरचे सेवेशीं पाठविलें कीं, हुजूरची स्वारी यावी म्हणोन. त्याजवरून आज स्वारी गोकाकेस जाणार.

---

१ सांगितलें कीं अमक्यास हीं वस्त्रें द्यावयाचीं.   २ पत्र बाळासाहेबांस मिरजेस.

कुचाचा नगारा झाला आहे. रा॥ रत्नाकरपंत आपा राजाज्ञा मनोळीहून काल गोकाकेस येऊन फौजेंत मिळाले. खासा स्वारी गेल्यानंतर कडनिकड करून ठाणें घ्यावयाचा बेत आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४३५ श्री. (३० नोव्हेंबर.)

पै॥ छ० २४ जमादिलाखर. सन तिस्सा तिसैन. कार्तिकमास.

[1]सेवेसीं धोंडो बापूजी जोशी शिरसा॥ नमस्कार विज्ञापना. कार्तिक व॥ ७ पावेतों वर्तमान बालकाचें क्षेम असे. विशेष. श्री॥ राजश्री नाना सरकारवाड्यानजीक आपल्या वाड्यांत आले होते. दोन रोज होते. पंचमीस श्राद्धास्तव वानवळे यांचे वाड्यांत गेले अद्यापि येथें आले नाहीं. येथील नानांच्या वाड्यासभोंवते राजश्री आबा काळे याचे लोक आहेत ते निघावे म्हणजे यावें; परंतु काळ्यांस सरकार आज्ञा जाली, परंतु उशीर निघावयास लागला. विना लोक निघाल्याशिवाय (नाना) येथें येत नाहींत. ती॥ राजश्री मोरोपंतदादा येथें असतां श्रीमंतांची स्वारी नानांकडे वानवळे यांचे वाड्यांत गेली. त्याजप्रमाणें नाना येथें वाड्यांत असतां स्वारी गेली. स्वारी गेलियाचें ती॥ राजश्री मोरोपंतदादा सांगतील त्यावरून कळों येईल. बायांचें व शिंद्यांचें मिटत नाहीं. शिंदे खर्चास मागतात यास्तव जंबूसर व सर्व अमदाबाज वगैरे तूर्त दहा लाख (उत्पन्नाचा मुलूख) नानांनीं शिंदे यांस योजिला आहे. हरएक कारभार नानांस कळल्याशिवाय होत नाहीं. वडिलांस व श्री॥ राजश्री रघुनाथराव दादांस येणेंविशीं पत्रें सरकारचीं गेलीं यांजप्रमाणें येथें बोलवा आहे. वडिलांपासीं पत्रें आलीं असतील. [3]वडिलांनीं श्रीपंढरपूर सुमारें भीमेच्या पाण्यावर असावें असें पत्र वडिलांस सरकारचें गेलें आहे अशी बोलवा बहुत जागा आहे.

---

१ पत्र बाळासाहेबांस मिरजेस. २ श्रीमंतांनीं नानांची गप्त भेट वानवळ्यांच्या

फ़हीचा वगैरे दंगा पत्रीं लिहितां येत नाहीं. कांहीं स्थीत राहिली नाहीं. कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

नं. ४४३६ श्री. (कार्तिक—नोवेंबर.)

[1]सेवेशीं विज्ञापना. राजश्री आबाजीपंताकडील कारकून पुण्यास गेला होता तो बुधवारीं संध्याकाळीं आला. त्याकडील वर्तमान शिबंदीकरितां श्रीमंत व पठाणांकडील लोकांत कटकट वाढली. इतक्यांत श्री॥ राजश्री नानांनीं आपले निसबतीचे रोहिले वगैरे लोक पाठवून खटला तोडविला. फुकट ब्राह्मण कारकून दोघे खटला जाला त्यावेळेस ठार पडले. श्री॥ राजश्री अमृतरावसाहेब यांचा अद्याप कांहीं बंदोबस्त ठीक नाहीं. श्री॥ राजश्री नाना मंगळवारपेठेंत वानवळ्याच्या वाड्यांत आहेत. आपले जागीं बंदोबस्तानें आहेत म्हणोन सां[illegible]तें स्वामीचे सेवेशीं विनंती लिहिली आहे. सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४३७ श्री. (कार्तिक व० ८—१ डिसेंबर)

पै॥ छ० २४ जमादिलाखर तिस्सा तिसैन. कार्तिक.

सेवेसीं विनंती सेवक बाळाजी दामोदर व गणेशराम शिर सा॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ० २२ जमादिलाखर मु॥ गंजीहोळ घटप्रभातीरीं सेवकांचें वर्तमान यथास्थित असे. विशेष. श्री॥ राजश्री भाऊसाहेब फौज व तोफखानासुद्धां छ० १९ जमादिलाखरीं घटप्रभा श्रीकृष्णा उतरले. दुसरे दिवशीं छ० २० जमादिलाखरीं घटप्रभा उतरले. श्री॥ राजश्री रामचंद्रपंत आपा कपाटसंगमाजवळ आहेत. अद्यापि श्रीकृष्णा उतरले नाहींत. चिंतामणराव आपा यांचें पत्र रामतीर्थचे मुकामचें जासूद घेऊन आला त्याजवरून बाळाजीपंत भिडे निसबत सुद्धां छ० १९ जमादिलाखरीं (त्यांजकडे) निघोन गेले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ पत्र नारो हरि करंदीकर याचें करवीराहून मिरजेस.

नं. ४४३८ श्री. (कार्तिक व० १३–५ डिसें.)

सेवेशीं विज्ञापना. ता. छ० २६ जमादिलाखर बुधवार दोन-प्रहर दिवस पावेतों मुक्काम लष्करनजीक मौजे हुणधोळी परगणे गोकाक वर्तमान यथास्थित असे. विशेष. मौजे मजकूर हा गांव आडमार्गीचा यास्तव आसपासचे गुळेंकरी येऊन गांवांत राहिले होते. बातमी राखून काल राजश्री आपा रांजाज्ञा फौजसुद्धां आले असतां गांवकरांनीं गोळी मारली. सबब हुजूरची स्वारी येथें येऊन गांव हल्यानें घेऊन लुटून जाळून फस्त करून दिला. माणसें बहुत मारलीं गेलीं. बायका मुलें नागवून सोडलीं. गांवची अवस्था अशी झाली. सुणधोलीनजीक नदीवर आज डेरे जाहले. कुलगोड गांव जरार करणेंविशीं लिहिलें असतां 'गांव जरार करावा तर कोठें जावें ? जागा नाहीं. तुमचे भरंवशावर आम्ही आहों. बंदोबस्त कळेल तसा करावा,' म्हणोन राजश्री गोविंद वासुदेव यांणीं लिहिलें आहे. येथील विचार स्वामींस विदितच आहे. त्यांचे लिहिणेंवरून पांच राऊत रखवालीस पाठवून दिले. रोखे पत्रें किती होतात नकळे ! सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नं. ४४३९ श्री. (मार्ग. शु. १–८ दिसेंबर.)

नकल.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री माधवरावजी स्वामीचे सेवेशीं. पोष्य गंगाधर गोविंद सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ० २९ जमादिलाखरपावेतों जाणून स्वकीय कुशल लिहीत आसिलें पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. " राजश्री भाऊप्रकरणीं अलीकडे माघारे आणवावे हा मजकूर जाहला होता. आपणास कळलाच आहे. त्या अलीकडे बहुतच नेट पडला तेंव्हां इकडूनही मर्यादा सोडून उत्तरें

१ पत्र मिरजेस बाळासाहेबांस. २ रास्ते.

जाहली. तट पडला तेव्हां पुर्तेपणें सरकारांतही समजलेनंतर ठरावांत आलें कीं, दरबारखर्चासुद्धां पंधरा लक्ष रुपये द्यावे आणि वस्त्रें व सरंजामाच्या वगैरे सोडचिट्या घ्याव्या. हा मजकूर आपणांस कळावा. तिकडे भाऊंसही लिहिलें आहे. परंतु काल देश वर्तमान ध्यानांत आणून आपणही त्यांस लेहून ज्यायोगें उलगड्यांत येईल तें करावें. ओढ धरली असतां दोन्हीं दौलतींस कल्याण नाहीं असें समजून वडिलांनीं ठरावांत आणून आम्हांस लिहिलें व राजश्री बाबा फडणीस यांस मुजरद (भाऊंकडे) पाठविलें. त्याजवरून त्यांची रवानगी भाऊंकडे केली. आपणही वडिलांस ल्याहावयाचे प्रकार लिहून लौकिक राही असें व्हावें. पुण्याकडील वर्तमान यजमान व फडणीस एकविचारें आहेत. बायांचे व शिंद्याचें समेटांत आणून यादी ठराव होत आहेत. परिणाम लागेल तो खरा !'' म्हणून लिहिलें तें कळलें. ऐसीयास ती॥ राजश्री भाऊसाहेब यांस आपण सातारेनजीक आणिलेपासोन सहा महिने जाहले. फौज जमा जाहली, सरकार चाकरी जाहली, ती आपले समक्षच जाहली. आजपावेतों पंधरा सोळा लक्ष रुपयांचे पेचांत वडील आले. आपण तो यत्न करीतच आहां. परंतु ऋणानुबंधेंकरून सहा महिने जहाले. फौजेचा पेंच निराळा, सरकारांत पंधरा लक्ष मागतात, पूर्वीचें कर्ज सरकारांत येणें, सावकारी पेंच वडिलांवर कसे, हें आपणांस विदित आहेच. सातारचे मुक्कामीं ठरणेंत आलें त्या द्विगुणित हल्लींची बेरीज जाहली. फौजेचे पेचांतून निघोन अबरू कशी राहील हें संकट प्राप्त आहे. आपणांस सर्व अवगत, तेथें विस्तार काय ल्याहावा ? आपण लिहिलेप्रमाणें विनंती वडिलांस लिहून पाठविली आहे. जें सातारचे मुक्कामीं ठरलें त्या अन्वयें ठरावांत आणून मुदत फुरसतीनें वागवून निकालांत येई असें करावें. सरकार व फौज दोनी खर्च म्हणतां लज्जारक्षक

१ आनंदराव रास्ते यांनीं.

श्रीगजानन किंवा आपला यत्न! दोन रक्षक. तेथें लिहावें असा प्रकार राहिला नाहीं. सदैव पत्रीं वर्तमान लेहून संतोषवावें. वडिलांचें अगत्य आपण धरून कीर्ति संपादिली ती जगप्रसिद्ध आहे. जेणें-करून श्रीमंतांची कृपा वडिलांवर होऊन परिणाम सुधारणार आपण आहेत. दिवसेंदिवस करवीरवासी महाराजांची प्रबळता जाहली हें चांगलें नाहीं. बहुत काय लिहिणें कृपा लोभ निरंतर असों द्यावा. हे विनंती.

नं. ४४५० श्रीगणराज. (मार्ग॥ शु. ४–११ डिसेंबर)

रा॥ जैनगुरुगोळ मठ मौजे नांदणी गोसावी, यांस—

स्ने॥ गंगाधरराव गोविंद, सु॥ तिस्सा तिसैन. मय्या व अलफ. रेवापा केंचाण्णा रयत मौजे कुपवाड यानें विदित केलें कीं, " आपली लेक लिंबी लिंगापा जैन यास देऊन लग्न केलें. नंतर तो निघून गेला त्याचा पत्ता कोठें लागेना. पोरगी थोर झाली. तेव्हां लिंगापाचा भाऊ सावंता यास विचारिलें. त्यानें सांगितलें कीं, लिंगापा हल्लीं कोठें आहे त्याचा पत्ता लागत नाहीं. तेव्हां त्यापासून सोड-चिठी लिहून घेऊन मी आपले लेकीचा पाट लाऊन दिला. त्यास गुदस्तां त्या पोरीचा दादला लिंगापा सरकारांत फिर्यादीस आला कीं, मी लग्नाचा दादला जिवंत असतां माझे बायकोचा पाट लागला त्यास माझी बायको माझे हवालीं करवावी. त्यावरून लग्नाचे दाद-ल्याचे हवालीं बायको झाली. परंतु आमचे जातींत पाट लागलेली बायको फिरोन लग्नाचे दादल्याचे घरीं नांदावयाची नाहीं. पोरगीही तेथून निघून आली. ती पाटाकडे द्यावयास आज्ञा व्हावी म्हणून." ऐशियास ही जैन जातीची गोष्ट. याकरितां तुम्हांस हें पत्र लिहिलें असे. तरी येविशींची चौकशी पुर्तेपणें करून तुमचे जातींत चाल असेल त्याप्रों लिहून मिरजेस सरकारांत पाठविणें. उपरांतिक रेवापा केंचाण्णास आज्ञा होणें ती होईल. जाणिजे. छ० २ रज्जब. सु॥ तिस्सा तिसैन मय्यी व अलफ. बहुत काय लिहिणें.

नं. ४४५१ श्रीशंकर प्रसन्न. (मार्ग० शु० ६-१३ डिसेंबर)

पै॥ छ० ९ रज्जब. मार्गशीर्षमास. सन तिस्सा तिसैन.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री गंगाधररावजी स्वामीचे सेवसीं.

पोष्य माधवराव अनंत. सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ० ४ रज्जबपावेतों यथास्थित असे. विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. "ती॥ राजश्री भाऊसाहेब यांस आपण सातारियानजीक आणिल्यापासोन सहा महिने जाहले. फौज जमा जाली ते आपले समक्षच जाहली. पंधरा सोळा लक्ष रुपयांचे पेचांत वडील आले. आपणही यत्न करीत आहांच. परंतु ऋणानुबधेंकरून सहा महिने झाले. फौजेचा पेंच निराळा, सरकारांत पंधरा लक्ष मागतात, पूर्वीचें कर्ज पेंच हें विदित आहेच ! सातारियाचे मुकामीं बेरीज ठरण्यांत आली त्याचे द्विगुणित हल्लींची बेरीज जाहली. फौजेचे पेचांतून निघून अबरू कशी राहील हें संकट प्राप्त आहे. आपण लिहिल्याअन्वयें वडिलांस लेहून पाठविलें आहे. सातारियाचे मुक्कामीं ठरल्याअन्वयें ठरावांत आणून मुदत फुरसतीनें निकालांत येई असें करावें." वगैरे विस्तारेंकरून लिहिलें, ऐसीयास भाऊ प्रथम आले ते वेळेचा (श्रीमंतांच्या) मर्जीचा डौल कोणते प्रकारचा होता ! युक्ती प्रयुक्तीनेंच मार्ग निघाला त्याप्रमाणें येथील मुक्कामींच अर्थ घडला नाहीं. येथून जाण्यामुळें व फौजबंदी करून आज्ञेखेरीज तमाम सरकार तालुका खराब केला हा रोष पुर्ता (श्रीमंतांच्या) मनांत येऊन कांहीं बोलणें चालेना. दोनी दौलतींवर बदनजर दिसोन आली. नित्यनित्य बोलण्याचे पाठ शेवटचे होऊं लागले. भाऊंच्या कल्याणाविशीं इकडून हरतऱ्हेनें प्रयत्न केले. शेवटीं नेटाचीं बोलणीं पडून जे गोष्ट समक्ष बोलतांच नये ऐसी

१ रास्ते.

मर्जी जाली. होती ते पराकाष्टा जाली यामुळें या बोलण्यावर आले. याचा विस्तार पत्रीं कोठवर ल्याहावा? येथें अडीच तीन महिने जाले एके ठिकाणीं मुक्काम. उलगडा पाडावा, नंतर कूच करावें, असा पुर्तेपणें बेत तेथें समजला. या मर्जीच्या दिवसांत या घाटास गोष्ट आली. त्यास परिहारेंकडून बोलण्यास कसें होईल? झालेला मजकूर आपणांस कळावयाकरितां लिहिला. कां कीं सर्व प्रकारें आपणांस भाऊंच्या कल्याणाचा उत्सव. दुरंदेशी पाहून विचाराचा अर्थ लेहून राज्यांत कीर्ति तेंच मेळवावें. असा समय पुढें प्राप्त होतो न होतो याचाही आभासच आहे. येथून तो श्रमाविशीं शेवटच जाला. चार रुपये अधिक वेगळे पडतात, परंतु सर्व प्रशस्त गोष्ट होती. त्यास कागद पत्र जातां येतांच विलंबावर पडून मागती काय संशय होईल हें नकळे! व भाऊंनीं होनगुंदें गजेंद्रगड प्रांतांत इतकें लांब जावयाचेंही कारण नव्हतें. असो. हा प्रकार सिद्ध जाला. यास आपलें बल पडून शेवटास नेला असतां सर्व यश आहे. बहुत काय लिहिणें. सारांश तूर्त काम उलगड्यांत आणून मोकळें व्हावें. मग जसा प्रसंग तसें करावयास येईल. लोभ करावा हे विनंती.

नं. ४४४२ (मार्ग. शु० १२–१९ दिसें.)

बाळकृष्णपंत भाऊ बाळ यांस बाळासाहेब यांचें पत्र मिरजेहून पुण्यास. रवाना १० रज्जबचें—

" करवीरकरांच्या दंग्यामुळें आज तीन वर्षें आमच्या तालुक्याची अवस्था हा काळपर्यंत कशी जाली हें सर्व तुम्हांस दाखलच आहे. राजश्री मोरो आपाजी सांगतील त्याप्रमाणें राजश्री नाना फडणीस यांस श्रुत करावें. "

नं. ४४४३ श्री. (मार्ग० शु० ९–१६ डिसेंबर)

पै॥ छ. १३ रज्जब सन तिस्सा तिसैन. मार्गशीर्ष.

सेवेसीं विनंती सेवक गोविंद शामराव [illegible]॥ नमस्कार विज्ञापना तागायत छ० ७ रज्जेबपावेतों सेवकाचें व[illegible]न यथास्थित असे. विशेष. स्वामींनीं पत्र छ० १ रज्जबचें पाठा[illegible] तें छ. ४ मिनहूस येऊन पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कळलें. इकडील वर्तमान श्रीमंत आपासाहेब व दाजीसाहेब कोपळचे सुमारें छ० ६ रज्जबीं गेले. समागमें सात आठ हजारपर्यंत स्वार व पायदळ दोन हजार पर्यंत समागमें आहे. त्याच मार्गें श्रीमंत भाऊसाहेब दोन कोसांच्या तफावतीनें जात आहेत. आज पुण्याहून राजश्री लक्ष्मणपंत बाबा फडणीस व वेदमूर्ति बापूभट दिम्मत रास्ते, हे उभयतां श्रीमंतांकडे कांहीं बोलावयास आले आहेत. मसलत काय ठरती पहावी. अनागोंदीस टिपूकडील जमाव पायचें माणूस एक हजार व स्वार पांचशें पर्यंत आपले सरदेस आले आहेत त्याची बातमी आज आली आहे. राजश्री तिमराव पारसनवीस येथून निघोन पूर्वेकडे गेले आहेत. स्वामीस वर्तमान कळलेंच असेल. येथे श्रीमंतांजवळ जमाव फौज राजश्री हरीपंत धायगुडे व आपलें पथकसुद्धां सहा हजारपर्यंत आहे. राजश्री विठ्ठलराव बाबा हणमसागरचे सुमारास आले. दोन चार दिवसीं फौजेस येऊन मिळतील लष्करांत धारण बीतपशील:—

तपशील.

००२॥	जोरी कैली मापें.		नाण्याचा भाव मलकापुरीस
००२	हरभरे.		(होनांचा दर.)
००॥।·	मीठ कैली माप	५	एकेरी.
००३।·	गहूं.	४॥२	धारवाडी.
००१॥·	तांदूळ.	४।·	अदवानी.
	वजनी वजन कच्चें	४।२	जमासिरी.
	(दर मणीं रु.)	४	चागरी मोती.
९	तूप.	४।२	सतारी व

४	गूळ.		महमदशाही.
६	तेल.		बट्टा मलकापुरीस.
११	साखर.	२८	मल्हारशाही
१२	सुपारी.	२९	फुलचेरी
७	खोबरें.	२०	चांदवडी
३	हळद.	१८	जुने हुकेरी
		१६	नवे हुकेरी
			खुर्दा टके ३

येणेंप्रमाणें आज भाव आहे.

नं. ४४४४ श्री. (मार्ग० शु० ११–१८ डिसेंबर.)

पै॥ छ० ९ रज्जब. सन तिस्सा तिसैन.

[1]सेवेशीं विज्ञापना.. पाच्छापुरांतील ब्राम्हण असामी पन्नास साठ व बायका व मुली पावणाशें शंभरपर्यंत गांवांतून निघाले. कोठें तरी भीक भागून रहावें याअर्थें जात होतीं. बायकांच्या नाकांतील मोतीं व गळ्यांतील मंगळसूत्रसुद्धां हरण जालें होतें ! व पुरुषांस दोन दोन हात लज्जारक्षणार्थ वस्त्रें होती. तशींच बायकांस. हें वर्तमान राजश्री रघुनाथ माने अंधळीकर[2] हे करवीरासच आहेत–ते लष्करांत आहेत–त्याणीं ब्राम्हणांस एक एक धोतर व तितक्या बायकांस मंगळसूत्रें हरण करून आणिलेलींच आपण खरेदी करून घेऊन दिलीं. गांवांतील नागवणेंचा विस्तार पत्रीं कोठवर ल्याहावा ? भादे-[3]ल्यांतून ब्राम्हण वगैरे पाणी पितात, यापरतें आणखी काय ल्याहावें ? माने याणीं पदरचे दोन तीनशें रुपये खर्च करून धर्मकृत्य केलें व तितक्या मंडळीस एक रोज भोजनाचें साहित्य दिलें. याप्रमाणें जालें.

---

१ नारो हरि करंदीकर याचें पत्र मिरजेस, करवीरकरांच्या लष्करांतून.
२ करवीरकरांच्या नोकरीस आहेत. ३ भदेलें, भादेलें, भदें, = मडक्याचा कपरा.